सप्रेम नमस्कार

सोबत 'रुची' दिवाळी अंक पाठवला आहे.

आपली प्रतिक्रिया जाणण्यास उत्सुक आहोत.

दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छांसह

आपले स्नेहांकित

सुदेश हिंगलासपूरकर, विश्वस्त

अरुण जोशी, संपादक

आणि

ग्रंथाली परिवार

ग्रंथाली

ग्रंथाली वाचक चळवळीचे

# रुची

दिवाळी अंक

ऑक्टोबर - नोव्हेंबर २०१०

मूल्य ८० रुपये

## भारतीय पर्यावरण
## आणि
## महासत्तेचा वेध!





# रुची

**ऑक्टोबर–नोव्हेंबर २०१०**
**वर्ष ३० वे, दिवाळी अंक, मूल्य ८० रु.**

संपादक : **दिनकर गांगल**
या अंकाचे संपादन : **अरुण जोशी**
मुखपृष्ठ : **सुनील महाडिक**
आतील चित्रे : **सतीश भावसार**
मांडणी : **योगिता मोरे**
वितरण व्यवस्था : **सुदेश हिंगलासपूरकर**
**रुची – वार्षिक वर्गणी : १०० रुपये**
**डिमांड ड्राफ्ट, म.ऑ. 'ग्रंथाली' नावे**

पत्रव्यवहार/वर्गणी पाठवण्याचा पत्ता
ग्रंथाली, इंडियन एज्युकेशन सोसायटीची
म. फुले कन्याशाळा, बाबरेकर मार्ग, दादर (प),
मुंबई ४०० ०२८
फोन : २४४७ ४८ ४३
Email - granthali01@gmail.com

**अंकात प्रसिद्ध झालेली मते ज्या त्या व्यक्तीची. 'ग्रंथाली' चळवळीचे 'रुची' हे व्यासपीठासमान मासिक आहे. त्यात सर्व छटांच्या विचारांना स्थान आहे. मात्र त्याच्याशी 'ग्रंथाली' विश्वस्त संस्था व तिचे विश्वस्त सहमत आहेत असे नव्हे.**

## अनुक्रम

### लेख

**माई** / प्रवीण बर्दापूरकर / ९
**प्रतिसृष्टी...!** / डॉ. सिद्धिविनायक बर्वे / १९
**मेस्मर आणि त्याचा संमोहनप्रभाव** / अच्युत गोडबोले / २४
**अब दिल के बहलने की उम्मीद नही बनती...** / कुमार नवाथे / ३२
**माझ्या आठवणीतले तात्या** / रोशन दाते (बेदरकर) / ३९
**धोतर, कुडता आणि पायजम्याचा अर्थ** / गिरीश कुबेर / ५९
**एक 'सार्वजनिक' कैफियत** / हेमंत देसाई / ६४
**नक्षलवाद – आज आणि काल** / देवेंद्र गावंडे / ८८
**मार्क्स आणि गांधी** / शिरीष वीरकर / ९५
**बदलते विश्व** / डॉ. यशवंत पाठक / ९९
**चोरबाजाराच्या अंतरंगात** / अरुण पुराणिक / १०८
**देशाच्या 'नियोजन' सदनात...** / हेरंब कुलकर्णी / ११६
**वृद्धत्वाचे नवे सामाजिक आयाम** / नीलिमा भावे / १२८
**आकाश झालेला माणूस!** / माधवी घारपुरे / १४३
**झाला थोडासा उशीर...** / आशुतोष जावडेकर / १५१
**माझे पुणेरी दादा** / अनुराधा गांगल / १५५
**जनसंवाद** / सु.गो. तपस्वी / १६०

### मुलाखत

**अचला जोशी यांच्या 'आश्रम नावाचं घर' या 'फॅक्शन'ची निर्मिती**
मुलाखत – प्रा. वि.शं.चौघुले आणि उषा मेहता / ४७
**'भारत आर्थिक महासत्ता होणार!' – डॉ. नरेंद्र जाधव**
मुलाखत – लतिका भानुशाली / ७४
**'समृद्धी हाच चीनचा धर्म' – अनिल चौधरी**
मुलाखत – लतिका भानुशाली / ८१

### कथा

**निर्णय काय घेता?** / डॉ. द. व्यं. जहागीरदार / ५३
**'चोर मिळेल का, चोर?'** / संजय बोरुडे / १०४
**कोंब** अनुवाद – सुषमा शाळिग्राम /
मूळ गुजराती लेखिका – वर्षा अडालजा / १२२
**सरकारी खिचडी** / सुभाष सुंठणकर / १६९
**ऋणानुबंधी** / प्रभा पुरोहित / १७९

### कवितेचं व्यासपीठ / १३५

डॉ. यशवंत मनोहर, सतीश सोळांकूरकर, सदानंद डबीर, प्रदीप गुजर, अशोक कोतवाल, ऐश्वर्य पाटेकर, गोविंद मोतलग, दत्ता हलसगीकर, बबन सराडकर, निलेश मदाने, सरोज जोशी, डॉ. यशवंत भागवत, प्रकाश खरात, उषा मेहता

## संपादकीय

रुचीच्या एप्रिल महिन्याच्या अंकात 'पुस्तकभिशी' हा लेख प्रसिद्ध केला होता. वेच्या रुध्या गावीत हा तरुण शिक्षक. प्रगत महाराष्ट्रातल्या कर्जतजवळच्या खेड्यात आजही त्याला रोज दहा किलोमीटर चालत शाळा गाठावी लागते. तशातही तो शिक्षकांकडून आणि मुलांच्या खाऊच्या पैशांतून काही पैसे जमवून पुस्तकभिशी सुरू करतो. त्यांना व सहकारी शिक्षकांना वाचनाचं महत्त्व पटवतो. अशी ऊर्जा असलेल्या माणसांची दखल घेणं ग्रंथालीनं महत्त्वाचं मानलं आहे. परिस्थितीचं भान देणारा जनसंवाद ग्रंथालीनं नेहमीच साधलाय. म्हणूनच गणपतीच्या निमित्तानं मांडलेल्या 'ध्वनिप्रदूषण आणि कार-विकार' या विषयाला चांगला प्रतिसाद मिळाला. पर्यावरण हाच विषय घेऊन, चित्रकार-कवी शांताराम पवार यांच्या अस्वस्थतेतून 'ऋतुसंहार' हे जे प्रदर्शन उभं राहिलं त्याचा वृत्तांत गेल्या अंकात प्रसिद्ध केला. पर्यावरण म्हणजे 'वृक्ष लावा, वृक्ष जगवा' इतका अर्थ आपण जाणतो. तो बऱ्याचदा, मोठ्या दुर्घटनेनंतर लावलेल्या मेणबत्त्यांसारखा थोड्या काळात विझून जातो. या वास्तवाच्या पार्श्वभूमीवर भारताचा महासत्तेकडे जाण्याचा प्रवास पाहायला हवा असं वाटलं. यातून या अंकाचा 'भारतीय पर्यावरण आणि महासत्तेचा वेध' हा विषय घडत गेला. सामाजिक आणि विशेषत: आर्थिक स्तरावर होणाऱ्या विभाजनामागची पार्श्वभूमी, वास्तव आणि उद्याची आशा पाहणं औत्सुक्याचं वाटलं. कारण काळ बदललाय तसे प्रश्नही बदललेत.

'सांग सांग भोलानाथ, पाऊस पडेल काय?' असे भाबडे प्रश्न मागे पडले आहे. 'मी नाही' ही मानसिकता जाऊन 'मी का नाही?' अशी वृत्ती निर्माण झाली आहे. आर्थिक उदारीकरणाच्या वाऱ्यामुळे निर्माण झालेल्या स्पर्धेत 'भारत महासत्ता होणार का?' हा आणखी एक प्रश्न चर्चेत आलाय. भारत व चीन महासत्ता होणार या आंतरराष्ट्रीय भविष्यवाणीनं आपण सुखावतोय. मात्र जागतिकीकरणाचा आपण लावलेला अर्थ आणि आपला अर्थांधळेपणा पकडून गिरीश कुबेर यांनी वास्तवाची जाण करून दिली आहे. इथल्या सार्वजनिक उद्योगांची कैफियत मांडून हेमंत देसाई यांनी स्वातंत्र्योत्तर भारताच्या सरकारी धोरणांवर नेमकं बोट ठेवलं आहे.

१९७८ आणि १९९१ या वर्षांत अनुक्रमे चीन व भारतानं आर्थिक उदारीकरण स्वीकारत परदेशी गुंतवणुकीसाठी विंडोज् नाही तर दारंच सताड उघडी केली. या दोन शेजाऱ्यांची त्याबाबतची मानसिकता, धोरणं आणि त्यामुळे महासत्तेपर्यंत पोचण्याची शक्याशक्यता लतिका भानुशाली यांनी, डॉ. नरेंद्र जाधव आणि अनिल चौधरी यांच्या घेतलेल्या स्वतंत्र मुलाखतींमधून उलगडते. त्यात भारतीय नियोजन मंडळाचे सदस्य डॉ. नरेंद्र जाधव यांनी भारत आर्थिक महासत्ता होईल असा आशावाद मांडताना आपल्या विचारांना नवा दृष्टिकोन दिला आहे. चार वर्षांपासून चीनमध्ये वास्तव्यास असलेल्या, लार्सन ॲन्ड ट्युब्रो या कंपनीच्या तिथल्या प्रकल्पाचे मुख्य कार्यकारी अधिकारी असलेल्या अनिल चौधरी यांच्या मुलाखतीतून चीनचं अंतरंग स्पष्ट होतं.

कोऽहम्? हा मानवाला पडलेला सनातन प्रश्न आणि माझं अस्तित्व काय आणि कशासाठी ही त्या प्रश्नाची रुपं तात्त्विक विचारमंथनापुरती उरली आहेत. आता, 'सोऽहम्' असं उत्तर देणारा 'प्रतिसृष्टी'चा डीएनए मानवानं बनवलाय. क्रेग व्हेंटर यांनी तयार केलेल्या डीएनएनं 'माणूस देव होणार का?' या प्रश्नावर आणून ठेवलंय. जैवतंत्रज्ञानाच्या या क्रांतीचा व भविष्यातील परिणामांचा आढावा डॉ. सिद्धिविनायक बर्वे या अंकात घेत आहेत. तर एकूणच तंत्रज्ञानाच्या धबडग्यामुळे निर्माण झालेल्या बदलत्या विश्वाचा लेखाजोखा यशवंत पाठक यांनी मांडलाय.

आपल्या अजब प्रयोगांनी जगाला संमोहित केलेल्या मेस्मरची ओळख अच्युत गोडबोले यांनी करून दिली आहे. प्रवीण बर्दापूरकरांनी, 'माई'चं रेखाटलेलं चित्र आणि कुमार नवाथे यांनी मांडलेली, रेडिओ सिलोनच्या वैभवशाली इतिहासावर काळानं उगवलेल्या सुडाची व्यथा अंतर्मुख करणारी आहे. प्रसिद्ध कथक नृत्यांगना रोशन दाते यांचं बालपण

नाशिकचं. कविश्रेष्ठ वि.वा. शिरवाडकरांचा अनेक वर्षांचा शेजार त्यांना लाभला. त्यांच्या आठवणी वेगळ्या तात्यांचं दर्शन घडवतात.

उषा मेहता आणि वि.शं. चौघुले यांनी 'आश्रम नावाचं घर'च्या निमित्तानं अचला जोशींची घेतलेली मुलाखत, हेरंब कुलकर्णी यांचे नियोजन मंडळातील अनुभव, देवेंद्र गावंडे यांनी उघड केलेला नक्षलवाद आणि अरुण पुराणिक यांनी मुंबईतल्या चोरबाजाराचा सांगितलेला रोचक इतिहास अशा विविध लेखांनी अंक वाचनीय झाला आहे. नेहमीप्रमाणे कथा-कविता आहेतच.

विशेष उल्लेख करायला हवा तो सुनील महाडिक यांचा. आपल्या व्यस्ततेतही त्यांनी आमच्या आग्रहाखातर उत्कृष्ट मुखपृष्ठ तयार करून देताना उत्स्फूर्त प्रतिसाद दिला व मुखपृष्ठामागची भावनाही थोडक्यात लिहून दिली. सतीश भावसारांनी नेहमीच्या सरावानं उत्तम चित्रं रेखाटली. या दोन्ही कलावंतांचे मन:पूर्वक आभार. शकुंतला मुळ्ये यांनी प्रूफांवर एक नजर फिरवून मुद्रितशोधनाचं काम त्वरित करून दिलं. त्यांचे आभार.

अंकाच्या तयारीत उषा मेहता, लतिका भानुशाली यांचं साहाय्य तेवढंच मोलाचं आहे. दर अंकाप्रमाणे याही अंकासाठी दिलीप चावरे आणि विनायक गोखले यांनी अंकाला योग्य आकार येत असल्याकडे कटाक्ष ठेवला. सुदेशचा पाठिंबा आणि प्रदीप गुजर, शिवाजी धनके, योगिता मोरे व अरुणा सावंत यांच्या सहकार्यातून तयार झालेला अंक इंडिया प्रिंटिंग वर्क्सच्या आनंद लिमये यांनी तितक्याच आत्मीयतेनं छपाई करून सिद्ध केला.

हितचिंतक व जाहिरातदारांनी अंकाला आर्थिक बळ दिलं. त्यांचे आभार.

भारत महासत्ता होईल का, माणूस देवच होतोय का, संस्कृती बदलत आहे का?... काहीही झालं तरी सण-उत्सव साजरे होतच राहतील. भारतीय समाज इतका एकलकोंडा नाही, त्यामुळे समूहानं व्यक्त होता येणारी साधनं टिकतील. दिवाळी अंकाचं माध्यम बदलेल कदाचित, इ-मेलवर ग्रीटिंगसोबत आकार बदलणाऱ्या रांगोळ्याही दिसतील, दिवाळी अंक बोलकेही होतील, पण येतच राहतील.

दिवाळीच्या हार्दिक शुभेच्छा! पुढील अंक डिसेंबरचा.

**- अरुण जोशी**

देणाऱ्याने देत जावे
घेणाऱ्याने घेत जावे
घेता घेता एक दिवस
देणाऱ्याचे हात घ्यावे.

विंदांची ही कविता बऱ्याच अंशी
एखाद्या लाईट हाऊससारखी माझ्या
जगण्याला मार्गदर्शन करीत असते.
मनुष्यप्राणी जर वृक्ष झाला, तरच
रानावनात वाढणारे वृक्ष जगू शकतील
आणि पर्यायाने आपण...
हे ह्या कलाकृतीतून प्रतीत होते आहे.
काही समविचारी मित्रांसमवेत
Sons of Soil ही निसर्गप्रेमी संस्था
स्थापन केल्यानंतर ह्या संस्थेच्या
बोधचिन्हाच्या रूपाने हे विचार
चित्ररूप केले आणि ते बोधचिन्हाच्या
पलीकडे पोचावेत म्हणून त्याला
शिल्परूप दिले.

**- सुनील महाडिक**



# माई

## प्रवीण बर्दापूरकर

आईला आम्ही माई म्हणत असू. हे संबोधन कुणी सुरू केलं, का केलं वगैरे काहीच माहीत नाही. माईलाही ते नेमकं आठवत नव्हतं. मी मॅट्रिकला असताना कधीतरी एकदा तिला, 'तुला माई का म्हणायचं आई असून?' असा प्रश्न विचारला तेव्हा ती क्षणभर गप्प झाली आणि मग म्हणाली, 'माई म्हटल्यानं आईपण संपतं का?' अनेकदा असे निरुत्तर करणारे, पण खूप काही सांगणारे प्रश्न ती उपस्थित करत असे.

आपल्याला आई आहे वगैरे हे कळलं तेव्हा मी सातआठ वर्षांचा असेन; आणि पक्कं आठवतं, की तेव्हा मी इयत्ता दुसरीत होतो. खामगावच्या पूरवार गल्लीत, मागे शेत असलेल्या एका वाड्यात आम्ही राहत असू. ते माझं आजोळ होतं. आजोळचं आडनाव खोडवे. आईचं माहेर. पाच मामा होते. ते बहुतेक सर्वजण शिकत किंवा जगण्याची काहीतरी धडपड करत होते. आजी होती आणि आजोबाही होते. आजीला 'अक्का' आणि आजोबांना 'भाऊ' म्हणत असत. भाऊ खामगावातल्या तेव्हाच्या फरशीला लागून कोणा मारवाड्याच्या पेढीवर मुनीम होते. त्याच मारवाड्याचा तो वाडा होता. वाड्याच्या बहुसंख्य भागात कडबा आणि एका भागात सरपण. त्यामुळे घरात किड्या-मुंग्यांचा सार्वत्रिक वावर असायचा. लाइट अर्थातच नव्हते. घरोघर लाइट असण्याचा तो काळही नव्हता. वयानं सर्वांत लहान असलेला मी 'माईचं लेकरू' म्हणून त्या घरात सगळ्यांकडून ऐकून घेत राहत होतो, शिकत होतो.

एके दिवशी, 'माई येणार', असा गलका झाला. दुपारच्या सुमारास एक मामा डोक्यावर लोखंडाची पेटी घेऊन आला. त्याच्या पाठोपाठ एक पावणेपाच-पाच फूट उंचीची, जाडंभरडं पातळ नेसलेली, गोरी आणि अतिशय आश्वासक चेहरा असलेली बाई आली. अक्का आणि भाऊंची ती सगळ्यात मोठी मुलगी. अर्थात, हे नंतर कळलं. ती आधी भाऊंच्या पाया पडली. अक्काच्या गळ्यात पडली आणि मग उभ्या असलेल्या पाच मामांनी पटापटा तिच्या पायांवर डोकं ठेवलं. एका लाकडी चौकोनी खांबाआडून मी हे सगळं पाहत होतो. मग तिचं माझ्याकडे लक्ष गेलं. पुढे होऊन तिनं मला जवळ ओढलं तेव्हा सर्वांत प्रथम जाणवला, तो तिचा मुलायम स्पर्श आणि त्यानंतर अश्रूंच्या कोमटपणातून तिचं मातृत्व. मग त्या लोखंडी पेटीतून एक पितळेचा डबा काढून, तिनं एक भला मोठा रव्याचा लाडू माझ्या हातात दिला आणि तो डबा अक्काकडे सोपवला. मी लाडू खाण्यात गुंग झालो

आणि घरात सुरू असलेल्या, माईच्या येण्यानं सुरू झालेल्या गलक्याचा मला विसर पडला.

आई म्हणून माईचा हा पहिला स्पर्श आजही माझ्या मनात आहे. चार-पाच वर्षांपूर्वी बसोली ग्रुपच्या एका कार्यक्रमासाठी खामगावला गेलो, तेव्हा पुरवार गल्लीत जाऊन तो वाडा शोधण्याचा प्रयत्न केला. सगळं बदललेलं होतं. नेमकं काहीच गवसलं नाही. माईचा स्पर्श झाल्याचा भास झाला आणि मागच्या शेतात जाऊन अनेकदा खालेल्या बोरांची चव जिभेवर रेंगाळू लागली...

यानंतरची आठवण एकदम नेकनूर नावाच्या बीड जिल्ह्यातल्या खेड्यातील आहे. तिथं माईसोबत आम्ही चारही भावंडं राहत असू. माई नर्स होती आणि त्या काळात-म्हणजे पन्नाशीच्या दशकात- अडल्या-नडलेल्यांना आहे त्या गोळ्या देणं, झालेल्या जखमा बांधणं, बाळंतपण करणं वगैरे कामं ती करत असे.

नेकनूरच्या काळातलं फार काही आठवत नाही, पण वडील अधूनमधून येत असत. त्यांना आम्ही अण्णा म्हणत असू. तेव्हा ते औरंगाबादला कुठंतरी नोकरी करत होते. ते घरी असण्याच्या त्या कालखंडात एक विलक्षण सन्नाटा घरात पसरलेला असे, हे मात्र पक्क आठवतं. ते सतत चारमिनार सिगारेट ओढत असत. तेव्हा तीन पैशांत चारमिनारची दोन पाकिटं येत असत आणि दिवसातून किमान दोनदा तरी ती आणायला जावं लागत असे, असं काहीसं अंधुकसं आठवतं.

नेकनूरला असताना लक्षात आला तो, तिला होणारा मायग्रेनचा त्रास. महिन्या-दीड महिन्यातून एकदा तरी तिला हा अ‍ॅटॅक येत असे आणि तो असह्य असे. उगाळलेल्या सुंठेचे लेप कपाळावर लावूनही तिची ही अर्धशिशी थांबत नसे, तरी घरची कामं रेटत राही आणि अनेकदा तर असह्य वेदनेनं रडत असे, गडाबडा लोळत असे. तिच्या अ‍ॅटॅकचा तो काळ अनेकदा भेसूर असे. असं असलं तरी बाळंतपणासाठी कुणी अडली असा निरोप जरी मिळाला, तरी कपाळ फडक्यानं गच्च आवळून ती जात असे. हे असं वेदना बाजूला सारून बाळंतपणाला तिचं जाणं शेवटपर्यंत कायम होतं.

आणखी एक गोष्ट मात्र आठवते. घरात बऱ्यापैकी पुस्तकं होती आणि दररोज त्यातली चार वाक्यं तरी लिहिणं प्रत्येकावर बंधनकारक होतं. आचार्य अत्रेंच्या 'कऱ्हेचे पाणी'चे दोन खंड, माईनं याच काळात माझ्याकडून वाचून घेतल्याचंही स्पष्ट आठवतं. बाकी त्या काळातलं आठवणं अस्पष्ट आहे.

सातवीत असताना, बीड जिल्ह्यातल्या गेवराई तालुक्यातल्या 'धोंडराई' नावाच्या गावापासून माई हळूहळू कळू लागली. आमची परिस्थितीही कळू लागली. माईला जरी लोक डॉक्टर म्हणत असले तरी ती खरं तर ऑक्झिलरी-नर्स-मिडवाइफ होती, म्हणजे खेडेगावात तातडीची वैद्यक सेवा उपलब्ध करून देणारी ती त्या काळातली आरोग्यसेविका होती. पगार असेल ४०-४२ रुपये. त्या काळात आजूबाजूच्या पाच कोसांच्या अंतरातील गावांना पंचक्रोशी असं म्हणत. अशी दहा-बारा गावं एका महत्त्वाच्या खेड्याच्या पंचक्रोशीत असत. त्यात पंचक्रोशीतल्या गावांना तातडीची आरोग्यसेवा उपलब्ध करून देण्यासाठी नियुक्ती झालेली असल्यानं, गावकरी नर्सला डॉक्टर म्हणत. आमच्या घरची परिस्थिती अतिशय बेताची. अतिशय म्हणजे टोकाच्या बेताची. एक किंवा दीड खोलीत माईचा पूर्ण संसार असे. त्या खोलीचं पाच-सात रुपये भाडं व उर्वरित पैशांत चार मुलांचा संसार आणि नवऱ्याला सांभाळण्याचं काम आई करत असे. याच काळात माझ्या लक्षात आलेली एक महत्त्वाची बाब अशी होती, की अण्णांना त्या वेळी नोकरी नव्हती. त्यांच्या नोकरीचा काहीतरी लोचा झालेला होता आणि त्यासाठी महिन्यातून एकदा ते औरंगाबादला जाऊन येत असत. नेमकं काय झालं होतं ते कधी कळलंच नाही. कळत्या वयात दोन-तीन वेळा मी माईला विचारलं, पण 'माझे भोग होते ते' एवढंच तिचं उत्तर असे. तिच्या सहनशीलतेत मला काहीच स्थान नव्हतं.

खोडवे ते बर्दापूरकर हा तिचा प्रवासही मला खूप गूढ वाटत असे. तो प्रवासही अपरिहार्यता होती, की अगतिकता, की अपरिहार्य अगतिकता हा प्रश्न मला तेव्हा पडे. आताही माईची आठवण झाली, की तो प्रश्न छळतो. माईनं हा प्रवास न कुरकुरता केला. त्यापेक्षा महत्त्वाचं हे, की तिची अगतिकता तिनं कोणाशीच शेअर केली नाही, ते एकटीनंच सहन केलं.

धोंडराईला असतानाच दोन महत्त्वाच्या गोष्टी घडल्या. त्यापैकी एक म्हणजे कोयनेला झालेला भूकंप. भल्या पहाटे त्या धक्क्यानं आम्हीही जागे झालो आणि मग बखोटं धरून आम्हाला अंगणात नेण्यात आलं. जमीन गदागदा हलत आहे हे तेव्हाचं फिलिंग आजही कायम आहे. सातवीची परीक्षा मी



धोंडराईलाच उत्तीर्ण झालो. या परीक्षेसाठी गेवराई नावाच्या तालुक्याच्या गावी जाऊन चार दिवस थांबावं लागलं. अण्णांची कोणीतरी एक आतेबहीण गेवराईला होती. त्यांना सगळे सखूआत्या म्हणत. त्यांच्याकडे मला सुपूर्द करण्यात आलं आणि पुढचे चार दिवस मी त्यांच्या घरी राहिलो. अतिशय जुन्या असलेल्या त्यांच्या वाड्याला असलेला पेटीच्या संडासाचा वास अजूनही येतो. त्यांच्या घरापासून बरंच चालून मुख्य रस्ता ओलांडला, की जिल्हा परिषदेची शाळा होती. त्या शाळेत सकाळ-दुपार असे पेपर असत. परीक्षेच्या आदल्याच दिवशी घर ते शाळा, हे अंतर माईनं आणि मोठ्या भावानं-दादानं नेऊन दाखवलं. दोनदा जाऊन-येऊन त्याची उजळणी करून घेतली आणि ते निघून गेले. पुढचे चार दिवस सखूआत्यानं अतिशय ममत्वानं माझी काळजी घेतली. परीक्षा संपल्याच्या संध्याकाळी दादा कोणाचीतरी सायकल घेऊन मला घ्यायला आला होता; आणि गेवराई ते धोंडराई हे, बहुधा पाच-सहा किलोमीटरचं अंतर सायकलच्या कॅरिअरवर बसून मी प्रवास केला.

सातवीचा निकाल लागला आणि तालुक्यात माझा दुसरा क्रमांक आला, हे आम्हाला दुसऱ्या दिवशी कळलं. पास होण्याचा आनंद अवर्णनीय होता. माई घरी नव्हती. मी भरपूर हुंदडून घेतलं. संध्याकाळी ती परत आल्यावर धावत जाऊन पास झाल्याचं तिला सांगितलं. तिनं पटकन सोबतच्या पिशवीतली एक खारीक काढून मला दिली आणि माझ्या कपाळाचा मुका घेतला, तो स्पर्शही अजून माझ्या कपाळावर जाणवतो.

माई बाळंतपण करायला गेल्यावर, मुलगा झाला तर खारीक, खोबरं आणि गहू मिळत असत. मुलगी झाली तर मात्र तीच उतरल्या चेहऱ्यानं परत येत असे. कुणालातरी मुलगी झाल्याच्या दु:खापेक्षा आपल्याला काहीच मिळालं नाही, याचं हताशपण तिच्या चेहऱ्यावर स्पष्ट दिसत असे. असं हे आमच्या अभावग्रस्त जगण्याचं 'दिसणं' आणि 'जाणवणं' सुरू झालं ते याच धोंडराईपासून. आपलं शिक्षण, वार्षिक बाराशे रुपये उत्पन्नाचा दाखला सादर करून नादारीवर चालतं, हेही धोंडराईलाच कळलं. हा दाखला मिळवण्यासाठी सरपंचाकडे बऱ्याच चकरा माराव्या लागत. मॅट्रिकनंतर ही जबाबदारी बापूसाहेब लहुरीकर यांनी घेतली. ते आमचे दूरचे नातेवाईक. जिल्हा परिषदेत मोठ्या पदावर होते.

मात्र, त्या विपरीत परिस्थितीतही माई हसतमुखानं वावरत असे. काही ना काही उद्योगात सतत मग्न असे. उदाहरणार्थ, गव्हले वळणं, लोकरीचं विणकाम, भाज्या वाळवून ठेवणं किंवा भाजी करताना लाल भोपळा, दुधी भोपळा, दोडके यांच्या काढून ठेवलेल्या सालींना तिखटमीठ लावून त्या वाळवत बसणं, अंगणात केवळ नुसतंच बसणं नव्हे, तर त्यावेळी हातात पुस्तक घेऊन काहीतरी वाचणं वगैरे वगैरे.

सातवीत चांगला पास झालो म्हणून मी खूप आनंदात होतो आणि संध्याकाळच्या जेवणात ताटात वाढलेल्या पिठल्यात मी संपूर्ण भात कालवून टाकला! पण, सगळा भात कालवण्यासाठी पिठलं पुरलं नाही. बराचसा भात कोरडा राहिला. मी आणखी पिठलं मागितलं तेव्हा माई म्हणाली, 'अरे, आपण पिठल्यात भात कालवून खायचा नसतो. पिठल्याला थोडासा लावून खायला असतो. आपल्याला तसंच परवडतं.' १९८४ मध्ये माई वारली, तरीही अजूनही तिचे ते शब्द मला जसेच्या तसे आठवतात. असं ती आयुष्यभर वेगवेगळ्या माध्यमांतून शिकवत राहिली, पण त्यात पांडित्याचा आव कधी नसे. का कोण जाणे, तिचा माझ्यात जास्त जीव होता आणि तो तितक्या लहानपणीसुद्धा मला स्पष्ट जाणवत असे. केवळ मलाच कशाला; माझ्या अन्य तिघा भावांसाठीही लहानपणाच्या भांडणात तो एक महत्त्वाचा मुद्दा होता.

मधली काही वर्षं पुन्हा स्पष्ट-अस्पष्टपणे आठवण्याची गेली. म्हणजे बीड जिल्ह्यातलं पाटोदा आणि डोंगर-किन्ही या गावी काही काळ झालेलं वास्तव्य. पाटोदा याच गावात सर्वांत प्रथम मी अंड्याचं ऑमलेट खाल्लं. मी तापातून उठल्यावर शक्ती यावी म्हणून माईनं ते करून दिलेलं होतं.

मग एकदम आठवण आहे, ती वैजापूर तालुक्यातल्या खंडाळा या गावची. त्या आधी औरंगाबाद जिल्ह्यातल्या लोणी नावाच्या गावी माई काही काळ होती, पण त्यातला बहुसंख्य काळ ती सुटीवर आणि औरंगाबादला आमच्यासोबतच होती. कारण या काळात अण्णांना टीबी झाला आहे, असं सांगण्यात आलं होतं आणि त्यांची ट्रीटमेंट सुरू होती. कोटला कॉलनीत तेव्हा एका भाड्याच्या बंगल्यात आम्ही राहत असू. अण्णा दिवसरात्र खोकत असत आणि 'पास' नावाचं एक लालसर औषध पीत असत. या काळात त्यांची पाठ सतत दाबून द्यावी लागत असे आणि त्यासाठी आम्हा भावंडांच्या ड्युट्या लागलेल्या असत.

नंतर अचानक लक्षात आलं, की त्यांना टीबी नसून कॅन्सर झालेला आहे आणि मग त्यांना शासकीय रुग्णालयात दाखल केलं गेलं. एका पहाटे साडेचार-पाचच्या सुमारास माझ्यापेक्षा मोठा असलेला चंदू धापा टाकत घरी आला आणि त्यानं अण्णा वारल्याचं सांगितलं. हे सगळं माझ्या कळण्या-न कळण्याच्या अवस्थेतलं होतं.

मुळात अण्णांविषयी मला फार प्रेम नव्हतं, पण त्यांच्याविषयी रागही नव्हता. का कोण जाणे, त्यांच्याविषयी माझ्या मनामध्ये पितृत्वाची एक अटॅचमेंटच नव्हती. त्यामुळे त्यांच्या आजारपणाचं किंवा त्याच्या आधी घरी असण्याचं किंवा ते घरी राहत नसत त्याचं, किंवा ते मरण पावल्याचं कळल्यानंतरही मला आपलं स्वत:चं असं खूप काही गमावलं गेलं आहे असं तेव्हा कधी वाटलं नाही, अजूनही वाटत नाही. तरीही ते आजारी असताना मी संकष्टी चतुर्थी निर्जळी करत असे. अण्णा गेले आणि देवाशी असलेलं माझं नातं संपलं ते कायमचं. दगदगीची नोकरी, अण्णांचं दुखणं आणि चार मुलांचं संगोपन यामुळे माईची मोठी दमछाक होत असे. मात्र तिनं ती कधी जाणवू दिली नाही आम्हाला आणि कुणाला- अगदी कुणालाही- देवालाही शरण गेली नाही. या सर्वांतून वेळ मिळाला की, कुठंतरी कोपऱ्यात काहीतरी वाचत असे. ती कोणतीच पोथी नसे. ते वाचन हा तिच्या वाट्याला आलेल्या तेवढ्या कष्टांवर जणू उतारा होता...

अनेकदा ती कविता गुणगुणत असे. *'शब्द शब्द जपून ठेव बकुळीच्या फुलापरी...'* अतिशय तन्मयतेनं म्हणत असे.

नंतर, लोणी नावाच्या या गावी मग काही काळ आम्ही होतो. लोणी हे काँग्रेसचे तेव्हाचे मराठवाड्यातले वजनदार नेते विनायकराव पाटील यांचं गाव. पण या गावाच्याही खूप काही आठवणी माझ्या मनात नाहीत. तिथून माईची बदली झाली औरंगाबाद-वैजापूर रस्त्यावर असलेल्या खंडाळा या गावी. हे गाव पत्रमहर्षि अनंतराव भालेरावांचं. याच गावात असताना 'टाइपरायटिंगच्या प्रशिक्षणाची आवश्यकता प्रत्येक गावात कशी आहे' असं पत्र ते संपादक असलेल्या 'दैनिक मराठवाडा'ला मी पाठवलं आणि ते प्रकाशित झाल्यावर मला आणि माईलाही झालेला अवर्णनीय आनंद अजूनही आठवतो.

तेव्हा काही अनंतरावांशी माझी ओळख नव्हती. पण गावातला एक माणूस माईला त्रास देत असे. त्याची भलीमोठी तक्रार मी एका पत्राद्वारे अनंतरावांना कळवली. सात-आठ दिवसांतच तो माणूस एका संध्याकाळी घरी आला आणि 'चुकलो' म्हणून माईच्या पाया पडला. अण्णांशी नातं आहे हे का सांगितलं नाही आधीच, असं बरंचसं काही तो म्हणाला. अनंतराव भालेराव यांना 'अण्णा' म्हणतात हे तेव्हा कळलं. माईला काही कळलंच नाही. तो गेल्यावर मी काय प्रकार केला, हे तिला सांगितलं. तिला त्यावेळी खूप भरून आलं.

त्यानंतर काही वर्षांनी पत्रकारितेत आल्यावर अण्णांची भेट झाली, तेव्हा अण्णांना हा प्रसंग सांगितला. तेव्हा ते हसले. प्रत्येक तक्रार बातमी नसते असं, आणि मग बरंच काही बोलले. अनंतराव भालेराव नावाचा पत्रकारितेतला भीष्म आपल्याशी बोलतो आहे, याचंच तेव्हा खूप अप्रूप होतं. बोलता-बोलता त्यांनी विचारलं, की तुझी भाषा इतकी स्वच्छ कशी, तू तर खेड्यात राहतोस. तेव्हा मी माईनं केलेल्या वाचनाच्या संस्काराची माहिती सांगितली. दररोज सुटीच्या दिवसांत दहा ओळी इंग्रजी आणि दहा ओळी मराठी शुद्धलेखन लिहिल्याशिवाय सकाळचं खायला कसं मिळत नसे, हे असं आणि बरंच काही सांगितलं. त्यात आपल्या लहानपणी कशी जबरदस्ती झाली असा सूर असावा. अण्णा समजुतीच्या स्वरात म्हणाले, 'अरे, तोच खरा संस्कार आहे. तुला तोच आयुष्यभर उपयोगी पडणार आहे.'

अण्णांचं हे म्हणणं भविष्यवाणीसारखं खरं ठरतंय!

औरंगाबाद जिल्ह्यातल्या कन्नड तालुक्यातल्या अंधानेर या गावाच्या आठवणी मात्र खूप आहेत. आम्ही, आमची परिस्थिती, माई, माईचं स्त्री असणं, तिनं सहन केलेली संकटं, हे सगळं मला कळत गेलं, ते याच काळात आणि माईच्या या सगळ्या कर्तृत्वाचं दडपण निर्माण व्हायला सुरुवात झाली, ती याच काळापासून.

लोणी आणि खंडाळ्यापासूनच उन्हाळ्याच्या सुट्ट्यांमध्ये, कुठंतरी काहीतरी चुटूकमुटूक काम करून दिवस सत्कारणी लावायला माईनं आम्हाला शिकवलं. अंधानेरच्या काळात या कामातून पैशांचं पाठबळ मिळत गेलं. १९६९ ते ७३-७४ पर्यंतचा हा काळ असावा. ७१चा भीषण दुष्काळही याच काळातला. मी आणि धाकटा विनोद गावातल्या ओव्हरसियर किंवा तत्सम अधिकाऱ्याकडे किंवा खासगी डॉक्टरकडे उन्हाळ्याच्या सुटीत काम करून थोडीफार मदत स्वत:ची स्वत:लाच करत असू.

एव्हाना माईचा पगार ११० चा ११५ रुपयांवर पोचलेला असावा. दोन्ही मोठे भाऊ औरंगाबादला राहत असत. त्यात दादा 'नवकुल कन्स्ट्रक्शन' नावाच्या कंपनीत कामाला होता, तरी त्या दोघांना मदत माई करतच असे. शिवाय, अंधानेरला आम्ही तिघं. पक्कं आठवतं, दीड खोलीचं भाडं १५ रुपये आणि नुकत्याच आलेल्या लाइटच्या एका बल्बसाठी दोन रुपये द्यावे लागत. हे लाइट येण्याआधी कंदील पुसण्यावरून धाकटा आणि माझ्यात जवळजवळ दररोज वाद होत असत. अखेर माईनं त्याचं एक टाइमटेबल ठरवून दिलं आणि वाद कायमचा संपवला!

अंधानेर या गावापासून कन्नड हे तालुक्याचं गाव. पाणंदीच्या रस्त्यानं पायी अंतर साडेतीन किलोमीटर असे, नाहीतर मग मुख्य रस्त्यापर्यंत दीड-पावणेदोन किलोमीटर पायी जाऊन बस पकडल्यावरही साडेतीन किलोमीटरच असे! बसचं भाडं दहा पैसे असे. अंधानेरकर दहा पैसे खर्च करण्यापेक्षा पाणंदीच्या रस्त्यानं जाणं-येणं पसंत करत असत आणि वाचवलेल्या वीस पैशांत बसस्टँडवर समोसा, आलुवडा, आदी चविष्ट पदार्थांचा आस्वाद घेत. कन्नडचा बाजार सोमवारी असे. आम्हाला काही बाजार करायला दर आठवड्यात जाणं बंधनकारक नव्हतं. माईला पगार असल्यानं महिन्यात एकदा आम्ही बाजाराच्याच दिवशी कन्नडला जाऊन महिन्याचा किराणा आणत असू. पंचवीस रुपयांच्या आत तीन माणसांचा किराणा होत असे. त्यात डाळी, साबण आणि स्नोची बाटलीही असे. भाजी बहुधा कांदे-बटाटे आणि वाळलेल्या लाल मिरच्या अशीच आणावी लागे. उर्वरित भाजी सकाळी शेतात जाणारी कोणीतरी बाई माईला, 'डॉक्टरीन बाई, भाजी कोणती आणू?' असं विचारून घेऊन शेतात जात असे आणि संध्याकाळी परतीच्या प्रवासात ओट्यावर बसलेल्या माईसमोर ती भाजी ठेवून, दुखण्याची कुठलीतरी तक्रार करून त्याबद्दलचं दवापाणी घेऊन पुढं जात असे.

मला फडके, खांडेकर, पेंडसे, खानोलकर, दळवी याच काळात कळले आणि आगरकर, फुले, आंबेडकरांची ओळख माईमुळे झाली, ती याच काळात. अंधानेरच्या काळात रामदास, तुकाराम यांच्यापासून ते नियमित पाठांतर करवून घेण्याच्या माईच्या सवयीनं आम्ही भावंडं अतिशय त्रस्त असू. पगाराला गेली की ती टाइम्स आणत असे. तो महिनाभर पुरवावा लागे. महिन्याच्या किराण्याच्या पुड्या इंग्रजी वृत्तपत्राच्या कागदात असतील तर ते कागद जपून ठेवत असे ती. तिच्या वाचनासाठी आणि आमच्या शुद्धलेखनासाठी.

शिक्षा करण्यासाठी मारण्याबिरण्याचे प्रसंग अतिशय अपवादानं आले. वीरकरांच्या डिक्शनरीतले शब्द पाठ करायला लावणं, संध्याकाळी परवचा म्हणायला लावणं, सुट्टया लागल्यावर दररोज २०-२५ ओळी शुद्धलेखन, सुटीच्या दिवसांत ग्रामपंचायतीतून वृत्तपत्र आणून त्याचं मोठ्यानं वाचन, अशा सवयी तिनं आम्हाला लावल्या आणि बहुसंख्य वेळा हीच आम्हाला होणारी शिक्षा असे. डांबरटपणाची परिसीमा गाठली गेली तर पाण्याच्या पिंपात उभं राहून वीरकरांच्या डिक्शनरीतले शब्द पाठ करणं वगैरे कठोर शिक्षा होत असत.

तेव्हा यामागचं गांभीर्य लक्षात येत नसे, पण पत्रकारितेत आल्यावर त्या संस्काराचं महत्त्व किती महत्त्वाचं होतं हे जाणवू लागलं. आता तर आर्केईक, प्रॉडिगल, पॅराडाइम शिफ्ट, इंपिडिमेन्ट, मॅलिग्नंट नार्सिसिझम असे काही शब्द कानांवर पडले की अंधानेरचे दिवस आणि माई आठवते.

पगार आणण्यासाठी माईला तेव्हा अंधारनेरहून कन्नड, कन्नडहून बसनं औरंगाबाद आणि तेथून पाचोड या गावी जावं लागत असे. पगाराला जाऊन येणं हा एकूण तीन-साडेतीन दिवसांचा कार्यक्रम असे. एक दिवस जायचा, एक दिवस यायचा आणि एक दिवस औरंगाबादच्या दादा आणि चंदू या मुलांसाठी. तिनं येण्याच्या सांगितलेल्या दिवशी फाट्यावर जाऊन मी आणि धाकटा अतिशय आशाळभूतपणे बसची

आणि त्या बसमधून येणाऱ्या माईची वाट बघत असू. त्यासाठी तासन् तास आम्ही फाट्यावर थांबत असू. माई नुसती उतरताना जरी दिसली की एकदम सेफ वाटत असे. तिनं कवेत घेतलं की तीन-चार दिवसाचं पोरकंपण विरून जात असे. औरंगाबादहून चाळीसगावला जाणारी बस अंधारनेरच्या फाट्यावर थांबत असे. तिकीट अंधानेर ते औरंगाबाद असं दहा पैसे जास्त पडायचं. मात्र औरंगाबाद ते कन्नड याच भाड्यात अंधारनेपर्यंतचा प्रवास होत असे. त्यामुळे येताना माई बसनं यायची ते थेट अंधानेरपर्यंत. पाचोडला जाताना मात्र अंधानेर ते कन्नड हे अंतर पायी जायची.

माई गावात नसतानाच्या काळात ठगणाबाई ही वृद्ध स्त्री आमची काळजी घेत असे. ती माईची असिस्टंट. अमेरिकेहून येणाऱ्या पावडरीचं दूध करून ते गरिबांच्या मुलांना वितरित करणं आणि आमच्या घरकामात माईला मदत, यापोटी तिला वीस-पंचवीस एक रुपये आणि दोन वेळचं जेवण मिळे. तिचा सरकारी पगार १५ रुपये होता. सकाळच्या दूध वाटपात तिला मी आणि विनोद मदत करत असूत. याच पावडरच्या दुधाचा चहा आम्ही ती पावडर मिळणं बंद होईपर्यंत पीत असू.

माईनं पहिल्यांदा आम्हाला ठगणाबाईच्या स्वाधीन करायचं ठरवलं, ते ऐकल्यावर ती चमकलीच. 'आ बया, मी तर कोळीन हाये' अशी तिची प्रतिक्रिया.

'त्यानं काय होतं? अन्नाला न् मायेला काय जात असते का?' असा त्यावरचा माईचा प्रतिप्रश्न होता.

जात, धर्म, देव वगैरेंचं आम्हाला भानच नव्हतं, माईनं ते होऊही दिलं नाही. भाड्याची खोली माळ्याची, सहवास रामराव मानकर, तुकाराम शिरसाट, विठ्ठल दांडगे यांचा, असा अब्राह्मणीच! किंबहुना आमचं दैनंदिन जगणं ब्राह्मणांत कधीच नव्हतं. आपण अधार्मिक का आहोत, जात का पाळत नाही याचा सात्त्विक मातृसंस्कार कसा प्रबळ आहे याची जाणीव पुढे खूप वर्षांनी राजकारण, आरक्षण वगैरे प्रश्नांवरील वाचन करताना झाली.

एकदा रामरावच्या घरी मटण शिजवलं, त्याचा घमघमाट सुटला होता.

'कशाचा रे हा वास?' मी विचारलं.

तर तो म्हणाला, 'मटनाचा. चल जेवू.'

तोपर्यंत मी मांसाहार केलाच नव्हता. वासानं भूक चाळवली म्हणून माईला विचारलं, 'खाऊ मी मटण?'

'खा की, त्यात विचारायचं काय? अन्नच ते!' हे तिनं सहज सांगितलं. सरळ जगणं असं ती सहज रुजवत असे.

अंधानेरच्या या दिवसांत जाणवलेल्या दोन ठळक गोष्टी म्हणजे आपली माई ही एक अतिशय देखणी आई आहे. शिवाय, ती सुशिक्षित आहे. महत्त्वाचं म्हणजे तिला तिची मतं आहेत आणि अगदी कोणी अनोळखी पुरुष आला तरी त्याच्यासमोर ती ठामपणे ते मांडू शकते.

याच काळात माई आणखी कळली. खरं तर, संपूर्ण कळली, असंही म्हणता येणार नाही. पण जी काही कळली ते तुकडे अतिशय थक्क करणारे आहेत. माईची आणि अण्णांची भेट कुठं झाली, हे तिनं कधीच सांगितलं नाही, पण अवघ्या सतराव्या-अठराव्या वर्षी तिचं लग्न झालं आणि वयाच्या पस्तिशीत अण्णा वारल्यानंतर, तिनं चार मुलांचा संसार आत्यंतिक प्रतिकूल परिस्थितीत आणि मोठ्या धैर्यानं निभावला. त्या काळातली परिस्थिती बघितली तर एवढ्या सुंदर स्त्रीनं, इतक्या प्रतिकूल परिस्थितीत खेड्यापाड्यात दोन लहान मुलग्यांसोबत राहून मातृत्वाची जबाबदारी पार पाडणं याला तोडच नाही. याच काळात माझ्यापेक्षा मोठा असलेला चंदू एक दिवस घर सोडून गेला. तो औरंगाबादला राहत असल्याचं आम्हाला उशिरा कळलं. त्याचं परागंदा होणं माईच्या डोळ्यांत अनेकदा उमटत असे, पण ते पुत्रवियोगाचं दुःख पांघरून ती जगली... चुकीचं रक्त दिलं गेल्यानं ती अचानक गेली. मरतानाही तिनं, तिच्या पुत्रवियोगाची, सहन करण्याची, छाया माझ्यावर पडू दिली नाही. उलट माझ्या तुटक वागण्याचं समर्थनच केलं. माईशी माझे संबंध अतिशय चांगले होते. आज पुस्तकात आपण जेव्हा आदर्श आई आणि मुलगा यांच्याविषयी वाचतो, ते सगळं मी त्या काळात अनुभवलं आहे. मी तारुण्यात आलो, प्रेमात पडलो आणि मग मला एक स्त्री म्हणून माई कशी जगली असेल, याची जी जाणीव झाली. आजही ती अंगाचा थरकाप उडवते.

अंधानेरच्या दिवसापासून म्हणजे ७४ नंतर मी सातत्यानं घराबाहेरच होतो, पण माईच्या ओढीनं वर्ष-सहा महिन्यांतून तिला भेटायला जात असे. अशाच एका भेटीत मी तिला विचारलं, की 'तुला पुरुषांनी त्रास नाही दिला का ग?'

तेव्हा माझ्याकडे जाड फ्रेमच्या काळ्या रंगाच्या चष्मातून पाहत माई म्हणाली,'त्रास झाला नाही, असं मी म्हणणारच नाही. एका प्रसंगी तर तूच तक्रार केली होतीस. पण एकदा मुलं हेच सर्वस्व मानल्यावर अधिकाधिक खंबीर होत गेले.'

मग बराच वेळ ती शांत बसली आणि म्हणाली, ‘आठवतं तुला? एकदा खंडाळ्याला आलेल्या एका सुपरवायझरला मी रात्री घराबाहेर हकलून दिलं होतं, तेव्हा तू आणि धाकटा विनोद भेदरून मला चिकटून उभे होतात, पण मी का भेदरले नव्हते हे कळलं ना तुला आता?’ तिच्या या प्रश्नातून आईमधली खंबीर स्त्री जी मला कळली. तिच्यासमोर मी आजही नतमस्तक आहे. खरं तर, नतमस्तक हा शब्द अतिशय खुजा आहे. ती त्याच्या पल्याड आहे.

माईबद्दल मी हे जे सांगितलं, त्याचा संबंध तिच्या देखणेपणाशीही आहे. अतिशय अप्रतिम गोरी होती. किती गोरी? तर मला तिचा मृत्यू आठवतो. बाबा आमटे यांनी तेव्हा गडचिरोली जिल्ह्यात ‘जंगल बचाव–मानव बचाव’ आंदोलन सुरू केलेलं होतं. ते आंदोलन कव्हर करण्यासाठी गडचिरोलीला गेलो होतो. दोन दिवस गडचिरोलीला राहून परतल्यावर, एक दिवस संध्याकाळी ऑफिसमध्ये लिहीत बसलो असताना माईची प्रकृती अतिशय गंभीर असल्याचा ट्रंक कॉल आला. तिच्या पाठीच्या कण्याचं कसलंसं छोटंसं ऑपरेशन होणार होतं. तसाही दोन–चार दिवसांनी मी तिला भेटायला जाणारच होतो. तिला नागपूरला आणायचं ठरलं होतं आमचं. एक स्वतंत्र खोलीही आम्ही तिच्यासाठी सज्ज करून ठेवली होती. पुस्तकं, टेपरेकॉर्डरसह. हातातला लेख पूर्ण करू आणि लगेच निघू असं ठरवेपर्यंत विनोदचा फोन आला, ‘ताबडतोब निघ’ म्हणून.

मी आणि मंगल ऑफिसमधून घरी पोहोचलो. तयारी करून बसस्टँडवर जाण्याआधीच पुन्हा फोन आला, माई गेली. तेव्हा जे घडत होतं त्यावरची प्रतिक्रिया म्हणून माझ्या मनात काहीच उमटत नव्हतं. आधीचे दोन–तीन दिवस केलेला स्कूटरचा प्रवास, त्यातून आलेला थकवा वगैरे वगैरे, अशा अनेक गोष्टींतून माईचं मरण माझ्यापर्यंत पोहोचलंच नव्हतं. बसनं जालन्याची दिशा पकडली आणि मी गाढ झोपी गेलो. जाग आली ती एकदम सिंदखेडराजाला. कुठं आहे हे कळलं, कुठं चाललो त्याची जाणीव झाली आणि कशासाठी चाललो, त्याची संवेदना तीव्र झाली; तेव्हा मात्र अतिशय अनावर झालं.

जालन्याला घरी दादाकडे पोचलो तोपर्यंत डोळे पूर्ण आटलेले होते.

मला पाहताच चांगला गलका झाला. दोघं–तिघंजण सावरण्यासाठी पुढे आले. रडण्याचे दोन–तीन आवाज आले; त्यातून त्यांच्याशी असलेल्या नात्याची जाणीव झाली, पण मी कोरडाच होतो. विनोदनं समोर होऊन माईच्या चेहऱ्यावरचं पांघरूण दूर केलं. मी सात–आठ मिनिटं शांतपणे बसून राहिलो. तिचा हात हातात घेतला तेव्हा जाणवलं, ते तिच्या शरीरातली शीर अन् शीर, नस अन् नस काळी–निळी झालेली आहे आणि तिच्या गोरेपणावर तो काळा–निळा रंग भेसूरपणे अतिशय उठून दिसतो आहे.

इतकं गोरेपण, देखणेपण लाभलेली बाई स्त्री म्हणून इतकी वर्षं एकटी वावरते, सगळं सहन करते मुकाटपणे, पुत्र–वियोगाचं दु:ख अबोल, अमिट ठेवून. खरंच, आई इतकी सहनशील असते? ही कल्पना त्याही क्षणी माझ्या मनात थरकाप उठवून गेली. अजूनही ती जाणीव मला कोणतीही अंत्ययात्रा जाताना दिसली, की अस्वस्थ करते...

खरं तर, प्रत्येकाचीच आई ही एक ग्रेट आई असते. प्रत्येकाच्याच आईचा संस्कार मोलाचा असतो, पण तरीही इतरांच्या आईपेक्षा एक आई म्हणून आणि एक स्त्री म्हणून मला सातत्यानं इतरांच्या आईपेक्षा माई वेगळी वाटली. वेगळेपणानं भावत राहिली. ती तुटकतुटकपणे समजत गेली, पण आई म्हणून तिनं अतिशय सलगपणे माझ्यावर केलेलं गारूड आजही कायम आहे. या म्हणण्याच्या पार्श्वभूमीवर माईबद्दलचं एक विलक्षण स्मरण आहे माझ्या मनात. अण्णा वारल्यावर खंडाळ्याला असतानाची ही घटना आहे. एका ओल्यागच्च, सरत्या संध्याकाळच्या अंधारात एक बाई घरी आल्या. ते घर म्हणजे कुंभारवाड्यातील गाढवांचा दर्प भरलेली अडीच–तीन खणांची ती खोली. त्या बाई आल्यावर माईच्या गळ्यात पडल्या. दोघीही रात्रभर रडत होत्या, काय काय बोलत होत्या. त्यातलं काही कळलं नाही, पण काही तरी अघटित आहे हे जाणवत होतं आणि ते जाणवणं कायमचं मनात दडून बसलं.

१९८३ मध्ये मी आणि मंगलनं लग्न करायचं ठरवलं. नागपूरहून घरी जालन्याला दादाकडे जाऊन मी ते माईला सांगितलं. डिसेंबरची थंडी होती. अंगणात आम्ही दोघं बोलत बसलो असताना मला ते अचानक आठवलं. ‘कोण होती ग ती बाई?’ मी माईला विचारलं.

क्षणभर माझ्याकडे बघत माईने विचारलं, ‘विसरला नाहीस अजून?’

'नाही ग, मुक्कामालाच आलंय ते', मी म्हणालो.

'अण्णाचं-तिचं अफेअर होतं. लग्न नाही झालं त्यांचं; ती होती', माई म्हणाली आणि गप्प झाली.

मी गांगरलो. सावरत म्हणालो, 'यू आर ग्रेट. नवऱ्याच्या प्रेयसीचं सांत्वन करण्याचं धैर्य कुठून आणलंस तू?'

'जन्माला येतानाच बाई भोग सहन करण्याची शक्ती घेऊन येते. तुम्हा पुरुषांना नाही कळणार ते...' आयुष्याकडे बघण्याचं, त्याला सामोरं जाण्याचं धैर्य इतक्या चिवटपणे दाखवणारी, अशी ही माई!

वारंवार विचारूनही 'ती' कोण हे माईनं सांगितलं नाही. खूप पिच्छा पुरवला तर उठून जाता जाता म्हणाली, 'माझी प्रायव्हसी आहे. ती अन् तुझ्यासाठी तो चिरेबंदी इतिहास नाही झाला का?'

बर्दापूरकर घराण्यातला मॅट्रिकची परीक्षा पहिल्या झटक्यात पास करणारा मी पहिला होतो. ५५ टक्के मार्क घेऊन मी पास झालो, याचा माईला अतिशय अभिमान होता. पुढे शिकावं अशी खूप इच्छा होती, पण अंधानेरला कॉलेजची सोय असण्याचं कारण नव्हतं. कन्नडलाही कॉलेज नव्हतं आणि औरंगाबादला स्वतंत्ररीत्या ठेवून माझं कॉलेजचं शिक्षण करण्याची ऐपत माईमध्ये नव्हती.

मी एखादा छोटामोठा कोर्स करून नोकरी करावी आणि नोकरी करत करत शिकावं, असं तिला खूप वाटायचं. नागपूरला तेव्हा सॅनिटरी इन्स्पेक्टरच्या कोर्ससाठी ५० टक्क्यांवर मार्क असणाऱ्यांना सहज प्रवेश मिळत असे. तो फॉर्म तिनं मला भरायला लावला. मुलाखतीचं बोलावणं आलं. पुणे-नागपूर बसनं औरंगाबादहून मी नागपुरात आलो, पण ती मुलाखत दिली नाही. मुलाखत दिली, असं माईला खोटंच सांगितलं. खूप दिवस ती निवड झालेल्या पत्राची आशाळभूतपणे वाट पाहत असे. मी मात्र या काळात आरामात कन्नडच्या लायब्ररीतून पुस्तकं आणून वाचत, रिकामे दिवस काढत होतो.

एक दिवस तिचा हा मातृत्वी आशाळभूतपणा मला असह्य झाला आणि मी तिला खरं काय ते सांगून टाकलं. तिच्या चेहऱ्यावर निराशा स्पष्ट दिसत होती. तिच्या अपेक्षाभंगाच्या जाणिवेचा कढ उत्कट झालेला होता. पण तिनं त्या कशाचाही उद्रेक होऊ दिला नाही. बराच वेळ शांततेत गेल्यावर समजावण्याच्या स्वरात ती म्हणाली, 'कन्नडला यावर्षीपासून कॉलेज सुरू होतं आहे. दोन महिने नांगरेसाहेबांच्या हाताखाली काम करशील तर तुझ्या शिक्षणाचा भार तूच उचलू शकशील.'

अंधानेरजवळ बांधल्या जाणाऱ्या एका मध्यम सिंचन प्रकल्पाचे के.एस.नांगरे हे ओव्हरसियर होते. धाकटा विनोद त्यांच्या मुलांना सांभाळण्याचं काम दिवसभर करत असे. मी जर त्यांच्यासोबत धरणावर काम केलं तर मलाही पैसे मिळतील, अशी तिची कल्पना होती. दुसऱ्या दिवशी सकाळीच जाऊन ती नांगरेंशी बोलूनही आली. पण नांगरेच्या कामावर जागाच नव्हती. अंधानेरपासून १८-२० किलोमीटरवर सुरू असलेल्या एक रस्त्याच्या कामावर देखरेख करणाऱ्या कुलकर्णी नावाच्या तेव्हाच्या बी ॲण्ड सी च्या ओव्हरसियरशी ते बोलले आणि मग मी त्या कामावर रवाना झालो.

प्री डिग्री, फर्स्ट इयर, सेकंड इयर अशी तीनही वर्षं माझ्या शिक्षणाच्या खर्चाची जबाबदारी मग रोजगार हमी योजनेनं उचलली. सुरुवातीला, आपण शिकले-सवरलेले, सेकंड क्लास मॅट्रिक झालेलो वगैरे आणि असं काम करतो, याची खूप लाज मनात असायची. शनिवार, रविवार घरी आलो, की माई खूप काय काय करून खाऊ-पिऊ घालायची. अगदी स्वत:च्या हातानं आंघोळ वगैरे. मातृत्वाचे असे प्रयोग व्हायचे. परत निघालो की चार-पाच दिवस पुरतील एवढ्या पोळ्या, लोणचं, गुळांबा वगैरे द्यायची.

वाटत असलेली ही लाज एकदा स्पष्टच बोलून दाखवली तेव्हा तिनं सरळ मला विचारलं, 'श्रमांना कुठे जात आणि लाज असते का? भीक मागत नाहीस तोपर्यंत तू जे काही करतोस, त्याची मला तरी कधीच लाज वाटणार नाही' आणि मग माझ्या लाजेचा हा भार एकदम हलका झाला. आयुष्यात पुढे जे काही फाके वाट्याला आले त्याही काळात मला श्रम आणि गरिबीची, त्या टोकाच्या अभावग्रस्ततेची कधीच लाज वाटली नाही.

पुढे खूप दिवसांनी कळलं-तेही धाकट्या विनोदकडून-की रोजगार हमीच्या कामावर जाताना माझ्यासाठी चार-पाच दिवसांच्या पोळ्या माई करून द्यायची आणि मी परत येईपर्यंत ती आणि विनोद फक्त भाकरी खात असत! मी नसण्याच्या काळात घरात पोळी होत नसे, भाजीही नाही. फक्त वरण आणि तेही दिवसातून एकदाच. गोडधोड होत नसे. हे सगळं आज जेव्हा एकटं असताना आठवतं, तेव्हा येणारे कढ आवरताच येत नाहीत.

कन्नडला नारायण नागदकर पाटील यांनी कला आणि वाणिज्य महाविद्यालय सुरू केलं होतं. तिथं जाऊन मी प्री डिग्री कॉमर्ससाठी फॉर्म मागितला तेव्हा कन्नड नगर परिषदेच्या नव्यानंच बांधलेल्या सभागृहात, टेबलाआड बसलेल्या कारकुनानं चमकूनच माझ्याकडे बघितलं. अर्धी चड्डी आणि अर्ध्या बाह्यांचा सदरा घातलेला हा मुलगा प्री युनिव्हर्सिटी कोर्सच्या प्रवेशासाठी अर्ज मागतोय, ही कल्पना काही त्याच्या पचनी पडली नाही. मग मी ऐटीत मॅट्रिकची गुणपत्रिका काढून त्याला दाखवली आणि त्यानं एक छोटंसं पुस्तक माझ्या हातात दिलं, पण फॉर्म कुठे असं मी त्याला विचारलं तेव्हा त्यानं त्या पुस्तिकेला 'प्रॉस्पेक्टस' असं म्हणतात आणि त्याच्याशेवटी फॉर्म कसा जोडलेला असतो तो दाखवला.

तिथंच बाजूला बसून मी फॉर्म भरला. आधीच तयार करून घेतलेल्या ट्रू कॉपीज त्याला जोडल्या आणि त्या क्लार्कला जाऊन फॉर्म दाखवला. त्यानं तो नीट वाचला आणि 'रोखपाल' अशी पाटी असलेल्या टेबलाकडे बोट दाखवून तिथं जाऊन पैसे भरण्यास सांगितलं. मागं वळलो तर पूर्ण बाह्याचा धुवट सदरा आणि भला मोठा बॉटम असलेला पायजमा घातलेला एक माझ्यापेक्षा कितीतरी मोठा मुलगा-खरं तर माणूसच-उभा होता. त्यानं विचारलं, 'कुठं ॲडमिशन घेतली?' मी ऐटीत सांगितलं, 'कॉमर्स'.

त्यानं त्याची ओळख करून दिली,'मी लक्ष्मण काळे. मीही कॉर्मसलाच ॲडमिशन घेतोय. दोन मिनिटं थांब. दोघंही सोबतच जाऊ तिकडे.' कन्नडच्या त्या नवीन महाविद्यालयाला वाणिज्य शाखेसाठी पहिला मी आणि दुसरा लक्ष्मण काळे असे दोन विद्यार्थी त्या दिवशी मिळाले.

तेव्हा एक मुलाचा बाप असलेला लक्ष्मण काळे अंधानेरचा जावई होता. तो पुढे चार्टर्ड अकाउन्टंट झाला. सध्या मुंबईत फोर्ट परिसरात त्याचं प्रशस्त कार्यालय आहे. सध्या औरंगाबाद हायकोर्टात वकिली करणाऱ्या भीमराव पवारच्या मुलीच्या, साक्षगंधाच्या निमित्तानं आम्ही सगळे बहिरगावला भेटलो. लक्ष्मण काळे आणि मी सर्व कार्यक्रम आटोपल्यावर अंधानेरला गेलो. जवळजवळ २२-२३ वर्षांनी अंधानेरला गेलेलो होतो. गाव खूप बदललेलं. जुन्या ओळखीच्या खुणा या बदलांच्या आड लपलेल्या होत्या. लक्ष्मण आणि मी भटकत-भटकत धरणावर गेलो. तेथून परतताना शाळेत गेलो. तिथल्या वऱ्हांड्यात चारपाच वृद्ध पत्ते खेळत आणि बिड्या फुंकत बसले होते. 'काय जावई कसे', वगैरे त्यांनी लक्ष्मणची विचारपूस केली.

लक्ष्मणनं त्यांच्या घरच्यांची विचारपूस केली. माझ्याकडे बोट दाखवून त्यांनी विचारलं, 'याला ओळखलं का?'

शक्यच नव्हतं. मग एकानं विडीची राख झटकत 'कोणी ह्यो बाबा' असा प्रतिप्रश्न लक्ष्मणला विचारला.

लक्ष्मणनं विचारलं,'माई डॉक्टरीन आठवते का? तिचा लेक हा.'

एकानं थोडेसं डोकं खाजवत कबुली दिली,'याला नाही वळखलं. पण माईसारखी डॉक्टरीन पुन्हा गावला भेटलीच नाही. लई भोगलं तिनं, पण चांगलेपणा सोडला नाही,' असं तो वृद्ध गृहस्थ म्हणाला.

थोडा वेळ असाच शांततेत गेला. दुसरा एक वृद्ध म्हणाला पण, 'माई तर लेकाला नंदू म्हणायची नं?'

'तो मीच' असं मी म्हणालो, तेव्हा त्याच्या चेहऱ्यावर स्मरणाचा आनंद उजळला.

कानावर बोटं मोडत म्हणाला,'माई मेल्याचं कळलं तर लई वंगाळ वाटलं.'

क्षण दोन क्षण तसेच गेले. त्यानं डोळ्याला हात लावला, कडा पुसल्या आणि मला भडभडून आलं. एखाद्या माणसाविषयी त्याच्या अपरोक्ष, तो मेल्यावर २०-२२ वर्षांनी चांगलं बोललं जातं आणि ज्याच्याविषयी चांगलं बोललं गेलं ती आपली माई आहे, हे सगळं असं सावट दाटून आलं.

'लई भोगलं तिनं' हे त्या वृद्धाचं वाक्य आठवलं परतीच्या प्रवासात आणि मला खूप रडू आलं. माईला समजून घेण्यात आपण कमी पडल्याचं अपराधीपण म्हणजे ते अश्रू होते.

माईचं मातृत्व जसं तिच्या अश्रूंतून सर्वप्रथम कळलं, तसंच माझं अपराधीपण जाणवून देणारे ते माझेच अश्रू होते...

**प्रवीण बर्दापूरकर**
एल-९०, वसंतनगर,
लक्ष्मीनगरजवळ, नागपूर ४४००२२
भ्रमणध्वनी - ९८२२०५५७९९
praveen_bardapurkar@hotmail.com

# प्रतिसृष्टी...!

## डॉ. सिद्धिविनायक बर्वे

लंडनमधील मध्यवर्ती विभागातील एका प्रतिष्ठित जीवशास्त्रीय प्रयोगशाळेचे संचालक त्यांची प्रयोगशाळा दाखवताहेत... 'आपली जशी पोल्ट्री असते ना कोंबड्यांची... तशी ही प्रयोगशाळा आहे माणसांची पोल्ट्री... ही एक अशी प्रयोगशाळा आहे की जिथे निर्मिती होते चक्क माणसांची... मानवी बीजांडं परीक्षण नळीत घेऊन त्यावर प्रक्रिया केली जाते... अन् इथे निर्माण केली जातात चार दर्जाची माणसं... पोल्ट्रीत जशी कोंबड्यांची पैदास होते ना तशी या प्रयोगशाळेत निर्माण होतात माणसंच माणसं...झटपट...'

काय?.. विश्वास नाही ना बसत... खरंय... म्हणजे हे वास्तव नसून ही आहे आल्ड्स हक्सले या जगप्रसिद्ध वैज्ञानिकाच्या भविष्यवेधी 'ब्रेव्ह न्यू वर्ल्ड' या वैज्ञानिक कादंबरीतील जीवशास्त्रीय संकल्पना... भविष्यातील जीवशास्त्रीय प्रगतीचा वेध घेणारी... पण विश्वास ठेवा अगर ठेवू नका या कादंबरीतील जीवशास्त्रीय संकल्पना आता उपलब्ध तंत्रज्ञानाच्या जोरावर प्रत्यक्षात येऊ घातल्या आहेत... साकारत आहेत...

मानवी जनुक आराखडा उलगडवून दाखवणारे शास्त्रज्ञ



'कृत्रिम' जीवाणू

क्रेग व्हेंटर व त्यांच्या सहकाऱ्यांनी नुकताच प्रयोगशाळेत 'कृत्रिम सजीव' बनवल्याचा दावा केलाय... क्रेग व्हेंटर यांच्या संशोधनाद्वारे प्रयोगशाळेत कृत्रिमरीत्या तयार केलेला डीएनएचा रेणू जीवाणू पेशीत संक्रमित करून या पेशीची वाढ करण्यात यश मिळाल्याचा दावा केला जातोय...

अन् प्रयोगशाळेत साकारतेय मानवनिर्मित 'प्रतिसृष्टी'... म्हणजेच थेट जगन्नियंत्याच्या निर्मितीवरच नियंत्रण मिळवणारा हा क्रांतिकारी शोध आहे...

खरंच मानवानं खराखुरा सजीव प्रयोगशाळेत तयार केलाय? जगभर हा एकच प्रश्न विचारला जातोय... अन् जणू परीकथेतील कल्पना प्रत्यक्षात साकारावी तशी 'ब्रेव्ह न्यू वर्ल्ड' ही कादंबरी प्रत्यक्षात साकारतेय...अन् जगभर चर्चा होतेय 'कृत्रिम सजीव' निर्मितीची.... 'प्रतिसृष्टी'ची...

विख्यात शास्त्रज्ञ रॉबर्ट ऑपनहायमर यांचं एक सुप्रसिद्ध वचन आहे... 'See things NOT as they are...but as

they might be'... नेमकं हेच सूत्र पकडत डॉ. क्रेग व्हेंटर व त्यांच्या सहकाऱ्यांनी सर्वस्वी प्रयोगशाळेत निर्माण केलेल्या 'कृत्रिम' जीवाणूची निर्मिती करण्यात यश संपादन केलंय... सूक्ष्म जीवातील डीएनए रेणू प्रयोगशाळेत कृत्रिमरीत्या निर्माण करून हा डीएनएचा रेणू सजीव पेशीत संक्रमित करण्यात आलाय अन् या सर्वस्वी नवीन सूक्ष्मजीवांची प्रयोगशाळेत वाढ करण्यात यश संपादन करण्यात आलंय...

विज्ञान-तंत्रज्ञानातील नवनवीन शोधांमुळे आजचं स्वप्न हे उद्याचं वास्तव ठरतं... अनेक कल्पनातीत गोष्टी प्रत्यक्षात साकारतात...विज्ञान-तंत्रज्ञानाच्या नेत्रदीपक प्रगतीमुळे मानवी जीवन क्षणोक्षणी बदलत जातं...अन् एक-एक क्रांती उलगडत जाते. शेती, औद्योगिकीकरण, अणुशक्ती, अवकाश तंत्रज्ञान आणि संगणकीकरणाच्या क्रांतिकारी युगानंतर आता उलगडतंय जीवतंत्रज्ञान या आधुनिक क्रांतिकारी ज्ञानशाखेमुळे मानवाच्या हाती चावी गवसलीय जीवसृष्टीवर विजय मिळवण्याची... मानवाला सामर्थ्य प्राप्त झालंय थेट 'प्रतिसृष्टी' साकारण्याचं!

हे जीवन म्हणजे काय... पृथ्वीवर सजीव सृष्टीची निर्मिती कशी झाली... पृथ्वीवरील जीवन नेमकं कुठून आलं...कसं निर्माण झालं...हे प्रश्न मानवजातीला सतत भेडसावत आलेत... पृथ्वीवरील जीवनाची निर्मिती हे मानवजातीपुढे सतत एक कोडं बनून राहिलंय...अन् मानवजातीची धडपड चाललीय या कोड्याची उकल करून जीवसृष्टीवर नियंत्रण मिळवण्याची...सजीवांवर नियंत्रण मिळवून 'जगन्नियंता' बनण्याची...मग मानवी प्रज्ञेच्या बळावर जीवनाचं अंतरंग जाणून घेण्याच्या दृष्टीनं माणसानं प्रयत्न सुरू केले...अन् साकारत गेली जीवनावर विजय मिळवण्याची कहाणी...



कृत्रिम सजीवाची घोषणा करताना क्रेग व्हेंटर

जरा सजीव सृष्टीकडे नजर टाकली तर आपल्याला दिसून येतं की पृथ्वीवरील सर्व सजीव पेशींपासून बनलेले असतात, असंख्य छोट्या-छोट्या पेशींपासून. या साऱ्या सजीव पेशींचं नियंत्रण केलं जातं पेशी केंद्रकाद्वारे. हे पेशी केंद्र जणू 'कंट्रोल रूम' असते, पेशीत घडणाऱ्या अभिक्रियांवर नियंत्रण ठेवणारी...आणि या पेशीच्या मुळाशी असतो जीवसृष्टीचा मूलाधार असलेला डीएनएचा सर्पिलाकार रेणू...

सजीवसृष्टीची जणू ललाटरेखाच... पेशी अन् पर्यायानं सजीवांचे गुणधर्म ठरवणारी... सजीवांतील गुणधर्म ठरवणारी जनुकं या डीएनए रेणूवर अंकित असतात...हा डीएनएचा सर्पिलाकार रेणू सजीव सृष्टीवर नियंत्रण करतो...

सुमारे ५० वर्षांपूर्वी वॉटसन व क्रीक या नोबेल पारितोषिक विजेत्या महान शास्त्रज्ञांनी डीएनए रेणूंची रचना व अंतरंग उलगडून दाखवत एका क्रांतिकारी पर्वाची सुरुवात केली. या शोधामुळे जीवशास्त्रीय संकल्पनांची उकल होत जीवसृष्टीचं रहस्य प्रगट होऊ लागलं. डीएनए रेणूचा शोध ही जीवसृष्टीच्या प्रगतीला कलाटणी देणारी घटना ठरली. जीवनाचं अन् पर्यायानं सजीवसृष्टीचं अंतरंग जाणून घेण्याच्या दिशेनं टाकलेलं ते पहिलं पाऊल होतं. शिडीसारखी रचना असलेल्या डीएनए रेणूच्या परस्परांभोवती गुंफलेल्या सरांत अनुवांशिकतेची परिभाषा अंकित केलेली असते, जनुकांच्या रूपात. जीवनाचं रहस्य याच रेणूत दडलेलं असतं. ही परिभाषा जणू स्वरलिपी असते जीवन संगीताची. या स्वरलिपीतून साकारणाऱ्या सुरावटीतून उमलतं जीवनगाणं अन् त्यातून फुलत जातं जीवन. डीएनए रेणूच्या अंतरंगाची उकल झाल्यामुळे जणू जीवनसंगीताच्या 'नोटेशन'चीच उकल माणसाला होत गेली...अन् मानवाला उमगू लागलं जीवनसंगीत...

सुमारे ३० वर्षांपूर्वी पॉल बर्ग या शास्त्रज्ञानं डीएनए रेणूतील जनुकांची जोडतोड करून 'कट् स्टिच' तंत्रज्ञानानं सर्वस्वी नवीन जनुकीय रचना असलेले पारजनुक 'ट्रान्सजेनिक' सजीव निर्माण करण्याचं 'जेनेटिक इंजिनीयरिंग' म्हणजेच 'जीवअभियांत्रिकीचं तंत्रज्ञान' विकसित केलं. या तंत्रामुळे मानवाला सजीवांच्या जडणघडणीत बदल करता येणं शक्य झालं. जीवनाच्या परिभाषेतील मुळाक्षरांत फेरफार करून या

नवीन तंत्राच्या जोरावर डीएनए रेणूच्या जोडतोडीतून नवीन जडणघडणीचा डीएनए निर्माण करता येणं शक्य झालं. पॉल बर्गच्या या शोधामुळे जणू डीएनए रेणूत अंकित असलेली जीवनसंगीताची सुरावट बदलता येणं शक्य झालं. सजीवांवर नियंत्रण मिळवण्याच्या दिशेनं टाकलेलं हे पुढचं पाऊल होतं. जीवनाच्या मूलाधारावर विजय मिळवणारं. या तंत्रामुळे डीएनए रेणूत बदल घडवून नव्या वांछित विश्वाचं सृजन करण्याची शक्ती मानवाला प्राप्त झाली.

अगदी पुरातनकाळापासून मानवानं असंच काहीतरी विलक्षण निर्माण करण्याची महत्त्वाकांक्षा बाळगलीय... आज आधुनिक ज्ञानविज्ञानाच्या जोरावर या कल्पनातीत गोष्टी प्रत्यक्षात साकारताहेत.. प्रतिसृष्टी साकार करण्याचं सामर्थ्य मानवाला लाभल्यानं माणूस बनतोय जणू जगन्नियंताच!

आधुनिक ज्ञान-विज्ञानाच्या प्रगतीबरोबर आपण पृथ्वीतलावर कुठून आलो?... या विश्वाची निर्मिती कशी झाली?...आपले पूर्वज कोण?... असे एक ना अनेक प्रश्न मानवी प्रज्ञेला सतावताहेत... आधुनिक जीवतंत्रज्ञानामुळे या प्रश्नांची उकल करता येणं आता शक्य होतंय... सजीवांचं अंतरंग अधिक स्पष्ट होतंय... सजीवांचं नियंत्रण करणाऱ्या डीएनए रेणूचं पृथ:करण करून आपले पूर्वज कोण होते हे जाणून घेता येणंही आता शक्य झालंय...

एकविसाव्या शतकाचं शास्त्र म्हणून गणण्यात आलेलं जीवतंत्रज्ञान झपाट्यानं जीवनावर नियंत्रण मिळवत कळसाध्यायाकडे पोचतंय... जेमतेम दशकापूर्वी डॉली मेंढीच्या रूपानं जगातला पहिला प्रतिरूप 'क्लोन' सजीव निर्माण करण्यात स्कॉटलंडमधील रोझॅलीन इन्स्टिट्यूटमधील डॉ. इयान विल्मट व त्यांच्या सहकाऱ्यांना यश प्राप्त झालं...प्रतिरूप सजीव प्रयोगशाळेत निर्माण करणं ही माणसाच्या आवाक्यातली बाब झाली आणि मानवजातीनं सजीवसृष्टीवर नियंत्रण मिळवण्याचा एक मोठा टप्पा गाठला.

एवढंच नाही, तर जीवतंत्रज्ञानाच्या सामर्थ्यावर देवाची अनमोल कृती असलेल्या मानवप्राण्याच्या निर्मितीवरही विजय मिळवण्यात शास्त्रज्ञांना यश मिळालं...मानवाची प्रतिरूपं 'क्लोन' तंत्रानं विकसित करण्याचं तंत्र आता आत्मसात झालंय अन् जीवतंत्रज्ञानाच्या सामर्थ्यावर देवाची अनमोल कृती असलेल्या मनुष्यप्राण्यावरच विजय मिळवण्यात जीवतंत्रज्ञान यशस्वी ठरतंय. अखेर, येणार येणार म्हणून गाजत असलेला मानवी क्लोन-प्रतिरूप सजीव-प्रत्यक्षात अवतरला. 'क्लोनेड' या फ्रेंच कंपनीच्या संचालिका डॉ. ब्रिगेटा बोसिलिए यांनी 'ईव्ह' नावाची मानवी क्लोन निर्माण केल्याचा दावा केलाय. मानवाची प्रतिरूपं 'क्लोनिंग' तंत्रज्ञानानं प्रयोगशाळेत निर्माण करण्याचं तंत्र आता मानवाला आत्मसात झालंय आणि जणू एखादी विज्ञानकथाच प्रत्यक्षात साकारते आहे.

पृथ्वीवरील मानवजातीच्या गेल्या लाख वर्षांच्या अस्तित्वातील आजवरचा सर्वांत लक्षणीय मानला गेलेला वैज्ञानिक शोध मानवी जनुकीय जडणघडणीची उकल करणारा 'मानवी जनुक आराखडा' सादर केला गेला अन् थेट जीवनाचं अंतरंग उकलण्यात मानवाला यश मिळालं. केवळ एक दशकापूर्वी फ्रान्सिस कॉलिन्स व क्रेग व्हेंटर या शास्त्रज्ञांनी 'मानवी जनुक आराखडा' सादर करून मानवी रंगसूत्रांवरील जनुकीय घटकांची क्रमवारी लावण्यात यश संपादन केलं. देवाची अनमोल कृती असलेल्या मानवप्राण्याच्या जडणघडणीच्या रसायनाचं कोडं मानवाला उमगलं. 'ह्युमन जीनोम प्रकल्पा'द्वारे मानवी जीवनाचं पुस्तकच जणू उलगडून दाखवणारा हा क्रांतिकारी शोध होता.


या साऱ्यांवर कडी करत 'कृत्रिम जीवाणू'ची निर्मिती करून क्रेग व्हेंटर व त्यांच्या सहकाऱ्यांनी लावलेल्या क्रांतिकारी शोधामुळे आता मानवाला प्रयोगशाळेत हव्या त्या जनुकीय गुणधर्माचे प्राणी, वनस्पती निर्माण करता येणं शक्य होणार आहे. या शोधामुळे जीवशास्त्रातील एक नवी शाखा उदयास येतेय. 'सिंथेटिक बॉयॉलॉजी' म्हणजेच 'कृत्रिम सजीवशास्त्र'... 'प्रतिसृष्टी' साकारणारं...

क्रेग व्हेंटर यांचा शोध हा तंत्रज्ञानाचा सुंदर मिलाफ आहे. या शोधाला एक तात्त्विक परिमाणही लाभलंय. जीवनावर नियंत्रण मिळवणारा हा शोध आहे. जीवन साकारण्याचं तंत्र माणसाला गवसलंय ते प्रयोगशाळेत या सजीवांची निर्मिती करून. हे जीवन म्हणजे काय...त्याची निर्मिती कशी होते याची उकल झाल्यामुळे या शोधाला तात्त्विक परिमाण लाभलंय.

या शोधामुळे 'डिझायनर' सजीव निर्माण करण्याचं तंत्र क्रेग व्हेंटर यांनी विकसित केलंय. नोबेल पारितोषिक विजेते शास्त्रज्ञ हॅमिल्टन स्मिथ यांच्या नेतृत्वाखालील वीस शास्त्रज्ञांच्या चमूनं तब्बल १५ वर्षांच्या अथक परिश्रमानंतर हे तंत्र विकसित करण्यात यश मिळवलंय. या शास्त्रज्ञांच्या चमूत तीन मूळ भारतीय शास्त्रज्ञांचाही समावेश आहे. हा

शोध साकारण्यासाठी खर्च आलाय तब्बल ४० दशलक्ष डॉलर्स.

या क्रांतिकारी प्रयोगात मायकोप्लाझमा या जीवाणूच्या डीएनए रेणूतील जनुकांचे आरेखन करून या जीवाणूतील ३८१ जनुकांची निर्मिती प्रयोगशाळेत कृत्रिमरीत्या करण्यात आली. प्रयोगशाळेत तयार करण्यात आलेला हा डीएनएचा रेणू मग दुसऱ्या जीवाणू पेशीत संक्रमित करण्यात आला. या नव्या 'कृत्रिम' सजीवाची मग प्रयोगशाळेत वाढ करण्यात आली आणि निर्माण झाला सर्वस्वी नवीन सजीव... 'कृत्रिम'रीत्या तयार केला गेलेला... या सजीवाचं नामकरण करण्यात आलं मायकोप्लाझमा लॅबॉरॅटोरियम. प्रयोगशाळेत तयार केला गेलेला म्हणून 'लॅबॉरॅटोरियम'...अन् साकारला क्रांतिकारी 'सिंथेटिक' म्हणजेच कृत्रिम सजीव...



**'सिंथेटिक' सजीव**

या भविष्यवेधी शोधामुळे अनेक क्रांतिकारी बदल घडून येण्याचा ठाम आशावाद व्यक्त केला जातोय. मानवातील अनुवांशिक आजार दूर करता येणं शक्य होऊन निरोगी, आरोग्यसंपन्न जीवन प्रदान करता येणं शक्य होईल. अनेक दुर्धर रोगांवर रामबाण लसींची निर्मिती करता येणंही शक्य होईल.

या शोधामुळे जणू जीवनाच्या कोड्याची उकल करून प्रयोगशाळेत जीवन निर्माण करता येणं शक्य झालंय. वामनानं जसं केवळ तीन पावलांत सारं विश्व पादाक्रांत केलं तसंच जीवनावर विजय मिळवणाऱ्या या तंत्रामुळे केवळ तीन पायऱ्यांद्वारे प्रयोगशाळेत सजीव साकारला जातो. या तंत्रात प्रथम जीवाणूतील डीएनए रेणूचं आरेखन करण्यात येतं. नंतर कृत्रिमपणे प्रयोगशाळेत निर्माण केलेला डीएनए रेणू एकत्र जोडला जातो व शेवटी हा रेणू जीवाणू पेशीत संक्रमित केला जातो. आणि तयार होतो नवा कोरा सजीव! 'कृत्रिम'रीत्या सर्वस्वी प्रयोगशाळेत तयार केला गेलेला...


हा शोध क्रांतिकारी आहे. या शोधामुळे एक नवी उत्क्रांती येऊ घातलीय. या शोधाच्या उपयुक्ततेबद्दल क्रेग व्हेंटर म्हणतात, की या शोधामुळे समुद्री शैवालापासून इंधननिर्मिती करता येणं शक्य होईल व त्याद्वारे मानवजातीला भेडसावणाऱ्या उर्जासंकटावर मात करता येणं शक्य होणार आहे. यापुढे जात व्हेंटर म्हणतात, की प्रयोगशाळेत तयार केलेले जीवाणू व शैवालप्रजाती आपण सरळ आपल्या गाडीच्या इंधन टाकीत सोडून इंधननिर्मिती करता येणं शक्य होईल! अनेकानेक दुर्धर व्याधींवर लसीची निर्मिती करता येणं शक्य होईल. हमखास लागू पडणारी 'पर्सनलाईज्ड' औषधांची निर्मिती करणंही या शोधामुळे शक्य होईल.

जगभरात मात्र ही खरंच कृत्रिम सजीवनिर्मिती आहे काय याविषयी उलटसुलट चर्चा घडून येतेय. या शोधामुळे अनेक सामाजिक व नैतिक प्रश्न निर्माण होण्याची भीती व्यक्त केली जातेय. अमेरिकेचे अध्यक्ष बराक ओबामा यांनी हा शोध जाहीर होऊन २४ तासही उलटले नाहीत तोच या शोधाच्या नैतिक पैलूंचा अभ्यास करण्यासाठी तडकाफडकी एक उच्चस्तरीय समिती स्थापन करण्याची घोषणा केलीय. तर दुसरीकडे हा शोध म्हणजे केवळ जीवअभियांत्रिकी तंत्राची पुढची पायरी असल्याचं मत व्यक्त केलं जातंय. अशा प्रकारे निर्माण झालेले सजीव निसर्गात सोडले तर त्यामुळे सजीवसृष्टीलाच धोका पोचण्याची भीतीही व्यक्त केली जातेय. हे तंत्र जर अतिरेक्यांच्या हाती पडलं तर त्याद्वारे दुर्धर रोग निर्माण करणाऱ्या जंतूंची निर्मिती होऊन मानवजातीच्या अस्तित्वास धोका पोचण्याची संभावना देखील व्यक्त केली जातेय.

या ठिकाणी एक गोष्ट नमूद करायला हवी, की हा एक क्रांतिकारी शोध आहे. जनुकांची प्रयोगशाळेत निर्मिती करून संपूर्ण रंगसूत्राची प्रयोगशाळेत निर्मिती करणं हे सजीवांच्या निर्मितीप्रक्रियेवर नियंत्रण मिळवणारं तंत्रज्ञान आहे. गेल्या काही वर्षांत जनुकांचा क्रम लावून त्यांची रचना स्पष्ट करणारं तंत्रज्ञान झपाट्यानं विकसित झालंय. त्याद्वारे संपूर्णपणे नवीन जनुकीय रचना असलेल्या पेशीची निर्मिती करणं म्हणजेच 'कृत्रिम सजीव' तयार करणं आहे.

क्रेग व्हेंटर यांच्या शोधावर जगभरात एकच कल्लोळ माजलाय. विज्ञानातील सर्व क्रांतिकारी शोध व बदलांना

**कृत्रिम सजीवांची निर्मिती**





**आरेखन** **जोडणी** **संक्रमण**

टीकेच्या चक्रव्युहातून जावं लागतं. गॅलिलिओ, कोपर्निकस, डार्विन आणि आइन्स्टाईन यांनाही याच दिव्यातून जावं लागलं होतं. अशाच क्रांतिकारी शोधांच्या तोडीचं हे संशोधन आहे. या शोधामुळे मानवाची सजीवसृष्टीची जाण वाढलीय आणि जीवशास्त्र एका नव्या टप्प्यावर येऊन पोचलंय. आज जरी जग क्रेग व्हेंटरना 'मॅड सायंटिस्ट' म्हणत असलं तरी प्रयोगशाळेत नवीन सजीव प्रजातीची निर्मिती करणं ही पृथ्वीवरील सजीवसृष्टीच्या निर्मितीला कलाटणी देणारी घटना आहे.

आज जीवतंत्रज्ञानामुळे आपल्या बुद्धिसामर्थ्याच्या जोरावर कल्पनेतील विश्व प्रत्यक्षात साकारण्याचं सामर्थ्य मानवाला लाभलंय आणि या सामर्थ्याच्या जोरावर माणूस बनतोय विश्वनियंता. जणू 'ब्रेव्ह न्यू वर्ल्ड' प्रत्यक्षात अवतरतंय. जीवांची उत्पत्ती, स्थिती अन् लय यावर नियंत्रण मिळवून नव्या वांछित विश्वाच्या सृजनातून साकारतेय 'प्रतिसृष्टी'...

**डॉ. सिद्धिविनायक बर्वे**
१०२, त्रिशूल, शिवधाम कॉम्प्लेक्स,
अंबरनाथ-४२१५०१
भ्रमणध्वनी : ९८२१० ९६००८
ssbarve@scientist.com

आज टॉवरसंस्कृतीच्या विळख्यात जात चाललेल्या 'लालबाग'चा गेल्या आठ दशकांचा सामाजिक इतिहास साकारलेला हा ग्रंथ उल्लेखनीय दस्तऐवज ठरणार आहे. काही प्रातिनिधिक उदाहरणांच्या साहाय्यानं, सर्व घटना बघताना लेखकाचा प्रांजळ सूर सकारात्मक आहे.




**लालबाग**
आदिनाथ हरवंदे
मूल्य : ४०० रुपये
सवलतीत : २४० रुपये

# मेस्मर आणि त्याचा संमोहनप्रभाव

**अच्युत गोडबोले**

अठराव्या शतकाच्या उत्तरार्धात आणि एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वार्धात मेस्मरिझम हा अचाट आणि विचित्र प्रकार धुमाकूळ घालणार होता आणि अनेक शिकलेले लोकही त्यात सामील होणार होते. मेस्मरिझम ही उपचारपद्धती म्हणजे नक्की काय प्रकार होता आणि ती निर्माण करणारी मेस्मर ही व्यक्ती होती तरी कोण?

जर्मनीतल्या इझनँग खेड्यातील, कॉन्स्टन्झ (Constanz) नावाच्या एका तळ्याकाठच्या गावात २३ मे १७३४ रोजी फ्रॅन्झ मेस्मरचा जन्म झाला. स्थानिक ज्येसुइटकडून तत्त्वज्ञानाचे धडे घेतल्यानंतर त्यानं धर्मगुरू आणि वकील होण्याचे अयशस्वी प्रयत्न केले. त्यानंतर व्हिएन्ना विद्यापीठात वैद्यकशास्त्र शिकून १७५९ साली त्यानं त्यात पदवी मिळवली. त्यानं माणसाच्या शरीरावर गुरुत्वाकर्षणाचा काय परिणाम होतो या विषयावर १७६६ मध्ये 'ऑन दी इन्फ्लुअन्स ऑफ दी प्लॅनेट्स' हा शोधनिबंध लिहिला. सुदैवानं त्याच्या गाइडनं तो न वाचल्यामुळे त्याला पीएच्.डी.ही मिळाली! या शोधनिबंधातल्या कल्पना न्यूटनबरोबर काम करणाऱ्या ब्रिटिश फिजिशियन रिचर्ड मेडच्या लिखाणावरूनच ढापल्या होत्या. सोळाव्या शतकात पॅरासेल्सस नावाचा एक डॉक्टर होता. आकाशातल्या ग्रहताऱ्यांचा माणसाच्या प्रकृतीवर परिणाम होतो अशी त्याची समजूत होती. त्याची तो प्रात्यक्षिकंही करी. पॅरासेल्ससच्या शिकवणुकीचा मेस्मरवर प्रभाव होताच. चंद्राचा जसा समुद्राच्या भरती-ओहोटीवर परिणाम होतो आणि त्यामुळे माणसाला अनेक तऱ्हेचे विकार का होतात याचं स्पष्टीकरण मिळतं, तसंच आकाशातल्या इतरही ग्रहताऱ्यांच्या गुरुत्वाकर्षणाचा माणसाच्या आरोग्यावर परिणाम होतच असतो असं मेस्मरनं प्रबंधात म्हटलं होतं. पण हा ग्रहताऱ्यांचा प्रभाव माणसापर्यंत पोचण्यासाठी मध्ये काहीतरी माध्यम असावं असं त्याला वाटलं. त्यासाठी त्यानं, या सर्व विश्वात एक अदृश्य असा द्रवपदार्थ भरून राहिलाय अशी कल्पना केली. ही कल्पना खरं तर ग्रीक काळापासून चालत आली होती. अशा द्रवपदार्थाला इथर, स्पिरिट्स किंवा न्युमा (Pneuma) अशा वेगवेगळ्या नावांनी संबोधत असत. युरोपमधल्या वैज्ञानिक विचारांमध्ये ही कल्पना वारंवार वापरली गेली. याच्याच प्रभावाखाली न्यूटननंसुद्धा असा पदार्थ असण्याची शक्यता मान्य केली होती. न्यूटनच्या अप्रकाशित पत्रव्यवहारामध्ये, 'प्रिन्सिपिया'मध्ये आणि 'ऑप्टिक्स'मध्ये या कल्पनेचा वारंवार उल्लेखही त्यानं केला होता.

न्यूटननं जरी अशा द्रवपदार्थांविषयी फक्त शक्यता वर्तवली होती, तरी काही उत्साही मंडळींनी, न्यूटननं ही कल्पना मान्यच केली आहे असं पसरवायला सुरुवात केली. असा पदार्थ जर नसेल तर गुरुत्वाकर्षण, प्रकाश, उष्णता आणि चुंबकत्व या सगळ्या गोष्टी कशा शक्य होतील आणि त्यांचा प्रभाव हा दूरवरच्या गोष्टींवर कसा पडेल? अशीही पुष्टी त्यांनी जोडायला सुरुवात केली. अशाच कुठल्यातरी लिखाणाचा मेस्मरवर प्रभाव पडल्यामुळे त्याचाही अशा द्रवपदार्थांवर विश्वास बसला होता आणि या सगळ्याचा माणसाच्या आरोग्यावर काय परिणाम होतो, याचा त्याला तपास करावासा वाटला होता.

पदवी मिळाल्यानंतर दोनच वर्षांत त्यानं व्हिएन्नामधल्या ॲना मारिया या श्रीमंत विधवेशी लग्न केलं आणि तिच्या मदतीनं व्हिएन्नातल्या सधन लोकांमध्ये जम बसवायला सुरुवात केली. बेंजामिन फ्रँकलिननं जेव्हा 'ग्लास हार्मोनिका' या वाद्याचा शोध लावला तेव्हा मेस्मर ते वाजवायला शिकला. मेस्मरला संगीताची आवड होतीच. मोत्झार्टच्या पहिल्या ऑपेराचा प्रयोग मेस्मरच्या घराच्या बागेत झाला होता!

१७७३ साली सत्तावीस वर्षांची एक बाई त्याच्याकडे उपायांसाठी आली. इतर डॉक्टरांच्या उपायांचा तिला गुण येत नव्हता. मेस्मरही तिच्याकडे बघून हतबल झाला होता. याच वेळी मॅक्झिमिलियन हेल या जेसुइट धर्मगुरूबरोबर त्याचं पूर्वी झालेलं संभाषण त्याला आठवलं. हेलनं चुंबकत्वाचा आरोग्यावर परिणाम होतो असं त्याला पूर्वीच सांगून ठेवलं होतं. मेस्मरनं दोन शक्तिशाली चुंबक विकत आणले आणि ते त्या बाईच्या शरीरावरून फिरवायला सुरुवात केली. याबरोबर ती थरथर कापायला लागली. काही काळ तिची शुद्ध हरपली. ती जेव्हा जागी झाली तेव्हा ती पूर्ण 'बरी' झाली होती! आजच्या विज्ञानाप्रमाणे तिला 'हिस्टेरिकल न्यूरॉसिस' झाला होता आणि ती सुचनांमुळे (सजेशन) बरी झाली होती. मॅग्नेटिक थेरपीचा जन्म यातूनच होणार होता. चुंबकत्वामुळे काही रोगांवर उपचार करता येतील असं मात्र मेस्मरला सुरुवातीला मुळीच वाटत नव्हतं.

या 'उपचारा'नंतर मात्र मेस्मरचा चुंबकत्वावर विश्वास दृढ झाला. याचा अर्थ, गुरुत्वाकर्षण आणि चुंबकत्व हे दोन्ही दूरवरून कुठल्यातरी इथरसारख्या अदृश्य माध्यमातून आपला प्रभाव टाकत होते. मेस्मरनं यानंतर गुरुत्वाकर्षण आणि



चुंबकत्व यातलं साम्य ओळखून, हे प्रयोग मग इतर रुग्णांवरही करायचं ठरवलं. रुग्णाला आडवं पडायला सांगून तो त्याच्या शरीरावरच्या दुखापत किंवा आजार झालेल्या अवयवांवरून शक्तिशाली चुंबक फिरवी. या चुंबकाचा गुरुत्वाकर्षणा-सारखाच प्रभाव इथरद्वारे त्या रुग्णाच्या शरीरावर पडेल आणि तो रुग्ण बरा होईल अशी त्याची समजूत होती. शरीरात चुंबकत्वाचा द्रव भरून राहिलेला असतो आणि या द्रवात जर काही 'गडबड' झाली किंवा त्याची दिशा बदलली तर रोग जडू शकतात असं मेस्मरला वाटे. यामुळेच चुंबक बाहेरून फिरवल्यावर तो द्रव पुन्हा मूळ दिशेनं फिरतो आणि ते पूर्ववत झाल्यानं रोग बरे होतात अशी ही थिअरी होती.

सुरुवातीच्या प्रयोगात, मेस्मर रुग्णाच्या गुडघ्यांना गुडघे टेकवून बसे. रुग्णाचे अंगठे आपल्या हातांनी दाबत त्याच्या डोळ्यांत रोखून पाही. मग तो रुग्णाच्या खांद्यापासून तळहातापर्यंत हात फिरवी. त्यानंतर आपल्या बोटांनी रुग्णाच्या बरगड्यांखालच्या भागावर बराच वेळ दाब देई. या 'उपचारानं' रुग्णाला विचित्र जाणिवा होत किंवा वाटे की आपल्याला बरं वाटतंय.

मग त्यानं चुंबकत्वाचाच उपयोग करून उपचार करायची आणखी पद्धत शोधून काढली. रोगांवर उपाय करण्याची मेस्मरची पद्धत ही खूपच सोपी असली तरी नावीन्यपूर्ण होती. रोग्याला एका टबच्या बाजूला बसवलं जाई. या टबमध्ये चुंबकत्व प्राप्त झालेला लोखंडाचा कीस पसरलेला असे. या टबाच्या मध्यापासून परिघाकडे जाणारे लोखंडाचे काही

दंडुकेही त्यात ठेवलेले असत. या चुंबकीय लोखंडी किसाकडून त्या लोखंडी दंडुक्यातही चुंबकत्व येई. मग मेस्मर त्या रुग्णाला या दंडुक्यावर हात ठेवायला सांगत असे. त्यामुळे चुंबकत्वाचा परिणाम त्या रुग्णाच्या शरीरावर होईल, असा तो प्रयोग होता. या प्रक्रियेत कित्येक रुग्णांत मानसिक आणि शारीरिक 'टर्ब्युलन्स' (अस्वस्थता, खळबळ) आणि डिस्टर्बन्स (व्यत्यय) जाणवे. पण या खळबळीनंतर बऱ्याच रुग्णांना चक्क बरंच बरं वाटायला लागे! जरी सगळे रुग्ण खऱ्या अर्थानं पूर्णपणे या प्रक्रियेत बरे झालेले नसले, तरी बरं होणाऱ्या किंवा निदान 'बरं झालोय' असं वाटणाऱ्या रुग्णांची संख्या मेस्मरला प्रसिद्धी मिळवून देण्याइतकी नक्कीच होती!

१७८० पर्यंत रुग्ण वाढू लागल्यावर मेस्मर एकेकट्यावर उपचार करी, तसाच एकाच वेळी समूहावरही करी. त्यासाठी तो एक साधारण दीडफूट उंचीची बकेट घेई. वीसेक रुग्ण भोवती बसतील एवढी ती मोठी असे. जितके लोक भोवती बसलेत तितकी छिद्रं बकेटला करून त्यातून बाहेरच्या बाजूनं काटकोनात निघणाऱ्या कमी-जास्त उंचीच्या लोखंडी शिगा काढी, ज्याद्वारे त्यांचा उपयोग शरीराच्या वेगवेगळ्या भागांच्या उपचारासाठी करता येईल. या लोखंडी शिगांव्यतिरिक्त बकेटपासून एका रुग्णाला जोडणारा एक दोरखंड असायचा. तो त्या एका रुग्णापासून दुसऱ्या-तिसऱ्या असा वर्तुळाकृती बसलेल्या सर्व रुग्णांना वेढत असे. आणि मग रुग्णांना स्पर्शही न करता आपल्या हातांच्या आणि डोळ्यांच्या विवक्षित हालचाली करून रुग्णावर उपचार करी.

या प्रयोगांच्या बातम्या व्हिएन्नाच्या वर्तमानपत्रांत झळकायला लागल्या. त्या वाचून मॅक्सिमिलियन हेल खवळला आणि ही त्याचीच मूळ कल्पना आहे आणि ती मेस्मरनं चोरली आहे असा आरोप करायला त्यानं सुरुवात केली. मेस्मरनं हेलचं म्हणणं खोडून काढलं आणि ही थिअरी आपणच अनेक वर्षांपूर्वी मांडली होती असं जाहीरपणे सांगायला सुरुवात केली. लोकांचा मेस्मरवर विश्वास बसला होता खरा, पण केव्हा ना केव्हातरी हेल पुन्हा डोकं वर काढून याचं श्रेय घेऊन जाईल असं त्याला वाटायला लागलं. यामुळे ही गोष्ट सोडून काहीतरी वेगळं करायला पाहिजे असं त्याला वाटायला लागलं.

मग आपल्याला वेगळ्याच तऱ्हेचं एक चुंबकत्व सापडलंय असं त्यानं जाहीर केलं. या चुंबकत्वाचा उपचारांसाठी उपयोग करताना कुठल्याही तऱ्हेच्या लोखंडासारख्या धातूची गरज भासत नाही असं त्यानं म्हटलं होतं. त्याच्या मते, प्राण्यांच्या आणि माणसाच्या मज्जासंस्थेतच (नर्व्हस सिस्टिम) चुंबकत्व असतं. त्याला तो 'ॲनिमल मॅग्नेटिझम' म्हणायला लागला. त्याच्या म्हणण्यानुसार, हा





ॲनिमल मॅग्नेटिझम आपण बघू किंवा स्पर्शू शकत नाही, तरीही प्रशिक्षण घेतलेल्या कुठल्याही माणसाला समोरच्या व्यक्तीतल्या या ॲनिमल मॅग्नेटिझमला चालना देता येते आणि त्यामुळे रुग्णाला बरं करता येतं. यासाठी बाहेरच्या चुंबकाची गरजच भासत नाही, असं तो म्हणायला लागला. यानंतर त्यानं रुग्णांवर बरेच प्रयोग केले, प्रात्यक्षिकं करायला सुरुवात केली. रुग्णाला झोपायला लावून त्याच्या शरीरावरून मांत्रिक करतात तसा, स्पर्श न करता, तो फक्त वरखाली-वरखाली हात फिरवी. यामुळे अनेक रोग बरे झाल्याचा दावाही तो करी. हे 'उपचार' होत असताना रुग्ण मात्र एका वेगळ्याच धुंदीमध्ये किंवा 'ट्रान्स'मध्ये जातो, असंही त्यानं सांगून ठेवलं होतं. मेस्मरच्या या असल्या वेडगळ प्रयोगांवर व्हिएन्नामधल्या त्यावेळच्या डॉक्टरांचा अर्थातच विश्वास बसला नाही.

१७७७ साली तर एक विचित्रच घटना घडली. 'मारिया थेरेसा फॉन पॅरॅडिस (Maria Therese Von Paradies)' नावाची पियानो एक वाजवणारी आंधळी मुलगी, मेस्मरकडे आली. मोत्झार्टनं त्याचा बी-फ्लॅट पियानो कॉंचर्टो के- ४५६ या मुलीसाठीच लिहिला होता. तीन वर्षांपासून ती आंधळी होती. मेस्मरकडे आली तेव्हा ती अठरा वर्षांची होती. मेस्मरनं तिच्यावर 'उपचार' सुरू केले. काही काळानं, 'तिला आता थोडंबहुत दिसायला लागलंय, पण ते फक्त मी हजर असतानाच तिला दिसतं, मी नसताना नाही' असं त्यानं सांगायला सुरुवात केली. वर्षभरानं तिच्या वडिलांनी कंटाळून उपचार थांबवले. ही बातमी सगळीकडे पसरली. यानंतर मात्र व्हिएन्नातल्या डॉक्टरांनी मेस्मरविरुद्ध एक ठग, ढोंगी, फसवणारा म्हणून जोरदार ओरड करायला सुरुवात केली. शेवटी या सगळ्याला वैतागून, कोणाला काहीच न सांगता, एके दिवशी मेस्मरनं आपला बाडबिस्तारा आवरला आणि तात्काळ व्हिएन्ना सोडून तो पॅरिसमध्ये निघून गेला!

पॅरिसचं सांस्कृतिक वातावरण वेगळंच होतं. पॅरिसमधली मंडळी ही सनातनी नव्हती. कुठलीही नवीन गोष्ट दिसली की लोक तिच्यामागे धावत. त्यामुळे नवीननवीन शोधांसाठी आणि प्रयोगांसाठी पॅरिसची भूमी खूपच सुपीक होती. यामुळे मेस्मरच्या 'ॲनिमल मॅग्नेटिझम'चं पॅरिसमध्ये चांगलंच स्वागत झालं. डॉ. चार्लस् डी. एस्लेन (Dr. Charles D. Eslen) हा त्याकाळचा पॅरिसमधला एक प्रसिद्ध डॉक्टर होता. त्यानं मेस्मरला खूप प्रोत्साहन दिलं. प्रत्यक्ष रुग्ण बरा झाला नाही तरी तो रुग्ण एका निद्रावस्थेत किंवा ट्रान्समध्ये जातो आहे, याचंही तिथल्या लोकांना खूप आश्चर्य वाटू लागलं  आणि ते बघायला ते गर्दी करायला लागले. मेस्मरनं या गोष्टीचा फायदा घेत मग पॅरिसमध्येच बस्तान बसवलं आणि तिथे त्याची ख्यातीही वाढतच गेली. अनेक तऱ्हेच्या व्याधी झालेल्या लोकांच्या झुंडीच्या झुंडी मेस्मरच्या दाराशी उपचारांसाठी यायला लागल्या. यामुळे मेस्मरची लोकप्रियता आणखी वाढली! इतकी, की मेस्मरच्या शिष्यांनी फक्त त्याच्या 'मेस्मरिझम'च्या उपचारांवर दोनशेच्या वर पत्रकं आणि अनेक पुस्तकं लिहिली होती. मेस्मर प्रथम एकेका रुग्णावर उपचार करी, पण पुढे त्याला वेळ कमी पडायला लागल्यामुळे तो एकाच वेळी अनेकांवर 'उपचार' करायला लागला. एका टबभोवती तो सगळ्यांना बसायला सांगे. आता त्याला लोखंडी कीस आणि चुंबकत्वाची गरज उरली नव्हती. तो प्रत्येकाकडे टक लावून बघे. मग तो माणूस ट्रान्समध्ये जाई आणि मग त्याचं हात फिरवणं सुरू होई!


हे प्रयोग आणि प्रात्यक्षिकं करताना मेस्मर या सगळ्या प्रयोगाबद्दल प्रचंड गुप्तता बाळगत असे. प्रयोगाच्या वेळी बराचसा काळोख करून, तेवढ्या प्रकाशात, जादूगारासारखे किंवा मांत्रिकासारखे गडद रेशमी पायघोळ अंगरखे किंवा तसेच चित्रविचित्र कपडे घालून, मागे वाजणाऱ्या हार्मोनिका या वाद्याच्या पार्श्वभूमीवर तो आपले प्रयोग करी. त्याच्या हातात बऱ्याच वेळा एक लोखंडी रूळ असे. आपण कुठलाही रोग बरा करू शकतो असा दावा तो करी. त्यामुळे प्रेक्षकांची उत्कंठा आणि त्यांना वाटणारं आश्चर्यही अनेक पटींनी वाढे. ज्यांच्यावर हा प्रयोग चाले त्यांना अगदी आरामात बसायला आणि त्या सगळ्या प्रकाराचा आनंद उपभोगायला सांगे. थोडक्यात, १७८५ सालापर्यंत या प्रयोगांतलं विज्ञान(!) जवळपास संपलंच होतं. आता त्याचं चक्क जादूटोणा किंवा चमत्कृतीचे प्रयोग असं स्वरूप झालं होतं. या प्रयोगांना लोकांची झुंबड उडत असली तरी पॅरिसमधले वैज्ञानिक मात्र त्याच्यावर वैतागायला लागले.

पॅरिसमध्येही डॉक्टर मेस्मरवर वैतागले. शेवटी, १७८४ साली मेस्मर बरोबर आहे की नाही हे ठरवण्याकरता, मेस्मरला विचारात न घेता, तत्कालीन राजा सोळावा लुई यानं वैद्याकशास्त्रातील चार निष्णातांचा आयोग तपास घेण्यासाठी नेमला. आयोगातील तज्ज्ञांच्या विनंतीनुसार राजानं रॉयल ॲकडेमी ऑफ सायन्सेसमधील आणखी पाच तज्ज्ञ या तपासासाठी नेमले. त्यात प्रसिद्ध रसायनशास्त्रज्ञ लेव्हायजे आणि

प्रसिद्ध मुत्सद्दी व वैज्ञानिक बेंजामिन फ्रँकलिन या दोघांचा समावेश होता. विविध रोगांवरचे उपचार किंवा निद्रावस्था या दोघांचा कुठल्याच तऱ्हेच्या चुंबकत्वाशी काहीही संबंध नसून, रोग्याला तात्पुरतं का होईना, जे बरं वाटतं ते 'प्लॅसेबो इफेक्ट'मुळे होतं, असा त्यांनी निर्वाळा दिला. आपल्यावर उपचार होत आहेत या कल्पनेनंच रुग्णाला बरं वाटणं असा तो प्रकार होता. उदाहरणार्थ, रुग्णाला त्याच्यावर उपचार होतायत याची कल्पना नसताना हेच प्रयोग त्याला दिसणार नाहीत अशा तऱ्हेनं जर केले, तर त्या रुग्णाला बरंही वाटत नाही आणि निद्रावस्थाही येत नाही असं त्यांनी दाखवून दिलं; आणि याउलट, रुग्णांना त्यांच्यावर बंद केलेल्या लोखंडी दरवाज्यातून उपचार होणार आहेत असं सांगून दरवाजा बंद केल्यावर काहीही उपचार न करताही त्या रुग्णांना थोडंस 'बरं' वाटायला लागलं होतं हेही त्यांनी दाखवून दिलं. थोडक्यात, मेस्मर थापा मारत आहे हे त्यांनी दाखवून दिलं होतं. मेस्मरला आता काय करावं ते कळेना. माझ्याकडे श्रीमंत लोकांच्या रांगा लागतात म्हणून मुद्दामच या डॉक्टरांनी माझ्याविरुद्ध कट रचलाय असं स्पष्टीकरण तो द्यायला लागला. परंतु एकंदरीतच या अहवालामुळे मेस्मर खूपच वैतागला आणि पॅरिस सोडून निघून गेला! आयुष्याची शेवटची तीस वर्ष त्यानं स्वित्झर्लंडमध्ये जवळपास पूर्ण अज्ञातवासात काढली!

**मेस्मरिझमचा प्रभाव**

मेस्मरनं पॅरिस सोडल्यानंतरही मेस्मरची पद्धती (मेस्मरिझम) मात्र पॅरिसमध्ये चालूच राहिली. त्याच्या अनेक शिष्यांनी त्याच किंवा तशाच पद्धतीनं रुग्णांवर उपचार करण्याचा सपाटा लावला. चुंबकत्व धारण केलेले धातू किंवा हात वापरून मग उपचार सुरू झाले. हे उपचार करण्यात मार्क्विस डी पुसेगर हा अग्रस्थानी होता. चुंबकत्व प्राप्त झालेल्या (मॅग्नेटाइज्ड) हातांचा वापर करून रुग्णाला झोपेच्या अवस्थेपर्यंत नेता येतं असं पुसेगरला वाटे. त्याच्या मते, अशा तऱ्हेनं आलेल्या निद्रावस्थेत रुग्णाला खूप हलकं वाटे आणि बरंही वाटे. माणसं निसर्गत:च झोपेत चालतात तशी काही चुंबकत्वाच्या प्रभावाखालील झोपेत चालत. या प्रकाराला कृत्रिम तऱ्हेनं झोपेत चालणं (आर्टिफिशियल सोम्नॅब्युनिझम) असं म्हणत. पुसेगर यानं झोपेत चालणाऱ्या व्हिक्टर रेस या खेडुताचं वर्णन केलं होतं. चुंबकत्वाच्या प्रभावाखाली झोपेत चालत असताना व्हिक्टरच्या व्यक्तिमत्त्वात बदल घडून येई.


**मूल्य : २०० रुपये,**
**सवलतीत : १२० रुपये**

## ध्यास आणि प्रवास

### सुलभा वर्दे

सुलभा वर्दे १९६२ साली मुंबईच्या सायन हॉस्पिटलमध्ये मेडिकल सोशल वर्कर म्हणून रुजू झाल्या. विविध प्रकारच्या रुग्णांची काळजी वाहताना तिथल्या अतिविकलांग रुग्णांची दारुण अवस्था त्यांच्या मनाचा ठाव घेत होती. जगण्याची आस हरवलेल्या या रुग्णांमध्ये आत्मनिर्भरतेतून आत्मविश्वासाची ऊर्जा निर्माण करण्याचा ध्यास त्यांनी घेतला. त्यातूनच सुरू झाला पॅराप्लेजिक फाउंडेशनचा प्रवास.

सायन हॉस्पिटलच्या एका बराकीत त्याचे बीज पेरले गेले आणि गेल्या चाळीस वर्षांत समाजाने दखल घ्यावी असे अपूर्व काम अनेक सहकाऱ्यांच्या मदतीने त्यांनी उभे राहिले.

पॅराप्लेजिकांच्या शारीरिक इलाजानंतर त्यांना व त्यांच्या कुटुंबीयांना मानसिक आधार, अर्थार्जनाची सोय, तना–मनाची निगा राखण्यासाठी समुपदेशन आणि क्रीडा, सहकार, सहलींमधून जीवनानंद निर्माण करून एका दुर्लक्षित घटकाचा आपुलकीने सर्वांगीण विकास साधण्यासाठी केलेल्या अथक प्रयत्नांची ही कहाणी...

त्याकाळात तो स्वत:च स्वत:च्या रोगाचं तर निदान करू शकत असे, शिवाय इतरांच्याही रोगाचं निदान तो करी, असं पुसेगर सांगे. आश्चर्य म्हणजे, पुसेगरच्याच म्हणण्याप्रमाणे, एरवी जागेपणी तो साध्या प्रश्नाचंही उत्तर देऊ शकत नसे!

या सगळ्या काळात ॲनिमल मॅग्नेटिझमवर युरोपात उलटसुलट चर्चा चालू झाली. खरं तर, यामुळे हे खूळ पूर्ण युरोपात आणखी जास्त पसरलं. काहीच आठवड्यांत लंडनमध्ये अशा प्रयोगांविषयी वर्तमानपत्रात चक्क जाहिराती यायला लागल्या. यामुळे असाध्य रोग बरे होऊ शकतात असंही या जाहिरातीत म्हटलं जात होतं. १७८६ सालापर्यंत मेस्मरिझमला खूपच भरभराटीचे दिवस आले होते. गल्लोगल्ली त्याचे प्रयोग करणारे तज्ज्ञ निर्माण झाले आणि अनेक ठिकाणी अशा प्रयोगांच्या जाहिराती व्हायला लागल्या. त्याचबरोबर त्याला विरोधही तितक्याच जोरात निर्माण झाला. विशेषत: फ्रान्समध्ये निर्माण झालेल्या कुठल्याही गोष्टीकडे इंग्लंडमध्ये खूपच साशंक नजरेनं बघितलं जाई. फ्रान्समध्येही त्यावेळेला जहाल चळवळी चालू असल्यामुळे तिथला विरोधही कडवट व्हायला लागला. यातून १७९४ सालापर्यंत मेस्मरिझमचं खूळ कमी होत होत, इंग्लंडमध्येही खूपच कमी झालं!

मेस्मरनं फ्रान्स सोडल्यानंतरही तिथे मेस्मरिझमचं हे खूळ कमी झालं असलं तरी पूर्णपणे नष्ट झालं नव्हतं. उलट, ते पुन्हा वाढलं. मेस्मरिझमचा प्रभाव कमी होत नाही असं लक्षात आल्यावर– १८२० साली– त्याचा सखोल अभ्यास करण्यासाठी दुसरा एक चौकशी आयोग नेमण्यात आला. तोपर्यंत मेस्मरिझम फ्रान्समधून जर्मनी, इंग्लंड आणि अमेरिका इथेही पसरला होता. त्याचा लोकांवर एवढा पगडा होता, की मेस्मरची पद्धती न वापरणाऱ्या डॉक्टरांनाही मेस्मरिझम टाळता येईना. चांगल्या डॉक्टरांनाही, 'तुमच्याकडे चुंबक आहे का?' असं रुग्ण विचारायला लागले. लोकाग्रहास्तव मग काही चांगले डॉक्टर त्यांच्या उपायांबरोबर, उगाचच चुंबकाचाही वापर करायला लागले.

हा दुसरा चौकशी आयोग अनेक वर्षं अभ्यास केल्यानंतर एका धक्कादायक निष्कर्षापर्यंत पोहोचला. मेस्मरच्या पद्धतीनं रुग्णाला खरंच बरं वाटतं; त्यात बरचंसं तथ्य आहे आणि इतर डॉक्टरांना जमणार नाही अशी ताकद या उपायांमध्ये आहे, असं त्यांनी सादर केलेल्या अहवालात म्हटलं होतं! या उपायांमुळे एकाच्या मनातले विचार दुसऱ्याच्या मनात थेटपणे, कुठलंही माध्यम न वापरता जाऊ शकतात असंही ठोकून दिलं होतं! बंद पाकिटातली पत्रंही या उपायांमुळे वाचता येतात, अशीही चक्क थापाथापी या दुसऱ्या चौकशी आयोगाच्या अहवालात होती! यामुळे चांगले डॉक्टर प्रचंडच वैतागले. या चौकशी आयोगावर भरमसाठ टीकाही झाली. आणि या गदारोळात, मग याचा शहानिशा करण्यासाठी तिसरा चौकशी आयोग नेमण्यात आला. या तिसऱ्या आयोगानं त्या 'खऱ्या' डॉक्टरांची बाजू घेत 'ॲनिमल मॅग्नेटिझम'च्या थिअरीमध्ये काहीच तथ्य नसल्याचं सांगितलं. यानंतर मात्र फ्रान्समधून मेस्मरिझमच्या थिअरीचं जवळपास पूर्ण उच्चाटन झालं.

फ्रान्समध्ये जेव्हा मेस्मरिझमचा अस्त होत होता, तेव्हा इंग्लंडमध्ये मात्र त्याची लोकप्रियता पुन्हा वाढत चालली होती. ड्युपोटे, एलियटसन, ब्रायड, एसडेल अशी इंग्लंडमधील मेस्मरिझमच्या नाट्यातली मुख्य पात्रं होती.

बॅरॉन ड्युपोटे हा फ्रेंच चुंबकतज्ज्ञ इंग्लंडच्या भूमीवर अवतरला आणि १८३६ साली त्यानं या बाबतीत खूपच खळबळ माजवून दिली. यामुळे लंडनमधल्या एका अतिशय प्रसिद्ध डॉक्टरची कारकीर्द उद्‌ध्वस्त होणार होती. ड्युपोटे इंग्लंडमध्ये येण्याअगोदर काहीच काळ जॉन एलियटसन (१७९२–१८६८) या डॉक्टरची लंडनमधल्या युनिव्हर्सिटी कॉलेजमध्ये 'चेअर ऑफ मेडिसिन' या पदावर नेमणूक झाली होती. एक उत्तम डॉक्टर असण्याबरोबरच एक उत्तम विचारवंत म्हणून एलियटसन प्रसिद्ध होता. चार्लस् डिकन्स, कीटस्, ठॅकरे आणि विल्की कॉलिन्स यांचा मित्र असलेल्या एलियटसननं स्टेथोस्कोपचा वापर सर्वप्रथम करायला सुरुवात केली. नवीन विचारांचं आणि वेगळ्या वाटांचं तो नेहमीच स्वागत करत असे.

एलियटसन लंडनमधल्या 'फ्रेनॉलॉजिकल सोसायटी'चा सदस्य होता. फ्रेनॉलॉजीच्या विचारसरणीप्रमाणे डोक्याच्या कवटीच्या उंचसखलपणावरून आणि आकारावरून त्या माणसाचा स्वभाव ओळखता येई आणि विविध रोगांचं निदानही करता येई. फ्रेनॉलॉजी आणि ॲनिमल मॅग्नेटिझम यांच्यात संबंध आहे असं वाटल्यामुळे एलियटसननं ड्युपोटेचं स्वागतच केलं. त्याचं पहिलं भाषण ऐकल्यानंतर तर त्यानं त्याला प्रात्यक्षिक करण्यासाठी चक्क युनिव्हर्सिटी कॉलेजमध्ये (१८२८) आमंत्रण दिलं.

हे प्रयोग गमतीशीरच झाले. ड्युपोटेच्या व्यक्तिमत्त्वामुळे आणि जॉन एलियटसनसारख्या प्रसिद्ध माणसानं हे प्रयोग आयोजित केले असल्यामुळे, दबावाखाली येऊन ज्यांच्यावर

हे प्रयोग होत होते त्यांच्याकडून ड्युपोटेच्या ज्या काही अपेक्षा होत्या–त्याचप्रमाणे ते वागायला लागले. उदाहरणार्थ, 'आता तुम्ही ट्रान्समध्ये जा' असं ड्युपोटेनं त्यांना सूचित केल्यानंतर त्यांनी खरंच ट्रान्समध्ये गेल्यासारखं वागायला सुरुवात केली. हे बघून एलियटसन खूपच आश्चर्यचकित आणि प्रभावित झाला.

मात्र अजूनही एलियटसनच्या मनात मेस्मरिझमविषयी काही शंका होत्या. १८३७ साली जेव्हा त्यानं दुसरा प्रयोग बघितला तेव्हा मात्र तो त्या प्रात्यक्षिकांमुळे भारावून गेला, आणि त्यानं मेस्मरिझमचा स्वीकार केला. त्यानंही आपल्या इस्पितळात त्याचे प्रयोग करायचं ठरवलं. पण इस्पितळानं याला आक्षेप घेतला. वैज्ञानिक पद्धतीनंच रुग्णांवर उपचार करण्यात यावेत, अशीही इस्पितळानं एलियटसनला ताकीद दिली. परंतु यामुळे एलियटसनचा मेस्मरिझममधला रस कमी होण्याऐवजी आणखीच वाढला. तो मेस्मरिझमचा वापर करून रुग्णांना बेशुद्ध किंवा बधिर करत असे. (या गुणांमुळे इंग्लिशमध्ये बधिर होणं किंवा एखाद्या गोष्टीमुळे भारावून जाऊन त्याच्या प्रभावाखाली जाणं याला 'मेस्मराइज होणं' असं म्हणायला लागले) एकदा रुग्ण बधिर झाला, की त्याला फारशा वेदना होत नसत. यानंतर एलियटसन रुग्णांवर शस्त्रक्रिया करी.

एलियटसनच्या या मेस्मरवादी नाट्यामध्ये आता दोन बहिणींनी प्रवेश केला. त्या 'ओके सिस्टर्स (Okey)' म्हणून प्रसिद्धीस आल्या. त्यांच्यावर जेव्हा प्रयोग केले जात तेव्हा त्या पूर्ण ट्रान्समध्ये जात असत आणि खूपच विचित्रासारखं काहीतरी करायला लागत. यामुळे त्यांना अशा प्रयोगाची अधिकच बोलावणी यायला लागली. काही काळातच त्या चक्क स्टार बनल्या! त्यांची वागणूक मात्र खूपच विक्षिप्त होती. त्यामुळेच या प्रयोगांच्या वेळी खूपच चित्रविचित्र प्रकार घडत. यातली बरीचशी प्रात्यक्षिकं त्या कॉलेजमध्येच होत असल्यामुळे, या सगळ्या प्रकरणाविषयी खूपच बोलबाला झाला होता आणि त्याला बरीच कुप्रसिद्धीसुद्धा मिळाली होती. लॅनसेट या प्रसिद्ध मासिकाच्या उपसंपादकांनीसुद्धा या बहिणींच्या विचित्रपणावर ताशेरे ओढले होते. अखेर, कॉलेजच्या अधिकाऱ्यांनी एलियटसनला हा सगळा प्रकार थांबवायला सांगितला. एलियटसन अर्थातच वैतागला. मेस्मरनं आणि मी, रुग्णांना बरं करण्याची एक खूप महत्त्वाची पद्धत शोधून काढली आहे आणि या शोधाचं महत्त्व मानवी इतिहासात वाफेच्या इंजिनाएवढंच मोठं आहे, असं म्हणायला त्यानं सुरुवात केली. कॉलेजला हे मुळीच पटलं नाही. याचा व्हायचा तोच परिणाम झाला. एलियटसनची नोकरीतून हकालपट्टी करण्यात आली!

एलियटसनकडे आता विद्यापीठातली मानाची खुर्ची आणि हुद्दा नव्हता, तरी त्याच्या कारकिर्दीत भरभराट खूप आली. त्याला खूप चांगले मित्र मिळाले आणि त्याची सर्वत्र प्रशंसा झाली. त्यानं नेहमीच्या उपचारांबरोबर चुंबकीय उपचारसुद्धा चालू ठेवले होते. फ्रेनॉलॉजी आणि मेस्मरिझम या दोन विषयांची चर्चा करण्यासाठी स्थापन झालेल्या 'झॉइस्ट (Zoist)' या नियतकालिकाचंसुद्धा तो संपादन करत असे. अर्थातच या नियतकालिकात त्याच्या यशस्वी चुंबकीय प्रयोगांविषयीचीच भरभरून माहिती असे. त्याचबरोबर एलियटसननं मेस्मरिझमबद्दल आणि त्याच्या प्रयोगांबद्दल वर्तमानपत्रांत मोठमोठ्या जाहिराती देणं सुरू केलं! उल्लेखनीय बाब म्हणजे तुरुंगातील सुधारणा, कामगारांच्या शिक्षणातील सुधारणा, देहदंडाला विरोध असे अनेक उदारमतवादी विचारसुद्धा या नियतकालिकातून प्रसिद्ध होत. १८५०च्या दशकापर्यंत इंग्लंडमध्ये एलियटसनचं नाव मेस्मरिझमशी पक्कं निगडित झालं होतं.

चुंबकत्व आणि झोपेत चालणं यातील संबंधावर त्याकाळी बराच विचार चालू होता. विल्यम कार्पेंटर आणि जॉन एलियटसन यांनी जागेपणा आणि झोप यांच्या सीमारेषेवरच्या अवस्थेवर बराच विचार आणि लिखाण केलं होतं. १९व्या शतकाच्या सुरुवातीला फ्रेडरिक हौफ नावाची, झोपेत चालणारी एक अशिक्षित मुलगी खूपच प्रसिद्ध झाली. ती जर्मनीतल्या वाइन्सबर्ग या गावात राहत असे. तिच्याविषयीच्या दंतकथाही त्याकाळी गाजल्या. म्हणे जास्टिनस कर्नर हा डॉक्टर जेव्हा तिच्यावर चुंबकत्वाचा प्रभाव पाडी तेव्हा ती झोपेत चालायला लागे आणि अस्खलित भाषेत धर्मशास्त्र, तत्त्वज्ञान आणि कॉस्मॉलॉजी (अंतराळविज्ञान) या विषयांवर तज्ज्ञांसारखं बोलायला लागे. ती अशा अवस्थेत स्वत:साठी आणि इतरांसाठी उपयोगी पडतील अशी औषधंही सांगायला सुरुवात करी! कहर म्हणजे ती भविष्यवाणीही करू शके. या सगळ्या गोष्टींमुळे हौफ खूपच प्रसिद्ध झाली. जगातील अनेक विचारवंत तिच्याशी चर्चा करायला येत. १८२९ साली, २८ वर्षांची असताना तिचा मृत्यू झाल्यावर, कर्नरनं तिच्याबद्दल आणि तिच्यावर केलेल्या प्रयोगांविषयी एका पुस्तकात लिहून ठेवलं. हे पुस्तकही लोकप्रिय झालं.

विल्की कॉलिन्स या कादंबरीकारानं या लिखाणामुळे



मेस्मरची समाधी

प्रभावित होऊन १८६८ साली 'मूनस्टोन' नावाची एक कादंबरी लिहिली. यात फ्रँकलिन ब्लेक नावाच्या माणसाला एक भारतीय रत्न यॉर्कशायरमधल्या एका ठिकाणी नेऊन देण्यास सांगण्यात येतं. त्याप्रमाणे ते रत्न पोचतं खरं, पण दुसऱ्या दिवशी सकाळी त्याची चोरी झाल्याचं आढळतं. ब्लेकला ते रत्न आपण स्वत:च अफूच्या प्रभावाखाली चोरल्याचं लक्षात येतं. यानंतर ब्लेकवर एक प्रयोग करण्यात येतो. त्याला अफू देऊन पुन्हा झोपवण्यात येतं आणि आश्चर्य म्हणजे तो पुन्हा झोपेत चालायला लागतो; वेगवेगळी कृत्यं करतो; पण नंतर त्याला ते सगळं आठवत नाही!

चुंबकत्वाच्या आणि ड्रग्जच्या प्रभावाखाली माणसांनी झोपेत चालू शकणं, हा माणसाच्या पुनर्जन्माचा पुरावा आहे असंही लोक म्हणायला लागले. पण पुढे मेस्मरिझमचा ऱ्हास झाला तेव्हा या पुनर्जन्म, सुपरनॅचरलशक्ती वगैरे गोष्टींवरचा लोकांचा विश्वास – थोडासा का होईना– क्षीण होत गेला. माणसं झोपेत मैलोन् मैल रस्त्यात, शेतात, मळ्यात चालतात, छपरावरही चढून जातात आणि जागेपणी ज्या गोष्टी करू शकणार नाहीत त्या ती सहजपणे झोपेत असताना करतात, पण हा जादूटोणा नसून त्याची कारणं वैज्ञानिक पद्धतीनं शोधता येतात, यावर आता लोकांचा विश्वास बसायला लागला.

हिप्नॉसिस, हिप्नॉटिझम या शब्दांचा उगम न्यूरॉ–

हिप्नॉटिझममध्ये अर्थात मेंदूची झोप (नर्व्हस स्लीप) आहे हे स्कॉटिश सर्जन जेम्स ब्रेड (१८४१) यानं मांडलं. ब्रेडची उपचारपद्धती फ्रॅन्झ मेस्मरच्या आणि त्याच्या अनुयायांच्या 'मेस्मरिझम' आणि 'ॲनिमल मॅग्नेटिझम'वर आधारित असली तरी कार्यपद्धतीबाबत त्यानं मांडलेला सिद्धांत वेगळा होता.

अतर्क्य प्रयोगांतून जगाला भुलवलेल्या विस्मयकारक मेस्मरनं ५ मार्च १८१५ रोजी, वयाच्या ऐंशीच्या वर्षी आपला देह ठेवला.

(मानसशास्त्रावरील आगामी पुस्तकावरून)

**अच्युत गोडबोले**
godboleas@yahoo.com
achyut.godbole@gmail.com

## मौन होई बोलके
### रोहिणी लिमये



**मूल्य २०० रुपये, सवलतीत १२० रुपये**

मुंबईत कर्णबधिरांसाठी शाळा काढून रोहिणी लिमये यांनी अनेकांना मुकेपणापासून मुक्ती देऊन व्यक्त होण्याची संधी उपलब्ध करून दिली. कर्णबधिरांसाठी शाळा सुरू केली, उपयुक्त अभ्यासक्रम आखले. श्रवण, वाचा व भाषाविष्कारासाठी विविध साधनांची निर्मिती केली. त्यांच्यातला माणूस घडवला.

# अब दिल के बहलने की उम्मीद नही बनती...

## कुमार नवाथे

२५ मार्च २००८ रोजी चार दिवसांकरता मी आणि सुधीर मोघे श्रीलंकेत आलो होतो. कोलंबोच्या कटुनायके एअरपोर्टवर पहाटे पहाटे उतरलो. हवेत प्रचंड उष्मा होता. कोचीन, त्रिवेंद्रमला उतरताना आकाशातून जो नजारा दिसतो, तोच हिरव्यागार गालिचांचा, नारळीपोफळींच्या प्रदेशाचा नजराणा मनाला ताजातवाना करणारा होता. जगभरच्या हवाई-अड्ड्यांच्या तुलनेत कोलंबोचा हा अड्डा पिटुकलासा आहे. बाहेर पडे-पडेपर्यंत आणि प्रत्यक्ष टॅक्सीत बसून मुख्य रस्त्यावरून धावेपर्यंत, घामाच्या धारांनी आपले अस्तित्व दाखवण्यास सुरुवात केली होती. भारताच्या तुलनेत श्रीलंकन रुपय्या भरपूर काही देऊन जातो. त्यामुळे मुंबईतील तीन-तारी हॉटेलांच्या किमतीत कोलंबोत पंचतारांकित वास्तव्य आरामात उपभोगता येते.

श्रीलंकेच्या या राजधानी शहरात अतिरेक्यांच्या कारवाया कुठे-कशा उसळून येतील याचा नेम नसतो, त्यामुळे सारे शहरच लष्करी गणवेश घालून बसल्यासारखे भासत होते. या देशात पाहण्यासारख्या, भेट देण्यासारख्या अनेक जागा आहेत. रामायण घडलेल्या लंकेला धार्मिकतेबरोबर समुद्रकिनाऱ्यामुळे इतरही अनेक आकर्षणांची जोड आहे. आम्ही मात्र कँडी, अनुराधापूर, नुआराएलियापासून थेट चहाच्या मळ्यापर्यंतची सफर फक्त पुस्तकांतून व अनेकानेक रंगीबेरंगी माहितीपत्रकांमधूनच केली. श्रीलंकेत चार दिवसांचा मुक्काम असूनही या साऱ्या जागांनी आम्हाला जराही भुरळ घातली नाही. आमचा आकर्षणबिंदू केवळ एकच होता- 'रेडिओ सिलोन'.

कोलंबो-७ या मध्यवर्ती भागात, ब्रिटिश जमान्यातील SLBC- श्रीलंका ब्रॉडकास्टिंग कॉर्पोरेशनच्या इमारतीत आम्ही प्रवेश केला आणि इतरत्र आम्हाला जणू प्रवेश निषिद्धच्या सूचनाच दिल्या गेल्या. केवळ रात्री वास्तव्याला घरी म्हणजे हॉटेलात जायची परवानगी दिली होती आणि सकाळी साडेसातच्या आधी रेडिओ स्टेशनवर हजेरी लावायची सक्तीवजा ताकीद होती. त्यामुळे तुरुंगातून सुनावणीकरता कोर्टात येणाऱ्या कैद्यांना जसा तेवढा एकच रस्ता ठाऊक असतो; थोडासा तसाच आम्हालाही रिक्षातून रेडिओ स्टेशन ते हॉटेल एवढा एकच रस्ता डोक्यात पक्का बसला होता.

श्रीलंकेतील आमचे सारेच दिवस सोनेरी आठवणींचे होते, कारण आमच्या पूर्वायुष्यातल्या जुन्या स्मृतींना ते उजाळा

देणारे तर होतेच; शिवाय आपण सारे खरेच अनुभवत आहोत यावर विश्वासही ठेवू न देणारे होते.

कुणाची श्रीमंती कशात मोजावी याला काही नियम नाही. जसे कफल्लक दिसणारा माणूस एखाद्या वाद्यावर हुकूमत गाजवून बंदिशी सादर करतो, तेव्हा त्याची श्रीमंती, मोठेपण पैशांत मोजण्याच्या पलीकडचे असते. त्याचाच प्रत्यय पहिल्याच दिवशी आम्हाला रेडिओ सिलोनच्या भेटीत आला. ध्वनिमुद्रिकांनी संपूर्ण भरलेली छोटेखानी, जुनी अनाकर्षक खोली आणि जुन्या दोन-चार खुर्च्या, टेबले. कुठेही नावीन्याचा- संगणक, एसी, दिव्यांचा झगमग भपका नाही, पण सारी खोली साठ-सत्तर वर्षांच्या जुन्या गाण्यांच्या खजिन्याने खच्चून भरलेली. यातील अनेक गाणी दुर्मिळ. त्या साऱ्याची मोजदाद पैशांत कधीच न होणारी.

इतक्या वर्षांनंतर आजही या ध्वनिमुद्रिका नव्या वाटाव्यात अशी चमक असलेल्या. हे रेडिओ स्टेशन म्हणजे एक गूढच आहे. जसजसे त्यांच्या अंतरंगात जाऊ तसतसे धक्के देणारे. इथे एवढ्या प्रचंड गाण्यांची यादी असलेला एकही संगणक नाही. सारे कार्यक्रम मेंदूच्या संगणकातूनच उतरतात. हजारो-लाखो लोकांपर्यंत रोज पोचतात. सारे स्टुडिओ सतत व्यग्र. सिंहली, तमीळ, कन्नड, तेलुगू, इंग्लिश, हिंदी... साऱ्यांची प्रसारणे कुठल्या ना कुठल्या स्टुडिओमधून चालू असतात. सारी इमारत म्हणजे वर्दळीचे एक मधुर संगीतच.

आम्ही रोज सारे कार्यक्रम ऐकत होतो, प्रत्यक्ष भाग घेत होतो. भारतातून आलेले आम्ही खास मेहमान म्हणून आमच्या मुलाखती घेतल्या जात होत्या. काही काम नसेल तेव्हा आम्ही कॅन्टिनमधल्या सिंहली जेवणाचा आनंद घेत होतो.

पहिला दिवस असाच उत्सुकतेत, सारेच थोडे थोडे पाहण्यात गेला. संध्याकाळची सभा सात वाजता सुरू होण्यापूर्वी त्या संध्याकाळचे कार्यक्रम व दुसऱ्या दिवशीचे सकाळचे कार्यक्रम याची तयारी उद्घोषिका पद्मिनी परेरा व ज्योती परमार यांना या दुपारच्या वेळेतच पूर्ण करावी लागायची. आमचा मुक्कामही हे सारे न्याहाळण्याकरता त्यांच्याच खोलीत असायचा. कोणता वार आहे, त्या वेळचा साप्ताहिक कार्यक्रम कुठला; त्यानंतर पुढील अर्धा तास कोणता कार्यक्रम, जर तो श्रोत्यांच्या गाण्यांच्या पसंतीचा असेल, तर त्यांच्या पत्रांवरून त्या ध्वनिमुद्रिकांची, श्रोत्यांच्या नावांची यादी करण्यासारखे काम हसत-खेळत होत राहायचे. उद्या सकाळच्या कार्यक्रमांत कोणाचा जन्मदिवस, पुण्यतिथी असल्यास तो विशेष कार्यक्रम तयार व्हायचा. शेजारीच ग्रामोफोन होता. एखादे गाणे त्यावर लिहिलेल्या नावावरून कळले नाही तर प्रत्यक्ष वाजवून ऐकले जायचे. त्या कार्यक्रमास योग्य न वाटल्यास दुसरे-तिसरे-चौथे असे एकामागून एक वाजवून, निश्चित केले जायचे. या साऱ्या धबडग्यात आम्हाला खरेच संकोचल्यासारखे वाटायचे. लाखो श्रोत्यांकरता बनवल्या जात असलेल्या कार्यक्रमाची मांडणी, त्याचे लिखाण, त्यामध्ये स्वत:चे शेरोशायरीपूर्ण निवेदन लिहिणे हा सारा जरी त्यांच्या नित्य कामाचा भाग होता, तरीही आपली त्यास अडचण तर होत नाही ना म्हणून टोचत राहायचे आणि दुसऱ्या बाजूला, आपण रोज थोडेच येऊन इथे फतकल मारून बसतोय; असा स्वत:च निवाडा करत, आपल्याच मनातील विचारांकडे आम्ही सोयीस्कर दुर्लक्ष करत राहायचो.

त्या छोट्याशा खोलीची रचना, मला वाटते न ठरवताही छान जमली होती. बसण्याच्या, आरामाच्या सुविधेपेक्षा प्राधान्य ध्वनिमुद्रिकांच्या दीर्घायुषी स्वास्थ्याला दिले होते. वरपासून खालपर्यंत मजबूत लाकडी कप्प्यांमधून, वरील कागदाच्या वेष्टनासह असलेल्या त्या साऱ्या सख्या एकमेकीस इतक्या खेटून होत्या, की वाटावे रसिकांच्या 'दिला'त त्या जरी 'जवान' होत्या तरी त्यांचे म्हातारपण त्यांना पक्के अवगत होते. त्यांना त्यांच्या जागेवरून उतरवताना वा पुन्हा स्थानापन्न करताना एखाद्या आजीची हळुवार काळजी घ्यावी तशी घेतली जात होती.

या साऱ्या दिवसांमध्ये आणखी आनंदाचे दुर्मिळ क्षण होते. ते कधी संपूच नयेत असे वाटणारे होते. जेवढे लोक दशकानुदशके रेडिओ सिलोनवरून गाणी ऐकत आहेत, त्यांना कोणत्याही गाण्याच्या व संवादाच्या एका मधुर लयीची सवय झाली आहे. प्रसारणात चढउतार असो वा अस्पष्टता असो, तरी सिलोनवरून वाजणारे काहीही गोडच वाटते. पण अगदी तेच-अगदी लताजींचेच गाणे एफएम वा अन्य कोणत्याही केंद्रावरून, कोणत्याही व्यत्ययाशिवाय अगदी सुस्पष्ट ऐकले तरी कुठेतरी बेसुरीचा भास होतो. (यालाच म्हणतात जातिवंत चक्रमपणा!) अशा या सरावलेल्या कानांनी, रेडिओचे माध्यमही गाळून जेव्हा थेट 78 RPMची तबकडी डोळ्यांसमोर फिरताना; लाखोंपर्यंत पोचण्याच्या वेळी आपण पाहतो, उद्घोषिकेला बोलताना, आपल्याबरोबर गाणी

ऐकताना पाहतो व तेच कानांत अनेक वर्षे साठवलेले सूर अगदी दोन फुटांवरून ऐकतो; तेव्हा आपली कॉलर ताठ न झाली तरच नवल! साऱ्या कार्यक्रमांची शीर्षकगीते, हजारोंनी आलेल्या पत्रांचे ढीग, दूरध्वनीद्वारे होणाऱ्या कार्यक्रमातील श्रोत्यांचा आवाज आणि रात्री नऊ वाजता तब्बल पाच मिनिटे चालणारे श्रीलंकेचे राष्ट्रगीत; आणि हुऽऽश्श संपला आजचा दिवस करत हॉटेलकडे प्रयाण. सारे सारे मस्त होते.

तिसऱ्या आणि चौथ्या दिवशी आम्ही अगदी वेगळ्या अनुभवातून गेलो. आमच्या मुलाखतीचे प्रत्यक्ष प्रसारण, आमच्या आवडीच्या गाण्यांवर आधारित कार्यक्रम, स्थानिक वर्तमानपत्रांकरता मुलाखत हे सारे अनपेक्षित होते. रेडिओ केंद्रावरील चित्रीकरणाकरता खास परवानगी दिली होती. त्यामुळे माझा कॅमेरा सतत चालूच होता. आजही ते चित्रीकरण पाहताना पुनर्भेटीइतके ताजेतवाने वाटते.

आमचा हा आनंदसोहळा शेवटी शेवटी जरा डगमगू लागला. रेडिओ केंद्राचे प्रमुख संचालक-चेअरमन यांनी आम्हाला याच दरम्यान त्यांच्या भेटीसाठी अगत्याने बोलावले. आमचे मनापासून स्वागत करत असतानाच, अगदी मोकळेपणाने गप्पा मारतानाच त्यांनी त्यांना भेडसावणाऱ्या अडचणी आम्हाला कथन केल्या. हिंदी रेडिओ स्टेशन चालवणे किती हलाखीचे आहे, त्या केंद्रापासून फायदा मिळण्याऐवजी रोज नुकसानीत कशी भर पडते आहे, भारत सरकारच्या निर्बंधांमुळे येणाऱ्या जाहिराती कशा बंद झाल्या आहेत वगैरे वगैरे सांगत; हा हिंदी विभाग बंद करण्यावाचून आत इलाजच नाही या निष्कर्षाला चेअरमन आले होते.

ते जे बोलत होते, ते अनेक दिवसांपासूनच्या त्यांच्या अंतर्गत घडणाऱ्या बैठकांतील अधिकारी लोकांच्या चर्चेचे सार होते; जे त्यांनी आज आमच्यासारख्या भारतीय श्रोत्यांना प्रत्यक्ष ऐकवले.

त्याच प्रांगणातील आमचा तो दिवस आज मनात एक उदासी घेऊन आला होता. मी कोणाचेही प्रतिनिधित्व करायला तिथे गेलो  नव्हतो, मी कोणी अधिकारी व्यक्ती नव्हतो. ना मी टाटा, अंबानींचा माणूस होतो. तरीही रेडिओ सिलोनच्या हिंदी विभागाच्या आर्थिक हलाखीची आकडेवारी चेअरमनसाहेब मला विस्ताराने सांगत होते. यातून मार्ग काढण्याचे उपाय विचारत होते. भारतीय जाहिरातदारांना मदत करण्याचे आवाहन मी करावे म्हणून सांगत होते. किमान रेडिओ स्टेशन चालवण्याच्या खर्चाचा काही भाग कुणीतरी उचलावा, त्याकरता प्रयोजकत्वाचे यजमानपद भूषवावे आणि अशा संस्थांचा मी शोध घ्यावा म्हणून पुन्हा पुन्हा सांगत होते. हे सारे न झाल्यास एकच घडणार होते आणि ते म्हणजे हिंदी प्रसारणच बंद होणार होते. शेवटच्या दिवशीची शेवटच्या सत्रातील ही बैठक म्हणजे वादळापूर्वीची शांतता होती.

मी आणि सुधीर मोघे सिंहली, तमीळ स्टुडिओंमधून प्रत्यक्ष प्रसारित होणारे कार्यक्रम पाहत होतो, ऐकत होतो. आमची तेथील साऱ्यांशी एवढी मस्त दोस्ती जमली होती, की मोडक्यातोडक्या भाषेचा अडसर आमच्या आदानप्रदानात कुठेही येत नव्हता. एक सिंहली उद्घोषिका काळीसावळी, दिसायला सुंदर व इतकी गोड हसणारी होती, की सुधीरने उत्स्फूर्तपणे, जर मी चित्रपट काढला तर तुलाच नायिका म्हणून घेईन असे सहजपणे सांगून टाकले होते. सांगायचे कारण एवढेच, या हास्यविनोदात आम्ही साऱ्यांचा निरोप घेत असतानाच आम्हाला चेअरमनसाहेबांचे परत बोलावणे आले.

ते तरुण चेअरमन धडाडीचे होते. हिंदी कार्यक्रम बंद होऊ नये असे त्यांनाही वाटत होते. पण त्याचा आर्थिक भारही त्यांना सोसवत नव्हता. आम्ही स्थानापन्न झाल्यावर ते एवढेच म्हणाले, ''संध्याकाळचे प्रसारण सध्या रोज दोन तास चालू आहे. त्याचा फक्त वीजभारच दरमहा पाच लाख रुपये आहे. मला फक्त तेवढेच पैसे तुम्ही कुठूनही, कोणाही जाहिरात प्रायोजकाकडून मिळवून द्या. ही सायंसभा मी अशीच चालू ठेवीन. लाखो श्रोत्यांना मी निराश करणार नाही. बाकी सारे खर्च आम्ही, आमचे सरकार करील. तुम्ही फक्त दरमहा पाच लाख रुपयांची तजवीज करा.''

मी कार्यकर्ता कधीच नव्हतो. चळवळीतला तर नव्हतोच नव्हतो. कॅन्सर, एड्स, हॉस्पिटलसारख्या कार्याकरता सुद्धा कुणाकडून पाच हजार रुपये मागण्याचे शब्दही मी उच्चारू शकत नव्हतो. मला माझ्या मर्यादांची जाणीव होती. तरीसुद्धा हजारो-कोटींची भाषा सहज बोलणाऱ्या भारतासारख्या आपल्या देशात, महिना केवळ पाच लाख रुपये द्या म्हणून कोणा उद्योगपतीस विनंती करणे; यात माझ्याकरता काही आव्हान आहे असे मला मुळीच वाटले नाही. त्यामुळे मीही 'एवढंच ना, पाच लाख रुपये महिन्यांची मी व्यवस्था करतो.' म्हणून आश्वासनही देऊन टाकलं. 'त्वरित बंद होणारी संध्याकाळची सभा आम्ही अजून एक महिना

चालू ठेवतो', चेअरमनने त्यांच्या बाजूने लगेच सांगितले.

आम्ही भारतात परत आलो आणि कधीही न अनुभवलेल्या वास्तव व्यवहारी जगाच्या चलत्‌चित्राच्या मालिकेची प्रत्यक्ष अनुभूती मला येऊ लागली. सिलोन रेडिओ स्टेशनवरूनच सगळ्यांचा निरोप घेताना माझे मन मला चेअरमनच्या शब्दांची सतत आठवण करून देत होते. त्याला आता तीन-चार दिवस होऊन गेले होते. एक महिना आम्ही प्रसारण बंद करणार नाही, तेवढ्या वेळात पैशांची व्यवस्था करा. पैशांचा व उरलेल्या दिवसांचा आट्यापाट्यांचा खेळ अगोदरच सुरू झाला होता. चार दिवसांचा बळी गेलेलाच होता. संगणक उघडला तर चेअरमन रेडिओ सिलोन साहेबांचे आभार आनंदाचे पत्र. पैसे मिळवून देण्याचे कबूल केले म्हणून आनंद, मदतीबद्दल आभार!

स्वत:करताही कधी कर्ज घेणे टाळणारा. त्या एकूणच चक्राचा धसका असलेला मी, दुसऱ्याकरता पैसे जमवायला निघालो होतो. सिलोनप्रेमींच्या नावाची व टेलिफोन नंबरची एक मोठी यादी माझ्याकडे होती. ती हाती घेऊन अहमदाबाद, दिल्ली, बरेलीपासून दुबईपर्यंत गरागरा फोन फिरवू लागलो. (पूर्वी वर्तमानपत्रांतून आलेल्या लेखांवर प्रतिक्रिया असलेले सिलोनप्रती प्रेम असलेली खूप पत्रे होती, त्यापैकी अनेकांना) आणि थोड्या दिवसानंतर सकाळपासूनच फोन घणघणायला लागला. कुणी मेरठचा, कुणी फरिदाबाद नगर, कोल्हापूरचा. प्रत्येकाच्या डोक्यात अफलातून (अव्यवहार्य) कल्पना होत्या. मी पंचवीस रुपयांची मनिऑर्डर आजच माझी वर्गणी म्हणून पाठवतो. जालना का कुठून तरी एक फोन होता. या साऱ्या चळवळ अभियानाचे (म्हणजे काय कुणास ठाऊक) मी नेतृत्व करावे, मी खजिनदार व्हावे असा त्याचा आग्रह होता. आमचा तुमच्यावर पूर्ण विश्वास आहे (एकमेकांस न बघितलेल्या त्यांनी पंचवीस रुपयांकरता मागचा पुढचा विचार न करता) माझ्यावर पूर्ण भरवसा ठेवला होता. लवकरच, 'कुमारसाहेब' तुम्ही असं करा तुम्ही तसं करा'च्या सल्ल्याने आणि सत्यनारायण टाइप वर्गणीच्या सूचनांच्या माऱ्यांनी मी हैराण झालो आणि सारे फोन करणे, फोन घेणे मी बंद केले.

काही धडाडीचे नवउद्योजक, सामाजिक कार्याला हातभार लावणारे दानशूर, सिलोनविषयी, जुन्या संगीताविषयी प्रेम असलेले पण सध्या संपर्कात नसलेले, अशांची मग मी यादी केली आणि कित्येक वर्षे संपर्क नसलेल्या या साऱ्यांना फोन करून, माझ्या फोनचे प्रयोजन आणि निवेदन करण्यास सुरुवात केली. बऱ्याच वर्षानंतरचा फोन म्हणून पहिला बराच वेळ (फालतू) ख्यालीखुशाली विचारण्यात आणि रेडिओ सिलोनचा विषय काढला की 'अजून स्टेशन चालू आहे?, आम्हाला माहीतच नाही'च्या आश्चर्यात जायचा. ते कसे चालू आहे, कार्यक्रम कोणते वगैरे वगैरे सांगेपर्यंत, आम्ही 'बिनाका गीतमाला न चुकता कसे वर्षोनवर्षे ऐकत होतो' या विषयावर घसरत बोलणे कुठेतरी भरकटत राहायचे. 'जय हो'च्या जमान्यात कुठे जुन्या गाण्यांना आपण पकडून बसायचे म्हणून माझेच बौद्धिक घेतले जायचे. हाही नाद दोन-चार प्रयत्नानंतर मग मी सोडून दिला.

दरम्यान दोन-तीन वेळा मला श्रीलंकेहून फोन आले. माझ्या प्रयत्नांची यादी असलेला एक मेलही मी त्यांना पाठवला. मी काय करतो आहे या पेक्षा मी पैसे कधी पाठवतोय याचे ठोस उत्तर त्यांना अपेक्षित होते. माझाच इथे अपेक्षाभंग दररोज होत असताना मी त्यांना काय उत्तर देणार होतो?

२६ एप्रिल २००८ रोजी पुन्हा विचारणा करणारा फोन, रेडिओ केंद्राच्या कार्यालयाकडून कोणी केला, पण त्रोटक बोलण्यातच तो संपला आणि दुसऱ्या दिवशी रात्री नऊची सभा संपताना, 'इस शामके प्रसारण का आखरी कार्यक्रम हम यही समाप्त करते है और कलसे सुबह का प्रसारण साडेनऊ बजे के जगह साडेआठ बजेतक ही रहेगा' म्हणून घोषणा झाली.

दुसऱ्या दिवसापासून रेडिओ सिलोनची सकाळची सभा अधुरी, नीरस वाटली. नऊ ते साडेनऊच्या वेळेत महफिलें-मुशायरामध्ये कव्वाली, रंगतरंगमध्ये एखादाच गायक वा गीतकार वा संगीतकाराची गाणी, गझल कार्यक्रमात गैरफिल्मी, न ऐकलेल्या गजला, बुधवारी एक रंग, एक रूपमध्ये एक विषय एक आविष्कार (मूड)ची गाणी तर कधी श्रोत्यांची पसंत अशी विविधता असलेल्या कार्यक्रमाच्या सवयीला एकदमच कात्री लागली.

संध्याकाळी सातला म्युनिसिपालटीचे रस्त्यावरील दिवे ज्या नियमितपणे लागतात, तसेच घरात रेडिओ सिलोनचे आगमन तब्बल दोन तासांकरता विनासायास होत राहायचे. त्यात आजूबाजूच्या केंद्रांची घुसखोरी खूप असायची, स्टेशन स्थिर राहायचे नाही, आवाजात चढउतार, शिट्ट्या सारे सारे असायचे. पण घरच्या माणसांच्या त्रासाची, खोकल्याची जशी सवयच होऊन जाते वा नाइलाजाने त्याचा स्वीकार होतो; रेडिओ सिलोनचेही तसेच होते. या गोंगाटावाचून ते जर एकदम


सुस्पष्ट आले तर कधी कधी चुकल्यासारखे वाटायचे. हे दुसरे स्थानिक केंद्र तर लागले नाही ना म्हणून शंका यायची. श्रीलंका नाव मध्येच कुठेतरी आले की गाडी पुढे सरकायची.

केंद्राचे संध्याकाळचे कार्यक्रम बंद झाल्यानंतरची माझी मानसिक अवस्था पहिल्याच दिवसापासून फारच विचित्र झाली. विश्वासही बसणार नाही, पण ठराविक वेळेला आजी–आई वा घरातल्या कोणी गेलेल्याची प्रकर्षाने आठवण येऊन मनाला जी कातरता येते ती मी रोज अनुभवू लागलो. आज सोमवार, 'ग्रामोफोन संगीतधारा'चा दिवस. १९५४ सालची गाणी आज लागली असती. साऱ्या आठवड्याचे सारेच कार्यक्रम असे नेहमीच जुन्या काळात नेणारे. सदैव जवां गीतांनी आधुनिक युगात तरुण ठेवणारे. जेवढा जास्त विचार तेवढी जास्त अस्वस्थता, जास्त बेचैनी आणि त्यामुळेच ईप्सित कार्य चालू ठेवण्याची ऊर्मी दाटू लागली.

हे माझ्याच बाबतीत घडत नव्हते. उजळ माथ्याने वावरणारे असे 'सिलोनी कट्टर अतिरेकी' देशभर होते. त्यांच्या संघटना होत्या. श्रोता संघ होते. या अतिरेकी संघटना भारत व पाकिस्तानात होत्या, त्यांना एकत्र आणण्याचे प्रयत्न फोनद्वारे चालू झाले. विचारांचे आदानप्रदान चालू झाले. प्रत्येकाने किमान आठ–दहा पत्रे श्रीलंका ब्रॉडकास्टिंग कॉर्पोरेशनला लिहिणे, आपली तीव्र नाराजी व्यक्त करणे, स्टेशन पुन्हा चालू करण्याचा आग्रह धरणे, फॅक्स करणे, आपापल्या श्रोता संघाची माहिती देणे, रेडिओ सिलोन दिवस, केवळ एकच दिवसाचा नसून बाराही महिने तो आम्ही पाळतो हे पटवून देणे; यांसारख्या गोष्टी रेडिओ केंद्रावर या ना त्यामार्गे कानावर जाऊ लागल्या. केवळ श्रोत्यांपलीकडचे जे होते त्यांनी इमेलद्वारे, आपापल्या खास माणसांतर्फे काय करता येईल याची चाचपणी करण्यास सुरुवात केली.

याच दरम्यान तमीळ टायगर्सच्या श्रीलंकेतील कारवाया, दहशतवादी हल्ले दिवसेंदिवस वाढत होते. हजारो निरपराधी लोक, सैनिक, शासकीय इमारती लष्करी वाहने यांची धूळधाण होत होती. सारे तमीळ मूळचे भारतीय, त्यांनी हा विध्वंस चालवलेला असताना आणि श्रीलंकन सरकारची मोठी रक्कम त्यांच्याशी लढण्याच्या कामात खर्च होत असताना, आमचे तुणतुणे आम्ही वाजवत ठेवणे ठीक नव्हते. युद्धजन्य परिस्थितीत आमचा क्षीण आवाज पोचणेही शक्य नव्हते.

तरीही चंदर नवानी या दिल्लीच्या रसिक श्रोत्याने



श्रीलंकेच्या राष्ट्राध्यक्षांनाच अनेक पत्रे लिहिली. त्या साऱ्या पत्रांची त्यास पोच मिळाली. सहानुभूतीपूर्वक विचार करू म्हणून आश्वासनेही मिळाली. श्रीलंकेच्या परराष्ट्रखात्याला, दिल्ली दूतावासातील अधिकाऱ्यांना, उच्चायुक्तांनाही त्यांनी सतत स्वत:च्या संपर्कात ठेवले. वेगवेगळ्या वर्तमानपत्रांतील कात्रणे एकत्र करून ती हिंदीत किंवा अन्य भाषेत असतील तर भाषांतरीत करून श्रीलंकन सरकारला पाठवण्याचा क्रम जारी ठेवला.

याचवेळी निरूपमा राव या परराष्ट्र सचिव झाल्या ही सिलोन रसिकांच्या दृष्टीने आनंदाची गोष्ट होती. त्या पूर्वी श्रीलंकेत भारतीय राजदूत होत्या, स्वत: जुन्या गाण्यांच्या प्रेमी होत्या व त्यांना भारतीय श्रोत्यांच्या आवडीची पूर्ण कल्पना होती. चंदर नवानी यांनी त्यांनाही सतत पत्रे लिहून विषय जागता ठेवण्याचा प्रयत्न चालू ठेवला.

कैलाश शुक्ला या इंदौरच्या श्रोत्याने रेडिओ सिलोन पुन्हा चालू होण्याकरता आपला 'इ–मेल' सतत वाहता ठेवला. एखाद्या देशाच्या बारीकसारीक हालचालींचा तज्ज्ञ

असल्याप्रमाणे, त्याने श्रीलंका या लहान देशाच्या साऱ्या आर्थिक कारभारावर बारीक नजर ठेवली. तमीळ अतिरेक्यांचा खातमा झाल्यानंतर, निर्वासितांच्या पुनर्वसनावरील खर्च होऊनसुद्धा किती हजार कोटींचा लष्करी खर्च वाचला, याची गणिते शुक्लांनी त्या देशालाच सादर केली व त्यापुढे आमची मागणी किती क्षुल्लक आहे हे पटवून देण्याचा सपाटाच लावला! हीच फूटपट्टी त्याने भारत सरकारलाही लावली. विविध भारतीवर किती लाख रुपये रोज खर्च होतात, त्याचा एक हजारांश भाग आपल्या सरकारने अमुक अमुक सांस्कृतिक करारानुसार सिलोन रेडिओवर खर्च करावयासच पाहिजे म्हणून परराष्ट्रखाते, अर्थखाते यांस पत्रे लिहिली. कुठलेही पत्र लिहिले, कोणीशी गाठभेट झाली, की शुक्लाचा मला लगेच फोन यायचा, मेल यायचा.

या दरम्यान श्रीलंकेत सार्वत्रिक अध्यक्षीय निवडणुकांचे वारे वाहू लागले होते. त्यामुळे (रेडिओ) हा विषय सिलोन सरकारच्या यादीतून जवळजवळ वगळल्यासारखा झाला होता. निवडणुकीची धुमश्चक्री आपल्या देशात काय आणि लंकेत काय, सगळीकडे सारखीच. आपण जसे भाजपा येणार का काँग्रेस याकडे डोळे लावून निकालाची वाट पाहातो; शुक्ला लंकेच्या निकालाकडे तशाच उत्सुकतेने पाहत होता. अध्यक्षपदी राजपक्षे आल्यावर नवे सरकार, नवीन मंत्री, नवीन उच्चायुक्त ही सारी जंत्री गोळा करून, भारतात राजदूत कोण येणार, त्यांचे सचिव कोण असणार या सीबीआय टाइप माहितीने सज्ज होऊन, शुक्लाने एकदा सकाळीच फोन केला आणि कोण, केव्हा, कुठे रूजू होणार ही माहिती मला सांगून, ऑगस्ट २०१०मध्ये दिल्लीत आम्ही पाच-सहा जणांनी उच्चायुक्तांना भेटण्याचा कार्यक्रमही निश्चित केला. त्यांच्या कार्यालयाशी संपर्क करून आम्हा पाच जणांनी नावे, फोटो आदी पाठवून देण्याची स्वत:वर जबाबदारी घेऊन निश्चित केले. माझी प्रगती कुठपर्यंत म्हणूनही विचारले.

माझा मागचा अनुभव म्हणजे आनंदच होता. काही मराठी खासदार, मंत्री दिल्लीत आहेत. त्यांना भेटण्यापूर्वी त्यांच्या सचिवांमार्फत हस्ते-परहस्ते मला कशाकरता भेटावयाचे आहे, माझ्या कामाचे स्वरूप काय इत्यादी सांगण्याचा मी प्रयत्न केला. 'साहेब मुंबईत आले की तुमची गाठ घालून देतो' सचिवांच्या या बोलण्यापलीकडे फारशी प्रगती झाली नाही. त्याबाबत मी स्वत:च फारसा आशावादी नसल्यामुळे मंत्रीपदाचा हा मार्ग मी फार ताणला नाही.

दरम्यान, वेगवेगळ्या ठिकाणी- जास्तकरून 'लोकसत्ता'त- रेडिओ सिलोन हा मध्यवर्ती मुद्दा ठेवून मी पाच-सहा मोठे लेख लिहिले. प्रतिक्रिया भरपूर, पण कोरड्या आल्या! एवढंच झालं, की अजूनही काही सिलोन रेडिओवेडे आहेत हे लोकांना कळले, तर त्या केंद्राचे प्रसारण अजूनही चालू आहे हे काहींना पहिल्यांदाच, नव्याने समजले.

तरीसुद्धा काही ठोस होत नव्हते. आपण लोकांना या जुन्या वारशाचे महत्त्व नीट पटवून देत नाही किंवा योग्य माणसांकडे योग्य माणसांमार्फत जात नाही असे वाटून, त्याच सणकीत मी 'हाफीज खुदा तुम्हारा' हा लेख लिहून काढला. ही सारी व्यथा त्यात होती. जर या बाबतीत काहीच घडत नसेल, तर 'हाफीज खुदा तुम्हारा' अशा आशयाचा तो लेख छापावयास द्यावा न द्यावा; अशा द्विधा मन:स्थितीत कुमार केतकरांना भेटलो. द्विधा अशाकरता, की मीच स्वत:ला म्हणत, वाचणाऱ्याला असे वाटेल, की जगात दुसरे विषय नाहीत का आणि त्याहीपेक्षा, कुमार नवाथेला यापेक्षा दुसऱ्या कशातच गती नाही का? का एवढ्याच विषयापुरते त्याचे सारे ज्ञान सीमित आहे. मीच स्वत:बद्दल काय काय ग्रह करून घेत होतो आणि म्हणत होतो, हा सगळा निव्वळ मूर्खपणा आहे झाले! या विषयावर काहीही बोलणे वा लिहिणेही!

पण प्रत्यक्षात कुमार केतकरांशी बोलताना, न ठरवताही याचा उल्लेख झालाच. एखाद्या विषयाचे गांभीर्य केतकरांच्या पटकन ध्यानात येते आणि मग स्वत: त्यावर काहीही भाष्य न करता, समोरच्याचे शांतपणे मन लावून ते सारे ऐकत राहतात. असेच त्या दिवशी झाले. मी चार वाक्ये बोललो आणि पुढचा सगळा वेळ माइक माझ्याच हातात दिल्याप्रमाणे केतकर फक्त श्रोता होते. मी किती वेळाने थांबलो कुणास ठाऊक. पण त्यानंतर ज्या पोटतिडकीने आणि चिडीने फिल्मी लोकांच्या जुन्या वारशाच्या बेपर्वाईबद्दल ते बोलले, तेव्हा अनेक नव्या गोष्टींची माझ्या ज्ञानात भरपूर भर पडली. केतकर म्हणाले, ''तुम्ही आता जे काही बोललात ना, एक लेख करून द्या, लगेच छापतो. एवढंच नाही तर, त्याच विषयाशी अनुरूप अग्रलेखही त्याच दिवशी लिहून छापतो.'' मला तर एकदमच बळ आले. लेख तर तयारच होता. त्यांच्या हातात तसाच देत मी हुऽऽश्श म्हटले. दोनच दिवसांत माझा लेख व त्यावर 'आवाज के दुनिया के दोस्तो' हा अग्रलेख छापून आला. ज्यात त्यांनी म्हटले होते, 'चाळीस हजार कोटी रुपयांची ही फिल्मी दुनिया कुणाच्या सशक्त खांद्यावरून इथपर्यंत आली

याचा थोडा तरी शोध त्यांनी घ्यावा. आपण नाही, तर निदान जे या अमोल खजिन्याचा सांभाळ करताहेत त्यांना सांभाळण्याचे दातृत्व त्यांनी थोडंतरी दाखवावं.' आमच्या लेखांचे चांगले स्वागत झाले.

मी काही उद्योगसमूहांची यादी करून कुमार केतकरांना दाखवली. ज्या उद्योजकांची एकूण पूर्वपीठिका त्यांना माहीत होती त्यावर काट मारून, इथे जाऊन वेळ खर्च न करण्याचा सल्ला त्यांनी मला दिलाच आणि त्याहीपेक्षा अमुक अमुक यांच्याकडे आपण जाऊ म्हणून त्यांनी स्वत:च सगळ्या गोष्टी पक्क्या केल्या.

एवढा रस घेऊन, आपला मोलाचा वेळ खर्च करून केतकर माझ्याबरोबर आले खरे, पण दुर्दैवाने फारसे काही घडले नाही. कुमार केतकर आमच्याकडे येऊन गेले ही मात्र त्या दिवशीची 'त्यांच्या' नोंदीत महत्त्वाची बातमी झाली.

या सगळ्या पडद्यामागील घटना. इथेतिथे कोणी ना कोणी, काही ना काही करतच होते. मला देखील या धडपडणाऱ्या किती जणांची नावे आजसुद्धा ठाऊक नाहीत. ज्यांची माहिती आहेत त्यांना मी प्रत्यक्ष कधी भेटलोही नाही. तरीसुद्धा हे नेटवर्किंग चालू होते, चालू आहे.

नुकतीच भूतानला सार्क परिषद झाली. कैलाश शुक्लाने आतापर्यंतच्या साऱ्या घटनांचे विवेचनपत्र देऊन आमची मागणीवजा विनंती, सार्कने भारत-पाकिस्तान सौहार्दाच्या संदर्भात नोंदवून घ्यावी अशी विनंती केली. त्यावर जे पुढे होईल ते होईल! निदान सार्कच्या कुठल्यातरी फायलीत हे आमचे निवेदन जाऊन ऐतिहासिक झाले.


दोन वर्षांत आश्वासने मिळाली. 'हो-नाही'च्या पारड्यात हा प्रश्न वर-खाली होत राहिला आणि मला वाटायला लागले की व्यवहार आणि भावना या कधीच एकत्र येऊ शकणार नाहीत. लक्ष्मी आणि पार्वती यांच्यासारखेच हे आणि मग हे जर सत्य आहे, वास्तव आहे, तर आपणही भावनेला कवटाळून आयुष्य किती काळ ढकलत राहायचे! शेवटी हे कुठंतरी थांबायला पाहिजे.

रेडिओ सिलोन श्रवणाचा पन्नास वर्षांचा तो प्रवास सुंदर होता. तुडुंब तृप्ती देणारा होता. तो आम्ही उपभोगलाच, साऱ्या जुन्या संगीतप्रेमींनीही त्यात तुडुंब विहार केला. ते सारे आता संपले. त्या संध्याकाळच्या सभा आठवणीत धूसर होऊ लागल्या. न जाणो, सकाळची सभाही अशीच शांत होईल. सहगलचा शेवटचा दर्दभरा सूर कायमचा दर्द देऊन जाईल.

साडेसातची जुनी गाणी एकामागून एक बरसत होती. 'धून'मधील मदनमोहनची अप्रतिम बंदिश लताजींच्या कोमल कंठसुरातून ठिबकत होती. 'सितारोंसे पूऽछो-नजारोंसे पूऽछो, की हम तेरी याद में सताए हुए है' - ही 'यादों की बारात' समोरचा चहा विसरून ऐकणे, यापेक्षा दुसरा आनंद तो कुठला! पण तोही केव्हातरी संपणार याची चुटपूट लागत असतानाच लताजींनी मधुबालाच्या मुखी 'तराणा'तील व्याकुळतेने आणखीच दु:खी केले. 'वोऽऽ दिन कहाँ गये बता, की जिस नजरमें प्यार था.... वो दिन कहाँ गये बता।'

सारी गाणीच आपल्या दु:खाला प्रतिसाद देणारी, म्हटलं तर सांत्वन करणारी....

**कुमार नवाथे**
साईप्रसाद, ६ वा मजला, दयाळदास रोड,
विलेपार्ले (पूर्व), मुंबई ४०० ०५७
दूरध्वनी : (०२२) २६११८३०९/९८६९०१४४८६
kumar.nawathe@hotmail.com




## नाझी नरसंहार - कुमार नवाथे

कुमार नवाथे यांनी 'शिंडलर्स लिस्ट' सिनेमा पाहिला आणि ते पोलंडमधील आउत्शवित्झ येथील नाझी छळछावण्यांतील मृत्युकांडाच्या कहाण्यांनी हादरून गेले. त्यांनी त्या सर्व जागा पाहिल्या. त्यामुळे त्यांना वाटले, की नाझीच्या फासिस्टवृत्ती आणि कृती किती दाहक आहेत हे मराठी वाचकांपुढे मांडावे. त्यातून निर्माण झाले एकूण ११० पानांची संहिता आणि २६ पाने कृष्णधवल छायाचित्रकथा असलेले हे पुस्तक.

**मूल्य १५० रु. ९० सवलतीत रु.**

# माझ्या आठवणीतले तात्या

## रोशन दाते (बेदरकर)

आजही अनेकदा माझ्या स्वप्नात ते ४०-५० वर्षांपूर्वीचं नाशिक येतं... शांत! रम्य!! रविवार म्हटलं की डोळ्यांसमोर येतं ते सकाळचं कोवळं कोवळं ऊन, थोड्या दूरवर दिसणारी नाशिक जिमखान्याची दगडी-कौलारू आकर्षक इमारत, ते टेनिस कोर्ट, आणि त्याच्या कुंपणावर फुललेली असंख्य फुलं.... विविध रंगी. झिनिया, कॉसमॉस, तेरडा, गुलबक्षी, कोऱ्हांटी, असंख्य गवतफुलं आणि तशीच रंगीबेरंगी फुलपाखरं! आल्हाददायक गाऽर वारा आणि अगदी सहज ऐकू येणारे विविध पक्ष्यांचे आवाज आणि भुंग्यांची गुणगुण मन मोहरून टाकायचे.

नाशिक जिमखान्याच्या जवळच आमची 'पटेल कॉलनी' होती आणि त्या कॉलनीत आमचा 'सरस्वती सदन' हा दोन मजली बंगला होता. म्हणजे बंगला होता मालुसरेंचा, पण तरी सुद्धा तो आमचाच होता. या बंगल्याकडे... घराकडे तोंड करून उभं राहिलं तर वरच्या मजल्यावर डावीकडे मालुसरेंचं एकत्र कुटुंब राहत असे, उजवीकडे वर्मा, राजे असे अनेक भाडेकरू येऊन गेले. पण तळमजल्यावर डावीकडे आम्ही, म्हणजे माझे वडील कृ.द. बेदरकर आणि उजवीकडे वि.वा. शिरवाडकर असे दोन शेजारी भाडेकरू तब्बल २५ ते ३० वर्षं राहत होतो. माझ्या वडिलांचा आणि तात्यासाहेबांचा किमान ४०-४२ वर्षांचा शेजार होता. दोघंही कॉलेज विद्यार्थी असताना गोदावरीच्या काठावर बालाजीच्या चाळीत शेजार शेजारच्या खोलीत राहत. काही वर्षांनंतर तिथूनच जवळ असणाऱ्या पाटलांच्या वाड्यात दोघं राहू लागले आणि पुढे १९४८च्या दरम्यान पटेल कॉलनीतील 'सरस्वती सदन'मध्ये आले ते १९७६ पर्यंत. माझ्या जन्मापासून जवळजवळ २५ वर्षांपर्यंत मला तात्यांचा सहवास मिळाला. नाटककार वि.वा. शिरवाडकर, कवी कुसुमाग्रज हे साऱ्या जगासाठी 'तात्यासाहेब' असले तरी आमचे ते 'तात्या'च होते.

पांढरा स्वच्छ पायजमा आणि तसाच पांढरा किंवा फिका पिवळसर कुडता ह्या अशाच पोशाखात मी तात्यांना नेहमी पाहिलं. हो! थंडीमध्ये वुलनचं छानसं जॅकेट ते जरूर घालत असत. फार थंडी असली तर घरातसुद्धा त्यांच्या अंगावर हलकीशी शाल असे. हसरे डोळे, नीतळ गोरा रंग आणि शांत चेहरा आम्हाला नेहमीच आपलासा वाटत आला. अगदी लहानपणापासून तात्यांच्या आसपास गेलं की शांत राहायचं, मोठ्यानं बोलायचं नाही अशी एक नकळत शिस्त लागली होती. तात्या लिहितात आणि लिहिताना त्यांना शांतता लागते

हे कॉलनीतल्या सर्व लहान-थोरांना माहीत होतं. मी ७-८ वर्षांची असेन. एकदा मी तात्यांना विचारलं, ''तात्या, तुम्ही रोज सकाळी ११ वाजता का उठता? आम्हाला तर भाऊ (माझे वडील) सकाळी ६ वाजताच उठवतात.'' तेव्हा तात्या म्हणाले, ''काय करणार, मला कविता लिहायच्या असतात आणि तू सारखी दिवसभर टिवटिव करत उंडारत असतेस. म्हणून तू रात्री झोपलीस की मग मी लिहायला लागतो.''

तात्या जवळजवळ पहाटे तीन-साडेतीनपर्यंत लिहीत आणि त्यानंतर झोपून सकाळी १०-११ वाजता उठत. सोनेरी काडीच्या मोठ्या कप-बशीमध्ये चहा पिताना आम्ही तात्यांना नेहमी पाहत असू. तात्यांकडे येणाऱ्यांची वर्दळ ११ नंतर सुरू होई. तात्यांची एक आवडती लाकडी झुलणारी खुर्ची होती. त्यावर तात्या हळूहळू डुलत गप्पा मारत असत. त्यांच्या बैठकीच्या खोलीला बहुतेक वेळा फिका निळा रंग दिलेला असे. तसेच निळे जाळीदार पडदे आणि निळ्या रंगाचा बांबूचा सोफा सेट. खोलीला ४ मोठ्या खिडक्या होत्या त्यामुळे हवा आणि उजेड भरपूर! एका कोपऱ्यात तात्यांचं लिखाणाचं टेबल. त्यावर ७-८ पुस्तकं, वह्या, काही कागद, कोपऱ्यात निळा टेबल लँप आणि एका कोपऱ्यात लाकडी, काचा लावलेलं पुस्तकाचं कपाट असा खोलीचा साज होता. तात्या एखादं नाटक लिहू लागले की ताई आम्हाला ताकीद देत असत, तात्या आता लिहिताहेत. कुणी दंगा करू नका. तात्यांनी मात्र आम्हाला कधीच हटकलं नाही.

कुसुमताई ही त्यांची धाकटी आणि लाडकी बहीण. मे महिन्यात त्या पुण्याहून येणार म्हटलं की तात्यांच्या घरात एकदम चहलपहल सुरू व्हायची. विविध पदार्थ तयार व्हायचे. घराच्या आतल्या रचनेत थोडा बदल केला जायचा. कुसुमताईंची मुलगी विनिता, मामा मामा करत सतत त्यांच्या भोवती असायची. बहीण येणार म्हटलं की तात्या सर्व काम बाजूला ठेवत असत आणि भाचीबरोबर गप्पा मारत. मे महिनाभर आमचा बंगला चारही घरातल्या पाहुण्यांनी गजबजून जायचा. सकाळ-संध्याकाळ बाहेर अंगणात खेळायचं आणि दुपारी व्हरांड्यामध्ये कॅरम, पत्ते, सागरगोटे किंवा इतर काही खेळ सुरू असायचे. अशाच एका सुट्टीत माझी भाची प्रज्ञा अंबरनाथहून आली होती. ती त्यावेळी पहिलीमध्ये होती. तात्या आणि प्रज्ञा मध्ये झालेला एक गम्मतशीर संवाद सांगते.

प्रज्ञा - ''तात्या आजोबा, तुमची कविता आमच्या पुस्तकात आहे.''

तात्या - ''अरे वा! छान! तुला आवडली का?''

प्रज्ञा - ''होऽऽऽ . छान आहे. पण आजोबा तुम्ही ती कविता कोणत्या पुस्तकातून घेतलीत?''

तात्या - (जोराने हसत) ''कोण जाणे कुठल्या पुस्तकातून घेतली.... आठवत नाही बाळा.... पण घेतली खरी कुठून तरी....''

तात्या असे कधीतरी लहान झालेले पण मी पाहिले आहेत.

तात्यांचं नाटकप्रेम तर जगजाहीर आहे. त्यातूनच नाशिकच्या लोकहितवादी मंडळाची स्थापना झाली. तात्या कलाकारांमध्ये, नाटककारांमध्ये रमत असत. पुण्या-मुंबईचे सर्व कलाकार तात्यांना भेटण्यासाठी, त्यांचे आशीर्वाद घेण्यासाठी उत्सुक असत. नाटककार वसंत कानेटकर, अ.वा.वर्टी आपले लेखन घरी येऊन तात्यांना वाचून दाखवत. त्यावेळी कानेटकरांचं नवीन नाटक आम्ही बाहेरच्या जिन्याच्या पायऱ्यांवर बसून ऐकत असू. एकदा ते वाचन सुरू झालं की निदान तीन-चार तास तरी चाले. मग मधूनमधून काही चर्चा ऐकू येई, काही वेळा हुंकार तर काही वेळा तात्यांची दाद ऐकू येई.

तात्यांना शास्त्रीय संगीताची आवड होती. रोज दुपारी १-१ ।। वाजता आणि रात्री १० वाजता ते रेडिओवर शास्त्रीय संगीत ऐकत असत. कधी कधी नाट्यसंगीत गुणगुणत असत. शीळ घालत गाण्याची धुन वाजवण हा त्यांचा छंद होता. माझ्या लहानपणी प्रत्येक घरात सायकल हेच वाहन असे. तात्यांना मात्र मी कधी सायकल चालवताना पाहिलं नाही. ते नेहमी चालत जात. पुढे केव्हातरी त्यांनी एक मोटार घेतली होती. त्यांच्याकडे काही वेळाकरता ड्रायव्हर येत असे. संध्याकाळी सहाच्या सुमारास तात्या गाडी घेऊन गावाच्या बाहेर कुठेतरी फिरायला जात. कधी पांडवलेण्याच्या दिशेनं तर कधी गंगापूर धरणाच्या दिशेनं. गावापासून दूर गेल्यावर गाडीतून उतरून गाडी घरी पाठवून देत आणि तिथून परतताना फिरत फिरत चालत रात्री नऊच्या सुमारास घरी येत. येताना शीळ वाजवत येत असत. ते फिरून आल्याची ती खूण असे. आमच्या जवळच जॅक्सन गार्डन (आताचं शिवाजी उद्यान) होतं. त्या उद्यानात दीनानाथ मंगेशकरांचा पुतळा बसवण्यात आला त्यावेळी लता मंगेशकर आल्या होत्या. त्यांनी आवर्जून घरी येऊन तात्यांची भेट घेतल्याचं मला आठवतंय.

लताजींवरून आठवलं, मी एफ्.वाय.ला असेन तेव्हा, ऋषिकेश मुखर्जींचा 'आनंद' सिनेमा लागला होता. तात्यांच्या

मनात त्यावर नाटक लिहावं असं होतं. एके दिवशी तात्यांनी सकाळी मला हाक मारून सांगितलं, ''रोशन, आज सकाळी ११ वाजता ऋषिकेश मुखर्जी येणार आहेत. तुला व तुझ्या मैत्रिणींना भेटायचं असेल तर त्यांना बोलाव.'' झालं पटकन सायकल काढून मी माझ्या मैत्रिणींना निरोप देऊन आले. सगळ्याजणी ११ वाजता जमल्या. आणि तात्यांनी हाक मारल्यावर आम्ही त्यांच्याकडे जाऊन थोडा वेळ भेटून आलो. ऋषिकेश मुखर्जी म्हणजे विलक्षण साधा माणूस! आमच्या गप्पा ऐकताना तात्या मात्र खुर्चीत बसून एक पाय हलवत गालातल्या गालात हसत होते. सगळ्यात जास्त गप्पा आमच्या चौकस सुरेखानं मारल्या आणि त्यांची दाद मिळवली. सुरेखा म्हणजे 'सकाळ' पेपर्सची दिल्लीची वार्ताहर सुरेखा टाकसाळ. ...... आणि मग त्या रात्री १२ ते २ दामोदर टॉकिजमध्ये त्या दोघांच्या बरोबर आम्ही परत एकदा आनंद सिनेमा पाहिला. ते दोघं सर्वांत मागच्या रो मध्ये बसले होते आणि ७-८ रांगा सोडून आम्ही. कधी कधी असं काही आठवलं तर स्वप्नच वाटतं.

आमची पटेल कॉलनी म्हणजे एक छोटा भारत होती. कॉलनीच्या एका टोकापासून पाहायला सुरुवात केली तर प्रथम पारशी, मग बोहरी, ब्राह्मण, मराठा, ख्रिश्चन, बौद्ध सर्व मंडळी एकत्र राहत होती. सगळ्यांचे सगळे सण एकमेकांच्या साक्षीनं साजरे होत असत. फराळाचे आणि प्रत्येकाचे विशेष पदार्थ एकमेकांना दिले जायचे. गणपती तर सर्व मिळून जोरात साजरा करत असत. पाच दिवस कार्यक्रम होत असे. आरास केली जाई. नाटक बसवताना तात्या पण हजेरी लावत. तात्या येणार म्हटलं की कलाकार मंडळींमध्ये उत्साहयुक्त भीती असे. टेहमी पटेल तर आवर्जून नाटकात काम करायची आणि आपल्या बोबड्या मराठीमध्ये संवाद म्हणायची. पण कॉलनीतली मुले उत्साहानं नाटक बसवतात यात तात्यांना आनंद असे.

दरवर्षी आमच्या वाड्याचे म्हणून काही खास कार्यक्रम होत. त्यातला एक म्हणजे कोजागिरी पौर्णिमा. ती आम्ही आमच्या गच्चीवर साजरी करत असू. आमची गच्ची प्रशस्त होती. १५-२० लोक बसल्यावरही आम्हाला दंगा करायला भरपूर जागा राही. सर्व तयारी झाली की मग पुरुष मंडळींना बोलावले जायचे. सर्वांच्या घरातनं सतरंज्या यायच्या. गच्ची झाडली जायची. मस्त गप्पांमध्ये दोन तास कसे जायचे ते कळायचं नाही. कोजागिरीप्रमाणेच थंडीच्या दिवसांत एकदा जॅक्सन गार्डनमध्ये डबे घेऊन आम्ही सर्व जेवायला जात असू. २-३ वेळा तात्यांनीही या कार्यक्रमाला हजेरी लावली होती.

'सरस्वती सदन'चं वातावरण कॉलनीतल्या इतर घरांपेक्षा वेगळंच होतं. तिथे असणारी माणसांची वर्दळ ही इतरांपेक्षा जरा 'हटके' होती. याचं महत्त्वाचं कारण म्हणजे त्या बंगल्यात राहणाऱ्या वेगवेगळ्या क्षेत्रांतील तीन दिग्गज व्यक्ती. त्यातील एक म्हणजे तात्या! साहित्य-नाटकाच्या क्षेत्रात अढळ स्थान मिळवलेलं मनस्वी व्यक्तिमत्त्व. घरात नट, नाटककार, विविध साहित्यिक, कवी, प्रकाशक, चाहते आणि अन्य मित्रमंडळींचा सतत राबता असायचा. अनेक जण तात्यांकडे सल्लामसलत करण्यासाठी येत. कधी विविध विषयांवर तात्त्विक चर्चा, कधी काव्यवाचन-नाट्यवाचन, कधी दिलखुलास गप्पा आणि हशा तर कधी दबक्या आवाजात दिली जाणारी समज, असे आवाजाचे पडसाद बाहेरून जाणाऱ्या माणसालाही जाणवत असत. दुसरी व्यक्ती म्हणजे माझे वडील, न्यू एज्युकेशन इन्स्टिट्यूटचे संस्थापक, न्यू हायस्कूलचे मुख्याध्यापक. शिक्षणतज्ज्ञ, गांधीवादी, राष्ट्रभाषा हिंदीचे कार्यकर्ते, सर्वोदयचे कार्यकर्ते, आणि बौद्ध समाजाचे मित्र व सल्लागार. त्यामुळे आमच्या घरात विद्यार्थ्यांपासून शिक्षण क्षेत्रातील नामवंत विचारवंतांपर्यंत शिक्षणाशी निगडीत अनेक मंडळी येत असत. शिवाय, इतर क्षेत्रातील कार्यकर्ते चर्चेसाठी येतच. वरच्या मजल्यावर नरेंद्र ऊर्फ नानासाहेब मालुसरे राहत. ते कम्युनिस्ट पक्षाचे खंदे पुरस्कर्ते होते. त्यामुळे पक्ष कार्यकर्त्यांबरोबरच पेठ-सुरगाणा आदी जिल्हांतील आदिवासी एकदम जथ्यानं येत असत आणि येताना जांभळं, करवंदं, मध यांचा मेवा आणायला विसरत नसत. वेगवेगळ्या ठिकाणी काढावयाच्या मोर्च्यांची आखणी होई. घोषणा दिल्या जात. नानासाहेबांचे धाकटे भाऊ, भाऊसाहेब मालुसरे एसटी कामगार युनियनचे मुख्य होते. त्यामुळे त्यांच्या मीटिंगा होत त्यावेळी त्यांच्या भाषणांनी आमचा बंगला दुमदुमून जात असे. म्हणून म्हटलं, कॉलनीच्या मध्यात असलेलं 'सरस्वती सदन' इतर बंगल्यापेक्षा जरा हटके होतं. या सर्व घटनांचा लहानपणापासून आम्ही बंगल्यातली सर्व मुलं अनुभव घेत आलो आणि कळत-नकळत त्या वातावरणाचे संस्कार आमच्यावर होत गेले.

कुठेही राजगिऱ्याचे लाडू किंवा वडी पाहिली तर मला ताईंची (सौ.शिरवाडकर) हमखास आठवण होते. महिन्यातून एकदा तरी त्या राजगिऱ्याच्या लाह्या फोडायला बसत असत. दुपारचं जेवण झालं आणि तात्या थोडे आडवे झाले की ताई



आमचे 'सरस्वती' सदन

आपला सरंजाम मांडत असत. स्वयंपाकघरात वर्तमानपत्रांचे ४-५ मोठे कागद, त्यावर स्टोव्ह, त्यावर एक मोठ्ठी लोखंडी कढई, एक पांढरंस्वच्छ फडकं असा जामानिमा करून, थोडा थोडा राजगिरा घालून, मंद आचेवर हलके-हलके कपड्यानं फिरवत त्या लाह्या फोडायच्या. आणि त्या तडतडत खोलीभर उडायच्या. अशा वेळी काही कामासाठी मी मधल्या खोलीतच दार ठोठावलं तर म्हणायच्या, ''स्वयंपाकघराच्या दारानं ये. मी तात्यांसाठी लाह्या फोडतेय. तात्यांना लाडू आवडतात ना...'' ताईंच्या बोलण्यात सतत तात्यांना हे... तात्यांना ते... तात्यांच असं.... तात्यांच तसं... असे शब्द असायचे. काय गम्मत आहे ना? कोण आपलं प्रेम, आपली आस्था, काळजी एखाद्याबद्दल कशी व्यक्त करील सांगता येत नाही.

पटेल कॉलनीत प्रत्येक घराला मोठं कंपाऊंड होतं आणि त्यात विविध प्रकारची झाडं होती. आमच्याही घराच्या चारी बाजू अनेक फळझाडं आणि फुलझाडांनी भरलेल्या होत्या. घराच्या बाजूला कडूनिंब, मधुमालती, पपई, गुलाब, फणस, रामफळ आणि तुतीची झाडं होती तर तात्यांच्या बाजूला मोठा पेरू, सायली, हिरवा चाफा, चिकू, लहान पेरू, पपनस, आंबे आणि सीताफळ इत्यादी. याशिवाय त्यांच्या बैठकीच्या खोलीच्या खिडकीखाली कोरांटी, गुलबाशी (गुलबक्षी) आणि जुईची फुलं येत. पुष्परचना करण्याचं मला लहानपणापासून वेड होतं. आमच्या घरात फुलं लावली की एक फ्लॉवर पॉट तात्यांकडे पण लावायचा हा माझा नियम होता. तात्या पण अनेक समारंभांना जात. त्यावेळी त्यांना विविध गुच्छ व हार मिळत. तात्या घरी आल्याबरोबर आमचे दार ठोठावत आणि फुलं माझ्या हातात देत. म्हणत, ''हं ही घे तुझी फुलं.'' मग ती फुलं सोडवून त्याचे फ्लॉवर पॉट बनवून दोन्ही घरांत लावण्याचं काम माझं असे. पतंगाच्या काडीला एक एक गुलाबाचं फूल बांधून.... त्याच्या बाजूला आंब्याची पानं लावून घट्ट-मुट्ट बांधलेल्या गुच्छापासून ते विविध देशी-विदेशी फुलांनी सजवलेल्या बुकेपर्यंतचा पुष्पगुच्छांचा प्रवास मला तात्यांनी दिलेल्या फुलांमधून पाहायला मिळाला आहे.

लहानपणी १५ ऑगस्ट, २६ जानेवारी, गणपती अशी काहीतरी निमित्तं काढून आम्ही काही करमणुकीचे कार्यक्रम करत असू. सर्व कॉलनीला स्वत: चित्र काढून एक-एका कागदावर निमंत्रण जात असे. अध्यक्ष म्हणून अनेकदा तात्यांनाच बोलावत असू. सगळं जग बोलावतं आणि आपण का नाही असं म्हणून तात्यांना आग्रह केला जायचा. डॉ. गोसावींच्या ओट्यावर आमचा कार्यक्रम व्हायचा. मग संध्याकाळी ६ वाजता तात्या दोन्ही पाय थोडे उडवत, हळूहळू चालत, थोडं डुलत यायचे. अशा वेळी ते छोटंसं भाषण करून आमचं कौतुक करायचे. सर्वांच्या घरातून चांगली चांगली फुलं तोडून स्वत: केलेला गुच्छ त्यांना दिला जायचा. आणखी काय काय करत होतो, रामजाणे!

त्या कार्यक्रमावरून आठवलं, तात्यांच्या 'विशाखा' काव्य-संग्रहातील 'किनारा' या कवितेवर आम्ही खूप

नाचायचो. तात्यांची कविता म्हणजे ती आपलीच अशी काहीतरी खुळी भावना तेव्हा मनात असायची. भारतीय स्वातंत्र्याच्या पहाटेला लिहिलेल्या ह्या कवितेचं आम्ही अगदी कोळीगीत करून टाकलं होतं! एकदा, मोठी झाल्यावर मी तात्यांना विचारलं, की आम्ही हे असं कोळीनृत्य नाचत होतो तर तुम्ही आम्हाला हटकलं का नाहीत? त्यावर तात्या म्हणाले, ''त्याचं असं आहे रोशन, मी कविता लिहून बाजूला होतो. वाचणाऱ्यानं त्याचं कसं रसग्रहण करायचं, त्याचा काय अर्थ लावायचा यावर माझं काही म्हणणं नाही. कवीनं फक्त कविता लिहायची असते. वाचक आपली भावना त्यात मिसळून ती वाचत असतो. आणि आयुष्याच्या वेगवेगळ्या टप्प्यांवर त्याच गोष्टींचा अर्थ बदलतही जातो, नाही का?''

तात्यांना नाटक आणि शास्त्रीय संगीताप्रमाणे नृत्य आवडत होतं की नाही हे मला माहीत नाही, पण आमच्या 'नृत्यकला केंद्राचा' कार्यक्रम पाहायला ते आवर्जून येत असत.

ताई बऱ्याच वर्षांपासून आजारी होत्या. त्यांना हत्तीरोग झाला होता. अनेक दिवसांच्या आजारपणानंतर त्यांचं देहावसान झालं आणि तात्यांच्या घराला एक पोरकेपणा आला. आमच्या घरी हिंगण्याच्या महिलाश्रमातून आलेली शांता आता तात्यांच्या घरातही काय हवं-नको ते पाहू लागली. तात्यांच्या मोठ्या वहिनी तात्यांना डबा पाठवू लागल्या. मीही घरात केलेली भाजी तात्यांना एका वाटीत देत असे. मग झालं, आमचा तो नियमच बनला. आम्ही दुपारी साडेबारा वाजता एकमेकांच्या वाट्यांची देवाणघेवाण करू लागलो. त्यामुळे रोज आमच्या दोन्ही घरांत मेजवानी असे. दोन भाज्या, चटणी, कोशिंबीर असं साग्रसंगीत जेवण व्हायचं. तात्यांना कोथिंबिरीची आणि मेथीची पीठ पेरून केलेली कोरडी भाजी खूप आवडत असे. त्यावर बारीक चिरलेला लसूण, मोहरी, हिंग, तिखटाची खमखमीत फोडणी घालून ते मजेत जेवत असत. त्यांना माझ्या आईच्या हातचे काही पदार्थ खूप आवडत. माझी आई (आम्ही तिला वहिनी म्हणत असू) सारस्वत होती. त्यामुळे बटाट्याचं नारळाचं वाटण घालून केलेलं साँग, तमळी, इडली आणि खास सारस्वती चटणी आठवणीनं तात्यांना दिली जात असे. आई दर पंधरा दिवसांनी एका रविवारी सकाळी इडली करत असे. आणि ती पण रगड्यामध्ये वाटून. आजच्यासारखं तयार पीठ तेव्हा मिळतच नव्हतं. ताई-तात्या मोठ्या प्रेमानं ते पदार्थ खात.

तात्यांचा वाढदिवस म्हटला की सकाळपासूनच मित्रमंडळींची आणि चाहत्यांची वर्दळ सुरू होई. नारळ, फुलं, आणि मिठाईनं स्वयंपाकघर भरून जाई. हळूहळू हे प्रमाण इतकं वाढलं की त्या दिवशी माणसांची रीघ लागे. मला वाटतं, त्यामुळे तात्या कंटाळून गेले आणि एका वर्षी त्यांनी निर्णय घेतला की वाढदिवसाला नाशिकमध्ये थांबायचं नाही. त्यामुळे आदल्या दिवशीच ते बाहेरगावी जाऊ लागले. त्यांच्याबरोबर त्यांचे मित्र वसंतराव चुंबळे, शिवाजी पाटील व अण्णा लोणारी हेही त्र्यंबकेश्वरच्या डाकबंगल्यात जात असत. पुढे ते २-३ दिवसांकरता गोव्याला जाऊ लागले.

तात्यांबद्दल आमच्या मनात एक आदरयुक्त भीती होती. ते रागावतात पण आपला राग बोलून दाखवत नाहीत हे आम्ही जाणून होतो. पण रागानं त्यांच्या मनावरचा ताबा सुटलेला मी फक्त एकदाच पाहिला आहे. त्यांच्या नात्यातील एका मुलानं काही चूक केली म्हणून तात्यांनी खूपच वरच्या आवाजात रागावत त्याच्या श्रीमुखात मारलेली मी पाहिली आहे. इतका संताप! नक्कीच त्यानं फार मोठी चूक केली होती. नव्हे, अक्षम्य गुन्हाच असणार तो, याची मला खात्री आहे.

तेव्हा टेलिफोन असे सर्रास सर्वांच्या घरी नव्हते. त्यामुळे प्रत्येक गोष्ट ही स्वत: जाऊनच करावी लागायची. तात्यांच्या घरी पाठक म्हणून एक गृहस्थ यायचे. ते तात्यांची बरीच कामं करत असत. बाजारातून वस्तू आणणं, वेगवेगळ्या ठिकाणी निरोप देणं, पोस्टाची काम करणं इत्यादी. नक्की आठवत नाही, पण बहुधा ते लोकहितवादी मंडळाचे कर्मचारी होते. ते जरा गोंधळेकर असावेत, कारण अधूनमधून तात्या पाठकांना जरबयुक्त समज देत असत. तरीही त्यांच्या सगळ्या अडचणींना तात्या त्यांच्या मागे उभे राहत. शेवटी पाठक कॅन्सरच्या आजारपणानं गेले त्याही वेळी तात्यांनी पाठकांना हरप्रकारे मदत केली. तात्या अनेकदा गरीब विद्यार्थ्यांना, होतकरू कवींना मदत करत असत.

१९७५ साली माझा भाऊ- भरतच्या लग्नाच्या वेळची गोष्ट. माझ्या वडिलांचं आणि तात्यांचं रोज एकमेकांकडे जाणं येणं नसलं तरी सुख-दु:खाच्या प्रसंगी त्यांना एकमेकांचा आधार असे. माझ्या आईचं निधन होऊन अडीच वर्षं झाली होती. एकदा भाऊ तात्यांकडे गेले आणि म्हणाले, ''तात्या, भरत लग्न ठरवतो आहे. भरत-रोशन मुंबईला जाऊन मुलीला भेटून आले. दोन्ही घरांकडून पसंती आहे. दोन दिवसांनी शीलाचे वडील श्री. कस्तुरे व मामा प्रभाकर निकळंकर येणार आहेत आपलं घर बघायला. तेव्हा तुम्ही पण या.'' त्यावर तात्या लगेच म्हणाले, ''भाऊ, मग असं करा की तुम्ही सर्व

माझ्याच घरी या. आपण इथंच बसून बोलू.'' आणि तात्यांकडे भेटायचं ठरलं. तशा त्या बैठकीत ठरवायच्या तीनच गोष्टी होत्या. एक लग्न कुठे करायचं, दुसरं केव्हा करायचं आणि तिसरं कशा पद्धतीनं करायचं. आमचं म्हणणं होतं की रजिस्टर पद्धतीनं करावं पण शेवटी धार्मिक पद्धतीनं करायचं ठरलं. १५ मिनिटांत आमचं बोलणं संपलही. खाणं-पिणं झालं आणि बैठक संपली.

तात्यांची एक आठवण माझे धाकटे काका- राजाकाका सांगत असत. राजाकाकांना गप्पा मारायला खूप आवडायचं आणि ते अगदी खुसखुशीत बोलायचे. तात्यांची आणि त्यांची चांगली दोस्ती होती. राजाकाका इंदौरमध्ये स्थायिक झाले होते. राजा काका उत्तम आर्टिस्ट, फोटोग्राफर आणि प्रतिष्ठित व्यक्ती म्हणून इंदौरमध्ये प्रसिद्ध होते. एकदा तात्या स्टेट गेस्ट म्हणून इंदौरला गेले होते तेव्हा राजाकाकांकडे उतरले होते. तिथे एका शाळेला भेट देण्यासाठी गेले असताना शाळेतल्या मुलांनी त्यांना तुम्ही कविता कशी लिहिता? तुम्हाला ती कशी सुचते? इत्यादी प्रश्न विचारले. तात्यांनी त्यांच्या प्रश्नांची उत्तरं दिली आणि शेवटी सांगितलं की मी जे आता तुमच्याशी बोललो आहे ते विसरून जा. कारण हे जर तुम्ही पेपरात लिहिलंत तर तुम्हाला मार्क मिळणार नाहीत. तेव्हा तुमचे शिक्षक जे तुम्हाला सांगतील तेच लक्षात ठेवा.

१९७५च्या सुमारास आम्ही पटेल कॉलनी सोडून कॉलेज रोडवरील मॉडेल कॉलनीमध्ये स्वत:च्या बंगल्यात राहायला आलो. मालुसरेंचं कुटुंब आता मोठं झालं होतं. त्यामुळे नानासाहेबांनी भाऊंना व तात्यांना त्यांची अडचण सांगितली, ''दोन-तीन वेगवेगळे ब्लॉक प्रत्येकासाठी पाहिजे आहेत तेव्हा तुम्ही दुसरी जागा पाहिलंत तर बरं होईल.'' मला माहीत आहे, हे असं जागा सोडून जा सांगणं त्यांना किती कठीण गेलं असेल, पण त्यांचीही निकड होती. आमच्यानंतर ७-८ महिन्यांतच तात्या राका कॉलनीत राहायला गेले. तेही घर छान होतं. तरी पण ते तात्यांचं घर आहे अशी मनाची समजूत घालावी लागायची. पुढे नाशिककरांनी त्यांना टिळक वाडीमध्ये एक टुमदार बंगला भेट दिला, अगदी तात्यांच्या व्यक्तिमत्त्वाला शोभेल असा! मुख्य म्हणजे त्यात तात्यांची अभ्यासासाठी खोली वेगळी होती. गप्पा-टप्पा करायला बैठकीची खोली प्रशस्त होती. तेव्हा वाटलं, की हं! हे घर तात्यांचं आहे. मी नोकरीला लागले होते. शाळा, घर व इतर कामांत तात्यांकडे वरचेवर जाणं जमत नव्हतं. पण आता फोन आल्यामुळे त्यांच्याशी फोनवर बोलता येई. तेव्हा ते म्हणत, ''काय गं! बरेच दिवसांत आली नाहीस?'' अशा वेळी मन अगदी खजील होत असे. अपराध्यासारखं वाटे.

माझं लग्न ठरलं तेव्हा तात्यांनी मला बोलावून घेतलं. माझ्यासाठी पोहे, पांडेकडचा पेढा आणि चहा असा बेत केला होता. खाणं-पिणं झाल्यावर माझ्या हातांत एक साडी देत म्हणाले, ''तू नेसतेस तशी फिक्या रंगाची सुती साडी आणली आहे. ताई असत्या तर त्यांनी तुझं सगळं केलं असतं.'' तात्यांनी एक फार सुंदर गुलाबी रंगाची, त्यावर जांभळ्या फुलांची फुल वॉयल असलेली साडी दिली होती. आजही ती साडी मी जपून ठेवली आहे.

लग्न होऊन मी पुण्याला आले. माझं कथ्थक नृत्याचं शिक्षण पुढे चालू ठेवायचं असं मी आणि रंजननं (चित्तरंजन दाते) ठरवलं. सर्वच दाते मंडळींनी त्याला प्रेमानं दुजोरा दिला आणि माझं खंड पडलेलं नृत्याचं शिक्षण सुप्रसिद्ध नृत्यांगना रोहिणी भाटे यांच्यासारख्या मातब्बर आणि बहुआयामी गुरूंकडे सुरू झालं. माझ्या वडिलांना... भाऊंना तर फारच आनंद झाला. मी नृत्यामध्ये पुढे करिअर करावं हे खरं तर त्यांचंच स्वप्न होतं. असो....

मी जेव्हा जेव्हा नाशिकला जात होते, तेव्हा तात्यांना भेटल्याशिवाय येत नव्हते. आता आमच्या गप्पांच्या विषयांनी वेगळं वळण घेतलं होतं. नृत्य, नृत्याचे विषय, दिल्लीच्या बाजूचं नृत्य आणि महाराष्ट्रातलं नृत्य असे अनेक विषय त्यात येत. एकदा नृत्य आणि साहित्य, साहित्यिक कल्पनांचा नृत्यातून होणारा विस्तार, त्यांची प्रतीकात्मक भाषा यावर सुरू झालेल्या गप्पा खूपच रंगल्या होत्या. तो दिवस मी कधीच विसरणार नाही. मी त्यांना कॅसेटवर रेकॉर्ड करून नेलेली एक पारंपरिक कृष्णवंदना आणि रोहिणीताईंची काव्य-नृत्यरचना असलेली खंडिता नायिका करून दाखवली. शिवाय, मी रचलेली कॅक्टस या बॅलेची संकल्पना सांगितली, तर म्हणाले, ''वा! वा! फार छान विचार केला आहेस. चांगल्या गुरूच्या हातात आहेस ना! फार विद्वान कलाकार आहेत रोहिणीबाई. विदुषी आहेत विदुषी!'' तात्या रोहिणीताईंना हमखास रोहिणीबाई म्हणत असत.

आता पुण्याला येऊनही मला ३३ वर्षं होऊन गेली. कथ्थक नृत्याच्या क्षेत्रात मी स्वत:ला संपूर्ण झोकून दिलं आहे. शिष्य, शिक्षक, नृत्यांगना, गुरू, परीक्षक, कोरिओग्राफर असे

नृत्यक्षेत्रातले विविध टप्पे गाठले आहेत. आज गेली ९ वर्षं मी 'कथकनृत्य, प्राचीन वास्तूंवरील नृत्यमूर्ती आणि चित्रकला या तीन ललित कलामधील परस्परसंबंध' यावर संशोधन करत आहे. राजस्थान, गुजरात, उत्तर प्रदेश, मध्यप्रदेश व महाराष्ट्र या पाच राज्यांतील जवळजवळ शंभर प्राचीन मंदिरं मी पहिली आहेत. या प्राचीन मंदिरांच्या निरीक्षणात मला 'विषकन्या' म्हणून ओळखली जाणारी एक वैशिष्ट्यपूर्ण मूर्ती पाहायला मिळाली आणि साधारण प्रत्येक मंदिराच्या बाह्यांगावर एकतरी विषकन्या कोरलेली असते असं लक्षात आलं. या विषकन्यांच्या अंगावर एक सर्प दिसून येतो. अनेकदा सापाबरोबरच विषकन्येच्या हातात मुंगूसही पाहायला मिळतो. दबा धरून बसलेले आणि एकमेकांवर आक्रमणाच्या तयारीत असणारे साप आणि मुंगूस मी जेव्हा प्रथम पाहिले, मला एकदम तात्यांची आठवण झाली. आठवण झाली ती तात्यांच्या 'अहि-नकुल' या कवितेची. ही कविता साप आणि मुंगूस जन्मजात वैराचं थरारक चित्र आपल्यासमोर उभं करते. त्या कवितेतील प्रत्येक शब्द, प्रत्येक कल्पना तात्यांच्या काव्यप्रतिभेची साक्ष देते. शिल्पकार आणि कवी दोघांनी हा अनवट विचार आपापल्या माध्यमातून अत्यंत समर्थपणे व्यक्त केला आहे. गडचिरोली येथील मार्कंडेय मंदिरावरील, नर्तनाच्या त्रिभंगी स्वरूपामधील विषकन्या मी पाहिली आणि त्याच क्षणी ठरवलं की या मूर्तीचं मागील पडद्यावर प्रक्षेपण करत तात्यांच्या 'अहि-नकुल'वर नृत्याचं सादरीकरण करायचं. महाराष्ट्राच्या सुवर्णमहोत्सवी वर्षानिमित्त, महाराष्ट्राच्या प्राचीन ललित कलांवर आधारित 'ललित अलंकृत महाराष्ट्र' ही नृत्यसंरचना मी माझ्या १० शिष्यांना घेऊन पूर्ण केली. ४ जून २०१० रोजी सादर केलेल्या 'ललित अलंकृत महाराष्ट्र'च्या पहिल्या प्रयोगात 'अहि-नकुल' ही कविता विविध देवळांमधील विषकन्यांच्या स्पष्टीकरणाद्वारे प्रस्तुत केली. प्रेक्षकांनी त्यास प्रचंड दाद दिली. आज तात्यांची आठवण मी माझ्या नृत्यरचनेच्या कोंदणात कायमची जडवून ठेवली आहे.


**रोशन दाते (बेदरकर)**
ए-२/११, सूर्यप्रभा गार्डन,
बिबवेवाडी, पुणे - ४११ ०३७
(निवास) : ०२० - २४२६१६०६
roshandatye@gmail.com



माणूसपणाच्या वाटेवरची
**पुरुष स्पंदनं**
दिवाळी २०१०

स्त्री-पुरुष नातेसंबंध, पुरुषत्व, लैंगिकता व संबंधित मुद्द्यांवर
विविध क्षेत्रातील, वयोगटातील
संवेदनशील पुरुषांना लिहितं करणारा आगळा अंक

संपादक: **हरीश सदानी** मुखपृष्ठ: **अनिल दाभाडे** मूल्य: **८० रुपये**



**'जात व स्त्रीपुरुष नातेसंबंध' विशेषांकात—**

• स्त्रीपुरुष नातेसंबंधांवर जातीच्या होणाऱ्या प्रभावाचा आढावा • समाजातील जातवास्तव, स्त्रियांवरील हिंसाचार यावर कला, साहित्य, समाजकार्य क्षेत्रातील तज्ज्ञांचे विश्लेषणात्मक लेख • आंतरजातीय विवाह झालेल्या तरुणांची मनोगते व अनुभवकथनं

लेख: लक्ष्मण माने, यशवंत सुमंत, अर्जुन डांगळे, भालचंद्र मुणगेकर, राम पुनियानी, प्रदीप देशपांडे, योगिराज बागूल, मिलींद कसबे, हरी नरके, सुधाकर सुराडकर, रमेश हरळकर, युवराज मोहिते, विलास वाघ, विठ्ठल बन्ने, सुरेश सावंत, ध्रुव मंकड, रमेश कांबळे, सचिन गरुड, रणजीत परदेशी, भीम रास्कर, विक्रम गायकवाड, सुहास सोनावणे, मधु मोहिते, नंदू गुरव

कविता: यशवंत मनोहर, एकनाथ पाटील, केशव सखाराम देशमुख, प्रशांत मोरे, लोकनाथ यशवंत, संदेश कुडतरकर

कथा: दिलीप पांढरपट्टे, दीनानाथ मनोहर, गुरुनाथ तेंडुलकर, अभिराम भडकमकर

युवास्पंदनं: गणमित्र मन्दा दत्तात्रय, राहुल गवारे, इनायत परदेशी

प्रकाशक: **मेन् अगेन्स्ट व्हायलन्स ॲंड अब्युज (मावा)**
७०५, परिश्रम बिल्डींग, भंडार गल्ली, ले.ज.रोड, माहीम, मुंबई - ४०० ०१६ दूरध्वनी: ०९८७०३०७३४८ इमेल: harsh257@rediffmail.com

## अचला जोशी यांच्या 'आश्रम नावाचं घर' या

# 'फॅक्शन'ची निर्मिती

मुलाखत – **प्रा. वि.शं.चौघुले आणि उषा मेहता**

नुकत्याच 'मौज प्रकाशना'तर्फे प्रसिद्ध झालेल्या अचला जोशींच्या 'आश्रम नावाचं घर– कहाणी श्रद्धानंद महिलाश्रमाची' या साहित्यकृतीचं महत्त्व दुहेरी आहे. गेल्या शतकातल्या आणि चालू शतकातल्याही समाजाच्या जडणघडणीवर, विशेषत: स्त्री जीवनावर, या पुस्तकामुळे जो प्रकाशझोत पडतो, तो आजच्या काळातही अंतर्मुख करायला लावणारा आहे. हे पुस्तक म्हणजे 'श्रद्धानंद महिलाश्रम' या संस्थेचा आठ दशकांचा अभ्यासपूर्ण, विचारांना चालना देणारा, प्रेरणादायी इतिहास. त्यातून संस्थेच्या स्थापनेची गरज का भासली हे कळते, तसे तिच्या विकासात आणि विस्तारात सहभागी असलेल्या वेगवेगळ्या समाजधुरिणांच्या योगदानाचीही कल्पना येते. याखेरीज अचलाताई, वेगवेगळ्या संकटांमध्ये अडकलेल्या, पुरुषी वर्चस्वामुळे फसलेल्या स्त्रियांच्या समस्यांचे जिवंत दर्शन या लेखनातून घडवतात, जे वाचणाऱ्यांना अस्वस्थ करून सोडते. स्त्रियांबरोबरच अनाथ मुलांचेही संगोपन आश्रमाने केले; तसेच त्यांना पालक मिळवून देण्याचेही प्रयत्न केले. स्त्रियांच्या आयुष्यातील विविध दु:खवेदनांचे आक्रंदन या पुस्तकातून ऐकू येते. सत्य घटनांवर आधारलेले हे लेखन महाकादंबरीच्या स्वरूपात - faction म्हणून आपल्यासमोर येते. एक साहित्यकृती म्हणून तर तिची गुणवत्ता आहेच, त्याचबरोबर सामाजिक इतिहासाचा लेखाजोखा तपासायलाही ती मदत करते. म्हणूनच या अनमोल ग्रंथाच्या निर्मितीबाबतचे संदर्भ, तपशील जाणून घेण्याची उत्सुकता होती. त्या दृष्टीनं अचलाताईंशी आम्ही केलेली ही बातचीत.

*अचलाताई, आश्रमासाठी तुम्ही गेली अनेक वर्षे वेगवेगळ्या पदांवर काम करत आहात. २००१ मध्ये तुमची या संस्थेच्या अध्यक्ष म्हणून निवड झाली. याच अवधीत तत्कालीन राष्ट्रपती ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या अध्यक्षतेखाली आश्रमाचा अमृतमहोत्सव साजरा झाला. या आश्रमाच्या कामामध्ये तुम्ही कधी आणि कशा ओढल्या गेलात?*

''तसं म्हटलं तर माझ्याकडून आश्रमासाठी काही काम व्हावं हे सहजच होतं. माझी आई मनोरमा फडके या आश्रमात वेगवेगळ्या पदांवर फार मनापासून काम करत होती. मला आठवतं, माझ्या वयाच्या सातव्या वर्षापासून मी तिच्याबरोबर अनेकदा आश्रमात जात असे; आश्रमाच्या परिसरात, मोठ्या कुटुंबात वावरावं तशी वावरत असे, आई काम करत असताना

तिथल्या मुलांशी खेळत असे. त्यावेळी महिलाश्रमाच्या अगदी सुरुवातीच्या व्यवस्थापिका लक्ष्मीबाई कोल्हटकर, अध्यक्ष बाबासाहेब जयकर, वेलजी लखमसी नप्पू, सहकार्यवाह नवरे, डॉक्टर उदगावकर या सर्वांना मी लहानपणी पाहिल्याचं मला आठवतंय. त्या वयातच आश्रमानं माझ्या मनात 'घर' बांधलं. भविष्यात मग अगदी स्वाभाविकपणे आश्रम हीच माझ्या समाजकार्याची कर्मभूमी झाली. शिक्षण संपवून व्यक्तिगत जीवनात स्थिर झाल्यावर, म्हणजे १९७६ सालापासून संस्थेच्या दत्तक विभागात मी अधिकृतपणे लक्ष घालायला लागले.''

*म्हणजे तुम्ही संस्थेची वाटचाल गेली चाळीस वर्षे जवळून पाहत आहात, नव्हे, अत्यंत समरसतेनं अनुभवता आहात. तुमच्या पुस्तकात संस्थेच्या स्थापनेपासूनचा ७५ वर्षांपासूनचा इतिहास फार वेधकपणे आला आहे. आश्रमाची सुरुवातीची वाटचाल तुम्ही कशी जाणून घेतली? आणि त्या आधीचा प्रश्न म्हणजे, संस्थेविषयी हे पुस्तक लिहिण्यासाठी तुम्ही उद्युक्त कशा झालात?*

''तुमच्या प्रश्नाचं सरळसरळ उत्तर म्हणजे, श्रद्धानंद आश्रमाचं काम करत असताना माझ्या मनात जी आंदोलनं उठत असत त्याविषयी मी माझे गुरुजी, खरं तर जिव्हाळ्याचे ज्येष्ठ स्नेही, श्री. पु. भागवत यांच्याशी बोलत असे. त्यांनी मला, मी या अनुभवांचं चित्रण करावं असं सुचवलं. पण या ४० वर्षांत केवळ मलाच आलेल्या अनुभवांतून ८० वर्षं अस्तित्वात असलेल्या आश्रमाचं सम्यक्‌दर्शन कसं होणार होतं? या विषयाकडे सांगोपांग पाहिलं पाहिजे असं वाटू लागलं.

मुख्य म्हणजे ज्या काळात आश्रमाची स्थापना झाली त्या काळातल्या धार्मिक, राजकीय आणि सामाजिक परिवर्तनाच्या पार्श्वभूमीची संपूर्ण माहिती व्हायला हवी होती. त्यासाठी त्या कालखंडाचा पट दाखवणाऱ्या पुस्तकांची मदत घेतली. याबरोबरच, ज्या संचालक मंडळींनी आश्रमाची स्थापना केली; त्या त्या काळात उद्‌भवणाऱ्या समस्यांना बळी पडलेल्या बायका-मुलांना आधार देऊन त्यांचं जीवन मार्गी लावलं, त्यांच्या चित्रणाशिवाय या आश्रम कहाणीचा गोफ अधुरा आणि अपुरा राहिला असता.

नशिबानं श्रद्धानंद स्वामी, त्यांचे गुरुजी-आर्य समाजाचे संस्थापक दयानंद सरस्वती, तसेच संस्थेच्या संस्थापक मंडळाचे बॅरिस्टर जयकर, सॉलिसिटर बाळासाहेब खेर, राजा नारायणलाल बन्सीलाल, रामेश्वरदासजी बिर्ला, जयंतीमल




मुळजी, वेलजी लखमसी नप्पू, लक्ष्मीदास तेजपाल आणि इतर कार्यकर्त्यांची चरित्रं, आत्मचरित्रं, त्यांच्यावर प्रसिद्ध झालेले लेख उपलब्ध आहेत. त्यांचे संपन्न, विस्मयकारक जीवनपट वाचून माझ्या जाणिवा समृद्ध होत गेल्या. ही सोन्यासारखी मंडळी फक्त अहवालाच्या पुस्तिकांमध्ये दडपली न जाता स्वंतत्रपणे वावरावीत असं वाटत गेलं.

त्यांनी सर्वांनी केलेले कार्य, भोगलेला मनस्ताप, समस्यांतून काढलेले मार्ग, घेतलेले निर्णय हे कार्यकारी मंडळाच्या दर महिन्याला होणाऱ्या सभांच्या इतिवृत्तांमध्ये आढळले.

या सर्वांची जीवनपद्धती आणि व्यक्तिगत विचारधारणांचं मला बरंचसं आकलन झालं आहे, असा विश्वास वाटू लागला आणि म्हणूनच त्यांच्या श्रद्धानंद आश्रमातील कार्यामागच्या प्रेरणेचा उगमही मी जाणू शकले.

आणखी एक शुभयोग म्हणजे आश्रमाच्या पहिल्या व्यवस्थापिका लक्ष्मीबाई कोल्हटकर यांच्या हस्ताक्षरातल्या दोन मौल्यवान वह्या मला गवसल्या. पानं पिवळट पडलेली होती. मजकूर तसा थोडकाच होता, पण त्यातून मला




**प्रकाशनसमयी अचला जोशी, कुमार केतकर आणि मंगेश पाडगावकर**

लक्ष्मीबाईंचं व्यक्तिमत्त्व, त्यांची मानसिकता उमजत गेली. जोडीला संस्थेची रजिस्टरे आणि त्यातले अहवाल होतेच. रजिस्टरांमधून त्या त्या वेळी आलेल्या अभागी जीवांची आणि त्यांच्या समस्येवर बाईंनी काढलेल्या तोडग्यांची माहिती मिळाली. त्यांच्यानंतर आलेल्या अधिक्षिकांच्या नोंदींतून आणि दत्तक गेलेल्या मुलांच्या आणि सर्व आश्रयार्थी महिलांच्या फायलीमधून आश्रमाच्या कामाचा मागोवा मी घेत गेले. आश्रमातले कर्मचारी– कमल रेड्डी, अनामिका, पोरेडी, नंदिनी शेट्ये, मोहन पंडित आणि मुख्य म्हणजे दादा ताटके, अशा सगळ्यांकडूनही मी काही ना काही माहिती मिळवत राहिले.

त्याखेरीज, आता वृद्ध झालेल्या, पण आपापल्या संसारात असलेल्या काही आश्रमकन्यांचा शोध घेऊन, मी त्यांना आवर्जून भेटले. जुन्या दिवसांच्या आठवणीत त्या रमत असताना त्यांच्याकडून मला बऱ्याच घटना कळल्या. ही सर्व माहिती लिहून घेऊन, त्यांना ती परत वाचून दाखवून, ती बरोबर असल्याची मी खातरजमा करून घेत असे. जवळजवळ चार वर्षे मी या कामातच घालवली आणि माझ्या कॉम्प्युटरवर जवळजवळ तीन हजार पानं भरून अधिकृत माहिती गोळा झाली!''

*खूपच मनापासून परिश्रम केलेत तुम्ही– म्हणूनच हा इतिहास जिवंत झाल्यासारखा वाटतो. तो कमालीचा वाचनीयही झाला आहे. याचं महत्त्वाचं कारण म्हणजे तुम्ही या लेखनासाठी निवडलेला फॉर्म, 'फॅक्शन्' म्हटलंय त्याला. हा निवडणं किंवा खरं तर शोधणं यासाठी प्रतिभाच प्रसन्न व्हायला हवी. उगीचच प्रशंसा करत नाहीये मी, पण खरंच या पुस्तकासाठी हा 'फॉर्म' कसा निवडलात तुम्ही?*

आश्रमाची कहाणी ही तिथे घडलेल्या घटनांद्वारे दिसणाऱ्या संमिश्र अनुभवाचं कथन करणारी असावी असं मला वाटलं. तो काळ समजला होता. आश्रमाच्या आद्य संस्थापकांच्या आणि नंतर आलेल्या कार्यकर्त्यांच्या जीवनधारणा कळल्या होत्या आणि आश्रम चालवताना त्यांनी काय कामं केली, अडचणी सोसल्या त्याची जाण आली होती. हे सगळं साहित्य एकत्र आलं. त्याची नुसती पुनर्रचना केली असती तर तो महत्त्वाचा, पण निर्जीव असा दस्तावेज झाला असता.

आमच्या आश्रमात गेल्या ऐंशी वर्षांचे अहवाल आहेत. त्यात मला एकत्रित स्वरूपाचा ऐंक्याऐंशीवा अहवाल तयार करायचा नव्हता. तिथल्या कार्यकर्त्यांची मानसिकता मला कळायला लागली होती. प्रत्यक्ष अनुभवातून माणसांची दृष्टी कशी बदलत जाते, हे मला त्यांनी वेगवेगळ्या वेळी घेतलेल्या निर्णयांवरून कळायला लागलं होतं.

आता फॅक्शन कशी होते ते सांगते. ''या संस्थेत मी काम करायला लागलो आणि सनातन्यांचा सुधारक झालो'' हे श्री.शं. नवऱ्यांचं स्वत:बद्दलचं विधान. ही 'फॅक्ट' आहे. ते 'सुधारक' झाले ही पण फॅक्टच आहे. हा प्रवास एका

दिवसाचा असू शकत नाही. मग मी घडलेलेच काही प्रसंग निवडले. लक्ष्मीबाई, अब्राह्मण बायकांबरोबर जेवतात याचं त्यांना वाटलेलं आश्चर्य हा एक खरं तर त्यांना 'शॉक'च होता. त्यानंतर बाईंनी एका 'ख्रिश्चन' बाईचं आश्रमात केलेलं बाळंतपण हा दुसरा शॉक. उदगावकरांनी मांग, महार यांना माणुसकीचे हक्क मिळवून द्यायला केलेला झगडा ते रोज पाहतात. या प्रत्येक घटनेचे तास त्यांच्या मनावर पडतात, नवरे बदलत जातात, पुढे जात-पात-धर्म यांचा विचारही विसरतात. आश्रमात घडलेल्या घटना, प्रसंग रचून उभ्या केल्या. त्यांची 'फिक्शन' केली आणि परिणाम साधला. आणखी एक उदाहरण- लोकमान्य टिळकांनी गीतारहस्याबद्दल बोलताना ''श्रद्धानंद स्वामींच्या रूपात मी माझ्या गीतारहस्यातला चालता-बोलता कर्मयोगी पाहतो'' असं केलेलं विधान ही फॅक्ट आहे. हे मला वापरायचं होतं. त्यासाठी स्वामीजींच्या खुनानंतर झालेल्या शोकसभेत मी ते टिळकांचं वाक्य जयकरांनी उद्धृत केल्याचं दाखवलं. ही फिक्शन. असे परिणाम साधत गेले.

खाली मान घालून आलेली बाई शिकली, की अधिक आत्मविश्वासानं वावरते, दुसरीला आधार देण्याइतकी ती बदलते, ते सर्व मला आश्रमातलं साहित्य वाचताना आणि पाहताना जाणवलं. घरातल्या वडिलधाऱ्या नातेवाइकांकडून अत्याचार झालेल्या दोन बालविधवा आश्रमात पोलिसांकडून आमच्याकडे सुपूर्द केल्या जातात. त्या दोघींना गुन्हेगार म्हणून तुरुंगात जावं लागतं काही दिवस. एकीनं चिडून जाऊन अत्याचाराला प्रतिकार केला, म्हणून ती खुनी, ती गुन्हेगार; तर दुसरी अत्याचाराला घाबरून स्वत:लाच संपवू पाहणारी, आत्महत्येचा प्रयत्न करणारी म्हणून गुन्हेगार! दोघीही गुन्हेगारच मानल्या गेल्या. पण दोघींची मानसिकता वेगळी. आश्रमात आल्यावर त्यांच्या मनोवृत्तींत लक्षणीय फरक झाले. त्यांचं हे वाढलेपण चित्रीत करूनच त्यांचं चित्र जिवंत होणार होतं. हे सारं शब्दरूपात प्रकटणं फार आवश्यक होतं. ज्याला 'बिटविन द लाइन्स' म्हणतो, तसे त्या सर्वांच्या वागण्यातले अनेक संदर्भ निरनिराळ्या प्रसंगांतून जाणवायला लागले. त्यात प्राण फुंकायचं काम या लेखनपद्धतीनं साधलं. म्हणजे एका अर्थी ते जग त्याच्या सर्व संबंधांनिशी, त्यातल्या ताणतणावांसह उभं करायचा प्रयत्न करायचा होता. त्यासाठीही मी ही लेखनपद्धती वापरली.

या पुस्तकाचा आरंभ कसा करावा याबाबत माझा निश्चय होत नव्हता. मग मी हा आरंभ चार-पाच प्रकारांनी लिहून पाहिला. एकदा, इतिहासाच्या क्रमानुसार लिहून पाहिलं, नाही आवडलं फाडून टाकला. मग एखादी जुनी, वृद्ध आश्रमाशी संबंधित असलेली आश्रमकन्या आश्रमाची कथा सांगत आहे, अशी कल्पना करून लिहून पाहिलं, तेही नाही रुचलं. आश्रमाची इमारत आपली कथा सांगत आहे अशीही कल्पना केली; ती तर लगेच रद्द केली. दर वेळी सुरुवातीची ३०-३५ पानं लिहावीत आणि फाडून टाकावीत, असं चाललं होतं. कुठलीच लेखनपद्धती मनास येईना. अचानक, आता फॅक्टवर, आधारलेली फिक्शन म्हणजे 'फॅक्शन'चा अवलंब मी करून पाहिला आणि तो मनासारखा जमतोय असं वाटलं. याबाबत मी भागवतसर आणि राम पटवर्धनांसारख्या मार्गदर्शकांशीही चर्चा करत होते.

या कहाणीत, आश्रमात घेतला गेलेला एकही निर्णय किंवा व्यक्ती काल्पनिक नाही. फक्त लेखकाचं स्वातंत्र्य घेऊन आश्रयार्थी आलेल्या सर्वांची नावं बदललेली आहेत. परिणामकारकतेसाठी क्वचित घटनाक्रम बदललेला आहे. प्रत्यक्ष घडलेल्या या गोष्टींचं चित्रण करताना त्यांना संजीवनी देणं हे पुनर्निमितीचं काम होतं, ते मी करण्याचा प्रयत्न केला.''

*एखाद्या कादंबरीचा विषय होऊ शकेल असं लक्ष्मीबाई कोल्हटकरांचं व्यक्तिमत्व तुम्ही उभं केलं हे आणि इतरही अनेक हाडामांसाच्या जिवंत व्यक्ती या पुस्तकातून भेटत राहतात.*

''मी तुम्हाला मघाशी सांगितलं त्याप्रमाणे आश्रमाशी निगडित असलेली सर्वच मंडळी माझ्या मनात रुंजी घालत असायची. अमका एक प्रसंग झाल्याची नोंद मिळाली, की त्याबद्दल त्या त्या व्यक्तीच्या काय काय प्रतिक्रिया झाल्या असतील हा विचार करण्याचा, ते प्रसंग मनात घोळवायचा मला छंदच लागला होता. एकीकडे माझी दैनंदिन कामं सुरूच असायची, पण मनात मात्र आश्रम नांदत असायचा. लक्ष्मीबाई रजिस्टरमध्ये रोज आलेल्या बायका-मुलींच्या नोंदी करत. त्याबद्दल काही प्रतिक्रिया त्यांच्या त्या वेगळ्या, लहान वहीत लिहून ठेवत. 'तिच्या वेदना पाहूनच माझ्या घशाखाली घास उतरत नाही.' 'कसं समजावावं यांना? स्वत:चं हित कसं कळत नाही म्हणते मी!' किंवा 'पुष्कळच चांगली वागते. आता तिची आज दृष्टच काढली पाहिजे! मनाचं समाधान, दुसरं काय?' अशा त्या त्या संदर्भातल्या प्रतिक्रियांतून लक्ष्मीबाई माझ्या मनात आकारायला लागल्या.

लक्ष्मीबाई काय किंवा इतरही व्यक्ती, कार्यकर्ते काय, अनुभवानं बदलत गेलेले दिसले, तरच ते अनुभव नीटपणे व्यक्त झाले असं मी समजते. त्याप्रमाणे लेखन तपासत गेले.

मुलाखतीनंतर लक्ष्मीबाईंची अल्पावधीत निवड करताना बाळासाहेब खेरांनी त्यांच्या चार गुणांचं वर्णन केलं आहे– 'अस्पृश्यता पाळीत नाहीत, मध्यमवयीन, उचित बुद्धिमान, काम करण्यास तत्पर.' खेरांनी अशा प्रकारची संस्था चालवली नव्हती तरी तिथं कशी व्यवस्थापिका लागणार आहे याचं किती अचूक चित्र त्यांच्या मनात तयार होतं! यावरून खेरांच्याही व्यवस्थापनकौशल्याची जाणीव व्यक्त होते, नाही का?

*अशा फॅक्टस्‌वरच्या लेखनासाठी काही बंधनंही पाळावी लागली असतील?*

''बंधनं तर होतीच! कोणतीही घडलेली घटनाच लिहायची, त्या प्रसंगाचं वर्णन करण्यापेक्षा चित्रण करायचं आणि अत्याचाराला बळी झालेल्या कोणत्याही बाईचं, तसंच दत्तक घेतलेल्या कोणत्याही कुटुंबांचं आणि व्यक्तीचं खरं नाव लिहायचं नाही, ही ती प्रमुख बंधनं! आमच्या विश्वासावर आधाराला, मदतीला आलेल्यांची नावं जाहीर करणं साध्या सभ्यतेला धरून होणार नाही, हे पक्कं मनात होतं.''

*तुम्ही आठ वर्षं या पुस्तकावर काम करत होता. पुस्तकाचं लेखन पूर्ण झाल्यावर तुमच्या मनात काय भावना होती?*

''शेवटचं पान कॉम्प्युटरवरनं काढलं आणि काही वेळ मी नुसती बसून राहिले. फाईलमध्ये ते घालून 'मौज'कडे घेऊन जाताना, इतक्या दिवसांचा मनीमानसी असलेला विषय आता आपल्यापासून दूर जातो आहे या विचारानं माझी विमनस्क अवस्था झाली. ऐंशी वर्षांत झपाट्यानं बदलत गेलेली समाजस्थिती, सामाजिक मानसिकता, राजकीय परिस्थितीतून उद्‌भवणारी अशांतता आणि सतत सुरू असलेली स्त्रीची विटंबना, तिचं शोषण, अनाथ मुलांचे अनुत्तरित प्रश्न; हे सारं अंत:चक्षूंना दिसणारं गरगरणारं चक्र आता लेखिका म्हणून तरी मी माझ्यापुरतं थांबवलं होतं. साफल्याच्या त्या क्षणात 'काय बोचते ते समजेना, हृदयाच्या अंतर्हृदयाला...' अशा अवस्थेत काही काळ उदासीनताच वेढून राहिली.

'आता ही संहिता आपली राहिली नाही, ती वाचकांच्या हाती सोपवल्याची भावना मग दृढ झाली. आश्रमाच्या या पुस्तकरूपावर आता मत देण्याचा हक्क वाचकांचा', ही भूमिका पक्की केली. वाचकांचं मत अधिक वस्तुनिष्ठ असल्यानं ते अधिक बरोबर, आपण त्यावर काहीही प्रतिक्रिया देणं उचित नाही, हे ठरवलं.

या पुस्तकाच्या निमित्तानं झालेल्या वाचनामुळे माझ्या ज्ञानात भर पडली. आश्रमाशी निगडित असलेल्या थोरामोठ्यांमध्ये मी मनानं बराच काळ वावरले. 'तस्मिन्नेव काले, तस्मिन्नेव प्रदेशे वर्ते!' अशा अवस्थेत माझं उन्नयन झाल्याची भावना मला आनंद देत राहिली.''

*पुस्तक छापून आल्यावर काही राहून गेलंय, आणखी काही तपशील द्यायला हवे होते, असं काही असमाधान वाटत राहिलं का?*

''पुस्तक लिहायला मी भरपूर वेळ घेतला. त्यात काय घालायचं, काय वगळायचं ही निवड करूनच मी लिहीत होते. कोणतीही घटना-प्रसंग पुनरुक्त होत नाही ना, हे परत परत तपासून पाहत होते. प्रत्येक कार्यकर्त्याच्या योगदानाची यथायोग्य नोंद होते आहे ना, आपल्या हातून काही राहून जात नाही ना याची खात्री करून घेत होते. ही कहाणी सांगताना मी आवश्यक त्या पुरेशा तटस्थतेनं, वस्तुनिष्ठ पद्धतीनं काम करत होते. त्यामुळे आता हे पुस्तक पुरं झाल्यावरही एखादी घटना लिहायची राहिली आहे अशी जराही हुरहुर माझ्या मनात नाही. ही साठा उत्तराची कहाणी, सफल, संपूर्ण झाली आहे, याचं मला समाधान आहे.

आश्रमात येताना आणि विशेषत: इथं काम करायला लागल्यावर निरनिराळ्या समस्यांच्या बळी झालेल्या बायका-मुलांच्या भावनिक गुंतवणुकीपासून मनानं अगदी दूर राहायला पाहिजे असा इशारा बुद्धी देत असे. त्या सवयीचा उपयोग ही संहिता लिहिताना झाला. स्त्रीच्या वेदना पाहताना दु:ख झालं नाही असं कसं होईल? पण यातनं तिचं पुनर्वसन करायचं सकारात्मक आव्हान घ्यायचं आहे या जाणिवेनं मन पुन्हा उभारी घेतं.

आश्रमातल्या अनेकांच्या अनुभवांचं चित्रण करतानाचा हा सर्वच लेखनप्रवास मला आनंद देणारा आणि माझं अनुभवविश्व संपन्न करणारा झाला. वाचकांनाही तो तसाच वाटावा ही इच्छा!''

*अचलाताई, या पुस्तकावर अनेक लेख लिहून आले. बहुतेक सर्वच वृत्तपत्रांनीही त्याची चांगली दखल घेतली आहे. ऑल इंडिया रेडिओनं तुमची मुलाखत प्रसारित केली. तुमच्या या पुस्तकाचं जाणकारांकडून सर्वत्र स्वागत होत आहे. पाच महिन्यांत याची दुसरी आवृत्ती आली आहे. तुम्ही संस्थेचा पंचाहत्तर वर्षांचा दस्तऐवज तयार केला आहात. तुमचं या उत्कृष्ट साहित्यकृतीनं झालेलं काम ऐतिहासिक महत्त्वाचं आहे. अतिशय मनापासून तुमचं अभिनंदन! पण आता एक शेवटचा प्रश्न. आता तुम्ही आमच्या अपेक्षा खूपच उंचावून ठेवल्या आहेत. तर या पुस्तकानंतर पुढचा लेखनसंकल्प कोणता?*


''हे पुस्तक लिहीत असतानाच मला साहित्य संघानं, माझे गुरुजी न.र. फाटक यांचं चरित्र लिहिण्याचं सुचवलंय. न.र.फाटकांची मी विद्यार्थिनी. त्यांचे आणि माझे जिव्हाळ्याचे, कौटुंबिक संबंध. तेव्हा मी आनंदानं मान्यता दिली. मात्र आधीचं पुस्तक हातावेगळं झाल्यावर मी लिहायला सुरुवात करीन असं सांगितलं होतं.

मी सरांना फक्त त्यांची विद्यार्थिनी या दृष्टीनंच पाहत आले होते, त्यांची माया अनुभवत होते. पण सरांच्या चरित्राची साधनं गोळा करायला लागले आणि हे केवढं आव्हान आहे हे लक्षात आलं. एकाच वेळी अनेक वाद्य सुसंवादीपणे वाजणारा वाद्यवृंद असावा, तसं त्यांचं चरित्रदर्शन व्हायला लागलं. त्यातलं एखादंही वाद्य कमी असलं तर त्याच्या दर्जात कमीपणा जाणवणार, तेव्हा सध्या मी तो मेळ जमवण्याच्या प्रयत्नांत आहे. याखेरीजही काही योजना मनात आहेत.''

अचलाताईंशी झालेल्या गप्पांतून बरंच काही कळलं असं वाटत होतं, पण बरंच काही राहिलं असंही वाटत राहिलं. अचलाताईंच्या या पुस्तकाबरोबरच त्यांच्या लेखनाचीही प्रक्रिया समजून घेण्याचा हा प्रयत्न!

**उषा मेहता**
१६-१७, शिवाजी पार्क,
मुंबई - ४०० ०२८.
फोन : ०२२-२४४६ १९९१

**वि.शं. चौघुले**
५/ए, ॐ विजयश्री,
संत जनाबाई पथ,
विलेपार्ले (पूर्व),
मुंबई- ४०० ०५७.
दूरध्वनी-(०२२)२६१३ ३६६०
भ्रमणध्वनी-(०२२)२०५०२०५०




**सोन्याच्या धुराचे ठसके**
पावशतकी सौदी अनुभव
**डॉ. उज्ज्वला दळवी**

सौदी अरेबियासारख्या अत्यंत प्रतिकूल हवामानाच्या, कट्टर इस्लामी राज्यात उपेक्षा, अन्याय नि हालअपेष्टा सहन करत, आयुष्यातील उमेदीची पंचवीस वर्षे वास्तव्य करणाऱ्या डॉ. उज्ज्वला दळवी यांनी त्या देशाच्या अंतरंगात शिरून, ते उकलून आपल्यापुढे ठेवले आहे. आपण वाचकांनी त्याबद्दल त्यांचं कृतज्ञ असायला हवं.

**मीना प्रभू**

**मूल्य २७५ रुपये, सवलतीत १६० रुपये**

# निर्णय काय घेता?

## डॉ. द. व्यं. जहागीरदार

माझ्यासमोर बसलेली व्यक्ती बाजीराव असण्याची सुतराम शक्यता नव्हती. बाजीराव कसा राजबिंडा, तांबूस गोरा रंग, धारदार नाक, भारदस्त व्यक्तिमत्त्व व महत्त्वाचे म्हणजे विलक्षण बोलके डोळे. याचा लवलेशही समोरच्या व्यक्तीमध्ये नव्हता. रंग काळपट, नाक फताडं, शरीर वाकलेलं आणि अती निस्तेज डोळे असलेली ही व्यक्ती बाजीराव कशी असू शकेल? तो स्पष्ट बोलूही शकत नव्हता, फक्त आपण बाजीराव निंबाळकर आहोत हेच सांगत होता.

''काका, आम्हाला तर हा तोतया वाटतो. बाबांना घरातून निघून गेल्याला आता पंधरा वर्षं झालीत. कारनं सफर करण्याची त्यांना भारी हौस. एकटेच गेलेले कारनं, उत्तर हिंदुस्थान पाहण्यासाठी. त्यानंतर त्यांचा पत्ता नाही. प्रवासात असताना घरी संपर्क ठेवणं त्यांना पसंत नसायचं. मला एकटं हिंडायचं आहे स्वैर, पक्ष्यासारखं, ते म्हणत. ते निघालेत आम्हा सर्वांना बाय बाय करून. पण ते आलेच नाहीत.'' प्रकाश सकाळीच बोलला होता.

''तुम्ही काही तपास वगैरे केला नाही?'' मी प्रश्न केला.

''खूप. पण काहीच निष्पन्न झालं नाही. हरिद्वारपर्यंत त्यांचा माग लागला. त्यानंतर पुढे उत्तरेकडे ते गेलेत असंही समजलं. तिकडे रस्ते वळणाचे, खाली खोल दरी, अशाच एखाद्या ठिकाणी त्यांची कार दरीत पडली असावी, असा तर्क केला तिथल्या शासनानं. आम्ही सर्वतोपरी प्रयत्न केला, पण यश आलं नाही. कापूर जसा क्षणकालात गायब होतो, दिसेनासा होतो. तसं बाबांचं झालं.'' जुन्या आठवणींनी आजही तो हळवा झाला होता.

क्षणभर शांतता पसरली. त्या व्यक्तीला त्याच्या खोलीत सोडून आम्ही दोघे बैठकीत आलो. 'आपण इथंच बोलू. मला खूप काही सांगायचं आहे तुम्हाला. तुम्ही न्यायाधीश आहात. माणसांची पारख तुम्हाला असणारच. कोण किती खरं बोलतो, किती खोटं हे तुम्हाला चटकन समजत असेल. म्हणूनच हा तिढा सोडवण्यासाठी तुम्हाला इथं येण्याची मी विनंती केली. खरं तर, तुम्हाला बोलावण्याची, तुमचा सल्ला घेण्याची कल्पना आईची. या प्रकरणाचा जसा गवगवा होऊ लागला, काहीतरी अंतिम निर्णय घेण्याची वेळ आली तेव्हा आई म्हणाली, मोरांबीकर काकांनाच बोलाव. आपल्या विनंतीला ते अवश्य मान देतील. दूर अंतरावर असले तरी बाबांसाठी, आपल्यासाठी अवश्य येतील.''

शेजारच्या खोलीतून स्वत: शारदावहिनीच आल्या.

डोईवर पदर, चालणं हळुवार, बोलण्यात मार्दव.

''नमस्कार भावोजी, तुम्ही आलात म्हणून खूप हायसं वाटलं मला. मागील पाच दिवसांपासून आमच्या घरात एकदम तंग वातावरण झालं आहे.''

''होणारच. घटनाच तशी आहे.''

''खरं आहे भावोजी. ह्यांची गावात प्रसिद्धी. गावाची प्रतिष्ठित व्यक्ती. नगराध्यक्ष होते. म्हणूनच ज्याला त्याला प्रश्न पडला आहे. साहेब परत आलेत का म्हणून जो तो विचारणा करतो आहे. सारखे फोन, अगदी भंडावून सोडलं आहे. उद्या सकाळी तर टीव्हीच्या एका चॅनेलचा ग्रूपच येणार आहे. ताबडतोब 'स्टोरी' तयार करा असा बॉसचा निरोप आला आहे त्यांना. खूपसे नाहक प्रश्न ते विचारणार मला, प्रकाशला. म्हणूनच तुमचा सल्ला हवा.''

अगदी शांतपणे शारदावहिनींनी प्रस्तावना केली.

''मला वाटतं, आपण सर्वच घटना आधी रीतसर पाहू. मला प्रथम सांगा. ती व्यक्ती आली कशी? सर्व, अगदी लहानसहान घटनादेखील क्षुल्लक म्हणून बाजूला ठेवू नका. आठवून प्रत्येक घटना सांगा. तो आला कसा? केव्हा? किती वाजता? प्रथम कोणी पाह्यलं त्याला?''

''मी सांगते, सर्व सांगते.'' वहिनी म्हणाल्या.

त्या सांगू लागल्या...''गुरुवार होता त्या दिवशी. संध्याकाळी मी दत्ताची पूजा-आरती करते. ती पूर्ण झाल्याशिवाय देवघर सोडत नाही मी. त्या दिवशी प्रकाश बाहेर गेला होता, सूनबाई मुलांना घेऊन माहेरी. स्वयंपाकाच्या बाई यायच्या होत्या. घरात मी एकटीच होते. घर दहा-बारा खोल्यांचं, पण माझ्या सरावाचं. त्यामुळे एकटी असले तरी मला कधी भीती वाटत नाही. आकाश काळ्याशार ढगांनी व्यापलेलं. ढगांचा गडगडण्याचा आवाज, मधूनच विजेचा दिपवून टाकणारा तेजस्वी प्रकाश. मी आरती करत होते. उजव्या हातात फुलवात आणि डाव्या हातात घंटी. म्हणूनच बेलचा आवाज प्रथम मला ऐकू आला नाही. बेल दुसऱ्यांदा वाजली. मी आरती मधून सोडून जात नाही हे घरच्यांना माहीत आहे. घरचं कोणी नसावं. मी आरती चालूच ठेवली. पुष्पांजली झाली. नंतर बेल वाजली नाही. नैवेद्य झाल्यावर मी देवघरातून बाहेर आले. पावसाच्या थेंबाचा रपरप होणारा आवाज कानांवर होता. मी व्हरांड्याचा लाइट-बल्ब ऑन केला. आतील बटण दाबून. एकाएकी कारचा लाइट माझ्या चेहऱ्यावर पडला, फक्त क्षणभर. मी दरवाजा उघडला तेव्हा कार दूरवर गेलेली. क्षणभर मी गोंधळले. व्हरांड्याच्या इतर दिशांना माझी नजर गेली. समोर एक व्यक्ती उभी होती, पावसाच्या पाण्यानं निथळत. तिनं माझ्याकडे पाहिलं. रामा गड्यापेक्षाही हलका पोशाख होता त्याचा. पाठीत बाक, अनवाणी, दाढीचे खुंट वाढलेले.

''कोण तू? काय हवंय तुला?'' मी रागानंच प्रश्न केला.

त्यानं काहीच उत्तर दिलं नाही. केसावरून पाणी निथळत होतं त्याच्या. तो थोडा पुढे आला. शर्टाच्या खिशातून प्लॅस्टिकची छोटेखानी पिशवी काढली. त्यातून एक बंद लिफाफा काढला आणि माझ्या हात दिला त्यानं.

''काय आहे याच्यात? पत्र असेल, पण कोणाचं?''

माझ्या प्रश्नाला त्यानं उत्तर दिले नाही. मला ते पत्र महत्त्वाचं वाटलं. मी मागे आले. दरवाजा आतून घट्ट बंद केला. पाहुण्याला, 'आत ये' असं म्हणण्याची या घराची रीत मी पाळली नाही. दिवे आले होते. मी कोचावर बसले. लिफाफा उघडला आणि वाचू लागले-

*सोबत पत्र आणणारे गृहस्थ हे बारा-पंधरा वर्षांपूर्वी गायब झालेले बाजीराव निंबाळकर आहेत. त्यांना स्मृतिभ्रंश झाला आहे पण शंभर टक्के ते बाजीरावच आहेत.*

पत्र मी दुसऱ्यांदा वाचलं. पत्राखाली सही नव्हती, तारीख नव्हती, पत्ता नव्हता, गावाचं नाव नव्हतं. बाजूला पडलेलं पाकीट मी उचललं. पांढरंस्वच्छ कोरं होतं ते. मला काही सुचेना. बाजीराव कणखर, भरघोस केस असलेले, पाणीदार डोळे, धारदार नाक आणि हुशारीचं तेज असलेले व्यक्तिमत्त्व होतं. व्हरांड्यात उभा राहिलेला, पाठीत वाकलेला, गबाळा, बाजीराव कसा असेल? मी पुन्हा दरवाजा उघडला. खेडुतासारखा उकिडवा बसला होता तो. थंडीनं हातपाय कापत होते त्याचे. मला त्याची दया आली.

मी त्याला आत घेतलं. भकास नजरेनं तो दिवाणखाना न्याहळत होता. तेवढ्यात स्वयंपाकाच्या बाई दार उघडंच असल्याने आत आल्या.

''बाई, एका थाळीत पोळी, भाजी आणा पाहुण्यांसाठी'' मी म्हणाले.

चार-पाच घडी केलेल्या पोळ्या, वाडगाभर वरण व दोन मुदा भात, बटाट्याची रस्सा भाजी एवढी भक्कम थाळी पाहुण्यांसमोर आणून ठेवली.

क्षणाचाही विलंब न लावता, दोन्ही हातांनी त्यानं

पोळ्यांचे मोठे तुकडे केले, वाडग्यात बुडवून तोंडात अक्षरश: कोंबले. भराभर जेवत होता तो. मध्येच त्याला ठसका आला. तोंडातला भात अक्षरश: जमिनीवर पडला. मला किळस आली त्याच्या जेवणाच्या पद्धतीची. मी आत निघून गेले, ते जेवण पाहणे नको म्हणून.

आणि मला खात्री झाली, हे बाजीराव नाहीत. आमची गंमत करावी म्हणून कोणीतरी चेष्टा केली असावी. हात पाण्यानं स्वच्छ धुतल्याशिवाय 'हे' कधी डायनिंग टेबलावर येत नसत, त्यांच्या जेवणात नजाकत असे. एकही शित ताटाबाहेर पडत नसे. बोटे कधी अन्नानं भरलेली नसत. स्वभावानं करारी होते, धाडसी होते पण जेवताना मात्र अगदी हळुवार. महत्त्वाचं म्हणजे जेवण झाल्यावर न चुकता ब्रश करत.


त्यांचा एकही गुण त्या पाहुण्यात नव्हता. तो जेवत असतानाच प्रकाश घरात आला. मी त्याच्या हातात पत्र ठेवलं.''

''इतका गबाळा, आमच्या बैठकीत बसून तोंडानं मचमच आवाज करत भाताचे बोकणे भरतो आहे हे दृश्यच मला चीड आणणारं होतं. मी त्याला बाहेर हकलणार होतो. इतक्यात आई बाहेर आली व तिनं पत्र माझ्या हातात दिलं. हा घामट मनुष्य माझा बाप? स्वप्नातही कल्पना करू शकत नाही मी.'' प्रकाश सांगू लागला

''आम्ही दोघांनी बरीच चर्चा केली. दुसऱ्या दिवशी त्याला समोर बसवून खूप प्रश्न केले. पण त्याला कोणत्याही प्रश्नाचं सुसंगत उत्तर देता आलं नाही. तोंडात पुटपुटत अस्पष्ट बोलत होता तो. 'मागील दहा-बारा वर्षं तो कुठे होता? कोणाकडे राहिला? पैशाची सोय कोणी केली. आमची कधी आठवण आली नाही का? मग आताच कसा उगवलास धूमकेतूसारखा? कोणाच्या कारमधून तू आलास?' असे असंख्य प्रश्न आम्ही विचारले पण एकाही प्रश्नाचं नीट, सुसंगत उत्तर त्यानं दिले नाही. एकच गोष्ट चांगली होती; ती म्हणजे दुसरं पत्र आलं नव्हतं. या माणासाला बाप म्हणून स्वीकार असं धमकावणीचं पत्रही आलं नाही. ज्यानं आणून सोडलं त्याचा माग घेण्याचा आम्ही प्रयत्न केला पण अजून तरी काही यश आलेलं नाही.

म्हणूनच आम्ही तुम्हाला बोलावलं, तुमचा सल्ला घेण्यासाठी.''

केस एकदम अनोखी होती. हा माणूस आताच कसा



उगवला? कोणालातरी याचा भूतकाळ माहीत असावा. दहा-पंधरा वर्षांचा प्रदीर्घ काळ. त्या काळात हा कुठे होता? अपघातामुळे यांची स्मृती गेली असेल तर मग याच्या आजारीपणाचा खर्च कोणी केला? ती व्यक्ती प्रकाशला त्याबाबत पैसे वगैरे काहीच मागत नाही? सर्वच अपारंपरिक.

मग हा तोतया असावा का? तोतया सामान्यपणे बोलण्या-चालण्यात हुशार असतो. आपलं अस्तित्व, खरेपणा सिद्ध करण्यासाठी सतत प्रयत्न करत असतो. शिवाय त्याचं हरवलेल्या व्यक्तीशी काहीतरी साम्य असायला हवं. इथे तर दहा टक्केदेखील साम्य नाही. या माणसाचं खरं रूप ओळखायचं कसं?

बांधा, चेहरा, बोलण्याची ढब आणि शारीरिक सवयी यामुळे माणसाचं व्यक्तिमत्त्व निश्चित होतं. त्याची त्यामुळेच ओळख होते. पण या झाल्या वरवरच्या गोष्टी. बालपणात, यौवनात माणसानं कमावलेल्या. यामुळे ओळख होते पण ती अंतिम समजायची का? ओळख पटवण्याचा आणखी एखादा मार्ग नाही का?

मला प्रश्न सुचत गेले. प्रकाशला, वहिनींना मी ते सांगत गेलो. आपलं छायाचित्र, पासपोर्ट ही शासननिर्मित ओळखपत्रं. पण व्यक्तीची निर्विवाद ओळख पटवण्यासाठी आपण पंचवीस-तीस वर्षांपूर्वी वापर करत होतो, त्यानं केलेली सही व निशाणी डावा अंगठा. शरीराला जोडलेल्या किंवा शरीरासोबत आलेल्या या जैविकप्रणाली.

''तुम्ही या माणसाची सही पाहिलीत, घेतली? डाव्या हाताचा अंगठा शिक्का तपासला का?'' मी प्रश्न केला.

''या दोन्ही गोष्टी कालच तपासल्या आम्ही. अक्षरतज्ज्ञाला दाखवून आणल्यात मी. बाबांच्या हस्ताक्षराशी बिलकुल मॅच नाही, शिवाय अंगठ्याच्या खुणादेखील अगदी भिन्न आहेत.''

''तुझं म्हणणं योग्य. पण अंगठ्याला इजा झाली, बोटं भाजली तरीही त्यावरील रेषा अस्पष्ट होतात म्हणून सध्या आम्ही तो पुरावा ग्राह्य मानत नाही.''

''पण आपणाला पुरावा हवाच कशाला? कोणी मागितला आहे पुरावा? टीव्हीची मंडळी येण्याआधी आपणच त्याला घरातून घालवून देऊ म्हणजे हे लचांड संपेल.''

प्रकाशच्या बोलण्यात श्रीमंतीची रग होती, तारुण्याचा उन्माद होता. मला मात्र हे प्रामाणिक उत्तर वाटलं नाही. पाहुणा स्वत:हून काहीही बोलत नाही. तो आहे दीनवाणा, आश्रित. म्हणूनच त्याला न्याय देण्यासाठी आपण सर्वतोपरी प्रयत्न करायला हवे. तो बाजीराव नाही, असूच शकत नाही हे गृहितक आम्ही आमच्या मनात पक्कं केलं आहे. तसा तो बाजीराव असण्याची शक्यता एक टक्का इतकीदेखील नाही, पण ही शक्यता शून्य मात्र नाही, आणि समजा, तो बाजीराव खरा असला तर आपण बाजीरावांवर अन्याय तर करत नाही?

बाजीरावची माझी भेट झाल्या घटनेला आता सोळा-सतरा वर्षं झाली असावीत. त्याचे त्या काळातले फोटो पाहिले, की पुन्हा बाजीराव मनात जागा होईल. प्रकाशला मी माझी इच्छा सांगितली. तो मला बाजीरावच्या स्टडीमध्ये घेऊन गेला.

पुस्तकांनी खोली भरली होती. एका बाजूच्या कपाटात एकाच आकाराची बाईंड केलेल्या वीस-पंचवीस पुस्तकांची उभी रांग होती.

''काका, ह्या बाबांच्या डायऱ्या, इंग्लंडला शिकायला गेले तेव्हा सवय लागली त्यांना. चर्चिल यांना ही सवय होती आणि 'चर्चिल माझे आवडते पुढारी, लेखक, प्रधानमंत्री असूनही दररोज रात्री झोपण्यापूर्वी चार ओळी हमखास लिहीत' असं. बाबा म्हणत.'' प्रकाशनं माहिती पुरवली.

मोठ्या माणसांच्या डायऱ्या म्हणजे इतिहासाच्या मागोवा. त्यांच्या मनातील द्वंद्वाचा खरा इतिहास. बाजीराव आपल्या डायऱ्या कोणालाही वाचायला देत नसे. काय लिहीत असावा तो? मी तपासून पाहू का ह्या डायऱ्या, या माझ्या प्रश्नावर अवश्य, अगदी अवश्य. आरामात वाचा. जेवयाला अजून एक तास आहे. पान मांडली की मी बोलवणं पाठवतो, असं म्हणून प्रकाश निघून गेला.

'आजपर्यंत बावीस देशांना भेट दिली मी. व्हिसा मिळताना कुठेच अडचण आली नाही मला. दुबईला जाण्यासाठी मला व्हिसाची फोटोप्रत दिली. तिथं पोचल्यावर प्रथम माझा व नंतर माझ्या डोळ्यांचा फोटो घेण्यात आला. नंतरच मला पासपोर्ट मिळाला. मला हे सर्व नवीन वाटलं, पण मग समजलं आपल्या डोळ्यांचं महत्त्व.' एका डायरीत अशी मनोरंजक माहिती.

मी डायऱ्या चाळू लागलो, पण डोळ्यांचा फोटो माझ्या मनात घर करून बसला. डोळ्यांचं एवढं महत्त्व का?

जेवणाच्या टेबलावर एक तरुण बसला होता, प्रकाशनं ओळख करून दिली. ''काका, हा माझा मित्र सारंग धाबे. आयटीमध्ये असतो, पण याची खरी ओळख म्हणजे अचाट स्मरणशक्ती तसेच बुद्धिमत्ता असलेला हा विलक्षण प्रेमळ मनुष्य.''

आमच्या गप्पा खूप रंगल्या. अंगठा निशाणीवर त्या सहजपणे आल्या. सारंगला या क्षेत्रातील खूप व खोल माहिती. आज उपलब्ध असलेल्या नवीन जैवमापक प्रणालीची सविस्तर माहिती सांगत होता तो. तळव्याचा रचनाबंध देखील बदलतो, म्हणूनच ही प्रणाली शंभर टक्के खात्रीची नाही.

माझ्या मनात सहज विचार आला, बाबुरावचा तळवा बदलला असावा का? पाहुण्याचा रचनाबंध निराळा म्हणून तो बाबुरावचा तळवा नाही असं ठामपणे सांगणं म्हणूनच शक्य नाही. मग अशा प्रकारात सध्या उपलब्ध असलेली

खात्रीलायक प्रणाली कोणती? हाच प्रश्न मी विचारला सारंगला.

''काका, तुम्ही अगदी योग्य प्रश्न विचारला. रक्तवाहिन्यांचा एकमेवाद्वितीय रचनाबंध आपल्या डोळ्यांमध्ये आढळतो. डोळ्यांच्या पडद्याला रक्ताचा पुरवठा करणाऱ्या सूक्ष्म रक्तवाहिन्यांचं जाळं आयुष्यभर कायम राहतं. त्यात फेरफार होत नाहीत. महत्त्वाचं म्हणजे या रचनाबंधाचं वाचन संगणकाकडून अचूक करता येतं. यात आणखी एक गंमत आहे व्यक्तीच्या शरीराला हात न लावता या रचनाबंधाची अचूक फोटोप्रत तुम्हाला मिळते. खऱ्या अर्थानं कधीही न पुसता येणारी व्यक्तीची ओळख.

सारंगचं विश्लेषण मी लक्ष देऊन ऐकत होतो. ज्या कामाकरता मला वहिनींनी बोलावलं, त्या कामात मी यशस्वी होईन असं उगाच वाटलं मला.

झोपण्यासाठी मला दिलेल्या खोलीत मी आलो. अंथरुणावर पडलो. पण रात्री अकरा वाजता हमखास येणारी झोप आज रुसली होती. विचारांचं काहूर माजलं होतं डोक्यात. डोळ्यांचा रचनाबंध पाहावा का त्या पाहुण्याचा? आणि तुलना करावी बाजीरावच्या डोळ्यांच्या रचनाबंधाशी? पण सोळा वर्षांपूर्वी दुबईत घेतलेला तो फोटो, त्याचा संगणकीय डेटा आता उपलब्ध असेल का? शिवाय, कोण करणार हा खटाटोप? प्रकाश तर करणार नाहीच. वहिनींना देखील हे शक्य होणार नाही आणि आम्ही कोणाला आमचा डेटा दाखवत नाही, शिवाय, कशाला हवा तुम्हाला हा डेटा असे जिकिरीचे प्रश्न विचारून ते आम्हाला भंडावून सोडतील. बाजीराव आपल्या गावात होता लोकप्रिय. पण राष्ट्रीय स्तरावर तो नगण्य होता. शिवाय, इतक्या खटपटी-लटपटी करून काय निष्कर्ष निघणार? दोन्ही रचनाबंधनांत काही साम्य नाही हे सिद्ध करायचा आपला अट्टहास का? पण न्यायमूर्ती असताना प्रत्येक केसचा अभ्यास करताना त्यात समाविष्ट असलेल्या प्रत्येक घटनेचा काळजीपूर्वक अभ्यास करण्याचा शिरस्ता होता आपला. न्यायाधिशाला कोणाचीही बाजू घ्यायची नसते. त्याची बाजू एकच असते आणि ती असते सत्याची!

क्षणभर मानलं, की दोन्ही डोळ्यांचे रचनाबंध अगदी coincide होतील. या पाहुण्याचा फायदा काय? त्याला काही समजत नाही. मागील पंधरा वर्षे आपण कुठे होतो हे तो सांगू शकत नाही. मग त्याला ज्यानं सांभाळले ती व्यक्ती का पुढे येत नाही? निदान त्या व्यक्तीची भेट तरी घ्यायला हवी. पण ती जर जाणूनबुजून अज्ञानातच राहणं पसंत करत असेल, तर मग आपल्या खटपटीला काय अर्थ?

टीव्हीची मंडळी सकाळी दहा वाजता कार्यक्रम सुरू करणार होती. आठ वाजल्यापासून त्यांच्या गाड्या घरासमोर येऊन उभ्या राहिल्या. लाइव्ह ब्रॉडकास्ट करणार होते. मुलाखत म्हणून सर्वांची लगबग.

बाजीरावच्या स्टडीमध्ये आम्ही जमलो. प्रकाशला मी बाजीरावच्या डायरीतला मजकूर सांगितला. तुझी इच्छा असेल तर पाहुण्याच्या डोळ्यांचा फोटो घेऊन बाजीरावच्या डोळ्यांच्या जुन्या फोटोशी तो जुळतो का ते पाहू आपण. सध्या उपलब्ध अशी अतिविश्वासू जैवमापक प्रणाली वापरूनच आपण निर्णय घ्यावा असं मला वाटतं, असा सल्ला दिला.

''काका, मला हे साफ नामंजूर आहे. आपल्या चाचणीचा निकाल जरी पॉझिटिव्ह आला तरी मी तो मानणार नाही, तो माझा खरा बाप असला तरी. आजच्या त्याच्या अवस्थेत मी त्यांना पिता म्हणून मान्यता कदापी देणार नाही. येणाऱ्या मंडळींना त्या जैवमापक प्रणालीची काय माहिती असणार? ते माझ्या व आईच्या बोलण्यावरच विश्वास ठेवणार. आम्ही ठाम सांगणार, हा उपरा आहे.''

तावातावानं तो खोलीतून बाहेर पडला. त्याच्या मागोमाग वहिनीही निघून गेल्या. मी एकटा उरलो. विश्वासू चाचणी उपलब्ध असताना ती वापरायची नाही म्हणजे विज्ञानावर अविश्वास दाखवणं झालं. बरं, जी उपकरणं, फोटो, संगणक ही माहिती देणार, ते अमानवीय भावनाविहीन, द्वेषापासून मुक्त म्हणूनच संपूर्ण विश्वसनीय. आपल्या फायद्याचा मलिदा फक्त विज्ञानाकडून चाखायचा, स्वार्थ आला की त्याला दूर सारायचं. हा कुठला न्याय?

टीव्हीचे कॅमेरे ड्रॉईंग रूममध्ये फिक्स झाले, येणाऱ्यांची गडबड सुरू झाली. 'पाहुण्याला घेऊन या' संयोजक म्हणाले. मी एका बाजूला खुर्चीत बसलो होतो. कुणीतरी माझ्या हातात कापडी, बंद लिफाफा दिला.

''कुरिअरनं आला आहे'' त्यानं सांगितलं.

मी लिफाफा उघडला. आत एक सीलबंद लिफाफा मोठ्या आकाराचा व एक साधं पाकीट होतं.

*''मी विज्ञानाचा चाहता. बाजीराव तीन-चार वर्षांपूर्वी*

*माझ्याशी, दुबईला घेतलेल्या डोळ्यांच्या फोटोबाबत बोलले होते. त्याचा डेटा मी मिळवला. तुमच्याकडे आलेल्या पाहुण्याच्या डोळ्यांचा फोटो मी दहा दिवसांपूर्वी मद्रासच्या गणपती नेत्रालयात काढून घेतला. दोघांचंही संगणकीय परीक्षण करवून घेतलं. डोळ्यांतील बाहुलीच्या कडेला असलेल्या कनीनिकेमधील वळकट्या, वर्तुळं आणि वर्तुळांमधील काळे ठिपक्यांचे डाग यांचे फोटो सेक्शन काढले. त्यांचे फोटो सोबत दिले आहेत. रेणूनिर्मितीनंतर 'इलेक्ट्रॉन डेन्सिटी' नकाशा काढून इलेक्ट्रॉनांची डेन्सिटी दोन न्युल्कियकांमध्ये पाहण्यात येते. तसे नकाशे काढून सोबत पाठवत आहे. त्यांना कंटूर मॅप्स म्हणतात.*

*दोन नकाशे शंभर टक्के एकमेकांशी जुळत आहेत! ही एकरूपता संगणकानं मिळवतात, म्हणून त्यात चूक असणे शक्यच नाही.''*

पत्र पुन्हा वाचलं मी. पत्रावर सही नव्हती. गावाचं नाव नव्हतं. लिफाफ्यातील दुसरं छोटं पाकीट मी उघडलं. आत एक बारीकशी चिठ्ठी होती.

''न्यायमूर्तीसाहेब, आता निर्णय काय घेता?''


**डॉ. द.व्यं. जहागीरदार**
२४ डॅफोडिल, ग्लेन डेल सोसायटी,
लोक हॉस्पिटलसमोर, ठाणे (प.)
मुंबई ४०० ६१०
दूरध्वनी : २५८८३३३८






## महर्षि वेदव्यास प्रणीत श्रीमद् भागवत महापुराण मराठी समश्लोकी

**समश्लोकीकार प्रा. सत्यसंध विनायक बर्वे**

**पाच खंड १८०० पाने**

**मूळ किंमत २,०००/-**
**सवलतीत १,२००/-**

श्रीमद् भागवत या ग्रंथाचे हे मराठी समश्लोकी रूपांतर. सहजसोप्या शब्दांत भागवताच्या श्लोकांची केलेली मांडणी अर्थवाही आहे. श्रीमद् भागवताचे मराठीतील हे पहिलेच समश्लोकी रूपांतर धार्मिक ग्रंथवाचकांइतकेच अभ्यासकांनाही उपयुक्त ठरेल. त्यास ज्योतिर्भास्कर जयंत साळगावकर यांची प्रस्तावना लाभली आहे. इस्कॉनच्या सहकार्याने, त्यांनी देऊ केलेल्या उत्कृष्ट चित्रांमुळे या ग्रंथास वेगळे सौंदर्यमूल्य प्राप्त झाले आहे.

**श्रीमद् भागवताचे हे खंड यादीतील पुस्तकांसह मिळणार नाहीत.**
**ते हवे असल्यास १२०० रुपये अधिक पाठवावेत.**

# धोतर, कुडता आणि पायजम्याचा अर्थ

## गिरीश कुबेर

काही जैविक कारणांमुळे बऱ्याचदा बालकं जन्मदोष घेऊन अवतरतात. म्हणजे कसल्यातरी एखाद्या कमतरतेमुळे कोणाला अंधार पडला की दिसेनासं होतं, कोणी रंग ओळखू शकत नाही. रातांधळे, रंगांधळे वगैरे म्हणतो आपण त्यांना. परंतु एखादा समाजच्या समाज असं काही व्यंग घेऊन जन्माला आल्याची उदाहरणं इतिहासातही फारशी सापडणार नाहीत.

आपल्या समाजाचं घ्या. तो दोन व्यंगं घेऊन जन्माला आलाय. तो ऊर्जांधळा आहे आणि तितकाच अर्थांधळाही. दोन्हींतलं अपंगत्व सिद्ध करण्यासाठी अनेक चाचणी पुरावे देता येतील. आपलं सरकार आपल्याला तीन वर्षांत महाराष्ट्र लोडशेडिंगमुक्त करू सांगतं आणि या अशा सामाजिक व्यंगामुळे आपण त्यावर विश्वास ठेवतो. आपल्याला वजाबाकी किती कळू नये? तीन वर्षांपूर्वी पहिल्यांदा असं म्हटलं तेव्हा ठीक होतं. पण त्यानंतर पाच वर्षांनंतरही ते तीनच वर्षं म्हणतायत, हे आपल्या लक्षातच येत नाही. हे असं काही कळत नसल्यामुळेच आपल्याला पेट्रोल, डिझेल स्वस्त ठेवलेलं आवडतं आणि माजी अर्थमंत्री पी. चिदंबरम आणि 'सत्यम'चा आता बदनाम झालेला प्रमुख राजू या दोघांच्याही कृती एकच होत्या हे कळत नाही. दुसरा स्वतःच्या कंपनीचे आकडे फुगवून सांगत होता, तर पहिला स्वतःच्या खात्याचे. यातला दुसरा तुरुंगात गेला तर पहिला गृहमंत्री झाला! याच आंधळेपणामुळे आपल्यातल्या बऱ्याचजणांना भारत महासत्ता वगैरे होतोय, हे खरंच वाटायला लागतं. असो. मुद्दा हा आहे, की हे आंधळेपण ओळखायचं कसं?

प्रश्न अगदी साधा आहे. आणि त्याची उत्तरं आहेत त्याहूनही साधी.

म्हणजे असं बघा, आजमितीला भारतातला सगळ्यात महागडा प्रदेश कोणता असेल तर तो आपल्या मुंबईतला नरिमन पॉईंट. तिथे जमिनीचे भाव गगनाला वगैरे भिडून तर सोडाच पण भेदून त्याच्याही वरच्या गगनापर्यंत पोचलेत. या परिसरात जागांच्या किमती इतक्या आहेत, की उच्च उच्च मध्यमवर्गीयाला तिथे एखादी बाथरूमसुध्दा घेणं परवडणार नाही. नुसतं टेबल-खुर्ची टाकून छोट्यातलं छोटं कार्यालय.. ज्याला बऱ्या भाषेत हल्ली ऑफिस म्हणतात... जरी सुरू करायचं झालं, तरी महिन्याला वट्ट पंचवीस ते तीस हजार रुपये मोजावे लागतात. म्हणजे महिन्यातले २०-२१ दिवस.. शनिवार-रविवार सुटीचे दिवस वगळून..तिथे बसायचं ठरवलं तर इतकी किंमत मोजावी लागते. हा झाला किमान

जागेचा..टेबलस्पेसचा..दर.

आता याच परिसरातल्या इमारतींच्या खाली गाडी उभी करण्याचा दर बघा. दिवसाला २० ते २५ रुपये. म्हणजे तिथल्या इमारतीतल्या एखाद्या अंधाऱ्या खोलीत जागा घ्यायची तर काहीच्या काही पैसे मोजायचे. पण त्याच इमारतीच्या खाली एखाद्यानं सकाळी नऊ ते संध्याकाळी पाच अशी गाडी उभी केली तर मामला २०-२५ रुपयांत मिटू शकतो. वरच्या इमारतीतल्या खोलीत काय असतं, तर बसायची व्यवस्था, उजेडासाठी लाइट आणि फोन..आणि फार फार तर एखादा फॅक्स. दूरसंचार व्यवस्थेतल्या प्रगतीचा झपाटा लक्षात घेतला तर हे सगळं रस्त्यावर उभ्या राहणाऱ्या गाडीतही मिळू शकतं. आणि या गाडीतली जागा आणि वरच्या इमारतीतल्या कार्यालयातली जागा, यांच्या आकारातही काही फारसा फरक नसतो.

याचा अर्थ असा, की समजा, एखाद्यानं सकाळी नऊ ते संध्याकाळी पाच या वेळात नरिमन पॉईंट परिसरात आपल्या गाडीतच कार्यालय थाटायचं ठरवलं तर त्याला दुकान चालवायला महिन्याला जास्तीत जास्त सहा हजार रुपये लागतील. आता असं बरेचजण...अर्थातच आपल्या गुर्जर बांधवांपैकीच कोणी (अन्यांना एवढं चातुर्य कुठलं असायला) करतही असतील. किंबहुना करतातच.

आपलं सरकारही समाजातल्या याच अर्थांधळ्यांतून तयार होत असल्यानं, त्यांना यातलं काही कळत नाही. खरं तर, या परिसरात गाडी उभी करण्याचा दिवसाचा किमान दर दोनपाचशे करायला काय हरकत आहे? सरकारला पैशापरी पैसे मिळतील. परत ज्यांना परवडू शकेल तीच मंडळी गाड्या घेऊन येतील. हे होत नाही. कारण तेच, अर्थांधळेपणा. हे साहेबाच्या देशात कळतं. त्यामुळे लंडनमधल्या नरिमन पॉईंट-सारख्या भागात...ज्याला बिझिनेस डिस्ट्रिक्ट म्हणतात.. गाडी घेऊन जायचं तर इतकं भरभक्कम शुल्क आहे, की भलेभलेसुद्धा बसमधून किंवा लोकलमधून जातात. हे असं कळतं म्हणूनच देशात काहीही नसताना आणि आकारानं महाराष्ट्राएवढाही नसलेला हा देश, आपल्यापेक्षा ताकदवान होतो.

हे सर्व कळणाऱ्या माझ्या एका ज्येष्ठ मित्रानं मध्यंतरी एक युक्तिवाद केला. तो म्हणाला, शरद पवारांना अर्थकारणातलं काहीही कळत नाही! आता इतकं अतिशयोक्तीपूर्ण विधान गेल्या दहा हजार वर्षांत महाराष्ट्रात कोणी केलं नसेल. तर या मित्रानं एक साधं समीकरण मांडलं. पुण्यातल्या एकूण वाहनांची संख्या घेतली आणि ही सगळी वाहनं एकापुढे एक अशी उभी केली तर त्यांना किती जागा लागेल ती संख्या त्यानं तोंडावर फेकली आणि पुण्यातला जागेचा दर घेतला. त्याच्या म्हणण्यानुसार, पुण्यातली सगळी वाहनं एकत्र उभी केली तर त्यासाठी जवळपास शंभरएक एकर जागा लागेल. आज पुण्यात जागेचा भाव एकरी काही लाखांत असेल तर ही वाहनं उभी करण्यासाठी जी जागा लागते आहे, त्यातून काहीच कसा पैसा उभा केला जात नाही, असा त्याचा प्रश्न. बिनतोड असा. यात पवार का दोषी; तर पुणे महापालिकेत त्यांचं वर्चस्व असूनही ते यासाठी काही करत नाहीत. पवारांनी एकदा का पुण्यात असं काही केलं, तर महाराष्ट्रात ते पसरायला वेळ लागणार नाही, असं तो मानतो.

आता हे होत का नाही? उत्तर तेच, अर्थांधळेपणा. (याच मित्रानं एकदा रिझर्व्ह बँकेत उच्च पदावर असणाऱ्या आमच्या दुसऱ्या मित्राच्या तोंडाला फेस आणला होता. हा त्या रिझर्व्ह बँकेतल्या मित्रापुढे शंभर रुपयांची नोट नाचवत म्हणाला, याच्यावर तुमच्या गव्हर्नरनं १०० रुपये देण्याचं वचन दिलंय..तर दे ते शंभर रुपये. तो दुसरा म्हणाला, तुझ्या हातात तर आहेत ते पैसे. तर हा त्यावर म्हणाला, ती प्रॉमिसरी नोट आहे, पैसे कुठेत..हे असं बराच वेळ चाललं. शेवटी त्या बँकवाल्यानं हार मानली. असो.)

हे केवळ आपल्या राज्यकर्त्यांनाच कळत नाही असं नाही; तर या राज्यकर्त्यांचं एरवी ऊठसूट अज्ञान दाखवणाऱ्या प्रसारमाध्यमांनाही कळत नाही. दोनेक वर्षांपूर्वी महाराष्ट्राच्या अर्थमंत्र्यांनं अर्थसंकल्पात रॉकेलला करात सवलत दिली. सगळ्या मराठी प्रसारमाध्यमांनी गरिबांच्या हिताचा निर्णय वगैरे वर्णन केलं त्याचं. त्यातल्या अनेकांना.. त्यामुळे त्या माध्यमांच्या वाचक/दर्शकांना.. हे कधीच कळलं नाही, की या गरिबांसाठीच्या वगैरे निर्णयाचा खरा फायदेकरी कोण आहे ते! अनेकांना हेही माहीत नाही आपल्याकडे अगदी मोजक्याच कंपन्या रॉकेल बनवतात आणि त्यातल्या काही राजकीयदृष्ट्या वजनदार कंपन्यांकडे रॉकेलचा अमाप साठा झाला होता. आपल्या मायबाप वगैरे सरकारनं हे दर कमी केले, रॉकेलला इतका उठाव आला, की वर्षभरात या कंपनीकडचं पडून राहिलेलं रॉकेल जळून गेलं. पुढच्या वर्षीच्या अर्थसंकल्पात सवलत रद्द झाली. या कानाचं त्या कानाला कळलं नाही, हे का झालं ते!




जगातल्या बड्या कंपन्या या अशा अज्ञानी समाजांच्या वासावरच असतात. या अशा समाजांतच तर खऱ्या मोठ्या बाजारपेठा लपलेल्या असतात.

या विधानावरनं अनेकांना त्यामागचा अर्थ कदाचित लक्षात येणार नाही. तो समजून द्यायला एकच उदाहरण पुरे! तर जगाला आपल्या भारतवर्षातल्या तरुणी सुंदर आहेत, याचा साक्षात्कार हल्ली सारखासारखा का होतो? ऐश्वर्या राय, सुश्मिता सेन यांच्यापासून ते अगदी युक्ता मुखी सुद्धा मिस वर्ल्ड किंवा मिस युनिव्हर्स का होऊ शकते?


याचं उत्तर आपल्या आर्थिक उदारीकरणाच्या धोरणात आहे. १९९१ साली तत्कालीन अर्थमंत्री मनमोहन सिंग यांनी परमिट राज संपवायला सुरुवात केली आणि अनेक बड्या कंपन्यांना भारतातली बाजारपेठ खुली झाली. यातला एक मोठा वर्ग होता सौंदर्य प्रसाधन कंपन्यांचा. तोपर्यंत आपल्याला चेहऱ्याची रंगरंगोटी करायला दोनच उत्पादनं होती– खाकी फेस पावडर किंवा पाँड्स. त्यातल्या त्यात सधन मंडळी लॅक्मे वापरायची. पण १९९१ नंतर सगळं चित्रच बदललं. ९१ सालच्या या धोरणांचे परिणाम दोन वर्षांत दिसायला लागले. दोन गोष्टी झाल्या त्यामुळे. एक म्हणजे अर्थातच अनेक परदेशी सौंदर्य प्रसाधनं भारतात आली. आणि दुसरं म्हणजे, आपल्या मुली आंतरराष्ट्रीय सौंदर्यस्पर्धांत पहिल्या नंबरानं विजयी ठरू लागल्या. इतक्या मोठ्या प्रमाणावर आपल्या तरुणींनी मिस वर्ल्ड, मिस युनिव्हर्स होणं आणि आर्थिक उदारीकरण यांचा थेट संबंध आहे, हे अनेकांना जाणवलंही नसेल. अर्थांधळेपणा तो हाच. यातला महत्त्वाचा भाग हा की मुळात मनमोहनसिंग पंतप्रधान झाले तेच मुळी आर्थिक कारणांमुळे.

पंतप्रधान नरसिंह राव यांच्या मंत्रिमंडळात मनमोहन सिंग अर्थमंत्री झाले. त्या आधी देशात सत्तेवर येऊन गेलेले विश्वनाथ प्रताप सिंग, देवगौडा, इंदरकुमार गुजराल यांच्या काळात जी आर्थिक बेदिली माजली होती ती निस्तरण्यासाठी आपल्याला आंतरराष्ट्रीय नाणेनिधी आणि जागतिक बँकेचे दरवाजे ठोठावावे लागले. संपूर्ण दिवाळखोरी टाळण्यासाठी आपल्याला सोनं गहाण ठेवावं लागलं. पण तरी केवळ त्याच्या बदल्यात आपल्याला हवी ती मदत मिळाली नाही. ती मदत देण्याआधी नाणेनिधीनं आपल्यावर एक महत्त्वाची अट उघडपणे घातली. ती म्हणजे आपण आपली अर्थव्यवस्था मोकळी करायची. तिच्यावरची नियंत्रणं हटवायची. म्हणजेच परदेशी कंपन्यांना आपल्या बाजारपेठेत मुक्त प्रवेश द्यायचा. याच्याच मागे, पावलाचा आवाजही न करता घातली गेलेली आणखी एक अट होती. तिचा जाहीर उच्चार अर्थातच झाला नाही. मनमोहन सिंग यांचा सरकारातला प्रवेश हा या दुसऱ्या अटीचा भाग होता. या दोन्ही अटी मान्य केल्यावर नाणेनिधीनं आपल्याला जवळपास २२६ कोटी डॉलरचं रचनात्मक कर्ज (स्ट्रक्चरल लोन) मंजूर केलं. त्याला रचनात्मक अशासाठी म्हणायचं, कारण त्याच्या आधारे

आपल्या तोपर्यंत प्रचलित अशा व्यापारउदिमाच्या प्रणाली होत्या; त्यांची रचना या कर्जाच्या मदतीनं बदलायची. ती अधिक बाजाराभिमुख करायची. ती कशी करायची याचा मार्गही नाणेनिधीनं आखून दिला होता. कर्जाच्या बरोबरीनं त्यांनी स्ट्रॅटेजी फॉर ट्रेड रिफॉर्म आपल्या गळी उतरवली. जिच्या आधारे आपलं नवं आर्थिक धोरण जन्माला आलं. याचंच जनकत्व मनमोहनसिंग यांच्याकडे जातं. म्हणजे मनमोहनसिंग आणि त्यांची धोरणं या एकाच नाण्याच्या एकच बाजू आहेत, हे सर्वसामान्यांना लक्षातही आलं नाही.

प्रत्यक्ष जमिनीवर त्याचे दोन वेगवेगळे परिणाम झाले. पहिला अर्थातच शहरांत दिसू लागला. भारतीय शहरांमधल्या बाजारपेठा परदेशी मालानं फुलून जाऊ लागल्या तो हाच काळ. माहिती-तंत्रज्ञान क्षेत्रात भारतीयांची भरभराट घडण्याचाही हाच काळ. मुक्तअर्थव्यवस्थेच्या झाडाला पहिला बहर यायचाही हाच काळ. वित्तीय सेवा क्षेत्रातल्यांच्या वेतनादी सोयीसुविधाही याच काळात वाढत गेल्या. माहिती तंत्रज्ञान, वित्तीय सेवासुविधा क्षेत्र अशांचा मिळून एक नवमध्यमवर्ग भारतीय शहरांत जन्माला आला. या वर्गाच्या हातात इतरांच्या तुलनेत खूपच पैसे खुळखुळत होते. जागतिकीकरणानं आपल्या बाजारपेठेत येणारी नवनवी उत्पादनं आणि हा नवश्रीमंत वर्ग असा समसमा संयोग झाल्यानं अनेकांच्या कानात या काळात चांगलंच वारं शिरलं. या नवश्रीमंतांचं कल्याण म्हणजेच भारताची भरभराट असं सुलभ समीकरण मांडलं गेलं. मनोरंजनाची साधनं, प्रसारमाध्यमं या नवश्रीमंतांच्या जीवनशैलीभोवतीच जाणीवपूर्वक घोटाळत राहिली. कारण जाहिरातींना प्रतिसाद देणारी क्रयशक्ती याच वर्गाकडे होती. आणि आहेही. यामुळे प्रसारमाध्यमांनी दुसऱ्या जगाकडे पाठ फिरवली.

हे दुसरं जग गरिबांचं. ते जग जणू अस्तित्वातच नाही, अशा प्रकारे प्रसारमाध्यमं वागली. अशक्त विचारशक्ती आणि त्याहूनही अशक्त सामाजिक जाणिवा असलेल्या समाजावर वा त्यातल्या एका घटकावर, प्रसारमाध्यमांचा मोठा पगडा असतो. असा वर्ग प्रसारमाध्यमांवर विश्वास ठेवत असतो. अशा परिस्थितीत समाजाच्या आर्थिक स्थितीचं ठरवून एकांगी चित्रण करणाऱ्या प्रसारमाध्यमांमुळे, सामाजिक विषमतेचा खंदक अधिकच रुंदावला. यातूनच नवी सांस्कृतिक मूल्यं तयार झाली. काहीही विकत घेण्याची क्षमता हाच या मूल्यांचा


# असाही महाराष्ट्र

**संदेश भंडारे**

संदेश भंडारे यांच्या छायाचित्रांचं विचारप्रवर्तक पुस्तक. मध्यमवर्गीय कक्षेबाहेरचा एक मोठा समाज त्यातून मूर्त झालेला आहे. सर्वसाधारण शहरी माणसाच्या विचारापलीकडचा महाराष्ट्र इथे साकार झाला आहे...

वसंत आबाजी डहाके यांची प्रस्तावना त्याचे महत्त्व विशद करते.

**मूल्य ३५० रुपये**

**सवलतीत २०० रुपये**

स्थायीभाव असल्यामुळे त्याला प्रतिसाद देण्यासाठी, बाजारपेठीय अर्थकारणानुसार, काहीही विकणाऱ्यांचा वर्गसुद्धा तितक्याच जोमानं तयार झाला. एकदा विकणं आणि विकत घेता येणं हेच महत्त्वाचं झाल्यावर प्रत्येक गोष्टीच्या गळ्यात एक अदृश्य असं किमतीचं लेबल लटकावलं जातं. मग ते वैद्यकीय उपचार असोत वा वैद्यकीय, अभियांत्रिकी, व्यवस्थापनशास्त्र आदी अभ्यासक्रमांचा प्रवेश असो. जे जे उत्तम त्याची उपलब्धता फक्त क्रयशक्तीशीच निगडित ठेवली गेली. समाजातल्या विशिष्ट वर्गाचीच क्रयशक्ती वाढणं, या वाढलेल्या क्रयशक्तीला वाट देण्यासाठी विविध प्रकारची उत्पादनं बाजारात येणं, बाजारपेठेसंदर्भात अधिक माहिती जनतेला मिळणं आणि त्या आधारे उत्पादनांची तुलना करता येऊन आपल्याला हव्या त्या उत्पादनाच्या खरेदीविक्रीचा व्यवहार अधिक सुलभ होणं असे बदल या जागतिकीकरणाच्या रेट्यात होत गेले.

पण या वरवरच्या झगमगाटाला जागतिकीकरणाच्या काळातच वाढत गेलेल्या दारिद्र्याची काळी किनार होती. भारतीय समाजात एक मोठा वर्ग या काळात अधिकच पिचत गेला. सुरुवातीला हा वर्ग जणू अस्तित्वातच नाही, असं आपणा शहरवासीयांचं वर्तन होतं. असं आपण वागलो कारण तेच! अर्थांधळेपणा. (या व्यवस्थेचं व्हॅल्यू जजमेंट.. नीतीमूल्यमापान.. करण्याची ही जागा नाही आणि तसा विचारही नाही. जे घडलं ते कसं घडलं ते आणि तसंच इथे मांडण्याचा प्रयत्न आहे.) आता २०१० सालच्या ऑगस्टच्या तिसऱ्या आठवड्यात रिझर्व्ह बँकेनं कबुली दिली आहे की, *१९९१ सालापासून हाती घेतलेल्या आर्थिक सुधारणांचा फायदा अपेक्षेइतका झालेला नाही.. या सगळ्या धोरणांचा नव्यानं विचार करायला हवा.*

अर्थसाक्षरता वाढू लागत असल्याचं हे लक्षण.

पण हे अज्ञान आपल्या रक्तातच नाही तर जनुकांतच आहे. डोळे उघडे ठेवून युरोपात वगैरे फिरताना हे आपलं अपंगत्व असं डोळेभरून जाणवतं. ज्यांना ते जाणवलंही नाही, त्यांनी एक साधा प्रयोग करून पाहावा. तुम्ही इंग्लंडात गेलात तर तिथे एखाद्याला– उदाहरणार्थ–पत्ता विचारून बघा. त्याला तो माहीत असला तर तो तो पत्ता कसा सांगेल, इथून वायव्येला पाचशे मीटरवर जा. उजवीकडे वळा. दोन लेन्स सोडा. तुम्हाला हवं ते घर तिसऱ्या लेनमधलं पाचवं.

आता या अनुभवाची तुलना आपल्याकडच्या अनुभवाशी करून बघा. मुळात पहिल्यांदा आपल्या पत्ता विचारण्यासाठी केलेल्या 'शुकशुकाटा'कडे एक दोन जण लक्षच देणार नाहीत. दिलं तर काय कटकट आहे..छापानं बघतील. भिकाऱ्याकडे वगैरे बघावं तसं. नंतर कोणी सांगायला आलाच तर तो सांगेल..हे काय, चार पावलांवर तर आहे. तेवढ्यात कुतूहल म्हणून आणखी एखादा थांबला तर तो त्याला खोडून काढेल..काय राव, चार पावलांवर काय..काहीही सांगता का..निदान फर्लांगभर तरी असेल ही जागा..मग त्या दोघांत चार पावलं की फर्लांगभर यावर परिसंवाद झडेल. मग एकमत समजा झालंच त्यांच्यात; तर तुम्हाला सल्ला मिळेल तो असा– एक पानवाला लागेपर्यंत असंच सरळ जा..मग उजवीकडे वळा..तिथून दोनपाच पावलांवर आंब्याचं झाड लागेल..मग डावीकडे वळा आणि तिथे कोणालाही विचारा हा पत्ता. सहज सांगेल.

या मार्गदर्शनानंतर झक मारली आणि पत्ता विचारायला गेलो, असं आपल्याला वाटेलच वाटेल.

नेमकेपणा आपल्या विचारांत बसत नाही. तो विचारांतच नसल्यामुळे आचारांत तरी कुठून येणार. आणि हाच नेमका अर्थ आहे, आपल्याकडची धोतरं, कुडते–पायजमे यांच्यामागचा. धोतरांच्या निर्मितीत होऊन होऊन काय चूक होणार. कुडते–पायजम्यांत झाली तरी त्यांचा आकारच असा असतो, की ती सहज झाकली जाते.

याच्या उलट साहेबांच्या सुटाबुटाचं. सूट शंभर म्हणजे शंभर टक्के बरोबर शिवायला लागतो. जरा जरी चूक झाली तरी ती अगदी उठून दिसते.

तेव्हा साहेब सूट घालतो आणि आपल्याला कुडत्या –पायजम्यात मोकळंढाकळं बरं वाटतं, याचं कारण हे आहे. आता हे वाचून पुढच्या वेळेला घालण्यासाठी कपाटातून कुडता काढाल तेव्हा त्याच्यामागे लपलेलं अर्थांधळेपण टोचलंच, तर वाईट वाटून घेऊ नका.

वुई आर लाइक दॅट ओन्ली...

**गिरीश कुबेर**
६०१ सूर्यविहार, सर्व्हिस रोड,
पाचपाखाडी, ठाणे (प.) ४००६०२.
दूरध्वनीः (०२२)२५३७३३७९.
girish.kuber@timesgroup.com
girishkuber@gmail.com

# एक 'सार्वजनिक' कैफियत

## हेमंत देसाई

काही महिन्यांपूर्वी मंगलोरमध्ये एअर इंडियाचे विमान कोसळून कित्येक प्रवाशांचा मृत्यू झाला. या दुर्घटनेनंतर पुन्हा एकदा एअर इंडियाच्या खाजगीकरण्याबद्दलची चर्चा सुरू झाली. या विमान कंपनीचा तोटा शेकडो कोटी रुपयांच्या घरात असताना तिला सरकारने सबसिडी देत का जगवावे, असा सवाल उठवला गेला. सवाल उठवण्याचे तात्कालिक कारण म्हणजे सामान्य प्रवाशांना मदत करण्यास अग्रक्रम देण्याऐवजी विमान कर्मचारी संपावर गेले. संपामुळे कर्मचाऱ्यांबद्दल सहानुभूती निर्माण न होता चीड उत्पन्न झाली. बाबरी मशीद पाडण्यात आल्यानंतर काही दिवसांतच इंडियन एअरलाइन्सचे वैमानिक असेच संपावर गेले होते. देशभर दंगे सुरू असताना वैमानिकांना आपल्या लठ्ठ पगारात आणखी वाढ हवी होती. त्यानंतरच नागरी हवाई वाहतूक क्षेत्राचे खाजगीकरण व्हावे, अशी मागणी जोर धरू लागली. आताही एअर इंडियाचे (ज्यात यापूर्वीच इंडियन एअरलाइन्स विलीन झाली आहे.) खाजगीकरण केले जावे, असा सूर छेडला जात आहे.

उत्पादनाव्यतिरिक्तची जी क्षेत्रे आहेत, त्यात खाजगी कंपन्यांना प्रवेश द्यावा, पण त्याचवेळी सरकारी कंपन्या मात्र बंद करू नये, असे सामान्यत: प्रतिपादन केले जाते. १९९०च्या दशकात असेच घडत आले. त्यामुळे उदाहरणार्थ, हवाई क्षेत्रात जेट, सहारा, किंगफिशर वगैरे कंपन्या आल्या. पण सरकारी हवाई कंपन्या शाबूत राहिल्या व त्यामधील कर्मचाऱ्यांच्या नोकऱ्याही. परंतु उदारीकरणास दोन दशके लोटल्यावर आता हे लक्षात येऊ लागले आहे, की खाजगी कंपन्यांच्या स्पर्धेत सरकारी कंपन्या टिकू शकत नाहीत. एअर इंडिया/इंडियन एअरलाइन्सचे प्रवासी दिवसेंदिवस घटत चालले आहेत. ताज, ओबेरॉय, आयटीसी वगैरेंच्या तुलनेत आयटीडीसीची हॉटेल्स व दुकाने फालतू वाटतात. दूरदर्शन हे खासगी चॅनेल्सच्या तुलनेत बाळबोध वा प्रौढ साक्षरांसाठीचे माध्यम वाटते. गावोगावच्या वार्ताहरांना दूरदर्शनच्या बातम्यांकरता व्हिडिओ क्लिप्स पाठवायच्या असतील, तर अगोदर परवानगी घ्यावी लागते. ती प्रक्रिया वेळखाऊ असते. एखादी दुर्घटना झाली, की 'थांबा हं, ॲक्शन रिप्ले करा, मी जरा परवानगी घेऊन येतो', असे म्हणता येत नाही.

टपाल खात्याची 'स्पीड पोस्ट' ही सेवा आहे. त्याद्वारे पाठवलेली पार्सले वेळेवर पोचत नाहीत वा कधी कधी जन्मात केव्हाही पोचत नाहीत. कसला स्पीड अन् कसले काय!

खासगी कुरिअरवाला केव्हाही घरी येऊन पार्सल घेऊन जातो व वेळेवर पोचवतो. रात्री आठ-आठपर्यंत या सेवा चालू असतात. पोस्टाचे तसे नाही. मुंबईत पोस्टमास्तर जनरल पदावरील अधिकारीच लाच घेताना पकडला गेला. पोस्टाच्या बड्या अधिकाऱ्यांचे कुरिअर कंपन्यांशी संबंध आहेत वा त्यांच्या स्वत:च्या कंपन्या आहेत. पोस्टात नवे कर्मचारी नेमत नाहीत. पोस्टमनना काम खूप करावे लागते, हे खरे; पण किती वर्षे पोस्टाबद्दल सहानुभूती बाळगून टिपे गाळायची? ज्याची सेवा उत्तम, त्याच्याकडेच लोक जाणार.

सार्वजनिक क्षेत्र म्हणजे राष्ट्रीय अभिमानाचे-अस्मितेचे प्रतीक आणि सामाजिक बांधिलकी असा युक्तिवाद सालोसाल केला गेला. परंतु, 'मला माझ्या देशाचा अभिमान वाटतो, कारण आपल्या दूरदर्शनचा वा कोल इंडियाचा दर्जा सर्वोत्कृष्ट आहे', असे कोणी म्हणतो का? दिल्लीत 'अशोका' हॉटेल आहे, ते अर्थातच पंचतारांकित आहे. तेथे सरकारी मेजवान्या झडतात. त्यात सामाजिक बांधिलकी शोधून सापडेल काय? तेल कंपन्यांच्या पॉश गेस्ट हाउसमधून मंत्री व अधिकारी चैन करतात त्यामुळे गोरगरिबांचे भले होते का?

अर्थात, आर्थिकदृष्ट्या किफायतशीर नसलेल्या मार्गांवर एअर इंडिया हवाईसेवा चालवते. त्यातील अनेक गावे व शहरे राजकीय नेत्यांनी शिफारस केलेली असतात. एअर इंडियाची जगभर कार्यालये आहेत. गलेलठ्ठ पगारावर हजारो कर्मचारी नेमलेले आहेत. शेकडो विमानांचा ताफा बाळगलेला आहे. अशी कंपनी तोट्यातच जाणार. अर्थात ईशान्य भारतासाठी तिने हवाईसेवा चालवलेली आहे व ते आवश्यक आहे. परंतु त्यासाठी एखादी स्वतंत्र छोटी कंपनी स्थापणे आर्थिकदृष्ट्या योग्य ठरेल. दूरदर्शन सरकारी प्रचारासाठी महत्त्वाचे आहे. परंतु तोही धड केला जात नाही. पण त्यासाठी हा पांढरा हत्ती पोसायला लागत आहे. हा प्रचारही नीट केला जात नाही.

ज्यांना कुठेही नोकरी मिळू शकणार नाही अशा हजारो कर्मचाऱ्यांचा प्रतिपाळ करण्यासाठी सरकारी उपक्रम चालवले जाऊ नयेत. अनेकांचे पगार लायकीपेक्षा जास्त आहेत. काहींचे लायकीपेक्षा कमी. सरकार म्हणजे नोकरीतील सुरक्षितता, सरकारी नोकरी म्हणजे पाचवा-सहावा वेतन आयोग. ठरावीक काम.

सरकारी बाबू लोकांना धंद्यातले काही कळत नाही. पण ते मॅनेजरकी करतात. पर्यटनमंत्री आयटीडीसीच्या व बँक विभागाचा अधिकारी राष्ट्रीयीकृत बँकांच्या कारभारात नाक खुपसतो. खरे तर, नेते व अधिकारी सार्वजनिक क्षेत्रावर सार्वजनिकरीत्या बलात्कारच करत आहेत. मुंबईत आरे डेअरीच्या आणि पोर्ट ट्रस्टच्या जमिनींवर राजकारण्यांचा डोळा आहे. राजकारण्यांना फुकट हवाई प्रवास करायचा असतो. आपल्या सग्यासोयऱ्यांना हा प्रवास घडवून आणायचा असतो. (नागरी हवाई वाहतूकमंत्री प्रफुल्ल पटेल यांनी अनेक पत्रकारांना फुकटात परदेशवारी घडवली, त्याचा त्यांना फायदा झाला. ते अत्यंत कार्यक्षम मंत्री असल्याचा गवगवा केला जाऊ लागला.) नेत्यांना 'आपली' हॉटेल्स व गेस्ट हाउसेस आपल्या कक्षेत असावीत, असे वाटते. दूरदर्शनने आपल्या सभा कव्हर कराव्या, अशी त्यांची इच्छा असते. त्यांच्या दृष्टीने सार्वजनिक क्षेत्राच्या सामाजिक बांधिलकीचा तेवढाच अर्थ असतो. स्वअधिकारात खेळायला खेळणी हवीत, सत्ता गाजवण्याची ठिकाणे हवीत, म्हणून सरकारी क्षेत्राचा ते गौरव करत असतात.

भारतीय घटनेच्या प्रीएम्बलमध्ये ज्या समाजवादाचा प्राणभूत तत्त्व म्हणून उल्लेख आहे, त्या तत्त्वाशी आपली बांधिलकी आहे, असे प्रत्येक राजकीय पक्षास म्हणावेच लागते. अन्यथा निवडणूक आयोगाकडून मान्यता मिळत नाही. या अटीस आव्हान देणारी जनहित याचिका मध्यंतरी सर्वोच्च न्यायालयाने फेटाळून लावली. यासंबंधी युक्तिवाद करताना नामवंत कायदेतज्ज्ञ फली नरीमन यांनी सांगितले, की गेली दोन दशके भारत उदारीकरणाच्या रस्त्यावरून मार्गक्रमण करत असताना, राजकीय पक्षांना समाजवादाशी आपली बांधिलकी असल्याचे जाहीर करायला लावणे हे विसंगत आहे. वास्तविक, नरीमन यांच्या मुद्यात तथ्य आहे परंतु या अटीला एकाही राजकीय पक्षाने आजवर आव्हान दिलेले नाही, त्यामुळे न्यायालयाने अर्ज फेटाळला.

समाजवादाशी बांधिलकी नाकारली, तर जनतेची प्रतिक्रिया काय होईल ही राजकीय पक्षांची भीती. म्हणून ते या अटीस आव्हानच देण्याचे टाळतात. प्रत्यक्षात ते भांडवलशाहीवादी धोरणे राबवत असतात. ही शुद्ध ढोंगबाजी आहे. शिवाय, गोरगरिबांचा उद्धार करण्याचा समाजवाद हाच एकमेव मार्ग आहे, असे नव्हे. ज्यांना समाजवादी विचारसरणी मान्य नाही, त्यांनाही सत्तेवर बसण्याचा अधिकार असला पाहिजे. व्यक्तिशः मी डाव्या विचारांचा असलो, तरी डाव्यांना

विरोध करणाऱ्यांनाही आपापली विचारसरणी रेटून राज्य करण्याचा अधिकार आहे, असे एक लोकशाहीवादी म्हणून माझेही प्रामाणिक मत आहे. असो.


स्वातंत्र्योत्तर काळात, १९४८ साली भारत सरकारचे पहिले औद्योगिक धोरण जाहीर झाले. उद्योगमंत्री डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी यांनी ते मांडले होते. त्या काळात देशातील सर्व उद्योगधंद्यांचे ताबडतोब राष्ट्रीयीकरण करण्यात यावे, अशी मागणी केली जात होती. त्या उलट, सरकारी हस्तक्षेप वा नियंत्रणे काढून टाकून भांडवलाचे पूर्ण स्वातंत्र्य द्यावे असे कारखानदार सुचवत होते. या दोन्हींचा सुवर्णमध्य साधणारी भूमिका सरकारने स्वीकारली, हेच ते मिश्र अर्थव्यवस्थेचे धोरण. उद्योगधंद्यांची विभागणी स्थूलमानाने चार विभागांत करण्यात आली.

१) शस्त्रास्त्रे, दारूगोळा यांचे उत्पादन आणि संरक्षणाशी संबंध असलेले व्यवसाय, अणुशक्ती, रेल्वे यांचा समावेश होता व त्यात सरकारचा एकाधिकार असणार होता.

२) कोळसा, लोखंड, पोलाद, विमाननिर्मिती, बोटी बांधणे, टेलिफोन, खनिज तेल, बिनतारी संदेशसाधने या मूलभूत क्षेत्रांत नवे कारखाने काढण्याची जबाबदारी सरकारने घेतली व गरज भासल्यास खासगी भांडवलाचे सहकार्य घेण्याचे ठरवले. जुन्या कारखान्यांचे राष्ट्रीयीकरण १० वर्षांपर्यंत केले जाणार नाही. त्यानंतर परिस्थिती पाहून त्याबद्दलचा निर्णय घेतला जाईल. जुने कारखाने सरकारने ताब्यात घेतले, तर खासगी भांडवलदारांना योग्य ती नुकसानभरपाई दिली जाईल. असे उद्योग राष्ट्रीयीकरणानंतर सरकारी महामंडळामार्फत चालवण्याचे धोरण ठरवण्यात आले.

३) मीठ, मोटारी, ट्रॅक्टर्स, यांत्रिक हत्यारे, अवजड यंत्रसामग्री, रसायने, खते, औषधे, रबरी वस्तू, सुती व लोकरी कापड, सिमेंट, साखर, कागद, हवाई व सागरी वाहतूक, खनिज पदार्थ, संरक्षणाशी संबंधित असलेले व्यवसाय या विभागांतील धंदे खासगी मालकीचे राहणार असले, तरी त्यावर केंद्र सरकारचे नियंत्रण असेल. त्याबाबतचे धोरण, ज्या राज्यात ते उद्योगधंदे असतील, त्या राज्याच्या सरकारशी विचारविनिमय करून ठरवले जाईल, असे म्हटलेले होते.

४) पहिल्या तीन विभागांत समाविष्ट न केलेले उद्योग हे सर्वांना खुले राहतील आणि खासगी व्यक्ती व सरकारी संस्थांना ते चालवता येतील. मात्र या धंद्यांची प्रगती होत



नाही असे दिसून आल्यास, सरकार हस्तक्षेप करण्यास मागेपुढे पाहणार नाही, असे ठासून सांगण्यात आले.

एकूण, सरकारने देशाची औद्योगिक प्रगती साधण्याची प्राथमिक जबाबदारी स्वत:कडे घेतली. खाजगी उद्योगधंद्यांनी समाधानकारक प्रगती घडवून आणली नाही, तर अशा धंद्यात नाक खुपसून नियंत्रणे आणण्याचे तसेच गरज पडल्यास ते ताब्यात घेण्याचे सरकारने 'आश्वासन' दिले. विशिष्ट उद्योग स्थापन करून त्यांचा विकास घडवून आणण्याचे आणि खाजगी उद्योगांना मदत-मार्गदर्शन करण्याचे काम सरकारने आपल्याकडे घेतले.

दहा वर्षांनी खाजगी उद्योगांचे राष्ट्रीयीकरण करण्याची धमकी दिली गेल्याने उद्योगपती खवळले. नवीन कारखाने काढणे, जादा भांडवल गुंतवणे, नवे उद्योग स्थापणे, नवीन यंत्रसामग्री बसवून उत्पादन वाढवणे याबाबतीत कोणतीही हालचाल करायची नाही, असे त्यांनी ठरवून टाकले. उलट, या धोरणामुळे विकासाला पायबंद बसला.

त्यानंतर केंद्र सरकारने १९५६ साली नवे औद्योगिक धोरण सादर केले. त्यात उद्योगधंद्यांची विभागणी तीन विभागांत करण्यात आलेली होती. शस्त्रास्त्रे, दारूगोळा, अणुशक्ती, लोखंड, पोलाद, कोळसा, खनिज तेल, विमाननिर्मिती, हवाई वाहतूक, जहाजबांधणी, रेल्वे, टेलिफोन, वीज उत्पादन व वाटप यांचा समावेश शेड्युल 'ए'मध्ये होता. या संरक्षण व मूलभूत उद्योगधंद्यांच्या विकासाची जिम्मेदारी सरकारवर टाकण्यात आली होती. पण या क्षेत्रांत जे खाजगी उद्योग स्थापन झाले होते त्यांचे सरकारीकरण करू असे धमकावण्यात आले नव्हते.

१९५६च्या धोरणानुसार, शेड्युल 'बी'मध्ये १२ उद्योगांचा अंतर्भाव होता- ॲल्युमिनियम, यांत्रिक हत्यारे, खते, कृत्रिम रबर, रस्ते, जलवाहतूक वगैरे. या क्षेत्रांत सरकार नवे कारखाने/प्रकल्प स्थापील व या क्षेत्रांतील कारखाने हळूहळू ताब्यात घेईल, पण खासगी भांडवलदारांना नवे कारखाने सरकारच्या मदतीने वा स्वजबाबदारीवर काढता येतील असे स्पष्ट करण्यात आले होते. शेड्युल 'बी'मधील उद्योगांचा विकास घडवून आणणे महत्त्वाचे होते. जर खासगी भांडवलाला नफ्याअभावी त्यांचा विकास घडवून आणणे जरूर वाटले नाही, तर सरकारने ही जबाबदारी घ्यावी, असे त्यात म्हटले होते.

उरलेले उद्योग शेड्युल तीनमध्ये होते व ते खाजगी क्षेत्रास सर्वस्वी मोकळे ठेवलेले होते. केवळ उद्योगपतींवर अवलंबून राहण्यापोक्षा सरकारने मोठ्या प्रमाणावर कारखाने उभारायला पाहिजेत, असे प्रतिपादण्यात आले होते. सरकारी क्षेत्राचा विस्तार करण्यात येणार होता, पण १९४८ ते ५५ या सात वर्षांत सरकारने जे उद्योग ताब्यात घेतले, तेही धड चालवले नाहीत. जागतिक बँकेचे तत्कालीन अध्यक्ष युजेन ब्लॅक यांनी म्हटले होते, की सार्वजनिक क्षेत्रविस्तारामुळे सरकारी यंत्रणेवर जास्त भार पडेल व देशाची औद्योगिक प्रगती घडवून आणण्यात अडचणी येतील. सरकारला कोणत्याही क्षेत्रात कारखाने काढण्याची मोकळीक दिल्यामुळे उद्योगपतींना नवीन कारखाने स्थापण्याबाबत उत्साह राहणार नाही.

आर्थिक सत्तेचे केंद्रीकरण होऊ नये याकरता सरकारी क्षेत्र व सरकारी सत्ता यांत वाढ करण्यात आली आहे, असा युक्तिवाद केला गेला, परंतु करनीती, आर्थिक धोरण याद्वारे विषमता कमी करता आली असती. सरकारी क्षेत्र वाढवून उपयोग काय झाला?

भारतात स्वातंत्र्यपूर्वकाळातही रेल्वे, पोस्ट, तारखाते, आकाशवाणी, शस्त्रास्त्रे कारखाने सरकारी मालकीचेच होते. परंतु तरी त्यामागे सार्वजनिक क्षेत्राची वाढ करण्याचे उद्दिष्ट नव्हते. सरकारने खासगी क्षेत्रात हस्तक्षेप न करण्याचेच धोरण मुख्यत: स्वीकारलेले होते.

स्वतंत्र भारताने पं. नेहरूप्रणीत सरकारी उद्योगांवर भर देण्याचे धोरण स्वीकारले. जी क्षेत्रे राष्ट्रविकासासाठी जरुरीची आहेत, पण ज्यात मोठी गुंतवणूक लागते व फायदा मिळण्यास बराच अवधी लागतो, त्याचे प्रमाणही कमी असते, अशा क्षेत्रांत उद्योगपती पडणार नाहीत, अशा वेळी त्यांची जबाबदारी सरकारलाच घ्यावी लागणार हा तो दृष्टिकोन. तो अत्यंत आदर्श होता, पंजाबमधील भाक्रा-नानगल धरणाचे उद्घाटन करताना 'टेंपल्स ऑफ मॉडर्न इंडिया' हे शब्द पंडितजींनी प्रथम वापरले. सरकारनेच हे भव्य धरण बांधले होते व ही धरणे, कालवे आणि सरकारी कारखाने म्हणजे आधुनिक भारताची तीर्थक्षेत्रे होत, असे त्यांचे मत होते. तेव्हा अरुंधती रॉय असत्या, तर त्यांनी पं. नेहरूंनी भाक्रा-नानगल बांधलेच कशाला म्हणून हल्लाबोल केला असता. महात्मा गांधींना धरणे व कारखाने नको होते. त्यांना ओढ होती खेड्यांची व ग्रामविकासाची, स्वयंपूर्णतेची. परंतु पं. नेहरू पंतप्रधान होते. देशामध्ये सार्वजनिक क्षेत्राची उभारणी आणि

विस्तार करण्याचे त्यांचे धोरण काँग्रेसने स्वीकारले.

ते समाजवादाचे, स्टॅलिनशाहीचे आणि केन्सवादी वर्चस्वाचे दिवस होते. त्यामुळे थोडा केन्स, थोडा स्टॅलिन यांच्याकडून कल्पना घेत पहिली पंचवार्षिक योजना जाहीर झाली. १९५६च्या औद्योगिक धोरणात 'Commanding heights of the Indian economy would be occupied by the public sector, while the private sector could play the seem & fiddle' असे स्पष्टपणे म्हटले गेले होते. परतंत्र भारतात जे.आर.डी.टाटा यांनी भारताच्या विकासाबद्दलच्या धोरणाची मांडणी केली होती, ज्यात अर्थव्यवस्थेतील सरकारी हस्तक्षेपाचे समर्थन करण्यात आले होते. त्यावेळी त्यांना कुठे ठाऊक होते, की त्यांच्या एअर इंडियाचे राष्ट्रीयीकरण करण्यात येणार आहे म्हणून...

सुरुवातीला जेआरडींनी टाटा सन्सचाच एक विभाग बनवून टाटा एअरलाइन्सची स्थापना केली. १९४६ मध्ये तिचे जॉइंट स्टॉक कंपनीत रूपांतर करण्यात आले व एअर इंडिया लिमिटेड नामकरण केले गेले. पुढच्याच वर्षी युरोपशी विमानवाहतूक सुरू करण्यासंबंधीची एक योजना टाटांनी भारत सरकारकडे धाडली. या नव्या प्रकल्पात सरकारचे ४९% व टाटांचे किमान २०% भागभांडवल असावे असे जेआरडींनी सुचवले होते. पब्लिक-प्रायव्हेट भागीदारीची देशातील ही पहिलीच कंपनी. तिला केंद्र सरकारने दहा दिवसांत मंजुरी दिली. सरकारचे काम इतक्या तडकाफडकी झाल्यामुळे ते चाट पडले होते. अनेक वर्षांनी जेआरडींची, ज्येष्ठ मंत्री बाबू जगजीवनराम यांच्याशी भेट झाली. तेव्हा त्यांनी गमतीने विचारले, 'आज सरकारला कोणताही निर्णय घेण्याचा निर्णय घ्यायला सुद्धा किमान दोन वर्षे लागतात. तर मग त्या काळात सरकारने इतका गतिमान निर्णय घेतला कसा?' यावर बाबू उत्तरले, 'त्या दिवसांत यापेक्षा अधिक शहाणपण आम्हाला आले नव्हते म्हणून!'

यथावकाश जेआरडींच्या शिफारशीनुसार एअर इंडिया व इंडियन एअर लाइन्स अशा दोन कंपन्या झाल्या. विमान वाहतूक उद्योगाचे राष्ट्रीयीकरण झाले. जेआरडी जेव्हा या कंपन्यांचे नेतृत्व करत होते, तेव्हा त्या उत्तम चालल्या होत्या. सरकारच्या आग्रहास्तव पंचवीस वर्षे त्यांनी एअर इंडियाचे अध्यक्षपद व इंडियन एअर लाइन्सचे संचालकपद भूषवले. त्यावेळी दोन्ही कंपन्या नफ्यात होत्या. कार्यक्षमतेने चालल्या होत्या. वीस-वीस वर्षे जुनी असलेली विमानेही छान दिसत, कारण त्यांची नीट देखभाल होत असे. या कंपन्या उत्तम चालल्या आहेत, तर इतर सरकारी उपक्रम फायद्यात का नाहीत, असा प्रश्न त्यांना पडे. आज त्या दोन कंपन्यांची एकच कंपनी झाली असून या एअर इंडियाची पुरती वाट लागली आहे. सरकारची मदत नसती, तर ती डब्यात गेली असती. मुजोर वैमानिक, उन्मत्त कर्मचारी व बेपर्वा अधिकारी यामुळे प्रवासी एअर इंडियास लाखोली वाहत असतात. खाजगी विमान कंपन्यांच्या स्पर्धेत एअर इंडिया टिकू शकत नाही.

टाटा स्टील ही भारतातील अवजड उद्योगांना मातृस्थानी असलेली कंपनी. तिच्या स्वत:च्या लोखंड व कोळसा खाणी असून, तेथे हजारो लोक वर्षानुवर्षे काम करत आहेत. १९७१ मध्ये कोळसा खाणींचे राष्ट्रीयीकरण झाले. पण तत्कालीन कोळसा व पालकमंत्री मोहन कुमारमंगलम यांनी टाटा स्टीलच्या खाणींना हात न लावण्याचा निर्णय घेतला. राष्ट्रीयीकरण करण्यात आलेल्या खाणींनी टाटांच्या खाणींचे उदाहरण समोर ठेवून तशीच कार्यक्षमता प्राप्त करून घ्यावी, हा त्यांचा या निर्णयामागील उद्देश होता.

विविध क्षेत्रांत सरकारी कंपन्यांचा एकाधिकार निर्माण झाला होता. पण १९७०पर्यंत त्यावर फारशी टीका झाली नाही. एखाद्या क्षेत्रात सरकारची मक्तेदारी कशाला असा सवाल क्वचितच कोणी उपस्थित करेल. परंतु ७०च्या दशकात सरकारी कंपन्यांची अकार्यक्षमता उघड झाली. बाजारात विविध मालाची टंचाई निर्माण होऊ लागली. राजीव गांधी सत्तेत आल्यावर आधुनिक भारताच्या उभारणीवर भर देत होते तेव्हा तर सार्वजनिक क्षेत्राची पुरती अधोगती झालेली होती. डॉ. मनमोहन सिंग अर्थमंत्री झाले, तेव्हा उदारीकरणाचे मंत्रपठण सुरू झाले. मग काँग्रेसने एकदम सरकारी क्षेत्र म्हणजे पांढरा हत्ती बनला आहे, असे कथन करण्यास सुरुवात केली. पं. नेहरूंनी सरकारी क्षेत्रावर अतिरिक्त भर दिला, असा उत्तर आधुनिक दृष्टिकोन मांडला जाऊ लागला. सरकारी क्षेत्र नकोच असे नव्हे, पण त्याचा अतिविस्तार केल्यामुळे विकासदर कमी होता (Hindu rate of groth), त्यामुळे दारिद्र्यनिर्मूलनाची गतीही अल्प राहिली. मग जपान, दक्षिण कोरिया व चीन भारताच्या पुढे कधीच निघून गेले...

हिरोशिमा-नागासकी बेचिराख होऊनही, दुसऱ्या महायुद्धानंतर जपानने गगनभरारी घेतली. १९९० पर्यंत जपान हा एक चमत्कार असल्याचे मानले जात होते. गेल्या दोन दशकांत त्याच्या विकासाची गती मंदावली असली, तरीही

आजसुद्धा जपानची अर्थव्यवस्था जगात दुसऱ्या क्रमांकावर आहे. जपानने मिनिस्ट्री ऑफ इंटरनॅशनल ट्रेड अँड इंडस्ट्री (MITI) स्थापन केली. जपानमधील उद्योगसमूहांनी जगभर नाव कमवावे यासाठी मदत करण्याचे काम हे खाते करत आले आहे. म्हणजे तेथे सरकारने सोनी, टोयाटो, मित्सुबिशी, पॅनासॉनिकसारख्या कंपन्यांना स्वस्त व्याजावर भांडवल दिले, आयात संरक्षण व निर्यात अनुदान बहाल केले, तसेच जागतिक बाजारपेठांची माहितीही पुरवली.

१९६० च्या दशकात दक्षिण कोरियातील सरकारने एलजी, सॅमसंग, पोस्को, दावूला सर्व प्रकारचे साहाय्य दिल्यामुळे त्या ग्लोबल जाएंट कंपन्या म्हणून मान्यताप्राप्त झाल्या. चीनने नियोजनाद्वारे औद्योगिकीकरण साधले व निर्यातीस गती दिली.

सनातनी फ्री मार्केटवाल्यांना सरकारबद्दल घृणा असते. सरकारला कसलेही श्रेय देण्यात त्यांना कमीपणा वाटतो. जपान, दक्षिण कोरिया वगैरेंनी प्रगती केली, त्यात सरकारचाही वाटा आहे, हे ते मान्यच करत नाहीत. चीनसह या देशांनी प्राथमिक आरोग्य व शिक्षणात प्रचंड गुंतवणूक करून विकासाची पूर्वपीठिका तयार केली. भारताने हे न करता सार्वजनिक क्षेत्रात प्रथम गुंतवणूक करून नंतर फक्त उधळपट्टी केली.

नेहरूंची ही विकासमंदिरे, भग्न मंदिरे झाली ती राजकारणी व प्रशासकांनी ती आपली खाजगी मालमत्ता मानल्यामुळे! इथे पुन्हा मला जेआरडींनी चाळीस वर्षांपूर्वी 'स्वायतत्ता आणि नियंत्रणाची चौकट' याविषयी आकाशवाणीवरून केलेले भाषण आठवते. ते म्हणाले होते, ''स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारतात मोठ्या संख्येने सार्वजनिक उद्योगांची उभारणी होणे कदाचित स्वाभाविक होते. साहजिकच, त्यांच्याशी संबंधित असणाऱ्या मंत्रालयांनी – त्यांना कसलाही पूर्वानुभव नसतानाही आपल्या या नवनिर्माणावर कडक नियंत्रण ठेवण्याच्या दिशेने पावले टाकायला सुरुवात केली. परिणामी, स्वायत्तता संपली. सार्वजनिक उपक्रमांना आपल्या सेवकांच्या वेतनश्रेणी स्वत:पुरत्या निर्धारित करण्याचे स्वातंत्र्य असावे, अशी मूळ कल्पना असूनही प्रत्यक्षात त्यावर सरकारचे नियंत्रण राहिले. त्यामुळे त्याच्या सीईओज्ना मिळणारे वेतन, खाजगी कंपन्यांच्या १०–२० टक्केच राहिले. सरकारी सेवेतील नोकरांना मिळणारे वेतन या उद्योगसमूहातील नोकरांना देण्याचे बंधन घातल्याने गुणी माणसे तेथे फिरकत नाहीत. ब्रिटन, फ्रान्स, जर्मनी व इटलीतील पीएसयूंना जास्त स्वायत्तता असते. तेथील संचालक मंडळांना सर्व प्रकारच्या कृती करण्याचे– अगदी बाजारातून कर्जउभारणी करण्याचेही–स्वातंत्र्य असते. सामाजिक उद्दिष्टांची कार्यपूर्ती होत आहे की नाही, उद्योग कार्यक्षमतेने चालतो आहे की नाही, एवढेच सरकारने बघितले पाहिजे. बाकी स्वायत्तता वाढवून दिली पाहिजे. सरकार वा संसद यांनी आपल्या प्रत्येक 'पीएसयू'साठी निर्धारित करायची उद्दिष्टे आणि अपेक्षित कार्यपूर्तीबरोबरच त्यांच्या फलनिष्पत्तीचे मूल्यमापन करण्याच्या दृष्टीने सुस्पष्ट निवेदन करावे व मार्गदर्शक तत्त्वे ठरवून द्यावीत. त्यानंतर विशिष्ट चौकटीत राहून कार्यरत होण्याचे स्वातंत्र्य द्यावे. त्याच्यावर बंधन असावे ते फक्त ताळेबंदाबरहुकूम शिस्तपालन करण्याचे, राष्ट्रीय हितसंबंधाच्या रक्षणातून उद्भवणाऱ्या इतर नियमनांचे. मात्र आज दैनिक कामात होणारा सरकारी हस्तक्षेप व आर्थिक धोरणाच्या अंमलबजावणीत शिरलेले राजकारण यामुळे सार्वजनिक क्षेत्रांचे नुकसान होत आहे. त्याचा फटका टंचाई व महागाईद्वारे सामान्यजनांना बसत आहे.''

इतक्या वर्षांनंतर तेल कंपन्यांवरील निर्बंध हटवले गेले. परंतु क्रूड तेलाचे जागतिक भाव भडकल्यास पुन्हा नियंत्रणे लागू होतील, यात शंका नाही. खाजगीकरणाकडे संशयाने पाहिल्याने व अकार्यक्षम कामगारांना काढून टाकण्याचे स्वातंत्र्य नसल्याने आज रोजगारप्रधान उद्योगात, आपण चीन व व्हिएतनामशी सामना करू शकत नाही. एवढेच काय, तयार कपड्यांच्या निर्यातीत बांगलादेशने भारतास मागे टाकले आहे. खाजगी क्षेत्रात स्पर्धेस वाव नव्हता. आयात स्पर्धा नव्हती, त्यामुळे सरकारी कंपन्याही दुबळ्या राहिल्या, सरकारी भिकेवर दिवस ढकलत राहिल्या.

इंदिरा गांधीपर्वात बोकारोच्या पोलाद कारखान्यास रशियाने मदत दिली पण त्या बदल्यात तेथे वाजवीपेक्षा जास्त रशियन तज्ज्ञ लादण्यात आले. दस्तूरखुद्द कंपनी प्रकल्पाचे डिझाइन करणार होती; पण रशियाच्या विरोधामुळे तिच्याकडून हे काम काढून घेण्यात आले. सरकारी उपक्रम परतंत्र असतात, ते हे असे!

दुसरे उदाहरण स्टील ॲथॉरिटी ऑफ इंडियाचे (SAIL) घेऊ. रुरकेलाचा पोलाद कारखाना त्याचा मुख्य हिस्सा. या कारखान्यांशी संलग्न असलेल्या खाणीत दहा वर्षांपूर्वी कामगारांचे आंदोलन सुरू झाले. तंत्रज्ञान बदलले. मग २००३

साली खाणच बंद करण्यात आली.

उदारीकरणानंतर SAILचे अस्तित्व संकटात आले. तोवर टिस्को व SAILची बाजारपेठेत मक्तेदारी होती. खाजगी पोलाद कंपन्यांनी SAILची दादागिरी संपवली. ती कार्यरत असली, तरी तिची रया गेली आहे. रूरकेलाने ७४% खाजगी भागीदारीत सिमेंट कारखाना काढला आहे. सिमेंटसाठी लागणाऱ्या चुनखडीचा साठा कंपनीकडे आहे. पण हा साठा स्वस्तामध्ये खाजगी कंपनीच्या घशात घातल्याचा आरोप होत आहे.

१९६४-६५ मध्ये पंतप्रधान लालबहादूर शास्त्री, गुजरातमधील आणंद येथील खेडा जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघाने उभारलेल्या पशुखाद्य प्रकल्पाचे उद्घाटन करण्यासाठी गेले होते. शास्त्रींनी या सहकारी मॉडेलची क्षमता जाणली व त्या संघाचे सरव्यवस्थापक डॉ. वर्गीस कुरियन यांना सरकारच्या कक्षेत बोर्ड स्थापण्यास सांगितले. देशभर 'आणंद'चे जाळे विणणे हे त्याचे काम. सरकारने एनडीडीबी हे महामंडळ स्थापले. त्यास निधी दिला व त्यामार्फत तो शेतकऱ्यांपर्यंत पोचवला. एकदा शेतकऱ्यांच्या सहकारी संस्था स्थापन केल्यावर महामंडळाचे अस्तित्व संपून या संस्थांचे नियंत्रण शेतकऱ्यांकडे जाणार होते. परंतु सरकारी महामंडळे-बोर्ड एकदा सुरू झाल्यावर बंद होत नाहीत. त्यामुळे गुजरातव्यतिरिक्त इतर राज्यांमध्ये दूध उत्पादक सहकारी संस्था तेवढ्या वाढल्या नाहीत. त्यांना पूर्ण स्वायत्तता दिलेली नाही, हे त्याचे कारण. शिवाय, सहकारी संस्था वाढल्या त्या लायसन्स राजमध्ये. तेव्हा खाजगी स्पर्धा नसल्याने त्या फोफावल्या. आता बहुराष्ट्रीय कंपन्या, दुग्धजन्य पदार्थांची बाजारपेठ काबीज करत आहेत. दूध सहकारी सोसायट्या तोट्यात जाऊ लागल्या आहेत. सरकारला त्याचे काही पडलेले नाही. पण छोटे शेतकरी चिंतेत आहेत. खाजगी/बहुराष्ट्रीय कंपन्या भागधारकांना उत्तरदायी आहोत. त्यांना शेतकऱ्यांशी काहीच घेणे-देणे नाही.

यापुढे असेच चालणार का? तर नाही. सुदैवाने सहकाराची जुनी कॅसेट वाजवत न बसता एनडीडीबीने नव्या पिढीचे दूध संघ, कंपनी कायद्याखाली स्थापायचे ठरवले आहे. त्यात दूध उत्पादक हे भागधारक असतील. गाव-जिल्हा-राज्य दूध संघ यामधील एक स्तर कमी करून हा धंदा सक्षम केला जाणार आहे. जगात हीच पद्धत आहे.

भारत हेवी इलेक्ट्रिकल्स लि. (भेल) ही देशातील वीजसामग्री बनवणारी अव्वल कंपनी. तिच्या शेअर्सना नेहमी मागणी असते. ती नवरत्न पीएसयूमधील कंपनी आहे. भोपाळमध्ये तिची मोठी टाउनशिप आहे. तिथे चक्कर मारली तर दिसेल, की तिथले रस्ते, घरे, रस्त्यावरील दिवाबत्तीची अवस्था बिकट आहे, पण कंपनीचे त्याकडे लक्ष नाही!!

तिचा व्यवसाय मात्र व्यवस्थित सुरू आहे. न्यूक्लिअर पॉयर कॉर्पोरेशन व अल्स्टॉम या कंपन्यांच्या सहकार्याने ती भोपाळमध्ये अणुइंजिनांचा_कारखाना उभारणार आहे. नवीन नोकरभरती सुरू आहे. कंपनीकडे भरपूर ऑर्डर आहेत. तिच्या कारभारात सरकार फार ढवळाढवळ करत नाही, त्याचा हा परिणाम.

धनबादला भारत कोकिंग कोल लिमिटेड आहे. ती कोल इंडिया लिमिटेडची उपकंपनी होय. देशातील पोलाद कारखान्यांची निम्मी गरज भागवते. पण कोळशात राखेचे प्रमाण खूप. शिवाय, तुफानी भ्रष्टाचार, कोळशाची चोरटी वाहतूकही होते.

एचएमटी ही पिंपरी-चिंचवडची शान होती. आज काय दिसते? हरयाणात पिंजारे येथे एचएमटीच्या कारखान्यात १९९४ पर्यंत ६,००० कामगार होते. आज फक्त ३०० आहेत. नव्या ऑर्डरच नाहीत. एचएमटी जे मशिन ६० लाखांना विकते, ते खाजगी कंपन्या २०-२५ लाख रुपयांत खपवतात. मग यांची उत्पादने घेणार कोण?

१९५२ साली कांडलामध्ये नवीन बंदर उभारले गेले, त्याचा पायाभरणी समारंभ पं. नेहरूंच्या हस्ते झाला. त्याची माल हाताळण्याची क्षमता २००७-०८ मध्ये साडेसहा कोटी टन होती, ती त्यापुढील वर्षात ती ११ टक्केपर्यंत वाढवली. २०१२ पर्यंत ती १०कोटी टनांपर्यंत नेण्याचे लक्ष्य आहे. मध्य पूर्व व युरोपला माल पाठवण्यासाठी ते बंदर सोयीचे पडते.

कांडला बंदराच्या सेवा वाजवी दरात आहेत. परंतु त्या कार्यक्षम नाहीत. तेथे मोठी जहाजे नांगरणे जोखमीचे असते. बंदरात येता-जाताना वाटेत कोणते अडथळे येतील हे सांगता येत नाही, असे निर्यातदार सांगतात. जवळच्या मुंदरा बंदरात माल हाताळणीचे काम वेगाने होते. कांडला बंदर १३.५ मीटर खोल आहे. त्यामुळे विशाल जहाजे तेथे नेता येत नाहीत. बंदराचा परिसर स्वच्छ नाही.

इंडियन ऑइल कॉर्पोरेशनने १९८२ साली उत्तर भारतात आपली सहावी रिफायनरी उभारली. त्या भागातील पेट्रोलियम उत्पादनांची गरज भागवणे हा हेतू. पण गेल्या काही

वर्षांत तिने एवढे प्रदूषण केले, की आग्र्याच्या ताजमहालवर परिणाम होऊ लागला. या बेजबाबदारपणाला काय म्हणायचे!

२००१मध्ये केंद्र सरकारच्या एकूण २३१ उपक्रमांपैकी १०९ तोट्यात, तर १२० नफ्यात होते. नंतर ही संख्या ५८ व १५७ अशी झाली. डिपार्टमेंट ऑफ पब्लिक एंटरप्रायझेसची ताजी आकडेवारी उपलब्ध नाही.

उदारीकरणानंतर १२३ पीएसयूंमधील काही भाग भांडवल विकून २६ हजार कोटी रुपयांचा महसूल सरकारने मिळवला. त्यानंतर यूपीए-१च्या काळात डाव्यांच्या विरोधामुळे निर्गुंतवणूक थांबली. आता ती पुन्हा धीम्या गतीने सुरू आहे. नॉन डिपार्टमेंटल एंटरप्रायजेसचा जीडीपीमधील हिस्सा ११ टक्के होता, तो कायम आहे. याचा अर्थ, सार्वजनिक उपक्रमांची परिस्थिती, फारशी बिघडलेली नाही. मात्र ज्या कंपन्या नफ्यात आहेत, त्यांचे राखीव निधी फुगले असूनही त्याची नीट गुंतवणूक झालेली नाही.

ओएनजीसी, बीएसएनएल, एनटीपीसी या सगळ्यात जास्त नफा कमावणाऱ्या पीएसयू, फर्टिलायझर कॉर्पोरेशन, फूड क्राफ्ट इन्स्टिट्यूट, हिंदुस्थान फर्टिलायझर कॉर्पो., एचईसी व हिंदुस्थान फोटो फिल्म्स या सर्वाधिक तोट्यात असलेल्या होत्या.

सरकारी कंपन्यांचा कारभार सुधारण्यासाठी अर्जुन सेनगुप्ता समिती नेमण्यात आली. तिने केलेल्या शिफारशी विचारात घेऊन सरकारने नवरत्न, मिनीरत्न व फायद्यातील कंपन्यांकरता अधिक आर्थिक स्वातंत्र्य दिले. उपकंपन्या स्थापणे, त्यातील गुंतवणूक काढून घेणे, या उपकंपन्यांना मालमत्ता हस्तांतरित करणे, नवे शेअर्स काढणे वगैरेंबाबत निर्णय घेण्याची मोकळीक देण्यात आली.

सध्या जवळपास ७५ सरकारी उपक्रम आजारी असून त्यांची प्रकरणे बीआयएफआरकडे पडून आहेत. २५-३० कंपन्या गुंडाळण्याची शिफारस केली गेली आहे. ज्या कारखान्यांचे पुनर्वसन करण्यात आले, त्यातले निम्मेच सुधारणा करू शकले आहेत. शिवाय, सरकार त्यांच्या मालाची प्राधान्याने खरेदी करते, त्यांना जादा भाव देते


## सहा महिन्यांत सहा आवृत्ती प्रसिद्ध!



### पंखाविना भरारी!

**शरयू घाडी**

प्रसाद हा अतिविकलांग मुलगा. कोपरापुढे हातांची होणारी मंद हालचाल आणि कुशाग्र बुद्धिमत्तेची देणगी एवढीच त्याच्या शारीरिक जमेची बाजू. असा हा प्रसाद आपल्या इच्छाशक्तीने, कर्तृत्वाने केवळ एकवीस वर्षांच्या उण्यापुऱ्या आयुष्यात एक दंतकथा बनला. शिक्षण, गायन, वक्तृत्व, चित्रकला यातील त्याने केलेली कामगिरी आपल्यातील अपूर्णत्वाची जाणीव करून देते. प्रसाद म्हणजे निसर्गाचा अनाकलनीय आविष्कार. त्याच्या जीवनाची आणि त्याच्या आई-वडिलांच्या समर्पणाची ही कहाणी आहे.

**मूल्य : २०० रुपये** **सवलतीत : १२० रुपये**

म्हणूनही ते तगलेले आहेत.

भारतात, राज्यस्तरावरील ११२९ सरकारी उपक्रम आहेत. त्यातले निम्मे कसले ना कसले उत्पादन करतात. बाकीचे सेवा पुरवतात वा कल्याणकारी कार्य करतात. या उपक्रमांत राज्य शासनांची एकूण अडीच लाख कोटी रुपयांची गुंतवणूक आहे. त्यांचा मिळून संचित तोटा ६० हजार कोटी रुपये आहे.

हा जागतिकीकरणाचा काळ आहे. त्यामुळे जागतिक स्पर्धेचा मुकाबला करण्यासाठी उत्पादन खर्चात बचत, संशोधनावर भर, नवनवीन कंपन्यांचा ताबा घेणे या गोष्टी कराव्या लागतील. त्यासाठी या कंपन्यांना स्वायत्तता द्यावी लागेल. कोणीतरी पतंगराव कदम नाहीतर छगन भुजबळ त्यांचे हात पिरगाळू लागला, तर कसे चालेल? केंद्र सरकारी उपक्रम व सरकार यांनी परस्पर सामंजस्याचा करार करावा अशी एक टूम निघालेली आहे. त्याचा काडीचा उपयोग झालेला नाही. कारण सरकार आपल्या कमिटमेंट पाळत नाही. जे उपक्रम नफ्यात आहेत ते शेअर्स-रोखे अशांमध्ये निधी गुंतवतात, यंत्रसामग्री, कारखाने यांत गुंतवणूक कमी करतात.

महाराष्ट्रात एमआयडीसी आहे. त्यांनी आजवर ५५ हजार भूखंडांचे वितरण केले आहे. पण रिकामे भूखंड पडेल भावात विकून पैसे खाण्याचे प्रमाण मोठे आहे. केंद्रीय दक्षता आयोगाने एमआयडीसीत लक्ष घातले, तर त्याची लक्तरे बाहेर येतील. महाराष्ट्र राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळ, लभ्यांश मिळाला की प्रदूषणाकडे डोळेझाक करते.

देशातील वीजमंडळाचा एकत्रित तोटा दहा हजार कोटी रुपयांवर गेला, तेव्हा सरकारला जाग आली. मग वीजक्षेत्राची पुनर्रचना सुरू झाली. महाराष्ट्राचीच नव्हे, तर बहुतेक राज्यांची महामंडळे गोत्यात आहेत. बँकांचे राष्ट्रीयीकरण झाल्यानंतर त्यांचा पसारा वाढला, पण मग त्या थकबाकीच्या ओझ्याने इतक्या वाकल्या, की नरसिंहम समितीस शस्त्रक्रिया करावी लागली. पूर्वी विमाक्षेत्रात स्पर्धा नसल्याने एलआयसी, न्यू इंडिया इन्शुरन्स वगैरेंमध्ये शैथिल्य आले होते.

सरकारी औषध कंपन्या डबघाईला आल्या आहेत. एस.टी. सारखी राज्यपरिवहन वाहतूक तसेच पर्यटन महामंडळे अडचणीत आहेत.

आपण या सगळ्याचा अर्थ समजावून घेणार की नाही? सार्वजनिक क्षेत्र - म्हणजे सरकारी खाती, विभाग कंपन्या, उपक्रम, महामंडळे. जोवर बाजारात एकाधिकार असतो, तोवर त्यांचे चालते. एकाधिकार संपल्यावर ते टिकाव धरू शकतातच, असे नाही. नवरत्न कंपन्या उत्तम काम करतात, ते तेथे 'वर्क कल्चर' असल्यामुळे; पण सामान्यत: सरकारची मालमत्ता सार्वजनिक असते. म्हणजे तिची लूट करणे, तिचे नुकसान करणे हा आपण आपला अधिकार समजतो.

सार्वजनिक क्षेत्र तीर्थक्षेत्र असल्याने, त्याची वाट लावण्याकडे आपला कल आहे. तरीसुद्धा या तीर्थक्षेत्रांना चिकटून राहिले, की पुरोगामी सोवळे कायम आहे, या जाणिवेने आपण धन्य धन्य होतो.

सगळ्याच सरकारी कंपन्या व त्यातील कर्मचारी वाईट आहेत, असे कोणी म्हणत नाही. देशाचा पाया रचण्यात त्यांची मोलाची कामगिरी होती. ज्या क्षेत्रांत भांडवल आणायला उद्योगपती तयार नव्हते, त्या क्षेत्रांत या कंपन्या आल्या. पण त्यांचा 'रोल' संपला आहे असे मानून योग्य वेळी त्या बंद केल्या गेल्या नाहीत. वशिल्याने नोकरभरती करून त्यांना सालोसाल पोसले गेले.

सोविएत रशियातील राजवटीचा अंत म्हणजे साम्यवादाचा नव्हे, तर स्टॅलिनवादाचा अंत असे आपण मानले. युरोपात व दक्षिण अमेरिकेत समाजवादी पक्ष जिवंत आहे, म्हणून आपण मोहोरून गेलो.

त्यांच्या व आपल्या परिस्थितीत, नेतृत्वात फरक आहे. भारतात राष्ट्रीय निष्ठा, प्रेम हा भाग कमी आहे. एकजुटीची, बांधिलकीची भावना नाही. आपण बडे-बडे प्रकल्प उभारले, पण लोकांच्या, कर्मचाऱ्यांच्या सर्जनशीलतेस वाव दिला नाही. सरकारी क्षेत्रात मूलभूत उद्योग उभारले, पण ग्राहकाला वेगवेगळ्या रुचीचा माल हवा असतो हे पाहिले नाही. नोकरीच्या सुरक्षिततेला महत्त्व दिले, कल्पकतेस, उपक्रमशीलतेस प्रोत्साहन दिले नाही. त्यामुळे विकासमंदिरांचा विकास थांबला. ती भकास, दीनवाणी झाली. आता या बहुतेक मंदिरांकडे कोणी ढुंकूनही पाहत नाही!

**हेमंत देसाई**
सी/३ गुलमोहर, दा.ग. महाजनी पथ,
महापालिका वसाहत,
शिवडी (पश्चिम), मुंबई-४०० ०१५
दूरध्वनी : २४१३५८६४
hemvdesai@rediff.com
hemant.desai001@gmail.com

# ‘भारत आर्थिक महासत्ता होणार!’

## डॉ. नरेंद्र जाधव

मुलाखत – **लतिका भानुशाली**

गेल्या काही वर्षांपासून भारत महासत्ता होणार हा सूर सर्व थरांतून आळवला जात आहे. परंतु देशाची स्थिती ‘ऑल इज वेल’ म्हणावी अशी नक्कीच नाही. दारिद्र्यरेषेखाली राहणाऱ्या लोकांच्या जीवनात उजेडाची पहाट उगवायला अजून किती काळ जाईल हे अनिश्चित आहे. शेतकऱ्यांचे प्रश्न आहेत. शिक्षणक्षेत्रात अपेक्षित बदल घडून येण्यास काही कालावधी लागणार आहे. वीज तुटवडा प्रचंड प्रमाणात जाणवत आहे. शहरी विकास व ग्रामीण विकास यांच्यातील दरी वाढत आहे. एकीकडे दोन वेळचे अन्न मिळण्याची भ्रांत असलेला समाज तर दुसरीकडे सरकारी गोदामांत सडून जाणारे अन्न असा विरोधाभास. राष्ट्रकूल स्पर्धेच्या आयोजनानिमित्त ढिसाळ कारभाराचे जगभर दर्शन. अशा पार्श्वभूमीवर, ‘महासत्ते’चा विचार कसा आला, कुठून आला, त्यामागे काही सबळ कारणे आहेत का, की हे केवळ स्वप्नरंजन आहे? असे प्रश्न आहेत.

२००६ ते २०१० या काळात आपला विकासदर ८ ते ८.५० रेंगाळत आहे. तो वाढून २०१३ पर्यंत १०% वर पोचेल अशी शक्यता कोणत्या आधारावर मांडली जाते?

भारतासह चीनही भावी महासत्ता मानला जातो. त्याच्याशी तुलना करता, २००६ ते २०१० मध्ये चीनचा विकासदर ११टक्क्यांवर स्थिरावला आहे आणि २०१२ पर्यंत तो ९ टक्क्यांपर्यंत खाली येईल असे म्हटले जाते, यात कितपत तथ्य आहे?

भारत सरकारच्या नियोजन आयोगाचे व राष्ट्रीय सल्लागार समितीचे सदस्य डॉ. नरेंद्र जाधव यांच्याशी चर्चा करून वरील प्रश्नांची उत्तरे शोधण्याचा केलेला हा प्रयत्न.

*भारत महासत्ता होणार हा विचार कधी व कसा सुरू झाला?*


महासत्तेचा विचार करण्यापूर्वी आर्थिक सबळतेकडे आपण कसे वळलो हे आधी पाहणे गरजेचे आहे. भारताच्या इतिहासात १९९१ हे साल महत्त्वाचे ठरले, कारण आर्थिक विकासाला कलाटणी देणारे ते वर्ष होते. त्या सुमारास भारतावर अभूतपूर्व आर्थिक संकट कोसळले होते. भारताची वित्तीय तूट प्रमाणाबाहेर वाढली होती. महागाईचा दर प्रमाणाबाहेर भडकलेला होता. परकीय चलनाची गंगाजळी आटत आटत १ अब्ज डॉलरपर्यंत खाली आली होती. फक्त पंधरा दिवस पुरेल इतकेच परकीय चलन आपल्याजवळ होते. त्यावेळी प्रथमच सर्वांना जाणीव झाली की देश

ज्वालामुखीच्या तोंडावर उभा आहे. त्यावेळी भारताची अवस्था 'ऑक्सिजनवर ठेवलेला पेशंट' अशी होती. कुठलाही देश आपल्याला मदत करायला तयार नव्हता. आंतरराष्ट्रीय संस्थांनीदेखील आपल्याकडे पाठ फिरवली होती. सोने गहाण ठेवल्याशिवाय कोणीही भारताला कर्ज द्यायला तयार नव्हते. अशा या अत्यंत खालावलेल्या परिस्थितीत, आलेल्या संकटाचे आपण चक्क संधीत रूपांतर केले. आपल्या देशाचे हे एक वैशिष्ट्य आहे, की मोठा पेचप्रसंग देशाच्या इतिहासात येतो त्यावेळी आपण एकदिलाने एकत्र येतो. नेमके हेच १९९१च्या आसपास घडले.

१९९१च्या या आर्थिक संकटानंतर भारताने नवीन आर्थिक धोरण स्वीकारले. आपल्या आर्थिक नीतीमध्ये मोठ्या प्रमाणात बदल केले आणि हळूहळू चमत्कार घडू लागला. खाजगीकरण, उदारीकरण व जागतिकीकरण (Privatisation, Liberalisation & Globalisation) या त्रिसूत्रीचा आपण स्वीकार केला. त्यामुळे आर्थिक विकासात वाढ झाली. खूप मोठे स्थित्यंतर घडू लागले. आर्थिक धोरणाचे सुकाणू आपण वेगात वेगळ्या दिशेने वळवले आणि त्यानंतर भारताने मागे वळून पाहिलेच नाही.

१९४७ साली भारत स्वतंत्र झाला. १९५१ मध्ये आपण नियोजनबद्ध विकासाची कास धरली. मात्र १९५१ ते १९८६ या पस्तीस वर्षांत आर्थिक विकासाचा दर होता फक्त साडेतीन टक्के. लोकसंख्यावाढीचा दर होता २.२%. म्हणजेच दर वर्षाला दरडोई उत्पन्नामध्ये केवळ १.३ टक्क्याने वाढ होत होती. याचाच अर्थ, प्रतिवर्षी १.३ टक्का या दराने दरडोई उत्पन्न वाढत राहिले असते तर सर्वसामान्य जनतेचे जीवनमान दुप्पट करायला आपल्याला तब्बल ५९ वर्षे लागली असती! चीनला तेथील दरडोई उत्पन्न दुप्पट करायला ११ वर्षे लागली. मलेशियाला १५ वर्षे लागली, कोरियाला १३ वर्षे, इंडोनेशियाला १९ वर्षे आणि तेच ध्येय गाठायला भारताला ५९ वर्षे लागणार होती. याचे भान ज्यावेळी आपल्याला आले तेव्हा आपल्या भ्रमाचा भोपळा फुटला. नवीन अर्थव्यवस्था स्वीकारल्यावर आपल्या विकासाचा दर झपाट्याने वाढू लागला. त्याआधी कितीही वर्षांची, म्हणजे पाच वर्षांची, दहा वर्षांची सरासरी घेतली तरी विकासाचा दर साडेतीन टक्के हाच असायचा! हे इतके वैशिष्ट्यपूर्ण होते, की त्यावेळचे नियोजन आयोगाचे सदस्य राजकृष्णा यांनी याला 'हिंदू रेट ऑफ ग्रोथ' म्हणून संबोधले होते. जणू हा आकडा भारताच्या भालप्रदेशावर नियतीने लिहून ठेवला होता. जवळजवळ ४० वर्षे, म्हणजे १९५१ ते १९९१ हा दर सरासरी तेवढाच होता. जेव्हा १९९३ साली विकासाचा दर जेव्हा ७ टक्क्यांनी वाढला तेव्हा तो सर्वांना योगायोग वाटला. १९९४ मध्ये जेव्हा पुन्हा तो ७% राहिला तेव्हा लक्षात आले, विकासदर वाढतो आहे. म्हणजेच नवीन अर्थनीतीने आपण साडेतीन टक्के विकासदराचे दुष्टचक्र भेदत आहोत याची जाणीव झाली. १९९२ ते २००२ या दहा वर्षांत आपल्या विकासाचा दर सरासरी ६ टक्क्यांवर जाऊन पोचला. २००२ ते २००५ या काळात तोच दर ८ टक्के झाला व २००५ ते २००८ या वर्षांमध्ये तो ९ टक्क्यांवर जाऊन पोचला आणि we emerged as the second fastest growing country in the world. जगात चीनच्या खालोखाल सर्वांत वेगवान अर्थव्यवस्था म्हणून भारत नावारूपाला आला. याचाच परिणाम म्हणजे, अलिकडे सगळेच जण भारत महासत्ता होणार असे भाकीत वर्तवायला लागले. (परंतु १९९४-१९९५ साली हे विधान मी पुण्यात केले होते तेव्हा लोकांनी त्या विचारांची खिल्ली उडवली होती. आता तेही लोक तेच बोलत आहेत! 'कालाय तस्मै नम:' दुसरे काय?)

या सर्व घटनांमुळे अलिकडच्या काळात दोन गोष्टी घडल्या. जगाचा भारताकडे पाहण्याचा दृष्टिकोन आमूलाग्र बदलला, हा गुणात्मक फरक झाला. प्रत्येक वित्तीय संस्थेने असे म्हटले आहे, की एकविसावे शतक हे चीन व भारताचे आहे. दुसरा गुणात्मक बदल हा झाला की आपल्या सर्वांचा स्वत:कडे पाहण्याचा दृष्टिकोन पूर्णपणे बदलला. आज देश म्हणून आपल्याला स्वत:बद्दल जो आत्मविश्वास वाटतो आहे तेवढा आत्मविश्वास स्वातंत्र्यानंतरच्या काळात पहिल्यांदाच वाटतो आहे हे मुद्दाम नमूद करावेसे वाटते. नवीन आर्थिक नीतीचा आपण स्वीकार केला आणि अनेक वर्षे जखडून ठेवलेल्या भारतीय उद्यमशीलतेला मुक्त प्राधान्य मिळाले तेव्हा भारतीय गुणवत्ता उफाळून आली. परिणामी, विकासदर वाढला आणि देश जवळजवळ जागतिक महासत्ता होण्याच्या दिशेने वाटचाल करू लागला.



**डॉ. जाधव यांच्याशी बातचीत करताना लतिका भानुशाली**

*राजीव गांधींनी भारतात आणलेली इलेक्ट्रॉनिक क्रांती आपल्या आधुनिक धोरणांची, अर्थव्यवस्थेची नांदी ठरली का?*

हो, तिथे सुरुवात झाली हे खरे असले, तरी पूर्णपणे तसे म्हणता येणार नाही. ज्यावेळी मनमोहन सिंग यांनी लेखणीच्या एका फटकाऱ्याने 'लायसन्स राज' बंद केले तो आपल्या देशाचा टर्निंग पॉईंट होता. IT क्षेत्राला आधी आपण सुरुवात केली, ती भविष्याकडे पाहून. त्यावेळेपासून बदलाची सुरुवात झाली, पण खरा मोठा बदल 'लायसन्स राज' बंद केल्यामुळे झाला. असे म्हणता येईल, की आपल्याला राजकीय स्वातंत्र्य १९४७ साली मिळाले पण आर्थिक स्वातंत्र्य १९९१ मध्ये मिळाले व तांत्रिक स्वातंत्र्य आता मिळाले. (या तीनपैकी दोन टप्प्यांत डॉ. मनमोहन सिंग यांनी फार महत्त्वपूर्ण कामगिरी केली आहे.)

*चीनएवढा विकास साधायला आपल्याला आपली मानसिकता बदलायला लागेल का? चिनी अर्थव्यवस्थेने जपानला मागे टाकले आहे. आपल्याकडे अजूनही ३०% लोकसंख्या 'दारिद्र्यरेषे'खाली आहे. ही तफावत कशी दूर होऊ शकते?*

चीन व भारत यांची तुलना करताना डाव्या चळवळीचे लोक आंधळेपणाने काळाच्या गरजेकडे दुर्लक्ष करतात. नवीन नीतीला सातत्याने याच लोकांनी विरोध केला. ज्याला आपण नवीन आर्थिक नीती म्हणतो ती आपल्यासाठी आज नवीन असली तरी जगासाठी कधीच नवी नव्हती. आर्थिक संकट जेव्हा आपल्यावर कोसळले तेव्हा आपण ती स्वीकारली. पण आपल्या आधी १३ वर्षापूर्वी कुठलेही आर्थिक संकट आलेले नसताना– १९७८ मध्ये– चीनने हीच नीती स्वीकारली. आपल्याकडे मात्र आजही साम्यवाद, समाजवाद, भांडवलशाही अर्थव्यवस्था हे वाद चघळत बसतात. त्याच्या पलीकडे आपली मानसिकता जात नाही. ती बदलायला पाहिजे व ती वेगाने बदलत देखील आहे. खरे तर, हे वाद आता कालबाह्य झालेले आहेत.

चीनचे तत्कालीन अध्यक्ष झियाओ पिंग यांना देखील हे बदल स्वीकारताना विरोध झाला होता. साम्यवाद व मार्क्स यांच्या विचारावर चालणाऱ्या देशाने ही नीती स्वीकारली कशी, असा विरोधाचा सूर त्यावेळेस होता. पण त्यावर त्यांचे उत्तर होते, ''मांजर काळं आहे की पांढरं हे महत्त्वाचं नाही. ते उंदीर पकडतं की नाही हेच महत्त्वाचं असतं.'' विकास कोणत्या पद्धतीने वाढला यापेक्षा विकास होतो आहे की नाही, देशाच्या आर्थिक नियोजनाचा सर्वसामान्य जनतेला फायदा होतो आहे की नाही हा कळीचा मुद्दा आहे. या मुद्याकडे लक्ष न देता पोथीनिष्ठ पद्धतीने हा वाद चघळला जातो. या निरर्थक वादाची व्यर्थता जेव्हा आपल्याला कळेल तो सुदिन म्हणायचा!

*आपल्याकडे विविध उद्योगधंद्यांना किंवा सेवांना सरकारी सबसिडी दिली जाते. इतर देशांची विशेषत: 'चीन'ची या बाबतीत काय भूमिका आहे. सबसिडीमुळे निष्क्रियता व कष्टाची उदासिनता जी इथे दिसते त्याच प्रकारे मानसिकता इतर देशात विकसित झाल्या आहेत का? नसतील तर आपली मानसिकता व त्यांची या भेदामागील कारणे स्पष्ट करू शकाल का?*

सबसिडीमुळे सरसकट उदासीनता येते असे म्हणणे योग्य ठरणार नाही. अन्नधान्याच्या सबसिडीमुळे उदासीनता येऊ शकत नाही. ती जगण्याची गरज आहे. NAC (National Adivisery Committee) अर्थात राष्ट्रीय सल्लागार समितीमध्ये

याची चर्चा होत आहेच. नियोजन आयोगात त्या दिशेने विचार चाललाय. पुढच्या काही महिन्यातच दारिद्र्य रेषेखाली असणाऱ्या जनतेला जास्तीत जास्त ३ रुपये किलो दराने कुटुंबामागे दरमहा ३५ किलो गहू/तांदूळ देण्यासाठी 'अन्न सुरक्षितता' विधेयक तयार केले जात आहे याची गरज आहे. त्यातून उदासीनता येईल असे म्हणणे गरीबांवर अन्याय करणारे आहे. संवेदनशीलता नसल्याचे लक्षण आहे.

पेट्रोलियमसाठी (केरोसिनसाठी) सरकार खूप मोठी सबसिडी देते कारण त्यावर सर्वसामान्य जनतेचे जीवनमान अवलंबून आहे. Oil crisis पहिल्यांदा १९७३ मध्ये झाला. त्यावेळी तेलाच्या किमती एका आठवड्यात ४००% वाढल्या. त्यावेळी जपानने झपाट्याने आपल्यात सुधारणा केल्या. उदाहरणार्थ, मोटार कारचा आकार छोटा केला. आपल्याकडे त्याबाबतीत पूर्ण उदासीनता आहे. सरकार खर्च करते म्हणजे ते फुकट आहे, कसेही वापरले तरी चालेल ही मानसिकता बदलण्याची गरज आहे. Save Fuel वगैरेसारख्या घोषणा देऊन आपली जबाबदारी संपत नाही. जर बाजारभावाने पेट्रोल खरेदी करावे लागले तर कदाचित आपण त्याचा काळजीपूर्वक वापर करू. एखादी गोष्ट फुकट आहे असे वाटते पण दुसरा कोणीतरी त्याची किंमत देत असतो, याचे भान आपल्याला नाही.

*चीन व आपल्यातील प्रमुख भेद म्हणजे आखलेल्या धोरणांची अंमलबजावणी. कम्युनिस्ट एकाधिकारशाहीची जरब व लोकशाहीचा आपण घेत असलेला गैरअर्थ, यामुळे चीनची प्रगती झपाट्याने होते आहे व आपला प्रगतीचा वेग कमी आहे असे म्हणता येईल का?*

चीन सर्व बाबतीत आपल्यापुढे आहे, पण financial system मध्ये नाही. चीनमध्ये निर्णय पटापट अमलात आणले जातात. आपल्याकडे मात्र घोंगडे भिजत पडते यात थोडा तथ्यांश आहे, परंतु चीनसारखे वागायचे तर आपल्याला आपल्या स्वातंत्र्याचा बळी द्यावा लागेल. आपल्याकडे संसदीय लोकशाही आहे. चीनसारखी एकाधिकारशाही असेल तर निर्णय झटपट घेणे शक्य आहे. पण एकाधिकारशाहीचे अनेक तोटे आहेत. व्यक्तीच्या खाजगी जीवनातसुद्धा सरकारी हस्तक्षेप असतो. लग्न करण्यासाठी सुद्धा सरकारची परवानगी लागते. त्यामुळे हे सर्व दोष स्वीकारून काही तत्काळ फायद्यांसाठी एकाधिकारशाही स्वीकारणे म्हणजे स्वातंत्र्य मिळवण्यासाठी ज्यांनी प्राणांची आहुती दिली त्यांच्याशी प्रतारणा करणे होय. तसा विचारसुद्धा करता कामा नये.

दीर्घकालीन विचार केला तर संसदीय लोकशाही हीच चिरकाल टिकणारी गोष्ट आहे. एकाधिकारशाहीचे काहीही होऊ शकते. राजवट उलटली जाऊ शकते. आपल्याकडे ज्या पद्धतीने लोकशाही रुजली आहे त्याचा अभिमान बाळगायला हवा. ६० कोटी मतदार भारतासारख्या खंडप्राय देशात शांततेने (काही अपवाद वगळता) सत्ताबदल घडवून आणतात हा चमत्कार आहे. भारताच्या आगे-मागे स्वातंत्र्य मिळालेल्या देशांत हे घडलेले नाही. किंबहुना, १९४७ ला भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर चर्चिल यांनी स्पष्टपणे म्हटले होते की ''लोकशाही तर दूरची गोष्ट आहे, पण देश म्हणूनसुद्धा भारत टिकू शकत नाही.'' आज आपली लोकशाही रुजली आहे. अमेरिकेसारख्या देशात सुद्धा अध्यक्षीय निवडणुकीत घोटाळे झालेत. त्याउलट आपल्याकडे लोकशाहीने जे मूळ धरले आहे ते वादातीत आहे. त्यामुळे आपल्याकडे घडणारे बदल चिरस्थायी ठरतील. याबाबतीत चीनचा आदर्श ठेवणे मूर्खपणाचे आहे.

*मानवी स्वातंत्र्यांचा बळी देऊन चीनने साधलेला विकास आणि लोकशाही मूल्यांना धक्का न लावता, त्या मर्यादेत, थोडासा त्यांच्या तुलनेत संथ चाललेला विकास यात आपला विकास श्रेष्ठ आहे असे म्हणू शकतो का?*

आपण व्यक्तिस्वातंत्र्याची गळचेपी करत नाही. शेवटी लोकांपर्यंत काय पोचते आहे हे महत्त्वाचे आहे. चीनमध्ये विकास झपाट्याने झाला हे खरे आहे. आपलीही पावले त्या दिशेने पडत आहेत. अर्थव्यवस्थेचे तीन भाग पडतात Agriculture (शेती), Industrial Manufacturing (कारखानदारी), Service sector (सेवा-क्षेत्र). पूर्वी अशी परिस्थिती होती, की चीन कारखानदारी क्षेत्रात अग्रेसर होता व भारत सेवाक्षेत्रात. आज भारत कारखानदारीत प्रगती करतो आहे तर चीन सेवाक्षेत्रात मुसंडी मारण्यासाठी जोरदार प्रयत्न करत आहे. दोन्ही देश महासत्ता बनत आहेत.

चीनमध्ये प्रगतीची सुरुवात आधी झाली कारण आपल्या १३ वर्षे आधी त्यांनी नवीन अर्थनीती स्वीकारली. पण पुढील काही वर्षांत भारत आर्थिक महासत्ता होईल ती तरुणाईच्या जोरावर.

भारतातील सरासरी वय २०२०च्या आसपास २९ वर्षे असेल. चीनचे ३७ वर्षे, अमेरिकेचे ३७ वर्षे पश्चिम युरोपचे ४२ वर्षे जपानचे ४८ वर्षे पण तरुणाईचे वरदान लाभले म्हणजे विकास आपोआप होणार नाही. यात शिक्षणक्षेत्र व skill development (कौशल्यविकास) या दोहोंची मोठ्या प्रमाणात पुनर्बांधणी केली पाहिजे. ते होत आहे. याच कामासाठी मी स्वत:ला सध्या वाहून घेतले आहे. तरुणाईच्या या उपलब्धतेचा योग्य वापर केला तर demographic dividend आपल्याला मिळेल व हे बळ वाया घालवले तर demographic disaster होईल. म्हणून शिक्षणक्षेत्राला प्राधान्य देणे गरजेचे आहे. हा चेक आहे, तो वटवला नाही तर त्याची किंमत शून्य असेल. असलेल्या मनुष्यबळाचा वापर योग्य दिशेने झाला नाही तर आलेली संधी वाया घालवण्यासारखे आहे. कुठल्याही देशाच्या आयुष्यात ही संधी एकदाच येते. ती आज आपल्याकडे आली आहे. येती १५-२० वर्षे ही संधी उपलब्ध राहणार आहे. त्याचा फायदा घेतला नाही तर आपल्यासारखे कपाळकरंटे आपणच! आज आपल्या labour force मध्ये (मनुष्यबळ) वार्षिक साडेबारा दशलक्षांनी भर पडते आहे. पुढच्या १० वर्षांत चीनचा labour force 60 दशलक्षांनी कमी होणार. २०२५ साली संपूर्ण जगात तांत्रिकदृष्ट्या कुशल (trained) लोकांची कमतरता निर्माण होणार आहे. पण भारतात मात्र हे होणार नाही. कौशल्य व शिक्षण या दृष्टिकोनातून तरुणाई विकसित केली तर आपण साऱ्या जगाला मनुष्यबळ पुरवू शकतो. ती क्षमता आपल्याकडे आहे. चीनने गेल्या २० वर्षांत जे मिळवले ते आपण पुढल्या दहा वर्षांत मिळवू शकतो. आज चीनपुढे आर्थिक विकासाचा दर तसाच ठेवता येईल किंवा नाही हा मोठा प्रश्न आहे. याचा फायदा आपल्याला घेता आला पाहिजे. अर्थात, इंडोनेशिया, मलेशिया यांच्याशीसुद्धा आपली स्पर्धा आहे हे ध्यानात घेणे गरजेचे आहे.

Controlled mind set (बंदिस्त विचारसरणी) मधून आपण आता Open mind set (मुक्त विचारसरणी) मध्ये आलेले आहोत. येत आहोत. जगाच्या दृष्टिकोनातून विचार केला तर १९९१ हे साल आपल्यासाठी जितके महत्त्वाचे ठरले तसेच ते जगाच्या दृष्टीनेपण क्रांतिकारी साल ठरले. एकीकडे तंत्रज्ञानात बदल झाला. संगणक, टेलिकम्युनिकेशन व इलेक्ट्रानिक्स या क्षेत्रात क्रांतिकारी बदल झाले तर जगात दुसरीकडे राजकीय पटलावर महत्त्वाचे बदल घडले. बर्लिन वॉल खाली येणे, शीतयुद्धाची समाप्ती व पेरिस्त्रोयकामुळे रशियाचे विभाजन. (यापाठी राजकीय, आर्थिक व तांत्रिक कारणे होती. यामुळे बदलाची प्रक्रिया वेगवान झाली. म्हणजे १९९१ ते २००० या दहा वर्षांत जगाच्या अर्थव्यवस्थेत जेवढा झपाट्याने बदल झाला, तेवढा बदल आधीच्या ९० वर्षांत झाला नव्हता!)

दुसरा बदल २००१ साली व्हायला सुरुवात झाली. हा बदल समजून घेताना थोडे भूतकाळात डोकावणे गरजेचे आहे. जगाची आर्थिक घडी दुसऱ्या महायुद्धानंतर बसवण्यात आली. १९४४ नंतर सगळे देश एकत्र आले आणि त्यांनी मिळून जगाची आर्थिक घडी बसवली. IMF, World bank, General Agreement of tariff & trade या संस्थांची निर्मिती झाली.

त्यावेळी एक अलिखित संकेत होता की तीन गट जगाचे आर्थिक नेतृत्व करणार. पहिला अर्थात अमेरिका, दुसरा पश्चिम युरोप व तिसरा जपान. हीच 'इंजिन्स ऑफ ग्रोथ' होती. यातील एक देश ढिला पडला तर इतर दोघांनी आर्थिक नेतृत्वाचे सुकाणू हाकायचे. दोन देश ढिले पडले तर तिसऱ्याने पुढे यायचे. हा संकेत अव्याहतपणे १९४५ ते २००० या ५५ वर्षांच्या कालावधीत चालला. २००१ साली पहिल्यांदा वेगळे काहीतरी घडले. या तीन पॉवर्सपैकी जपान १९९७ पासून मागे पडत गेला. त्याची नकारात्मक वाढ १९९७ पासून सुरू झाली आणि आता तो पूर्ण डबघाईला आला आहे. अमेरिकेने १९९२ ते २०००पर्यंत वेगाने विकास घडवून आणला. आधीच्या वर्षांतील प्रगतीपेक्षा उत्कृष्ट प्रगती या कालावधीत त्यांनी साधली. पण नंतर मात्र त्यांची घसरण (slow down) सुरू झाली. त्यावेळी असे वाटले, की 'इंजिन ऑफ ग्रोथ' म्हणून तिसरा गट म्हणजे पश्चिम युरोप पुढे येईल. पण तसे झाले नाही. युरोपचा विकासदर २००१ मध्ये अर्धा टक्का होता, त्याच्या पुढच्या वर्षी तो पाऊण टक्के झाला. अशा प्रकारे जगातील सगळ्या इंजिन ऑफ ग्रोथची गती मंदावली. याला 'सिंक्रोनाईज्ड ग्लोबल स्लो डाऊन' असे म्हटले गेले. त्यावेळी जगाच्या पटलावर अचानक आणि अपरिहार्यपणे चीन व भारत हे दोन देश उगवले. कारण १९९१ पासून १० वर्षांत आपल्या प्रगतीला सुरुवात झाली होती व चीनने आपल्या आधी १३ वर्षे प्रगतीला सुरुवात केली होती. त्यामुळे भारत महासत्ता बनेल या म्हणण्याला बळकट पुष्टी मिळत आहे.


योग्य संधी मिळाली तर आपल्या देशाची एका व्यक्तीची सरासरी क्षमता ही अमेरिकेच्या एका व्यक्तीच्या सरासरी क्षमतेपेक्षा श्रेष्ठ आहे. अष्टावधानता हे आपल्या लोकसंख्येचे

वैशिष्ट्य आहे. कारण जगण्यासाठी विविध संघर्ष करत राहणे हे आपण लहानपणापासूनच शिकतो. या गुणवत्तेला आता संधी मिळायला लागली आहे. अर्थात अनेक आव्हाने आपल्यापुढे आहेत. आज व्यापक विकास होतो आहे पण विकासाची फळे अजून समाजाच्या सर्व थरांमध्ये पोचलेली नाहीत. अजून खूप काही करायचे आहे.

आपण जे साध्ये केले आहे ती असामान्य गोष्ट आहे. इ.स.१००१ मध्ये आपण महासत्ता होतो. इ. स. १ ते इ. स. १००० या काळात भारत-चीन आलटून-पालटून महासत्ता होत्या. तेच पुन्हा एकदा घडते आहे. आज भारतात नि:शब्द क्रांती चालू आहे. मुख्य प्रवाहापासून पिढ्यान् पिढ्या दूर असलेल्या लोकांना आता संधी मिळते आहे. हा विकास सर्वसमावेशक आहे. इ.स.१ मध्ये आपले उत्पन्न जगाच्या साडेएकतीस टक्के होते कारण तो विकास सर्वसमावेशक होता. नंतरच्या काळात जातीव्यवस्थेमुळे फक्त साडेतीन टक्के लोकांना विकासाची संधी मिळाली. त्यामुळे देशाचा विकास थांबला. १९९१ वर्षांत हा विकासाचा आलेख खाली आला. कितीतरी आईनस्टाइन या जातीव्यवस्थेत मारले गेले. म्हणूनच आजचा विकास हा महत्त्वपूर्ण आहे. हा विकास साडेतीन टक्के लोकांमुळे नाही तर मुख्य प्रवाहाबाहेर असलेले लोक आज प्रवाहात येताहेत म्हणून घडलेला आहे. चित्रकलेपासून सर्जरीपर्यंत प्रत्येक क्षेत्रात फर्स्ट जनरेशन लर्नर दिसत आहेत. हे सारे मूकपणाने घडते आहे.

थोडक्यात, भारतापुढे सामाजिक, राजकीय, आर्थिक आव्हाने आहेतच. पण त्या सर्वांवर योग्य धोरणांच्या आधारे मात करता येऊ शकते. राजकीय इच्छाशक्ती व सामाजिक जागरुकता या दोन्ही गोष्टी एकत्रित करण्याची गरज आहे. विकास नीतीमध्ये रचनात्मक बदल होणे आवश्यक आहेत. हे सगळे अडथळे हळूहळू पार पाडत महासत्तेच्या वाटेवर आपला प्रवास सुरू झाला आहे. तो असाच पुढे जाईल अशी डॉ. जाधव यांनी व्यक्त केलेली आशा आपणही बाळगण्यास हरकत नाही.

**लतिका भानुशाली**
१० सी, एन्जालिका कॉसमॉस लॉज,
नीलकंठ ग्रीन्ससमोर,
मानपाडा, ठाणे (प.)-४०० ६०६.
latikabhanushali@yahoo.co.in



**महारूद्र**

**(आंतरराष्ट्रीय फूटबॉलमधला मराठमोळा झंझावात!)**

जी.बी. देशमुख

पहिल्या प्रयत्नातच कुशल खेळाडूप्रमाणे कुठल्याही खेळाची लय भीमरावांना साधत असे. या दैवी देणगीला कठोर कष्टांची जोड देऊन भीमरावांनी फूटबॉल बहरवला. या खेळाचा स्थायीभाव आहे, त्या खेळाची विलक्षण गती. भीमरावांना सहजसाध्य असलेले अनेक खेळ होते, परंतु फूटबॉलकडे लक्ष द्यायचं असं न ठरवताही भीमराव फूटबॉलमध्येच रमले. कारण या खेळाची नैसर्गिक गती आणि भीमरावांच्या व्यक्तिमत्त्वातील असामान्य वेग ह्यातील ताळमेळ सहज होता. फूटबॉलमध्ये नावारूपास येणं हे त्यांच्या अंतर्बाह्य व्यक्तिमत्त्वाचं सहजसुंदर प्रकटीकरण होतं. फूटबॉलशी त्यांचं नातं ही सर्वांत नैसर्गिक गोष्ट होती.

**मूल्य १२० रु.**

**सवलतीत ७० रु.**

# ‘समृद्धी हाच चीनचा धर्म’

## अनिल चौधरी

मुलाखत – **लतिका भानुशाली**

चीन व भारत एकमेकांचे सख्खे शेजारी, तरी एक अज्ञात भिंत या दोघांमध्ये कायम उभी असते. चीनमध्ये साम्यवाद तर भारतात समाजवाद व लोकशाही रचना. दोन्ही देशांनी परकीय आक्रमणे आणि युद्ध यांचा सामना केलेला. पण गेल्या पंचवीस वर्षांत चीनने झपाट्याने कात टाकली. आर्थिक नीतीमध्ये बदल घडवले व जागतिक स्तरावर सर्वांत वेगवान अर्थव्यवस्था असा नावलौकिक मिळवला. हा बदल नेमका कसा घडला, त्यासाठी योजनाबद्ध पद्धतीने त्यांनी ध्येयधोरणांची अमंलबजावणी कशी केली? त्यांच्या साम्यवादी रचनेचा त्यांना यासाठी कितपत फायदा झाला?

गेली चार–साडेचार वर्षे चीनमध्ये वास्तव्यास असलेले, ‘लार्सन ॲण्ड ट्युब्रो’च्या चीनमधील युनिटचे मुख्य कार्यकारी अधिकारी (चीफ ऑपरेटिंग ऑफिसर) अनिल चौधरी यांच्याशी चर्चा करून चीनच्या अंतरंगाचा घेतलेला हा वेध.

*गेल्या काही वर्षांत चीनने नेत्रदीपक प्रगती साधलेली दिसते आहे. त्या प्रगतीचा आलेख व त्यामागची कारणे यांचे विश्लेषण कसे करता येईल?*

हा वेध घेण्यापूर्वी ज्या देशांना चीनने मागे टाकले आहे त्यांचा व चीनचा इतिहास बघणे गरजेचे आहे. चौदाव्या शतकात अमेरिकेचा शोध लागला व युरोपीय देशांतील मंडळींनी हळूहळू तिथे आपले बस्तान पक्के केले. त्यांचे राजकीय धोरण व्यापारविकास हेच होते. त्यासाठी तेथील नैसर्गिक साधनसंपत्ती प्रचंड प्रमाणात वापरली गेली. विशेषत: कोळसा, पेट्रोलियमचे साठे यावर लक्ष ठेवूनच तिथे व्यापार–जगत वाढवले गेले. हळूहळू अमेरिकेची भराभराट होत गेली. विशेष म्हणजे अमेरिकेने प्रत्यक्ष आपल्या भूमीवर युद्ध कधीच अनुभवले नाही. अप्रत्यक्षपणे दुसरीकडे युद्ध घडवून तिथे युद्धसामग्री विकली व प्रचंड नफा कमावला. प्रचंड साधनसंपत्तीची उपलब्धता, औद्योगिक क्रांतीमुळे विजेचा दिवा, टाइपरायटर, ग्रामोफोन असे शोध त्यांच्या प्रगतीला वरदान ठरले. त्याचबरोबर त्यांनी केलेली दीड लाख कि.मी.ची रेल्वे लाईन्सची उभारणी. यामुळे त्यांचा विकासाचा वेग झपाट्याने वाढला. १७७६मध्ये अमेरिका स्वतंत्र झाली. त्यामुळे तसा त्यांना प्राचीन इतिहास नाही, संस्कृती (ठरावीक सोडून) नाही.

या पार्श्वभूमीवर इतर देशांचा विचार केला की लक्षात येते, की त्यांनी मोठ्या प्रमाणावर हालअपेष्टा पाहिल्या आहेत. युरोपने दुसऱ्या महायुद्धानंतर प्रथमच जवळजवळ ६०–७० वर्षे

दीर्घकाळ शांततेचा काळ अनुभवला. असा काळ देशाच्या विकासासाठी आवश्यक असतो.

जपानचा इतिहास वेगळा आहे. परदेशी गुंतवणूक, पेटंटचे हक्क विकत घेणे, तंत्रज्ञानाचा विकास, लायसेन्सिंग, या गोष्टींमुळे जपानचा विकास झाला. रशिया-जपान युद्ध (१९०४-०५) पहिले व दुसरे जागतिक महायुद्ध, इंडो-चायना, कोरियन युद्ध (१९५०-५३) दुसरे युद्ध या सर्वांमुळे जपानमध्ये प्रखर राष्ट्रीय भावना वाढीस लागली. दुसऱ्या महायुद्धातील अणुसंहारानंतर तो देश फिनिक्स पक्ष्याप्रमाणे पुन्हा उभा राहिला. जगाला काहीतरी करून दाखवण्याच्या इर्ष्येने त्यांनी उद्योजकता वाढवली व त्यांच्या विकासाला सुरुवात झाली.


चीनची परिस्थिती यापेक्षाही वेगळी होती. १९१० पर्यंत त्यांच्याकडे राजेशाही राजवट होती. त्यामुळे सातत्याने युद्धाचा सामना या देशाने केला. नंतर बराच काळ त्यांच्यावर जपानने राज्य केले. त्यामुळे भयानक अत्याचारांना हा देश सामोरा गेला. पण तिथल्या भीषण दुष्काळात दोन ते तीन कोटी जनता मृत्यूमुखी पडली. दुसऱ्या महायुद्धात जेवढा नरसंहार युरोपने पाहिला त्यापेक्षा जास्त नरसंहार या दुष्काळात चीनने पाहिला. त्यानंतर (६०च्या दशकात) माओचा काळ आला. माओने चांगला दृष्टिकोन डोळ्यांसमोर ठेवून सामाजिक व राजकीय बदल घडवून आणले. प्रथम तुकडा पद्धतीने केली जाणारी शेती बंद करून शेतीचे सामुदायिकीकरण (कलेक्टिव फार्मिंग) सुरू केले. माओने चीनमध्ये असा विचार रुजवला की जग ही आपली बाजारपेठ समजण्यापेक्षा आपल्या देशात अंतर्गत व्यापार वाढवला तर विकास लवकर होईल. कारण तेवढे मोठे क्षेत्रफळ त्या देशाचे होते. शेतीला उपयोगी ठरणारी अवजारे निर्माण करणारे कारखाने उभारण्यावर त्यांनी भर दिला आणि शेतीचे उत्पादन कसे वाढवता येईल याचा विचार केला. माओच्या काळात त्यावेळी जी सरकारी घरे लोकांना दिली गेली ती आजही पाहावयास मिळवतात. त्याच्या काळात चीनमध्ये भ्रष्टाचाराचे प्रमाण शून्य होते. पण समानता निर्माण करण्याच्या पराकोटीच्या अतिरेकामुळे तिथल्या लोकांची क्रयशक्ती (एफिशिअन्सी) घटली. साम्यवादी रचनेमुळे श्रमनिहाय मोबदला न मिळण्यामुळे आंतरिक असंतोष वाढत होता. त्याचा परिणाम उत्पादनक्षमतेवर झाला. गरजेपेक्षा जास्त पैसा कमावण्यास वाव नव्हता, साम्यवादी तत्त्वज्ञानाच्या ते विरोधात होते. परिणामी, साम्यवादाचा फुगा फुटून भ्रमनिरास झाला. देशासाठी तो राजकीय दृष्ट्या खडतर काळ होता. माओ त्याकाळात राजकीय अज्ञातवासातच होता. १९७६ मध्ये त्याचा अंत झाला. नंतर १९७८ पासून झियाओ पिंग यांनी नवीन अर्थनीती स्वीकारली व अंशत: उदारीकरण, जागतिकीकरण, खाजगीकरण यांना प्राधान्य दिले.

सुरुवात त्यांनी शेतीपासून केली. कारण चीन हा प्रामुख्याने शेतीप्रधान देश होता. माओने केलेल्या चुका सुधारण्याचा प्रयत्न प्रथम केला गेला. सेवाक्षेत्र व कारखानदारी यांना प्राधान्य दिले. आज त्यांच्याकडे ४०% सेवाक्षेत्र, ५०% कारखानदारी व १०% कृषी असे चित्र आहे.

शेतीप्रधानतेकडून कारखानदारीप्रधान असा त्यांचा प्रवास आहे. शेतीचे सामुदायिकीकरण बंद करून शेतकऱ्यांना स्वातंत्र्य दिले गेले. त्यातून 'स्वत:ची शेती' ही भावना वाढीस लागली. त्यामुळे उत्पादन वाढले. खऱ्या अर्थाने चीन हा आता साम्यवादापासून दूर चाललाय असे म्हटल्यास गैर ठरू नये. लोकशाही हळूहळू आणण्यात येईल असा इथला सूर आहे, पण खरे चित्र माहीत नाही. त्यांच्या मीडियाकडून तसे भासवले जाते, पण मीडियावर सरकारचा अंकुश आहे हेही तितकेच खरे आहे.

मात्र, रूजलेल्या साम्यवादी रचनेचा त्यांना फायदा होतो तो सरकारी योजना राबवताना. चायनीज कम्युनिस्ट पार्टी (सीसीपी) हा त्यांचा प्रमुख राजकीय पक्ष आहे. ऑक्टोबर १९४९ मध्ये सीसीपी चा जन्म झाला. गेल्या साठ वर्षांत त्यांनी अनेक योजना राबवल्या. एकच पक्ष असल्याने निर्णय घेणे, त्याची अमंलबजावणी करणे हे लवकर होते. त्यामुळे वेळेचा अपव्यय वाचतो.

चीनच्या विकासाचे मुख्य कारण उत्पादनखर्च कमी व उत्पादनक्षमता अधिक हे आहे. सध्या चीन जगातील दोन नंबरचे व्यापारी उत्पादन केंद्र म्हणून ओळखला जातो. जगातील सर्वांत मोठा निर्यातदार म्हणून चीनची ओळख आहे. सिमेंट, रसायने, खते, इलेक्ट्रॉनिक्सच्या व चामड्याच्या वस्तू यांची प्रामुख्याने निर्यात होते. त्याचबरोबर चीन जगातील दोन नंबरचा आयातदार आहे. चीनचा विकास हा पूर्वेकडून पश्चिमेकडे असा चाललाय. पूर्वेकडील समुद्र, तेथील बंदरे ही व्यापार उद्योगांसाठी उपयुक्त ठरली हे त्याचे प्रमुख कारण होय. शिवाय, चीनला तेरा देशांची सीमारेषा स्पर्श करते. हे सर्व देश विकसनशील किंवा अविकसित आहेत. त्यामुळे तसा व्यापारासाठी त्यांचा उपयोग नाही, त्यामुळे विकसित राष्ट्रांबरोबर व्यापार करायचा तर समुद्र व्यापार विकसित केला पाहिजे यावर त्यांनी भर दिला.



पत्नीसह
अनिल चौधरी

तिथे ४८% लोकसंख्या शहरी आहे व ५२% भाग ग्रामीण आहे. ग्रामीण भागात पश्चिम व मध्य चीनचा समावेश होतो. ग्रामीण विकासासाठी त्यांनी होक्हू पद्धत सुरू केली. यात प्रत्येकाला आयडेंफिकेशन नंबर असतो. ही पद्धत म्हणजे एका राज्यातून दुसऱ्या राज्यात स्थलांतरित होण्याकरता परवानगी देणे. चीनमध्ये पूर्वी शिक्षण व नोकरी यासाठी स्थलांतरित व्हायला परवानगी लागत होती. त्यासाठी शैक्षणिक संस्था व संबंधित कंपनी यांची प्रमाणपत्रे सादर करावी लागत असत. आता त्यात शिथिलता आली आहे. पूर्वेकडील इंडस्ट्री वाढू लागल्यामुळे स्वाभाविक कामगारांची आवश्यकता निर्माण झाली. यामुळे शांघाय, बिजिंग, सॅनझेन, झझियांग, चिंगडाव, हरबीन वगैरे शहरांतीत लोकसंख्या वाढू लागली. परंतु आपल्या मुंबई, दिल्ली, कोलकात्यासारख्या समस्या निर्माण झाल्या नाहीत कारण परकीय गुंतवणूक वाढायला सुरुवात झाली होती. शिवाय १९९० नंतर डब्ल्युटीओ करारानंतर परकीय गुंतवणूक जास्त वाढली. त्यामुळे ग्रामीण भागातील लोकसंख्येला शहरी भागात सामावून घेताना समस्या निर्माण झाल्या नाहीत.

शेतीला स्वातंत्र्य दिल्यानंतर त्यांनी उद्योगधंद्यांना स्वातंत्र्य द्यायला सुरुवात केली. त्यामुळे परत परकीय गंतवणूक वाढायला सुरुवात झाली. अनेक परदेशी कंपन्या यायला लागल्या. नवीन कारखान्यांना लागणाऱ्या परवान्यांमध्ये शिथिलता आणली. आयकर कमी केले. तंत्रज्ञान विकसित करणाऱ्या उद्योगधंद्यांना जास्त प्राधान्य दिले. सर्वसाधारण उद्योगांना ३ वर्षे कर माफ असेल तर या उद्योगांना प्रत्यक्ष नफा सुरू होईल त्या वर्षापासून पुढील ५ वर्षे टॅक्स माफ करण्यात आला, तर इतर कारखान्यांसाठी हा कालावधी तीन वर्षे ठेवण्यात आला. (भारतात जे वेगवेगळे टॅक्स भरावे लागतात तसे तिथे नाही. तिथे फक्त व्हॅट आहे. तो १७% आहे. याशिवाय व्यक्तिगत आयकर आहे व कंपनीच्या नफ्यावर 'कॉपोरेट टॅक्स' आहे. कृषीवर ५% कर आहे.) मात्र उद्योगधंद्यांना शिथिलता दिल्यानंतर दोन गोष्टी घडल्या. एक, भाववाढ झाली व भ्रष्टाचार वाढला, जो माओच्या काळात नव्हता. त्याविरोधात तिथे प्रदर्शने झाली, पण ती दडपली गेली. (तिनानमन स्वेअर आंदोलन)

*अशा प्रकारची मानवीहक्कांबाबतही आंदोलने झाली का?*

मानवीहक्कांबाबत जाणिवा होत्या, मात्र सरकारी धोरण सरासरी जीवनमान उंचावण्यास योग्य आहे हे तेथील जनतेच्या लक्षात आले त्यामुळे विरोध तीव्र नव्हता. लोकांचे सरासरी दरडोई उत्पन्न वाढायला लागले आहे. मोठ्या शहरांमध्ये ते प्रतिवर्षी १०,००० डॉलर आहे. तर पश्चिमेकडच्या प्रदेशात ते ५००-४०० डॉलर आहे. तिचे तीन आर्थिक झोन तयार झालेत. पूर्व, मध्य व पश्चिम. चीन या उरलेल्या भागांचा विकास करण्यासाठी प्रचंड प्रमाणात मूलभूत सोयीसुविधा तेथे निर्माण केल्या जात आहेत. पूर्वेकडून आता मध्यप्रातांत विकास केंद्रित करण्यावर भर दिला जातोय.

*पायाभूत सोयीसुविधा आधी निर्माण करून नंतर परदेशी गुंतवणुकीला आमंत्रण दिले, की परकीय गुंतवणुकीला आधी प्रोत्साहन दिले?*

या दोन्ही गोष्टी एकत्रित होत गेल्या. एकाच वेळी सर्वत्र विकास साधण्यापेक्षा सुरुवातीला विशिष्ट प्रांतिक विकासावर त्यांनी भर दिला. कोणत्याही प्रांताचा विकास करताना निधीची आवश्यकता असतेच, त्यामुळे परकीय गुंतवणुकीच्या माध्यमातून निधी उपलब्ध झाल्यावर त्याचा वापर करून त्यांनी 'गाँगडाँग' हा हाँगकाँगजवळचा प्रांत विकसित केला. 'सेनझेन'- जो भाग तर पूर्वी चक्क मच्छिमारांचे शहर म्हणून ओळखला जायचा - त्यावर लक्ष केंद्रित केले. या शहराची निर्यात संपूर्ण भारताच्या निर्यातीपेक्षा जास्त आहे. शिवाय स्वस्त कामगारांची उपलब्धता ही मोठी उपलब्धी त्यांच्याकडे होती. या कारणामुळे आणखी आणखी परकीय उद्योगधंदे त्यांच्याकडे येतच गेले. यातून पूर्व चीन विकसित केला.

त्यासाठी ५० ते ६० हजार कि.मी. द्रूतगती मार्ग त्यांनी तयार केले. प्रत्येक वर्षी जवळजवळ ५० कि.मी.ने ट्रेन स्पीड वाढवला जातो. तेथील हाय स्पीड ट्रेन ताशी ३५० कि.मी.

वेगाने धावतात. त्याकरता रेल्वे रुळांचे बांधकाम, रेल्वे इंजिनांची बांधणी, रस्त्यांचे सपाटीकरण अशा विविध गोष्टी त्यांनी विकसित करायला सुरुवात केली. जगभरात नावाजलेल्या कंपन्यांपैकी एक म्हणजे हेअर ही कंपनी. जगातील सर्वात मोठी व्हाइट गुड्स मॅन्युफॅक्चरिंग कंपनी म्हणून ती ओळखली जाते. तसेच, शांघाय सिल्क ग्रूप हा जगातला सर्वात मोठा गार्मेंट एक्स्पोर्टर म्हणून नावाजलेला आहे.

यातून त्यांची अर्थव्यवस्था इतकी मजबूत होत गेली, की अमेरिकेतील मंदीच्या काळात चीनने अमेरिकेलाच आठशे बिलियन डॉलरचे कर्ज दिले आहे. यामुळेच अमेरिकन अध्यक्ष मधुनमधून चीनला भेट देऊन त्यांना गोंजारत असतो. असेच कर्ज त्यांनी जपानलाही दिले आहे.

*चीनने मात्र ऑलिपिंकचे शिवधनुष्य लीलया पेलले. हे त्यांनी कसे साध्य केले?*

चीनमध्ये कोणताही प्रकल्प राबवताना झपाट्याने नियोजन करून त्याची अंमलबजावणी केली जाते. कारण एकच राजकीय पार्टी. व दुसरे जीव ओतून, झटून काम करण्याची प्रवृत्ती. या योजना राबवण्यासाठी त्यांच्याकडे 'थिंक टँक' असतात. त्यात वरच्या थराचे सरकारी अधिकारी व त्यांचे मदतनीस असतात. कामाच्या तारखा, नियोजित कालावधी, आयत्या वेळच्या समस्या, नैसर्गिक आपत्ती यांचा विचार करून ध्येय निश्चित केले जाते व ते ठरवलेल्या कालावधीतच पूर्ण केले जाते. काम हे एक आव्हान म्हणून स्वीकारण्याची त्यांची प्रवृत्ती आहे. झपाटल्यासारखे काम करण्याची वृत्ती वाखाणण्यासारखी आहे. उदा. ऑलिंपिकच्या वेळी सहा महिने आधी त्यांची स्टेडियम्स बांधून तयार होती. त्यावेळी आदरातिथ्य-शिक्षण यावर पण भर दिला गेला. त्यासाठी टॅक्सी चालक, किरकोळ हॉटेलवाले, दुकानदार यांना विशेष प्रशिक्षण देण्यात आले. त्यांना इंग्रजी बोलण्याचे प्रशिक्षण देण्यात आले.

स्वयंसेवकाचा गट निर्माण केला गेला. प्रत्येकाला आपला प्रांत, कामाचे क्षेत्र वाटून देण्यात आले. परदेशी पाहुण्यांशी कसे वागायचे, त्यांना कशी मदत करायची यांसारखी कामे याअंतर्गत शिकवण्यात आली. विमानतळावर उतरल्यापासून कुठे जायचे, कसे जायचे याविषयी माहिती प्रवाशांना मिळेल अशी व्यवस्था केली गेली. मेट्रो रेल्वे होतीच. त्यात १३-१४ लाइन्सची भर टाकण्यात आली. बसेसची संख्या वाढवण्यात आली. वाहतुकीवर ताण पडू नये म्हणून नवीन रस्ते बांधले. अशा तऱ्हेने










समर्थ, समृद्ध व संपन्न चीन अशी स्वत:ची जगभर प्रतिमा त्यांनी तयार केली.

*यामागे साम्यवादी राजवटीचा प्रभाव असेल का?*

असे म्हणता येऊ शकते. एखाद्या योजनेसाठी नुसती जमीन संपादन करताना सुद्धा आपल्याकडे अनेक समस्या निर्माण होतात. विविध पक्षांचे संमिश्र सरकार असल्याने मतभेद असतात आणि पुनर्वसनाची शाश्वती नसल्याने आपल्याकडे योजनांना विरोध होतो. त्यामुळेही प्रकल्प लांबतात वा अपूर्ण राहतात. तिथे मात्र सेझसारखे प्रकल्प राबवताना विस्थापितांना घरे, त्यांच्या नोकरीची-उत्पन्नाची व्यवस्था आधी केली जाते. त्यामुळे विरोध फारसा होत नाही. काही ठिकाणी तर अतिरिक्त मूलभूत सोयी त्यांनी गरजेआधीच उभारून ठेवल्या आहेत. उंच उंच इमारती रिकाम्या उभ्या आहेत. त्यामुळे नवीन प्रकल्प राबवताना विस्थापितांची सोय लगेचच होते. त्यात तिथे वाहतूक व्यवस्था स्वस्त आहे. जवळजवळ पंधरा शहरांत मेट्रो रेल्वे आहे. २ ते ४ युआन म्हणजे भारतीय चलनात १५ ते ३० रुपयांत ५० ते ६० किलोमीटर अंतर सहज पार करता येते. तेही वातानुकूलित गाड्यांमधून! बसमधून ७ ते १४ रुपयांत शहरात कुठेही फिरू शकतो. शांघाय शहराच्या एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत सात रुपयेच मोजावे लागतात. पण त्याचबरोबर लोकांचे सरासरी उत्पन्न वाढल्याने महागाईपण वाढली आहे. १९९० साली त्यांनी सेवाक्षेत्रही स्वतंत्र केले. किरकोळ आणि घाऊक व्यापारवरचे नियंत्रण उठवले. अर्थात, त्यांच्या किमतीवर सरकारी नियंत्रण आता नाही. फक्त औषधांच्या किमतीवर सरकारी नियंत्रण आहे.


*चीनमध्ये अनेक इंडस्ट्री आल्या. त्या आणताना, ते तंत्रज्ञानही मिळावे असा आग्रह चीनने धरला. याबाबत काय सांगता येईल?*

फॉरेन डायरेक्ट इन्व्हेस्टमेंटबद्दल सांगायचे तर, आधी त्यांनी हायर टेक्नॉलॉजी इंडस्ट्रींना प्राधान्य दिले. यांगत्स्ये नंदीवरचे जे प्रसिद्ध धरण आहे. त्यावर वीस गेगावॅट इतकी वीजनिर्मिती होते. यासाठी त्यांनी टर्बाइन्स टाकली ती दोन टप्प्यांत टाकली. त्यातली पहिली पंधरा टर्बाइन्स होती त्यासाठी त्यांनी दोन परदेशी कंपन्यांकडून टेक्नॉलॉजी मिळवली आणि अट अशी टाकली की त्यांनी टेक्नॉलॉजी ट्रान्सफरही करायला पाहिजे. त्यातून शांघाय इलेक्ट्रिक व आणखी एक कंपनी यांनी ती टेक्नॉलॉजी आत्मसात केली. मग पुढचे दहा टर्बाइन्स उभारताना चिनी कंपन्यांना आधीच्या दोन्ही परदेशी कंपन्यांसह टेंडर भरायला परवानगी होती. कमी टेंडरमुळे काम चिनी कंपनीला मिळाले. त्यातून पुढची टर्बाइन्स स्वबळावर उभी केली. त्यांचे म्हणणे आहे, की आधीच्या पंधरा टर्बाइन्सइतका किंवा थोडा सरसच आमचा दर्जा आहे. अशा रीतीने ते पुढे जात चालले होते.

आता परिस्थिती अशी आहे, की उत्तर-पूर्व चीनमध्ये त्यांनी स्वत:ची खाजगी विमाने बनवायला घेतली आहेत. अमेरिकेची 'बोइंग' व युरोपची 'एअरबस'ही खाजगी सेवा जशी आहे तशीच प्रायव्हेट एअरक्राफ्ट चीन गेल्या काही वर्षांत बनवत आहे. त्यामुळे टेक्नॉलॉजी ॲब्सॉर्बशनमध्ये काही गोष्टी अशाही होतात, की शांघाय विमानतळापासून २५-३० किलोमीटर प्रवासासाठी त्यांनी 'मॅग्लेव' म्हणजे चुंबकीय तत्त्वावर चालणारी वेगवान ट्रेन सुरू केली. उद्देश हा, की येणाऱ्या परकीयांना प्रगती दाखवत आकर्षित करता येते. ही ट्रेन सिमेन्सने बनवली. परंतु पुढच्या ट्रेन्सकरता चीनने सिमेन्सकडून टेक्नॉलॉजी मागितली किंवा एकत्रित प्रकल्प करू असे सुचवले तेव्हा सिमेन्सने त्यास







**चौधरी दांपत्याच्या मागे दिसते ती चिन्यांनी ताजमहालची केलेली कॉपी!**

नकार दिला. त्यामुळे अशाप्रकारच्या ट्रेन त्यांना पुन्हा निर्माण करता आल्या नाहीत.

त्यात तंत्रज्ञानाची कॉपी करणे त्यांच्या रक्तात आहे. उदाहरणार्थ, शेवरेलेट ही कंपनीची गाडी चीनने 'गीनी' नावाने कॉपी केली होती. त्यांचे कारखानेही बाजूबाजूला होते व त्यांना सुट्या मालाचा पुरवठा करणारा पुरवठादार पण तिथलाच होता. पूर्वी अशासारखी नावे, उत्पादने असलेल्या बऱ्याच कंपन्या असायच्या. पण या गोष्टीचे तिथे अजिबात वावगे वाटत नाही.

*परदेशी बाजारपेठ मिळवताना डुप्लिकेट प्रॉडक्ट बनवले व परदेशांत स्वस्तात विकले असे घडले का?*

हो, पण त्याबाबत परदेशांत लोकांमध्ये जागरुकता दिसल्यामुळे ते ब्रॅन्ड न पाठवता त्यांनी नवीन ब्रॅन्ड तयार केले. 'मीडिया' हा स्वत:चा ब्रॅंड निर्माण केला. त्याद्वारे तयार केलेले टी.व्ही., फ्रीज आज अमेरिकेच्या बाजारात लोकप्रिय आहेत. असे अनेक आहेत. सुरुवातीला त्याबद्दलही साशंकता होती, पण काही लोकांनी ते घेतले व चांगले चालले. यामुळे विश्वास वाढला. शिवाय वस्तू स्वस्तही होत्या. हे शक्य झाले ते तिथे वॅट कमी व रोजगार मूल्य कमी यामुळे असे करणे शक्य होते. अमेरिकेत रोजगार दर आहे तासाला ५० डॉलर तर चीनमध्ये तासाला साधारण ३ डॉलर. याचा एकत्रित परिणाम म्हणजे अवजारे पण स्वस्त मिळतात. त्यामुळे सुरुवातीची यंत्रसामग्री परदेशातून घेऊन नंतर त्याची तंतोतंत प्रतिकृती तयार केली जाते. अशा पद्धतीने त्यांनी जगभर बाजारपेठ काबीज केली आहे.

*स्वातंत्र्याची जाणीव होत आहे का?*

तसे चित्र वरून तरी सर्व 'ऑल इज वेल' आहे असे वाटते. मध्ये मध्ये जनतेचे अभिप्राय त्याबाबतीत गोळा केले जातात. त्यांना प्रश्न विचारले जातात. उदा. चीनमध्ये पुन्हा जन्म घ्यायला आवडेल का? वगैरे. त्यात ७५% लोकांनी आवडेल असे उत्तर दिले असे तिथे दाखवले जाते. पण खरे-खोटे सांगता येत नाही. तिथे सरकारचा प्रभाव आहे. पण आज परदेशात शिकायला गेलेले तरुण चीनमध्ये परत येतात हे मात्र खरे आहे. जे सरकारी खर्चाने गेले त्यांना परत येणे भाग असते. पण स्वखर्चाने गेलेल्यांवर तसे बंधन नसताना ते परत येत आहेत कारण परदेशातील सर्व सोयी, भरभराट त्यांना स्वत:च्या देशात सहज उपलब्ध होत आहे. त्याशिवाय परदेशी कंपन्यांबरोबर इथे आलेली परदेशी माणसे सुद्धा इथे स्थायिक होण्यासाठी उत्सुक आहेत. हा बदल इथे नवा आहे. याचं कारण विकासाचा दर सर्वत्र खालावत असताना चीनने मात्र तो वाढवत ठेवून ११% पर्यंत नेला आहे. त्यामुळे आपले भवितव्य सुरक्षित आहे या भावनेने इथे परदेशी रुजत आहेत.

*चीन विकासाचा दर कायम ठेवू शकेल का? त्यासाठी त्यांच्या योजना काय आहेत?*

चीनने आता विकसनशील राष्ट्रे व अविकसित राष्ट्रे

यांच्याशी व्यापारी धोरण वाढवण्याचे ठरवले आहे. त्याचाच परिणाम म्हणून केनिया, नायजेरिया वगैरे देशांचे प्रमुख वरचेवर चीनला भेटी देतात.

त्यांनी १९० परदेशी वस्तूंवरील टॅरिफ कमी केला आहे. शिवाय, तेथील उद्योगधंद्यांनी अफ्रिकन देशात गुंतवणूक करायला सुरुवात केली आहे. विशेषत: तेलक्षेत्र. जवळजवळ १६०० उद्योजक आफ्रिकेत तेलक्षेत्र, कृषी, खाणकाम, मॅन्युफॅक्चरिंग सेवाभूत सोयी या उद्योगधंद्यात गुंतवणूक करत आहेत.

*चीनच्या सांस्कृतिक-सामाजिक जीवनाविषयी काही सांगू शकाल का?*

तिथे प्रामुख्याने बौद्ध धर्माचे पालन केले जात असले तरी चीनमध्ये ख्रिश्चन व इतर धर्मीयही आहेत. मॉनेस्ट्रीबरोबर चर्चचेही महत्त्व त्यांच्या सामाजिक जीवनात आहे. परंतु, चीनच्या पूर्वेकडील विकसित भागातील नवीन पिढी मात्र धर्मापासून दूर होत चालली आहे. त्यांनी समृद्धी हाच आपला धर्म मानला आहे. या पिढीचा देवावर फारसा विश्वास नाही. आधीच माओच्या काळात धर्म ही अफूची गोळी आहे या विचाराचे संस्करण झालेच होते. त्यामुळे धार्मिक विधी, पूजाअर्चा यांना तरुणांच्या जीवनात फारसे स्थान नाही. पारंपरिक वस्त्रे फक्त सणासमारंभांतच परिधान केलेली दिसतात. जात, धर्म हे प्रकार नसल्याने लग्ने ही आर्थिक स्तर पाहून केली जातात. जोडपी शक्यतो स्वत:च्या आईवडिलांच्या घराच्या आसपासच घरे घेतात. पाळणाघर हा प्रकार तिथे नसल्याने मुलांची काळजी घेण्याच्या दृष्टीने ते सोयीचे पडते. आर्थिक सुबत्तेलाच महत्त्व देण्याच्या तरुणांच्या प्रवृत्तीमुळे आणि संसाराला धार्मिक अधिष्ठान नसल्यामुळे पूर्व चीनमध्ये घटस्फोटाचे प्रमाण वाढत आहे.

*भारत महासत्ता होऊ शकते का?*

हो. पण २०२० पर्यंत वगैरे नाही. त्यासाठी प्रथम मूलभूत सोयीसुविधा वाढवल्या पाहिजेत. वीजक्षमता मोठ्या प्रमाणात निर्माण झाली पाहिजे. मुंबईसारख्या आर्थिक राजधानीच्या शहरात रस्त्यांची अवस्था अत्यंत भयानक आहे. अशा वातावरणात परकीय उद्योगधंदे इथे वाढू शकत नाहीत. शिवाय, इथे कारखाने उभे करताना बऱ्याच गोष्टींची सुचिभूर्तता पाळावी लागते. त्यात वेळ जातो. ते लवकर झाले पाहिजे. आता आता त्या दिशेने पावले पडत आहेत. आपल्याकडे किनारपट्टीच्या प्रदेशाचा आपण म्हणावा तसा उपयोग केलेला नाही. भारतात गुजरातमधील विकासदर हा चीनपेक्षा जास्त आहे. गुजरातमधील राजकारण बाजूला ठेवून त्यांचे विकासाचे मॉडेल इतर राज्यांनी स्वीकारले पाहिजे. कोणत्या प्रकल्पाला प्राधान्य द्यायचे ते प्रामुख्याने ठरवले गेले पाहिजे. शिवाय जात,धर्म, पंथ या चक्रातून राजकारण बाहेर पडले पाहिजे. त्यामुळे ज्या नॉन व्हॅल्यू ॲडेड ॲक्टिव्हिटी होतात त्याचे विपरीत परिणाम संपूर्ण देशावर होतात व पर्यायाने प्रगतीला खीळ बसते. खरे तर, जपान व चीन यांच्यासारखे आत्यंतिक मृत्यू भारताने पाहिलेले नाहीत. दुसऱ्या महायुद्धात जपान संपून गेला. परंतु काहीतरी जगाला दाखवण्याच्या इर्षेने पुन्हा उभा राहिला. भारतात जातीमुळे व्यवसायस्वातंत्र्य नव्हते. त्यामुळे नशिबाला दोष देत 'आलिया भोगासी' प्रवृत्ती वाढीस लागली. त्यामुळे संघर्षासाठी लागणारी जिगर निर्माण झाली नाही. कोणत्याही देशाची प्रगती दोन गोष्टींमुळे होते. एक म्हणजे नवीनतेचा ध्यास व दुसरे म्हणजे जगासाठी स्वस्त कामगार उपलब्ध असलेला देश अशी प्रतिमा तयार होणे.

नवीनतेच्या ध्यासातून अमेरिकेने २८० ते ३०० नोबेल पुरस्कार प्राप्त केलेत. युनायटेड किंगडम् व जर्मनीने ८० ते १०० नोबेल पुरस्कार मिळवलेत, जपानने १०, तर भारत व चीन यांनी फक्त दोन ते तीन. अमेरिकेत दरवर्षी ९५,००० पेटंट घेतली जातात. ते सर्व प्राथमिक संशोधनाच्या संदर्भात असतात. उदा. टेप जाऊन सीडी आला वगैरे. जर्मनीत दरवर्षी १०,००० पेटंट घेतली जातात. दक्षिण कोरियात ९,५०० तर चीनमध्ये २,२०० आणि भारतात फक्त ७२० पेटंट घेतली जातात. हे चित्र बदलण्याची गरज आहे. भारताचा विकास घडवताना विकासाचा वेग वाढवणे, मूलभूत सेवांना प्राधान्य देऊन नंतर पेटंट व नोबेल या दीर्घकालीन योजना म्हणून राबवल्या पाहिजेत.

**ANIL CHOUDHARI**
No.90, Ximei Road,
Wuxi National High-tech Industrial
Development Zone, Wuxi , Jiangsu,
People's Republic of China 214028.
ChoudhariAM@LNTEBG.com
Choudhari20@gmail.com

**लतिका भानुशाली**
latikabhanushali@yahoo.co.in

# नक्षलवाद आज आणि काल

## देवेंद्र गावंडे

दहशतवादानंतर देशाच्या सार्वभौम एकतेला आणि अखंडतेला बाधा पोचवणारी सर्वात मोठी गोष्ट कोणती असेल तर ती 'नक्षलवाद' आहे. या चळवळीमुळे सारा देश गृहयुद्धाच्या खाईत ढकलला जातो की काय, अशी शंका आता येऊ लागली आहे. पश्चिम बंगालमधील नक्षलबारी या लहानशा गावात १९६७ मध्ये चारू मुजुमदार, कानू संन्याल व जंगल संथाल या तिघांच्या नेतृत्वात भूमिहीनांनी उठाव केला आणि एक सशस्त्र राजकीय आंदोलनाला प्रारंभ झाला. हे खरे असले तरी या उठावामागील कारणे शोधण्यासाठी स्वातंत्र्यपूर्व आणि स्वातंत्र्योत्तर काळात झालेल्या विविध आंदोलनाकडे नजर टाकावी लागते. मुळात नक्षलबारीच्या उठावाची बीजे या काळात घडलेल्या अनेक घटनांमध्ये दडलेली आहेत. नक्षलबारीचा उठाव उत्स्फूर्त वा स्वयंस्फूर्त नव्हता. १९६७ मध्ये झालेल्या या उठावामागे किमान तीन दशकांचा कम्युनिस्ट चळवळीचा इतिहास आहे. या इतिहासाच्या काही टप्प्यांवर नजर टाकली, की या उठावामागील कारणे आपोआप लक्षात येतात.

भारतात कम्युनिस्ट पक्षाचा उदय १९२०च्या दशकात झाला. या पक्षाने ४०च्या दशकात ग्रामीण भागांतील दोन मोठ्या लढ्यांचे नेतृत्व केले होते. तेव्हाच्या अविभाजित बंगालमध्ये 'ते भागा' आंदोलन आणि दक्षिणेत 'तेलंगणा' आंदोलन. ही दोन्ही आंदोलने उभी करण्यात कम्युनिस्ट पक्षाचा सक्रीय सहभाग होता. 'ते भागा'चा अर्थ तीन भाग असा होतो. तेव्हा बंगालमध्ये भातशेतीवर राबणाऱ्या मजुरांचे खूप शोषण होत होते. शोषणकर्ते प्रामुख्याने बंगाली जमीनदार होते. या जमीनदारांच्या शेतीवर राबणाऱ्या मजुरांना पिकाचा अर्धा हिस्सा मजुरी म्हणून दिला जात असे. उरलेले अर्धे पीक जमीनदाराच्या वाड्यात जायचे. १९४६ ते ५१ या काळात कम्युनिस्ट पक्षाने मजुरांना सोबत घेत उत्पादित पिकांचे तीन भाग पाडण्यात यावेत, त्यातील एका भागावर मालकांचा हक्क असेल तर उरलेले दोन भाग मजुरांचे असतील, अशी मागणी घेऊन आंदोलन सुरू केले. पुढे याच आंदोलनातून कसेल त्याची जमीन (नांगोल जार जोमी तार) अशी मागणी पुढे करण्यात आली. शेकडो वर्षांची जमीनदारी-प्रथा नष्ट व्हावी याविरुद्ध बंगाली बरगादारांनी पुकारलेला हा पहिला लढा होता. अशाच पद्धतीचे आंदोलन तेलंगणामध्ये सुद्धा झाले. तेव्हाच्या हैदराबाद संस्थानामध्ये वजन ठेवून असलेल्या जमीनदारांनी गरीबांची पिळवणूक सुरू केली होती.

वेठबिगारी, बळजबरीने करवसुली, गावातील जमीनदारांची दादागिरी, पिळवणूक व सावकारीमुळे भूमिहीन शेतमजूर, अल्पभूधारक शेतकरी अतिशय त्रस्त होते. या साऱ्यांनी कम्युनिस्टांच्या नेतृत्वात या अत्याचाराविरुद्ध लढा उभारला. १९४६-४७ या काळात झालेले हे आंदोलन प्रामुख्याने नलगोंडा, वारंगल आणि खम्मम जिल्ह्यात अतिशय तीव्र होते. या दोन्ही आंदोलनाचा शेवट वेगवेगळ्या पद्धतीने झाला. बंगालमधील 'ते भाग' आंदोलन संपवण्यासाठी तत्कालीन मुस्लिम लीग सरकारने मजुरांची मागणी मान्य करत 'बरगादार कायदा' अंमलात आणला. या भूसुधार कायद्यामुळे न्याय मिळेल असे मजुरांना वाटले. त्यामुळे त्यांनी आंदोलनातून अंग काढून घ्यायला सुरुवात केली. प्रत्यक्षात बंगालमध्ये जमीनसुधार कायद्याची अंमलबजावणी काही प्रमाणात व्हायला आणखी वीस वर्षे जावी लागली, असे इतिहास सांगतो.

तेलंगणामधील आंदोलनाचा शेवट कम्युनिस्ट पक्षाच्या नेत्यांमधील अंतर्गत वादामुळे झाला. हे आंदोलन सुरू असतानाच १३ सप्टेंबर १९४८ ला केंद्राने लवकर पाठवून हैदराबाद संस्थान ताब्यात घेतले. तेव्हा सामान्य लोकांनी निजामाच्या विरोधात घोषणा देत भारत सरकारचे तसेच नेहरू आणि पटेलांचे स्वागत केले. या जल्लोषामुळे कम्युनिस्टांचे मजुरांचे आंदोलन झाकोळले गेले. याचवेळी काही डाव्या नेत्यांनी बदललेली परिस्थिती लक्षात घेता, आता पक्षाने राजकीय मुख्य धारेत प्रवेश करून निवडणुका लढवल्या पाहिजेत असे मत व्यक्त केले तर काहींनी काँग्रेसच्या विशेषत: नेहरूंच्या- विचारांचे समर्थन करायला सुरुवात केली. या वादातच पक्षाने १९५२ च्या पहिल्या सार्वत्रिक निवडणुकीत पक्षाचे उमेदवार रिंगणात उतरवले. तेव्हापासून कम्युनिस्ट पार्टी ऑफ इंडिया (सीपीआय)मध्ये सुरू झालेला हा वाद नंतरचे दशकभर सुरू राहिला. पक्षातील तरुण नेत्यांनी काँग्रेसला विरोध करायला सुरुवात केली. राजकीय विचारधारा जोपासण्याच्या नादात तेलंगणाचे आंदोलन मागे घेणे चुकीचे होते. आंदोलन थांबल्यामुळे भूमिहीनांना जमीन वाटपाचा कार्यक्रम जवळजवळ बंद पडला असे या तरुण नेत्यांचे मत होते. काँग्रेस पक्ष जमीनदारांचे व औद्योगिक घराण्यांचे हित जोपासणारा आहे. या पक्षाच्या मागे जाऊन जमीनसुधार कार्यक्रम अंमलात आणता येणार नाही व पक्षही वाढू शकणार नाही. काँग्रेसला विरोध करूनच जमीनसुधार कार्यक्रम पुढे नेता येईल अशी भूमिका मांडत ज्योती बसू, चारू मुजुमदार, सुशीतल राम चौधरी यांनी १९६८ मध्ये मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाची (सीपीएम) स्थापना केली. यानंतर एकाच वर्षाने चारू मुजुमदारांनी वेगळी विधाने करायला सुरुवात केली. निवडणुका, कायदे, न्यायालये म्हणजेच प्रामुख्याने लोकशाहीच्या मार्गाने जाऊन भूमिहीनांना कधीच जमीन मिळू शकणार नाही अशी भूमिका त्यांनी मांडली. देशाच्या घटनेत 'राइट टू प्रॉपर्टी' मान्य करण्यात आल्याने त्याचा फायदा भूमिहिनांपेक्षा जमीनदारांनाच होईल असे त्यांचे म्हणणे होते. यातूनच मग चारू मुजुमदारांनी दार्जिलिंग जिल्ह्यातील सिलीगुडी उपविभागामध्ये, तीन पोलिस ठाण्यांच्या हद्दीत येणाऱ्या गावातील नागरिकांना सोबत घेऊन सशस्त्र उठाव केला. यात केवळ नक्षलबारीच नाहीतर फांसीदेवा व खारीबारी या गावातील शेतमजूर मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. मुजुमदारांसोबत कानू संन्याल व या भागातले आदिवासी नेते जंगल संथाल यांनी या उठावाचे नेतृत्व केले आणि नक्षलवादी चळवळीचा जन्म झाला.

सन १९६७ ते ६९ या काळात चारू मुजुमदारांच्या विचाराने प्रेरित होऊन अनेक तरुण या चळवळीत सामील होत गेले व ठिकठिकाणी हिंसक आंदोलने व्हायला सुरुवात झाली. आंध्र प्रदेशातील श्रीकाकुलम, पार्वतीपुरम, ओरिसामधील कोरापूट, बिहार आणि उत्तर प्रदेशातील काही भागांत ही आंदोलने होत होती. १९६९ मध्ये मुजुमदारांच्या पुढाकाराने या सर्व भागातील नेत्यांनी एकत्र येत सीपीएमपासून वेगळी चूल मांडली व सीपीआय (एमएल) या पक्षाचा जन्म एक मे रोजी झाला. यानंतरची तीन वर्षे म्हणजे १९७२ पर्यंत या भागात मोठ्या प्रमाणावर हिंसक आंदोलने सुरू होती. या पक्षाचे नेते विरुद्ध पोलिस अशा चकमकी सातत्याने होत राहिल्या. प्रामुख्याने बंगाल व आंध्रमध्ये उठावाचे प्रमाण जास्त होते. १९७२ मध्ये चारू मुजुमदारांना अटक झाली आणि अटकेत असतानाच त्यांचा मृत्यू झाला. त्यांच्या मृत्युनंतर या पक्षाची वाटचाल थंडावली. १९७५च्या आसपास ही चळवळ बरीच माघारली व या काळात हा पक्ष विखुरलासुद्धा गेला. या पक्षाच्या झेंड्याखाली राहून गरीबांना न्याय देता येत नाही हे लक्षात आल्यानंतर आंध्रप्रदेशातील डाव्या विचारांच्या पण लोकशाही व्यवस्था न मानणाऱ्या नेत्यांनी एकत्र येत १९७९ मध्ये पीपल्स वॉर ग्रुपची स्थापना केली. यासाठी कोंडापल्ली सीतारामय्या यांनी पुढाकार घेतला. याच

काळात बिहार, तेव्हाचा मध्यप्रदेश, बंगालमधील नेत्यांनी वेगवेगळी नावे धारण करत प्रस्थापितांच्या विरोधात सशस्त्र लढा सुरूच ठेवला. बिहार व आताच्या झारखंड तसेच छत्तीसगडमध्ये चळवळ चालवणाऱ्या युवकांनी, माओवादी कम्युनिस्ट सेंटरची (एमसीसी) स्थापना करून लढा सुरू ठेवला. पीपल्स वॉर ग्रुपची (पीडब्ल्यूजी) स्थापना करणाऱ्या नेत्यांनी प्रारंभापासून दूरदृष्टी दाखवत, मध्य भारतातील विविध राज्याच्या सीमावर्ती भागाला दंडकारण्य झोन संबोधून, या भागात चळवळीची बांधणी सुरू केली.

ओरिसा, बस्तर, झारखंड, कर्नाटक, महाराष्ट्र, बंगाल व आंध्रप्रदेशाच्या सीमावर्ती भागात, १९७५ ते ८० च्या दशकात प्रशासन नावाची गोष्टच अस्तित्वात नव्हती. प्रामुख्याने आदिवासीबहुल असलेल्या या भागात जंगलाचे प्रमाण भरपूर होते. या भागाची भौगोलिक रचना अतिशय किचकट व दुर्गम शब्दाला साजेश होती. नेमकी हीच बाब पीडब्ल्यूजीच्या नेत्यांनी हेरली व आदिवासींमध्ये जागृती करायला प्रारंभ केला. तेव्हा या भागातल्या जंगलावर व्यापारी, ठेकेदार, वनाधिकारी यांचे राज्य होते. या सर्वांकडून आदिवासींवर अन्याय केला जात होता. या अन्यायाविरुद्ध प्रतिकार करायचा असेल तर हाती शस्त्रे घेणे आवश्यक आहे हे नक्षलवाद्यांनी आदिवासींना पटवून दिले. शहरी संस्कृतीपासून दूर, नागरी जीवनाचा गंध नसलेला व अन्याय काय आहे हेही ठाऊक नसलेला या सीमावर्ती भागातील समाज, सहजपणे या चळवळीच्या पाठीशी गेला नाही. त्यासाठी नक्षलवाद्यांना बरेच प्रयत्न करावे लागले. आपण गरीबांच्या हितासाठी काम करतो हे दाखवण्यासाठी नक्षलवाद्यांनी या सीमावर्ती भागात बंदुकीच्या जोरावर जमिनीचे वाटप सुरू केले. अन्याय करणाऱ्या बड्या ठेकेदारांना तसेच व्यापाऱ्यांना उघडपणे शिक्षा द्यायला सुरुवात केली. सार्वजनिक वितरण-प्रणालीअंतर्गत येणारे धान्य गरीबांना मिळत नाही हे लक्षात आल्यावर स्वस्त धान्य दुकाने लुटून धान्याचे वाटप करणे सुरू केले. या सीमावर्ती भागात तेंदूपानाची तोडणी व बांबू कापणे हा गरीबांच्या उत्पन्नाचा प्रमुख आधार आहे हे लक्षात आल्यानंतर तोडणी व कापणीची मजुरी वाढवून दिली. यासाठी बंदुकीचा सर्रास वापर करण्यात आला. प्रशासनाचे अस्तित्व नाही. पोलिस यंत्रणासुद्धा तोकडी आहे. अशा स्थितीत या भागात काम करणाऱ्या ठेकेदार व व्यापाऱ्यांना नक्षलवाद्यांपुढे शरण जाण्याशिवाय दुसरा पर्यायच नव्हता. यातूनच मग या चळवळीकडून हिंसक घटना घडू लागल्या. त्याची झळ आपल्याला बसत नाही पण फायदा मात्र होतो आहे, हे आदिवासींच्या लक्षात आल्यावर ते सुद्धा या चळवळीच्या मागे उभे राहिले. यामुळे दंडकारण्य भागात पीपल्स वॉर ग्रुपचा दबदबा निर्माण झाला. या भागात राहणारे लोक लहानसहान प्रश्न सोडवण्यासाठी नक्षलवाद्यांकडे धाव घेऊ लागले. लोकांची साथ मिळत आहे हे लक्षात आल्यावर नक्षलवाद्यांनी स्वायत्त सरकारची कल्पना समोर केली. यातून काही भागांत त्यांनी लोकसहभागातून सिंचनासाठी तलाव उभे केले. 'शासन शत्रू आहे, तेव्हा त्याला विरोध करा' असे स्थानिकांच्या मनावर बिंबवण्यात नक्षलवादी यशस्वी ठरले.

१९९०च्या दशकात नक्षलवाद्यांनी आंध्रप्रदेशातील आपला मुख्य तळ छत्तीसगड व महाराष्ट्राच्या सीमेवर असलेल्या अबुजमाड पहाडावर हलवला. येथे गनिमी युद्धाच्या प्रशिक्षणासोबतच संघटनेशी संबंधित सर्व कामे करण्यात येऊ लागली. १९९३ मध्ये पीपल्स वॉर ग्रुपमध्ये फूट पडली आणि काही नक्षलवादी, जनशक्ती दलमच्या माध्यमातून वेगळी चूल मांडून मोकळे झाले. ही फूटसुद्धा वैचारिक मतभेदामुळेच पडली होती. अवैध वृक्षतोडीला विरोध करायचा की समर्थन, असा एक मुद्दा त्यात होता. नेमके येथूनच या चळवळीचे स्वरूप हळूहळू बदलत गेले. हा बदल लक्षात येताच चळवळीची वैचारिक बैठक मांडणाऱ्या ज्येष्ठ नक्षलवाद्यांनी देशभरातील नक्षलवाद्यांना एकत्र आणण्यासाठी हालचाली सुरू केल्या. नुकताच मारला गेलेला या चळवळीचा प्रवक्ता आझाद याने यासाठी पुढाकार घेतला. भूमिगत राहून काम करणाऱ्या आझादने या एकत्रीकरणासाठी देशभर दौरे केले. सर्वांची समजूत काढण्यात त्याचा मोठा सहभाग होता. त्याच्याच पुढाकाराने २००३ मध्ये अबुजमाड पहाडावर देशभरातील नक्षलवाद्यांची एक महासभा घेण्यात आली. या सभेला सर्व गटाचे नेते हजर होते. यातच विलिनीकरणाचा निर्णय घेण्यात आला. मात्र तो अंमलात यायला वर्ष जावे लागले. २००४ मध्ये 'भारतीय कम्युनिस्ट पार्टी माओवादी' या झेंड्याखाली देशभरातील नक्षलवादी एकत्र आले व माओवादी म्हणून ओळखले जाऊ लागले. या चळवळीची संघटनात्मक रचना मात्र पीडब्ल्यूजीसारखीच राहिली. दंडकारण्य भागात नक्षलवाद्यांचा प्रभाव जसा वाढला तसा त्यांचा बीमोड करण्यासाठी सुरक्षा दलांचा वावरसुद्धा वाढला. या भागात आधी फक्त एकाकडे शस्त्र होते. त्यामुळे


हुकूमत अबाधित होती. नंतर दुसऱ्या बाजूला शस्त्र आले आणि वर्चस्वाचा खरा सामना सुरू झाला. असा सशस्त्र संघर्ष सुरू झाला की कोणत्याही भूमिगत संघटनेसमोर पडतो तोच प्रश्न या संघटनेला सुद्धा पडला. आपल्या बाजूने उभी राहणारी जनता महत्त्वाची की संघटना असा हा प्रश्न होता. साहजिकच नक्षलवाद्यांनी संघटनेला प्राधान्य दिले व जनतेला वाऱ्यावर सोडले. सुरक्षा दले व नक्षलवादी असा सामना सतत होऊ लागल्याने त्यात सामान्य जनताही नाहक होरपळू लागली. या जनतेला आधार देण्याऐवजी संघटना कशी अभेद्य राहील याकडेच नक्षलवाद्यांनी जास्त लक्ष दिले. जनता जितकी त्रस्त होईल व परिस्थिती जेवढी जास्त चिघळेल तेवढा फायदा आपल्यालाच मिळेल हा नक्षलवाद्यांचा हेतू होता. चिघळत्या परिस्थितीत जनतेने साथ सोडू नये म्हणून नक्षलवाद्यांनी मग केवळ दहशतीचा मार्ग अवलंबला. बंदुकीच्या धाकावर जनतेला दहशतीत ठेवायचे व आपल्या विचारसरणीचा एक दिवस विजय होईल असे सांगत राहण्याचे धोरण या चळवळीने अंगीकारले. यामुळे जनतेच्या भल्यासाठी चळवळ हा मुख्य हेतूच बाहेर फेकला गेला. या भागातील मजुरांना मजुरी मिळते की नाही, धान्य मिळते की नाही हे प्रश्न या चळवळीतून आपोआप बाद होत गेले. दहशत पसरवण्यासाठी सामान्य जनतेला  व पोलिसांना ठार करायचे हेच एकमेव उद्दिष्ट या चळवळीकडे शिल्लक राहिले.

वर्गशत्रूच्या नावावर आपल्याच बांधवांचे बळी घेतले जात आहेत हे सामान्य जनतेच्या लक्षात आले. तोवर फार उशीर झाला होता. हे ज्यांच्या लक्षात आले त्यांनी दोन्हीकडील शस्त्रांच्या कचाट्यातून बाहेर पडण्याचा प्रयत्न करून बघितला पण कुणाला यश आले नाही. गेल्या दशकभरातील या चळवळीचा प्रवास बघितला तर दहशत माजवणे व खंडणी गोळा करणे या पलीकडे या चळवळीकडून काहीच घडले नाही. पंचवीस वर्षांपूर्वी या चळवळीवर विश्वास ठेवणाऱ्या सामान्य जनतेला सुद्धा या संघर्षात 'राम' नाही असे आता वाटते. पण त्यांना काहीच करता येत नाही. गेल्या दशकभरात नक्षलवाद्यांनी विकासकामांना विरोध हा अजेंडा प्रभावीपणे राबवला. तो योग्य नाही असे वाटूनही त्यांना काही म्हणायची हिंमत जनतेकडून होऊ शकली नाही. संघटित सशस्त्र टोळीपुढे कुणाचेच चालत नाही हे लक्षात आल्यावर नक्षलवाद्यांनीसुद्धा जनता सोबत आहे असा खोटा प्रचार करत संघटनेचा गाडा आजवर हाकत आणला आहे. या चळवळीला जनतेविषयी अजिबात आपुलकी नाही. आता त्याची जागा दबावाने घेतली आहे. दंडकारण्य भागात असलेल्या व्यापाऱ्यांकडून, कारखानदारांकडून म्हणजेच भांडवलदारांकडून खंडणी गोळा करणे व गरीबांचे गळे कापणे हा एकमेव उद्योग सध्या नक्षलवाद्यांनी चालवला आहे.

सार्वजनिक वितरणप्रणालीतून येणारे जे धान्य नक्षलवादी आधी जनतेत वाटायचे, आता तेच धान्य नक्षलवाद्यांचा शिधा म्हणून वापरले जात आहे. आदिवासींच्या जमिनी उद्योगपतींच्या ताब्यात जाऊ देणार नाही असे सांगत कारखानदारीला विरोध करणाऱ्या नक्षलवाद्यांनी, आता नियमित खंडणी देणाऱ्या कारखान्यांना परवानगी देणे सुरू केले आहे. गडचिरोली जिल्ह्यातील सूरजागड भागात हे घडले आहे. तात्त्विक विचार मागे पडून केवळ बंदुकीला महत्त्व आल्याने या चळवळीतील वैचारिक बैठक असलेल्या सदस्यांची संख्या गेल्या दशकभरात झपाट्याने कमी होत गेली. विचारसरणीचा प्रचार झाल्यानंतर त्याने प्रभावित होऊन चळवळीत सामील होणे वेगळे आणि महिन्याला वेतन मिळेल या आमिषावर हातात बंदूक घेऊन चळवळीत दाखल होणे वेगळे. अलीकडच्या काळात वेतन मिळेल या आशेवर चळवळीत दाखल झालेल्यांची संख्या मोठी आहे. याशिवाय तरुण व तरुणींना जबरदस्तीने सामील करून घेण्याचे प्रकार सुद्धा वाढले आहेत. विचाराचा कोणताही गंध नसलेल्या व्यक्तीच्या हाती शस्त्र दिले तर चुका होणारच. नेमके तेच आता या चळवळीत घडू लागले आहे. दोन दशकांपूर्वी चळवळीवर जेव्हा विचारसरणीचा प्रभाव होता तेव्हा कुणाला शिक्षा देताना दहादा विचार व्हायचा. आता सर्रास गळा कापला जातो. दहशत कायम ठेवण्यासाठी या हत्या नेमाने घडवून आणल्या जातात. तेव्हा वैचारिक मतभेद झाले तरच सरकारसमोर आत्मसमर्पण करण्याचे धाडस या चळवळीतले सदस्य दाखवत. आता अनेक नक्षलवादी पायी फिरणे, वेळेवर जेवण न मिळणे, तब्येतीकडे दुर्लक्ष अशा कारणासाठी आत्मसमर्पण करत असल्याचे निदर्शनास आले आहे. महिला नक्षलवाद्यांचे आत्मसमर्पण तर केवळ लैंगिक छळ असह्य झाल्याने होत असल्याचे आढळून आले आहे. यावरून या चळवळीतून विचारसरणी केव्हाच हद्दपार झाली आहे हेच लक्षात येते. लोकशाहीला विरोध, त्यामुळे विकासाला विरोध हे या चळवळीचे सूत्रसुद्धा आता काळाच्या ओघात पार बदलले आहे. लोकशाही व्यवस्थेतील सर्वात

मोठा घटक असलेल्या निवडणुका उधळून लावण्याच्या घोषणा नक्षलवादी करत असले तरी प्रत्यक्ष कार्यक्षेत्रात कुणाला निवडून आणायचे, त्यासाठी किती खंडणी घ्यायची यासारखी धोरणे नक्षलवादी उघडपणे ठरवत असतात. आपल्या प्रभावक्षेत्रातील लोकप्रतिनिधींनी चळवळीवर भाष्य करू नये यासाठी हे प्रकार केले जातात. सोबतच पैसाही महत्त्वाचा घटक असतोच. नक्षलवाद्यांनी मोठी खंडणी घेऊन स्वत:च्या प्रभावक्षेत्रात त्याच व्यक्तीला मतदान घडवून आणल्याची अनेक उदाहरणे आहेत. विकासकामांना विरोध हे नक्षलवादांचे अजूनही प्रभावी हत्यार असले तरी यामागील गणिते परिस्थिती बघून ठरवली जातात. जनतेने विकासकामात सहभागी होऊ नये असे बजावणाऱ्या नक्षलवाद्यांना, कंत्राटदारांनी केलेली कामे चालतात कारण त्यातून खंडणी मिळते. त्यांचे प्रभावक्षेत्र असलेल्या भागाचा पायाभूत विकास झाला तर जनता पाठीशी राहणार नाही अशी भीती या चळवळीला सतत वाटत आली आहे. यामुळे अशा प्रकरणात खंडणी उकळताना अतिशय सावध पावले उचलली जातात. या साऱ्या बाबी लक्षात घेतल्या तर ज्या उद्देशाने ही चळवळ सुरू झाली, तोच नाहीसा झाल्याचे स्पष्टपणे दिसून येते. खंडणीखोरांची संघटित टोळी असे स्वरूप झालेली ही चळवळ, आता राजकीय उद्दिष्टाच्या गप्पा करत लाल किल्ल्यावर झेंडा फडकावण्याचे स्वप्न बघू लागली आहे; म्हणूनच देशाची अखंडता धोक्यात आली आहे.

**देवेंद्र गावंडे**
लोकसत्ता ऑफिस,
रेड क्रॉस भवन,
चंद्रपूर
भ्रमणध्वनी– ९८२२४६७७१४




# सूर्य होता रात्रीला!

**मेधा आलकरी**

**मूल्य ४०० रुपये    सवलतीत २४० रुपये**

लेखिकेचा गेल्या पंधरा वर्षांत वीस देशांमध्ये वास्तव्यासाठी वा पर्यटनाच्या निमित्ताने जो प्रवास झाला त्याचं हे अनुभवलेखन. यामधून त्या त्या देशातील लोकजीवन, पर्यटनस्थळं, वन्यजीवन वाचायला मिळतं. सहप्रवासाची जाणीव आणि तरीही एकटे होण्यातला सुटेपणा ह्यांची इथे होणारी सरमिसळ सहजसुंदर आहे. मध्यपूर्व आशिया, आशिया, आफ्रिका, युरोप आणि ऑस्ट्रेलिया अशा पाच खंडांतील वैविध्यपूर्व चवींचं हे पंचखाद्य!

# मार्क्स आणि गांधी

## शिरीष वीरकर


एकोणिसाव्या शतकामध्ये दोन महान मानवांचा जन्म झाला. कार्ल मार्क्स आणि महात्मा गांधी. कार्ल मार्क्स हे प्रकांडपंडित. त्यांनी दास कॅपिटल, कम्युनिस्ट मॅनिफिस्टो असे दोन ग्रंथ जगाला दिले. मूळ संकल्पनेप्रमाणे, श्रमजीवींचे राज्य जगामध्ये यावे असे मार्क्सचे तत्त्वज्ञान. याला अनुसरून चीन आणि रशियामध्ये राजकीय उलथापालथ झाली. लेनिननंतरच्या काळात स्टॅलिन यांनी रशियामध्ये तर माओ, झेंडाग यांनी चीनमध्ये मार्क्सवादाचा अवलंब करून राजसत्ता उलथवली आणि कम्युनिस्ट राजसत्तेची उभारणी केली. समतेचा संदेश देणारी, आंतरराष्ट्रीय बंधुत्व वाढवणारी, मार्क्सच्या आर्थिक उत्पन्नावर आधारित अशी सत्ता जगभर लोकप्रिय झाली. फिडेल क्रॅस्ट्रो, चे जेवेरा आदी कितीतरी मार्क्सवादी क्रांतिकारक यामधून पुढे आले. सतराव्या शतकामध्ये इंग्लंडमध्ये झालेल्या औद्योगिक क्रांतीत संपूर्ण मानवजातीचे जीवन बदलण्याची क्षमता होती. मानवाला लागणाऱ्या जिन्नसांचे मास प्रॉडक्शन देणारी एक नवीन खाजगी उद्योगप्रणाली इंग्लंडमध्ये तेव्हा उदयाला आली. या औद्योगिक धंद्यांना लागणारे भांडवल अर्थातच तत्कालीन श्रीमंतवर्गाचे होते. सुरुवातीच्या काळात विविध यंत्रांचा शोध लागल्यानंतर फॅक्टरीमध्ये काम करणारे कामगार असा एक नवा वर्ग उदयाला आला. त्याआधीच्या काळात सरंजामशाही राजवटीतील एक तर सरकारमध्ये काम करणारे कर्मचारी अथवा सरंजामशाहीच्या घरी काम करणारे कामगार अशीच कामगारांची ओळख होती. परंतु बघता बघता हे चित्र खाजगी उद्योगधंद्यांनी पालटून टाकले. कॅपिटालिझमच्या या उदयामध्ये सुरुवातीच्या सुमारे ५० ते १०० वर्षांच्या काळात कामावर जाणाऱ्या कामगारांवर अन्वनित अत्याचार झाले.

इंग्लंडमधील या सर्व आर्थिक पार्श्वभूमीवर कार्ल मार्क्सने आपले विचार मांडले. भारतामध्ये जसे म्हटले जाते बळीचे राज्य येवो म्हणजे शेतकऱ्यांचे राज्य यावे याच धर्तीवर कामगारांच्या राज्याची स्वप्ने कार्ल मार्क्स यांनी तेव्हा पाहिली. त्या काळात कार्ल मार्क्सचे विचार हे क्रांतिकारी होते, कारण कामगारांची होणारी पिळवणूक पाहून, व्यथित होऊन त्यांनी आदर्श राज्य यावे अशी कल्पना मांडली. भांडवलशाहीच्या जुलमाखाली भरडले जाणारे कामगार आणि त्यांचे कुटुंबीय यापासून मुक्तता हवी असेल तर आर्थिक समतेच्या आधारे कामगारांनी स्वत:चे राज्य अस्तित्वात आणावे अशीच ही संकल्पना होती.

कार्ल मार्क्सना त्यांच्या संकल्पनेमध्ये समता आणि बंधुभाव या दोन्हीची आवश्यकता होती. जगातील सगळ्या कामगारांनी एक व्हावे अशी विलक्षण कल्पना त्यांनी मांडली. फ्रेंच राज्यक्रांती आणि इंग्लंडमधील भांडवलशाहीचा उदय या पार्श्वभूमीवर कार्ल मार्क्सचे विलक्षण असे क्रांतिकारी विचार जगापुढे आले. कामगारांचे राज्य आल्यानंतर हळुहळू अनुशासन आणून राज्य करणारी यंत्रणा कमी व्हावी अशी मूळ संकल्पना कार्ल मार्क्स यांनी मांडली. State should wither away असे त्यांचे विचार. सुरुवातीच्या काळातील सत्तेचे केंद्रीकरण गेल्यानंतर वेगवेगळ्या ठिकाणच्या गावा/शहरांतील अर्थव्यवस्था स्वप्रयत्नांनी आर्थिक स्वावलंबी होईल आणि सत्तेचे विकेंद्रीकरण झाल्यावर राज्यशासन ही संकल्पनाच आवश्यक राहणार नाही, असे कार्ल मार्क्सचे स्वप्न होते.

महात्मा गांधी नावाच्या एका विलक्षण व्यक्तीचा उदय याच शतकात झाला. गांधीजींकडे मार्क्सप्रमाणे अर्थव्यवस्थेला छेद देणारी कोणतीही क्रांतिकारी विचारप्रणाली नव्हती. महात्मा गांधी यांनी नैतिकता, सत्य आणि अहिंसा या पूर्वापार चालत आलेल्या मूल्यांची उपासना आणि जोपासना केली. महात्मा गांधींनी अन्यायविरुद्ध चळवळी केल्या त्याचबरोबर स्वातंत्र्याची सुद्धा चळवळ केली. गांधीजींचे प्रमुख हत्यार हृदयपरिवर्तन हे होते. कामगारांच्या लढ्याचे नेतृत्व करतानासुद्धा मालकाच्या हृदयामध्ये नैतिक आचरणाबाबत बदल घडवण्याची आकांक्षा ते बाळगून होते.

आज एकविसाव्या शतकाच्या सुरुवातीला या दोघांची तुलना करता, आपल्याला आढळून येईल, की सबंध जगामध्ये मार्क्सवादाचा उपयोग करून चालवलेली शासनयंत्रणा लोप पावली आहे. रशियामध्ये गोर्बाचेव्ह यांनी ग्लासनॉस्त (स्वातंत्र्य) आणि पेरीस्त्रॉयका (पुनर्रचना) अशी हाक दिली आणि रशियन कम्युनिझम मोडीत काढला तर माओच्या चीनने कम्युनिझमच्या पडद्याआड भांडवलशाहीचा स्वीकार केला. जगातील सर्व कामगार कधीच कामगार चळवळीत एकत्र आले नाहीत. संघटित झालेल्या कामगारांनी युनियनच्या माध्यमातून भांडवलीशाहीशी टक्कर देत स्वत:ला जास्तीचे आर्थिक फायदे मिळवले परंतु त्या उत्पन्नाचे वाटप असंघटित क्षेत्रातील कामगारांना केल्याचे ऐकिवात नाही. भांडवलशाहांना सुद्धा कामगारांच्या शक्तीपुढे नरमाईचे धोरण घेणे भाग पडले संघटित कामगारांना संरक्षण देणारे कायदे फारसे अंमलात आले नाहीत.



कामगारांमध्ये जी समता आणि जो बंधुभाव निर्माण व्हावा अशी मार्क्सची इच्छा होती ती प्रत्यक्षात उतरू शकली नाही. एका अर्थाने, मार्क्सने जे स्वप्न पाहिले आणि ज्या स्वप्नासाठी मानवेंद्र रॉय, ज्योती बसू, कॉम्रेड श्रीपाद डांगे अशा कितीतरी भारतीय नेत्यांनी आपले आयुष्य वेचले. वर्गकलहातून आलेल्या विषमतेमधून क्रांती घडून येईल असे वाटले, मात्र त्यातून समता आणि बंधुभावाची पहाट प्रत्यक्षात कधीच उदयाला आली नाही. रशिया आणि चीनमध्ये पोलादी पडद्याआड खूप मोठ्या प्रमाणावर नरसंहार झाला; कामगारांच्या आयुष्याची नंदनवने काही फुलली नाहीत. मार्क्सवादाकडे तारुण्यात वळलेले अनेक विचारवंत भविष्यामध्ये हळुहळू मार्क्सवादापासून दूर केल्याचे आपल्याला दिसून येते. रशिया आणि चीन येथील राजवटी कोसळल्या किंवा पडल्या हा काही मार्क्सवादाचा पराभव नाही, परंतु मार्क्सने जे स्वप्न पाहिले ते साकार होऊ शकले नाही हा त्यांचा पराभव. मार्क्सने असे सुद्धा म्हटले होते, की भांडवलशाहीला जे भांडवल लागत जाणार आहे ते कमी पडल्याने भांडवलशाही मोडकळीला येईल. मात्र भांडवलशाही प्रकल्पासाठी लागणारे भांडवल जनतेकडूनच गोळा करण्याच्या 'शेअर कॅपिटल' या अभिनव कल्पनेचा जन्म झाला त्यातच भांडवलशाहीचे यश निश्चित झाले. तेही व्यवहाराच्या कसोटीवर वेगवेगळ्या ठिकाणी उतरले नाही असे दिसून येते.

कार्ल मार्क्सचे विचार आणि त्या अनुषंगाने उदयाला आलेल्या कम्युनिस्ट विचारसरणीची तुलना गांधीजींच्या विचारसरणीशी करता असे प्रकर्षाने आढळून येते, की कार्ल मार्क्सचे विचार हे त्या काळाशी सुसंगत होते. एका विशिष्ट कालखंडात त्या विचारांची मोहिनी सबंध जगावर पडली. परंतु आज मागे वळून पाहिले की मार्क्स आणि मार्क्सवाद हे दोघेही मागे पडले आहेत असे जाणवत आहे. गांधीजींनी त्यांच्या चळवळीला नैतिकतेची जोड दिली. अहिंसा,

स्वातंत्र्य, सत्य या मूल्यांचा उद्घोष त्यांनी केला. महात्मा गांधींपासून प्रेरणा घेऊन मंडेला, मार्टिन ल्यूथर किंग यांनी अन्यायाविरुद्ध लढे दिले. गांधी गेले तरी गांधीवाद आज सगळ्या जगाला व्यापून राहिला आहे. याचे मुख्य कारण गांधीजींनी स्वत:च्या विचारांबाबत जनतेत जाऊन प्रयोग केला, चळवळी उभारल्या. नैतिकतेचे अधिष्ठान स्वत:च्या आचरणाने लोकांसमोर ठेवले. संत, नेते, राजकारणी वैचारिक युगपुरुष अशी गांधीजींची प्रतिमा होत गेली. मार्क्सने सिद्धांत मांडला. त्या सिद्धांतानुरूप चालणारी अर्थव्यवस्था उभारण्यासाठी स्वत: मार्क्सने चळवळ करून यश मिळवल्याचे दिसून येत नाही. मार्क्सने विचार दिले, पण गांधीजींनी मने जिंकली म्हणून वैचारिक पगडा काही काळ राहू शकतो पण हृदयाशी आंतरिक नाते जोडून तो भातृभावाची उभारणी गांधीजींनी प्रत्यक्षात करून दाखवली. या दोन्ही महान पुरुषांना वंदन करताना विसाव्या शतकाचा सगळा पट आणि सगळे घटनाक्रम आपल्यासमोर आल्याशिवाय राहत नाहीत.

गांधीजींचा अर्थवाद हा खेड्यातील बारा बलुतेदार पद्धतीवर आधारित होता. 'स्वयंपूर्ण खेडे' हे त्यांचे स्वप्न होते. स्वदेशीबरोबर चरख्याचे महत्त्व सुद्धा त्यांनी बिंबवले. 'चरखा चला चलाके लेंगे, स्वराज्य लेंगे' असा न्यारा पण त्यांनी दिला. प्रत्यक्षात चरखा चालवून कापडाची निर्मिती होणे दुरापास्त होते. त्यामुळे चरखा हा केवळ स्वदेशी चळवळीशी निगडित असा सिम्बॉल ठरला. त्याचे अर्थकारणाशी नाते जुळू शकले नाही. औद्योगिक क्रांतीमुळे बलुतेदार पद्धत ही कल्पनाच मोडीत निघाली. थोडक्यात गांधीजींच्या स्वप्नातील खेडे खऱ्या अर्थाने प्रत्यक्षात येऊ शकले नाही. शहरातून येणाऱ्या औद्योगिक मालावर खेड्याची जनता विसंबून राहू लागली. अर्थकारण हा गांधीजींचा विषय कधीच नव्हता. म्हणून गांधीजींनी पुरस्कार केलेले अर्थकारणसुद्धा टिकू शकले नाही.

मार्क्सवादाची कास धरलेल्या चीन, रशिया यांनी भांडवलशाहीचे अनुकरण करायला सुरुवात केली. कामगारांची समता आणि त्यावर आधारलेली आर्थिक सत्ता प्रत्यक्षात कधीच अस्तित्वात नव्हती. जॉन ऑरवेल यांनी म्हटल्यानुसार कम्युनिझममध्ये All are equal but some are more equal हेच खरे झाले. जुन्या काळातील राजे–संस्थानिक जाऊन पक्षाचे नेते त्याच पद्धतीने सोयीसुविधा स्वत:साठी घेऊ लागले. मार्क्सला अभिप्रेत असलेली समता आणि बंधुत्व प्रत्यक्षामध्ये कधीच अस्तित्वात आले नाही. त्याची कारणे पाहिली असता असे दिसते, की मार्क्सने समता, बंधुत्व आणि आर्थिक समतेचा किंवा साम्यवादाचा विचार जगाला दिला असला तरी मार्क्सने स्वत: कधीच कुठलीही चळवळ उभारलेली नाही. लेनिन आणि माओ यांनी मार्क्सचे तत्त्वज्ञान त्यांना पाहिजे त्या पद्धतीने अंगिकारले. स्टॅलिनच्या काळात अर्थकारणाच्या नावाखाली हजारो लोक बळी गेले आणि लाखो लोकांचे जीवन उद्ध्वस्त झाले. जगातील कामगारांनी एक होण्याऐवजी–बंदुकीच्या जोरावर–कामगारांच्या नावाखाली काही नेत्यांनी सत्ता राबवली असाच इतिहासाचा मागोवा घेतला असता दिसून येते.

मुक्त अर्थव्यवस्था आणि भांडवलशाहीचे गुणगान करून कम्युनिस्ट राज्य करू लागले, परंतु मुक्त अर्थव्यवस्थेचे माहेरघर असलेल्या अमेरिकेतच या पद्धतीला घरघर लागली. १९३० नंतर २००८–०९ साली अमेरिकेत जी मंदी आली ती सावरण्यासाठी मुक्त अर्थव्यवस्थेला बगल देऊन अमेरिकेने अर्थव्यवस्थेत हस्तक्षेप केला आहे. युरोपमध्ये सुद्धा याच पद्धतीने मंदीची लाट आली असून सध्याचे चित्र असे आहे, की साम्यवाद, समाजवाद, भांडवलशाही हे सगळेच वाद मोडीत निघाले आहे. अर्थकारणामध्ये राष्ट्राचा हस्तक्षेप अर्थव्यवस्थेवर वाढत असून आर्थिक राष्ट्रवादच फोफावत आहे. भविष्यात त्यालाही घरघर लागण्याची शक्यता आहे.

महात्मा गांधींनी नुसतेच विचार दिले नाहीत तर स्वत: चळवळ उभारली. मार्क्सने तत्त्वज्ञान आणि विचार जगाला दिले. गांधीजींच्या नेतृत्वाखाली नैतिकतेचे भान असलेल्या समाजाची एक मोठी फळी निर्माण झाली. शत्रूवर हृदय–परिवर्तनाने विजय मिळवणे असा विलक्षण गांधीवाद आणला. अर्थकारणाशी संबंधित समता, बंधुत्व जगातील कामगार या सगळ्या गोष्टी कालबाह्य झाल्या असल्या तरी नैतिकतेच्या आधारे स्वातंत्र्याची मशाल गाधीजींनी पेटवली. सत्याग्रह आणि नैतिकतेचे भान ठेवून नेतृत्व आणि राजकारण करता येते गांधीजींनी जगाला दाखवले. कार्ल मार्क्स आणि गांधीजी दोघेही गेले, मार्क्सवाद कालबाह्य झाला. पण गांधीजींनी म्हटल्यानुसार सत्य आणि अहिंसा ही तत्त्वे मानवाची मूलभूत मूल्ये असल्याने त्याचे उद्गाते गांधी आणि गांधीवाद सतत प्रकाशात आहे.

**शिरीष वीरकर**
१३ ए/८, १५ गव्हर्नमेंट क्वार्टर्स,
के. खाडे मार्ग, हाजी अली, मुंबई – ४०० ०३४.
shirish.veerkar@gmail.com

# बदलते विश्व

## डॉ. यशवंत पाठक

सध्या सारे, सारेच बदलतेय. बदलांविषयी भरपूर बोलले जातेय. लिहिले जातेय. मूल्यांकडे बघण्याची दृष्टी बदलत चाललीय. मोठमोठ्या मराठी लेखकांच्या महोत्सवाला ज्येष्ठ नागरिकांची गर्दी असते. तरुण वर्ग त्यात रमत नाही. पॉप्युलर लेखकांची मोहिनी पन्नाशीनंतरच्या पिढीत अधिक दिसते. नेमाने होणाऱ्या साहित्योत्सवांना वा अभिजात कलोत्सवांना उतरती पिढी हजेरी लावते. नोस्टॅल्जियात रमणारेही सेवानिवृत्त असतात. नव्या मुलांना या साऱ्याबद्दल फारसे कुतूहल नसते. असे कुतूहल शाळेमध्ये जागृत करण्याचा हेतुपुरस्सर यत्न केला जातो, पण तो फक्त फोटोपुरता उरतो. एखाद्या कवीची कविता हजारो विद्यार्थ्यांनी गायिली! त्यात आपला मुलगा झोतात कसा येईल याचा विचार पालक करतात. म्हणून त्या कवीचा काव्यसंग्रह वाचणारी किती मुले आहेत? व्याख्याने आता बाद झालेली दिसतात. गणेशोत्सवातील अनेक व्याख्यानमाला इतिहासजमा झाल्या आहेत. याला फार थोडे अपवाद आहेत. व्याख्यानांना येणारा श्रोतृवृंद हा फारसा युवा नसतो. ही तक्रार नाही किंवा टीका नाही, हे वास्तव आहे. याचा विचार फक्त माध्यमाच्या संदर्भात करून चालणार नाही. हे बदल सर्वत्र होताहेत. त्या त्या पातळीवर अनेक बदल होताहेत. त्याचे रूप लक्षात घ्यावे लागते. ते समजून घ्यायला सध्या सारे नकारार्थी रिकामे आहेत. 'वेळ नाही' हा नपुंसकी प्रयोग करण्यात साऱ्यांना धन्य वाटते. मोबाइलवरही 'दोन मिनिटे बोलू शकतो का?' असा प्रश्न विचारणाऱ्याने कोणता विचार केला असेल, नाही सांगता येत. ऐकणाऱ्याच्या विचारांचा प्रश्नच नाही. मोबाइलने ऐहिक अंतर पुसून टाकले. पण उथळ खोल्यांना अकारण प्राधान्य दिले. कुणीही मोबाइल वापरतो ही जर क्रांती मानली जाते, तर मोबाइलवरल्या बडबडीतून विचारमंथन होत नाही, हीही क्रांतीच मानावी लागते. नवीन काही सुचण्यासाठी जो सृजनशील एकांत लागतो तोच आम्ही हल्ली मारून टाकतो. म्हणून इंटरनेटवर चुकीची माहिती लादली जाते. ज्ञानाच्या नावाखाली गोडाऊन लोड केली जातात, पण त्यांची सत्यासत्यता कोण पडताळून पहाणार? माहितीचे ज्ञानात आणि व्यवस्थापनात कधी रुपांतर होणार? फक्त प्रश्नच पाहत बसायचे?

लहान मुलाला मॅगी आवडते. पिझ्झा, बर्गर, सॉसमध्ये तो अडकतो. त्याला सकस पौष्टिक लाडू नकोच असतो. त्याला सांगूनही तो ब्रेड-जॅम पसंत करतो. सक्तीने मुलाच्या डब्यात पोळी-भाजी देण्याच्या सूचना पालकांना शाळेतून

येतात. तेव्हा पालक चिडतात. नोकरीत आई-बाबा असतात. चार प्रकार स्वयंपाकात करायला आईला सवड नसते. त्यात पोळीला काकू, ताई, बाई असतात. भाजी कशीबशी आईने परतायची, बाबांनी ती डब्यात भरायची. काही मुलांच्या डब्यात फरसाण असते. ते यावर खूष असतात. अशा अन्नाने चिमुरड्यांचे भरणपोषण कसे होणार? मुलांना 'अन्न हे पूर्णब्रह्म! उदर भरण नोहे, जाणिजे यज्ञकर्म ।।' ही जाणीव निर्माण करण्यासाठी पालकांमध्ये सुयोग्य संवाद असावा. मुलाच्या व्यक्तिमत्त्वाला त्याचे भान त्याच्या लक्षात आणून द्यायची नैतिक जबाबदारी पालकांची आहे. आजच्या फॅशन परेडच्या खोट्या वातावरणात आईवडिलांना आपला मुलगा 'सेलिब्रेटी' व्हावासा जाम वाटतो. ते त्याच्यासाठी काहीही करतात. यात मुलगा वाढत नाही. त्याला असह्य एकाकीपण येते.

सध्या सर्वत्र 'स्पर्धा' माजल्याची ओरड चालू आहे. स्पर्धा पूर्वीही होती. वैदिक काळातही होती; पण ती स्पर्धा नव्हती. ती मैत्रीची घट्ट वीण होती. ज्याच्यापाशी जे चांगले असेल तो ते विनामूल्य द्यायचा. म्हणजे त्याचे मूल्य मूल्यात नसे. म्हणून गुरुशिष्य परंपरा आजही वंदनीय ठरते. काय विकावे आणि काय विकू नये याचा सद्‌विवेक त्यात होता. पंचगव्य विमानातून नेऊन विदेशात श्रावणी करणाऱ्या बातम्या इंटरनेटवर वाचताना कीव वाटते. देवतांच्या स्थापना, मंदिरे या बातम्या मार्केटिंगच्या जमान्यात होतात. यामधे दर्शन किती आणि प्रदर्शन किती ते आपण ठरवा. बाकीची प्रार्थनास्थळे भारतात उभारली जाऊनही त्याच्या बातम्या नसतात. काय मार्केटिंग करावे आणि काय न करावे हे समाजाने ठरवावे लागते. त्यासाठी समाज सुजाण असला पाहिजे. तो पदव्यांनी होत नाही. जबर पदवीधारक अशिक्षितानेही लाजावे असे वागतात. आपल्या पदाचे वर्म त्यांना उमगतच नाही. त्या पदावर 'मी' आहे. म्हणजे 'मी' अधिक विचारप्रगल्भ झाला पाहिजे. त्यासाठी त्या 'मी'ने अभ्यासात गुणवत्तेच्या भराऱ्या घेतल्या पाहिजेत. पद हे मला अनुभवसमृद्ध करण्यासाठी आहे, हे लक्षात न घेता पदाला लागणारे कागद कसेही गोळा करून ते पद पदरात पाडून घेण्यासाठी वाट्टेल ते करणे नि पदभारानंतर वाटेल ते करणे. यामुळे स्पर्धा रोगट झाल्या आहेत. ज्या उभारत्या कोवळ्या वयात निसर्गात बागडायचे, अभ्यासात वाढायचे, खेळात फुलायचे, अंगभूत कलांत बहरायचे- याने खरे तर आपण सुंदर होतो- ते सोडून मेकअपच्या चिखलात कोवळ्यांना रुतवायचे नि त्यांच्या डोळ्यांभोवती काळी वर्तुळे रंगवायची, वयाला येतील असे शब्द देण्याऐवजी त्यांच्याकडून काहीही वदवून घ्यायचे, काहीही गाऊन घ्यायचे नि त्यांचे हळवे निरागसपण पालकांनी करपून टाकायचे अशा स्पर्धा बालपण हरवतात. आतला सच्चा सूर जाळून टाकतात. अंगभूत उपज खलास करतात. चार दिवसांच्या कौतुकाच्या लोंढ्यात तो जो वाहून जातो, तो नंतर काठालाही सापडत नाही. अशा स्पर्धा सर्वत्र आहेत. 'इमोशनल अत्याचार' उघड दाखवले जातात. यापेक्षा त्याची कारणमीमांसा करताना तो जे गुण उधळतो, ते सर्व क्षेत्रांत दार्शनिक असल्यासारखे थाटात वावरतात. या स्पर्धा नसतात, ही गुण मारण्याची चेंबर्स असतात. याचा विचार केलाय का?

'करिअर' या शब्दाला सध्या चांदीपेक्षा भाव आहे. कशातही 'करिअर' आलेय. एखाद्या विषयातले नैपुण्य प्राप्त केल्यानंतर समाज त्यांना 'पंडित' असे म्हणत असे. आता जो तो 'पंडितवरेण्य' ठरलाय. ज्ञानाची जितकी चेष्टा आज चालली आहे, तितकी आजपर्यंत कधीही झाली नाही. ज्ञानाची आब कुणीही राखत नाही. जो तो पृष्ठभागावर चौफेर टोलेबाजी करतो. लोक टाळ्या देतात. मतामतांचा कानोसा घेत घेत बदलल्यासारखा आभास निर्माण करायचा. त्यांनाच सारखे स्टेज द्यायचे. जे खरे तपी आजही आहेत ते फारसे कुणाला ज्ञात नाहीत. कारण ते पुढे पुढे करीत नाहीत. आव त्यांना माहीत नाही. ते त्यांच्या विश्वात मस्त असतात. जे त्यांच्यापाशी जातात ते त्यांना नवे देतात. खरा करिअर करणारा आपल्यातल्या अस्सलतेला जपतो. तो निःसीम साधक असतो. आपल्या विद्येत आणि कलेत तो जीव ओततो. तोच त्याचा आयडॉल असतो. त्याच्या अभ्यासातून तो त्याला पाहत पाहत वाढतो. अशा वाढण्यातून जगणे लोभसवाणे बनते. हा विचार मन स्वच्छ ठेवतो. वेळेचा अपव्यय टळतो. जिज्ञासा उजवी ठरते. संवाद सत्संग होतो.

आजच्या व्यवस्थेत बदल होताहेत म्हणे. आश्रम जाऊन एसीरूम होताहेत. निरनिराळ्या आयत्या साधनांनी अभ्यास स्थूल झाला आहे. त्याला परीक्षेची सूज आली आहे. त्यात अभ्यासक्रमांचा गुंता अवघडच आहे. अभ्यास परीक्षा ओरिएंटेड झालाय. ऑन लाईन सर्व फॉर्म भरता येतात. ज्ञानाच्या समजावणीचे काय? इंटरनेटवरील माहितीने पाने भरून काढली. त्यातून मला काय समजले? साऱ्याला गती आलीय. मग आपल्या ग्रहणशक्तीला गती यायला हवी.

अभ्यास ट्यूशन क्लासच्या आणि कोचिंग क्लासच्या नळ्यांतून भरवला जातो. अशा व्यवस्थेत निर्मितीशील विचार कसा काय जन्मणार? सगळेच काही अभ्यासक्रमाच्या चौकटीतून वाढत नाहीत. कॉम्प्युटरने साऱ्याला विलक्षण गती दिली. सर्व क्षेत्रांत त्याने त्याची व्यवस्था निर्माण केली. पण त्याला बुद्धीची व्यवस्था लावता आलेली नाही. मेमरी टाकणे वेगळे आणि मेमरी निर्माण करणे वेगळे. तांत्रिकता इतकी आली की, सगळेच प्रश्न येस-नोच्या छोट्या कॉलममध्ये आपण बसवून मोकळे झालो. त्यामुळे जाणिवा विकसित झाल्या काय? विज्ञानाने समजून घेतलेली निर्सगातली प्रगल्भता आज आम्ही कितपत ध्यानात घेतली? तांत्रिक कसरतींमधून विविध व्हायरस निर्मून आम्ही आम्हालाच आजही हतबुद्ध केले. व्हायरसला घालवण्यासाठी अँटी व्हायरस आला. हा काही जय नव्हता. तो पश्चात्तापातला विजय होता. प्रोग्रॅमरच व्हायरस निर्मून फक्त आपले आपल्याला विकत राहिले. या मार्केटिंगच्या जमान्यात आम्ही आम्हालाच विकून टाकले. त्यामुळे अस्तित्वाचे सार्थ भान क्वचितांना आले. सच्ची प्रगल्भता दुर्मिळ ठरली. माझ्या लहानपणी एक म्हण होती, ''बडबडणाऱ्याचे खडे विकले जातात, अबोल्याचे मोती पडून राहतात.'' ज्यांच्यापाशी मोती आहेत, त्यांना आवाज आहे. हा आवाज ऐकणारे कान आज दुर्मिळ आहेत. ओवरी गेली. ओसरी गेली. अंगणही गेले. सारे काही बंद लॅच्च्या आत आले. आज सगळ्यांचे पाय सारखेच. मुलांचे बूट आजोबा वापरतात. बापाचा जोडा पोराच्या पायात आला म्हणजे तो कर्तासवरता झाला. आज बापाचा जोडा पोराला लहान पडतो. पिढ्या पिढ्यांतले नैसर्गिक अंतर तेच आहे. पण भावनात्मक अंतर वाढले. जगण्याला बहिरंगी आयामे भरपूर आली. तेवढ्यापुरते तेवढेच जगायचे नि सोडून द्यायचे हा विचार बळावला. यातून 'यूज अँड थ्रो' पॉलिसी पसरली.

मुळात महत्त्वाचे निरोप देण्याघेण्याचे काम मोबाइलचे. मोबाइलचा जन्म यासाठी झाला. पण 'महत्त्वाचे' याला अर्थ उरलाच नाही. 'महत्त्व' कशाला आहे आणि कशाला द्यायचे याचे भान आज नाही. जो तो जी जी बडबड मोबाइलवर करतो ती त्याची बडबड महत्त्वाची ठरते. अशा मोबाइलने समाजात काय काय अनर्थ निर्माण केले ते आपण अनुभवता आहात. काही काही तर इतके कशासाठी बोलतात ते कळेनासे होते. बोलण्यातून काही नवीन मिळते काय? बोलण्याची सार्थ तातडी खरोखर असते काय? जे आपण बोलतो त्यातून मनस्ताप होतो, का काही मिळते? मोबाइलवर लहान मुले जे गेम खेळतात त्यात शत्रुत्व निर्माण करण्याचीच भावना वाढते. कुठल्या ना कुठल्या वर्तुळाला पार करीत करीत जे अंतिम गाठायचे तेही जिद्दीपेक्षा आकसानेच अधिक असते. त्यामुळे मुलगा मोबाइलचे बटन बंदुकीसारखेच दाबतो. यातून तो पुढेमागे-मागेपुढे होत जातो. नि हिंस्त्र होतो. त्याच्यातली सभ्यता उर्मटपणात रूपांतरित होते. तो न ऐकता गेमवर आपले हिंसक राज्य प्रस्थापित करण्याच्या नादात आई-बाबांना मानीत नाही. खेळात तो विकारांसकट गुंततो. म्हणून त्याच्या हातून जर मोबाइल हिसकावून घेतला तर तो व्हायोलंट होतो. कुणालाही मारतो. यावर उपाय एकच असतो. त्याच्यातला चांगुलपणा संवादाने सतत जिताजागता ठेवणे. त्याच्याबरोबर वाचन करणे. त्याला निर्सगात नेऊन चांगल्यावाईटाचे भान नैसर्गिकपणे (सहजपणे) देणे.

आज माध्यमांनी बडबडण्याचा आठवडे बाजार मांडलाय. याची साऱ्या क्षेत्रांत कॉपी चाललीय. त्यामुळे भाषा उघडी पडलीय आणि तिची बरवळ झालीय. लहान लहान मुले धडाधडा सेलिब्रेटींच्या स्टाइलने बकबक करतात. त्याचे आपण अवाजवी कौतुक करतो. अनुभवाला साजेसे शब्द मुलाच्या मुखात येत नाहीत. प्रौढ शब्दांच्या अकाली वापर करून हे सारे 'मराठी भाषेचे शिवाजी' फारच दीनवाणे झालेले दिसतात. बोल्डनेसच्या नावाखाली अती उघड्यानागड्या बोलांनी वरवर सुखावतो. त्यामुळे तो व्यक्त होत नाही. तो त्याला नीट पाहत नाही. संवाद कसाही करायचा नि त्याला गप्पा हे गोंडस नाव द्यायचे. सध्या तर मुलाखतींच्या नावाखाली जो तो उठतो नि त्वरित स्वत:च्या जीवनाचे, जगण्याचे तत्त्वज्ञान मांडून व्यासवाल्मीकींचे आपण काका आहोत अशा थाटात वावरतो. त्याला (हातात वृत्तपत्र असल्याने) ठळक अक्षरांत पहिल्या पानावर प्रसिद्धी त्या क्षणांएवढीच मिळते. आश्चर्य याचे वाटते, याबद्दल अभ्यासकही दुर्लक्ष करतात. सबंध आयुष्य अभ्यासात घालवून शंकराचार्यांनी 'जीवो ब्रह्मैव नापर:' (जीव आणि ब्रह्म वेगळे नाहीत) किंवा 'जीवनम् सत्यशोधनम्' असे अद्वितीय मूल्य विश्वाला दिले. याचा अभ्यास करायला हवा. नव्या नव्या शैलीदार आकर्षक बाटल्या निर्मायच्या आणि त्यात पांचट अनुभव भरून आरशीने महोत्सवात मांडायच्या. स्वत:ला यथेच्छ मिरवून घ्यायचे. सत्संगाच्या नावाखाली तर काय काय भयंकर चालते! आणि

त्याला तुफान गर्दी होते. या साऱ्याचा भावार्थ एकच आहे, विचारगर्भ संवाद आज होत नाही. सगळ्यांनाच चार चाकीने वेगाने जायचेय. सिग्नल नको आहेत. जिथे जायचे ते सारे बिग बझार आहेत. मी चार चाकीने जाऊन माझा वेळ वाचवत नाही. तर उचापती करण्यात वेळ घालवतो. संवाद अहम् सारून असावा. संवादातून मने समजून घेता आली पाहिजेत. वरवरचे औपचारिक संवाद कलेवरे वाटतात. लोक तेच ते बोलतात. आजचे काही हुकुमी वाक्यप्रयोग समाजाच्या सर्व थरातील सन्माननीय आपल्या संवादात न कंटाळता योजतात. उदा.-''.....ही काळाची गरज आहे.'' ''शिक्षण पद्धतीत बदल झाला पाहिजे.'' ''पर्यावरणाचा ऱ्हास थांबवा. झाडे लावा.'' आपणच झाडांना उध्वस्त करायचे नि आपणच झाडे लावायची! या साऱ्यातला आत्मा हरवत चाललाय. त्यामुळे आपण आपल्यालाच परके आणि पोरके होत चाललोय.

संवाद स्पष्ट असावा. आपले मत यथातथ्य मांडावे हे मान्य. संवाद करताना पुन्हा पुन्हा 'मला वाटतं... मला हल्ली असं फार जाणवतं....' असे सारखे अधुनमधून म्हणायचे कारण नाही. तुम्हीच म्हणत असता ना! मग त्यात पुन्हा 'मी''मी'कशाला? त्याने आपण वस्तुनिष्ठ होण्याऐवजी अतिशयोक्त होत जातो. मुलाखती ऐकताना उबग येतो. काहींच्या 'मी'च्या संवादात एवढा दर्प असतो की, कांद्याच्या डोळ्यात पाणी येते. बोलताना नवीन काही सांगण्यासारखे असले तर ऐकणाऱ्याचे कान नवे होतात. त्याच्या विचाराला चालना मिळते. मनात मूलभूत प्रश्नांचे अंकुर फुटतात. आपल्या विचारांचा आपण एक नवा व्यूह तयार करतो. तो संवादातून अधिक निर्दोष बनतो. संवाद विचारप्रवण असला की कुविचारांना मनात थारा राहत नाही. मूलत: संवाद पारदर्शी असला की तो आपातत: धीट होतो. नवी पिढी आणि जुनी पिढी आजपर्यंत एकमेकांशी संवादत होत्या. त्यांच्या अभिव्यक्ती भिन्न होत्या. पूर्वीची पिढी अल्पाक्षरातून संवादायची. कारण तिचा बोलण्यापेक्षा कृतीवर अधिक भर होता. त्यामुळे वरवर अबोला वाटायचा. पण मुलाच्या वाढीस जे वातावरण आहे ते त्यांना झेपेल त्या परिस्थितीतून त्यांनी दिले. एकत्र कुटुंबात नेमून दिलेल्या कामांवर ते चोख होते. त्यांचा परस्परांवरील विश्वास हाच संवाद असे. त्यामुळे प्रत्येक बाबतीत बडबड नव्हती. जो तो आपले काम साऱ्यांचे मानायचा. नि व्यवहार स्वच्छ चालत. सारे स्वच्छ मनाने हे करीत. हे संवादावरील अवगुंठन लक्षात घेतले म्हणजे नवी पिढीही चांगली घडली. हे बघा ना! आज संवादाने बिघडणेच सर्व क्षेत्रांत जाहीर दिसतेय.

कुठल्याही काळी कुठल्याही क्षेत्रातले बदल ही वर्तमानाची हाक असते. त्याविषयी कुरकुरीचे कारण नाही. नव्या व्यवस्था येतात. वाडे सांभाळणे कठीण झाले. चरितार्थासाठी कुटुंबांतून कुटुंबे गावोगावी गेली. मानवी शक्ती संकुचित बनली. सुटसुटीत कुटुंबे येऊन ती परिस्थितीसदृश आलेल्या नव्या वातावरणाला सामोरी गेली. वाड्यातली भिजकी बोलकी आपुलकी कुटुंबांनी कितपत जपली याचे सर्वेक्षण जाहीर आहे. आपुलकीऐवजी शरीर यंत्र झाले. पॅकेजेस् पाठोपाठ पॅकेजेस् वाढली. जगण्यात अती तांत्रिकता आली. कंदिलाच्या प्रकाशात अभ्यास केलेले थोर ठरले. आजच्या डिजिटल युगात कंदिलाची गरज नसली तरी अभ्यासाची ओढ अस्सल हवी की नको? अभ्यास हा पुस्तकातून आणि अनुभवातून येतो. निरीक्षणासाठी चालणे आले. गाड्या भरपूर आल्या. निसर्ग अभ्यासणे नि त्याला सांभाळणे हा खरा नव्या बदलाचा 'Civic Sense' आहे. वेळेचे नियोजन करताना मी माझ्या अभ्यासाला काही वेळ राखलाच पाहिजे. मला रेडिमेड उत्तर नको. त्याने बुद्धी जड होते. मी उत्तर शोधलेच पाहिजे. तेही प्रश्नापुरते ठरावीक ओळीत नको. नेमक्या शब्दात मुद्देसूद असायला हवे. त्या उत्तरातून प्रश्नाच्या मुळापर्यंत जायला हवे. संदर्भांची भली मोठी जंत्री नकलून 'ऑन लाइन' हे साध्य होणार नाही. विचारासाठी आणि स्वत:च्या 'स्व'साठी काहीही करून वेळ ठेवायलाच हवा. तरच आपण खऱ्या अर्थाने वाढू शकतो. टेक्निक, कौशल्य देते. परंतु ओरिजिनल, बुद्धी वाढविते. तंत्रज्ञानातली कौशल्ये वाढलेली दिसतात. पण एखाद्या विषयावर मुळापर्यंत जाऊन संशोधन करणारे थोडेच असतात. नोकरीतल्या ऐहिक सुविधा अधिकाधिक मिळण्यासाठी जॉब चेंजिंग्ची फॅशन रुळलेली आहे. एखाद्या कंपनीत एखादा पाच वर्षे टिकला तर त्याचे सहकारी त्याची खिल्ली उडवतात. त्याच्याकडे साशंकतेने बघतात. दर दोन वर्षाला जो नवीन जॉब करतो तो आजच्या काळात 'शक्तिमान' ठरतो. सतत जॉब बदलल्याने त्याच्या जाणिवा त्याला अंतर्मुख करायला वेळ देत नाही. गावोगावी हिंडून तो उथळ अस्थिरतेच्या प्रमेयात वावरतो. त्यामुळे त्याचा संशोधनाचा अवकाश खंडित होतो. डोक्यात फक्त एकच, पुढली उडी कुठे? सरकारी बदल्यातून त्याला त्याची वाढ करण्याची संधी थोडीफार तरी येते. पण नवी पिढी त्यामुळे


बदलाच्या चंचलतेत उनडकते. विशेषत: विकसनशीलता भरकटली जाते. जे काय अंगावर पडेल ते स्वीकारावे लागते. आपले आपल्याला जे काम हवेय तेच आपल्यापासून दूर जाते. काही प्रमाणात स्थिरता लाभल्यास नव्या संशोधनाला मन प्रवृत्त होते. मात्र याची चाहूल ठेवण्याचे भान हवे.

सध्याच्या बदलात शहरांची वाढ आणि नवा वसाहतवाद निर्माण झाला आहे. प्रॉडक्शन, मार्केटिंग, एम्.बी.ए. यांना महत्त्व प्राप्त झाले आहे. घरपणा दुरावला नि हॉटेल संस्कृती, पिझ्झा-बर्गर, चायनीज फूड फोफावले आहे. 'घरचा डबा' हा प्रयोग इतिहासजमा झाला. 'फूड पॅकेज', 'रेल्वे-थाळी' आलीय. या साऱ्यात खाणे म्हणजे पोटाला दाबणे झाले आहे. पिण्याला नवा फॉर्म् मिळालाय. या साऱ्यातून पार्टी कल्चर आले आहे. पार्टी-क्लबातून फक्त माणसावर मात करायच्या रोगट साथी वाढवल्या आहेत. माणुसकी संपलीय. माणूस यूज अँड थ्रो झालाय. देवांचे सार्वजनिक उत्सव राजकीय मंडळींनी वाटून घेतले आहेत. देवापेक्षा उत्सव करणाऱ्याचा 'कट् आऊट' भव्य असतो. सगळ्यांचे सीडीकरण झाले आहे. या साऱ्याने यांत्रिकता वाढली आहे. कामाशिवाय क्वचित मोबाइल वाजतात. 'तू कसा आहेस?' असा जिव्हाळा जागतिकीकरणाच्या झगमगाटाने आणि उदारीकरणातल्या साधारणीकरणाने संपला. गुन्हेगारीचे आधुनिकीकरण सर्वत्र झालेले दिसते. पैशाला अवास्तव स्थान आले आहे. त्यामुळे अभ्यास, योग्यता, संस्कृती, सभ्यता, समंजस सुजाण संवाद या कुणीतरी लॉकअप्मधे टाकल्या आहेत. नव्या रस्त्याने अशाश्वती आली. नव्या पुलांनी आयुष्य क्षणभंगुर केले. कारण सकारण, समंजस वेग समाज ठेवीत नाही. विदेशीकरणाच्या रेट्याने आमची मूळ मुळे मूक झाली आहेत. आम्ही नव्याला विकलो गेलो आहोत. याचा विचार करायला हवा. द्रारिद्र्याचेही जागतिकीकरण झालेले आहे.

**डॉ. यशवंत पाठक**
संत ज्ञानदेव अध्यासन प्रमुख, पुणे विद्यापीठ,
डॉ. आंबेडकर भवन, गणेशखिंड,
पुणे-४११००७
दूरध्वनी : ०२०-२५६९१४३३

STANLEY
Fully Shielded For Human Consideration

NOW STANLEY OFFERS
THE ESSENTIAL DIFFERENCE
FOR INDUSTRIES



OUR PRODUCTS

D.P. & T.P. MAIN SWITCHES,
DISTRIBUTION FUSE BOARD
& KITKAT FUSE IN
16 AMPS TO 500 AMPS / 240 VOLTS TO 415 VOLTS

CHANGEOVER SWITCH
16 AMPS TO 1250 AMPS IN 415 VOLTS

BUS BAR CHAMBER ALSO
METAL CLAD PLUG, SOCKET & CONDUIT BOXES
IN 2 POLE 10 TO 20 AMP X 250 VOLTS
IN 3 POLE 20 TO 30 AMP X 440 VOLTS

STANLEY SWITCHGEAR PRODUCTS
21, SATGURU INDUSTRIAL ESTATE, VISHESWAR NAGAR,
OFF AAREY ROAD, GOREGOAN (EAST), MUMBAI - 400 063.
TEL.: 2874 1958, 2874 0582 FAX : 2876 5148,

Email : stanleyswith@yahoo.co.in • www.stanleyswitch.com

GLARE BLOOM. TEL. : 28134481

Stanley Provide You Stability Safety & Longlasting

# 'चोर मिळेल का, चोर?'

## संजय बोरुडे

..... तर आमच्या बायकोला 'चोरी'बद्दल भलतेच आकर्षण आहे...! कुठल्याही मध्यमवर्गीय घरात 'चोरी झालीच पाहिजे' अशी तिची आग्रहाची भूमिका आहे! चोरी झाल्याशिवाय घराला 'घरपण' येत नाही; यावर तिचा ठाम विश्वास आहे. वास्तुशांती ते फेंगशुई या प्रवासात 'चोरी' हे महत्त्वाचे, अनिवार्य आणि लक्षवेधी स्टेशन आहे असा तिचा दावा आहे.

कारण घरात चोरी होण्याचे काही महत्त्वाचे फायदे आहेत. उदाहरणार्थ, १. ज्या घरात चोरी झाली ते घर एकदम 'फोकस'मध्ये येते; २. वर्तमानपत्रातून प्रसिद्धी मिळते. मारहाण झाली किंवा भिंत फोडली वगैरे असल्यास तर आपली 'सुंदर' छबी झळकण्याची शक्यता वाढते; ३ चोरी झाल्याने कॉलनीतील समस्त रहिवाशांची सहानुभूती, प्रेम मिळते (जे एरवी मागूनही मिळत नाही!); ४. आपली लपवलेली मालमत्ता जाहीर करण्यास नामी संधी चालून येते. आपल्याला आकडा 'वाढवून'ही सांगतो येतो! ५. कॉलनीत आपले 'लाईफस्टाईल' किती 'अव्वल' दर्जाचे होते याचे 'इम्प्रेशन' मारण्याची संधी मिळते; ६. पोलिस चौकशीला आल्याने 'व्ही.आय.पी.' किंवा 'व्ही.व्ही.आय.पी.' झाल्यासारखे वाटते. ७. चोरी झाल्यानंतर दीर्घकाळ चर्चेत राहता येते; ८. याखेरीज 'चोर' नावाच्या जमातीला त्या निमित्ताने 'रोजगार' उपलब्ध झालेला असतो ही एकप्रकारे समाजाची सेवाच नकळत आपल्या हातून घडते...

आता तुम्ही म्हणाल, चोरीला गेलेल्या मुद्देमालाचे काय? आपले होणारे आर्थिक नुकसान? त्यावरही बायकोने विचार करून ठेवला आहे. तिचे म्हणणे असे, की चोरीला गेलेल्या 'ऐवजा'ची व्याख्या काय? तर सार्वजनिक ठिकाणी इच्छा असूनही घालता न येणारे दागिने किंवा 'नोटां'च्या स्वरूपातील 'माल' जो उघड करावा तर इन्कमटॅक्सवाल्यांची भीती! म्हणजे असून अडचण आणि नसून खोळंबा! 'असून अडचण' या अर्थी; की असेल तर रक्षणाची काळजी आणि 'नसून खोळंबा' या अर्थी; की स्टेटसचा प्रश्न! मग 'ऐवज' नावाचे 'झंझट' असण्यापेक्षा ते 'चोरी' या 'सन्माननीय' मार्गाने लंपास केले गेले तर किती उजळ, स्वच्छ सहानुभूती मिळते लोकांची!

हं.... तर असे हे बायकोचे 'अफलातून' मानसशास्त्र! म्हणून येनकेन प्रकारे आपल्या घरात 'चोरी झालीच पाहिजे' असा तिचा आग्रह आहे आणि गेले कित्येक दिवस ती याच विचाराने संत्रस्त आहे! कॉलनीतील एखाद्याच्या घरातून साधा

सुतळीचा तोडा जरी चोरीला गेला तरी हिला कोण रुखरुख लागते! का? तर म्हणे आपल्या घरातून का नाही गेला? भरीस भर म्हणून तिने महिला मंडळातील इतर सदस्यांनाही नादावले आहे.... त्यामुळे हिच्या विचारांचा एक पंथही उदयाला येऊ लागला आहे....

बायकोच्या असल्या 'चौर्याकर्षणा'मुळे घरातील वामकुक्षीचा किंवा माश्या मारण्याचा वेळही 'घरात चोरी कशी होईल' या विषयावर जाऊ लागला. त्यामुळे माझा घरातला निवांतपणा संपला... घर दिसले की घरात जाऊच नये असे वाटू लागले.... बायकोच्या सततच्या टुमण्यामुळे घरात चोरी होण्यापेक्षा 'मलाच कुणीतरी चोरून नेले तर बरे होईल असे वाटू लागले....

आज ना उद्या तरी आपल्या घरात चोरी होईल ही बायकोची अपेक्षा फोल ठरल्याने बायकोने उपासतपास सुरू केले! जगातील गाजलेल्या शर्विलकांची आत्मचरित्रे वाचली. पारायणं केली.... दोन-चार वेळा वेषांतर करून तिनेच घरात चोरी करण्याचा अयशस्वी प्रयत्नही केला....! तिच्या पंथातल्या बायका रोज विचारायच्या म्हणे तिला, की 'आज तरी तुमच्याकडे झाली काही नाही चोरी?' 'चोरी' या विषयाने झपाटलेल्या बायकोची ही 'बाधा' एवढी वाढली की तिने आत्यंतिक निराशेपोटी माझा मानसिक छळ सुरू केला! ''घरात मेली साधी चोरी सुद्धा होत नाही आणि म्हणे घर! अन् पुरुषासारखे पुरुष तुम्ही! असं कसं गप्प बसता? बांगड्या भरल्यात का? बायको चोरी व्हावी म्हणून एवढी तळमळतेय बिचारी, त्याचं काहीच कसं नाही? पुरुषांची जातच मेली हलकट! कसं देखवते बायकोचं दु:ख? जरा हात-पाय हलवा आणि चोरी घडवून आणा, आपल्या घरी!'' नमुन्यादाखल बायकोची ही काही मुक्ताफळं!

आता काय करावे? बरे, कॉलनीतल्या आणखी कुणाशी चर्चा करावी तर त्यांनाही नको ती माहिती मिळणार.... त्यापेक्षा विचार करून शेवटी मी पेपरमध्ये एक जाहिरात दिली.... चांगले पाचशे रुपये घालून!.... पत्ता कळू नये म्हणून पोस्ट बॅग नंबर देण्याची काळजी घेतली.... कारण मुळातच 'चोर शोधणे' हे बेकायदेशीर कृत्य आहे. उगीच पोलिसांचा फालतू ससेमिरा नको! मजकूर असा होता-

चोर पाहिजे!

अपेक्षा - छोटा, मोठा, भुरटा, तस्कर कोणताही चोर चालेल. मात्र सफाईतदारपणे चोऱ्या करण्याचा किमान तीन वर्षांचा अनुभव आवश्यक.... सजा काटून आलेला असल्यास प्राधान्य दिले जाईल. इमानदारीने चोरी करण्याची तयारी हवी आकर्षक इनाम दिले जाईल. संपर्क - पो.बॅ.क्र.....

मोठ्या उत्साहाने वाट पाहू लागलो.... आठ दिवस गेले. आम्ही दोघे नवराबायको रोज पोस्टमनची वाट पाहू लागलो.... नवव्या दिवशी एक पत्र आले; तसा आमचा चेहरा उजळला.... चला, एक तरी माईचा लाल निघाला! घाईने पत्र फोडले, मजकूर वाचून कपाळावर हात मारला!

श्रीमान,

स.न.

आम्हीही चोराच्या शोधात आहोत. आपल्याला जर कुणी हुशार, कामसू चोर मिळाला तर कृपया त्वरित संपर्क साधावा- आकर्षक कमिशन दिले जाईल.

संपर्क - पो.बॅ.क्र....

घ्या! इथे आम्हालाच चोर भेटेना तर यांना कुठून द्यावा? हे म्हणजे भाडेकरूने पोटभाडेकरू ठेवल्यासारखे झाले! बरे, पुन्हा संपर्कासाठी माझी पो.बॅ.क्र. आयडिया!

महिला उलटला तरी चोर सापडला नाही किंवा कुणी चोराने संपर्क साधला नाही. शेवटी माझ्या लक्षात आलं, की चोराला गाठायचे म्हटले तर रात्रीच गाठायला पाहिजे. म्हणून मग मी रात्री कॉलनीत फिरायचे.... चुकून चोर कुठे चोरी करताना सापडला तर त्याला पैसे देऊन का होईना; पण घरी चोरी करायला सांगायचे. नाही ऐकले तर हातापाया पडून त्याला विनंती करायची असा वज्रनिश्चय करून रात्री दहाच्या पुढे कॉलनीत चक्कर मारायला निघालो. एका झाडावर चढून बसलो. तासभर बसूनही चोराचे चिन्ह दिसेना.... मग मी झाडावरच पेंगू लागलो.

इतक्यात धडफळेंच्या घराच्या भिंतीपाशी कुणीतरी उभे असल्याचे दिसले. मी डोळे चोळून खात्री केली. खरोखरच तिथे पांढऱ्या कपड्यातले कुणीतरी उभे होते. मी बघू लागलो तर ती पांढऱ्या कपड्यातील व्यक्ती धडफळेंच्या खिडकीपाशी गेली. खिडकी उघडायच्या किंवा उचकटायच्या प्रयत्नात तो असावा. मला खूप आनंद झाला. 'अरे, चोरा, कुठे जाशील आता?' मी मनाशीच म्हणालो. हळूच खाली उतरलो. चोरपावलांनी धडफळेंच्या अंगणातील बॅरल मागे लपलो. आता झडप घालून चोराला पकडणार तोच धडफळेंची खिडकी उघडली गेली. चोर आत घुसणार की काय या शंकेने

मी ग्रासलो पण चोर तसाच उभा होता. खिडकी उघडली आणि धडफळेंची मालू त्या तरुणाशी हलक्या आवाजात बोलताना दिसली.... त्याने तिचा हात धरलेला....! म्हणजे हे चोरीप्रकरण नसून प्रेमप्रकरण होते तर!

आत्यंतिक निराशेने मी घरी परतलो.... रात्री असले काही दिसण्यापेक्षा रात्रीचे भटकणेच नको हा विचार माझ्या मनात बळावला.

भल्या सकाळी झोपेतून उठावे लागले. दारावरची बेल कुणी तरी वाजवत होते. चेहऱ्यावर पाणी मारून दार उघडले तर दारात पोलिस इन्स्पेक्टर युनिफॉर्ममध्ये. खाडकन् झोप उडाली. आता नसती बिलामत झाली. चोर तर मिळाला नाहीच पण पोलिस मात्र हजर! मी शक्य तितक्या अदबीने त्यांना 'आत या' म्हणालो तर त्यांनी मला हलक्या आवाजात सांगितले,

''तुम्हीच बाहेर या... थोडे महत्त्वाचे काम आहे. घरच्यांना डिस्टर्ब नको....''

मी बाहेर आलो. दार ओढून घेतले. घरासमोरच्या छोट्याशा बागेत मी त्यांना घेऊन गेलो. मनातून मी हादरलोच होतो.

''मिस्टर धामणे तुम्हीच ना?''

''होय साहेब....''

''ही जाहिरात तुम्हीच दिली होती ना?'' जाहिरातीचे कात्रण माझ्यापुढे फडकावत ते म्हणाले.

''प.... पण तुम्हाला कसं कळलं?''

''कानून के हाथ बहुत लम्बे होते है बच्चूऽ'' ते गरजले.

पोस्ट बॅग क्रमांक देऊन सुद्धा माझे नाव फुटले. मला कसेतरीच वाटले.

''मी संबंधित वर्तमानपत्र व पोस्टातून माहिती काढली आहे... खरे सांगा....''

''म.... मीच दिली होती साहेब....'' मी अजीजीने म्हणालो, ''फार ताणू नका साहेब, मिटवून टाका....''

माझा केविलवाणेपणा चेहऱ्यावरून निथळत होता. पण मग इन्स्पेक्टरांच्या चेहऱ्यावर माझ्यापेक्षा दीनभाव उमटलेला पाहून मी चकित झालो.

''त्याचे काय आहे धामणेसाहेब....'' ते कमालीच्या नम्रतेने बोलू लागले. ''माझे प्रमोशन पाच वर्षांपासून अडकलेय हो.... गेल्या पाच वर्षांत मला माझं कर्तृत्व दाखवण्याची संधीच मिळाली नाही.... तुमच्या हद्दीतील या



पोलिस स्टेशनवर जेव्हापासून रूजू झालोय ना तेव्हापासून एकही केस झाली नाही हो, इतके कसे प्रामाणिक लोक इथे राहतात हो? साधी शिवीगाळ झाली अशी सुद्धा तक्रार दाखल झालेली नाही.... त्यामुळे माझं प्रमोशन लांबलंय हो....''

''....पण मी काय तरू शकतो याच्यात?'' आता माझी भीड चेपली होती.

''तुम्हीच मला वाचवू शकता, धामणेसाहेब....'' इन्स्पेक्टर हात जोडून म्हणाले, ''तुम्ही जाहिरात दिली म्हटल्यावर अर्ज आलेच असतील की! मुलाखतीही झाल्या असतील.

''अहो, तसं....'' मी त्यांना थांबवत म्हणालो.

''असं कसं?'' ते अजीजीने म्हणाले, ''काहीही करून हे काम कराच. मला एखादा चोर पकडून द्या हो. पाहिजे तेवढं कमिशन घ्या. पण हे काम करा माझं. नाही म्हणू नका. फार झालं तर चोराचंही मार्जिन ठरवून टाकू आपण. पण प्लीज एवढं काम कराच. वाटलं तर हात जोडतो, पाया पडतो.'' इन्स्पेक्टर वाकत म्हणाले.

आता काय करावे बुवा? कसे थांबवावे या महाशयांना? त्यांचा समज तसाच ठेवला तर कदाचित हे शक्य आहे; असा विचार करून त्यांना म्हणालो,

''बरं, ठीक आहे! तसंच काही घडलं तर मी फोन करतो

तुम्हाला, ओ.के.?''

''नक्की ना?''

''ऑफकोर्स येस्...''

मग कसेबसे त्यांना घालवण्यात मला यश आले. आता चोर कुठे शोधावा बुवा? मी बाजारात चौकशी केली तर चोराबद्दल कुणालाच काही सांगता येईना. एकाला विचारले; तर त्याने 'चोर बाजारा'चा रस्ता दाखवला. तिथे बघतो तर सगळ्या जुन्या वस्तूंचा बाजार. चोरांचा तपास नाही....!

शेवटी बऱ्याच तपासानंतर शहराबाहेरच्या टेकडीवर पारध्यांची पाले उतरलेली आहेत असे समजले. ही जमात चोरीसाठी कुप्रसिद्ध असल्याचे समजले. मी उत्साहाने माझी स्कूटर दामटली. ती पाले बघितली. मी तिथल्या दोघातिघांना विचारले,

''तुमच्यात कोणी चोर-बिर आहे का?''

त्यांचे चेहरे चमकले; मग आक्रसले आणि बघताबघता त्यांच्या चेहऱ्यावरचे भाव सरसर बदलले.... त्यांच्यातला एक इन्शर्ट केलेला तरुण पुढे आला. त्याने सरळ माझी गचांडी धरली आणि तो गरजला.

''का रे ये गयबान्या, देऊ का कानाखाली? पारधी समाज काय चोर आहे का? मानवी हक्क अभियानाचा कार्यकर्ता आहे मी? भटक्याविमुक्त जमातीवर अन्याय झाला तर आम्ही पेटून उठू. समजलास काय?''

त्याच्या तावडीतून कशीबशी सुटका करून घेऊन मी पळ काढला. सरळ घरी आलो. वाटले, चोर मिळायचे राहिले बाजूला पण फुकटचा मार मात्र मिळायचा! बायकोला सांगितल्यावर ती म्हणाली-

''मिळेना का मार! पण तो चोरांकडून मिळाला म्हणजे मिळवली!''

घ्या! काय पण बायको मिळालीय! मी या विचारात असतानाच दारावरची बेल वाजली. दार उघडले तर दारात एक मलमलचा सदरा घातलेला, जीन्स पॅण्ट, डोक्यास तांबडी पट्टी, एका डोळ्याला काळी काच, गळ्यात चेन असा अवतार असलेला धटिंगण आत घुसला. पाठोपाठ मशीनगन घेतलेले दोन कमांडो. मागे अणखी चार-पाच जण...

''हं, धामणे कोण?'' त्याने बार टाकला.

''कोण म्हणजे? मीच की!'' मी पुढे होत म्हणालो.

''ही कुठली पद्धत घरात घुसायची?''

''मी अखिल भारतीय चोर संघटनेचा अध्यक्ष आहे! आणि हे माझे कार्यकर्ते!''

''अरे वा! केवढं भाग्य!! आम्ही चोर शोधण्यासाठी काय काय नाही केलं सायेब! अलभ्य लाभ!''

सौ.ही घाईने पुढे झाली. नमस्कार करून पटकन चहाच्या तयारीला लागली.

चहा घेता घेता अध्यक्ष महाशय म्हणाले,

''साहेब, तुम्ही चांगल्या घरातले दिसता म्हणून समजावून सांगायला आलो. आम्ही समस्त चोर मंडळींनी चोरीचा पारंपरिक धंदा सोडून दिला आहे. आम्ही थोडा ट्रॅक बदलला आहे. त्यामुळे आपल्याला चोर शोधायची पाळी आली. आपली जाहिरात वाचून आलो. परत चोर या जमातीला बदनाम करण्याचा प्रयत्न करू नका. आम्ही सुधारलो आहोत. पुन्हा जुन्या मागासलेल्या वाटेवरून चालायला भाग पाडू नका. तुमच्या या शोधमोहिमेमुळे आमचे काही कार्यकर्ते तुम्हाला बळी पडतील आणि आमची मुश्किलीने बांधलेली संघटना मातीमोल होईल.... तेव्हा सोयीने राहा.... नाहीतर 'गेम' करू....''

तेवढ्यात एका कार्यकर्त्याने मशीनगन रोखली. मी गळाठलो. तेवढ्यात सौ.ने समयसूचकता दाखवली.

''ठीक आहे साहेब, आम्ही नाही शोधणार चोर...बिर... पण आपण सुधारलात हे पाहून आनंद वाटला.... तुमच्या संघटनेसाठी आम्ही एक हजार एक रुपयांची देणगी द्यायची ठरवली आहे...''

मग माझ्याकडे वळून पाहात म्हणाली, ''चला काढा हजार रुपये.''

सौ.च्या या युक्तीचा अपेक्षित परिणाम झाला. त्यांचे चेहरे खुलले..... मी हजार रुपये काढून दिले आणि सुटकेचा नि:श्वास सोडला.....

सौ. आणि मी एकमेकांकडे पाहून समाधानाने हसलो. जाता जाता तो अध्यक्ष म्हणाला,

''दिवसभरात अशी दहा घरं पालथी घातली की आमचा धंदा होतो. मग कशाला आम्ही चोरी करू?''

मग ते सगळे हसत हसत बाहेर पडले. आम्ही दोघेही पती-पत्नी चाट होऊन एकमेकांकडे बघत राहिलो.....!

**संजय बोरुडे**

द्वारा, नागेश गणगे,

२०४, मुळा, शासकीय निवासस्थाने,

डी.एस.पी. चौक, अहमदनगर-४१४००१

भ्रमणध्वनी : ९३७२५६०५१८

# चोरबाजाराच्या अंतरंगात

## अरुण पुराणिक

**मुंबईची पार्श्वभूमी**

तसे पाहिल्यास मुंबईचा इतिहास फार तर तीन–चार शतकांचा! त्या काळी हे शहर केवळ उत्तम व सोयीचे बंदर म्हणून प्रसिद्ध होते.

मुंबई शहराचे वर्णन करताना गोविंद नारायण माडगावकर म्हणतात, ''कलकत्ता, दिल्ली, आग्रा, लखनौ, जयपूर वगैरे हिंदुस्थानातील शतश: शहरे आपापले प्राचीन ऐतिहासिक वैभव मिरवत उभी आहेत. तरी पण विद्या, व्यापार आणि संपत्ती इत्यादी गोष्टींत मुंबईची बरोबरी करणारे शहर इतरत्र कुठेही नाही. इथे ऐतिहासिक प्रेक्षणीय स्थळे नसली तरी या शहरातील अठरापगड जातींच्या लोकांचा चित्रविचित्र देखावा, त्यांची एकमेकांपासून भिन्न वर्तणूक, चालीरीती, पोशाख, पाहणाऱ्याचे चित्त वेधून टाकतात. मुंबईसारखी शांतता दुसऱ्या कोणत्याही शहरात नांदत नाही. यासाठी सर्व युरोपीयन लोकांचे आवडते वास्तव्याचे स्थान मुंबईच आहे. केवळ इंग्रज इथे राहत होते म्हणून मुंबई वैभवसंपन्न होऊन तिची भरभराट झाली नाही, तर येथील बहुतेक लोक आंग्लभौमित्र विद्येने विभूषित झाले आहेत, हे होय. मुंबईची भरभराट येथील लोकांचे व्यापारधंद्यातील साहस, पुढारीपणा आणि सार्वजनिक कृत्यांत मोठ्या आस्थेने व कळकळीने वाटाघाट करून पुढे पाऊल टाकण्याच्या कामी त्यांचे अग्रेसरत्व इत्यादी गोष्टींवरून झाली आहे. इथे एकाच वेळी हिंदू, मुस्लिम, पारशी व पाश्चिमात्य संस्कृती हातात हात घालून सुखनैव नांदताना दिसतात.''

**मुंबईतील बाजार**

अशा बहुरंगी, बहुढंगी मुंबईत दोनशे वर्षांपूर्वी अनेक मजेशीर बाजार होते.

'मारवाडी बाजार' भुलेश्वर–क्रॉफर्ड मार्केट रस्त्यावर होता. इथे उंची शेले, शालू, साड्या, लुगडी, पीतांबर, पागोटी आणि सतरंज्या मिळत.

'अंग्रेज बाजार' फोर्टच्या मेडोज् स्ट्रीटवर होता.

'सट्टा बाजार' मुंबादेवी तलावाच्या मागे एका मोठ्या इमारतीच्या आगाशीवर (गच्चीवर) होता. मारवाडी लोक तेथे पावसावर सट्टा खेळत! पाऊस कोणत्या दिवशी व किती पडणार, यावर सट्टेबाज भाव देत असत. कालांतराने पोलिसांनी या सट्ट्यावर बंदी घातली.

याशिवाय मुंबईत भाजीबाजार (भायखळा मंडई), कांदेबटाटे बाजार (डंकन रोड), फूलबाजार (भुलेश्वर), तांबाकाटा अथवा तांबट आळी (तांब्या, पितळेची भांडी),

लोहार आळी-चाळ (हार्डवेअर), चिऱ्याचा बाजार (धोबीतलाव), कापड बाजार (मंगलदास व मुळजी जेठा मार्केट), पानबाजार (खेतवाडी), बांगडी बाजार, खांड बाजार, बोरा बाजार, क्वाटल बाजार (दाभण किंवा दोरखंड), कुंभार तुकडा, गोणपाट बाजार, कॉटन बाजार (कॉटनग्रीन), क्रॉफर्ड मार्केट तसेच नळबाजार असे बाजार १८६५ ते १८७० च्या दरम्यान बांधले गेले. नळबाजाराशेजारी भिकार बाजारही होता. दारावर भिक्षा मागण्यास आलेल्या भिकाऱ्यांच्या (यामध्ये साधू, बैरागी वगैरे सर्व प्रकार येत.) झोळीमध्ये लोक घरातील मूठभर धान्य घालत. भिकारी लोक गहू, तांदूळ व ज्वारीसाठी वेगवेगळ्या झोळ्या ठेवत. दिवसभर जमा झालेले धान्य दिवस मावळताना भिकार बाजारात नेऊन विकत. पुढे, काळाच्या ओघात यातले काही बाजार बंद पडले.

ग्रॅण्टरोडला प्ले (पिला) हाऊस परिसरात मोहमयी, मनोरंजनाचा रंगीतसंगीत बाजार होता, तर पवन पुलाखाली (केनेडी ब्रिज) नृत्यसंगीताचा बाजार होता. परंतु या सर्वात जुना, वर्षानुवर्षे चालत आलेला, गरीब जनतेला वरदान ठरलेला, आगळावेगळा, वैशिष्ट्यपूर्ण बाजार आहे. तो म्हणजे जुना बाजार ऊर्फ चोरबाजार!

**चोरबाजार**

हा मुळात जुन्या कपड्यांचा, पादत्राणांचा चिंधी व मोचीबाजार! पुढच्या काळात तेथे जुन्यापान्या, नानातऱ्हेच्या वस्तू विक्रीसाठी येऊ लागल्या. या जुन्या बाजाराचे नामकरण 'चोरबाजार' कसे झाले? याचा किस्सा त्या बाजारातच ऐकायला मिळतो.


नाना शंकरशेट यांनी, मुंबईच्या समुद्रकिनारी मरिन लाइन्स भागात हिंदूसाठी दहनभूमी (सोनापूर) बांधली. इथे प्रेते जाळल्यामुळे आसपासच्या परिसरात दुर्गंधी पसरते म्हणून चिराबाजार, धोबीतलाव व ठाकुरद्वारच्या ख्रिश्चन तसेच पारशी लोकांनी या स्मशानभूमीला आक्षेप घेतला होता. त्यांनी थेट व्हॉइसरॉयला पत्रे पाठवली. तेव्हा स्मशानभूमीमुळे खरोखरीच दुर्गंधी पसरते की काय, हे पाहण्यासाठी व्हॉइसरॉय जातीने मुंबईला आले होते. त्यावेळी सॅण्डहर्स्ट रोडच्या रस्त्यावरून जाताना, नळबाजाराच्या समोरच्या गल्ल्यांतून, 'बे बे रुपया, जुनापुराना सामान ले लो भाय', 'मिठो खाजा एक आना' असे तारसप्तकात ओरडत, आपला माल विकणाऱ्या मुस्लिम फेरीवाल्यांचा आवाज त्यांच्या कानी पडला. त्या काळात लोकवस्ती विरळ आणि वाहनांची रहदारी नसल्याने मुंबईच्या रस्त्यांवर शांतता नांदत होती. तेव्हा त्रासिकपणे 'क्या शोरबाजार है' म्हणून त्या आवाजाला व्हॉइसरॉयसाहेबांनी नाक मुरडले होते. त्यावरून या जुन्या बाजाराचे नाव 'शोरबाजार' पडले. लोकांनी त्याचा चोरबाजार असा अपभ्रंश केला.

मजा म्हणजे, पुढील काळात मुंबईतील शर्विलकांनी आपल्या हस्तकौशल्याने, चलाखीने अनेकांना आपला 'हिसका' दाखवून या बाजाराचे 'चोरबाजार' हे नाव कायम केले. इंग्लंडची राणी व्हिक्टोरिया मुंबई भेटीस आली असताना तिच्या मौल्यवान सामानातून तिचे आवडते 'व्हायोलिन' हळूच गायब झाले होते. काही दिवसांनी ते चोरबाजारात जुने सामान म्हणून विक्रीसाठी आले तेव्हा पोलिसांना सापडले. चाळीस वर्षांपूर्वी राजकुमार या प्रख्यात सिनेअभिनेत्याचे चोरीस गेलेले किमती मनगटी घड्याळही पोलिसांनी इथेच जप्त केले होते.

हैदराबादचे प्रख्यात रईस, नवाब सालार जंगचे वंशज अलियावर जंग मुंबईचे गव्हर्नर होते. ते वाळकेश्वरला राजभवनात राहत. एके दिवशी एका चोराने समुद्रमार्गे होडीतून येऊन, मागच्या बाजूने साहेबांच्या शयनगृहात प्रवेश केला आणि तेथील अलमाऱ्यांतील साहेबांचे कपडे चोरून पोबारा केला. मुंबई पोलिसांची झोप उडाली. इतकी कडक सुरक्षा असताना तिथे चोरी झालीच कशी, हे पोलिसांना कळत नव्हते.

आठ-दहा दिवस असेच निघून गेले. त्या बुद्धिमान चोराचे दुर्दैव आड आले. साहेबांचे कपडे विकताना 'चोरांच्या आळंदीत' म्हणजे चोरबाजारात तो पकडला गेला. त्याचे दुर्दैव अशासाठी, की त्याने चुकीच्या माणसाचे कपडे चोरले. शेरवानी, कुर्ते, कोट, गाउन्स असे हैदराबादी नवाबाचे उंची, भारी किमतीचे कपडे विकत घ्यायला कुणीही माईचा लाल पुढे येईना! नाही म्हणायला फक्त कोटाची बटणे तेवढी विकली गेली होती. खरे तर, अशा शर्विलकांचे फोटो करून चोरबाजारात लावले गेले पाहिजे होते. शेवटी चौसष्ट कलेपैकी चौर्य ही सुद्धा एक कलाच आहे. तेथील एक चाचा मला कौतुकाने म्हणाले, 'मालिक ऐसी हुनर (कला) बहुत कम लोगों को देता है.'

नळबाजारासमोरच्या, सरदार वल्लभभाई पटेल (जुना सॅण्डहर्स्ट रोड) रोडवरून मौलाना आझाद रोडकडे (जे.जे. हॉस्पिटल रोड) जाणाऱ्या मटण स्ट्रीट, चिमणा बुचर स्ट्रीट, मोची गल्ली या सर्वसाधारण परिसराला चोरबाजार म्हणून संबोधले जाते. यामध्ये सुद्धा मिनी मार्केट, मुघल बाजार, चिंधी गल्ली, बोहरी मोहल्ला, गुजर स्ट्रीट, बारा इमाम रोड यांसारखे भाग आहेत. पश्चिम रेल्वेने ग्रॅण्टरोडला तर हार्बरने सॅण्डहर्स्ट रोड






स्टेशनला उतरावे लागते. बसने यायचे झाल्यास भेंडी बाजार नाक्यावर उतरावे लागते. स्वत:ची गाडी घेऊन यायचे असल्यास गाडी जे.जे. उड्डाण पुलाखाली उभी करून बाजारात चालत जाणे श्रेयस्कर असते.

**मटन स्ट्रीट**

मॉर्टन नामक ब्रिटिश इंजिनीयरने नळबाजार मंडई उभी केली असे म्हणतात. त्यातील मटण आणि मच्छी मंडईच्या समोरील गल्लीला त्याचे नाव दिले गेले होते. नळबाजारातील कसाई लोकांनी मॉर्टन स्ट्रीटचे मटन स्ट्रीट असे नामकरण केले. मटन स्ट्रीटवर पूर्वी कधीही मटणाचे दुकान नव्हते व आजही नाही. शेजारीच चिमणा बुचर स्ट्रीट आहे. कसायाचे नाव असले तरी इथे बकरे कापले जात नाहीत की बकऱ्याचे पार्ट्सही मिळत नाहीत. इथे फक्त गाडीचे सुटे भाग (स्पेअर पार्ट्) मिळतात. मोची गल्लीत मात्र अजूनही मोची राहतात व तिथे नवे-जुने जुतेही मिळतात.

**हार्डवेअर बाजार**

नळबाजारासमोर, मटन स्ट्रीट, चिमणा बुचर स्ट्रीट व सैफी ज्युबिली स्ट्रीट या गल्ल्यांच्या तोंडाशी हार्डवेअर बाजार आहे. इथे सर्व प्रकारचे व आकारांचे खिळे, स्क्रू, हातोड्या, स्क्रू ड्रायव्हर्स, पाने, कात्र्या, करवती (लोहार व सुतार सामान), छिन्नी, तराजू, साखळ्या (चेन्स), वजने, मापे, डंबेल्स, व्यायामशाळेतील लोखंडी सामान, रोलर स्केटिंग, सर्व प्रकारची छोटी छोटी चाके, नट बोल्टस, रंगाचे ब्रश, विविध प्रकारच्या स्प्रिंग्ज, बाथरूम फीटिंग्ज आदी सामान मिळते. दीड-दोनशे वर्षांपासून सकाळी रोजीवर अथवा कंत्राटावर काम करणारे सुतार, प्लंबर, रंगारी, कडिया, हमाल, 'मांडव' बांधणारे लोक, दोन टाकी परिसरात रस्त्यावर उभे असतात. मटन स्ट्रीटच्या तोंडाशी फुटकळ सामानाचे गाडे उभे असतात. पूर्वी या गाड्यांवर बटन चाकू, रामपुरी चाकू, खटक्यांचे चाकू, दुहेरी धार असलेले, करवतीसारखे पाने असलेले सुरे, खंजीर, कोयते, कुऱ्हाडी, वस्तरे, फाइट (पुढे टोक असलेल्या लोखंडी अंगठ्या), गुप्त्या (मुठीच्या काठीत लांब धारदार पाते असलेल्या सुऱ्या), विळ्या, नारळ खोवणी, स्वयंपाकघरातील सुऱ्या आदी सामान मिळे. गेल्या पंचवीस वर्षांपर्यंत मुंबईतील तमाम भाईलोक प्राणघातक हत्यारे इथूनच खुलेआम खरेदी करत. प्रत्येक खुनासाठी वापरलेले हत्यार पूर्वी बहुधा इथूनच खरेदी केलेले असे. पोलिसांनी बंदी घातल्यापासून ही हत्यारे मिळणे आता बंद झाले आहे. पूर्वी याच रस्त्यावर विविध प्रकारच्या टोप्यांची दुकाने होती. इथे काश्मिरी, इराणी, बोहरी, तुर्की, फारसी, अरबी लोकांच्या रंगीबेरंगी टोप्या मिळत. चोरबाजारात साधारणत: पाचशे स्टॉल्स (टपऱ्या) आणि दुकाने आहेत. काही टपऱ्या २ x ३ फूट इतक्या लहान आहेत. मात्र अनेकांची जवळपासच्या भागात मोठमोठी गोदामेही आहेत. कितीही मोठे गिऱ्हाईक असले तरी येथील व्यापारी त्याला आपल्या गोदामात घेऊन जात नाहीत. आधी कळवल्यास 'माल' दुकानात आणून ठेवतात. येथे जवळजवळ पावणेदोनशे दुकाने ॲण्टिक (दुर्मिळ) वस्तूंची आहेत. या बाजारावर मुख्यत्वे काठेवाडी मुस्लिम लोकांचे प्राबल्य आहे. पूर्वी बाजारात काळे जाकीट व लाल गोंड्यांची तुर्की टोपी घातलेले 'चाचा' दिसत. सध्या मात्र मन्सुरी, खोजा, मेमन, युपीचे भय्ये, हैदराबादी व्यापारी आहेत. जुने फर्निचर व काच सामानाच्या धंद्यात काही बोहरी आहेत. मोची गल्लीतील जुते बाजारात सांगली, मिरज, कोल्हापूर भागातील मराठी लोक आहेत. चोरबाजारात जो सार्वजनिक गणपती बसवला जातो तो याच लोकांचा असतो. येथील





दुकानदार आपली नावे, दुकानाचा नंबर, टेलिफोन नंबर पाटीवर लिहून ती दुकानाबाहेर लावतात. या पाट्यांवर बहुधा आपल्या दुकानात कोणत्या प्रकारचा माल विकला जातो याचेही चिन्ह दाखवलेले असते.

**चोरबाजारातील जरीवाले**

'जरी'चा धंदा चोरबाजारातील सर्वांत पुरातन धंदा! गेल्या शतकापर्यंत मुंबईतील पाठारे प्रभू, शेणवी, खत्री, सोनार, पाचकळशी, सीकेपी, सारस्वत व ब्राह्मण अशा समाजांतील घरंदाज सधन स्त्रिया जरीचे काठ असलेले शालू व पैठण्या सर्रास नेसत. पाठीवर शेले घेत. पुरुषमंडळीसुद्धा अल्पाक, शार्कस्किनचा कोट परिधान करत. पूजेसाठी भरजरी पीतांबर अथवा कद नेसत. त्यांच्या या जुन्या कपड्यांना चोरबाजारात सोन्याचा भाव येत असे. जरीकाठी शालू, पैठण्यांतून खरोखरीच सोने, चांदी निघत असे.

**चिंधी गल्ली**

चाळीत, जुन्या इमारतीत, घराबाहेर, गॅलरीत, गच्चीवर वाळत घातलेले कपडे अनेक वेळा चोरीस जातात. घरातून असे चोरलेले, लाँड्रीतून गहाळ झालेले, घरफोडीतील कपडे या न त्या मार्गाने पहाटेच्या वेळी चोरबाजारात येतात. श्रीमंत लोक जुने, मळलेले, थोडेसे फाटलेले कपडे टाकून देतात. मध्यमवर्गीय लोक जुने कपडे बोहारणी अथवा वाघरीणीना (काठेवाडी बायकांना) देऊन त्याच्या बदल्यात डबे, बरण्या, भांडी किंवा लसूण घेतात. बोहारणी हे कपडे चोरबाजारात विकतात. रेडिमेड गारमेंट कंपन्यांचे दिवाळे वाजते. एक्स्पोर्टच्या ऑर्डरी कॅन्सल होतात. डिफेक्टिव्ह माल बनतो तेव्हा तो स्टॉकही या बाजारात येतो. उल्हासनगर, धारावीमध्ये प्रसिद्ध कंपन्यांची लेबले लावून डुप्लिकेट माल बनतो. तोही इथेच येतो. दिवसभरात फाटके कपडे इथे पुन्हा शिवले जातात. लाँड्रीचा मार्क पुसून टाकला जातो. मळके, डाग पडलेले कपडे धुऊन, इस्त्री करून सायंकाळी नव्याने परत बाजारात येतात. सायंकाळच्या मंद प्रकाशात जुने कपडे ओळखूही येत नाहीत. मुंबईत आणि आसपासच्या परिसरात लाखो गरीब लोक राहतात. त्यांना दुकानातून कापड विकत घेऊन, आपल्या मापाचे कपडे शिवणे किंवा नवीन तयार कपडे विकत घेणे परवडत नाही. ते लोक चोरबाजारातून स्वस्तात तयार कपडे खरेदी करून आपल्या नव्या कपड्यांची हौस भागवतात. इथे मॉलसारखी ट्रायलरूम नसते. लोक भररस्त्यावर उभे राहून रेडिमेड पॅण्ट अथवा जीन्स कमरेला लावून आपल्या मापाची आहे की नाही ते पाहतात व थोडीशी घासाघीस करून स्वस्तात खरेदी करतात. या व्यवहारात व्यापारीही खूश आणि गिऱ्हाईकही खूश असते.

**मुघल बाजार**

याचे नाव मुघल बाजार असले तरी या ठिकाणी मुघलकालीन कोणत्याही वस्तू मिळत नाहीत. हा बाजार हरी मस्जिदजवळ असून इथे लहानमोठ्या जहाजांवरील फुटकळ सामान विकणारी आठ-दहा दुकाने आहेत. सुकाणू (जहाजाचे गोल स्टिअरिंग व्हिल), विविध प्रकारचे नांगर, दुर्बिणी, जहाज नांगर टाकते त्यावेळी वाजवली जाणारी घंटा, नेव्हिगेशनचे रंगीत

दिवे, बॅटरी चार्जर्स, लाइफ जॅकेटस्, जहाजावर वापरली जाणारी दिशा, वारा, पर्जन्य, भरती ओहोटी, स्टॅबिलिटी दर्शक मीटर्स किंवा यंत्रे आदी सामान विक्रीस ठेवलेले असते. यातील बहुतेक सामान परदेशी कंपन्यांचे आणि अत्यंत टिकाऊ असते. यांची मोठी गोदामे तिथे आहेत.

'हरी (हिरवी) मशिदी'समोर मिनी मार्केट आहे. इथे फुटकळ वस्तू विकत मिळतात. रस्त्यावर पेन्सिली, बटणे, दोऱ्यांची रिळे, सुया, विणकामाचे साहित्य मिळते. मुंबई-सारख्या शहरात कालबाह्य, अपघातात छिन्नविच्छिन्न झालेल्या, देशीविदेशी कंपन्यांच्या मोटरगाड्या, मोटर सायकली, कमीत कमी किमतीत हस्तांतरित होत होत शेवटी निकामी, टाकाऊ होत जातात. त्यांच्यावर खर्च करणे व्यवहारिकदृष्ट्या मूर्खपणाचे असते. अशा 'कोमात' पोचलेल्या एके काळच्या आलिशान गाड्या, हातगाडीवरून शेवटच्या क्रियाकर्मासाठी चोरबाजारात येतात.

बारा इमाम रोडवरील गॅरेजेस म्हणजे गाड्यांचे अस्तित्वच नष्ट करणारी स्मशानभूमी! मेडिकल कॉलेजमध्ये निष्णात सर्जन शवविच्छेदन करून, बेवारस प्रेतांचे विविध अवयव अलगद काढून विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी देतात, तसे तेथील कुशल मेकॅनिक चार तासांत केवळ स्क्रू ड्रायव्हर, छिन्नी व हातोड्याच्या साहाय्याने गाड्यांचे सर्व पार्ट मोकळे करून मालकांना देतात. गाडीचा उरलेला सांगाडा, सडलेले पत्रे, निरुपयोगी पार्ट वजनाच्या भावात भंगारवाल्याला विकून टाकतात. जुन्या गाड्यांचे हे सुटे पार्ट मालकांना कधीकधी दामदुप्पट किंमत मिळवून देतात.

पाऊणशे वर्षांपूर्वीच्या हौशी मालकांनी कौतुकाने सांभाळलेल्या काही व्हिंटेज गाड्या आजही मुंबईच्या रस्त्यावर रॅलिजमध्ये धावताना अथवा प्रदर्शनात दिसतात त्याचे श्रेय या चोरबाजारालाच जाते. कारण त्यांना लागणारे विविध प्रकारचे सुटे भाग चढ्या भावात का होईना, फक्त चोरबाजारातील गॅरेजवालेच पुरवू शकतात.

इथे जुन्या गाड्यांबरोबरच परराज्यातील चोरीच्या गाड्याही येतात. मुंबईत बहुधा परगावाहून आलेल्या गाड्यांच्याच चोऱ्या होतात. या गाड्या केवळ दोन तासांत 'मोकळ्या' केल्या जातात. त्यांचे काही अस्तित्वही शिल्लक राहत नाही. आजकाल या गाड्या कुर्ला व धारावीला जातात.

या निमित्ताने मला प्रसिद्ध फिल्मी संगीत-वादक, कलाकार केरसी लॉर्डकडून ऐकलेला, चोरबाजारासंबंधीचा जुना किस्सा आठवला. पार्श्वगायिका लताने उमेदीच्या काळात मोठ्या हौसेने सेकंड हँड गाडी घेतली होती. त्या गाडीला दोन चाकांवर व्हिलकॅप नव्हती. ती विकत घ्यायला सकाळीच लताचा ड्रायव्हर जयसिंग चोरबाजारात गेला होता. गाडीचा मेक व इतर माहिती घेतल्यावर तिथल्या माणसाने 'आप यही रुको, अभी मैं व्हिल कॅप ले के आता हूं' म्हणत पाच मिनिटांत घेऊन आला. त्या पॅक करून, 'पैसे देऊन' जयसिंग घरी आला. दुपारी तो त्या कॅप बसवायला गेला. पाहतो तर पहिल्या दोन्ही व्हिलकॅप गायब! त्या अनोळखी माणसाने जयसिंगच्या गाडीच्या दोन कॅप काढून त्यालाच विकल्या होत्या! आजकाल असले प्रकार खूप कमी झाले आहेत. तरीसुद्धा आपली खाजगी गाडी घेऊन चोरबाजारात खरेदीसाठी जाणे आजही धोक्याचे आहे.

**मोची गल्ली**

चिंधी गल्लीशेजारच्या मोची गल्लीत पादत्राणांचा (चपला, बुटांचा) बाजार आहे. इथे चपला, बूट बनवून विकले जातात. महाराष्ट्रात हजारो देवळे आहेत. देवळाबाहेर भाविकांचे जोडे चोरणारे शेकडो भुरटे चोर ते जोडे मोची गल्लीत विकतात. दंगलीच्या काळात चोरलेला मालही इथे येतो. आजकाल पाश्चात्त्य कंपनींच्या ब्रॅण्डेड शूजना (बुटांना) फार मोठी मागणी आहे. त्यांच्या किमतीही फार असतात. ते चोरून इथे विकणारेही लोक आहेत. पाश्चात्त्य कंपनीचे नकली शूजही इथे पाहायला मिळतात. ज्यांना खरोखरीच भारी शूज वापरण्याची हौस आहे, त्यांनी येथील मोची बाजाराला जरूर भेट द्यावी.

चोरबाजारात उपलब्ध असणाऱ्या गेल्या शे-दीडशे वर्षांतील चित्रविचित्र दुर्मिळ वस्तूंवर नुसती नजर जरी टाकली तरी डोळे आश्चर्याने विस्फारित होतात. वाचकांच्या माहितीसाठी विविध सामान व ते जिथे मिळते अशा काही ठिकाणांची माहिती पुढे देत आहे.

**मटन स्ट्रीट**

'पॉवर टूल्स'

'कटिंग टूल्स'

'मेझरिंग टूल्स'- वजने, मापे, तराजू, छोटी इन्स्ट्रूमेंटस

'व्हील्स'- सर्व प्रकारची चाके, स्केटस्

'जिम्नॅशियम मटेरियल'- व्यायाम शाळेत लागणारी उपकरणे, डंबेल्स, प्लेटस्, रॉडस्

'पूलिज'- 'कप्प्या'

'डेको' क्लॉक, स्मिथ कंपनीची, आजोबांची, चुन्याच्या डबीसारखी दिसणारी भिंतीवर लावण्याची, पेंड्युलमची

(लंबकाची), लाकडाची गोल, चौकोनी, टेबलावर ठेवण्याची, मनगटी, कोटाच्या खिशात ठेवण्याची, टांगायची, 'शो' पीस, फॅन्सी, सार्वजनिक ठिकाणी लावायची मोठी घड्याळे!

पोर्तुगीज-इंग्रज काळातील मेणबत्ती, रॉकेल, गॅसचे दिवे, चिमण्या, कंदील, हंड्या, झुंबरे, रस्त्यावरचे, उद्यानातले असे रंगीबेरंगी, डोळे दिपवून टाकणारे दिवे. यात दिव्यांची पारख महत्त्वाची. काही दिवे खरेच जुने असतात, काही नुसते जुने दिसतात, काही जुन्या दिव्यांच्या नवीन प्रतिकृती असतात. काही मात्र संग्रही बाळगण्यासारखे दुर्मिळ दिवे असतात.

'फॅन्स' किंवा पंखे - टेबल, सीलिंग, एक्झॉस्ट, कार फॅन्स, थिएटर फॅन्स.

रेडिओ, ट्रान्झिस्टर्स, चेंजर्स, टेपरेकॉर्डर, स्पूल्स, रेकॉर्ड प्लेअर्स, कर्णे, भोंगे (स्पीकर्स), माइक्स, ध्वनिक्षेपक.

मणी, मण्यांच्या माळा, रंगीत दगड, काचा.

'जुनी स्टेशनरी'- दौती, कलम, बोरू, निब्स, पेन्स लिहिण्याचे डेस्क.

वाद्ये - व्हायोलिन, पियानो, ट्रंम्पेट, बोंगो.

काचेच्या रंगीत बाटल्या, बरण्या, सुरया.

जुनी खेळणी-बाहुल्या, कार, रेल्वे, जोकर्स, पत्ते, जुने फोटो अल्बम, वॉल पेटिंग्ज, रेखाचित्रे.

जुन्या बायबल, कुराण व गीतेच्या प्रती, दुर्मिळ पुस्तके

कॅमेरा - व्हिंटेज कॅमेरा, बॉक्स कॅमेरा, ८ एम एम मुव्ही कॅमेरा.

'मिनिएचर बाजार' - छोट्या छोट्या प्रतिकृती, पोस्ट कार्डस्, हॅण्डपेटेण्ट पोस्ट कार्डस, स्टॅम्पस्, देशविदेशांतील चलनातील जुनी दुर्मिळ नाणी.

**बॉलिवूड बाजार- गुजर स्ट्रीटजवळ**

क्लासिकल, सुगम संगीताच्या, गायनाच्या व वादनाच्या रेकॉर्डस्, नट, नट्यांचे व सिनेमातील स्टिल फोटो, (लॉबी कार्डस्, शो कार्डस्) पोस्टर्स, हॅण्डपेटेंड कार्डस् फोटो, बुकलेटस् (गाण्यांचा पुस्तिका), टेप्स, सीडी व स्पूल, फिल्मी गाण्यांच्या हजारो ध्वनिमुद्रिका, काचेच्या स्लाइडस्.

'टेलिफोन्स' - गेल्या शतकातील सर्व प्रकारचे टेलिफोन्स, 'टाइपरायटर्स'

'फर्निचर'- हंडीवाली मशिदीसमोर- बर्मा, चायना, झेकोस्लाव्हाकिया, व्हिक्टोरियन पद्धतीचे जुन्या शैलीचे कलात्मक फर्निचर

आजच्या अद्यावत शॉपिंग सेंटर्स, मॉल संस्कृतीच्या जमान्यात, मुंबापुरीच्या अडीचतीनशे वर्षांच्या इतिहासाची साक्ष असणारे आपले वेगळे अस्तित्व जपत, थंडी, ऊन-पाऊस, वारा यांना न जुमानता, उघड्यावर दिमाखाने भरणारे आठवड्यांचे बाजार; मुंबई शहराचे एक वेगळे आकर्षण आहे. अंधेरी-मरोळचा शनिवार बाजार, मालाडचा सोमवार बाजार असे जुने पारंपरिक बाजार आजही भरत असले तरी त्यांना चोरबाजाराची शान नाही.

'जुम्मा' किंवा शुक्रवार हा मुस्लिम बांधवांचा धार्मिक महत्त्वाचा म्हणजे प्रार्थनेचा दिवस असतो. या दिवशी चोरबाजारातील सर्व दुकाने व स्टॉल्स दिवसभर बंद राहतात. परंतु दर शुक्रवारी भल्या पहाटेपासूनच या बाजाराला जाग येते. दूरदूरचे फेरीवाले आपले किमती सामान, पाट्या, हातगाड्या, टेंपोत भरून इथे घेऊन येतात. सकाळी सात वाजेपर्यंत हा बाजार नटूनथटून तयार असतो. फेरीवाल्यांच्या रस्त्यावर बसण्याच्या जागा ठरलेल्या असतात. त्यासाठी ते स्थानिक दुकानदारांना दिवसाचे भाडेही देतात. हा इतर आठवड्याच्या बाजाराप्रमाणे फळेफुले, भाजीपाला, मच्छी, घरगुती वस्तूंचा, मुलांच्या खेळण्यांचा बाजार नाही. इथे महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यांतून, शेजारच्या राज्यांतून जुन्या दुर्मिळ वस्तू विकण्यास येतात. या मालाला ग्राहकांची चांगली मागणी असते. त्यातील निवडक, शेलका मालही पडेल त्या किमतीत उचलण्यास चोखंदळ ग्राहक तयार असतो. कारण परत ती दुर्मिळ वस्तू हाती लागेल याची शाश्वती नसते. इथे येणारा बहुतेक सर्व माल हा जुना, वापरलेला अथवा चोरलेला असल्याने त्याची किंमतही बरीच कमी असते. ग्राहकाला येथील सौंदर्यपूर्ण कलात्मक वस्तूंची भुरळ पडते. हौसेला इथे मोल नसते. सामान किंवा वस्तू पाहताक्षणीच आवडणे सर्वांत महत्त्वाचे असते. ग्राहक आपल्या पूर्वजांची आठवण म्हणून, छंद जोपासण्यासाठी, संग्रह वाढवण्यासाठी कधी घराच्या सजावटीसाठीही हे सामान खरेदी करतात. येथील प्रत्येक वस्तूच्या मागे इतिहास दडलेला असतो. ॲण्टिक अथवा जुन्या वस्तूची किंमत तिच्या दुर्मिळपणावर ठरते. विक्रेत्याची पैशांची गरज आणि ग्राहकाला वस्तूची गरज यावर सौदा ठरतो. त्या दुर्मिळ वस्तूची किंमत काहीही असू शकते. इथे तुमचे 'लक' महत्त्वाचे असते.

दोन-तीन शतकांपूर्वी पोर्तुगीज, डच, इंग्रज, फ्रेंच, यहुदी यांसारखे अनेक पाश्चात्त्य लोक इथे राहत होते. अनेक देशांबरोबर आपले व्यापारी संबंध होते. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर आपल्या चीजवस्तू इथेच सोडून ही विदेशी मंडळी आपल्या मायदेशी परत गेली.

त्यांनी वापरलेल्या चीजवस्तू या ना त्या मार्गाने शेवटी चोरबाजारात येतात. याशिवाय अनेक इतिहासप्रसिद्ध शहरांतील, विविध संस्थानांतील जुने राजवाडे, जमीनदारांचे बंगले, नबाबांच्या हवेल्या लिलावात निघतात, जीर्ण होऊन जमीनदोस्त होतात. परत नव्याने बांधल्या जातात. तेथील कलाकुसरीचा सर्व माल हे व्यापारी खरेदी करतात. याशिवाय कित्येकजण आपल्या वडिलोपार्जित जुन्या वस्तू जागेच्या अडचणीमुळे, नादुरुस्त झाल्यामुळे नाममात्र किमतीत फेरीवाल्यांना विकतात. फॅशन बदलते, नवीन वस्तू, नवीन मॉडेल्स येतात. त्यामुळे जुन्या वस्तू 'आउटडेटेड' होतात. काहीवेळा हलाखीची परिस्थिती निर्माण झाल्यामुळे घरचे सामान विकण्याची परिस्थिती येते. हे सामानही पिनपासून मोठमोठी झुंबरे, हवेल्यांच्या खिडक्यादारांपर्यंतच्या वस्तू हे फेरीवाले इथे विकायला आणतात.

रेडिओग्रॅम, चेंजर, साखळी लावलेली शोभिवंत घड्याळे, जातिवंत लाकडाचे अत्यंत कोरीव नक्षीकाम केलेले फर्निचर, तांबा, पितळ, ब्रॉन्झ, जस्त आदी धातूंपासून बनवलेल्या सुबक वस्तू, पेटिंग्ज, चित्रे, राजेरजवाड्यात दिसणारे नक्षीकाम केलेले पेटारे, रांजण, गुडगुड्या, पक्ष्यांचे मोठाले पितळी पिंजरे, कलात्मक पुतळे, मूर्ती, चहाचे पेटारे, चौकोनी बरण्या, पोर्सिलीनच्या प्लेटस्, कपबश्या, कटग्लासेस, लायटर्स, अॅश ट्रेज, दारुचे मग्ज, चलनी नाणी यांसारख्या असंख्य वस्तू इथे पाहायला मिळतात- भारतीय पुरातत्त्व खात्याने निर्बंध घातलेल्या हस्तिदंती, प्राण्यांची हाडे, कातडी, केस व शिंगांपासून बनवलेल्या वस्तू, देवादिकांच्या पंचधातूंच्या मूर्ती, शिल्पे अशा काही संरक्षक वस्तू सोडून बाकी सर्व सामान इथे मिळते. पुरातत्त्व विभागाची माणसे अधूनमधून इथे पाहणी करण्यास येतात. बाजारात आलेली कोणतीही जुनी दुर्मिळ वस्तू दुरुस्त करणारे, जुनी वस्तू नवीन करण्यात वाकबगार असणारे कसबी कारागीर इथे आहेत. इथे एकदा विकलेली वस्तू कुणी परत घेत नाही. खरेदी-विक्रीची पावतीही सहसा कुणी देत नाही. परदेशी लोकांना विमानतळावर दाखवायला कच्ची पावती देतात. परंतु त्यावर खरी किंमत कधी लिहिलेली नसते. इथे बहुतेक सर्व व्यवहार रोखीने चालतो. डिमांड ड्राफ्ट, क्रेडिट कार्डवरही पेमेंट घेतले जाते. मात्र सहसा उधारी ठेवली जात नाही.

पाच वर्षांपेक्षा जुन्या वस्तूंना सेल्सटॅक्स लागत नाही. काही व्यापारी आपण विकलेली वस्तू, सामान अस्सल असल्याचे सर्टिफिकेट देतात. आपल्याकडे १०० वर्षांपेक्षा जुन्या वस्तू परदेशी पाठवण्यावर बंदी आहे. आपल्या संग्रही अशा वस्तू असल्यास त्या सरकारकडे रजिस्टर कराव्या लागतात. तसे कायदे अनेक आहेत. परंतु ते राबवण्यासाठी यंत्रणा अत्यंत अपुरी आहे. इथे माल कुठून येतो व तो नंतर कुठे जातो यावर काहीच नियंत्रण नाही. अनेकजण 'असली माल' म्हणून नकली माल विकतात. शेलका, किमती माल यांच्या गोदामात असतो. विश्वास पटल्यावरच तो आणून दाखवला जातो. आजकाल परदेशी गिऱ्हाईके इथे मोठ्या प्रमाणावर येत असल्याने, त्यांच्याशी हे मोडक्यातोडक्या इंग्रजीत बोलतात. इंटरनेटवर यांच्या स्वत:च्या वेबसाइट आहेत. इंटरनेटमुळे यांचा व्यवसाय आजकाल ग्लोबल झाला आहे.

कनिष्ठ, मध्यमवर्गीय, विविधवस्तूंचे छांदिष्ट, हौशी, संग्राहक, इतिहास, समाजशास्त्राचे अभ्यासक, हिन्दुस्थानी कारागिरी, कलाकुसर यांविषयी कुतूहल असणारे विदेशी नागरिक, बंगले, फ्लॅट, हॉटेल्स, रेस्टारंट यांच्या अंर्तगत सजावटीसाठी विविध वस्तू घेणारी उच्चवर्गीय व्यापारी मंडळी, स्टुडिओत सिनेमांचे सेट लावणारे तंत्रज्ञ, कारागीर, पंढरीच्या यात्रेकरूसारखे नित्यनियमाने, भक्तिभावाने दर शुक्रवारी इथे येतात.

चोरबाजारच्या अंतरंगात शिरण्यासाठी, तेथील अर्थपूर्ण व्यवहार समजून घेण्यासाठी मला बरीच खटपट करावी लागली. 'चोरबाजार' हा पूर्वी व्ही.पी.रोड, लॅमिंग्टन रोड, पायधुणी व डोंगरी पोलिस स्टेशन्सच्या सरहद्दीवर वसलेला होता. सध्या तो बाजार जे.जे. मार्ग पोलिस स्टेशनच्या हद्दीत येतो. मुळात हा भाग म्हणजे गुन्हेगारी विश्वाची राजधानीच म्हणायला हरकत नाही. मुंबईतील नामचीन अंडरवल्ड डॉन या भागातून उदयाला आलेले आहेत. त्यातून हा धार्मिकदृष्ट्या अत्यंत संवेदनशील भाग. दंगलीच्या काळात लॅमिंग्टन रोड पोलिस ठाण्यावरच्या नंदकुमार गोखले या तरुण अधिकाऱ्याची क्रूर हत्या झाली ती याच चोरबाजारच्या नाक्यावर! पॅरडाइज हॉटेलच्या परिसरात!

जवळचा चार नळ परिसर म्हणजे मुंबईतील खिसेकापू टोळ्यांचा सर्वांत मोठा अड्डा! त्यांच्या सराईत टोळ्या बाजारात भेंडी बाजारच्या बस स्टॉपवर 'गिऱ्हाइकांच्या' शोधात फिरतच असतात. त्यांचे आठ-दहा लोक तुम्हाला मध्ये घेऊनच पद्धतशीरपणे लुटतात. यावर गर्दीत न घुसणे आणि सतत सावध राहणे हा एकच उपाय आहे. भेंडीबाजारातील 'गँग' एका जमान्यात संपूर्ण मुंबईत कुप्रसिद्ध होती.

येथील मोठे व्यापारी, दुकानदार सहसा कधी चोरीचा माल

घेत नाहीत. छोट्या टपरीत दुकान चालवणारे, ओट्यावर बसणारे व्यापारीच चोरीचा माल विकत घेतात, तो सुद्धा ओळखीच्या चोरांकडूनच! परगावच्या चोरांना, रॉबर्सना हे लोक सहसा जवळ करत नाहीत. कारण पकडले गेल्यास त्या गावी किंवा शहरात खेटे घालायला यांच्याकडे वेळ नसतो. स्थानिक पोलिसांचे आणि अशा व्यापाऱ्यांचे मात्र सख्य असते. एक तर ते आपल्या दोन नंबरच्या धंद्याचा हप्ता देतात. शिवाय मुंबईत जेव्हा मोठा गुन्हा घडतो, तेव्हा त्यातील आरोपींची खबरही हेच लोक देतात. पोलिसांना एखाद्या केसमध्ये, प्रॉपर्टी रिकव्हर होत नसेल तर आपल्याकडचा तसाच माल पोलिसांना देऊन ते मदतही करतात. याबाबतीत घडलेला एक मजेशीर किस्सा, मला एका निवृत्त पोलिस अधिकाऱ्याकडून ऐकायला मिळाला.

चर्चगेटला राहणाऱ्या एका होम सेक्रेटरीच्या घरात चोरी झाली होती. तशी एके काळी यशवंतराव चव्हाण यांच्या घरात चोरी झाली होती. चोरांना सर्वच सारखे असतात, समाजात त्याचे काहीही स्थान असो! तेव्हा आपल्या मोठ्या साहेबांना खूश करण्याकरता आझाद मैदान पोलिस ठाण्यातील एका तरुण अधिकाऱ्याने शक्कल लढवली. त्याने एफआयआर पाहून तशा प्रकारचा माल चोर बाजारातून जप्त करून साहेबांना नेऊन दिला. त्याला वाटले, आपण तातडीने तपास करून माल रिकव्हर करून दिला म्हणून साहेब खूश होतील! साहेबांच्या मुलाने त्या अधिकाऱ्याला स्पष्टपणे सांगितले,''हा माल आमचा नाही, मुकाट्याने परत घेऊन जा!'' तो अधिकारी खजिल झाला.

चोरीचा माल विकत घेताना पकडले गेल्यास येथील व्यापारी (ते अडाणी, निरक्षर असले तरी व्यवहारात चतुर असतात) सरळ सांगतात,''हमे क्या मालूम साब ये चोरी का माल है?'' त्यांचे एकच म्हणणे असते, चोरीच्या केसमध्ये आम्हाला पाहिजे तर साक्षीदार बनवा पण आरोपी बनवू नका. चोरबाजारात लोक जसे जुन्या वस्तू विकत घ्यायला येतात, तसेच, आपल्या वस्तू विकायलाही येतात. येथील व्यापारी चोरीला माल अचूक कसा ओळखतात? माणसांची पारख कशी करतात? याविषयी मला अनेक वर्षे कुतूहल होते. मी अलीभाई या वृद्ध व्यापाऱ्याला याविषयी छेडले असता ते म्हणाले, ''चोर को पहचानना, बिलकूल नया होगा तो भी बहुत आसान हैं।''

''मगर कैसे?'' मी विचारले,

''उसकी शकलसे! पुलिस चोर को ढूंढती है और चोर हमेशा पुलिस को। वो तुमसे सीधी नजर कभी नही मिलाएगा। उसका ध्यान रास्तेपर रहेगा। इस बाजार में गरीब से गरीब आदमी भी अपनी चीज बेचने आता है तो उसको दुख होता है। वो परेशान रहता है। कचरे के भाव में वो अपनी चीज कभी नहीं बेचता। जादातर चोर यहां चरस का दम लगाकर ही आते है। जिनका जमीर जिन्दा है वो गम करता है और नशे में गम भुलाता है। जिसका जमीर ही मर गया वो गम नहीं करता और अजनबी को अपनी चीज नहीं बेचता। चोर जो भी मिला उसी में खुशी मानकर वहां से जल्दी खिसक जाएगा। इस लाइन में पैसा जरूर है लेकिन रिस्क उठानी पडती है। कभी कभी लेने के देने भी पडते है। एक बार आप अगर इस लाइन में घुस गए तो फिर बाहर निकलना बहुत मुश्किल होता है। आपको चोर भी नहीं छोडते है और पुलिस भी। कभी कौनसा केस खुल जाएगा कोई बोल भी नहीं सकता है। इससे लम्बा रहना बेहतर है।''



**दुर्मीळ वस्तू विकणाऱ्या मुदस्सरच्या खांद्यावर हात ठेवून उभे असलेले अरुण पुराणिक**

अमीर, गरीब, चोर, पोलिस, छांदिष्ट, नादिष्ट लोकांना आकर्षित करणारा, पाहणाऱ्याला नेत्रसुख देणारा, मुंबईचा इतिहास व संस्कृती जतन करणारा, तिचा जगभर प्रसार करणारा दुर्मिळ, संग्राह्य वस्तूंचा हा चोरबाजार; हे मुंबई शहराचे एक आगळेवेगळे वैशिष्ट्य आहे.

**अरुण पुराणिक**
इ-१०३, महेश्वरीनगर,
एमआयडीसी, अंधेरी (पूर्व)
मुंबई-४०००९३
vgpuranik@gmail.com

# देशाच्या ‘नियोजन’ सदनात...

## हेरंब कुलकर्णी

Given the special focus on education in the Eleventh Plan, I have no hestation in calling this plan a 'National Education plan.'

– पंतप्रधान मनमोहनसिंग

भारताचे पंतप्रधान मनमोहनसिंग यांनी अकराव्या पंचवार्षिक योजनेबाबत हे उद्‌गार काढल्यापासून पंचवार्षिक योजनेच्या मसुद्याविषयी फारच आदर वाटत होता. उत्सुकता वाटत होती. त्यातच अकराव्या योजनेने थेट व्हाउचर्स सिस्टिमची प्रायोगिक तत्त्वावर अमंलबजावणी करावी असे सुचवल्यामुळे, देशातील डाव्या चळवळीतील विचारवंत त्यावर तुटून पडले होते; तर माझ्यासारख्याला, व्हाउचर्सची एक जिज्ञासा असल्याने किमान प्रायोगिक तत्त्वावर अंमल करायला हरकत काय? असे वाटत होते. त्या उत्सुकतेतून २००७ साली अकराव्या योजनेचा मसुदा वाचून काढला. त्यातील ‘व्हाउचर्स’च्या धाडसाचे कौतुक वाटले होते.

त्याचबरोबर आणखी एका गोष्टीचे कौतुक वाटले. ते म्हणजे, की या देशातील प्राथमिक शाळांमधील गुणवत्ता, किमान अध्ययनक्षमतेची पातळी अतिशय कमी आहे याची स्पष्ट कबुली हा मसुदा देतो. पाचवीच्या विद्यार्थ्याला दुसरीची किमान अध्ययनक्षमता प्राप्त आहे, असे ‘असर’च्या अहवालाच्या आधारे हा मसुदा स्पष्टपणे नोंदवतो. याचे कौतुक अशासाठी वाटले, की शासनस्तरावर अपयशाची कबुली देण्याची पद्धत नसते. तसे मान्य करणे व त्यावर कृतिकार्यक्रम आखणे ही तर खूपची लांबची गोष्ट! त्या पार्श्वभूमीवर अकराव्या योजनेत घडलेले हे परिवर्तन मला महत्त्वाचे वाटते. शिक्षणावर अब्जावधी रुपये खर्च करूनसुद्धा जर मुले साधे वाचन-लेखनही शाळेत शिकत नसतील तर एवढा सारा डोलारा, चर्चा कशाला करायची? ही उद्विग्नता मला सातत्याने व्यापते. त्यामुळे अकराव्या योजनेतील ही कबुली व त्याविषयी व्यक्त केलेली चिंता मला जवळची वाटली.

त्यानंतर माझ्या प्रत्येक भाषणात प्लॅनिंग कमिशनची ही चिंता व व्हाउचर्सची शक्यता याचा संदर्भ येत गेला. मुंबईला व्ही.जे.टी.आय.ने शिक्षणविषयक एक आंतरराष्ट्रीय परिषद आयोजित केली. त्यात सहभागी झालो असताना, तिथे डॉ. नरेंद्र जाधव कार्यक्रम संपल्यावर घाईने जाताना भेटले. ‘ग्रंथाली’ने प्रकाशित केलेले माझे शिक्षणविषयक पुस्तक, ‘शाळा आहे- शिक्षण नाही’ त्यांना भेट म्हणून दिले आणि

त्यानंतर पुन्हा संपर्कही झाला नाही.

त्यापूर्वी वर्षभर अगोदर पुणे विद्यापीठाचे शिक्षणशास्त्र विभागाचे अधिष्ठाता संजय सोनवणी यांनी, विद्यापीठात प्राथमिक शिक्षणावर आवर्जून व्याख्यान आयोजित करून त्या व्याख्यानाची पुस्तिका, डॉ. नरेंद्र जाधवसरांच्या सूचनेवरून प्रसिद्ध केली होती. खरे तर, जाधव सरांशी इतकाच परिचय.

त्यानंतर दोन वर्षांनी सर केंद्रीय नियोजन आयोगावर सदस्य म्हणून गेले. मनुष्यबळ विकास मंत्रालयाशी निगडित शिक्षण हाच विषय सरांकडे आला; आणि सरांनी त्या शिक्षण समितीच्या मध्यवर्ती आढाव्यासाठी महाराष्ट्रातील शैक्षणिक व सामाजिक कार्यकर्त्यांना आवर्जून निमंत्रित करायचे ठरवले. प्रत्येक आढावा समितीत सरांनी महाराष्ट्रातील चाळीस ते पन्नास टक्के कार्यकर्ते व अभ्यासक आवर्जून घेतले. अगोदरच महाराष्ट्राचा आकस असलेल्या दिल्लीत त्यामुळे गदारोळ झाला. तेव्हा जाधवसरांनी पहिल्या नियोजन आयोगापासून किती कमी मराठी माणसे घेतली गेली आहेत, याची आकडेवारीच सादर केली. हा 'बॅकलॉग' भरतो आहे असेही त्यांनी ठामपणे ऐकवले. सरांचा हा बेधडकपणा व स्वाभिमान खचितच कौतुकास्पद आहे.

या समितीवर माझी निवड होणे हे काहीसे आश्चर्यकारक अशासाठी वाटले, की आजकाल अपवाद वगळता समित्या, शासकीय समित्यांवर निवड होताना गुणवत्ता हा बहुधा शेवटचा निकष असतो. जात, राजकीय सलगी इथपासून तर निवड करणाऱ्या व्यक्तीची केलेली भाटगिरी, प्रसंगी केलेली कामे इत्यादी निकष प्राधान्याने असतात. त्यामुळे गुणवंतांपेक्षा बहुतेक समित्यांवर 'चमकेश' मंडळीच जास्त दिसतात. व्रतस्थपणे काम करणारे संशोधक एकूणच दूर ठेवले जातात. त्यामुळे त्याचा परिणाम एकूण सर्वच क्षेत्रांच्या कुपोषणावर जाणवतो. त्या पार्श्वभूमीवर, केवळ माझे पुस्तक वाचून, सरांनी इतक्या महत्त्वाच्या राष्ट्रीय पातळीवर मला निवडावे, याचे खूपच आश्चर्य वाटले.

ज्या वेळी ही निवड झाली, त्यावेळी मी मोबाइलचा वापर बंद केलेला होता. (तो एक स्वतंत्र लेखाचा विषय!) मोबाइल बंद करून, माझ्या छोट्या गावात सर्व बाजूंनी संपर्क बंद करून कामे करत होतो. जाधवसरांचा स्वीय सचिव किशोर रकताटे हा ग्रामीण भागातला तरुण. एन.एस.एस.च्या योजनेतून पुढे आलेला. एन.एस.एस.च्या चाकणेसरांनी त्याला हेरला. जाधवसर या खेड्यातील तरुणाला दिल्लीत घेऊन आले. इतरत्र स्वीय सचिवसुद्धा लागेबांध्यातून निवडला जात असताना, मुलाखती घेऊन सरांनी या तरुण मुलांना नियोजन आयोगात केबिन मिळवून दिल्यात. किशोर रकताटेने दिल्लीहून पुणे विद्यापीठ, पुणे विद्यापीठातील एन.एस.एस.मधून आमच्या गावचे एन.एस.एस. व त्या एन.एस.एस. प्रमुखांनी माझ्या कार्यालयात फोन करून मला गाठले... या चिकाटीचेही मला कौतुक वाटले. एकीकडे रेंज गेली तरी आपली एखादी संधी हुकली तर नसेल असे मनात येते. अशावेळी तुमच्याकडे फोन नसतानाही तुमच्यापर्यंत संधी पोचतेच. याचे श्रेय या मंडळींच्या चांगुलपणाबरोबरच आपण सारेच केवळ संपर्क साधनांनाच खूप महत्त्व देतो, मात्र त्यावाचून फारसे अडत नाही, हाही मुद्दा लक्षात आला.

जाधवसरांनी पुणे विद्यापीठ, सामाजिक कार्यकर्ते, संशोधक, अभ्यासक असे विविध क्षेत्रांतील लोक निवडले होते. आमच्या एकट्या शिक्षणविषयक समितीत महाराष्ट्राचे माजी गृहमंत्री भाई वैद्य, 'युक्रांद'चे नेते कुमार सप्तर्षी, शिक्षकनेते रमेश जोशी, न्या. चंद्रशेखर धर्माधिकारी, डॉ. गजानन एकबोटे, शांतिलाल मुथा हे सदस्य होते. खरे तर, महाराष्ट्रातील सर्व मंडळींनी आपापल्या समितीत जे योगदान दिले त्याचा आढावा घेण्यासाठी स्वतंत्र्य लेखच होऊ शकेल.

या लेखाचा हेतू माझ्यासारख्या तळात काम करणाऱ्या सामान्य व्यक्तीला, देशाची सर्वोच्च ठिकाणी शिक्षणाची धोरणे जिथे ठरतात, त्या यंत्रणांविषयी काय वाटले हे मांडणे आहे. त्यामुळे महाराष्ट्राच्या एकूण योगदानावर फारसे लिहीत नाही.

मुळातच मी ग्रामीण भागात शिक्षणाच्या प्रशासनात प्रत्यक्ष कामाचा अनुभव घेतो आहे. प्रत्यक्ष शासन कसे काम करते हे अनुभवतो आहे. त्याचबरोबर राज्यस्तरावरील विविध बैठका, कार्यशाळा, समित्यांमध्ये सहभागी झाल्यावर एकूणच प्रशासन कसे काम करते, त्यांच्या मर्यादा काय असतात, अडचणी काय असतात? याचा अनुभव घेतलेला. पण राज्यपातळीवर ही धोरणे ज्याच्या आधारे बनतात ते केंद्रसरकार कसे काम करते, याची माहिती झाली. बऱ्याचदा गावपातळीवर कुठल्याही प्रशिक्षणात, शिक्षक धोरणांवर हलके भाष्य करत असतात. त्यात बहुतेक वेळा त्रागा, वैताग असतो आणि त्यात कधीकधी भाव असा असतो, की वर

दिल्लीत बसलेली मंडळी केवळ ए.सी. हॉलमध्ये बसून धोरणे आखतात आणि त्यांना व्यवहार काहीच कळत नाही, किंबहुना ग्रामीण व शहरी भागातील सर्वांनाच, वरच्या मंडळींना फिल्डचे आकलन नाही, त्यांना गावपातळीचे प्रश्नच कळत नाही असे वाटत असते.

मला खरी उत्सुकता ती होती, की खरेच ही सचिव मंडळी त्याअर्थाने कितपत अपडेट आहेत. त्यांना ग्रामीण प्रश्नांचे कितपत आकलन आहे? ग्रामीण शिक्षणाविषयी त्यांना कितपत आस्था आहे?

त्या दृष्टिकोनातून याकडे बघत होतो. त्यात पुन्हा प्लॅनिंग कमिशन हे प्रकरण सर्वत्र खूपच गंभीरपणे घेतले जाते. त्यात सध्याच्या प्लॅनिंग कमिशनचे उपाध्यक्ष मॉन्टेकसिंग हे मनमोहनसिंगाचे जीवश्चकंठश्च आणि त्यातही जागतिकीकरणसमर्थक असल्याने सध्याच्या सरकारवर नियोजन आयोगाचा एक दहशतवजा दबादबा आहे. अर्थात ती खूप चांगली गोष्ट आहे. त्यामुळे विकासप्रक्रियेचे ऑडिट होत राहते. या समितीवर निवड झाल्यावर मला हा अनुभव अनेकदा आला. आमच्या पंचायतसमितीत एक ट्रेनी बीडीओ आले. ते यू.पी.एस.सी.तून नुकतेच सुटलेले. कोणीतरी माझी ओळख करून दिली. ते फाईल वाचताना 'हूं' करत होते. त्या परिचयात 'प्लॅनिंग कमिशन' शब्द येताच त्यांनी ताडकन फाईल बाजूला टाकून माझा हात हातात घेतला! त्यामुळे 'नियोजन आयोग' ही जादू नेमकी काय आहे, हेही बघण्याची उत्सुकता होती.

बैठकीपूर्वी संपूर्ण देशाची शिक्षणविषयक धोरणे, आकडेवारी याविषयीची टिपणे आम्हाला पाठवण्यात आली. तो माझा सर्वांत आवडता विषय. देशपातळीवरील अधिकृत आकडेवारी अगदी घरपोच मिळाली. इतर वेळी त्यासाठी खूपच अदबावे लागत होते. त्यातून इतर राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्राची स्थिती बघता आली. (उदाहरणार्थ–सोबतचा तक्ता)

या सर्व आकडेवारीत उत्तरप्रदेश, बिहारच्या तुलनेत महाराष्ट्राने खूप मजल मारली आहे आणि केरळ, हिमाचलच्या आपण खूपच मागे आहोत हे लक्षात आले. नकळत तौलनिक अभ्यास सुरू झाला. आसामसारख्या राज्याची काळजी वाटू लागली.

सर्व शिक्षा अभियान, मिड डे मिल, माध्यमिक शिक्षण, साक्षरता या सर्व विषयांबाबत खूप तपशीलवार माहिती

| राज्य | साक्षरता | शिक्षकविद्यार्थी प्रमाण | गळतीचा दर | शालाबाह्य मुलांची संख्या |
|---|---|---|---|---|
| आंध्र | ६०.५% | २१:१ | ५६.७४ | १,७१,४१४ |
| आसाम | ५४.३% | २४:१ | ७३.५६ | १,९९,१८७ |
| बिहार | ४७.०% | ५४:१ | ७६.११ | ५,२२,५८६ |
| गुजरात | ६९.९% | ३३:१ | ४९.२९ | ९९,३४३ |
| केरळ | ९०.९% | २२:१ | ०० | १२,३१६ |
| हिमाचल | ७६.५% | १७:१ | ४.५०% | २,५८७ |
| उत्तरप्रदेश | ५६.५% | ५०:१ | ४४.१८% | ३,०१,९८८ |
| महाराष्ट्र | ७६.९% | २७:१ | २१.९३% | ५६,०८० |

(स्रोत – DISE 2007-08)

मिळाली. त्यात विशेषता ही वाटली, की कबुली सर्वत्र होती. 'आव्हाने' या नावाखाली का होईना, पण आपल्याला काय साध्य करायचे आहे याची यादी असायची. गळतीचा दर आटोक्यात आणण्याचा प्रयत्न करूनही गळती कमी होत नाही, हे सरकारनेच स्पष्टपणे नोंदवलेले बघून जरा बरे वाटले.

आकडेवारींच्या वैधतेविषयी नेहमीच शंका घेतली जाते; परंतु केंद्रीय पातळीवर 'आपली संख्या जास्त दिसायला नको' या एकाच भीतीपोटी सर्वत्र संख्या कमी दाखवली जाते. त्यातून शालाबाह्य मुले सगळीकडेच कमी दिसतात. गळतीचा दरही असाच फसवा असतो, पण त्याचे कारण पुन्हा प्रशासकीय व इतर असतात. शाळांमध्ये विशिष्ट तुकड्या असतील तर विशिष्ट संख्येने शिक्षक मंजूर केले जातात. त्यामुळे तुकड्या टिकवण्यासाठी पटावरून विद्यार्थी कमी केले जात नाहीत. त्यामुळे गळती कमी दिसते.

आकडेवारीच्या या मर्यादा असल्या तरीसुद्धा दिशादर्शन व्हायला आकडेवारी नक्कीच महत्त्वाची ठरते. किमान आसाम, बिहार, राजस्थानची शैक्षणिक स्थिती गंभीर आहे, हे सहजच लक्षात येते.

हे सारे अभ्यासल्यावर विमानाने दिल्लीला गेलो. विमानतळावरील वातावरण, निरीक्षणे हे माझ्या ग्रामीण नजरेने लिहायचा मोह आवरतो! स्वत:तील एक विसंगती मलाच खटकली. वास्तविक, केंद्रसरकारच्या कोणत्याही समिती सदस्याला विमानप्रवासाची सवलत, ही इतकी खर्चिक बाब खटकायला हवी पण कुठेतरी आपण उत्तेजित होतो आहोत असे मला जाणवले. त्याचे विश्लेषण केले तेव्हा लक्षात असे आले, की आपल्या तमाम मध्यमवर्गीयांत जे न्यूनगंड असतात

त्यातून उच्चमध्यमवर्गाविषयी एक सुप्त आकर्षण असते. त्यातून विमानप्रवास, पंचतारांकित हॉटेल, उच्चभ्रू वातावरणात वावरणे, इत्यादी चेकलिस्टवर आपल्यालाही टिक करायच्या असतात. हे सुप्त आकर्षण विचारसरणीला भेदून पलीकडे जाते! कार्यकर्त्याचा एन.जी.ओ. होण्याला हीच भानगड कारणीभूत असते.

प्रत्यक्ष नियोजन आयोगाची इमारत, तेथील सुरक्षा हे सारे दडपण आणायला पुरेसे आहेत. एकूणच तो सारा परिसर न्यूनगंड सहजपणे पेरतो. आपले सारे मुद्दे मांडायचीच भीती वाटायला लागते. चकचकीत वातावरणातल्या त्या सभागृहात लवकर पोचल्यावर, मराठमोळा प्रेमळ किशोर आणि जाधवसरांचे आश्वासक बोलणेच फक्त जवळचे होते.

मला खरी उत्सुकता होती, सेक्रेटरी ही भानगड जवळून बघण्याची. एक एक सेक्रेटरी येऊ लागले. आमच्या शैक्षणिक समितीत भारत सरकारच्या शालेय शिक्षण विभागाचे सचिव, सर्व शिक्षा अभियानाचे सचिव, साक्षरता विभागाचे सचिव, माध्यमिक शिक्षणाचे सचिव, सी.बी.एस.ई. बोर्डाचे अध्यक्ष, राष्ट्रीय अध्यापक संशोधन संस्थेचे प्रमुख, नवोदय विद्यालयाचे प्रमुख या मंडळींबरोबरच कुमुद बन्सल, कृष्णकुमार, मिपाचे प्रमुख गोविंदा, राष्ट्रीय बालआयोगाच्या अध्यक्षा शांता सिन्हा हे सारे या समितीचे सदस्य होते. त्याचबरोबर त्रिपुरा, गुजरात, ओरिसा, उत्तरप्रदेशचे शिक्षणसचिवसुद्धा या समितीचे सदस्य होते. एकूण २५ सदस्यांत ही सारी मंडळी संपूर्ण देशातील नोकरशाहीचे तिथे प्रतिनिधित्व करीत होती.

खाजगी गप्पांमध्ये सचिवांना शिव्या घालणे, त्यांना 'लाल फीत' वगैरे म्हणणे हा अनेकांचा छंद असतो. पण प्रत्यक्षात देशपातळीवरील सचिव बघणे हे दडपण आणणारे प्रकरण असते. पुन्हा सभागृहातले आणि सभागृहाबाहेरचे त्यांचे वागणे आणि त्यातही पुन्हा त्यांच्या केबिनमधले त्यांचे वागणे टोकाचा फरक दर्शविणारे असते. नजरेत एक उद्दामपणा असतो, पण त्याला कारण बुद्धिमत्ता आणि आत्मविश्वासाचे मिश्रण हे असते. बैठकीत ते साधारणत: बैठकीच्या प्रमुखाशी सलगी दाखवतात आणि इतरांना अंतरावर ठेवतात. ते प्रचंड बिझी असतात. आपण एकाच बैठकीसाठी आठ दिवस कपड्यांसह तयारी करून दिल्लीला जातो आणि त्यानंतरचे पंधरा दिवस बैठकीचे इतिवृत्त ऐकवत राहतो. ही मंडळी सभागृहात येताना विषयात प्रवेश करतात आणि सभागृह सोडताना पुढच्या बैठकीची चर्चा मनात सुरू करतात. दिवसभरात अशा अनेक मीटिंग्ज ते करत असतात.

सर्वांत मोठा धक्का सचिवांच्या आकलनाचा होता. जे प्रश्न आपण अत्यंत आकांडतांडव करून मांडतो, ते सारे प्रश्न त्यांच्याकडे आकडेवारीसह अपडेट असतात. पुन्हा आकडेवारीच्या तपशिलासह माहीत असतात. त्यामुळे समोरच्यांचे सर्व मुद्दे ते खोडू शकतात. आपण पहिल्यांदाच एखादा मुद्दा मांडत असतो पण ते मुद्दे त्यांनी अनेकदा ऐकलेले असतात. त्यामुळे मुद्दे मांडताना आपण जितके उत्तेजित होतो तितके ते थंड असतात. त्यामुळे गळती, शालाबाह्य मुले, शैक्षणिक सुविधा यांची इतक्या वरच्या पातळीवर चर्चा सुरू असताना, सातत्याने आढावे घेतले जातानाही तळातले वास्तव बदलत का नाही, याचे कारण मला असे जाणवले, की राज्यसरकारांचे प्राधान्यक्रम त्या तीव्रतेने ते विषय बनत नाहीत. पुन्हा राज्यस्तरावरील योजना जिल्हा, तालुका स्तरापर्यंत झिरपताना राजकीय हस्तक्षेप, आर्थिक भ्रष्टाचार, तळाच्या पातळीवरील नोकरशाहीची कुवत, इच्छाशक्ती या सर्वच घटकांचा परिणाम होतो. त्यातही केंद्रस्तरावरील अधिकाऱ्यांचे कार्यक्षेत्र हे केवळ धोरण आखणे, निधी वितरित करणे हेच असल्याने प्रत्यक्ष त्या निधीचे तळात काय होते याविषयी फारशी चर्चा होत नाही. त्या निधीचे समायोजन तपासणे, खर्च बरोबर झाला का? एवढीच काळजी केली जाते. केंद्रसरकारच्या स्तरावरून राज्यस्तरावरील योजनांची अंमलबजावणी तपासणी यंत्रणा स्वतंत्रपणे असल्याची गरज आहे, कारण आज केंद्रीय पातळीवरून भेटी होतात पण त्या थेट नसतात. राज्यशासनाच्या अधिकाऱ्यांनी ठरवलेल्या ठिकाणीच केंद्रीय अधिकारी जातात.

केंद्रीय सचिवांचे आकलन लक्षात आल्यावर वरील मुद्दे जास्त तीव्रतेने लक्षात आले. त्यानंतर आमची पहिली बैठक प्रत्यक्ष सुरू झाली. त्या बैठकीत संपूर्ण देशस्तरावर शैक्षणिक योजनांची अंमलबजावणी कशी सुरू आहे, याचे सादरीकरण देशाच्या प्रमुख सचिवांनी केले. अर्थात अंमलबजावणीपेक्षा एकूण निधी, त्याविषयीची धोरणे हीच चर्चा मोठी होती. धोरणात्मक गोष्टीसुद्धा त्या अर्थाने, महत्त्वाच्या होत्या. शिक्षणासाठी जी एकूण तरतूद आहे, त्या तरतुदीनुसार ५०% रक्कम ही फक्त प्राथमिक शिक्षणासाठी व साक्षरतेसाठी खर्च केली जात आहे. २०% रक्कम ही माध्यमिक शिक्षणासाठी आणि ३०% रक्कम ही उच्च शिक्षणासाठी खर्च केली जात आहे. प्राथमिक शिक्षण व

साक्षरतेसाठी निम्मी रक्कम खर्च केली जाते आहे. प्राथमिक शिक्षण व साक्षरतेसाठी निम्मी रक्कम खर्च होते आहे ही धोरणात्मक बाब खूपच महत्त्वाची आहे. त्यातही पुन्हा प्राथमिक शिक्षणात होणाऱ्या खर्चात, सर्व शिक्षा अभियानात व मध्यान्ह भोजन योजनेवरच जास्त खर्च केला जात आहे.

२००२-०३ साली ८७% शाळा या १ कि.मी. अंतराच्या आत होत्या. २००७-०८ मध्ये जवळपास ९९% वस्त्यांना आज १ कि.मी. अंतरात शाळा आहेत. ३ कि.मी. अंतरात असणाऱ्या शाळा ७८% पासून ९०% पर्यंत पोहोचल्या आहेत. ही आकडेवारी खूप बोलकी असते. शिक्षणाची संधी आज वस्तीपर्यंत आपण दिली आहे. ही खूप मोठी उपलब्धी आहे. शासनावर तुटून पडताना त्याची ही बलस्थाने लक्षात घ्यायला हवी. गळतीचा दर प्राथमिक स्तरावर २००१ साली प्राथमिक स्तरावर ३९% होता तो २००५-०६ साली २५.४३% पर्यंत खाली आला आहे. तर माध्यमिक स्तरावर तो ५४.०६ पासून ४६% पर्यंत खाली आला आहे. शालाबाह्य मुलांची संख्या ३ कोटी २० लाखांपासून ४५ लाखांपर्यंत याच काळात कमी झाली आहे. कारण शेवटी गळतीही शाळेत प्रवेश घेतलेल्यांची मोजली जाते. जे शाळेतच जात नाहीत त्यांची नाही. त्यातही मी म्हटल्याप्रमाणे, शाळा पटावर नावे तशीच ठेवतात व मुले गैरहजर असतात. ती गळती ठरत नाही.

शाळाबाह्य मुलांची संख्या हास्यास्पद वाटली. जागतिक अभ्यासानुसार, भारतात शाळेत न जाणाऱ्या मुलांची संख्या २१ दशलक्ष आहे. त्यामुळे शासकीय संख्या ही नेहमीच खूप कमी वाटते. पण गळती व शाळाबाह्यची संख्या या १० वर्षांत खूप वेगाने कमी होते आहे हे मात्र मान्यच करावे लागते.

लेखाच्या सुरुवातीला म्हटल्याप्रमाणे मला कबुली महत्त्वाची वाटते. 'Tackling systematic issues including teacher absenteeism and accountablility : Teacher absenteeism, multigrade teaching, single-teacher schools and overall poor quality of education have impacted upon the stickiness of elementary drop out rate which remains unabated at 46%' . These issues still remain to be addressed effectively. The impact of one million teachers sanctioned under the SSA simply gets diluted on account of high proportion of teacher absenteeism.'

इतकी स्पष्ट कबुली व त्याविषयीचे अपयश मान्य करून उपाययोजनेची मांडलेली गरज मला महत्त्वाची वाटली.

साक्षरतेविषयीची आकडेवारीही धक्कादायक अशीच वाटली. शहरी व ग्रामीण साक्षरतेतील दरी जरी कमी झाली तरीसुद्धा निरक्षरतेत ६२.४ दशलक्ष अनुसूचित जातीतील महिला, ३६.४ दशलक्ष अनुसूचित जमातीच्या महिला या निरक्षर आहेत. मुस्लिमांतील एकूण साक्षरता ५९.१% आहे. मुस्लिम महिलांमधील साक्षरता हरियाणात २१.५%, बिहारात ३१.५% आणि नागालँडमध्ये ३३.३%, काश्मीरातफक्त ३४.९% आहे. ही खूपच चिंतेची गोष्ट, नियोजन आयोगाला वाटते.

एकूणच या सर्व आकडेवारी बघितल्यावर असे वाटते, की आपण चर्चासत्रे, परिसंवादांत शासनावर एकारलेपणाने तुटून पडतो. पण प्रत्यक्ष प्रशासन जवळून बघितल्यावर लक्षात येते, की धोरणे आणि निधीची उपलब्धता या समस्याच नाहीत, तर प्रशासनात अंमलबजावणी प्रभावी न होणे याच समस्या असतात; तेव्हा बहुतांश उत्तरे ही प्रशासकीय असतात. सर्व शिक्षा अभियानातील बहुतांश योजना या कार्यकर्त्यांना प्रशासनावर दडपण टाकून वंचितांकरता राबवण्यासाठी आहेत, पण दुर्दैवाने त्यासाठी फारशी सामाजिक जागरुकता निर्माण न झाल्याने एन.जी.ओं.नीच त्याचा लाभ उठवला.

अधिकाऱ्यांच्या मांडणीनंतर आम्हा सर्व अशासकीय प्रतिनिधींना त्या सादरीकरणावर बोलण्याची संधी मिळाली. नरेंद्र जाधवसरांचे वेगळेपण मला असे जाणवले, की शासनाला झाकण्याचा किंवा अधिकाऱ्यांना सांभाळून घेण्याचा त्यांनी प्रयत्न केला नाही. अशासकीय सदस्यांना कितीही आक्रमकपणे त्यांनी बोलू दिले. त्यामुळे नोकरशाही या सर्व बैठकांत बचावाच्या पवित्र्यात राहिली.

मी स्वत: भटक्याविमुक्तांच्या शिक्षणाकडे होणारे टोकाचे दुर्लक्ष, आश्रमशाळांची दयनीय अवस्था, स्थलांतरितांच्या शिक्षणाची आबाळ आदी मुद्दे मांडताना शासनावर टोकाची टीका केली. पर्यवेक्षीय यंत्रणांचे अपयश ठामपणे मांडले. भाई वैद्य यांनी ० ते ६ वयोगटातील शिक्षणाची जबाबदारी शासन ढकलत असल्याचे आक्रमकपणे मांडले. पब्लिक-प्रायव्हेट पार्टनरशपिविषयी रमेश जोशींनी अत्यंत आक्रमकपणे शासनाचा खाजगीकरणाचा अजेंडाच उलगडून दाखवला. जागतिक बँकेची सरकावर परिणाम करणारी धोरणे स्पष्टपणे पुढे

आणली. डॉ. कुमार सप्तर्षींनी माध्यमिक शिक्षणाची परवड मांडली. शांतिलाल मुथा व डॉ. गजानन एकबोटे यांनी शालेय पोषण आहार योजनेची चिकित्सा केली. विनाअनुदानित शाळांचा मुद्दा मांडला. हे सारे प्रश्न मांडायला जाधवसरांनी प्रोत्साहनच देऊन अधिकाऱ्यांना त्या विषयांवर स्पष्टीकरण द्यायला लावले. उपप्रश्नांनाही स्थान दिले. त्या चर्चांमधून काही घडले असेल किंवा नाही, पण एक समाधान मात्र नक्कीच वाटले, की दिल्लीपासून हजारो किलोमीटरवर गडचिरोलीत बघितलेली शैक्षणिक आबाळ, वीटभट्टीवर बघितलेली स्थलांतरितांची परवड, भटक्यांची वेदना देशातील सर्वोच्च ठिकाणी निर्णयप्रक्रियेतील कुठेतरी महत्त्वाच्या अधिकाऱ्यांसमोर मांडता आली.

हे समाधानसुद्धा खूप मोठे वाटते. कारण इतर वेळी तिथे नम्रपणे बसणाऱ्या या अधिकाऱ्यांना गाठणे किती जिकिरीचे असते! हे प्रत्यक्ष अनुभवलेली मंडळीच सांगू शकतात. केबिनमध्ये प्रवेश मिळणे, त्यातही पुन्हा त्यांचे सतत चालणारे मोबाइल, ऐकण्यात नसणारी एकाग्रता, मीटिंग्ज आणि कामाच्या तणावात लगेच न मिळणारा प्राधान्यक्रम. हे सारेच थकवणारे असते. तेव्हा या यंत्रणांना तळातल्या कार्यकर्त्यांचा फीडबॅक खूप कमी पोचतो. लेखात आधी म्हटल्याप्रमाणे अधिकाऱ्यांना ते प्रश्न नवे नसतात, पण ती धग पोचलेली नसते.

अधिकाऱ्यांकडे आकडेवारी असते आणि कार्यकर्त्यांकडे त्या प्रश्नाची धग असते. आकडेवारी असते थंड आणि धग असते ज्वालाग्रही. ही ज्वालाच त्या आकडेवारीला लपेटून प्रवाही करत असते. तेव्हा सर्वोच्च स्थानावरील अधिकारी व प्रत्यक्ष तळातले कार्यकर्ते यांची गाठ घडवणे गरजेचे असते. ती प्रक्रिया जाधवसरांनी करून दाखवली.

पुन्हा वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मीटिंग्जमध्ये एक मुद्दा लक्षात आला, की केवळ प्रश्नांची धग असूनही चालत नाही तर नियमांच्या परिभाषेत ते मांडावे लागतात. केवळ 'गरिबांची मुले शिकत नाहीत' असे म्हणून चालत नाही तर शालाबाह्य मुलांची प्रत्यक्षातील स्थिती व शासकीय आकडेवारी यातील विसंगतीवर बोट ठेवले तरच अधिकारी बिचकतात. तळमळीनं भाषण करून त्यांच्यावर फारसा परिणाम होत नाही.

जाधवसरांनी प्रत्येक चर्चेत अधिकाऱ्यांना तळातले वास्तव लक्षात आणून देऊन, अप्रत्यक्षपणे यंत्रणा तपासण्याचीच जाणीव करून दिली. शालेय पोषण आहार योजनेचे कोट्यवधीचे आकडे वाचले जाताना, प्रत्यक्ष गावात योजना कशी चालते हे, आम्हाला बोलते करून, वास्तवाच्या कागदी घोड्यांना छेद दिला.

भाषेबाबत इंग्रजीचा आत्मविश्वास कमी पडतो हे स्वत:लाच जाणवले. जाधवसरांसारखे सहजपणे हावभावयुक्त इंग्रजी बोलता आले पाहिजे असे वाटून गेले. रमेश जोशींचे इंग्रजी भाषाप्रभुत्व कौतुकास्पद वाटले. भाई वैद्यांचे हिंदी त्यांच्या व्यक्तिमत्वातील प्रभावाने नकळत प्रभावी वाटत होते. दुर्दैवाने, दिल्लीतील हिंदी हद्दपारच झाली आहे. बहुतांश ठिकाणी फक्त इंग्रजीच बोलली जाते. ते आपण थांबवू शकत नाही, तेव्हा आपणही नकळत इंग्रजीचा आधार घेतो.

**हेरंब कुलकर्णी**
महालक्ष्मी मंदिराजवळ,
मु.पो.ता.अकोले
जिल्हा-अहमदनगर-४२२६०१.




**कळी उमलताना**

**अनुराधा गोरे**

मुलांमधील ऊर्जा हळुवारपणे जागृत करून, त्यांना सकारात्मक दृष्टिकोन देणारं हे लेखन पालक-शिक्षकांना नक्कीच मार्गदर्शक ठरेल.

**मूल्य २०० रु. सवलतीत १२० रु.**

# कोंब

## अनुवाद – **सुषमा शाळिग्राम**

**मूळ गुजराती लेखिका – वर्षा अडालजा**

प्रार्थनागृहात आज फारसे लोक नव्हते. हरिदास आणि शोभाताई दोघांनी इकडे–तिकडे नजर टाकली. नाहीतरी तिथे खूप लोक होतेच कुठे? पंचेचाळीस कॉटेजिसपैकी काही रिकामी होती. साधारणत: एका कॉटेजमध्ये एकच जण राहत होता; नाहीतर त्यांच्यासारखी जोडपी. थोडीफार. सकाळी प्रार्थनेची वेळ जरा उशीराचीच होती. सात–साडेसात. उठायला उशीर झाला तरी येता यावं, अशी. पण प्रार्थनेला सगळेच्या सगळे कधीच हजर नसायचे. कधी कोणाची तब्येत नरमगरम तर एखाद्या दिवशी कोणाचा ईश्वराला भेटायचा मूड नसायचा.

हरिदासांची सुद्धा आज इथे यायची अजिबात इच्छा नव्हती. नव्हती तर नसू दे ना! शोभानं तरी इतका का आग्रह धरावा? सकाळी येत नाही म्हटलं तर स्वत:ही खाटेवर बसून राहिली.

''तुला जायचं तर तू जा. मला कोणी धोंड दिलीय का, गेलंच पाहिजे म्हणून? मी नाही आलो तर तुला जाता येत नाही?''

डोळे पाणावल्यामुळे अस्पष्ट दिसणाऱ्या पतीकडे शोभाताई थोडा वेळ पाहत राहिल्या. मग हलकेच त्यांनी मान खाली घातली.

''हेच ते! रडून आपलं ते खरं करायची तुझी ही सवय मला पूर्वीपासूनच आवडत नाही. तुला माहीत आहे ते. का यावं मी प्रार्थनेला? का करू प्रार्थना? त्यानं आपली प्रार्थना ऐकली असती तर आज आपण इथं कशाला असतो?''

हृदयात पेटलेली आग आसवांनी विझली नाही. छातीत धूर कोंडल्यासारखं गुदमरायला झालं. खिडकीत अडकवलेली काठी हरिदासांनी काढून घेतली. पायांत चपला सरकावल्या. शाल पांघरून शोभाताई त्यांच्याबरोबर निघाल्या. दार ओढून घेऊन ती दोघं बाहेर पडली. बाहेर पडताक्षणी रखरखीत ओसाड रान हिंस्र पशुप्रमाणे अंगावर चालून येणार असल्यासारखी घडीभर तिथंच थांबली.

नकळत, शोभाताईंनी पतीच्या हाताला स्पर्श केला. बोलण्यासारखं होतंच काय! बेचाळीस वर्षं सुखदु:खाच्या वाटेवर जोडीनं चालत आले होते. पण आज ते समोर दिसणारं प्रार्थनागृह अनेक योजनं दूर वाटत होतं.

दोघांनी हळूहळू चालायला सुरुवात केली. बाणासारखा सूं सूं करत सोसाट्याचा वारा अंगाला चाटून गेला. त्याच्या तीक्ष्ण डंखानं शोभाताईंच्या अंगावर शहारा आला. त्यांनी शाल घट्ट लपेटून घेतली.

लक्षात सुद्धा येऊ नये अशा प्रकारे कुशनं सगळी पावलं टाकली होती. बोलता–बोलता कधीतरी म्हणायचा, ''दोन–

चार वर्षं तरी प्रमोशनचं नाव काढायची सोय नाही. ऑफिस पॉलिटिक्स पप्पा, दुसरं काय?' कधी म्हणायचा, महागाई अशी भडकली आहे, की स्वप्नातही मोठं घर घेण्याची शक्यता नाही. लवला अमेरिकेला शिकायला पाठवण्यासाठी तुम्ही आपलं भडोचचं घर विकलं नसतं तर आज तो पैसा प्रॉपर्टीत गुंतवता आला असता.

त्यानंतर एका पाठोपाठ एक, दोन मुली झाल्या. त्यांना खेळायला, अभ्यासाला जागा हवी. घर एवढंसं, त्यातून तुम्ही रिटायर झालात. तुम्हाला दिवसभर घरात एकट्याला करमणार कसं? वेळ कसा जाणार? बालमंदिर किती लांब.... शिवाय हे....न्...ते....न्...असं...न्.... तसं... आणि एके दिवशी अचानक...

बा, पप्पा, एक फार छान बातमी आहे. आपल्या शहराच्या अगदी जवळच एक वृद्धाश्रम होतोय. नावापुरता वृद्धाश्रम, बाकी पिकनिक रिसॉर्टच म्हणा ना! त्याचा प्लॅन पाहूनच मी खूश झालो. प्रत्येक कॉटेजमध्ये सगळ्या सोयी, कॉमन रूममध्ये सगळ्या खेळांची साधनं हजर! टीव्ही भला मोठा. झालंच तर दर रविवारी डॉक्टरांची व्हिजीट. शिवाय, बाग... कारंजं....आमराई....''

'अग आई गऽऽऽ !' शोभाताईंच्या तोंडून अस्फुट किंकाळी निघाली. ठसकन् ठोकर बसली आणि टोकदार दगडानं पायाचा अंगठा चिरला गेला. हरिदासांनी आजूबाजूला पाहिलं. दूरवरपर्यंत बाभळीच्या वठलेल्या शुष्क खोडांखेरीज दुसरं काही नजरेला पडत नव्हतं. विखुरलेल्या सुट्या सुट्या कॉटेजिसची दारं बंद होती. कान देऊन ऐकलं तरी प्रार्थनागृहाकडून कसलाच आवाज ऐकू येत नव्हता. तेवढ्यात हरिदासांना आठवलं. रुमाल. खिशातून रुमाल काढून आपल्या पत्नीच्या अंगठ्याला गुंडाळू लागले. पाहता पाहता रुमाल रक्तानं भरला.

काठीच्या आधारानं ते कसेबसे उठून उभे राहिले. लेकाची ही गुडघेदुखी! त्यांनी पत्नीकडे पाहिलं. लंगडत्या पायानं शोभाताई निघाल्या. त्यांच्यामागे हरिदास चालू लागले. बोलायची गरज नव्हती. स्पर्शानं, डोळ्यांनी, पुष्कळ वेळा तर नुसती मान हलवूनही भागायचं! एकमेकांचे हात धरून दोघं प्रार्थनागृहात आली. काही थोडे लोक एकटेदुकटे बसले होते. बसलेल्या, घोगऱ्या आवाजात धीरजबेन गात होत्या,

'हरि तारा हजार नाम,
कया नामे लखवी कंकोतरी...'

(हरी, तुझी हजार नावं, कुंकुमपत्रिका कोणत्या नावावर पाठवावी?) बेसुऱ्या आवाजात इतर कोणी त्यांना साथ देत होते. उरलेले माना डोलावत होते, की डुलक्या खात होते कोण जाणे! शोभाताई टाळ्या वाजवत ताल देऊ लागल्या. ओठातल्या ओठांत पुटपुटू लागल्या. हरिदासांनी ओठ घट्ट मिटून घेतले.

असा कोणता मोठा शुभ दिवस उजाडलाय आज, की अगदी कुंकुमपत्रिका पाठवून देवाला आमंत्रण पाठवायला हवं? त्या आकाशात बसलेल्याच्या असंख्य झगमगत्या डोळ्यांना काहीच दिसत नाहीये का? शहरवस्तीपासून इतक्या दूर ही असली खडकाळ ओसाड जमीन. आयुष्यातून तडिपार करून, धान्याची पोती आणून टाकावीत तसे आईबाप इथे आणून टाकलेत एकेकांनी. उघडेबोडके मातकट डोंगर, उगाच आपली थोडीशी बाभळीची काटेरी झाडंझुडपं, तसलंच कसलं तरी काटेरी झाडझाडोऱ्याचं कुंपण ह्या वृद्धाश्रमाच्या भोवताली. इथं ना कधी कोकिळेचं कूजन ऐकायला मिळतं, ना कुठल्या प्रकारची चैतन्याची स्पंदनं जाणवतात. गनिमी–काव्यानं लढणाऱ्या शत्रूसारखा मृत्यू कुठेतरी दडून, दबा धरून बसलाय. कधी झडप घालेल अन् पकडेल तावडीत; काय नेम? पोटची, सख्खी पोरं फसवतात तिथं यमाचा काय भरवसा!

लव परदेशातून पैसे पाठवतो. विचारतो, 'पप्पाजी, तुम्ही ऑलराइट असाल, मी ऑलराइट आहे.'

'कसलं ऑलराइट? इथे काही सुद्धा ऑलराइट नाहीये. हरिदासांना मोठ्यानं किंचाळावंसं वाटलं. शोभाताईंच्या अंगठ्यातून अजून थोडं थोडं रक्त ठिबकत होतं. जखम पिकली तर? बरीच नाही झाली तर? धनुर्वात तर नाही होणार? गेल्या दोन रविवारी डॉक्टर फिरकले नाहीत. त्या मिस्टर मोदींच्या छातीत कफ झाला होता आणि ह्याच धीरजबेनना परवा दम्याचा जोरदार अ‍ॅटॅक आला होता. आता मारे गाताहेत–कया नामे कंकोतरीऽऽ !''

पुन्हा एकदा ते कसेबसे उठून उभे राहिले. गुडघ्यातून जोरात कळ आली. गेल्या महिन्यात ट्रस्टी आले होते तेव्हा तक्रार केली होती की बाबांनो, बसाय–उठायला त्रास होतो. सगळीकडे जरा खुर्च्या–बाकं ठेवा. पाण्याचा त्रास आहे, विहीर तरी खणा. बाग करा. डोळ्याला जरा हिरवं दिसेल, थोडीफार सावली मिळेल.... तर नाहीच! नुसतं ''बघू बघू'' म्हणून एक फेरी टाकली. ''सरकारी ग्रँट मिळाली म्हणून ह्या मुरमाड जमिनीवर कशातरी ह्या कॉटेजिस बांधता आल्या. तुम्हाला ठाऊकच आहे, एव्हरीथिंग इज डिफिकल्ट नाऊ अ डेज!''

पाय ओढत, ख्याक् ख्याक् खोकत, कुंथत आणखी

दोन-चार म्हातारेकोतारे येऊन पोचले. कोणीतरी गायला सुरुवात केली. 'वैष्णवजन तो...' हरिदासांच्या मनात पुन्हा एकदा कडवटपणा दाटून आला. मोठ्यानं ओरडायची इच्छा झाली. 'बाबा रे, एक वैष्णवजन गेला मरून. पन्नास वर्षं झाली. अजूनपावेतो दुसरा वैष्णवजन भेटला नाहीये.' शोभाताई डोळ्यांनी खुणावत खाली बसायला सांगत होत्या. डावा पाय घासत ते बाहेर जाऊ लागले. हॉलमध्ये कृष्ण, देवीमाता, साईबाबा, विवेकानंद...सगळ्यांच्या मोठमोठ्या तसबिरी लावलेल्या होत्या. वेगवेगळ्या, मढवलेल्या सुभाषितांनी भिंती सजवल्या होत्या. 'काढून फेकून दिल्या पाहिजेत सगळ्याच्या सगळ्या!' हरिदासांनी तोंड फिरवलं.

प्रार्थनागृहाच्या बाहेर येऊन त्यांनी खोल श्वास घेतला. वाऱ्यानं पानं सळसळावीत तसं छातीत सळसळलं. त्यांनी चहूकडे नजर फिरवली. उजाड वैराण रानाचा भाला उरात घुसला. निवृत्तीनंतर काय काय स्वप्नं पाहिली होती! आता संध्याकाळी कामावरून यायला उशीर व्हायचा प्रश्नच नव्हता. कुशच्या मुलांना घेऊन समुद्रावर जावं, त्यांनी बांधलेले वाळूचे किल्ले पाहावे, शोभाच्या जोडीनं पाण्यात पाय भिजवत मावळत्या सूर्याची सोनकिरणं अंगावर झेलत उभं राहावं... कधी बागेत जावं. बागेतल्या हिरव्याकंच वैभवानं आपणही ताजं टवटवीत व्हावं... स्वप्नंच स्वप्नं.

''काय हो हरिदास, अर्ध्या प्रार्थनेतून उठून आलात?'' गळ्याला मफलर गुंडाळत मि. मोदी समोर उभे ठाकले.

''तुम्हाला ठाऊक आहे मि. मोदी! अहो, मी बायकोच्या समाधानासाठी येतो. बाकी ह्या किंचाळण्याला प्रार्थना म्हणतात का? शेंडा ना बुडखा!''

दोघं चालू लागले. आपल्या कॉटेजपाशी आल्यावर हरिदास म्हणाले,''या ना, आत या.'' मि.मोदी लगेच आत आले. शोभाताईंच्या खाटेवर बसले. रोज सकाळी ह्यावेळी काहीतरी निमित्त काढून ते यायचे. दहा वर्षांपूर्वी पत्नीचं निधन झालेलं. चार मुलं. सगळी आपापल्यात मग्न. 'डॅडी, एकटा जीव तुमचा. इथे तुम्हाला सोबती मिळतील.' एके दिवशी घेऊन आले मर्सिडीजमधून आणि गेले सोडून.

द्वारपालांसारखे दोघे एकमेकांसमोर बसून होते. काळ इथे अमर्त्य होता. शाश्वत. अश्वत्थाम्यासारखा अमर. मध्यान्ह होईतोच मोठ्या कष्टानं वेळ ढकलता ढकलता ते थकून जात. मग भोजनगृहापर्यंतचा प्रवास. अन्न बेचव. एकामागून एक घास गिळायचे. पाणी खारट. कितीही प्या. तहान भागायची नाही. तहान- जीवनाची, प्रेमाची.



चकार शब्द न काढता, भयानक शांततेत सगळे जण जेवण उरकत. पोट भरल्यावर जनावरानं आपल्या गुहेत शिरावं तसे कोणी रेवाशंकर नाहीतर धीरज, काशी बा किंवा एखादी समुकाकी किंवा असेच कोणी कोणी निमूटपणे आपापल्या कॉटेजमध्ये निघून जात. बाहेर सूर्याचा भाता अविरत चाललेला आणि उन्हाच्या ठिणग्या उडताहेत. कसाबसा दिवस ढकलायचा. काळोख दाटला की रानात रात्र डोलू लागायची. मग पुन्हा एक सकाळ... पुन्हा एक दिवस.

कधी-मधी कोणाचे नातेवाईक, सगेसोयरे भेटायला यायचे. कोणी आलेलं कळलं, की बाकीचे सगळे गोळा व्हायचे. 'अरे वा', 'कसं काय?''बरे आहात?' 'काय म्हणता?' 'घ्या, आज सोन्यासारखा दिवस उगवलाय्... जरा एवढं माझं काम... फोन... एवढा निरोप...पत्र...'

कधीतरी कुश यायचा. सोबत थोडेसे फराळाचे पदार्थ... वर्तमानपत्रं, मासिकं... कधी पल्लवी असायची बरोबर. कधी नुसतंच...''सध्या ध्वनीची अन् रीमाची परीक्षा सुरू आहे. मुलांच्या परीक्षा म्हणजे काय... पल्लवीचीच परीक्षा. घराबाहेर पडायला जमतच नाही. परीक्षा झाल्यावर पल्लवीचे भाऊ-भावजय आले होते... जागा अपुरी...''

आश्रमाभोवतीचं काटेरी कुंपण लांबत लांबत त्यांच्या

आयुष्याच्या सीमेपर्यंत पोचत होतं. नजर पोचेतो दूरवरचा मातकट-तपकिरी उजाड माळ त्यांच्या आत पसरत होता. संसारी दुनियेतून झाडले-झटकलेले, हकलले-ढकललेले ते सगळे ह्या इथपर्यंत पार टोकाशी येऊन ठेपले होते. पलीकडे होती मृत्यूची सरहद्द आणि आश्रम म्हणजे दोन्हींच्या मधली नो मॅन्स लँड.

एके दिवशी सकाळी आश्रमाच्या आवारात एक जीप येऊन थांबली. तीन-चार तरुण पोरं-पोरी त्यातून उतरली. लगेच इकडून-तिकडून, दारांआडून डोकी बाहेर निघाली. मुलं? कोणाचे नातेवाईक? तरुण मुलं? इथे? इतक्या सकाळी?

रोजच्यासारखं हरिदास आणि मि.मोदी प्रार्थनागृहातून लवकर बाहेर पडले होते. अजून पहिला चहासुद्धा मिळाला नव्हता. सकाळी दूधच आलं नव्हतं. रात्री धड झोप लागली नव्हती. डोकं जड झालं होतं. भुतानं झपाटावं तसं मि. मोदींना कफानं धरलं होतं. पिच्छा सोडत नव्हता. दोघं मुकाट्यानं थोडसं अंतर चालत गेले. जीप पाहून थबकले. हरिदासांना अगदी चीड आली. 'चला, चला, मि.मोदी. असतील कोणीतरी. आले असतील कोणालातरी भेटायला. गोड गोड बोलतील, की निघाले...'

खोक् खोक् करत मोदींनी दुजोरा दिला. दोघं पुन्हा चालू लागले.

''एक्स्क्यूज मी.'' ती पोरं जवळ आली होती.

''काय आहे? कोण हवंय्?'' हरिदासांनी तिरसटपणे विचारलं.

''तुम्हीच.'' वाऱ्यानं उडणारी झुलपं सावरत एका तरुणानं स्मित केलं.

''मी? माझ्याकडे काम आहे? अहो मिस्टर, मी तुम्हाला ओळखतही नाही.''

''आम्ही तरी कुठे ओळखतो?''

सगळे हसले. हरिदासांचं पित्त खवळलं.

''चेष्टा करताय आमची? एवढंच शिकवलंय का तुम्हा आजकालच्या पोरांना? हेच संस्कार केले तुमच्या घरच्यांनी?''ते गरजले.

सगळ्यांना एकदम संकोचल्यासारखं झालं. एक मुलगी पुढे आली. ''तुम्हाला वाईट वाटलं असेल तर माफ करा. तुम्ही आमच्या वडिलांसारखे आहात. आम्ही तुमची चेष्टा कशी करू?''

''मग?'' हातातली काठी जमिनीवर ठोकत हरिदासांनी मोठ्यानं विचारलं.

प्रार्थनागृहातून लोक बाहेर येत होते. काहीतरी वेगळं घडतंय असं कळल्यावर उत्तेजित होऊन सगळे तिकडे धावले. शोभाताईसुद्धा लगबगीनं आल्या.

''काय झालं? हे कोण सगळे?''

''विचार तूच'' हरिदास गुरकले.

उतरलेल्या चेहऱ्यानं ती मुलगी म्हणाली, ''आम्ही सगळे इन्स्टिट्यूट ऑफ सोशल स्टडीजचे स्टुडंट्स् आहोत. आम्हाला शेवटच्या वर्षी एक सोशल प्रोजेक्ट करायचा असतो. आम्ही चौघं वृद्धाश्रमावर प्रोजेक्ट करणार आहोत... म्हणून तुम्हाला भेटायला... आश्रम बघायला...''

''या..या.. पाहिला आश्रम? आता आम्हाला बघा. हे पाहा, आम्ही उभे राहिलो. या, भेटा! कॅमेरा नाही का आणला? घ्या, काढा आमचे फोटो. मग लिहा तुमच्या प्रोजेक्टमध्ये... बिचारे बुढ्ढे म्हातारे इथे मृत्यूची शिक्षा भोगत जगत राहिलेत. आपण त्यांच्याबद्दल सहानुभूती बाळगली पाहिजे... आदर बाळगला पाहिजे...! आदर, माय फूट!'' हरिदासांचा रागानं लाल झालेला चेहरा पाहून ती मुलगी गांगरून मागे हटली.

शोभाताईंनी रागेजत म्हटलं,''काय हे?'' मग मुलीकडे वळून म्हणाल्या, ''त्यांचं बोलणं मनावर घेऊ नकोस हं! आज जरा त्यांना बरं नाहीये ना, म्हणून...''

''म्हणूनबिणून काही नाही. इथं काय ठेवलंय बघण्याभेटण्यासारखं? आम्ही म्हणजे काय प्रदर्शनातली वस्तू आहोत? बघायला म्हणे...!!'' रागारागानं हरिदास पुढे सरसावले. मोदींनी त्यांचा हात धरून ठेवला.

''एवढी दूर आलीत पोरं, त्यांना बोलू तरी द्या.''

बाजूच्या घोळक्यातल्या इतर तीन-चार जणांनी त्यांची 'री'ओढली. ''हो..हो.. बोलू द्या.. बोलू द्या... हं, विचारा, विचारा, काय विचारायचंय ते!''

एकाच्या अंगात उत्साह संचारला. ''चला, चला, तिकडे प्रार्थनेच्या जागेकडे चला. मी जरा बघून येतो. दूध आलं असेल तर त्यांना चहा द्यायला सांगू.''

साचलेल्या निश्चल डबक्यात तरंग उठावेत तसं सगळे काही ना काही बोलू लागले. आता मात्र हरिदासांचा तोल सुटला.

''जा नं जा. चहा प्या. गप्पा मारा. जा, जा. ते आता हात झटकून होतील पसार. मग धोंड्यासारखं तुम्हालाच इथं खितपत पडायचंय्!''

दुखरा पाय ओढत हरिदास कॉटेजकडे निघाले. सगळ्या

घोळक्यासोबत मोदी प्रार्थनागृहात गेले. शोभाताई थबकल्या. क्षणभर काय करावं हे त्यांना सुचेना. मग त्याही सगळ्यांच्या पाठोपाठ गेल्या. कॉटेजमध्ये शिरताक्षणी हरिदासांनी काठी भिरकावून दिली. धाडकन पलंगावर अंग टाकलं. पायातून कळा येत होत्या. डोकं भणभणत होतं. प्रदर्शन मांडलंय् का आपलं? जणू अचानक कोणीतरी उघडं करून टाकलंय असं वाटून त्यांनी चादर ओढून घेतली. चादर पांघरून तसेच पडून राहिले.

कितीतरी वेळानंतर दार वाजलं. शोभाताई आल्या होत्या. हरिदास रुसून निजूनच राहिले. इतरांसारखी ही मूर्खसुद्धा त्यांच्या मागे गेली!

शोभाताईंना धस्स झालं. ''का हो? झोपलातसे? तापबीप नाही ना?''

चादर फेकून ते बसते झाले. ''आहे ताप. काय करशील?''

''काय बाई म्हणावं तुम्हाला! लहान पोरासारखं करता अगदी. किती चांगली होती ती मुलं. काय काय एकेक सांगत होती गमती गमती! अन् ह्या बघा, किती बिया दिल्यायत पेरायला. आणल्या मी. ते म्हणे की इथे रोपं, फुलं...''

हरिदास खो खो हसू लागलो.

''रोपं? फुलं? ह्या दगडगोट्यात? कहता भी दीवाना, सुनता भी दीवाना!''

''तुम्हाला जे म्हणायचे ते खुशाल म्हणा! मी पेरणार म्हणजे पेरणार.''

''खबरदार आपल्या अंगणात बिया पेरशील तर!'' अंगात आल्यासारखे हरिदास एकदम उठायला गेले, पण उठणं जमेना. त्यांच्याकडे न पाहताच शोभाताई बाहेर निघून गेल्या. जरा वेळानं खिडकीखाली आवाज येऊ लागले. हरिदास बळेबळे उठले. खिडकीजवळ जाऊन उभे राहिले. शोभाताई आणि मि. मोदी दोघे मिळून जमीन खणत होते.

''शोभा!'' हरिदार ओरडले. ''थांब, थांब म्हणतो ना!''

''मेल्या एवढ्याशा बिया लावल्या तर तुमचं काय गाठोडं जातं हो?'' चिडून त्या म्हणाल्या.

मातीनं भरलेला हात उंच करून मि. मोदी समजावणीच्या सुरात म्हणाले,''काही उगवणार नाहीय, नसू दे. पण शोभाताईंना हौस आहे तर करू द्या की! मी पण लावल्यात माझ्याकडे.''

''हो का? ठीक ठीक. छान छान सुवासिक दगड उगवतील ते डोक्यात मारून घ्या.'' हरिदासांनी धाडकन खिडकी बंद केली.

दुसऱ्या दिवशी त्यांना जाग आली तेव्हा शोभाताई खोलीत नव्हत्या. उठायला उशीर झाला? आपल्याला सोडून शोभा एकटीच प्रार्थनेला गेली? बरं झालं, कटकट गेली. रोज त्या प्रार्थनेचा सुरुवातीपासूनच त्रास व्हायचा, आजच्या दिवस तरी वाचलो. गुडघा सुजलाय वाटतं! हरिदास सावकाश उठले. हळूहळू चालत तोंड धुतलं, केस विंचरले तोवर शोभाताई आल्या.

''आटोपली का प्रार्थना? झाल्या शिरा ताणून?''

''काय हो हे तुमचं म्हणते मी! प्रार्थनेची वेळ आता होतेय. मी माझ्या पेरलेल्या बियांना पाणी घालायला गेले होते.''

''हत्तेरेकी! अजून ते बियांचं भूत आहेच तुझ्या मानगुटीवर?''

''माझं भूत मला लखलाभ! चला प्रार्थनेला.''

''नको. तू जा एकटी. माझी नाही इच्छा.''

''पाय दुखतोय ना? ऐकत नाही माझं जरासुद्धा. मागच्या खेपेला कुशनं आणून दिलं होतं त्या आयुर्वेदिक तेलानं चांगलं मालीश करून देते म्हटलं, पण ऐकायचं कोणी?''

''तुझ्या त्या बियांना पाज ते तेल.''

शोभाताई निघून गेल्या. मफलर गुंडाळून काठी टेकत तेही बाहेर आले; पण एकतर पाय दुखत होता आणि सोबतीला कोणी नव्हतं. त्यांचं मन रमेना. ते कॉटेजमध्ये परत आले. पलंगावर बसून राहिले. काळ्या ढगांनी आकाश भरून गेल्यावर होतो तशा अंधारानं कॉटेज भरून गेली आहे असं त्यांना वाटू लागलं. खिडकी उघडायची इच्छा झाली पण त्या बियांची आठवण होताच मन कडवट झालं. काय साली निर्लज्ज दुनिया आहे, हृदयशून्य! ही शोभाही त्यांनाच सामील झाली!!

बऱ्याच वेळानं शोभाताई आल्या. तिरकसपणे ते बोलले,''खूप वेळ चालली तुमची....प्रार्थना!'' शोभाताईंवरचा रोष अजून मावळला नव्हता.

''काशीबांच्या घरी गेले होते.''

''घ्या! कॉटेज घर कधीपासून झाली? आणि तू लोकांच्या घरी कधीपासून चकरा मारायला लागलीस?''

''काशीबांनी छान विटा लावून वाफा केलाय. तो बघायला गेले होते. पण ते जाऊ दे. पुन्हा तुमची कटकट सुरू होईल. माझा चहा झालाय तिकडे. तुमचा घेऊन येऊ?''

शोभाताई पुन्हा बाहेर गेल्या. कॉटेजमधली एक न् एक वस्तू मोडून तोडून फेकून द्यावी असं हरिदासांना वाटायला लागलं. एकजात सगळे मूर्ख कसे?

दोन दिवस अबोल्यात गेले. ते उठायच्या आतच शोभाताई निघून जात. नंतर बाहेरून चहाबिहा पिऊन उशिरा

परतत. अलीकडे प्रार्थनेला जाणं हरिदासांनी सोडल्यातच जमा होतं. शोभाताईसुद्धा आग्रह करत नव्हत्या. त्यामुळे बरं वाटण्याऐवजी रागच येत होता. 'आता कशाला मला बोलवेल? त्या बिया गळ्यात पडल्यात ना! मी सकाळी सोबत नसलो तर, बरंच झालं. खुशाल मजेत काशीबांचे वाफे पाहायला जावं, मोदींच्या अंगणात जावं... मोदींनी म्हणे अंगणात दोन्ही बाजूंनी लावल्यात बिया. म्हणजे म्हणे दोन्ही बाजूंनी वेल चढवता येईल दाराच्या चौकटीवर. नवीनभाईंनी मातीच्या कुंडीत तुळशीचं रोप लावलंय न् काय. धनजीला स्वैंपाकघरालगत भाजीपाल्याचा मळाच फुलवायचाय असं काल कोणीतरी म्हणत होतं. वेड्यांचा बाजार आहे झालं!'

आताशा मोदी सकाळी त्यांच्याकडे उशीरा यायचे. मग रोजच्यासारखं दोघं थोडंसं फिरून यायचे. इकडे मिळणारी वर्तमानपत्रं शिळी असायची, शिळ्या बातम्यांचीच चर्चा चालायची असं सगळं होतचं होतं; तरी हरिदासांना वाटायचं आपल्यात आणि मोदींच्या मध्ये असंख्य बियांची एक भिंत बांधली गेली आहे. त्यांच्या मनात राग उसळायच्या. वाटायचं एक कुदळ घ्यावी आणि सगळ्यांच्या बिया खोदून काढाव्या. रोपं उपटून टाकावी. अरे, डोळे फुटलेत का तुमचे? दिसत नाही का जमीन किती ओसाड, पडीक आहे ते? इथे काही नाही उगवणार. काही नाही बहरणार रे बाबांनो, काही नाही.

शोभाताईंशी रोजचं ठरावीक तेवढं बोलणं होतंय्.

'ऐकलतं का? कुशनं कळवलंय, रीमा पास झाली. पेढे पाठवणार आहे. आश्रमात वाटायला. पल्लवीची बहीण अमेरिकेहून आलीय. तिला भेटायला घेऊन येणार आहे...' नेमका मुद्याचा तेवढा विषय टाळून बाकी सगळं बोलताहेत. शोभा थोडी बदलल्यासारखी वाटते. बारीकशा फटीइतका दुरावा. पण तेवढ्यानं जसा काही रुसण्या-फुगण्याचा, भांडायचा अधिकारच नष्ट व्हावा तसं मन उदास असतं. रोज उशिरा येण्याबद्दल मोदींना सुनवायचं सोडून दिलंय. आता कशालाच अर्थ उरला नाहीय. मोदींच्या दाराच्या चौकटीवर मधुमालतीची वेल चढणार नाही. रात्री रानावनातून सूं सूं करत येणारा सोसाट्याचा वारा, पाठीवर हिरवंगार ओझं घेऊन येणार नाही. कधीच, काहीच होणार नाही.

विद्यार्थ्यांचं ते टोळकं कोणत्या कुमुहूर्तावर आलं होतं कोणास ठाऊक! एवढ्याशा नखभर बीनं त्यांच्या शोभाला हिरावून घेतलं होतं! शोभाला खूश करण्यासाठी तिनं आग्रह करण्याची वाट न पाहता, ते प्रार्थनागृहाच्या दाराशी जाऊन उभे राहात; पण प्रार्थना झाल्यावर गप्पाटप्पा करायला कोणीच तिथे रेंगाळत नव्हतं. आपापल्या 'पेरणी' केलेल्या जमिनीच्या तुकड्याकडे जो तो पसार होई. आसामात झालेल्या भूकंपाच्या करुण कहाण्या मोदींना सांगायला जावं तर लक्षात यायचं, की तासभर ते अंगणातल्या त्या नापीक जमिनीकडेच टक लावून बघत बसलेत. हरिदासांना मोदींची कीव येई.

बस्स! खूप झालं. हा वेडपटपणा संपवलाच पाहिजे. सगळे वाफे खोदून काढले तरच शोभाची न् सगळ्यांची डोकी ताळ्यावर येतील.

त्यादिवशी ते शोभाताईंच्या आधी उठले. हलकेच बाहेर पडून कॉटेजच्या मागच्या बाजूच्या खिडकीपाशी आले.

अरे वा! शोभानं काशीबांकडून वाफा तयार करून विटाही रंगवून घेतल्या वाटतं. अलीकडे फिरकलीच कुठे ह्या बाजूला! शोभा उठायच्या आत त्या वांझोट्या बिया खोदून काढल्या पाहिजेत. नंतर त्या मोदीबुवांची पाळी! चांगला धडा शिकवतो एकेकाला! बागा करताहेत!

वाफे खोदून काढायला काहीतरी शोधण्यासाठी त्यांनी सर्वत्र नजर फिरवली. टोकदार काहीच सापडलं नाही. हरकत नाही. हातांनीच माती उकरून काढीन.

हरिदासांनी वाफ्यात हात घातला. बोटाच्या टोकांना अति कोमल, ऋजुस्पर्श झाला. अंगावर काटा आला. चकित होऊन त्यांनी लक्षपूर्वक पाहिलं. खडकाळ, ओसाड, पडीक जमीन फोडून इवले इवले, नाजूक, लसलसते, हिरवेगार कोंब उगवून वर आले होते. पृथ्वी रोमांचित होत असावी तसे वाऱ्याच्या झुळुकीसरसे किंचित थरथरत होते. अहाहा! किती शीतल, सुखद स्पर्श!

हरिदासांचे डोळे विस्फारले गेले. हे काय? ती कठीण भूमी फोडून, हिरवे हिरवे कोंब बनून अंकुरल्यासारखे, ते स्वत:च ताजे टवटवीत हिरवेगार झाले होते.

हर्षातिशयानं त्यांनी धक्का मारून खिडकी उघडून टाकली आणि मोठ्यानं हाक मारली, ''शोभाऽऽ!''

(मूळ गुजराती कथा 'कूंपळ' लेखिका – वर्षा अडालजा)

**सुषमा शाळिग्राम**
१००४, ट्विन टॉवर्स 'ए'
१६५, डी.पी. रोड, औंध,
पुणे – ४११००७.
फोन : ०२०-२४८८०७१९

# वृद्धत्वाचे नवे सामाजिक आयाम

## नीलिमा भावे

माणसे जन्माला येतात, मोठी होतात, म्हातारी होतात, आणि मरून जातात. मनुष्यप्राण्याला स्वत:बद्दलची आणि स्वत:च्या आजूबाजूला असलेल्या जगाची जाणीव होऊ लागली, त्याबद्दलची त्याची समज वाढू लागली, त्यानंतर ही गोष्ट त्याच्या लक्षात आली. पण ही नैसर्गिक प्रक्रिया माणसाच्या जिव्हाळ्याचा आणि अभ्यासाचा विषय झाली ती मानवी संस्कृतीच्या इतिहासात फारच उशीरा-अगदी अलीकडे-म्हणजे त्यांच्या जीवनक्रमाचा निसर्गाशी असलेला संबंध तुटल्यानंतर. शेती आणि शेतीशी संबंधित उद्योग यावर चालणारी माणसाची उपजीविका बदलली. त्यानंतर, विज्ञान व तंत्रज्ञान यांच्यावर आधारित यंत्रप्रधान उत्पादनपद्धती आली. तिने माणसाच्या कुटुंबव्यवस्थेत आणि समाजव्यवस्थेत मूलगामी बदल घडवले. त्यानंतर माणसाचे काम करण्याचे ठिकाण, कामाचे स्वरूप, त्या कामास लागणारी कौशल्ये, त्या कामातून होणारी फलनिष्पत्ती, सगळे काही बदलले. दरम्यान विज्ञानाची प्रगती चालूच होती. आरोग्य आणि औषधोपचार या क्षेत्रातले नवे नवे शोध सर्वसामान्य माणसापर्यंत पोचत होते. त्याचे राहणीमान सुधारत होते. आणि जगभर माणसाची आयुर्मर्यादा वाढत होती.

पूर्वी आपल्याकडे चाळिशी आली की म्हातारपण आले असे समजले जायचे. हल्ली चाळिशी हा ऐन तारुण्याचा काळ समजला जातो. पूर्वी एखाद्याने साठी गाठली तर त्याबद्दल परमेश्वराचे आभार मानण्यासाठी धार्मिक समारंभ केला जायचा. आता माणूस निदान पंचाहत्तरी तरी गाठणार, हे गृहीत धरले जाते. वृद्धत्व येणार तर ते कशा पद्धतीने यावे, कशा पद्धतीचे असावे, याचा विचार आता सुरू झाला आहे. ही एक नवी घटना कुटुंबात आणि समाजात घडू लागली आहे. पूर्वीच्या काळी घरात, समाजात वृद्ध माणसे असत पण 'वृद्धत्व' या गोष्टीचा स्वतंत्र विचार केला जात नसे; कारण ती माणसे कुटुंबाचा भाग म्हणून सामावली जात असत. एकूण कुटुंबव्यवस्थेत कुटुंबातल्या वृद्धांचीही व्यवस्था लागत असे. पण आता कुटुंबाचेही स्वरूप बदलले आहे. त्यामुळे वृद्धत्वाच्या व्यवस्थेचेही स्वरूप बदलले आहे.

वृद्धत्वाला येण्याची मनाई करणे शक्य नसले तरी येणारे वृद्धत्व कमीतकमी त्रासदायक होईल याची तरतूद करणे शक्य आहे, व तशी तरतूद प्रत्येकाने करायला हवी, या विचाराने आता समाजात मूळ धरले आहे. पूर्वीच्या काळी म्हाताऱ्या माणसांकडून कुटुंबाची एवढीच अपेक्षा असायची, की त्यांनी

संसारातले लक्ष कमी करावे, आणि ते ईश्वरभक्तीकडे वळवावे. एका कोपऱ्यात बसावे, समोर येईल ते खावे-प्यावे, आणि पडून राहावे. आता वृद्धापकाळातली आर्थिक तरतूद, आरोग्यविषयक तरतूद, कुटुंबातल्या घटकांच्या परस्परसंबंधाचा विचार, वृद्धांचे सामाजिक जीवन असे अनेक पैलू माणसाने म्हातारे होणे या नैसर्गिक प्रकियेला असतात, हे लक्षात येत चालले आहे. बऱ्याच प्रगत देशांमधून-त्यात आपल्या देशाचाही अंतर्भाव आहे-सरकारी धोरण व सरकारी प्रयत्न यांच्या मदतीने, वृद्धत्वाच्या कौटुंबिक व सामाजिक समस्यांची व्यवस्था लावणारे उपक्रम हाती घेण्यात येत आहेत. वृद्धांसाठी काम करणाऱ्या स्वयंसेवी संस्था स्थापन होत आहेत.

माणसांची आयुर्मर्यादा वाढत चालल्यामुळे समाजातली वृद्धांची संख्याही वाढत चालली आहे. 'वृद्ध' या वयोगटातही उपगट पाडावे लागत आहेत. नोकरीतून निवृत्त होण्याचे वय साठ वर्षे, म्हणून साठ वर्षेपूर्व ही वृद्धत्वाची सुरुवात धरली तरी साठ ते पंचाहत्तर हा वयोगट हल्ली आपली तब्येत सांभाळून असतो, त्यामुळे खुटखुटीत असतो. या वयोगटातल्या व्यक्तींनी स्वत:ला कसल्या ना कसल्यातरी उपक्रमात गुंतवून घेतलेले असते. हे उपक्रम कधी कुटुंबाच्या उपयोगी पडणारे असतात, कधी त्यांना स्वत:ला समाधान देणारे असतात, तर कधी थोडेफार पैसे मिळवून देणारेही असतात. या पुढच्या, म्हणजे ७५ ते ८५ या वयोगटातल्या लोकांच्या बहुधा तब्येतीच्या काहीतरी महत्त्वाच्या तक्रारी सुरू झालेल्या असतात. पण यातल्या सगळ्याच व्यक्ती तशा असहाय्य झालेल्या नसतात. घरातल्या लहान लहान कामांच्या जबाबदाऱ्या उचलून गृहव्यवस्थेला हातभार लावत असतात. ८५ च्या पुढचे वृद्ध मात्र बहुतांशी 'वृद्ध' म्हणता येतील अशा शारीरिक-मानसिक अवस्थेत असतात. त्यांना दुसऱ्यांची मदत लागते. काही विकार जडलेले असल्यास रुग्णशय्येवर असतात. हिंडते-फिरते असले तरी घरातल्या किंवा घराबाहेरच्या व्यवहारांची जबाबदारी घेण्याइतके सक्षम राहिलेले नसतात. त्यांना घरातही एकटे ठेवणे योग्य नसते. अर्थात हे वयोगट ढोबळ मानाने ठरवलेले आहेत. त्यातल्या लक्षणांची अदलाबदल होऊ शकते. पण त्यांच्या विषयीचे प्रश्न मात्र तेच राहतात.

आपल्या समाजात गेल्या ३०-४० वर्षांत जे बदल घडून आले, त्यांची कारणे काहीही असली तरी त्यांचा परिणाम म्हणून वृद्धांची जागा, कौटुंबिक उतरंडीत सगळ्यात वरच्या पायरीवरून सगळ्यात खालच्या पातळीवर आली आहे. हे कटु असले तरी सत्य आहे, आणि वृद्धांना त्याची तीव्र जाणीव आहे. म्हणूनच आजची वृद्ध मंडळी स्वत:ला '७० वर्षांचा असणं' किंवा '८० वर्षांचा असणं' असे म्हणवून घ्यायला लागली आहेत. पण मनातल्या मनात या वृद्ध मंडळींना वृद्धत्व म्हणजे 'नको रे बाबा'; वृद्धत्व म्हणजे अडगळीत पडणे, वृद्धत्व म्हणजे गृहीत धरले जाणे; वृद्धत्व म्हणजे 'आणखी किती वर्ष यांना आयुष्य आहे कुणास ठाऊक' हे वाक्य घरात वरचेवर ऐकायला लागणे; वृद्धत्व म्हणजे मुलांनी हिडीसफिडीस करणे; वृद्धत्व म्हणजे नातवंडांनी टिंगल करणे; वृद्धत्व म्हणजे मुलांवर ओझे होऊन राहावे असेच वाटत राहते. ''आम्ही वृद्ध नाही, आम्ही अजून तरुणच आहो'' असे दोन्ही बाहू उभारून पुन्हा पुन्हा जगाला सांगितले, तरी त्यामागची वेदना लपत नाही.

वृद्धत्वाकडे पहाण्याचे दोन मुख्य दृष्टिकोण आहेत. पौर्वात्य दृष्टिकोण आणि पाश्चिमात्य दृष्टिकोण असेही म्हणता येईल. जेव्हा एकत्र कुटुंबपद्धती ही समाजाची गरज होती; म्हणजे शेतीप्रधान उत्पादन व्यवस्थेच्या काळात तेव्हा वृद्धत्वाबरोबर माणसाच्या अंगी अनुभवाचे 'पुष्कळ पावसाळे पाहिल्याचे' शहाणपण येते, असे मानले जात असे. त्यामुळे कौटुंबिक अडचणीत, सामाजिक समस्येत वृद्धांचा सल्ला विचारला जात असे. त्यांच्या शब्दाला कुटुंबात व समाजात मान असे. त्यांचा सामाजिक दर्जा उच्च मानला जात असे. हा सकारात्मक दृष्टिकोण होता.

दुसऱ्या बाजूला पाश्चिमात्य विचारानुसार वृद्धत्व येणे म्हणजे शारीरिक दुर्बलता येणे, परावलंबी होणे, मानसिकदृष्ट्या कमकुवत होणे, आर्थिक परिस्थिती खालावणे व या साऱ्यांचा एकत्रित परिणाम म्हणून वृद्धांचे कुटुंबातले व समाजातले महत्त्व-व वावरही-कमी होणे असा नकारात्मक दृष्टिकोण होता.

या दोन्ही दृष्टिकोनांमध्ये थोडेफार तथ्य आहे. पण सर्वसाधारण समाज जसजसा शेतीप्रधान ग्रामकेंद्रित अर्थव्यवस्थेकडून उद्योग प्रधान, शहरी अर्थव्यवस्थेकडे वळतो आहे, तसतसा वृद्धांबद्दलचा नकारात्मक दृष्टिकोण अधिकाधिक प्रबळ होत चालला आहे. त्यामुळे आज शारीरिकदृष्ट्या सुदृढ असलेले, मानसिकदृष्ट्या सक्षम असलेले, आर्थिकदृष्ट्या स्वतंत्र असलेले, आणि कुणाच्याही मदतीची गरज नसलेले वृद्धदेखील; समाजाकडून कोपऱ्यात सरकवले जाऊ लागले आहेत. त्यांचे अस्तित्व असून नसून सारखे समजले जाऊ लागले

आहे. यांची प्रतिक्रिया म्हणून हल्ली वृद्धमंडळी स्वत:चा पोशाख, खाणे-पिणे, वागणेबोलणे जास्त जास्त तरुणांसारखे ठेवू लागले आहेत. त्याबद्दल काहीसा अट्टहासही करू लागली आहेत, असे पुष्कळदा जाणवते.

वृद्धत्वाबद्दल एक तिसरा विचारही आज नव्या तरुणांमध्ये अधूनमधून डोकावताना दिसतो आहे. तो म्हणजे 'वृद्ध' हा एक लाडावलेल्या माणसांचा सामाजिक गट आहे. 'लाडावलेला' या अर्थी, की देशांच्या उत्पादनव्यवस्थेत काही सहभाग राहिलेला नसूनही देशातल्या सोई-सवलतींचा फायदा ही मंडळी घेत असतात. देशात उपलब्ध असलेल्या संसाधनांचा त्यांच्याकडे जाणारा वाटा त्यामुळे प्रमाणापेक्षा जास्त असतो. ज्या कुटुंबात तीन पिढ्या एकत्र राहत असतात, त्या कुटुंबात वृद्धपिढीवर कुटुंबाच्या उत्पन्नाचा त्यांच्या वाट्याच्या प्रमाणापेक्षा जास्त भाग खर्च होतो; अशी भावना अलिकडे निर्माण होऊ लागली आहे.

कुटुंबातले वृद्ध सभासद हे इतर सभासदांपेक्षा वेगळे आहेत, व त्यांचे अस्तित्व कसेबसे सहन करायचे आहे, अशी भावना विसाव्या शतकाचा उत्तरार्धात निर्माण झाल्याचे दिसते. याचा परिणाम म्हणून 'आपण घरातल्यांना नकोसे आहोत' अशी भावना सुखवस्तू, मोठ्या जागेत रहाणाऱ्या कुटुंबातल्या वृद्धांनाही ग्रासत चाललेली दिसते. त्यामुळे कर्तीसवरती मुले असूनही गावातल्या गावात, एकाच हाउसिंग सोसायटीत, कधीकधी एकाच इमारतीतही स्वतंत्रपणे एकेकटे रहाणाऱ्या वृद्धांचे प्रमाण वाढत चालले आहे. अशा एकट्या राहणाऱ्या वृद्धांच्या मदतीसाठी काही स्वयंसेवी संस्था, पोलिस खाते मदत करते. या नव्या सामाजिक सेवा, नव्या वृद्धत्वाची गरज म्हणून निर्माण झाल्या आहेत.

वृद्धत्वाशी संबंधित एक कौटुंबिक समस्या म्हणजे अलीकडे वाढत्या प्रमाणावर दिसणारे मेंदूच्या पेशींचे विकार. ही समस्या आरोग्यविषयक असली तरी त्यामुळे विकारग्रस्त वृद्धांची शारीरिक व मानसिक स्थिती हळूहळू ढासळू लागते, व ते परावलंबी होत जातात. ही प्रक्रिया सावकाश चालते, त्यामुळे दीर्घकाळ चालते. यावर अजून उपाय सापडलेला नाही व मृत्यूही लवकर येत नाही. अशा विकाराने ग्रस्त असलेली व्यक्ती ज्या कुटुंबात असेल, त्या कुटुंबातल्या इतर व्यक्तींवर त्या आजारांचा व शुश्रूषेचा आत्यंतिक शारीरिक, मानसिक, भौतिक व आर्थिकही ताण पडतो. अशा कधी बऱ्या न होणाऱ्या वृद्ध रुग्णांचे आयुष्य औषधे देऊन वाढवत जावे का, असा नैतिक प्रश्न समाजात उपस्थित होण्याची शक्यता, नजिकच्या भविष्यकाळात उपस्थित होऊ शकते. खाजगी बोलण्यात तो आजच उपस्थित केला जात आहे.

आज समाजाची सर्व सहानुभूती त्या रुग्णशय्येला खिळलेल्या वृद्ध व्यक्तीला असते. तिची शुश्रूषा करणाऱ्या व्यक्तीचा-ही व्यक्ती बहुधा त्या रुग्णाची तितकीच वृद्ध सहचर/सहचरी किंवा वृद्धत्वाकडे झुकलेली मुलगा/मुलगी असतात - विचार कुणाकडून केला जात नाही. उलट हे काम कर्तव्य म्हणून आणि/किंवा पुण्यकर्म म्हणून, सेवा करण्याची संधी म्हणून न कुरकुरता आनंदाने केले जावे; अशी सगळ्यांची-म्हणजे ज्यात त्यांना स्वत:ला काही करावे लागत नाही अशा शेजारी पाजारी, नातेवाईक ओळखीपाळखीची मंडळी यांची- अपेक्षा असते. त्या सेवा देणाऱ्या व्यक्तीला स्वत:साठी थोडीशी विश्रांती, थोडा निवांतपणा, थोडा विरंगुळा हवासा वाटला, तर तसं वाटणं म्हणजे जणू काही पापच आहे. निदान चुकीचं तरी आहे असं समजलं जातं. वर्षानुवर्षे अशी शुश्रूषा मोलानं घेणं परवडणारी कुटुंब समाजात फार नसतात. यापुढे दिवसेंदिवस घरातल्या इतर व्यक्तींना अशा दीर्घकालीन शुश्रूषेसाठी वेळ देणंही कठीण होत जाणार आहे. त्यामुळेच अशा वृद्ध रुग्णांचं आयुष्य औषधं देऊन वाढवत जावं का, हा प्रश्न खाजगीत आत्ताच विचारण जाऊ लागला आहे. पुढे मागे तो समाजातही चर्चेला येऊ शकेल.

वृद्धत्वाबद्दलचा बहुतेक अभ्यास हा वृद्धांच्या शारीरिक समस्यांबद्दल आलेला आहे. त्यातून जेरॉण्टॉलॉजी म्हणजे वार्धक्यविचार ही वैद्यकीय शाखाही नव्यानं आकार घेत आहे. त्यामानाने वृद्धांच्या मानसिक, कौटुंबिक आणि सामाजिक समस्यांचा पद्धतशीर अभ्यास अजून होताना दिसत नाही. वृद्धांसाठी काम करणाऱ्या स्वयंसेवी संस्थादेखील असा अभ्यास करताना दिसत नाहीत. त्यांचे उपक्रम हे वरवरच्या मलमट्टीसारखे असतात, व त्यांच्या उपयुक्ततेचा देखील पाठपुरावा केला जात नाही. (उदा. रक्षाबंधनाच्या दिवशी शाळेतल्या मुलांनी काही वृद्धांना आजी-आजोबा म्हणून राख्या बांधणे; हा उपक्रम काही स्वयंसेवीसंस्था त्या दिवशीचा कार्यक्रम म्हणून राबवतात. पण त्यानंतर पुढे ती मुले व ते आजी-आजोबा यांचा एकमेकांशी संपर्क यावा, अशी कोणतीही योजना नसते.)

अलीकडे बहुतेक वृद्ध मंडळी स्वत:च काही ना काही सामाजिक उपक्रमात सहभागी होत असतात. कधी आपापले

गट तयार करून स्वत:च अनौपचारिक उपक्रम चालवतात. जसे भिशी, रमी, भजनमंडळ, हास्यक्लब, रोज एकत्र फिरायला जाणे, एकत्र व्यायाम करणे, एकत्र जमून गप्पा मारणे, वगैरे. काहीजण ज्येष्ठ नागरिक संघाच्या कामात सहभागी होतात किंवा दुसऱ्या एखाद्या स्वयंसेवी संस्थेत काम करतात. थोडक्यात म्हणजे बहुतेक वृद्ध लोकांच्या बाबतीत नोकरी/व्यवसायातून निवृत्त झाल्यानंतर आयुष्याचे एक नवे पर्व सुरू होते. या नव्या पर्वात काय करावे यासाठी समाजात आज अनेक पर्याय उपलब्ध झाले आहेत. कुटुंबाबाहेरच्या अशा उपक्रमांमध्ये भाग घेतल्यामुळे वृद्धांच्या कुटुंबातल्या वागण्यावर, कौटुंबिक संबंधांवर काय परिणाम होतो? त्यामुळे त्यांच्यात आत्मसन्मानाची भावना वाढते का? की उलट आढ्यता, आत्मगौरव, अहंभाव निर्माण होतो? अशा कामांमधून त्यांचे कुटुंबाच्या बाहेरच्या माणसांशी जवळचे संबंध निर्माण होतात का? या नव्या संबंधांमुळे त्यांना भावनात्मक आधार, भावनांची ऊब मिळते का? की ही फक्त वेळ घालवण्याची साधने असतात? या पैलूचाही अभ्यास करण्याची गरज आहे.

मात्र निवृत्तीनंतरच्या आयुष्याच्या या पर्वात आज काठच्या वृद्धांना सक्रीय रहाण्याची गरज भासते, ही गोष्ट लक्षणीय आहे. त्यामुळे निवृत्त व्यक्ती चालवू शकतील किंवा सहभागी होऊ शकतील असे उपक्रम समाजात वाढत आहेत. वृद्धत्वाचा हा एक नवा सामाजिक आयाम आहे.

आजकाल एकेकट्या वृद्ध आई/वडिलांमध्ये देखील स्वतंत्र रहाण्याची प्रवृत्ती वाढत आहे. मुले गावातच असली, आणि सुस्थितीत असली तरी त्यांच्या घरात अंग चोरून रहाण्यापेक्षा स्वत:च्या घरात स्वत:च्या मनाप्रमाणे राहावे, आणि लागेल त्या मदतीची व्यवस्था आपले पैसे देऊन करून घ्यावी, असा विचार व त्यानुसार आचारही वाढतो आहे. पारंपरिक भारतीय कुटुंबव्यवस्थेत झालेला हा एक मूलगामी बदल आहे.

वृद्धत्वाचा विचार आणखी दोन प्रकारांनी करता येतो. त्यातला एक प्रकार सामाजिक व्यवस्थेच्या किंवा संरचनेच्या दिशेने जातो, तर दुसरा प्रकार सामाजिक प्रक्रियेच्या दिशेने जातो. आपण सर्वजण एका विशिष्ट प्रस्थापित सामाजिक व्यवस्थेत जन्म घेत असतो. या सामाजिक व्यवस्थेनुसार आपले आयुष्य आकार घेत असते. आपल्या आयुष्याच्या प्रत्येक टप्प्याच्या केंद्रस्थानी ती सामाजिक व्यवस्था असते. (उदा. शिक्षण संपवून कमाई करू लागणे, लग्न करणे, मुले केव्हा व किती होणे इ.) कुटुंबातल्या व पर्यायाने समाजातल्या वेगवेगळ्या व्यक्तींनी त्या त्या टप्प्यावर काम करावे, त्यांचे स्थान कुठे असावे, हे ती व्यवस्थास ठरवते. त्यात वृद्धांच्या स्थानांचाही समावेश असतो. याचे नेहमी देण्यात येणारे उदाहरण शेतकीप्रधान उत्पादन व्यवस्थेतल्या सामाजिक संरचनेचे असते. ही व्यवस्था कुटुंबाधिष्ठित असते. त्यात काम करणाऱ्या व्यक्तीला निवृत्ती नसते. त्या कामाला लागणाऱ्या मनुष्यबळामुळे ती कुटुंब व्यवस्था पसरलेली, किंवा संमिश्र असते. शेतजमिनीची व राहत्या घराची मालकी सगळ्यात वरच्या पिढीकडे असते, व त्यामुळे निर्णय घेण्याचा अधिकार त्या पिढीकडे असतो. या उलट उद्योगप्रधान समाजव्यवस्थेत कुटुंबातली प्रत्येक व्यक्ती स्वतंत्रपणे काम करते, ठरावीक वेळच काम करते, वेगवेगळे काम करते, वेगवेगळ्या ठिकाणी काम करते, त्यामुळे कुटुंबातल्या व्यक्तींची अधिकाराची उतरंड बदलते व कुटुंबव्यवस्था काहीशी विस्कळीतही होते.

या उलट सामाजिक प्रक्रियेच्या दृष्टीने विचार केला, तर असे दिसून येते, की समाजाची रचना ही कधीच पूर्णपणे पक्की आणि पूर्णपणे स्थिर नसते. बाह्य परिस्थितीतल्या वेगवेगळ्या दबावांमुळे ती सतत हलत असते, व त्या हेलकाव्यामुळे थोडी थोडी बदलतही असते. सावकाश आणि नकळत. पण कधी कधी वेगात आणि धक्के देतदेखील! अगदी शेतकीप्रधान कुटुंबातही हे बदल घडून येत असतात. वृद्ध व्यक्तीचे कुटुंबातले व समाजातले स्थानही या बदलाबरोबर थोडे-थोडे बदलत जाते.

समाजरचना हलती ठेवणारे बाह्य परिस्थितीतले घटक कधी काळानुसार ठरतात, तर कधी ते मुद्दाम ठरवले जातात. कायदे करणे, सुविधा पुरवणे, जाणीव-जागृती निर्माण करणे अशा मार्गांनी परिस्थिती बदलण्याचे प्रयत्न केले जातात. गेल्या काही वर्षांत वैद्यकीय क्षेत्रातले शोध, आर्थिक परिस्थितीतली सुधारणा, आरोग्यरक्षणाची जाणीव यामुळे समाजात वृद्धांची संख्या वाढते आहे. या वाढत्या संख्येमुळे वृद्धत्व ही एक कौटुंबिक व पर्यायाने सामाजिक समस्या होऊ लागली आहे. हे जेव्हा जाणवू लागले, तेव्हा जगातल्या बहुतेक प्रगत व प्रगल्भ जाणिवांच्या देशांनी असे मार्ग अवलंबिलेले आपल्याला दिसतात.

कुटुंब हा समाजाचा लहानात लहान कार्यशील घटक आहे. परिस्थितीच्या रेट्यानुसार कुटुंबाच्या अंतर्गत संबंधांच्या

रचनेत व कार्यपद्धतीतही बदल होत आहेत. कुटुंबातल्या इतर सदस्यांशी नाते असलेल्या वृद्ध सदस्यांचे स्वरूपही पालटत चालले आहे. त्यांचा परिणाम वृद्धांच्या दैनंदिन आयुष्यावर होतो आहे. दुसरीकडे, समाजाचा एक घटक या नात्याने कुटुंबाचे देखील समाजाच्या इतर घटकांशी असलेले संबंध बदलत आहेत. कुटुंबातल्या वृद्धांखेरीज इतर सदस्यांचे उदाहरण घ्यायचे झाले तर, पती आणि पत्नी, आईवडील आणि मुले, भावंडे यांचे देखील आपापसातले संबंध बदलत चालले आहेत. हे संबंध कसे असावेत, यांची संकल्पनाही बदलते आहे.

वृद्ध आईवडिलांची जबाबदारी त्यांच्या तरुण, कर्त्या मुलांवर असते. या कर्तव्य भावनेत अजून जरी बदल झाला नसला, तरी ती जबाबदारी कशा प्रकारे पार पाडावी या विचारात बदल होतो आहे. वृद्ध आईवडील आणि तरुण, कर्ती मुले यांचे परस्परसंबंध हेलकावे खात असलेले दिसतात. त्या त्या वेळच्या परिस्थितीनुसार ते बदलतात. ते सतत प्रेमाचे, विश्वासाचे, औदार्याचे नसतात. तसेच सतत रागाचे, वैतागाचेही नसतात. मात्र या संबंधांमध्ये हल्ली एक 'दूरस्थ'पणा येऊ लागला आहे.

आजी-आजोबा आणि नातवंडं हे नातं पूर्वी सर्व बाबतीत परस्परांना पूरक असायचे. आता हल्ली या नात्याचं स्वरूपही बदलले आहे. आता ते आजी-आजोबा आणि नातवंडे यांच्या आपापल्या स्वभावाप्रमाणे, सवडीप्रमाणे, परिस्थितीप्रमाणे, आवडीप्रमाणे ठरते आहे. उदाहरणार्थ, नातवंडांबरोबर गमतीजमती करणारे, गप्पा मारणारे आजी-आजोबा/नात्यापुरते, औपचारिक आजी-आजोबा; आईवडील दिवसभर घराबाहेर असल्याने तेवढा वेळ त्यांच्या भूमिका निभावणारे आजी-आजोबा/कधीकधीच भेटणारे, काहीसे परके वाटणारे आजीआजोबा. थोडक्यात म्हणजे आजकालच्या कुटुंबात आजी-आजोबा त्यांची परंपरेने ठरवून दिलेली भूमिका निभावत नाहीत.

वृद्धांनी कुटुंबात व समाजात स्वतंत्रपणे व स्वतंत्रवृत्तीने राहणे हे आता सार्वत्रिक होत आहे. त्याचबरोबर हेही दिसते, की वृद्धत्व आल्यानंतर काही जुने कौटुंबिक व सामाजिक संबंध पुन्हा नव्यानं स्थापित करण्याचा प्रयत्नही होतो आहे. उदा.वृद्धत्व आल्यानंतर आपल्या भावंडांशी पुन्हा एकदा जवळून संपर्क साधणे बऱ्याच जणांना आवश्यक वाटते. बहीण-बहीण, भाऊ-भाऊ ही नाती त्यांची आपापली आयुष्ये पुढे सरकत असताना पुष्कळदा दुरावलेली असतात. कधी काही गैरसमजही निर्माण झालेले असतात, ते सगळं मागे टाकून जुने दुवे पुन्हा सांधावे, जुन्या आठवणीत रमावं, जुना काळ जागवावा असं वाटायला लागतं. त्यातून त्या संबंधांना पुढे काही स्थिरता, ओलावा येतोच असं नाही. पुष्कळदा अशा पुनरुज्जीवित संबंधांचं आयुष्य त्या त्या भेटीपुरतंच मर्यादित राहतं. पण काही वेळा त्यातून जुने संबंध नवीन रूप घेतात, किंवा त्यावरचा गंज निघून ते स्वच्छ होतात. एकमेकांना ठरवून भेटणं, एकत्र प्रवासाला जाणं, एकमेकांच्या घरच्या लग्नकार्यांना आवर्जून हजर रहाणं, कौटुंबिक बाबतीत मन मोकळं करणं, निधन पावलेले आई-वडील किंवा एखादं भावंड यांच्या आठवणी काढणं, गैरसमज दूर करण्याचा प्रयत्न करणं, असे अनेक पैलू या पुनरुज्जीवित संबंधांना असू शकतात. भावंडाची उणीव भासणं, ही वृद्धत्वाच्या टप्प्यावर व एक मोठी मानसिक व सामाजिक पोकळी होऊ शकते.

अशीच काहीशी गोष्ट, शाळा-कॉलेजच्या जुन्या मित्र मैत्रिणींच्या बाबतीत असते. त्या वयात झालेल्या मैत्रीमध्ये मग ती टिकलेली असो वा नसो फारशी गुंतागुंत नसते. त्यामुळे ४०-४५ वर्षानंतरही ते धागे पुन्हा जुळायला फारसा वेळ किंवा त्रास लागत नाही. अशा मैत्रीपासून काही अपेक्षाही नसतात. अधूनमधून जमेल तसा एखादा फोन, वर्षातून एखादा मेळावा एवढे सिंचन हे संबंध ताजे ठेवायला पुरेसे असते. पण वृद्धपणी तो ताजेपणा हवाहवासा वाटतो. असे मेळावे भरवण्याची पद्धत आपल्याकडे दिवसेंदिवस वाढत चालली आहे, ते त्यांची गरज प्रत्येकाला वाटते म्हणूनच.

वृद्धत्वाच्या टप्प्याला असलेला हा एक महत्त्वाचा आधुनिक सामाजिक पैलू आहे. वृद्धपणी कुटुंबात जाणवणारा एकलकोंडेपणा, सगळ्यांपासून तुटल्याची भावना, मनात येणारे औदासीन्य, रोजच्या दिनक्रमाला आलेला कंटाळवाणेपणा, या सगळ्यांमुळे वृत्तीत कधीकधी निर्माण होणारा कडवटपणा किंवा तुसडेपणा - हे सर्व दूर ठेवण्यासाठी जुन्या नातेसंबंधांचे आणि स्नेहसंबंधांचे पुनरुज्जीवन उपयोगी पडते, त्यात गुंतावे लागत नाही, त्यामुळे दुखवाले जाण्याचेही कारण नसते, ही त्यातली आणखी एक जमेची बाजू असते.

वृद्ध व्यक्तींचे त्यांच्या कुटुंबातल्या वेगवेगळ्या व्यक्तींशी असलेले संबंध वेगवेगळ्या प्रकारचे व वेगवेगळ्या पातळ्यांवरचे असतात. त्यात सगळ्यात जास्त महत्त्व सहचर/सहचरींशी असलेल्या संबंधांना असते. एकत्रित काढलेल्या

अडचणी, एकत्रित घेतलेले आनंद, एकत्रित तोंड दिलेले प्रसंग, एकत्रित घालवलेले आयुष्य या सगळ्यांच्या आठवणी या संबंधात एक जवळीक निर्माण करतात, व मानसिक आणि सामाजिक आधार देतात. सहचर/सहचरींचे निधन वृद्धपणी आयुष्यात मोठी पोकळी निर्माण करते.

पाश्चात्त्य देशात एकटे किंवा स्वतंत्र्यपणे राहण्याच्या वृद्धांसाठी शासन व स्वयंसेवी संस्था अनेक सोई उपलब्ध करून देतात. रुग्णशय्येवरच्या वृद्धांसाठी प्रशिक्षित व्यक्ती शुश्रूषेकरता व इतर वैद्यकीय मदतीकरता घरी पाठवावे; वृद्धांना ताजे, पोषक, पुरेसे जेवण घरपोच नेऊन देणे व ते जेवेपर्यंत सोबत बसावे; वृद्धांकडे आठवड्यातून एक-दोनदा गप्पा मारण्यासाठी जावे, वृद्धांच्या सहली नेणे, त्यांना सिनेमे दाखवणे, त्यांच्यासाठी विरंगुळा केंद्रे चालवणे, त्यांना राहण्यासाठी स्वतंत्र घरांच्या कॉलनीज् बांधणे, चांगल्या दर्जाचे वृद्धाश्रम चालवणे, असे उपक्रम आता आपल्याकडेही सुरू झाले आहेत. वृद्धांना अशा सुविधा पुरवल्या जातील, त्या पुरवण्याची गरज भासेल असे अगदी २०-२५ वर्षांपूर्वी देखील कुणाला वाटले नसेल, ही एक दीर्घकालीन परिणाम असणारी, व कुटुंबव्यवस्थेत मूलगामी बदल होत असल्याचे जाणवून देणारी महत्त्वाची सामाजिक घडामोड आहे.

येऊ घातलेल्या वृद्धत्वाला तोंड कसे द्यायचे त्याची मानसिक तयारी करण्यासाठी काही देशांमधले शासन प्रयत्न करत असते. वृद्धांचा शासनावरचा व समाजावरचा भार कमी व्हावा, असा प्रयत्नांचा उद्देश असतो.

येऊ घातलेल्या बाळाच्या आई-बाबांना प्रसूतीची व बालसंगोपनाची माहिती व प्रशिक्षिण देणारे उपक्रम पाश्चात्त्य देशात सर्रास चालवले जातात, वयात येणाऱ्या मुलांना लैंगिक शिक्षण दिले जायला हवे, हे आता आपल्याकडेही मान्य झाले आहे. त्याच धर्तीवर येऊ घातलेल्या वृद्धत्वासाठी तयारी करण्याची वेळ आता आली आहे. वृत्तपत्रे व इतर माध्यमांतून त्यासंबंधी लिहिणे-बोलणे जास्त असते पण ते मुख्यत: आरोग्याशी संबंधित असते.

माणसांना वृद्धत्व येणे या घटनेला अनेक पैलू आहेत व त्यांचा त्या वृद्ध माणसासोबत राहणाऱ्या इतर लहान-मोठ्या माणसांवरही परिणाम होत असतो. त्यामुळे थोडे औपचारिक, थोडे अनौपचारिक, प्रश्नोत्तरांच्या व चर्चेच्या स्वरूपाचे तज्ज्ञांनी चालवलेले छोटे अभ्यासक्रम वृद्धत्वामुळे निर्माण होणाऱ्या समस्या समजून घेण्यासाठी, व त्या सोडवण्यासाठी उपयुक्त होऊ शकतील. या अभ्यासक्रमाचा काही भाग तरुणांसाठीही असण्याची गरज आहे. वृद्धांनी स्वत:चे आरोग्य कसे सांभाळावे; स्वत:ची व पत्नीची आर्थिक तरतूद कोणती व किती करावी; राहण्याची सोय, वैद्यकीय मदत यांची व्यवस्था कशी करावी; वृद्धांचे कुटुंबाशी संबंध कसे असावे, समाजाशी संबंध कसे असावेत हे विषय त्यात असतीलच. याखेरीज वृद्धत्वाबरोबर होणारे शारीरिक व मानसिक बदल व त्यांची लक्षणे यांची माहिती कुटुंबातल्या तरुण व्यक्तींनाही असणे आवश्यक आहे. ज्यायोगे ते आपल्या आईवडिलांच्या वृद्धत्वाकडे समजदारीने व जबाबदारीने पाहातील, त्याचबरोबर वृद्ध माणसांना देखील त्यांच्यामुळे घरात व समाजात निर्माण होणाऱ्या प्रश्नांची जाणीव करून देणे आवश्यक आहे, ज्यायोगे त्यांना स्वत:च्या वागण्याविषयी विचार करण्याची आवश्यकता समजून येईल. हल्लीची वृद्धमंडळी स्वत:ला एकतर महात्मा तरी समजतात, नाहीतर हुतात्मा तरी समजतात. त्यामुळे त्यांचे कौटुंबिक प्रश्न विनाकारण गुंतागुंतीचे होतात. शिवाय वृद्धत्वाच्या समस्यांमध्ये आपण मुलांजवळ राहतो की मुले आपल्याजवळ राहतात हा देखील एक कळीचा मुद्दा असतो.

वृद्ध आणि त्यांचे कुटुंबीय यांच्यासाठी तयार करण्यात येणाऱ्या मार्गदर्शक अभ्यासक्रमात, घरातल्या वृद्ध व्यक्तीला काही कायमस्वरूपी विकार आहे का, काही वाढत जाणारा विकार आहे का, वृद्ध व्यक्ती हट्टी, दुराग्रही, वर्चस्व गाजवणाऱ्या स्वभावाची आहे की मिळते घेणारी, पडते घेणारी आहे, आनंदी, मनमोकळी आहे की कुढ्या स्वभावाची आहे; या पैलूंचाही विचार व्हायला हवा. वृद्धांच्या शारीरिक दुर्बलतेची आणि मानसिक असुरक्षिततेची जाणीव तरुणांना करून द्यायला हवी, त्याच बरोबर वृद्धांच्या अवाजवी अपेक्षा कशा हाताळाव्या याचेही मार्गदर्शन कुटुंबातल्या तरुण व्यक्तींना करणे आवश्यक आहे.

असे उपक्रम सगळ्यांना सक्तीचे करणे शक्य नाही, परंतु प्रसार माध्यमांमधून त्यांची सतत माहिती देत गेल्यास हळूहळू तरुण, वृद्ध- दोन्ही वयोगटातली मंडळी सुरुवातीला कुतूहल म्हणून व नंतर उपयुक्त म्हणून त्यासाठी पुढे येतील. वृद्धांसाठी काम करणाऱ्या स्वयंसेवी संस्थांनी व ज्येष्ठ नागरिक संघांनी असे छोटे-छोटे, दोन-तीन दिवसांचे अभ्यासक्रम कार्यान्वित करावे, वृद्धांच्या प्रश्नांसाठी ते त्यांचे महत्त्वाचे योगदान ठरेल.

माणसे जसजशी वृद्ध होत जातात तसतसा त्यांना

त्यांच्या भोवतालच्या जगाशी त्यांच्या संबंध कसा आहे, कसा असावा याविषयी मनात शंका येऊ लागतात. कुटुंबातले त्यांचे स्थान डळमळीत झालेले असते, मागे सरकलेले असते, याचा परिणाम त्यांच्या सामाजिक संबंधावरही होऊ लागतो. सर्वसाधारण समाजात वावरण्याचा आत्मविश्वास ते गमावू लागतात व त्यामुळे एकलकोंडे होत जगतात. त्यांचे सामाजिक संबंध त्यांच्या समवयस्कापुरते मर्यादित होत जातात. आपल्यापेक्षा लहान वयाच्या मुलांशी- माणसांशी कसे वागावे, त्यांना आपल्या वागण्याबद्दल काय वाटेल; याबद्दल त्यांच्या मनात संभ्रम निर्माण होत जातो.

आपल्या समाजामध्ये वृद्धांकडे बघण्याची एक नवी मनोवृत्ती आजकाल निर्माण होते आहे, ती म्हणजे 'वृद्ध' हा वयोगट इतर समाजापासून वेगळा असल्याची भावना. पूर्वी माणसे पिढ्यान्‌पिढ्या एका गावात, एका घरात, एकत्र रहायची. घरात मूल जन्माला येणं, त्यानं त्याच घरात मोठं होणं, त्याच घरात म्हातारं होणं ही प्रक्रिया सहजपणे घडत जायची. त्याकाळी वृद्ध सदस्य कुटुंबापासून वेगळे समजले जात नसत. वृद्धत्वाबरोबर माणसात होणारे बदल-हालचाल मंदावणे, कमी ऐकू येणे, नजर अधू होणे, विस्मरण होणे, बसल्या बसल्या तक्रारी करत राहणे, हे सर्व नैसर्गिक समजले जायचे, कधी तिकडे दुर्लक्ष केले जायचे, कधी हसण्यावारी नेले जायचे, तर कधी त्याबद्दल डाफरलेही जायचे, पण त्यांच्याबद्दल दुरावा वाटत नसे.

आजकाल नोकरी-व्यवसायानिमित्त मुले लांब जातात, तेथेच स्थायिकही होतात. आईवडिलांना बरोबर नेणे शक्य असतेच असे नाही, व नव्या शहरात, नव्या वातावरणात वृद्ध आईवडिलांना करमतही नाही. आईवडिल त्यांच्या जुन्याच ठिकाणी राहतात. मुलांची त्यांच्याविषयीच्या भावनेची बंधने शिथिल होत जातात, ज्याने त्याने आपापली व्यवस्था लावून घ्यावी, ही विचारसरणी समाजात प्रसृत होऊ लागली आहे. आपण वेगळे आणि आपले वृद्ध आईवडील वेगळे अशी भावना निर्माण होऊ लागली आहे. नातवंडांनाही आजी-आजोबा 'पाहुणे' वाटतात.

वृद्धांच्या घरातल्या वागण्या-बोलण्याला कंटाळल्यामुळे, जागेच्या कमतरतेमुळे, त्यांची काळजी घ्यायला दिवसभर घरात कुणी नसल्यामुळे किंवा इतरही काही कारणांनी वृद्धांना एखाद्या संस्थेत ठेवण्याचाही पर्यायही हल्ली शोधला जातो. काळाची गरज म्हणून स्थापन झालेल्या या वसाहती, वृद्धांसाठी एक मोकळे व आनंदी वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्न करतात. यात वृद्धांनीही पुढाकार घेणे अपेक्षित असते. मात्र तसे घडताना दिसत नाही. आपल्या नातवंडांना पाळणाघरात ठेवायला मागेपुढे न पाहणे वृद्ध स्वत: मात्र वृद्धाश्रमात राहायला तयार नसतात.

एकूणच वृद्धांच्या बऱ्याच प्रश्नांना, बऱ्याच प्रमाणात वृद्ध स्वत:च जबाबदार असल्याचे दिसून येते. त्यातला एक महत्त्वाचा भाग म्हणजे स्वत:चे वृद्धत्व न स्वीकारणे. अमूक एक प्रकारचे वागणे किंवा पोशाख हा वयाला शोभतो किंवा शोभत नाही, असा शब्दप्रयोग हल्ली वापरलाच जात नाही. नीट बसणाऱ्या दातांच्या कवळ्या, महागडी श्रवणयंत्रे, मोतीबिंदूच्या शस्त्रक्रियेमुळे पुन्हा तरुण झालेली नजर, चांगल्या आर्थिक परिस्थितीमुळे आहार, औषधोपचार, व्यायाम यांनी सांभाळून ठेवलेली तब्येत; या सगळ्यांमुळे ऐंशीच्या घरातल्या वृद्धांनी चौपाटीवर पाणीपुरी खाणे, टीव्हीवरची अंगविक्षेपयुक्त गाणी पाहणे हे सर्रास झाले आहे. म्हातारपणी पुन्हा लग्न करणाऱ्यांचे हल्ली कौतुक होते. वृद्धांनी इंद्रियोपभोगांमधून मन काढून घ्यायला हवे हा विचारच आता कालबाह्य झाला आहे, समाजात पसरलेला व्यक्तिवाद आणि उपभोगवाद यांचे वृद्धांच्या बाबतीतले हे दृश्य स्वरूप आहे. हा एक लक्षणीय सामाजिक बदल आहे.

म्हातारपण ही पूर्वी सामाजिक तर सोडाच, पण कौटुंबिक किंवा वैयक्तिकही 'समस्या' नव्हती. ते म्हातारपण येणे हा निसर्गनियमाचा भाग होता, आणि तो तसाच स्वीकारला जात होता. आता म्हातारपण हे माणसापासून सुटून त्याची एक 'घटना' झाली आहे. तिची चर्चा होते, तिच्याबद्दल सूचना केल्या जातात, किंबहुना तिचं अवडंबर माजवलं जातं आणि मग त्याची 'समस्या' होते.

मग असं वाटायला लागतं, की माणसाची आयुर्मर्यादा त्याच्या नैसर्गिक कार्यक्षमतेपलीकडे वाढल्यामुळे किंवा वाढवल्यामुळे नक्की काय साध्य झालं?

(संदर्भ : The social processes of aging + old age -Arnold Brown)

**नीलिमा भावे**
२, झपूर्झा, साहित्यसहवास,
कालेलकर मार्ग, वांद्रे (पूर्व), मुंबई- ४०००५१.
फोन : २६५९२०४०
neelimabhave@gmail.com

# कवितेचं व्यासपीठ

## हे कवी !

हे कवी! ज्या दु:खांनी आवळला आहे गळा दुनियेचा
त्या दु:खांच्या मुळांशी भांडत राहू दे मला
आटोक्यात येत नाही आग दुनियेला लागलेली
यावेळी हजार हातांचे अग्निशामक होऊ दे मला.

जमिनीवरच पाय राहू दे घट्ट माझे
अहंकाराचा वाराही चुकून लागू देऊ नको मला
माझ्या आयुष्याची काच असू दे पारदर्शक
कोणालाही ओरबाडणारी दुष्टता करू नको मला.

जगू इच्छिणाऱ्यांना आवडत नाहीत दु:खे
आणि माणसेच दु:खांची जंगले निर्माण करतात.
तुटलेली शिल्पे होणे आवडत नाही माणसांना
ही माणसेच स्वत:ला आणि परस्परांना तोडत राहतात.

माझ्या शब्दातून बोलत राहावे मातेचे व्याकूळ काळीज
शब्दांना पहारेकरी कर सजग माझ्या; गोठू देऊ नकोस
शब्द पेटत, पेटवत राहावेत सदोदित माझे
शब्दांना सैनिक ठेव सतत माझ्या, आसवे होऊ देऊ नकोस.

माणसाच्या भल्याची ताठ कविता लिहिताना
आटू देऊ नकोस तलाव माझ्या प्रतिभेचा
खूप प्रवासी असू दे क्रांतीचे स्वप्न पाहणारे
आणि तडा जाऊ देऊ नकोस माझ्या जहाजाला.

हवेच्या पायांमधील पैंजणाची रुमझुम
कोणी चोरणार नाही यासाठी जागू दे मला
फुलांच्या मुखांवरचे मारलेले हास्य
जिवंत करण्याचे बळ मिळू दे मला.

बाजार चोख असावेत, गळे कापणारे नसावेत
कोणीही प्रेतांची बाजारपेठ करू नये दुनियेला
कदाचित मृत्यूही होईल हतबल माझ्या करुणेच्या चांदण्यापुढे
दुनियेतील शहाणपणाचा मृत्यू मात्र मारील मला.

जीवन कळवळून बोलवित आहे माणसांना
आणि माणसे तर स्मशानाकडे भरधाव निघाली आहेत
हे कवी! माझी होऊ देऊ नकोस नाचक्की
मी श्वासांची विद्यापीठे घेऊन फिरतो आहे.

**डॉ. यशवंत मनोहर**
'लुम्बिनी', ४५ लोकसेवा नगर,
नागपूर-४२२०२२
फोन : ०७१२-२२३७६५६

## छप्पर

तुमच्या गावाकडच्या घराचे छप्पर कोसळले आहे.
गणू सांगत होता
गावावरून आईला भेटून आलेला.

बरे झाले.
वेळ दिवसाउजेडाची होती आणि आई नेमकी अंगणात होती
नाहीतर,
या असल्या गर्दीच्या दिवसात, भर उन्हात
पळावे लागले असते गावाकडे
मी म्हणालो मनात.


काही काळजी करू नका रे,
निदान हा पावसाळा तरी भिती नाही;
आई बोलत होती मधुशेट वाण्याच्या दुकानातल्या फोनवरून.
भिती हा शब्द तिने जाणीवपूर्वक हळू उच्चारला असावा
मला वाटले.

दादाला फोन केला तर म्हणाला
तूच जाऊन ये जरा ॲडजस्टमेंट करून
मीच गेलो असतो पण,
आम्ही बाहेर चाललोय फिरायला.
हां.
आणि आईला जरा बजावून सांग
सारखे सारखे अंगणात जाऊ नकोस म्हणाव.

रात्री बायकोला म्हणालो,-
एक-दोन दिवस गावाला जाऊन यावे लागेल.
तर म्हणाली, ''कश्शाला? भाऊजी नाहीत का?
हे मात्र बरे आहे
काही काम निघाले की तुम्ही.
उद्या घराच्या वाटण्या निघाल्या तर
सर्वांच्या आधी पोहोचतील वडिलभाऊ म्हणून.
आणि हां,
जाणारच असाल तर तेवढ्या हातातल्या पाटल्या घेऊन या.
आपणच घातल्या होत्या त्या त्यांच्या साठी-षष्ठीला
नंतर उगीच जोखीम नको...''

काहीतरी कोसळण्याचा आवाज येतो आहे सतत...
मध्यरात्र उलटून गेली आहे.
मी उठून बसलो आहे अंधारात एकटा.
कोसळते आहे काहीतरी...
गावाकडच्या घराचे छप्पर,
आई, की
मी?

**सतीश सोळांकूरकर**
श्री सह्याद्री को.ऑप.हौ.सोसायटी,
वि.९, फ्लॅट क्र.६, पुणे रोड,
कळवा (पश्चिम), जि. ठाणे- ४०० ६०५.
फोन : ०२२-२५४० ३७७८
मोबाइल -९३२४३ ६३९३४
satishsolankurkar@gmail.com



**उरल्यासुरल्या जगण्याचं रिमिक्स**
**गोविंद काजरेकर**
भोवतालच्या विनाशक दमनव्यवस्थांमुळे वर्तमान समाजात निर्माण झालेले अराजक, विसंगती आणि त्यातील हास्यास्पदता उघड करणारी कविता.

**मूल्य ७५ रु. सवलतीत ४५ रु.**

## देश

कोण जाणे कोणता हा देश आहे
कावळ्यांना पांढरा गणवेष आहे!


संसदेचा रोज आखाडाच होतो
ठोकशाहीचा तसा आदेश आहे!

भांडणे आरक्षणास्तव रंगलेली,
–आणि बाकी राहिला अनुशेष आहे!

या बुवाबाजीत सामिल बुद्धिजीवी–
–आकडेवारीत जो, 'दरवेश' आहे!

देश पोखरला घुशींनी यार सारा,
वाळवीने फस्त करणे शेष आहे!

**सदानंद डबीर**
१ बी/ २०६, विमान–दर्शन,
जीवा महाले मार्ग,
अंधेरी (पूर्व), मुंबई– ४०० ०६९.
फोन : २६८४ ८३९९




**खयाल**
**सदानंद डबीर**

**मूल्य १०० रु.**
**सवलतीत ६० रु.**

श्रोत्यांना शेरातला भाव जेव्हा ह्या हृदयाचा त्या हृदयी दाखल झाला असं वाटतं तेव्हा तो शेर 'हासिले गझल' मानला जातो. डबीरांच्या गझलांमध्ये असे शेर बहुतांश आढळतात.

## चंद्र वेगळा...

प्रत्येकाच्या झोळीमधला चंद्र वेगळा
कवितेसाठी ओळीमधला चंद्र वेगळा।।

उतार आयुष्याला आता थंडी लागते
बाजारातून शिवून आणला चंद्र वेगळा!

चुरगळलेल्या आयुष्या, तुज कळते सारे
बालपणीच्या हट्टाचा रे चंद्र वेगळा!

अमावास्येच्या स्वप्नांना मी निजवून येतो
बंद पापणीवरती दिसतो चंद्र वेगळा!

नेहमीसाठी काळीज माझे घरात असते
कुलुप उघडता नाचत येतो चंद्र वेगळा!

सौभाग्याला चंद्रकोरीची गरज भासते
भडक न होता शीतलतेचा चंद्र वेगळा!

पोटासाठी वणवण फिरत्या तांड्यामध्ये
स्वत: पाहिला चंद्राने तो चंद्र वेगळा!

चंद्रावरती माणूस जाऊन आला तरीही–
प्रत्येकाच्या धर्मामध्ये चंद्र वेगळा!

**प्रदीप गुजर**
१, सुयोग, रामवाडी,
नौपाडा , ठाणे– ४०० ६०२.
फोन : ०२२–२५३३ ९००२



**पंतप्रधानांना पत्र**
**अरुण शेवते**
एका बाजूला शेतकऱ्यांच्या आत्महत्या आणि दुसऱ्या बाजूला वाढत चाललेली अनास्था व चंगळवाद, यांतून फुटलेले शब्दांचे निखारे...

**मूल्य ८० रु.**
**सवलतीत ५० रु.**

## कळवळ्याची आबादानी

रात्र काळी आर्त ना!
आपुल्याला डसली जहरीली

धसली धसली ना!
आपुली खुशियाली धसली

कळवळ
ही कळवळ्याची आबादानी
आबादानी पिचली

आरोळी, ये आरोळी.... ये आऽऽऽ रोळी
आपुल्याशी आपुली

काहिली, ये काहिली!
काहिली नि काहिली काहिली!!

**अशोक कोतवाल**
संदर्भ, ४८/१/५४, ब्लॉक क्र.६,
शिव कॉलनी, जळगाव-४२५ ००२.
भ्रमणध्वनी -९८५०१ १७५३९

## एक कविता

आपलेच आपल्याशी वैर धरतात
दगडाचं काळीज कंबर कसतात
नांगरावखराचं शस्त्र करतात
म्हणून दु:खी-कष्टी
नको कधी उष्टी
आपद नस्ती
भूकेशी कुस्ती
संपेचना...
-हा माझा धरलेला लचका
कुच्याळ माणूस सोडीचना!

मस्तक तापू लागलंय
ऊन ऊन डोळ्यात
कुठलं भूत मानगुटीवर
अडकून पडलं गळ्यात
दुखलं-खुपलं माझं मला
मीच विचारीत नाय...

एका कुत्र्याची अन् माझी भूक मोजू काय?

**ऐश्वर्य पाटेकर**
क.का.वाघ महाविद्यालय,
काकासाहेबनगर,
ता. निफाड, जि. नाशिक- ४२२३०८
भ्रमणध्वनी - ९८२२२ ९५६७२



**कुणीच कसे बोलत नाही....**

**अशोक कोतवाल**

अशोक कोतवाल यांची कविता ही व्यामिश्र वर्तमानची आणि अनिश्चित भवितव्याची कविता आहे. जवळच्या नात्यांनाही करपवणाऱ्या ओढगस्तीची दखल ती घेत आणि निष्ठावंतांनाही षंढ करून बिनचेहऱ्यांचे बनवणाऱ्या व्यवस्थेची लक्तरे टांगते.

**मूल्य १०० रु. सवलतीत ६० रु.**

## साथ

सावलीचे झाले
मजलागी ओझे
देहाचे आकार
रोज होती ताजे

शब्द फोडूनी गा
वीज अवतरे
धन कबीराचे
किती चोरू मी रे!

ठिबकता थेंब
माझे काव्य भंगे
इंद्रायणी गाथा
तुक्याची तरंगे

पोरवयी ज्ञाना
रचितो अभंग
पांढऱ्या केसांना
लावितो मी रंग

जन्मोजन्मी साथ
उमेची महेशा
उरली न मला
सावलीची आशा

**गोविंद मोतलग**
श्रीकृपा, सवितवाडी,
रणपिसे नगर, अकोला– ४४४ ००५.
भ्रमणध्वनी –९४२०८ ३९५७५

## तुझेपण

आवडते मला म्हणून
बायकोने मूगतांदळाची खिचडी केली
जिभेवरचा पहिला घास
आई, तुझ्याच हाताचा आग्रही वास.

तुझ्यासारखीच उठते ती लवकर
घर आवरते नीटस भरभर
अंगणात ठिपक्याची रांगोळी
जणू तुझ्याच बोटांतून झिरपलेली.

कधी नातेवाईक येतात आपले तिचे
तेव्हा उधाणलेल्या समृद्रासारखे स्वागत त्यांचे.
बोलणे नितळ तळमनातले
तुझ्याच ओठांतून उचलून घेतलेले.

झऱ्यासारखी खळखळ हसते
काळजीने कधी डोळे भरते
सावली होते...चांदणे होते
तुझ्यासारखीच मनभर असते.

आता तिचेही वय झालेय
तरीही अजून टवटवीत दिसते
तिच्या माझ्या मावळतीला
तुझेपण घेऊन उगवते.

**दत्ता हलसगीकर**
२०–अ, जवान नगर,
विजापूर रस्ता, सोलापूर –४१३ ००४.
फोन – ०२१७–२३४२५९४



**बदलत गेलेली सही**
अंजली कुलकर्णी
सही म्हणजे स्वओळख. ‘बदलत गेलेली सही’ हा कवितासंग्रह म्हणजे माणसांच्या, हरवत चाललेल्या स्वओळखीच्या शोधाचा प्रवास...
**मूल्य १२० रु. सवलतीत ७५ रु.**

## दिवा

जळत आहे दिवा तोवर
हसत हसत जगून घ्यावे
डोळ्यांत उजेड आहे तोवर
दिव्यासारखे जळून घ्यावे...

रानावनात, डोंगरदऱ्यांत
सैरभैर भटकून घ्यावे
सूर्य आहे तोवर मन
आभाळभर पसरून द्यावे...

काळाला किनार नसतात
त्याचे अंतर मोजू नये
अनंताचा गुंता येथे
उगाच उकलत बसू नये...

प्रत्येकाने थोडे थांबून
बुडत्याला बोट द्यावे
थडी लागताच मोबदल्यात
चिमूटभर हृदय घ्यावे!

**बबन सराडकर**
हनुमान मंदिरामागे,
गाडगेनगर, अमरावती-४४४६०३.
भ्रमणध्वनी - ९९७०९०९७०९

## झेलमच्या काठावर...


शांत झेलम   अवखळ
सुंदर पर्वत   मोहक गुलाब;
सौंदर्यवतींचे मेळे   देवदारांचे शांतवन
वरदान मातीचे   चिरस्फूर्ती संजीवन ।।१ ।।

मंदिर मशीद   गुंफा स्तूप
पहाडी संस्कृती   सरबराई खूप
पराठे कावा   अक्रोड बदाम
एक आत्मा   वैविध्याला सलाम ।।२ ।।

वाळूची पोती   रस्तोरस्ती खंदके
विस्थापित पंडित   मायभगिनींचे हुंदके
अशांत लालचौक   प्रसन्न दलसरोवर
पुकारती शिकारे   झुंबड अनावर ।।३ ।।

मातेचा मुकुट   नंदनवन न्यारे
कुटिल डाव   पलीकडचे इशारे
जिहादचे विष   उतारा लष्कराचा
अजेय लोकशाही   जयघोष मानवतेचा ।।४ ।।

**निलेश मदाने**
nmadane@rediffmail.com



**या शतकाचा सात-बाराच होईल कोरा...**
शंकरराव दिघे

या दीर्घ कवितेचा महानायक आहे ते विस्कटून चाललेले प्रातिनिधीक खेडे. तेथील उद्ध्वस्त होत असलेली माणसे, समतोल साधणाऱ्या पण लयाला चाललेल्या व्यवस्था आणि भरकटत चाललेली मूल्यसंचिते. लेखणीच्या फटकाऱ्यातून उभी राहतात या साऱ्याची अर्कचित्रे...

**मूल्य ८० रु. सवलतीत ५० रु.**

## लेखकाचे अहोभाग्य

मी पुस्तक लिहीत असताना
शब्दांचा होता घरभर, मनभर संचार
संवेदनांचा मुक्त रसरसता वावर
घर पिंपळासारखं सळसळतं
मी झपाटलेली, भिरभिरती.

पुस्तक सिद्ध झालं
प्रसिद्धही झालं
शब्द पुस्तकात विसावले.
संवेदनांनी पंख मिटले
मी रिती, रिकामी, रंगहीन


वारकऱ्यांची दिंडी
आषाढीला निघते दरवर्षी
माझ्या शब्ददिंडीला
हेच अहोभाग्य लाभेल ना?

**सरोज जोशी**
२१/७, आझाद, पेस्तम सागर रोड नं १,
पोस्ट- टिळक नगर,
मुंबई - ४०० ०८९.
फोन : २५२२२३१७.

## अग कविते....!

तू आहेस माझ्या आंतरिक द्वंद्वाची
अटळ कृष्णछाया...
एक कृष्णविवर...
तुझ्यातून निघालेला भीषण
विश्रब्ध, बेदरकार आक्रोश...
सहन करावा लागणारा...
निमूटपणे....
क्रमावि लागणारी सर्पगंधवार
मूग गिळून कंठावी लागणारी
एकट्याने... अगतिकपणे....
आणि सहावि लागणारी
एक अबोल आभा...
निरवतेची... अनिवार्यशी....

**डॉ. यशवंत भागवत**
५, सुहासिनी अपार्टमेन्ट,
अ/४४, तुळशीबागवाले कॉलनी,
पर्वती, पुणे-९.
भ्रमणध्वनी : ९८६०० ५१६७०
फोन : ०२०-२४२२५९८५



**मूल्य २५० रु.**
**सवलतीत १५० रु.**

# झपाटलेली झाडे

**सरोज जोशी**

गेल्या पंचवीस-तीस वर्षांत मराठी कवितेने खूपच नवनवीन रूपे घेतली. त्या आधी ती मुख्यत: लेखन-मुद्रणातून वाचक-रसिकांपर्यंत पोचत होती, त्याऐवजी ती सभासंमेलनांतून श्रोत्यांना अधिक सरळ भिडू लागली. त्यातून मंचीय कवितेसारखा नवा फॉर्मच घडून गेला आहे. भावगीते, नभोवाणी, चित्रपटगीते, सुगम गाणी अशा अनेक प्रकारांतून कविता लोकांना अधिक प्रिय होऊ लागली. कविता मूलभूत बदलाच्या टप्प्यावर असताना, १९८० नंतर प्रभावशाली ठरत गेलेल्या काही महत्त्वाच्या कवींवरील लेखनाचा समावेश या पुस्तकात झालेला आहे. हे कवी रूढ मराठी कवितेत नवी भर घालत ती संपन्न करत आहेत...

## स्वप्नशील होवू दे

सूर्यास्तानंतरच्या मलूल आकाशाखालील
मी अंधारअपत्य
मी जखमी शहर अन् माझ्या माथ्यावर
व्यथित चांदण्या दोलायमान
प्रशांत बुद्धमूर्तीसमोर मी सैरभैर
मानतोय पतनात धन्यता
भिनवतोय जालीम विषाचे गुणधर्म स्वत:त
करतोय कैदाशिणीची आराधना दिवाभीत होवून
स्खलनाच्या दर्पणात पहातोय भेसूर चेहरा
अवसेसमोर थरथरतायत् ज्योती दिव्यांच्या
मी स्वीकारतोय सांप्रत सत्य काळोखाला काळोख म्हणून
पिसाट संभोगांचे ध्वनी आदळतायत् कानांवर
ओंगळ मरण स्त्रवतेय अस्तित्वातून
सूर्य उगवेल न उगवेल
निरंकुश होतोय मृत्यूचा माहौल
प्रांजळ निद्रेतून किंवा तुझ्या अंगभूत प्रकाशझोतातून
स्वप्नशील होवू दे अवघी गात्रे निस्सीम संज्ञा

**प्रकाश खरात**
सी-३६, हेमल अपार्टमेन्टस्,
जनकल्याण नगर, खारोडी, मार्वे रोड,
मालाड (प.), मुंबई- ४०० ०९५.
फोन : ०२२-२०३२०१२०

## झाड

अटकर बांध्याच्या
मध्यमवयीन स्त्रीनं
नीटनेटकं होऊन
भरघोस अंबाड्यावर
फुलं माळून
देवदर्शनाला निघावं....
तसंच वाटतं हे झाड.

झाड माझ्या दारातलं
पर्णसंभारानं विनटलेलं
माथ्यावरच्या फुलांनी बहरलेलं
सुगंधानं आणि मोहकतेनं
आसमंत भारून टाकणारं...

तसं तेही निघालंच आहे देवदर्शनाला
रस्तारुंदीकरणाच्या निमित्तानं!...


**उषा मेहता**
१६-१७, शिवाजी पार्क,
मुंबई - ४०० ०२८.
फोन : ०२२-२४४६ १९९१



**मितवा** – उषा मेहता **मूल्य ५० रु. सवलतीत ३० रु.**
अल्लड-अवखळ तरुणीच्या मनातले मनोहर तरंग व्यक्त करणारी मालिका-कविता.



**निरंतर** – उषा मेहता
हा संग्रह म्हणजे विविध अनुभवांचा मांडलेला निरंतर प्रवास आहे.त्यात अंतर्मुखता आहे आणि वास्तवाचा घेतलेला वेधही आहे.
**मूल्य २०० रु. सवलतीत १२० रु.**



**अन्वय** – उषा मेहता **मूल्य १०० रु. सवलतीत ६० रु.**
स्त्रीचे असणे आणि स्त्रीचे माणूस असणे या दोन अवस्थांमधले दु:खदायक अंतर मेहता यांना सतत जाणवते आणि ते अनेक छटांसह त्यांच्या कवितेतून व्यक्त होते. माणूस आज ‘माणूस’ राहिलेला नाही या जाणिवेचेही उष्ण कढ त्यांर्चीया कवितेतून दाटतात.

# आकाश झालेला माणूस!

## माधवी घारपुरे

‘रंगुनी रंगांत साऱ्या रंग माझा वेगळा’ असं मनातच म्हणणारा, इंद्रधनुषी कुंचल्यात भिजूनही फक्त निजरंग जपणारा, बुद्धीचं तेज चेहऱ्यावर झळकत असतानाही ‘अज्ञानी’ समजून वावरणारा, उच्च पदावर बसण्याची योग्यता असूनसुद्धा कायम भारतीय बैठकीवर विराजमान होणारा ‘अजब गारुडी’ तुम्ही पाहिलाय की नाही, मला माहीत नाही पण मी मात्र भाग्यवान! कारण गेली ३१ वर्षे या अजब गारुड्याचा सहवास मला मिळाला आणि त्याच्या पोतडीतून अनेक नवनवीन गोष्टी बाहेर आल्या. त्याच गोष्टी तुमच्यासमोर ठेवायचा हा तोकडा प्रयत्न. मुळात ही व्यक्ती कोण? तर ही मुलखावेगळी व्यक्ती म्हणजे डॉ. बाळ बेंडखळे... बाबा बेंडखळे... बेंडखळेसर!

डॉ. नरेंद्रनाथ केरोपंत बेंडखळे ऊर्फ बाळ बेंडखळे हे मुळात पेशानं चित्रकला शिक्षक. जे.जे. स्कूल ऑफ आर्ट्‌समधून त्यांनी आर्ट मास्टर ही पदवी घेतली, ती धोंडसरांच्या हाताखाली काम करून. जाता जाता कधीतरी एखादा सुंदर हस्ताक्षरातला लेख ते तुम्हाला दाखवतील, तर कधी गोड आवाजात सुंदर कविता गाऊन दाखवतील; कारण कविता त्यांची जिवलग सखी! कधी मुलं एकत्र बसलेली दिसली तर मन भारून टाकणाऱ्या वातावरणात अशी कथा पेश करतील, की कथाकथनकारानं तो वस्तुपाठच समजावा. त्यांच्याबरोबर सहलीला कधी गेलात तर वनस्पतींची नुसती सखोल माहितीच मिळणार नाही तर त्या लता, वेली, झाडं यांच्याशी संवाद करण्याची कलापण तुम्ही शिकून याल. उत्तम छायाचित्रण करणं हा तर या माणसाचा छंद. या छंदापायी आणि भ्रमंतीच्या आवडीपोटी किती गड, किती किल्ले, किती भुयारे पायांखाली तुडवली याची गणनाच नाही...

अंधश्रद्धेविरुद्ध लढा... या माणसानं दिला.
मोडीलिपीचा अभ्यास... यानं मनापासून केला.
पुरातत्त्व विभागाच्या मूर्ती... एकतानतेनं साफ केल्या.
भुयाराचा प्रवास, अभ्यास... मौजेत केला.
अनुवादाचं काम... मोठ्या प्रमाणात केलं.
प्लॅस्टर ऑफ पॅरिसच्या शिलालेखांचे प्रिन्टस्...तेही घेतले.
ब्रॉन्झच्या पुतळ्याचं काम.... ते पण शिकले.
मधुमक्षिका पालनाची कला.... तीही अवगत केली.
कथा-कवितांचं लेखन.... किती ते विचारूच नका.
जातककथांचा अभ्यास.... मुळापासून केला.

आता आपल्याला कळेल, की या माणसाला मी ‘अजब गारुडी’ का म्हटलं ते!

अशा या खरोखरीच मुलखावेगळ्या माणसाची आणि माझी गाठ प्रथम पडली ते 'आदर्श विद्यालय' नावाच्या छोट्या पण गुणी माणसांच्या शाळेत. १९७९ साली.

सुदृढ, बांधा, उंच-गौरवर्ण, तेजस्वी डोळे, छातीवर रुळणारी दाढी, मानेपर्यंत रुळणारे केस, अंगात लेंगा-झब्बा, कातड्याच्या काळ्या पट्ट्याचं घड्याळ, गळ्यात एक शबनम, अत्यंत गोड, शुद्ध, स्वच्छ, स्पष्ट आणि आत्मविश्वासानं बोलणं.... अशा व्यक्तिमत्त्वानं मला पहिल्याच भेटीत भारून टाकलं. पण पहिल्या भेटीतच आपलंसं करून घेणारी ही व्यक्ती नाही. समोरच्या माणसाला कळणार नाही पण त्याला पूर्ण जोखल्याशिवाय आपलंसं करणार नाही. त्यामुळे सुरुवातीला मी या माणसाला 'शिष्ट' माणसांच्या यादीत टाकलं. परंतु जसजसा परिचय वाढत गेला तसतसा या माणसाचा आपलेपणा प्रकर्षानं जाणवू लागला आणि एका सहकाऱ्याचं रूपांतर 'वडिलधाऱ्या माणसात' कधी झालं ते कळलंच नाही. पातीच्या कांद्याची पात जशी सोलावी तशी व्यक्तिमत्त्वाची एक-एक पात उलगडू लागली आणि आज माझ्यासमोर बेंडखळेसर उभे आहेत ते असे... मला जेवढे समजू शकले ते सर आहेत ते असे... बर्फाचा एक अष्टमांश भाग जो वर दिसला तो मी सांगणार आहे. सात अष्टमांश अजून पाण्याखालीच आहे.

साल १९७९. एका विद्यार्थ्याला मी अडवलं, की आता इथून जायचं नाही. पण तो विद्यार्थी इतका वांड होता, की माझा हात बाजूला सारून जिन्यातून निघून गेला. माझं वयही लहान होतं, त्याला आवरण्याची ताकद आणि हिम्मत दोन्ही माझ्याजवळ नव्हती. 'सर' त्याचे क्लास टीचर. म्हणून मी त्यांच्याकडे तक्रार केली. संताप व्यक्त केला. अपेक्षा होती, की सर त्याला बोलावतील, रागावतील, शिक्षा करतील पण त्यांनी माझ्यापुढे हात जोडले आणि म्हणाले, ''बाई, शांत व्हा. रागावू नका. तो चुकलाय. त्याचा वर्गशिक्षक म्हणून त्याच्यावतीनं मी तुमची माफी मागतो.''

मी गारच झाले. त्या क्षणाला प्रथम शिकले, की उत्तम शिक्षक जर व्हायचं असेल तर शिष्याच्या चुकांची जबाबदारी प्रथम आपण स्वीकारायला हवी.

सरांना प्रत्येक गोष्टीत एकाग्रता हवी असते. ते स्वत: तर काहीही करताना एकाग्र होतात, शिवाय ते कुणाला काही समजावून सांगत असतील आणि मध्येच कुणी येऊन बोलायला लागलं तर ती गोष्ट त्यांना आवडत नाही. ते बोलणार काहीच नाहीत, फक्त स्वत:चं बोलणं थांबवतील आणि हसतील.

एकाग्रतेबरोबरच स्पष्टवक्तेपणा आणि स्वत्व जपणं मी सरांकडूनच शिकले आहे. शाळेत भेट देण्याची पाकिटं मी तयार करत होते. सरांचं हस्ताक्षर रेखीव म्हणून पाकिटांवर नावं घालायची विनंती मी त्यांना केली. त्यांनी सांगितलं, ''मॅडम, आज मी तुम्हाला नावं घालून देतो पण ज्या पाकिटातले पैसे काढून घेऊन पाकीट डस्टबिनमध्ये जातं, अशा पाकिटांवर मी नावं घालत नाही. कचऱ्यात जावं इतकं माझं अक्षर स्वस्त नाही.' मी उत्तरानं चाट पडले.

सरांच्या घरी जाणं ही एक आनंदपर्वणी असते. त्यांच्या घरी गेलं की समजतं, की उंची सोफा, अलिशान हॉल, महागडे पडदे यांनी घराची शोभा वाढत नाही. ती वाढते, घरातल्या प्रसन्न वातावरणानं आणि आनंदी चेहऱ्याच्या माणसांमुळे. छोट्याशा खोलीत कुठेही अत्यंत मोकळेपणानं बसा. कुणी आलंय म्हणून भराभर साफसूफ करण्याची घाई नाही. एका भिंतीवर शिवराज्याभिषेकाच्या सोहळ्याचं ६' x ६' चं चित्र दिसेल, दुसऱ्या भिंतीवर भलीमोठी कासवाची पाठ दिसेल. शेजारी ढाल-तलवार दिसेल, कोपऱ्यात ५' उंचीची स्वच्छ समई दिसेल, कोनाड्यात कमंडलूच्या झाडाचे कमंडलू दिसतील, समोर शोकेसमध्ये विविध विषयांवरचे ग्रंथ दिसतील आणि ७० वर्षांपूर्वीपासूनचे कॅमेरेसुद्धा पाहू शकाल. आनंदानं चिंब भिजून या सगळ्याची माहिती सर देत असतात.

अशा वातावरणात सरांना अनेक प्रश्न विचारावेसे वाटतात, पण कुठून सुरुवात करावी तेच कळत नाही. म्हणून मध्येच विचारलं, ''सर जी.ए. कुलकर्णींच्या संपर्कात कसे आलात? त्यांच्याविषयी भरभरून बोलता तुम्ही.''

सर हसले आणि म्हणाले, ''तुम्हाला आश्चर्य वाटेल, मॅडम. पण आम्ही प्रत्यक्ष कधी भेटलो नाही. जिव्हाळ्याची पत्रमैत्री आमची. वर्तमानपत्रांत त्रोटक माहिती वाचली आणि पत्र पाठवलं तर उत्तरच आलं नाही. पुन्हा स्मरणपत्र पाठवलं तर 'पत्र पोचले' एवढंच उत्तर आलं. मनाला हे पटत नव्हतं. प्राध्यापक असा असू शकतो का? या व्यक्तीला माणूसघाणी व्यक्ती म्हणावे का? अनेक प्रश्न उभे राहिले आणि पुन्हा मी त्यांना पत्र पाठवलं. मला ते गूढ वाटत होते. पण परत पत्र पाठवण्यापूर्वी त्यांची काही पुस्तकं एकाग्रतेनं वाचून काढली. गूढता अधिक वाढली आणि पत्र लिहिलं. त्याचं उत्तर मात्र व्यवस्थित आलं आणि पत्राचा सिलसिला वाढत गेला. जी.ए. धारवाड कॉलेजला असताना आमची पत्रापत्री जास्त झाली. १९६८ सालची त्यांची पत्रं माझ्या नजरेसमोर येतात. जांभळ्या

शाईनं लिहिलेली ती पत्रं नव्हेतच, तर जी.ए. समोर बसलेत आणि मला ते समजावताहेत असंच वाटतं. त्यांची पत्रं विलक्षण होती. इनलॅण्डवर कुठेही जागा मोकळी न सोडता लिहिलेली त्यांची पत्रं जपून ठेवावी अशीच होती.

''मी त्यांना एकदा विचारलं होतं, की 'मानवी मनात कृष्णविवरं असतात का?' त्यांनी सांगितलं होतं, 'निस्सीम प्रेमाबरोबर त्या विरुद्ध अंगाची दाहकता त्याला-तिला ठाऊक असते. पण एका क्षुल्लक प्रेमबिंदूसाठी, कृष्णविवरात असूनसुद्धा विवर झाकून टाकलेलं असतं. प्रेमाचा धागा तुटतो तेव्हा कृष्णविवरातच जीव अडकून पडतो. अखेरपर्यंत! जे कृष्णविवरात गेलं ते पुन्हा परत दिसणार नाही. एका कृष्णविवरासारखी विस्मृतीची अनेक विवरं जतन करावी म्हणजे त्रास होणार नाही.''



सौ. माधवी घारपुरे, सौ. बेंडखळे, श्री. बेंडखळे

जी.एं.चं पत्रलेखनातलं हे मत सांगून बेंडखळेसर म्हणाले, ''भूतकाळात जमवलेल्या वस्तूंकडे मी वय आणि काळाप्रमाणे पाहतो आणि विसरण्याचा प्रयत्न करतो. कधी यश येते - कधी नाहीही. अशा वेळी जी.एं.च्या विचाराचा मला फार मोठा आधार वाटतो. मनात येतं, की प्राध्यापक (जी.ए.) मला 'आकाश' व्हायला सांगत होते. किती स्मृती आकाशानं जपल्या असतील. सृष्टीच्या निर्मितीपासूनच्या सर्व सर्व गोष्टी, कुठल्या ना कुठल्या स्थितीत तिथं असतीलच ना?

प्राध्यापकांबद्दल बोलायला लागलं की किती बोलू आणि किती नको असं होतं. त्यांच्या पत्रांतला एकूण गोषवारा मी थोडक्यात सांगतो. प्राध्यापक स्वत: गूढ वाटावं असं वागले आणि स्वत: गूढ होऊन बसले. पत्रांत ते सांगायचे, 'अंधार-प्रकाशाचा खेळ मानवी स्वभावात असतो. गूढाकडे म्हणजे अज्ञाताकडे प्राणिमात्रांचा ओढा असतो. मृत्यू कुणालाही नको असतो. जन्म हवासा वाटतो. पण मृत्यू? उत्सव जसे जन्माचे असतात तसे मरणाचेही असतात. माणसाला 'हवं-हवं' असं जे वाटतं त्याचवेळी 'नको नको'चा संचय होत असतो.''

मनुष्य स्वभावाबद्दल एके ठिकाणी जी.एं.नी लिहिलं होतं, की प्राणांतिक प्रेम करणारा मृग स्वगुंजनात अडकून मरण पावतो. त्याच्या प्रेमिका त्यानंतर इतर धष्टपुष्टितांना अंगिकारतात- तसं मनुष्य स्वभावात असेल का?..... बेंडखळेसर सांगतात, ''आमची आणि प्राध्यापकांची पत्रमैत्री अत्यंत जिव्हाळ्याची होती. आपण लेखनातून लेखक शोधतो. पण प्राध्यापकांनी ही प्रक्रिया कठीण केली. अज्ञाताचा शोध आणि कुतूहल त्यांनी कायम ठेवलं. हीच त्यांच्या लेखनाची हातोटी होती. त्यांच्या तोलाचे रसिक त्यांना कमी भेटले हीच फार मोठी खंत आहे.... थांबतो.'' ...इति बेंडखळे.

''लेखनासाठी तुम्हाला कुणी मार्गदर्शन केलं का?'' असं मी सरांना विचारल्यावर त्यांनी हसत हसत एक मार्मिक आणि प्रत्येकाला मार्गदर्शक असं उदाहरण मला सांगितलं. दुर्गाबाई भागवत वाचनालयात अस्वलांचा अभ्यास करत बसल्या असताना एक प्रवासवर्णन सरांनी त्यांना दाखवलं आणि काही विचारलं तेव्हा दुर्गाबाई म्हणाल्या, ''बाळ, तुला एक सांगते, ते कायम तू लक्षात ठेव. तुझं तू वाचत जा. तुझा तू वाढवत जा आणि तुझा तू सुधारत जा.'' एवढं एक वाक्य मला पुरलं. मी तसाच बनत गेलो.

सरांच्या कवितांबद्दल काय बोलावं? आठ-दहा कवितासंग्रह प्रसिद्ध होऊ शकतील असा साठा असताना- नुकताचम्हणजे १८ जुलैला-'पावसफूल' नावाचा एकमेव कवितासंग्रह प्रसिद्ध झाला. मणभर वाचावं आणि कणभर लिहावं असं मानणाऱ्या या माणसानं इतकं लेखन केलंय! त्यांच्या शब्दांना वाट मिळाली की कवितेची पहाट फुलते आणि प्राजक्ताच्या सड्यानं कवितेचं अंगण भरून जातं. प्रतिभा-प्रतिमा-भावना आणि कल्पनेचा साठा इतका आहे, की कवितेला शेकडो वाटा फुटतात. ज्ञानाच्या पूर्णविरामापेक्षा

अनुभवाचे स्वल्पविरामच त्यांच्याकडे अधिक आहेत. त्यांचे अनुभव ऐकताना, वाचताना आपण थक्क होतो.

तसंच 'पावसफूल'या नामकरणासंबंधी आपल्याला सांगता येईल. हरिश्चंद्रगडावरच्या तारामतीच्या लवणांत घनदाट जंगल आहे. गोनीदा आणि इतर मित्रांसोबत सर तिथे गेले. इतरजण मागे फिरले आणि भरत मोदीसह सर पुढे गेले तर मोठ्या आकाराचे कवक दिसले. लांब फांदीमुळे काढता आले नाही. पुढे गेले तर ४०/४५ कवकं लागलेली लांबच लांब व्ही आकाराची फांदीच आणली आणि विष्णुतीर्थावर उभी केली. सर म्हणाले,''हे पावसाळ्यात येतं. माझ्या पुस्तकाचं नाव मी 'वृष्टीफूल'च ठेवणार.'' ते वाक्य आप्पांनी (गोनीदा) ऐकलं आणि म्हणाले,''वृष्टी म्हणजे काय रे?'' ''पाऊस''– एकमुखी उत्तर आलं. ''मग उच्चारायला कठीण असा 'वृष्टी' शब्द का वापरतो? वृष्टीचा अर्थ सर्वच लोकांना पटकन कळणार नाही. शब्दांच्या पाठी अर्थ धावायला हवा. मग 'पाऊसफूलं'/ 'पावसफूल' म्हण नां!'' असे नामकरण झाले.

पुढे गोनीदा म्हणाले,'' आता या १०–१२ कवकाच्या फांदीचं काय करणार? तुझ्या घरात जागा नाही, मी फिरस्ता. तू असं कर, की ही फांदी 'लता'च्या घरी पोहोचती कर.'' अरुण कामत आणि बेंडखळेसर लतादीदींकडे गेले आणि ती कवकं लागलेली फांदी दिली. दीदींनी त्याचा डेकोरेटिव्ह पीस तयार करून घेतला. काही महिने ते अडाणी–वास रहित फूल स्वरलतेच्या स्वरांकित घरात विराजमान झालं.

सर म्हणतात,''या हरिश्चंद्रगडानं मला दोन गोष्टी दिल्या. एक म्हणजे मंगेशकरांच्या घराचा उंबरठा आणि दुसरं म्हणजे कवकाला 'पावसफूल' हे नाव.''

सरांचं जुन्या ११वीपर्यंतचं शिक्षण खेडला (कोकणात) झालं. ते पण आईबरोबर शेतात काम करत करत. गवताचे भारेपण डोक्यावरून वाहून नेण्याचं काम करावं लागलं. शेतातल्या कामाला उशीर झाला की शाळेला उशीर होई. पण अशा वेळी शाळेच्या शिक्षकांविषयी कृतज्ञता व्यक्त करायला सर विसरत नाहीत. उशिरा आले की वर्गाबाहेर काढलं जायचं. अशा वेळी सरांची शिक्षणाची ओढ बघून शिक्षक त्यांना दरवाज्यात बसवत. म्हणजे नियमाप्रमाणे वर्गाबाहेर तर काढले, अभ्यासही बुडाला नाही. ''म्हणून मी साऱ्यांचा ऋणी आहे.'' हे सरांचं वाक्य....

११ वी नंतर त्यांनी खेड सोडलं आणि मुंबईला आले, स्वत:च्या पायांवर उभं राहण्यासाठी. बॉम्बे सेंट्रलला चुलत आजोबांचं दुकान होतं. यमुताईंचा मुलगा म्हणून दुकानात राहायची सोय आजोबांनी केली.

पुढे घरी राहायची सोय झाल्यावर शिवाजी पार्क ते माटुंगा स्टेशनपर्यंत चालत जायचे. तिथून मग जे.जे.ला जायचे. घरात सगळी कामं करायची. अगदी सहा महिन्यांच्या बाळाचे कपडे धुण्यापासून सारं काही वेळेत आटपायचं. तिथे असतानाच निसर्ग आणि निसर्गातले छोटे–मोठे प्राणी या सगळ्याची आवड निर्माण झाली. मधमाश्यापालनाचं शिक्षणही तिथंच मिळालं.

यावरून मी त्यांना विचारलं, ''सर, तुम्हाला सगळे 'मधुमती' म्हणून चिडवत. त्याचा ह्या मधमाशी–पालनाशीच काही संबंध आहे का?''

सर खदखदून हसले आणि म्हणाले, ''सांगणार नव्हतो पण आता सांगतो. मधमाश्यांशी कसं बोलावं, हे मला अवगत आहे. मधमाशीतील राणी माशी कशी ओळखायची, ती बाजूला कशी काढायची, पोळ्यातून मध कसा बाहेर काढायचा ते सर्व मी शिकलो. माझी डी.टी.सी.ची परीक्षा होती. मी परीक्षेला निघालो होतो. तेवढ्यात मधमाशीपालनाच्या पेटीत माश्या तडफडताहेत हे लक्षात आलं. पेटीत कुणा मुलानं काड्या घालून माश्यांना डिवचलं होतं. मी तिथं गेलो. विशिष्ट तऱ्हेनं हातानं संकेत केला. टक्टक् वाजवलं, पण तेवढ्यात एक माशी कानशिलाशी, चष्म्याच्या काडीत अडकली आणि तिथं करकचून चावली.

तसंच उठून पेपरला जाईपर्यंत डोळा टरारून सुजला. चष्मा घालता येईना. चष्म्याची एक काच डोळ्यांसमोर धरून मी पेपर लिहिला. सात दिवस त्रास झाला. परीक्षा संपली. मी पास झालो पण सेकंड क्लास मिळाला. तेव्हा त्या परीक्षेपासून मुलं–मुली 'मधुमती' म्हणू लागली.''

मला वाटतं, हे नाव बेंडखळेसरांना पूर्णपणे सार्थ आहे कारण त्यांची मती मधुप्रमाणे दिसेल तिथला मध टिपून घेणारी आहे. म्हणून तर प्रार्थना समाज शाळेतल्या नोकरीच्या काळात अनेक गोष्टी त्यांनी टिपल्या.

प्लॅस्टर ऑफ पॅरिसमध्ये अनेक शिलालेखांचे प्रिंटस् घ्यायचे काम अवघड, पण तेही केले.

ब्रॉन्झच्या पुतळ्यांचे काम आर.टी. शिरगावकरांकडे शिकले. अंधेरीला त्यांचा स्टुडिओ आहे. तिथे हे काम चाले. पंचधातूचे पुतळे–मूर्ती निर्माण करायच्या आधीच्या सर्व प्रोसेस त्यांनी शिकवल्या.

किल्ले आणि गड यांच्या तटाच्या पायाच्या दगडांचा अभ्यासही त्यांनी केला. कधी एकट्यानं, कधी गो.नी. दांडेकरांबरोबर तर कधी बाबासाहेब पुरंदरे यांच्याबरोबर. तटामध्ये असलेली गणपतीची मूर्ती शोधली. विसापूरच्या किल्ल्यावरचे सात शिलालेख शोधले. या नखरेल तटाच्या पश्चिमेला हे मिळाले. तिथंच फिरता फिरता वनस्पतींचा–आयुर्वेदाचा अभ्यास केला.

फोटोग्राफी तर होतीच होती, त्याबरोबर सिनेकॅमेरादेखील चालवायला शिकले. सह्याद्रीतील सर्व लेण्यांची डॉक्युमेंटरी करून भारत सरकारला द्यायची त्यांची मनापासून इच्छा होती पण जमलं नाही, याची खंत त्यांच्या मनाला लागून राहिली आहे. कारण दोन माणसं कॅमेरा घेऊनच पळून गेली!

'वाहिली ती गंगा आणि राहिलं ते तीर्थ' असंच म्हणणारा हा माणूस आहे. हाती आलं त्याचा अती आनंद नाही, हातून निसटलं त्याचं दु:ख नाही. असा हा स्थितप्रज्ञ माणूस चित्रांत आणि काव्यांत एकटाही रमतो. चित्रकला हे मूककाव्य आहे आणि काव्य म्हणजे वाचा असलेली चित्रकला आहे, ही बाब त्यांनी १०१ टक्के सिद्ध केलेली आहे.

कुणालाही नावं ठेवणं या माणसाच्या रक्तात नाही. लेखक असूनही कुणाच्याही लेखनातील थेट चुका ते कधी दाखवत नाहीत. 'मी असं लिहिलं असतं' एवढंच म्हणतील. आपण ते समजून घ्यायचं.

'वा!', 'छान!!', आणि 'सुरेख!!!' हे त्यांचे परवलीचे तीन शब्द आहेत. कुणाला दुखावायचं नाही हे तत्त्व पहिलं. म्हणूनच ते मुलांत मूल होऊ शकतात.

खरं तर, सूत्र आणि सूक्तं यांच्याशी त्यांच्या शिळोप्याच्या गप्पा चाललेल्या असतात. बसल्या जागी चार अक्षरं मागे ठेवून जायची त्यांची वृत्ती आणि प्रवृत्तीसुद्धा! त्यामुळे माझ्यासारखी एखादी व्यक्ती ती अक्षरं गोळा करत जाते आणि एक खजिनाच तयार होतो.

दिनांक १३ जून १९९४. शाळेचा पहिला दिवस होता. तासाला जाण्यापूर्वी सरांनी एका कागदावर चार ओळी लिहिल्या होत्या.

*'वाढत्या वयाबरोबर ज्ञान वाढतं हे खरं, पण*
*ज्ञानविस्तारांच्या प्रचंड कक्षांची जाणीव*
*झाल्याबरोबर अपुऱ्या आयुष्याचं दु:ख वाढत जातं.*
*शिक्षण खऱ्या अर्थानं असंच आहे.'*

५ सप्टेंबरला एक बोलकं वाक्य त्यांच्याकडून ऐकायला मिळालं, जे शिक्षकांच्या डोळ्यांत झणझणीत अंजन घालतं,

*'ज्यांच्या ज्ञानकक्षा सीमित असे गुरुजन*
*निवृत्तीकडे नेहमीच लौकर झुकतात.'*

खोलवर विचार करणाऱ्याला हे वाक्य खूप काही देऊन जातं आणि पुढे ते म्हणतात असा निवृत्त होणारा शिक्षक जर नसेल तर–

*'शाळेतला प्रत्येक उजाडता दिवस विद्यार्थ्यांच्या दृष्टीने*
*मनोहर चांदण्याचा असतो. आपल्या दृष्टीने*
*नव्या अरुणयुगाचा असतो.'*

मला आठवतंय, १९९२ ची वार्षिक परीक्षा होती. स्टाफरूममध्ये आम्ही दोघेच होतो. रिलिव्हर असल्यानं जरा बोलायला मोकळा वेळ होता. या परीक्षा कशासाठी, यामुळे नेमके काय साध्य होते? इत्यादी गोष्टींवर चर्चा चालू होती. पुढे दोन दिवसांनी माझ्यासमोर सरांनी एक कागदाचा चिटोरा ठेवला. त्यावर परीक्षेबद्दलची मतं लिहिली होती. सरांनी ज्या पद्धतीनं त्याच्यावर विचार केला होता, त्या पद्धतीचा विचार कधी शिक्षणमंत्र्यानंही केला असेलसं वाटत नाही. तो पुढीलप्रमाणे–
परीक्षा म्हणजे

- आपल्याला जे समजलं आहे ते दुसऱ्याला समजावून सांगणं, लिहिणं वा प्रात्यक्षिक करून दाखवणं.
- एक आनंद. ज्ञानाचे अनुभवात रूपांतर करून दाखवण्याचा भरपूर आनंद.
- अभ्यासातून मोकळे होण्याचा, नव्या गोष्टी सुरू करण्यासाठी रिकामा होण्याचा क्षण.
- भीती हे परीक्षेचे दार. ते धाडसानं उघडलं, की ज्ञानगंगा खळाखळा वाहू लागते.
- व्यवहारातील सत्य–असत्य चाचपण्याची रेषा.
- एक पायरी. वर चढायचं की खाली उतरायचं? उतरा अथवा चढा; शक्ती ही खर्च होणारच.
- गुरुजनांचा, मातापित्यांचा आनंद द्विगुणित करणारा क्षण.
- परीक्षा आत्मविश्वास देते.

परीक्षेकडे पाहण्याची अशी दृष्टी किती शिक्षकांनी मुलांना दिली असेल? ज्यांनी दिली असेल ते सारे बेंडखळे असतील!

मला आठवतो, तो सरांचा शाळेतला निरोप समारंभाचा दिवस. मी खूप अस्वस्थ होते. आता सर रोज भेटणार नाहीत, यापेक्षा नवनवीन विचार आता आपल्याला कोण देणार? हाच विचार सतावत होता. त्याचबरोबर नियमाप्रमाणे निवृत्तीचा दिवस कधी ना कधी येणार, हे पण मान्य होते. कळत होतं पण वळत

नव्हतं. ही गोष्ट सरांच्या लक्षात आली असावी. काही बोलायचा त्यांचा स्वभाव नाही. आपल्या भाषणात मात्र ते म्हणाले,

''विकसनासाठी प्रस्थापन करणाऱ्यांना, आशीर्वचन देण्यासाठी करत असलेला कौटुंबिक सोहळा म्हणजे निरोप समारंभ. प्रत्येक क्षण दुसऱ्या क्षणाला निरोप देत असतो, निसर्गातील ऋतू एकमेकाला निरोप देतात, त्यात वेळ अथवा सीमारेषेचं बंधन नसतं. गुरू असो वा शिष्य, त्यांना दिलेला निरोप त्यांच्या वर्तमानाला भविष्याने जोडलेला दिसावा असा हा क्षण!''

माझी निराशा विरघळून गेली. मी स्टाफरूममध्ये आले तर समोर लिहिले होते,

*'पाच बोटातून माझ्या,*
*झरे माझा हरी'*

अशा किती आणि काय काय घटना लिहू? सरांनी आमच्या स्टाफचं जगणं समृद्ध केलं, एवढं मात्र निश्चित!

मला वाटतं, सरांना घडवताना परमेश्वरानं कोणतं रसायन वापरलं, त्यालाच माहीत. त्यांची वृत्ती पूर्णपणे वाङ्मयात भिजून गेलेली, प्रवृत्ती भटक्याची. इतकी, की लग्नाच्या दुसऱ्या दिवशीच भुयारांच्या अभ्यासाला गेले. त्यांच्या स्वभावाची कल्पना असलेल्या वहिनींनी कोणतीही तक्रार केली नाही कारण त्यांना पसंत करताना गो.नी.दांनी सर्व कल्पना दिली होती. त्यामुळे सरांना त्यांचा पूर्ण पाठिंबा होता. भुयारात पायी प्रवास करताना अनेक गूढरम्य कथा कानी येत. त्या गूढरम्यतेमुळे कुतूहल वाढले आणि अनेक भुयारांचा शोध घेतला गेला. जळगाव, पाचोरे ते तेरेखोलपर्यंत डोंगर फिरताना ५०-६० भुयारे लागली. काळोखात आत शिरले पण हाती काही लागले नाही.

हातखंब्याच्या भुयारात मात्र वाघ समोर आला. कळसूबाईच्या पुढे कोंबडकिल्ल्या. तिकडे पाठोपाठ तीन भुयारे होती. भुयारातले अनुभव सारेच थरारक. एकदा तर पुढे गेल्यावर जनावरं बरीच होती. पुढे जायची पंचाईत. मागून मोठे दगड पडून परतीची वाट बंद झालेली. मोठा बाका प्रसंग पण सहीसलामत सुटले. भुयारांच्या प्रवासावर सरांच्या अनेक कथा लिहून तयार आहेत. वाचकांच्या भेटीला त्या केव्हा येताहेत त्याची वाट पाहू, पण लवकरच त्या येतील.

भुयाराप्रमाणे गड फिरताना कधी एकटंच, कधी मित्रमंडळी, कधी गोनीदा, कधी ब.मो. पुरंदरे असत. अखंडपणे गडकिल्ल्याच्या वातावरणात तिथल्याच दगडाची उशी करून, आकाशाच्या घोंगडीची ऊब घेणारा हा माणूस! ग्रहताऱ्यांच्या निरीक्षणाचा छंद सावलीसारखा जपलेला. एकीकडे अधांतरी असणारे ग्रहतारे अभ्यासताना जमिनीवर असणाऱ्या काट्याकुट्यांतही भेटणाऱ्या वनस्पतींच्या शास्त्राचा, बेंडखळे हा माणूस पूरकवैद्य आहे. वनस्पतींची जाण असण्याचा गुण आईकडून वारशानं आला. त्याचाच सखोल अभ्यास त्यांनी केला आणि अजूनही करताहेत. तो अभ्यास पाहून 'ग्रामीण आरोग्यसेवा संघटनेच्या' वतीनं, सोनावणे साहेबांनी त्यांना 'डॉक्टर' ही पदवी बहाल केली.

विविध विषयांवर त्यांनी मनापासून प्रेम केलं. वयाचा अडसर कधीच आला नाही. मला वाटतं, पन्नाशीनंतर सरांनी तनाचा वाढदिवस कधीच साजरा केला नसावा. केला तो फक्त मनाचा. गेल्या १९ जुलैला ७२ वा वाढदिवस झाला, तो परिपक्व आणि सतत कौतुहल असलेल्या मनाचा. माहितीची अनंत दारं त्यांनी खोलली आहेत. त्या आधारे नव्याजुन्याचा दुवा ते नेहमी जोडतात.

दगडांत आणि काट्याकुट्यांत, रंगांत, काव्यांत, रानात रमणारं मन कुठंतरी रानफुलासारखंच संवेदनशील आहे. म्हणूनच जातककथांचा सखोल अभ्यास केलेल्या या पित्यानं आपल्या मुलांची नावं ठेवली ती परमानंद आणि संघमित्रा अशी! कारण त्यांना माहीत आहे, की मित्रांच्या संघातच नेहमी परमानंद गवसतो. मुलंही त्यांच्या पावलावर पाऊल टाकून जाणारी आहेत. संघमित्रानं तर छायाचित्रणात सरांच्या पुढे एक पाऊल टाकलं आहे. डोंबिवलीत जे उत्तम फोटोग्राफर आहेत त्या यादीत संघमित्रा ही एकटीच स्त्री फोटोग्राफर आहे.

कै. सौ. वहिनींच्या उल्लेखाशिवाय सरांच्या माहितीला काही अर्थ राहणार नाही. एकाही शब्दानं तक्रार न करता त्यांनी घर, मुलं, त्यांचं शिक्षण पाहिलं. अखेरपर्यंत कधीच कुठल्या गोष्टीचा अट्टहास धरला नाही आणि सरही कधी मुलांच्या आणि पत्नीच्या स्वतंत्रवृत्तीच्या आड आले नाहीत. मला गंमत वाटते ती या गोष्टीची, की वहिनींना ते नेहमी 'आमचे साहेब' असंच संबोधत. आठवडाभर ऑफिस आणि घर करून थकलेल्या 'साहेबांना' रविवारी सर स्वत: स्वयंपाक करून हक्काची विश्रांती द्यायचे. असे 'सत्यवान' आपल्याला किती घरी सापडतील?

सरांच्या स्वभावाचे किती पैलू, किती कंगोरे उलगडले तरी बर्फासारखा ७/८ भाग पाण्याखालीच राहणार आहे याची मला खात्री आहे.

त्यांच्या आयुष्यात दु:खाचे प्रसंग कधी आलेच नाहीत असं मुळीच नाही; पण त्याचं त्यांनी ना कधी प्रदर्शन केलं, ना

कधी तोंडाने बोलले. सौ. वहिनी गेल्यावर मात्र–

*'रिते तन, रिते मन*
*सारे झाले रिते रिते'*

या ओळी त्यांचं मूक दु:ख सांगून गेल्या.

थोडक्यात सांगायचं, तर स्थितप्रज्ञ असलेला हा माणूस पूर्णपणे मन:शांती मिळालेला असा आहे. शेवटी मन:शांती ही जगण्याच्या आचारातूनच जन्माला येते. 'सांस्कृतिक शांती' त्यांनी ग्रंथवाचनातून मिळवली.

'आर्थिक शांती', 'जोडोनिया धन उत्तम व्यवहारे, उदास विचारे वेच करून' मिळवली.

'सामाजिक शांती' समाजात मिसळून, निरपेक्ष मदत करून मिळवली.

'गृहस्थ' म्हणून जगण्याबरोबर हा माणूस 'कलावंत' म्हणून अधिक जगला, जगतोय. कारण गृहस्थाचं पोट भरलेलं असतं, कलावंताचं पोट आणि मन कधीच भरत नाही. अनेक मानसन्मान त्यांना मिळाले पण लोकप्रियतेत ते कधीही अडकले नाहीत. म्हणूनच कलावंत राहिले. टाळ्यांच्या गजरात आणि स्वाक्षरी देण्यात गुंतून पडले नाहीत, म्हणूनच कलावंत राहिले. या गोष्टी ते कटाक्षानं टाळतात. समोर येतच नाहीत. त्यांची व्याप्ती वडाची आहे पण वृत्ती लाजाळूची आहे.

सर, तुमच्याकडे पाहिलं, की मन आकाश होतं. तुमच्याबरोबरीनं आम्ही कितीही उंच गडावर यायचं म्हटलं तरी तुम्ही अखंड महाराजांच्या सिंहासनाशेजारीच असणार आणि आम्ही पायथ्याशी. इथूनच तुम्हाला हसताना पाहणं हाच आमचा आनंद! तुम्हाला दीर्घायुरारोग्य लाभो हीच त्या भगवंताला एकमेव प्रार्थना आणि तुमच्या व्यक्तिमत्त्वाला त्रिवार मुजरा!

**माधवी घारपुरे**
धनंजय सोसायटी, ब्लॉक नं.९,
आर.पी. रोड, रामनगर, डोंबिवली (पू).
भ्रमणध्वनी –९८१९०३५७१२
gharpuremadhavi@gmail.com



# झाला थोडासा उशीर...

## आशुतोष जावडेकर

‘मराठी संगीतकार हिंदीमध्ये प्रभावशाली ठरताना दिसत नाहीत?’ – संपादकांनी सुचवलेल्या या महत्त्वाच्या विषयाकडे वळण्याआधी, मी अस्सल मराठी माणसाप्रमाणे दोन शंका उपस्थित करतो आहे. पैकी पहिली म्हणजे खरोखरच असं चित्र आजच्या घडीला आहे का? मराठी संगीतकारांचा, गायकांचा, तंत्रज्ञांचा ठसा हिंदीमध्ये–खरं तर बॉलिवूडमध्ये पडतो आहे की नाही? आणि दुसरं म्हणजे तसा ‘प्रभाव’ मुदलात पडला पाहिजे का?

हिंदी चित्रपट संगीताच्या परिघाबाहेरही आज बरंच काम होत आहे. खाजगी अल्बम, रिमिक्स, फ्यूजन, मंत्र–मन:शांती–योग इत्यादी गोष्टींचे अल्बम्स, रॉक, सॉफ्ट रॉक, देसी रॉक, देसी, कंट्री म्युझिक इत्यादी अनंत तऱ्हांनी भारतात नवं संगीत अवतरत आहे. तेव्हा मराठी माणसांचा याही साऱ्या परिघात कितपत प्रभाव आहे हे बघायला पाहिजे. मागे वळून पाहिलं, तर पार्श्वगायनाच्या क्षेत्रामध्ये लता आणि आशा या दोन मनस्वी ‘मराठी मुलींनी’ राज्य केलेलं दिसतं आणि थोडीथोडकी नव्हे; तर चाळीस–पन्नास वर्षे!

संगीतकारांमध्ये आठवायला गेलं तर पटकन नाव आठवतं ते सी. रामचंद्रांचं. चितळकर हे मराठी आडनाव त्यांनी जसं झटक्यात टाकलं तसाच खास मराठी ढंगाचा, मर्यादित कुवतीचा मराठी सांगीतिक बाजही त्यांनी नमनालाच झटकला असावा. त्यांचं संगीत हे खरोखरीच देश कवेत घेणारं होतं, एखादं राज्य नव्हे! पण एस.डी, मदन–मोहन, बप्पी लाहिरी, लक्ष्मीकांत–प्यारेलाल ते नदीम–श्रवण, जतिन–ललित, राजेश रोशन, ते थेट आताच्या शंतनू मोईत्रा, ए.आर.रेहमान, शंकर–एहसान–लॉय या साऱ्या रांगेमध्ये मराठी नाव ठळकपणे दिसू नये, आठवू नये हा योगायोग नसावा. काहीतरी नक्की आहे, ज्यामुळे मराठी कलाकार तिथवर पोचत नसावेत. आज काय स्थिती आहे? कशी आहे? मराठी माणसांविषयी दुजाभाव आहे? का कमी बजेटमध्ये काम करायला लागल्यावर वर सरकता येत नाही? का मुळात क्षमताच जुजबी –निदान स्पर्धेच्या मानानं– कमी आहे? की एकमेकांचे पाय ओढणं? की अजून दुसरं काही–वेगळंच?

मला वाटतं, मी तरुण मराठी संगीताशी संबंधित माणसांशीच बोलावं. फक्त माझे विचार मांडण्यापेक्षा ते बरं राहील. विषयाचे सारे कोन चाचपायला त्याची मदत होईल.

पहिला फोन मी करतो आहे तो सागर धोटेला. सागर धोटे हे नाव अजून मराठी माणसांपैकी कित्येकांना ठाऊक

नसलं तरी ते लवकरच ठाऊक होईल असं त्याचं काम आहे. तो खऱ्या अर्थानं global आहे. लंडनच्या मिडलसेक्स विद्यापीठाची रेकॉर्डिंग आर्टस्‌ची पदवी त्यानं प्राप्त केली आहे आणि आता मुंबईत थेट बॉलिवूडमध्ये त्यानं काम करायला सुरुवात केली आहे. EMIच्या Replay या आंतरराष्ट्रीय स्तरावरच्या अल्बममध्ये सागरचा एक ट्रॅक आहे – त्यामध्ये तो स्वत: गायलाही आहे. सिंगापूरच्या ICICI ची जाहिरात त्यानं संगीतबद्ध केली आहे. अजून बाकी काही सांगायची गरज नाही – त्याच्या कामाची पातळी कुठली आहे हे यावरूनही स्वच्छ दिसतं!

''रिझनालिजम वगैरे काही नाही'' सागर बोलू लागतो ''मला वाटतं, Modernisation हाच स्पर्धेचा नियम आहे.'' मराठी माणसांना ते केवळ मराठी आहेत म्हणून डावललं जातं असं त्याला मुळीच वाटत नाही. पण तो पुढे म्हणतो, ''हे मॉडर्न संगीत द्यायला मुळात मनही तसंच मॉडर्न हवं आणि लोकांची अभिरुची बदलेल या भरवशावर न राहता आपणच ती बदलवून टाकायला हवी!''

''आता कुठे थोडं थोडं मराठीमध्ये नवं यायला सुरुवात झाली आहे. 'झेंडा'मधलं गाणं मी पहिल्यांदा ऐकलं तेव्हा मी प्रभावीत झालो, कारण त्या पारंपरिक वळणाच्या गीतात इलेक्ट्रिक गिटार वाजवली आहे. ते फार भुरळ घालणारं आहे. नवे मराठी संगीतकार हळूहळू बदलत आहेत, पण पुढे यायचं असेल तर पुष्कळच बदलायला हवं. आज Hip-hop नवीन आहे; ते तुम्ही तुमच्या संगीतात लगेच वळवून बसवायला हवं! मला वाटतं, Thinking behind each track is most essential. प्रत्येक ट्रॅकमागे संगीतकारानं काय विचार केला आहे यावर पुढचं ठरतं. आणि आता हळूहळू अवधूत गुप्ते आणि अजय-अतुल यांना हिंदी चित्रपटसृष्टीचे दरवाजे किलकिले होत आहेत! पुढचा प्रवास तर अगदी अवघड आहे. तुमची Sustainibility ही कितीतरी घटकांवर ठरते.''

सागर जसजसं ओघात बोलतो आहे तसतसं मला जाणवतं आहे की Sustainibility हा खरा प्रश्न नसावा; मराठीमध्ये वर्षानुवर्षं उत्तम संगीत देणारे संगीतकार होते आहेत. मूळ मुद्दा आहे vision चा; जाणिवेचा; प्रतिभेच्या आंतरिक वळणाचा. कदाचित, अजूनही सगळं जग संगीताच्याच बाबतीत नव्हे, तर साऱ्याच बाबतीत digitalize झालं, तरी आपण ऑर्गनच्या नाट्यसंगीताचे गहिवर काढणार असू, तर काही खरं नाही. सागरला तसं मी म्हटलं, तर तो पटकन म्हणतो



आशुतोष जावडेकर

आहे, ''आता बस्‌ झालं! There is nothing wrong in digitalization of music.''

मला पटतं सागरचं– आता बस झालं! आमचं जुनं गाणं, गळ्याचा गोडवा, शब्दोच्चाराची महती, अॅरेंजिंगचा अभाव, गळ्याचं ते विशिष्ट 'भाव-वळण'–आता पुरे झालं!

''मुळात मराठी लोकांचा प्रभाव संगीतक्षेत्रात अगदीच नाही असं नाहीच. आज सगळे स्टुडिओ बघ; तिथले बव्हंशी तंत्रज्ञ, Sound Engineers हे मराठीच आहेत. माझ्या अल्बमचं काम मी यशराज स्टुडिओमध्ये केलं; जिथे हिंदीमधली सगळ्यात मोठ्या बजेटची कामं होतात. तर गंमत म्हणजे तिथेही सगळे मराठीच बोलत होते!''

गंधार संगोराम आता माझ्याशी खास त्याच्या मुद्दे सुटे सुटे करत बोलण्याच्या शैलीत गप्पा मारतो आहे. गंधार हाही सागरसारखाच तरुण, नवाकोरा संगीतकार-गायक आहे. त्याचा पहिला अल्बम 'हिंदी' असावा यातच त्याची vision ध्यानात यावी. पण तो एकाचवेळी मराठी एकांकिकांना उत्तम संगीत देतो आणि दुसरीकडे global कान घेऊन गाणी ऐकतो. तो पुढे बोलू लागतो आहे, ''ध्रुव घाणेकरसारखं एखादं नाव आता दिसतं आहे. 'द्रोण' चित्रपटाचं संगीत त्यानं दिलेलं आहे.''

मला एकदम स्नेहा खानवलकरची आठवण होते. 'ओय लक्की लक्की ओय' या चित्रपटाला तिनं नुकतंच संगीत दिलं आहे आणि कमरेला ढोल बांधून उभ्या असलेल्या स्नेहाचा फोटो फिल्मफेअरमध्येही दाखल झाला आहे!

''आणि आशु, वादक! वादक जे हिंदीत काम करतात, ते सगळे मराठीच आहेत की! अगदी लक्ष्मीकांत-प्यारेलाल पासून ए.आर. रहमानपर्यंत सगळ्यांकडे मराठीच वादक असतात. नुकतंच अजय-अतुलला संगीताचं National Award मिळालं आहे. तेव्हा हेही बघायला पाहिजे. मराठी



सावनी शेंडे-साठ्ये



गंधार संगोराम



सागर धोटे

माणसांचं हिंदीत अगदीच स्थान नाही असं नाही. आता Play-back चं म्हणशील, तर आजकाल संगीतकाराच्या हातामध्ये सगळी सूत्रं नसतात. निर्माता म्हणतो, की सुनिधीनं हे गाणं गावं, हे गाणं श्रेयानं गावं- तेव्हा तसंच होतं... रहमानसारखा एखादाच माणूस डिक्टेट करू शकतो. वाटेल त्याला घेऊ शकतो. अर्थात मराठी पुरुष गायकांमध्ये आतातरी कुणीच मला तिथे पोचेल असं दिसत नाही.''

गंधारनं अगदी वेगळी बाजू मांडली आहे. शेवटी तो म्हणतो आहे, ''अर्थात वैयक्तिक लेव्हलला मला मराठी-अमराठी हे सगळं दुय्यम वाटतं. त्या माणसाकडे मुख्य म्हणजे टॅलेंट आहे की नाही, हेच माझ्यासाठी महत्त्वाचं आहे.''

गंधार आणि सागर दोघेही त्यांच्याही नकळत खास 'मराठी' पोटतिडीकेनं बोलतात. माझ्या एका बंगाली संगीतकार मित्राला मी फोन करतो आहे. तो गोड बोलून विषय संपवतो आहे आणि पंजाबी संगीतकाराला फोन करायलाच नको. तो आधी मानधन, फोटो-प्रसिद्धी, अंकांचं कव्हरेज क्षेत्र इत्यादीवरच बोलेल!

तेवढ्यात माझा सावनी शेंडे-साठ्येबरोबर संवाद होतो आहे. सावनी खरं तर शास्त्रीय संगीतामधील, पण तिची आकलनक्षमता, निरीक्षणशक्ती, अभ्यास, व्यासंग हे universal पातळीचं आहे. हिंदी चित्रपटसंगीताविषयी ती तेवढ्यात अभ्यासपूर्वक बोलू शकते, जेवढं 'गांधी-मल्हार' रागाच्या validity विषयी तिनं उदाहरणार्थ बोलावं!

''हिंदी आणि मराठीचं बजेट वेगळं आहे. फारच तफावत आहे त्यामध्ये. साधी गोष्ट, हिंदीमध्ये एक छोट्या मधल्या 'पीस'साठी चाळीस व्हायलीनवादक मागवतात. मराठीत सगळं मिळून वीस जणांचं बजेट असतं.

दुसरं म्हणजे, दहा टक्के जरी एखाद्या संगीतकरानं नवीन केलं तरी तो संतुष्ट होतो. हिंदीमध्ये लोक पुन्हा पुन्हा मिक्सिंग करतात, म्हणतात हे चेन्नईत जाऊन करू, तिथे अजून चांगलं होतं आपलं काम. म्हणजे एकदा Empire मध्ये काम झालं, की झालं!

मराठी संगीतकार हिंदीत घुसेल तरी कसा? आपलं काम मुळातच एवढ्या तुटपुंज्या बजेटमध्ये असतं, की ते हिंदीवाल्यांना पटूच शकत नाही. हिंदीमध्ये granduer (ग्रँजर) लागतं, भव्यता लागते. ती वृत्ती मुळातच आपल्याकडे नाही.

मराठी गाणी इतकी गाजली आहेत. पण arranging वर ती गाजलेली नाहीत. उलट, हिंदीत अगदी पूर्वीपासून गाणी arranging वर गाजली आहेत. 'आरजू'मधल्या 'अजी रूठकर' गाण्यामधला saxophone चा तुकडा कधी येतो आहे याची लोक वाट बघतात.

तुमचे सूर universal असतील, तर आणि तरच हिंदीत शिरू शकता. तुम्ही फक्त सुधीर फडके ऐकून mould होऊ शकत नाही. आपल्याकडे गंमत अशी आहे की Self-con-

tentment फार लगेच होते. 'मी मराठीचा राजा आहे ना, मग पुरे!' अशी वृत्ती आपण बघतोच!''

सावनीला मला मुळीच disturb करावंसं वाटत नाहीये. तिच्या सुरांइतकीच तिची वाणी प्रवाही आहे. सरतेशेवटी, तिला मी त्या कुप्रसिद्ध regionalism विषयी विचारतो आहे. बेला शेंडे या तिच्या सख्ख्या बहिणीचा ए.आर.रहमानपर्यंतचा प्रवास तिनं जवळून बघितला असल्यानं ती यावर काय म्हणते याचं मला कुतूहल आहे.

''काही rackets असतात. मराठी माणसांना खाली खेचलं जातं. पण तशी स्पर्धा असणारच. तुमचे सूर universal असले तर तुम्हाला कुणी अडवू शकत नाही!''

मी फोन खाली ठेवल्यावर पहिल्याप्रथम मला जाणवतं आहे, ते आम्हा चौघांमधलं वैचारिक साम्य. गंधार-सागर विशीचे, संगीतकार आणि नव्या उमेदीचे. मी-सावनी तिशीचे, जरा मोठे, व्यावसायिक जगापेक्षा बाहेरचं जगणंही थोडं अधिक बघितलेले. पण आमच्या आणि पुढच्या पिढीचं एकमत यात दिसतं, की

- – आता(जुनं) पुरे झालं!
- मराठी-अमराठीपेक्षा Talent महत्त्वाचं.
- मराठीत आत्मसंतुष्टता आहे.

'बजेट'च्या मुद्याबाबत मात्र वेगवेगळी मतं आहेत. सागरला वाटतं, बजेट हा काही मुद्दा असू शकत नाही. जर मी त्याच सॉफ्टवेअरवर काम करतो; ज्यावर हिंदी संगीतकार करतो, तर बजेटचा मुद्दाच कुठे येतो? गंधारला वाटतं, आता ऐंशी टक्के संगीत सॉफ्टवेअरवर होतं, तरी मराठीत उत्तम गाणी होताना दिसत नाहीत.

मला वाटतं, बजेट हे छोटं असलं तरी फार मर्यादा येत नाहीत. चांगलं गाणं, तरीही होऊ शकतं. पण सावनी म्हणते तसं ते 'भव्य' होत नाही. गाण्याला जर इस्माईल दरबारसारखं grandure हवं असेल तर लाइव्ह वाद्यसंचाला पर्याय नसतो.

मूळ मुद्दा निराळा वाटतो मला. सुदैवानं, माझी कॉलेजची पाच वर्षं ही संपूर्णतया अमराठी वातावरणात गेली होती. पंजाबी, बंगाली मित्रांचे नमुने तेव्हा मी बघितले. आपण मराठी माणसं त्यांच्या तुलनेत कमी धाडसी असतो असं मला नेहमीच वाटत आलेलं आहे. शिवाय, मराठी माणूस कलाकार असेल तर त्याचं theorotical knowledge भले अफाट असेल, स्वत:च्या गाण्यात ते उतरवायला त्याला जमत नाही किंवा भीती वाटते. आणि म्हणूनच, 'गर्जा महाराष्ट्र माझा'चं rock remix करणारा अवधूत गुप्ते, हा अनेक अर्थानं मला मराठी सांगीतिक इतिहासामधला Milestone वाटतो!

दुसरं म्हणजे, खूपदा मराठी कलाकार आपल्या वर्तुळात राहतात. त्यांना ते सुरक्षित वाटतं आणि सोयीचंही वाटतं. तिथे त्यांना रोज स्वत:ला proove करायला लागत नाही- हिंदीत ते रोज करायला लागतं.

त्याहून महत्त्वाची, मराठी गायकांची-संगीतकारांची सांगीतिक जडणघडण ही कच्ची नसली तरी मर्यादित आवाक्यामधील आहे. झोपताना कुशीला त्यांना 'गेले द्यायचे राहून'च लागतं, नोरा जॉन्सचं अतीव सुख देणारं, संथ, मधाळ गाणं नाही चालत.

अर्थात, सगळे असे मुळीच नाहीत. किंबहुना; खूपच बदल मला आसपास दिसत आहेत! कितीतरी नावं या दशकात हिंदीत गाजतील असं मला वाटतं. बेला शेंडेनं पार्श्वगायनामध्ये मराठी प्रभावाचा 'ओनामा' केला आहे. अजय-अतुलला संजय लीला भन्साळीचा चित्रपट मिळाल्याची कर्णोपकर्णी वार्ता आहे. कौशल इनामदार मराठीच्या वरच्या जरा elite, genteel वर्तुळात वावरतो आहे - हेही काही कमी नाही; सोपं नाही.

शिवाय, नशीब म्हणून एक वेगळीच गोष्ट असते, नाही का? कुठला कलाकार कधी वर-खाली जाईल हे काही अंशी तरी सटवाईच लिहून ठेवत असली पाहिजे! ती मराठी- अमराठी बघत असेल असं पूर्वेतिहासावरून वाटत नाही!

सगळं जग बदलत आहे; संगीतही पालटलं आहे! क्लिन्थ ब्रूक्स या समीक्षकानं आताशा कवितांना Metaphor चीच भाषा कळते असं म्हटलं होतं, त्यालाही वर्षं उलटून गेली. बदलणाऱ्या संगीताला आता आता Metaphor ची भाषा कळू लागली आहे. ध्रुवपद, कडवं, मधले संगीत, चाल, गायकी यापलीकडे संगीत वाढलेलं मला स्वच्छ दिसतं आहे. ते संगीत - Metaphor मराठी संगीतकारांमध्ये दिसतं की नाही, हा खरा कळीचा प्रश्न आहे!

**आशुतोष जावडेकर**
Off.No.7, युगाय मंगल,
गांधी लॉन्ससमोर, गुळवणी महाराज पथ,
एरंडवन, पुणे- ४११००४.
भ्रमणध्वनी : ९८२२७९२१३६
ashudentist@gmail.com

# माझे पुणेरी दादा

## अनुराधा गांगल

आपल्या भोवती अनेक माणसे वावरत असतात. आपले मित्र-मैत्रिणी, नातलग मंडळी, आपले शेजारी-पाजारी ओळखीची माणसे यांच्याकडे लक्षपूर्वक पाहिले तर ही सर्व माणसे घर, स्वत:चा व्यवसाय तर करीत असतातच. परंतु त्यांना स्वत:ला आवडणारा असा स्वत:चा एकतरी छंद ते करतात हे दिसून येते.


कोणाला गायन, कोणाला वादन, कोणाला चित्रकला तर कोणाला लेखन असे नाना प्रकार त्या छंदाचे असतात. त्यातील त्यांचे उल्लेखनीय काम पाहिले तर थक्क व्हायला होते. लहानपणापासूनच आई-वडील मुलांकडे जातीने लक्ष देतात. त्यांच्या अभ्यासाबरोबर पोहायला, डान्स करायला, तबला वाजवायला अशा क्लासेसमध्ये त्यांचे नाव घालतात. मुलेही अभ्यासाबरोबरच त्या त्या क्षेत्रात प्रगती करतात.

फार फार पूर्वी सर्वच विषयांत आजच्या इतकी प्रगती साधली गेली नव्हती. ज्या घरांतून शिक्षणाचे महत्त्व लक्षात घेतले गेले होते त्या घरांतील स्त्रियासुद्धा शिक्षणासाठी बाहेर पडल्या होत्या. परंतु सर्व घरांतून खाणे-पिणे, देऊळ, व्यायाम, अध्यात्म वाचन, धार्मिक वाचन इतकेच साधले जात होते.

माझे वडील मूळचे कर्जतजवळच्या कोहीळ या खेडेगावचे. पण पोटापाण्यासाठी व्यवसायानिमित्त ते पुण्यात स्थायिक झाले. त्यांना आम्ही मुले दादा म्हणत होतो. त्यांचा स्वभाव अगदी मोकळढाकळा-गप्पीष्ट-विनोदी होता. ते आत एक-बाहेर एक असे नव्हतेच मुळी. आवाज छान मोठा होता; मोठा होता तरी त्यात गोडवा होता. त्यांचे वह्यांचे दुकान होते. कोणी मित्र येता-जाताना दिसला तर ते त्याला जोरात मोठ्याने हाक मारत, त्याला बोलावत, चहाचा आग्रह करीत. ते तंबाखू खात, त्या तंबाखूच्या डबीला ते 'खाऊची डबी' म्हणत. चहावर 'खाऊ घे रे' असाही उत्साही आग्रह करीत.

अशा माझ्या दादांना एक छंद होता की 'खूप चांगले खाणे अन् लोकांना खाऊ घालणे'. ते नेहमी म्हणत, खाताना बरोबर आणखी पण कोणीतरी हवेच. आमच्या घरी येणाऱ्या पाहुण्याला ते त्यासाठी रहाण्याचा आग्रह करीत. तोंडाने म्हणत, ''अरे राहा रे, परवा जा. उद्या आपण श्रीखंडाचा बेत करू या.'' त्याला ते इतका आग्रह करीत की त्या पाहुण्याला आपला मुक्काम ठोकावाच लागे!

माझ्या लग्नाच्या दुसऱ्या दिवशी घरात वीस-पंचवीस पाहुणे होते. पण त्यांनी सर्वांसाठी आंब्याच्या रसाचा बेत केला होता. अन् 'पाहुणे जायचे आहेत' म्हणून मला सासरहून



बोलावून घेऊन मोठा 'गंजभर रस' त्यांनी माझ्या समोर ठेवला. ''अगं, खरे तर 'रसा'साठी तुला बोलावले'' असे म्हणाले.

मी आता मुंबईत राहते. सर्व मुंबईकर पुण्याच्या अनेक पद्धतींना नावे ठेवतात. पण मी तर लहानपणापासून माझे दादा व ते मित्रांना, पाहुण्यांना खाण्यासाठी करीत असलेला आग्रह पाहात आले होते. त्यामुळे मला मात्र कळतच नसे.

आंब्याच्या दिवसांत आमच्या घरी बाजारात आंबा आला की तो दिसेनासा होईपर्यंत 'आमरस' असे. त्यांना जेवताना आमरसासाठी 'वाटी' घेतलेली आवडत नसे. आम्ही त्यासाठी मोठे 'वाडगे' मांडत होतो. आजी मात्र आम्हाला म्हणे, ''आता त्या साली-बाठी या दाराने कचरा कुंडीत न्या. डोळ्यांवर येते.'' हे आजीचे वाक्य तुम्हाला खटकेल. पण सांगते, की मी हे जे माझ्या दादांचे वर्णन करते आहे. ते वाचून तुम्हाला अतिशयोक्ती वाटेल पण अतिशयोक्ती तर अजिबातच नाही. थोडे एखाद् वेळेस जास्त लिहायला हवे होते इतके ते खरे आहे.

आमरसाच्या दिवसांत ते एकदा तरी पुरणपोळीचा बेत करायला सांगत. सर्व जावयांना फोन करून बोलावलेले असायचे. मग आमरस-पुरणपोळी व साजूक तूप असे खाणे हा बेत होई. तुम्ही पण एकदा हा बेत करून पाहा हं. खुश व्हाल.

दर चतुर्थीला आमच्या घरी गुरुजी पुजेला व जेवायला असत. त्या दिवशी रात्री 'उकडीचे मोदक' असत. गुरुजी व ते छान खात. पण एखाद वेळेस गुरुजींचा मुलगा आला तर ते आम्हा मुलांनाच आग्रह करीत. आम्ही काय खाणार ते त्यांना माहीत असे. ते त्याला म्हणून ते आईला म्हणत, ''त्यांना दोन, मला पाच अशी 'बीट' लावू या.'' अशा कारणानेच आईचे-आजीचे कधी कमी पडत नसे. त्या सर्व बरोबर करीत असत.

पुरणपोळी अनेकदा होई. तव्यावरच पोळी शेकताना दोन्ही बाजूंनी साजूक तूप घातले जाई. अशी पोळी फारच छान लागे. बासुंदी, श्रीखंड वारंवार होई. त्या काळी 'हॅपी बर्थ डे'ची एवढी प्रथा नव्हती. पण दादा आम्हा प्रत्येकाचे इतकेच काय त्यांचा- आईचा व आजीचा वाढदिवस लक्षात ठेवत. इतर केक वगैरे प्रकार नसे. पण वाढदिवसाच्या अगोदर दोन दिवस त्यांचे सुरू होई. परवा तुझा वाढदिवस नां, आपण अमुक करू या. प्रत्येकाला जे आवडेल ते किंवा तो सांगेल ते वाढदिवशी होत असे.

माझ्या लग्नाच्या वर्षसणाला पंधरा-वीस माणसे जेवायला होतो खरी, पण त्यांनी श्रीखंडासाठी आईला चाळीस लीटर दूध घ्यायला सांगितले होते. प्रत्येक प्रकार असा खूप खूप केला जात असे. उरलेच तर दुसऱ्या दिवशी खाताना ते म्हणत, 'आज श्रीखंड जास्तच छान लागते आहे हं.'

त्यांच्या 'पूना मर्चंण्टस'ची दरवर्षी सहल जात असे. एकदा ते वाई-साताऱ्याला गेले होते. तिथे एके ठिकाणी त्यांनी मस्त-दाट, घरगुती (ज्यांच्या घरी गाई-म्हशी आहेत, भरपूर दूध आहे अशा ठिकाणची) बासुंदी खाल्ली. त्यांना ती इतकी आवडली की त्यांनी तेथे दुधाची छोटी बरणी विकत घेतली, त्यांत बासुंदी घेतली. खास आम्हा सर्वांसाठी तेथून ते लगेच घरी यायचे होते. आता गंमत बघा हं. ते रात्री १२ला घरी आले. आम्ही तीन मुले झोपलो होतो. त्यांनी 'ट्युब'चे बटण ऑन केले. आम्हां सर्वांना उठवले, चूळ भरायला सांगितली. आईला 'वाट्या' आणायला सांगितल्या. अन् आम्ही ती बासुंदी त्या वेळेस स्वादिष्टपणे चाखत होतो. एकीकडे दादांना, 'कशी झाली ट्रीप?' म्हणून विचारीत होतो.

असे आमचे दादा. दादा कधी-कधी चिडत असत. आईने त्यांना तेल हवे आहे किंवा साबुदाणा हवा आहे, असे सांगताच म्हणत, ''आहे का तुझा 'आणा' पाठीशी. काही आणणार नाही. माझ्या दुकानात विक्री झाली, गल्ल्यात चार पैसे आले तरच आणीन, नाहीतर काही नाही.'' असे जोरजोरात आईवर ओरडणारे दादा पुरणपोळीचा बेत ठरला की स्वत:च आईला म्हणत, ''हे बघ, मी वेगळी खास

कोल्हापुरी डाळ व गूळ घेऊन येतो. पुरणपोळी करायची आहे नां! ती तुझी 'डाळ' नको.'' तसेच, कैरीचे लोणचे ज्या दिवशी असेल त्या दिवशी ते मंडईतून मोठ्या, कडक कैऱ्या आणणार. खास हिंग आणणार. सगळे पदार्थ खास असणार. आमचे घर व दुकान जवळजवळ होते. संध्याकाळी ४-५ वाजता त्यांची घरी फेरी झाली की ते दिंडीदरवाज्यापासूनच वास घेत येत. घरात शिरल्यावर आईला म्हणत, ''हं, छान हिंगाचा वास येतो आहे. बरं कां! रात्री जेवताना एक फोड वाढ गं, बघू या कसे जमले आहे ते'' असाही त्यांचा आवाज असे. त्या काळी वाड्यांत पंधरा-वीस बिऱ्हाडे असत. प्रत्येक घरी लोणचे झाले की वाट्यांतून ते एकमेकांच्या घरी जात असे. मग जेवताना,''हे कोणाचे लोणचे? हां बरं, त्यांना म्हणावं थोडं मीठ घाला अजून.'' असेही म्हणत. असे माझे दादा होते. चवीने खाणारे. 'आणा' त्यांना सांगायचे नाही. तरीही सर्व गोष्टी चांगल्या व भरपूर खाणारे.'रस' घेऊन खाणारे.

भोर गावाहून एक 'असामी' पुण्यात लोणी विकायला येत असत. ते आले की दादा त्यांचा पाच किलोचा डबाच घेऊन टाकीत. आई तर नेहमी म्हणे,''हवं तिथं काही करीत नाहीत अन् नको तिथं हे एवढं करतील!'' दिवाळी जवळ आली की ते आईला म्हणत,''हे बघ लोणीवाले आले की लोणी घेतोच. पण सर्व लाडू चांगल्या तुपातच करायचे. मग आई बेसन लाडू साजूक तूपात करे व रवा लाडू डालडा तूपात करे. आतासारखे चौकोनी कुटुंब व येणारे जाणारे नेमके नसत. आमच्या वाड्यात वासुदेव, शेणवाली, बांगडीबा करणारी, दहा-बारा माधुकरी मागणारे व सर्व शेजार-पाजार; इतकेच काय रस्ता झाडणारी झाडुवाली पण, अगदी भिकारीणसुद्धा दिवाळी मागे. आई सर्वांना फराळाचे देत असे. त्यामुळे घरच्या बायकांना अशा नाना गोष्टी कराव्याच लागायच्या. चुकून त्यांनी कुठचातरी लाडू खाल्ला अन् त्यांना अगदी थोडेसेच 'खो' असे झाले तर आईला म्हणत,''काही तरी खायला देते, बघ खोकला झाला. तो चाटण करून दे.'' आई म्हणत असे, ''काही खोकला आहे का तरी! पण करूया 'चाटण''', चार लवंगा अन् चार वेलदोडे निरंजनावर 'काळसर करून' साखरेच्या थोड्याशा पाकात त्याची पूड करणे, की झाले चाटण.

त्या काळी आमच्या घरी सणवार तर असतच, पण श्राद्ध-पक्षही असे. दादा गुरूजींना दहा वेळा बजावीत असत, ''गुरुजी लेचेपेचे ब्राह्मण नकोत हं. चांगले खाणारे ब्राह्मण सांगा.'' दरवेळेस तसे खाणारेच ब्राह्मण येत. पण एकदा गुरुजींना पण वाटले असेल, की दादांची जिरवू याच. एके वर्षी त्यांनी मस्त खाणारे गुरुजी आणले होते. त्यांचे नाव होते 'काणे गुरुजी'. त्या गुरुजींनी सर्व झाल्यावर सांगितले, की 'मला एका केळीच्या पानाशेजारी दुसरे केळीचे पान मांडा'. त्यांचे वाक्य आजी, आईने ऐकले. त्याही जास्तीच्या तयारीत होत्याच. नेहमी असायच्याच. आम्हा मुलींचे श्राद्धाच्या त्या गोष्टींचे सर्व आवरून झाले. आम्ही पाट-पाणी-भांडी-वाट्या मांडल्या, केळीची पाने मांडली. काणे गुरुजींना दोन केळीची पाने मांडली. एवढया वेळात आजी-आईने पण 'भात' कधीच वैरला होता. होतही आला होता. त्यावेळेस त्यांचे आधण वगैरे तयारी आधी तयारच असे. 'रोवळी'मध्ये तांदूळही धुतलेले असत. झाले, सर्वजण जेवायला बसले. मी आज इतकी मोठी झाले, कितीदा तरी खूप खाणारे लोक पाहिले असले, तरी अजूनही माझ्या स्मरणात त्या 'काणे भटजींचे' जेवण रुतून बसले आहे. त्या दिवशी माझ्या दादांच्या चेहऱ्यावर 'तृप्त' झाल्याचे समाधान होते. लहानपणापासून पाहात होतो म्हणून म्हणा किंवा आई-दादांचे रक्त असेल म्हणून म्हणा. आम्हा मुलांना 'किती जेवले ते!' हे असे वाक्य कधीच स्पर्शू शकले नाही. दादांसारखेच आम्हांलाही तृप्त तृप्तच वाटते.

दादांच्या दुकानाचा व्याप नंतर नंतर खूप वाढला. दिवाळीच्या वह्या करायला दिवाळीआधी चार महिने सुरुवात होत असे. अनेक 'गडी' कामाला येत. पण मधून, एखाद्या रविवारी त्यांना ओले वाटाणे उसळ म्हणजेच मटार उसळ व ब्रेड असा बेत असे. मटाराची उसळ, हरभरे उसळ (ओले सोलाणे) भरपूर प्रमाणात होत. मटाराच्या शेंगा किंवा हरभऱ्याच्या जुड्या 'हाराभर' येत असत. वाड्यातील मुले व शेजारच्या वहिनी 'मटार' सोलायला येत असत. उसळ झाली की माझी कामगिरी असे, अनेकांना वाडग्यांतून उसळ पोचवण्याची!

आमच्या घरी फणस, कलिंगडं पण 'मोठी मोठी' दादा आणत असत. दुपारी तो समारंभ असे. सर्वांना देऊन, आमच्या नोकरांसाठी बाजूला ठेवून मगच आई ताट आमच्यासमोर ठेवे. ती स्वत: एक तरी गरा खात होती की नाही, कोणास ठाऊक? हल्ली मुले-आई-बाबा एकत्र खायला बसतात. मुले 'आई, तू पण बैस बरं' म्हणतात. मला खूप लाज वाटते. आमचे त्यावेळेस असे लक्षच नसे. नुसते

नाचण्यात-इकडेतिकडे देण्यात-खाण्यातच वेळ जात असे.

दादांचा एक 'खाणे-क्लब' होता. व्यावसायिक दहा-बारा मित्र व ते सर्व भरपूर खाणारे असे एकत्र झाले होते. दरवेळेस एकेका घरी पार्टी म्हणजे नुसते जेवणच बरं कां असे. हल्लीची पार्टी नव्हे. कांदा भज्यांची, मटार-उसळीची, सोलाणे उसळीची, आमरसाची अशी नुसती खाण्याची जंगी पार्टी असे. त्यात त्यांनी असे ठरवले होते, की पानात टाकायचे नाही (त्या सर्वांचे खाणे बरं कां). जो टाकेल त्याच्याकडे आणखी एक पार्टी लागू असे. आमरस दोन स्टीलची मोठी पिंपे काढावा लागे. हे वाचून हल्लीच्या मुली म्हणतील, ''आधी एक तर इतके खायचे कशाला? अन् त्या काळी या बायका करत कशा होत्या?''

माझ्या आईच्या मनात कितीतरी विचार येतच असतील की! पण ती सतत हसतमुख असे. तिच्या शरीराचे रसायन कशाचे बनले होते ते माहीत नाही. पण होती खरी हसतमुख.

एकदा फ्रुटसॅलडच बेत होता. मी सकाळीच जाहीर केले होते की, ''आज दुपारी तीन वाजता 'ह्यांचे' दोन मित्र येणार आहेत हं आपल्या घरी.'' दादांनी आईला आधीच फ्रुटसॅलड बाजूला ठेव असे बजावले होते. आईने ठेवले होतेच. तिलाही ते कमी वाटले म्हणून दुसऱ्याही पातेलीत तिने काढून ठेवले होते. दुपारी तीनला ठरल्याप्रमाणे मित्र आले. थोड्या गप्पा झाल्यावर मी त्यांना 'बाऊल'मध्ये फ्रुटसॅलड देण्यासाठी उठले. दादा ओरडलेच, ''अगं, ते बाऊल बिऊल नको, पातेलेच ठेव. आज हा बेत होता, तुमच्यासाठी ठेवले आहे. भरपूर खा.''मी पण दोन पातेल्यांत चमचे घालून त्या पातेल्याच त्यांच्यासमोर ठेवल्या ते मित्र अवाकच झाले. आमचा अशोक (जैन) म्हणाला, ''हे सर्वांचे फ्रुटसॅलड आहे का?''

एकदा, मी, आई, दादा व माझी वहिनी जेवायला बसलो होतो. ती नुकतेच लग्न होऊन आमच्या घरी आली होती. आमरस होता. आई व ती फोडणी भात खात होत्या. दादा मला म्हणाले,''काय गं, ह्या दोघी काय खाताहेत, घेतला की नाही त्यांनी रस.'' मी म्हटलं, ''अहो दादा, त्या प्रथम फोडणी भात खात आहेत.'' (मोतिबिंदूमुळे दादांना कमी दिसत होते) दादा लगेच म्हणाले, ''हात, साल्यांनो, चांगले खायचे सोडून फोडणीचा भात खाताहेत. आधी रस घ्या बघू.'' अर्थात ते सुद्धा फोडणीभात खात असत. पण आमरस होता नां! मग त्यांना तोच फक्त दिसे. अन् 'हात साल्यांनो' म्हटले तरी दादांच्या त्या वाक्यात असलेले प्रेम नक्कीच नजरेत भरे.

एकदा माझ्या घरी विजय तेंडुलकर जेवायला आले होते. बोलताना दादांचा विषय निघाला. तुझ्या दादांचा फोटो दाखव असे ते म्हणाले. फार जाडजूड नसलेल्या, बांधेसूद दादांचा हसरा फोटो पाहून तेही खूषच झाले होते.

माझे दादा वयाच्या त्र्याऐंशीव्या वर्षी म्हातारपणामुळे वारले. पण त्यांना त्या वयापर्यंत कधीच ब्लडप्रेशर, मधुमेह असले काही काही नव्हते. ते अगदी चांगल्या तब्येतीचे होते. त्यांना काही झाले आहे हे आम्हाला माहीतच नाही. गोड खाण्याने मधुमेह आहे किंवा तो होईल असे त्यांच्या मनात कधीच आले नाही. एकदा आमच्या ओळखीच्या बाईंकडे त्यांच्या मुलाची मुंज होती. त्यांना दादा चांगले जेवतात हे माहीत होते. आम्हाला जेवायला बोलावले होते. दादा जेवायला बसले होते. आचारी जिलेब्या वाढत आले होते. तशा भरपूर ताटात जिलेब्या उरल्या होत्याच. ते ताट बाईंनी स्वत: घेतले व ''दादा, आता मी वाढते हो तुम्हाला'' असं म्हणाल्या. दादाही म्हणाले, ''एकदाच काय त्या वाढ. मग परत परत यायचे नाही.'' त्या बाईंनी पण त्या ताटांत उरलेल्या सर्व जिलेब्या दादांच्या पानात घातल्या, दादांनीही त्या सर्व खाल्ल्या. रात्री आईला म्हणाले, ''मला फक्त एक ग्लासभर ताक 'हिंग' लावून दे''. ताक प्यायले व झोपले, असाही निर्धार होता. पण त्या जिलब्यांचा इतर काही त्रास त्यांना झाला नाही.

हे सर्व दादांचे किस्से आत्ताच्या काळात सांगणे हे सुद्धा बरोबर नाही. सगळे जण हसतील, नावे ठेवतील. पण हेही एक उत्तम प्रकृतीचे लक्षण आहे. आपण तर खाणेच पण तेवढेच आग्रहाने इतरांना खाऊ घालणे हे उत्तम खिलाडुपणाचे लक्षण आहे. गोड स्वभाव, गोड बोलणे, गोड खाणे, गोड खाऊ घालणे असं त्यांचे गोड-गोड व्यक्तिमत्व होतं.

दादा फार-फार जिद्दीचे होते तशी जिद्द माझ्या अंगात आली असती तर फार बहार झाली असती! ते चौथीपर्यंतच शिकलेले होते. कर्जतला असताना शेजारी शिवणमशीन होते. त्यांच्या मशिनवर बसणे व मशीन चालवणे, दादांना चांगले अवगत झाले होते. पुण्याला आल्यावर एका मारवाडी वह्यांच्या दुकानांत वह्यांचे पुठ्ठे शिवून द्यायच्या कामाला ते लागले. सहा-सात वर्षांत नुसते पुठ्ठेच शिवणे नाही तर तेथील सर्वच कामात लक्ष ठेवून बारकाईने ती सगळी कामे शिकून घेतली. ते सर्व पाहून दादांनी मनात असे ठरवले होते, की आपणही असेच दुकान सुरू करायचे. आजी एके ठिकाणी

पोळ्या करीत असे. कर्जतहून आल्या आल्या त्यांना सर्वांना कामे करणे भागच होते. दादांनी तिला त्यांच्याकडून तीन–चारशे रुपये आणायला सांगितले. जुजबी पण महत्त्वाचे सामान खरेदी केले गेले. अन् घरातच दादांनी 'वह्या करणे' सुरू केले. तयार झालेल्या वह्या एका पिशवीत भरून ते मोठमोठ्या व्यापाऱ्यांकडे जात व आपल्या वह्या विकीत. चार–पाच वर्षे घरात चालू केलेले दुकान वेगळ्या वास्तूत सुरू झाले ते दादांच्या जिद्दीमुळेच. स्वत: नोकर म्हणून सुरुवात झालेल्या या माणसाकडे नंतर पंधरा–वीस नोकर काम करू लागले. हे सर्व जिद्द, मेहनत, कणखरपणा, प्रामाणिकपणा या अंगातील गुणांमुळेच.

आमच्या घरी अनेक नोकर कामाला येत. त्यांना ते वह्या तयार करण्यातले सगळे बारकावे सांगत. एखादा जरासा चुकला तर म्हणत, ''अरे, अशा चुका करायच्या नाहीत. आपली वही व शिवण बघून लोकांनी कौतुक केले पाहिजे, वही फेकली तरी एक पानही सुटता कामा नये अन् अरे, उद्या तू स्वत:चे जर दुकान सुरू केलेस तर हे सर्व तुला माहीत नको का?''

आम्ही चौघी बहिणी व नंतरचा भाऊ. त्यामुळे दादांच्या मदतीसाठी आम्ही पण दुकानात बसत होतो. एकदा मी एक कॉयरची वही पंधरा रुपयांना विकली. दादा जेव्हा आले तेव्हा मी त्यांना विचारले, ''दादा, ह्या वहीची किंमत किती हो?'' त्यांनी सांगितले, ''अकरा रुपये'' ''अरेच्या, अहो मी ती पंधरा रुपयांना विकली.'' आता एखाद्या माणसाला आनंद झाला असता. पण दादा लगेच म्हणाले, ''अगं, हे बरोबर नाही. चुकलीस. आता लक्षात ठेव. पंधरा नाही, अकरा रुपयांना विकायची. त्या अकरा रुपयांत माझे ही चार आणे गृहीत असतात. अकरा रुपयालाच विकायची.'' असा प्रामाणिकपणा त्यांच्या नसानसात भिनला होता. आमची कन्या अपर्णा बोटे न मोजता तोंडानेच बिलाचा आकडा सांगे. दादांना तिचे फार फार कौतुक वाटे!

दादा ब्राह्मण असून व्यवसाय मारवाडी करीत होते. मारवाडी लोक स्वत: पैसा मस्त वसूल करतात. पण पैसा देताना हात आखडता घेतात. ८५–७५ असे बील झाले. तर ते ८० रुपये हातावर ठेवतील. पण अशांना दादा सांगत, ''अरे, ८० रुपये सर्व सामानाचे झाले. वरचे ५ रुपये माझे आहेत. चल, मुलगी आहे दुकानात. आपण घरी जाऊ, खाऊ, चहा पिऊ.'' आमच्या दुकानाजवळच एक चहाचे छोटेसे हॉटेल होते. तिथे मी दिवसभरात पंधरा–वीस वेळातरी 'दोन चहा, दातार' असे सांगत असे. येथे सुद्धा मला कधी दादांच्यात पुणेरीपणा दिसला नाही.

आमच्या दुकानात फक्त लक्ष्मी पूजनाला सबंध वर्षांची विक्री होत असे. त्यामुळे त्याचे काम दिवाळीआधी चार महिने चाले. दादा दिवसभर अन् रात्रीही असे काम करीत की त्यांना स्वप्ने ही वह्यांचीच पडत असावीत. आमचे दुकान व घर जवळजवळ असल्याने कित्येक गिऱ्हाईकांना घरही माहीत झाले होते. दिवाळी जसजशी जवळ येईल. त्यावेळी कित्येकदा दादा पहाटे दचकून उठत. आईला म्हणत, ''बघ गं, कोणीतरी हाका मारीत आहेत. दार वाजले वाटते.'' आई सांगे, ''कोणी नाही हो, तुम्ही दमलात, झोपा.''

एकदा, आमच्या घरी एक जण वही घेऊन आले. इन्कम टॅक्ससाठी त्यांना जुन्या वहीतला एक कागद काढायचा होता. वही उसवणे व परत तशी शिवणे हा दादांच्या हातचा 'मळ'च. पण दादा त्यांना 'नाही म्हणाले.' ते ऐकेनात तर दादांनी सांगितले, ''अरे, तुझी वहीची सर्व पाने काळी झाली आहेत. मी जो कागद घालीन तो त्यांच्यापेक्षा पांढरा शुभ्र अन् नवाकोरा असणार. ते नक्की कळणार. तुला व मलाही शिक्षा होणार. त्यापेक्षा टॅक्स भर, अरे माझे पैसे नको देऊस, पण टॅक्सचे पैसे आधी भर.''

मंडईतले व्यापारी 'ज्ञानेश्वर' नेहमी यायचे. दादांचे काम, वह्या या शिवाय इतर काहीच त्यांना सुचत नाही. हे सर्व घटक त्यांना चांगलेच माहीत होते. ते आले की मला म्हणत, ''अगं, दादा जेव्हा जातील, तेव्हा त्याच्या मानेखाली रोजमेळ ठेव. तो सुखाने 'वर' जाईल.'' त्यांच्या वाक्यावर दादा मनमोकळे हसत.

दादा गेले तेव्हा मला ज्ञानोबांच्या म्हणण्याची आठवण झाली. पण मी ते ठेवू शकले नाही. दादा मात्र नक्कीच तृप्त होते. त्यांचा आत्माही नक्कीच तृप्त असेल, कारण त्यांचा नातू आता दुकानात व्यवहार करतो आहे. अन् मुख्य म्हणजे मुळातच ते मोकळे–ढाकळे होते. हात राखून व्यवहार करणारे नव्हते. सढळ हाताने, सढळ मनाने ते जगत आले होते.

**अनुराधा गांगल**
ए–३, अजिंक्यतारा सोसायटी,
स्वास्तिक पार्क, सीएसटी रोड,
कुर्ला सिग्नल जवळ,
चेंबूर, मुंबई –४०० ०७१

# जनसंवाद

सु.गो. तपस्वी

**जनसंवाद – एक वैचारिक गट आणि त्याची उद्दिष्टे**

जनसंवाद हा एक वैचारिक गट आहे. धर्मनिरपेक्ष आणि पक्षनिरपेक्ष राहून समाजातील शक्तिसामर्थ्य संघटित करणारा, सुसंस्कृत व सक्षम समाजाचे स्वप्न बाळगणारा, संवेदनशील व सत्प्रवृत्त समाजमनाला हाक देणारा आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे संविधानातील लोकशाही मूल्ये केंद्रस्थानी मानणारा. भारताने लोकशाही राजवट जवळ केली, परंतु आजही दृष्टोत्पत्तीस येते ते म्हणजे समाजाची मानसिकता सरंजामशाहीचीच आहे. आपल्या अनेक राजकीय–सामाजिक समस्यांचे मूळ ह्या विरोधाभासातच आहे. प्रस्तुत विचारांतूनच ३ मे, २००९ रोजी 'जनसंवाद' हा वैचारिक गट उदयास आला.

**नजिकची उद्दिष्टे**

जनसंवादच्या नजिकच्या उद्दिष्टांत प्रचार व प्रसारावर भर दिला गेला आहे. त्यानुसार वार्षिक जनजागृती उपक्रमाद्वारे दर वर्षी एखाद्या सामाजिक विषयावर दिवाळी विशेषांकाद्वारे स्पर्धा घेण्यात येते. गेल्या वर्षीचा विषय होता '**सामाजिक मूल्ये**' आणि ह्या वर्षीचा विषय आहे '**सामाजिक बांधिलकी**.'

दुसरा उपक्रम आहे तो गावोगावी चर्चागट स्थापन करण्याचा. ह्या गटांना '**जनसंवाद–मंच**' असे संबोधले जाईल. साधारणत: जवळपास राहणारे, वा सहजी भेटू शकणारे दहा–पंधरा लोक एकत्र येऊन आपापला गट स्थापन करतील व इतर विषयांबरोबर, आळीपाळीने पुढील तीन विषयांवर आपापसात गप्पा मारतील, गटचर्चा साधतील. ते तीन विषय आहेत – लोकशाही व नागरिकत्वाची मूल्ये, सामाजिक बांधिलकी आणि ग्रामीण व नागरी समस्या निवारणार्थ 'घटना'मान्य कार्यक्रमांची रूपरेषा. 'मंचां'तील चर्चा अनौपचारिक असतील. हळूहळू ह्या चर्चांमधून लिखाणाची स्फूर्ती घेऊन, 'स्फुट' लिखाण करून ते स्थानिक दैनिकांत 'विशिष्ट' सदरांत सादर करण्याचा प्रयत्न केला जाईल.

'जनसंवाद–मंचा'चे दोन स्पष्ट हेतू आहेत. पहिला म्हणजे स्थानिक पातळीवर सामाजिक आस्था निर्माण करणे, जे गटा–गटांतील परिचयवृद्धीतून साधले जाईल. निर्माण होणाऱ्या आस्थात्मक घनिष्ट संबंधांतून हळूहळू स्थानिक समस्यांना वाचा फुटेल व जबाबदारी घेऊन त्या समस्यांचे निवारण करण्याची इच्छाशक्ती गावोगावांच्या 'मंचां'त निर्माण होईल. दुसरा हेतू आहे तो म्हणजे, उपरोक्त 'स्फुट'

लेखनाच्या प्रकाशनातून ठिकठिकाणच्या दैनिकांद्वारे जनसंवादच्या विचारांचा प्रचार, प्रसार साधला जाऊन जनजागृती साधण्यास मदत होण्याचा.

महाराष्ट्राबरोबरच इतर राज्यांत असे गट निर्माण होण्यासाठी प्रयत्न सुरू झाले आहेत, अशा तऱ्हेने जनसंवाद थोडाफार देशव्यापी झाल्यानंतर व योग्य ते सदस्य संख्याबल लाभल्यानंतर दूरगामी उद्दिष्टे साधण्याकरता उपक्रम सुरू करता येतील.

**दूरगामी उद्दिष्टे**

जनसंवादची कृती आंदोलनात्मक नसेल व अंगिकारलेले पुढील उपक्रम लोकशाही मार्गाने व्यावसायिकरीत्या राबवले जातील.

- उद्‌बोधनातून (एनलाइटनमेंट) जनजागृती साधून सामाजिक परिवर्तन साधण्यासाठी समाजात अनुकूल मानसिकता निर्माण करणे,
- उद्दिष्टे साधण्यासाठी माध्यमांकडून पुढाकार घेतला जाईल असे वातावरण निर्माण करणे,
- शिक्षणक्षेत्राला प्रभावित करून शालेयशिक्षणात गरजेच्या सुधारणा साधण्यासाठी मानवविज्ञान शाखांतील अभ्यासूंना व विश्वविद्यालयांतील शास्त्रज्ञांना जरूर ते अर्थसाह्य उपलब्ध करून देऊन उपयुक्त संशोधन करण्यास प्रवृत्त करणे. अशा शास्त्रोक्त अभ्यासाची व संशोधनाची उद्दिष्टे आहेत–

– देशभरातील शालेयशिक्षणात समाविष्ट करण्यासाठी योग्य तो समाजशिक्षणाचा अभ्यासक्रम (करिक्युलम) व शिकवण्याच्या पद्धती **(पेडगागी)** ठरवणे, आणि

– विकसित देशांत शालेयशिक्षणात देण्यात येणाऱ्या अभ्यासक्रमांतील योग्य बाबींचा स्वीकार होण्यासाठी शास्त्रशुद्ध प्रयत्न करणे.

- समाजशिक्षणाचा उपरोक्त अभ्यासक्रम, देशभरातील शाळा-कॉलेजांतून सुयोग्य पद्धतीने अंमलात आणण्याकरता शासनाला राजी करवून घेण्यासाठी दबावगट (प्रेशर ग्रूप्स) निर्माण करणे, आणि
- उपरोक्त शैक्षणिक सुधारणा अंमलात आणण्याबाबत उच्च व सर्वोच्च न्यायालयांकडून शासनाला आदेश देणे. तसे आदेश देण्याकरता योग्य परिस्थिती निर्माण व्हावी म्हणून संबंधित कायद्यांचा अभ्यास करून विविध न्यायालयांत 'जनहितयाचिका' प्रविष्ट करणे आणि त्या लवादांत यशस्वी होण्याकरता कायद्यांचा गरजेचा अभ्यास व इतर संशोधन विशेषज्ञांकडून होण्यासाठी प्रयत्न करणे.

**मूल्यांचे विवेचन**

भारतीय समाजात **लोकशाही, नागरिकत्व व सामाजिक बांधिलकी** ही मूल्ये रुजवणे हे जनसंवादचे प्रमुख उद्दिष्ट आहे.

**• लोकशाही**

बऱ्याच जणांची लोकशाहीची कल्पना राज्यव्यवस्थेशी निगडित असते, व ती तेथेच थांबते. लोकशाही हे वैचारिक मूल्य असून प्रत्येक व्यक्तीच्या आयुष्यातील सर्व परिघांत ते व्यक्त होते – कौटुंबिक, व्यावसायिक आणि सामाजिक. सुटीसाठी परगावी जाण्याचे ठिकाण कुटुंबात कोण ठरवते? कार्यालयात एखादी योजना कार्यान्वित करण्यापूर्वी संबंधित लोकांना विचार व्यक्त करण्याची संधी दिली जाते का? एखाद्या रस्त्यावरील रहदारीची समस्या दूर करण्यासाठी तेथील रहिवासी एकत्र येऊन विचारविनिमय करतात का? अशा प्रश्नांतून लोकशाही मूल्यांवर प्रकाश पडावा.

**• सामाजिक बांधिलकी**

समाज छोटा होता तेव्हा लोक एकमेकांना ओळखत होते आणि सामाजिक बांधिलकी जोपासण्यासाठी विशेष प्रयत्न करावा लागत नव्हता. परस्परावलंबन सहज लक्षात यायचे व त्यातूनच आपोआप बांधिलकी निर्माण व्हायची. आजच्या फापटपसाऱ्यात आपले अवलंबन एकास-एक असे नसते. त्यामुळे 'माझा ह्या घटनेशी, त्या व्यक्तीशी संबंध काय' असे म्हणून आपण दूर होतो. खरे तर, बँकेतील कर्मचारी, रेल्वे-बस अशा रहदारीच्या सुविधा पुरवणारे, नगरपालिका देत असलेल्या विविध सेवांचे व्यवस्थापन करणारे, शाळा-कॉलेजांतील शिक्षक व इतर, इस्पितळांतील वैद्यकीय सल्लागार व कर्मचारी, तद्वत प्रशासनातील कोणत्याही खात्यांतील नोकरवर्ग, वगैरे सारी मंडळी परस्परांवर अवलंबून असतात, एकमेकांसाठीच काम करत असतात; पण त्रयस्थपणे. त्या कामात जिव्हाळा नसतो – दुसऱ्या बाजूचा विचार (एम्पथी) केला जात नाही. म्हणून, देणारा तत्पर नसतो आणि लाभार्थींना चांगल्या सेवा देणाऱ्याचे कौतुकही नसते. ह्या कारणांमुळे सर्व गोष्टी जमेल तेवढ्या व **'टाकणं'** टाकल्यासारख्या केल्या जातात. करत असलेल्या कामाचा रास्त अभिमान सहसा अनुभवास येत नाही व कार्यक्षमता क्वचितच नजरेस येते; सर्व कामे होत असतात ती पगारासाठी,

पगारवाढीसाठी आणि उन्नतीसाठी (प्रमोशन).

रस्त्यावर अपघात झाला तर जखमींच्या मदतीसाठी आपण थांबतो का? वयस्क लोकांच्या अडचणी समजून कोणत्या सोयी उपलब्ध केल्या जातात ह्या गोष्टीकडे आपले कधी लक्ष असते का? आपले अपत्य अंध, बहिरे वा मुके नसेल तर अशांच्या शाळांमध्ये आपण रस घेतो का? शेजारच्या गरीब वस्त्यांतील समस्यांचा आपल्याशी काही संबंध असतो का?

परमार्थ म्हणून नव्हे, नीट विचार केला तर दूरगामी स्वार्थासाठी आम्हा साऱ्यांना सामाजिक बांधिलकीचे भान गरजेचे आहे.

**● नागरिकत्व**

उपलब्ध शासकीय-प्रशासकीय व्यवस्थेचा उत्तम फायदा त्याच समाजाला मिळू शकतो; ज्या समाजातील बहुतांश सदस्य चांगले नागरिक असतात. अशा नागरिकांना जशी हक्कांची जाण असते, तद्वत त्यांना त्यांच्या जबाबदारीचेही भान असते. थोडक्यात, नागरिकत्वाच्या मूल्याचे पालन म्हणजे कायद्यांचे पालन! रोजच्या जीवनात निदान चार क्षेत्रांतील कायद्यांचे पालन आपण सर्वांनी मनापासून केले, तर आहे त्या परिस्थितीतही भारतीयांना रोजच्या जीवनात कमालीचे सुख अनुभवास येईल - ती चार क्षेत्रे आहेत रहदारीचे नियम, कचरा व्यवस्थापन व सार्वजनिक स्वच्छता, रांगेची शिस्त आणि वक्तशीरपणा.

**● अपेक्षित समाजपरिवर्तन**

जसजसा जनसंवादच्या विचारांचा प्रसार होईल व लोक उपरोक्त मूल्यांचे महत्त्व ओळखून त्या मूल्यांना आचरणात आणतील तेव्हा विविध व्यवस्थांची परिस्थिती समाधानकारक ठरेल वा लोकांकडून पुढाकार घेतला जाऊन जाणवलेल्या उणिवांचे निराकरण साधले जाईल.

लोकशाहीत शासन-प्रशासनावर अवलंबून राहण्यापेक्षा उपरोक्त मूल्यांचे पालन जास्त जनहित साधेल आणि ते आपल्याच हातात आहे!

प्रस्तुत राज्यव्यापी स्पर्धेत जास्तीत-जास्त संख्येने सहभागी होऊन वाचकांनी प्रतिसाद द्यावा.

स्पर्धेत भाग घ्या. किमान, **'जनसंवाद'**चे सदस्य होऊन विचारांना पाठिंबा देणाऱ्यांचे संख्याबल वाढवा, हेच वाचकांना आवाहन.

**● आपण नाही तर कोण, आत्ता नाही तर केव्हा ●**

ग्रंथाली दिवाळी विशेषांकांच्या प्राथमिक फेरीतून
**'जनसंवाद'**च्या राज्यव्यापी वार्षिक जनजागृती उपक्रमात
सामील व्हा आणि भरघोस पारितोषिके मिळवा!

| **प्रथम** | **द्वितीय** | **तृतीय** |
|---|---|---|
| **रु. ३,०००** | **रु. २,०००** | **रु. १,०००** |

**अनुभवकथन स्पर्धेत भाग घेऊन 'सामाजिक बांधिलकी'** ह्या
विषयावर **'जनसंवाद'**ने राज्यभरात साधलेली
**वैचारिक घुसळण यशस्वी करण्यासाठी**
**'रुची'च्या वाचकांना सुवर्णसंधी!!!**

**आपला प्रतिसाद डिसेंबर २४, २०१० ह्या तारखेपर्यंत पोचला पाहिजे.**

आमचे प्रकाशन, लाभलेल्या पात्र प्रतिसादातून **'जनसंवाद'**च्या राज्यव्यापी अंतिम फेरीसाठी निवड करेल.

**अंतिम फेरीसाठी निवड झालेल्या सर्व स्पर्धकांना उत्तेजनाप्रीत्यर्थ रुपये १००/- जनसंवादतर्फे देण्यात येतील.**

**पत्रव्यवहाराचा**
**पत्ता:** ग्रंथाली, टोपीवाला लेन म्युनिसिपल स्कूल, पहिला मजला, डॉ. भडकमकर रोड पोलिस स्टेशनसमोर, ग्रँटरोड, मुंबई-४०००००७

**स्पर्धकांसाठी निवेदन**

स्पर्धेसंबंधातील संपूर्ण मजकूर आपापल्या दिवाळी विशेषांकात प्रसिद्ध करून राज्यातील अनेक प्रकाशने **'जनसंवाद'**च्या वार्षिक जनजागृती उपक्रमात सहभागी होत आहेत. सामाजिक जाणीवजागृती साधताना राज्यभरातील वाचकांना विचार प्रकटनाची सुयोग्य संधी उपलब्ध करून देणे, ठिकठिकाणच्या विचारांची व्यापक देवाण-घेवाण साधणे, काटेकोर नियोजन व वेळापत्रक, सर्वंकष प्रतिनिधित्व साधलेले राज्यव्यापी परीक्षक मंडळ आणि पारदर्शकता ही **'जनसंवाद'**च्या स्पर्धेची वैशिष्ट्ये आहेत. गेल्या स्पर्धेतून राज्यभरात लाभलेली विश्वासार्हता वृद्धिंगत करणे हेच प्रस्तुत स्पर्धेत **'जनसंवाद'**चे लक्ष्य असेल.

**(१) स्पर्धा नियम**

(१.१) **'सामाजिक बांधिलकी'** ह्या विषयावर प्रकाश टाकणारे, सामाजिक मानसिकतेचे पैलू खुलवणारे व लोकशाही मूल्याची दखल घेणारे एक **'नमुना'** अनुभवकथन, **श्रीनिवास टॉवर्स** ह्या शीर्षकाखाली पुढील मजकुरात समाविष्ट केले आहे. स्पर्धा लिखाणाचे स्वरूप नमुना म्हणून दिलेल्या त्या अनुभवकथनातून व्यक्त होईल.

(१.२) अनुभवकथनाचा (केस-स्टडी) मुख्य उद्देश असतो तो म्हणजे प्रत्यक्ष उदाहरणाचा दाखला देऊन मुद्दा पटवणे. 'पुढच्यास ठेच, मागचा शहाणा' ह्या वाक्प्रचारानुसार माणूस दुसऱ्याच्या अनुभवातून शिकतो, शहाणा होतो. प्रस्तुत मानवी स्वभावाला जमेस धरून समाजात सुयोग्य वर्तणूक साधण्यासाठी बोधामृतापेक्षा अनुभवकथन जास्त उपयुक्त ठरते, प्रौढांकरिता तर निश्चितच! एखाद्या घटनेच्या अनुभवकथनातून विचारांना चालना दिली जाते. जोडीला, त्या कथनात समर्पक विवेचन साधले गेले तर त्या विचारांना दिशा देखील लाभते. **'सामाजिक बांधिलकी'**ला अनेक पैलू असतात; समाजातील बऱ्या-वाईट वागणुकीतून ते दृष्टोत्पत्तीस येतात - समाजात कसे वागावे, कसे वागू नये ह्या गोष्टींचा उलगडा होतो. स्पर्धकांच्या अनुभवकथनातून **'सामाजिक बांधिलकी'**चा असा एखादा पैलू स्पष्ट झाला पाहिजे.

(१.३) स्पर्धा सर्वांना खुली आहे. पात्रतेसाठी कोणतीही अट नाही. स्पर्धेत भाग घेण्यासाठी वाचकांनी सहभागी झालेल्या कोणत्याही, पण फक्त एकाच, प्रकाशनाकडे आपला प्रतिसाद पाठवावा. एकापेक्षा जास्त प्रकाशनांकडे प्रतिसाद पाठवल्याचे नजरेस आल्यास तो स्पर्धक त्या वेळेपासून स्पर्धेतून बाद ठरवला जाईल.

(१.४) अनुभवकथनाची **शब्दसंख्या पाचशे ते सहाशेपर्यंत मर्यादित** असावी; शब्दमर्यादेबाहेरची अनुभवकथने स्पर्धेतून बाद ठरवली जाऊ शकतात.

(१.५) स्पर्धकांचे प्रतिसाद निवडलेल्या प्रकाशनाकडे **२४ डिसेंबर,२०१० ह्या अंतिम तारखेपूर्वी** चौकटीत दिलेल्या पत्रव्यवहाराच्या पत्त्यावर पोचले पाहिजेत. अंतिम तारखेनंतर लाभलेल्या प्रतिसादाची दखल घेण्यास ते ते प्रकाशन व **'जनसंवाद'** जबाबदार राहणार नाहीत.

(१.६) स्पर्धेत वैयक्तिक वा संयुक्तपणे - गट स्थापन करून - सहभागी होता येईल. गटांची उदाहरणे म्हणजे - एखादे मित्रमंडळ, ज्येष्ठ नागरिक संघाचे सदस्य पती-पत्नी, कुटुंब, बहीणभाऊ, वगैरे. संयुक्तपणे - गट स्थापन करून - सहभाग साधला तर त्या त्या गटाला एक गटप्रमुख नेमावा लागेल; सर्व व्यवहार त्या गटप्रमुखाबरोबर व त्याच्या नावाने केले जातील. विजयी (उत्तेजनार्थ व अंतिम फेरी) ठरलेल्या गटासाठी पारितोषिकाचा धनादेश गटप्रमुखाच्या नावाने काढला जाईल; गटांमधील सदस्यांमध्ये रकमेची विभागणी करण्याबाबत संयोजक कोणतीही जबाबदारी घेणार नाहीत.

(१.७) वाचकांच्या प्रतिसादात दोन भाग असतील. पहिला भाग असेल तो स्पर्धकाची वैयक्तिक माहिती (नाव, वय, व्यवसाय, पत्ता, ई-मेल आयडी व दूरध्वनी क्रमांक) आणि **'जनसंवाद'**चे सदस्य व्हायचे असल्यास तसा उल्लेख सुद्धा पहिल्या भागात करावा; दुसरा भाग म्हणजे अनुभवकथन.

(१.८) संयुक्तपणे - गट स्थापून - सहभागी होणाऱ्या गटांमध्ये दोन ते पाच सदस्य असू शकतील; म्हणजे पाच ही कमाल गटसंख्या असावी अशी अट आहे. गटसदस्यांनी एक सामाईक अनुभवकथन करायचे आहे, परंतु वैयक्तिक माहिती मात्र प्रत्येक गटसदस्याची द्यायची आहे.

(१.९) **प्रत्येक स्पर्धकाने (वैयक्तिक वा संयुक्त) संपूर्ण प्रतिसादाच्या दोन प्रती त्याने निवडलेल्या प्रकाशनाकडे पाठवायच्या आहेत.** एक प्रत प्राथमिक फेरीसाठी, जी प्रत ते ते प्रकाशन स्वत:कडे ठेवेल. दुसरी प्रत ते प्रकाशन अंतिम फेरीतील मूल्यांकनासाठी **'जनसंवाद'**कडे पाठवेल.

(१.१०) लिखाण कागदाच्या एका बाजूला (पाठपोट नको) व्यवस्थित मार्जिन सोडून केलेले असावे, कोणतीही खाडाखोड नसावी आणि ते लिखाण प्रती काढण्यालायक असावे (पुसट नसावे). लिखाण काळ्या रंगात टंकलिखित केलेले असावे; ते शक्य नसल्यास काळ्या रंगाचे बॉलपॉईंट पेन वापरावे. कोणत्याही कारणामुळे लिखाण सुलभरीत्या व पूर्णपणे व्यवस्थितरीत्या वाचता आले नाही तर परीक्षकांकडून होणाऱ्या मूल्यांकनावर अनिष्ट परिणाम होऊ शकतो, हे स्पर्धकांनी ध्यानात घ्यावे; अशा परिणामांना प्रकाशन व **'जनसंवाद'** जबाबदार राहणार नाही.

(१.११) प्रकाशनांकडून **'जनसंवाद'**कडे पोचलेल्या प्रतिसादांमधून, अंतिम फेरीसाठी पात्र ठरलेल्या (स्पष्टीकरणासाठी परिच्छेद क्रमांक (२) मधील मजकूर बघा) अनुभवकथनाच्या प्रती काढून **'जनसंवाद'** त्या प्रती परीक्षक मंडळातील प्रत्येक सदस्याकडे पाठवेल; त्या प्रतींवर प्रकाशक व स्पर्धकाचे नाव नसेल.

(१.१२) वाचकांबरोबरचा संपर्क व पत्रव्यवहार, प्राथमिक फेरीतील मूल्यांकन, अंतिम फेरीसाठी पात्र ठरलेल्या स्पर्धकांची घोषणा, उत्तेजनार्थ द्यायच्या धनादेशांचे वितरण, उपस्थित झालेले मुद्दे व त्यांचे निराकरण, वगैरे गोष्टींच्या अंमलबजावणीसाठी ते ते प्रकाशन जबाबदार राहील. प्राथमिक फेरीत लावायचे निकष व निर्णयप्रक्रियेबाबत सर्व हक्क संबंधित प्रकाशनाकडे राहतील आणि त्या त्या प्रकाशनाचे निकष व निष्कर्ष अंतिम मानले जातील; त्या संदर्भात **'जनसंवाद'** कोणताही पुढाकार घेणार नाही वा ढवळाढवळही करणार नाही. उपरोक्त सर्व व्यवहार काटेकोर व

पारदर्शकपणे करण्याची जबाबदारी त्या त्या प्रकाशनाची राहील.

(१.१३) **‘जनसंवाद’**ने उपक्रमाचे नियोजन करण्यासाठी **‘रुची’** व **‘मिळून साऱ्या जणी’** ह्या मासिकांच्या प्रकाशनांचे साहाय्य घेतले आहे व संपूर्ण उपक्रमावर व्यवस्थापकीय नियंत्रण राखण्यासाठी स्पर्धासमिती नियुक्त केली आहे; स्पर्धासमितीच्या अध्यक्षा आहेत विद्या बाळ व इतर सदस्य आहेत सुदेश हिंगलासपूरकर, राज्यश्री क्षीरसागर व सु. गो. तपस्वी. प्रस्तुत स्पर्धासमिती सर्व व्यवस्थापन व निर्णयप्रक्रिया लोकशाही मार्गाने साधेल आणि **‘जनसंवाद’**च्या सल्लागार समितीला जबाबदार राहील. उपक्रमासंबंधित वाद्य मुद्यांवर सल्लागार समितीच्या सल्ल्यानुसार गरजेचे निर्णय घेतले जातील. स्पर्धासमितीने साधलेले सर्व बदल, लावलेले निकष व घेतलेले निर्णय सर्व संबंधितांवर बंधनकारक असतील.

**(२) मूल्यांकन प्रक्रिया व पारितोषिके**

(२.१) राज्यव्यापी स्पर्धेतील प्राथमिक फेरीत प्रत्येक प्रकाशनाने किमान एक व कमाल तीन स्पर्धक निवडायचे आहेत. त्यासाठी प्रत्येक प्रकाशकाकडे आलेली प्रतिसादांची संख्या हा निकष लावला जाईल; दहापर्यंत – १, दहा ते वीस – २, आणि वीसच्या पुढे – ३; म्हणजे कमाल तीन. प्रत्येक प्रकाशन स्वत:कडे आलेल्या प्रतिसादांचे मूल्यांकन करून निवडक स्पर्धकांना पात्र ठरवेल आणि त्यानंतर अंतिम फेरीसाठी निवडलेल्या स्पर्धकांची नावे तो तो प्रकाशक **‘जनसंवाद’**च्या समन्वयकाकडे पाठवेल.

(२.२) राज्य पातळीवरील अंतिम फेरीसाठी साधारणत: चाळीस स्पर्धक ही कमाल मर्यादा राहील.

(२.३) परिच्छेद (२.१) मधील पद्धतीने प्रकाशनांनी निवडलेल्या स्पर्धकांची संख्या चाळीसच्या फार पलीकडे गेल्यास **‘जनसंवाद’**ची स्पर्धासमिती, ती फेरी उपान्त्य मानून प्रकाशनांनी निवडलेल्या सर्व स्पर्धकांच्या लिखाणाचे मूल्यांकन करेल व चाळीसच्या आसपास स्पर्धक अंतिम फेरीसाठी पात्र ठरवेल.

(२.४) अंतिम फेरीसाठी **‘जनसंवाद’**तर्फे पात्र ठरलेल्या सर्व (चाळीसच्या आसपास) स्पर्धकांना **उत्तेजनार्थ रुपये १००/– चे पारितोषिक देण्यात येईल.** प्रत्येक प्रकाशनातर्फे द्यावयाच्या तशा उत्तेजनपर पारितोषिकांप्रीत्यर्थ होणाऱ्या **खर्चाची भरपाई म्हणून त्याप्रीत्यर्थ झालेल्या खर्चाइतक्या रकमेचा धनादेश ‘जनसंवाद’ त्या त्या प्रकाशनाकडे पाठवेल.**

(२.५) **‘जनसंवाद’** स्पर्धकांच्या लिखाणाला, स्पर्धकांना व संबंधित प्रकाशनांना प्रसिद्धी देण्याकरता अंतिम फेरीसाठी निवडलेल्या (चाळीसेक) स्पर्धकांच्या लिखाणाचे संपादन करून एक पुस्तक प्रकाशित करण्याचा विचार करते आहे; त्यासाठी योग्य प्रकाशकाबरोबर बोलणी सुरू आहेत.

(२.६) **‘जनसंवाद’तर्फे राज्यव्यापी अंतिम फेरीत तीन पारितोषिके (• प्रथम: रु. ३,००० • द्वितीय: रु. २,००० • तृतीय: रु. १,०००) आणि प्रशस्तीपत्रके दिली जातील.**

(२.७) अंतिम फेरीतील मूल्यांकन करण्यासाठी गेल्या वर्षीच्या स्पर्धेसारखेच तज्ज्ञ विचारवंतांचे एक परीक्षक मंडळ नेमण्यात येईल. प्रस्तुत परीक्षक मंडळात विविध क्षेत्रांत कार्यरत असणाऱ्या अनुभवी व्यक्तींचा समावेश असेल. **‘जनसंवाद’**ने विभागीय प्रतिनिधित्व साधण्यासाठी विविध जिल्ह्यांतून राज्यातील तीस नामवंतांना परीक्षक म्हणून निमंत्रित केले आहे. अनुमती दिलेल्या सर्व निमंत्रित व्यक्ती परीक्षक मंडळावर सदस्य म्हणून काम बघतील. मात्र, ही खबरदारी घेतली जाईल, की अंतिम मूल्यांकनासाठी परीक्षक मंडळात किमान पाच सदस्य (त्या पाच सदस्यांत दोन महिला) उपलब्ध आहेत. **‘जनसंवाद’**तर्फे सु. गो. तपस्वी हे प्रस्तुत परीक्षक मंडळावर सदस्य ह्या नात्याने समन्वयकाचे काम बघतील.

(२.८) परीक्षक मंडळांच्या प्रत्येक सदस्याने केलेल्या वैयक्तिक मूल्यांकनाद्वारे दिलेल्या गुणांच्या बेरजेनुसार, **‘जनसंवाद’**ची स्पर्धासमिती अंतिम फेरीतील विजेते ठरवेल. परीक्षक मंडळातील प्रत्येक सदस्याचे गुणांकन व **‘जनसंवाद’** स्पर्धासमितीचे निर्णय वादातीत मानले जातील आणि सर्व संबंधितांना बंधनकारक राहतील.

**(३) जबाबदारी व हक्क**

(३.१) कोणत्याही स्पर्धकाने कोणत्याही प्रकाशनाकडे पाठवलेल्या अनुभवकथनाचे सर्व अधिकार (कॉपीराइटस्) **‘जनसंवाद’**कडे राहतील.

(३.२) प्राथमिक फेरीतील सर्व बाबी, निकष व निष्कर्ष ते ते प्रकाशन ठरवेल व ते अंतिम मानले जातील आणि संबंधितांवर बंधनकारक राहतील.

(३.३) **‘जनसंवाद’**ची स्पर्धा समिती राज्यपातळीवरील अंतिम फेरीतील मूल्यांकन करण्यासाठी एक परीक्षक मंडळ नियुक्त करेल. काळजी घेतली जाईल, की त्यातील कोणत्याही सदस्याचे स्पर्धेत सहभागी झालेल्या दिवाळी विशेषांकांच्या कोणत्याही प्रकाशनाशी थेट संबंध नाहीत.

(३.४) परीक्षक मंडळातील कोणत्याही सदस्याबरोबर त्या त्या सदस्याने केलेल्या मूल्यांकनासंबंधात कोणाकडून व कोणत्याही प्रकारची चौकशी वा चर्चा केली जाणार नाही अथवा स्पष्टीकरण

मागितले जाणार नाही; प्रत्येक सदस्याचे मूल्यांकन अंतिम मानले जाईल व सर्व संबंधितांवर बंधनकारक राहील.

### नमुना अनुभवकथन

## *श्रीनिवास टॉवर्स*

**लेखक – सु. गो. तपस्वी**

दहा वर्षांपूर्वी ब्रिगेडिअर जगताप मुंबईतील एका सोसायटीत राहायला आले तेव्हा पहिल्या टॉवरमध्ये दोन-चार कुटुंबांचंच वास्तव्य होतं आणि दुसऱ्या टॉवरचं तर बांधकामही पूर्ण झालं नव्हतं. जगतापांना घरी अण्णा म्हणायचे; म्हणून सोसायटीचेही ते अण्णाच झाले! वीस मजल्यांचा एक टॉवर, प्रत्येक मजल्यावर दोन फ्लॅटस्; म्हणजे चाळीस बिऱ्हाडं! त्यामुळे, पुढेही अण्णांचं येणं-जाणं त्यांच्या राहत्या टॉवरपुरतंच मर्यादित राहिलं; साहजिकच टॉवर ङ्कएङ्खमधील मंडळींना अण्णांबद्दल जास्त आपुलकी होती.

मिलिटरीतील अनुभवामुळे असेल, पण अण्णा खूप सोशल होते. कधी क्रिकेटची मॅच तर कधी कोणाचा वाढदिवस, ह्या ना त्या कारणानं अण्णा ङ्कएङ्ख टॉवरच्या कुटुंबांना बोलवायचे व त्यांच्याही घरी जायचे; ती पद्धत मग 'ए' टॉवरमध्ये रुळत गेली. जात-येत राहण्यानं आपापसातील परिचय वाढला, जिव्हाळा निर्माण झाला; एक-दुसऱ्याला मदत करणं नेहमीचंच झालं!

टॉवर 'बी'मध्ये असे कोणी अण्णा नव्हते. सोसायटी जरी एकच होती, माणसं जरी त्याच समाजातील आणि एकाच आर्थिक स्तरातील होती तरी टॉवर 'ए'सारखा आपापसातील जिव्हाळा टॉवर 'बी'मधील रहिवाशांमध्ये निर्माण झाला नाही. ते लोक मुंबईतील बऱ्याच इतर सोसायट्यांसारखे 'हाय-हॅलो'च्याच ओळख-पातळीवर राहिले.

दोन्ही टॉवर्सचं व्यवस्थापन एकच मॅनेजिंग कमिटी बघायची. खरं तर, चेअरमन आणि सेक्रेटरी हेच सारी जबाबदारी निभावायचे. शंभरेक कुटुंबांचं एवढं मोठं खटलं, म्हणून रोजच्या कामासाठी एक मॅनेजर मात्र नेमला होता. तो सकाळी दहा ते संध्याकाळी सहापर्यंत असायचा. एरवी, सोसायटीच्या ऑफिसच्या बाहेर एक नोटिस बोर्ड होता. नोटिस बोर्डावर कंत्राटदारांची नावं, पत्ते, फोन नंबर सर्वांना उपलब्ध असायचे.

सोसायटीचं नाव होतं श्रीनिवास टॉवर्स. पुढील घटना त्याच सोसायटीतील. ती इथं सांगण्याचा माझा हेतू मात्र वेगळाच आहे.

एका सकाळी काय झालं, की सहाच्या सुमारास साऱ्या लिफ्ट्स बंद पडल्या. टॉवर 'ए'मधील मंडळी म्हणाली, 'अरे, आपल्या लिफ्ट्स बंद पडल्या' आणि 'बी' टॉवरमधील जनतेची प्रतिक्रिया होती, 'सोसायटीच्या लिफ्ट्स बंद पडल्या!' एकच घटना, पण दोन टॉवर्समधील मानसिकतेतील फरक बघा.

मनातील भावनेप्रमाणे कोणाला काय वाटतं, ते त्या त्या माणसाच्या शब्दप्रयोगातून व्यक्त होत असतं आणि तसं वाटणंच व्यक्तीच्या त्यानंतरच्या वागण्याला कारण ठरत असतं. मात्र, प्रत्येक परिस्थितीत कोणाला काय वाटतं, हे ज्याच्या त्याच्या सामाजिक मानसिकतेवर अवलंबून असतं.

'आपलं' वाटलं, समस्या आपलीच वाटली म्हणून 'ए' टॉवरमधील कोणीतरी खाली गेलं, नोटिस बोर्डावरील टेलिफोन नंबर शोधून त्या व्यक्तीनं इलेक्ट्रिशियअनला फोन करून बोलावलं. टॉवर 'ए'च्या लिफ्ट्स ताबडतोब सुरू करून इलेक्ट्रिशिअन गेला. त्याला वाटलं होतं की टॉवर 'ए'मधल्या माणसानं फोन केला म्हणजे फक्त टॉवर 'ए'च्याच लिफ्टस् बंद पडल्या असणार!

टॉवर 'बी'मधील जनतेची धारणा मात्र अशी होती की लिफ्ट्स सोसायटीच्या त्यामुळे जबाबदारी मॅनेजिंग कमिटीची. त्या भावनेनुसार त्यांच्या लिफ्ट्सही सुरू झाल्या, पण दहा वाजल्यानंतर; 'मॅनेजर' आल्यानंतर!

प्रस्तुत घटनेची नोंद घेतली गेली अन् बोलबाला झाला, की चेअरमन 'ए'मध्ये राहत होता म्हणून 'ए' टॉवरच्या अडचणीला प्राधान्य दिलं गेलं.

जनरल बॉडी मीटिंगमध्ये उपरोक्त घटनेवर खडाजंगी झाली. त्यावेळी नजरेस आणून दिलं गेलं, की बिचारा चेअरमन त्या दिवशी मुंबईत नव्हताच आणि सेक्रेटरी त्या सुमारास दोन-तीन दिवस हॉस्पिटलमध्ये होता. संपूर्ण खुलाशानंतर प्रकरण मिटलं, आणि जो तो आपापल्या व्यवहारात दंग झाला. सारेच ती घटना विसरून गेले!

सोयीसाठी कामाचं विभाजन आणि त्यानुसार वैयक्तिक जबाबदारीची जाण हे व्यवस्थापनशास्त्रातील तत्त्व समाजबांधणीसाठीही महत्त्वाचं असतं. ते तत्त्व रोजच्या


व्यवहारांत पाळलं गेलंच पाहिजे. व्यवस्थापनशास्त्रानुसारच, हाताखालच्या माणसाकडून जबाबदारी पेलली गेली नाही तर खात्याचा प्रमुख हात झटकू शकत नाही. लोकशाही समाजातील वागणं देखील असंच असलं पाहिजे. घटकांनीच निवडून दिलेल्या नेतृत्वाकडून दुर्लक्ष झालं वा त्याला काही कारणानं जबाबदारी पेलता आली नाही तर त्रयस्थाच्या भूमिकेतून घटकांचं हात झटकणं बेफिकिरीचंच ठरेल. तशा वागणुकीतून स्वत:चंच नुकसान होतं, हे आम्ही लक्षात घेतलं पाहिजे.

समाजाच्या समस्या ह्या फक्त निवडून दिलेल्या नेतृत्वाची जबाबदारी मानून समाजात त्रयस्थासारखं अलिप्तपणानं राहिलं तर नुकसान आपलंच होत असतं. वैयक्तिक व सामाईक जबाबदारीतील हा विरोधाभास, खरं तर सूक्ष्म फरक, लोकशाही समाजातील 'सामाजिक बांधिलकी'तून स्पष्ट होतो. श्रीनिवास टॉवर्समधील उपरोक्त घटना हेच तत्त्व दर्शवून देते.

'मी स्वत: व माझं कुटुंब एवढीच माझी जबाबदारी', असं मानून चालत नसतं. माणूस जंगली होता तेव्हा तो तसं वागायचा. माणूस आणि जनावर ह्यांतील हा फरक आपण विसरत चाललो आहोत की काय? मानवीउत्क्रांती होताना गरजेतून समाज निर्माण झाला, समाजसंस्कृती उदयास आली आणि त्याला कारण होतं परस्परावलंबन; तोच समाजबांधणीचा स्थायिभाव असला पाहिजे.

समाजातील साऱ्याच व्यक्ती एकमेकांवर अवलंबून असतात. 'सर्व ठीक असतं तेव्हा स्वत:त मशगुल आणि फक्त अडचणीतच इतरांची आठवण' असं समाजात वागून चालत नाही. कोणत्याही समाजात परस्परावलंबनाची भावना आपलेपणातूनच निर्माण होते; तो आपलेपणा निर्माण होण्यासाठी मात्र प्रयत्न झाले पाहिजेत. सामाजिक बांधिलकी म्हणजे तरी काय, ही आपुलकीची भावनाच ना?

**सु.गो. तपस्वी**
ए-३/१९, मीनल गार्डन्स, पटवर्धनबाग,
एरंडवणे, पुणे-४११००४
भ्रमणध्वनी - ९७६६१५२२५३
suhas@fandsindia.com




# विकासाची रूपरेषा - परिसंवादांच्या अनुभवातून
**सु.गो. तपस्वी**

अज्ञान व अंधश्रध्दानिर्मूलनातून (एनलाइटमेंट) समाजाला विकासाभिमुख करत, समतेचं शिक्षण देत देश विकसित करण्याकरता समाजशास्त्रज्ञांनी, सामाजिक नेतृत्वानं पुढे यायला पाहिजे, अन् तेही बाह्या सरसावून! मूल्यशिक्षणाची आवश्यकता प्रतिपादन करणारे हे विचार.

**मूल्य ३०० रु. सवलतीत १८० रु.**

**दिवाळीच्या हार्दिक शुभेच्छा !**



# आदिती ज्युस सेंटर

**साऊथ इंडियन डिशेस, सॅण्डविचेस,**
**फ्रँकी, पिझ्झा, ज्युस,**
**आदिती स्पेशल फालुदा**

शॉप नं. १, अलंकार शॉपिंग सेंटर
फोर लिमिटेड बस स्टॉपजवळ,
एस.व्ही. रोड, अंधेरी (पश्चिम)
मुंबई-४०० ०५८
फोन : २६२८६९८२
aaditifastfood@gmail.com

# सरकारी खिचडी

## सुभाष सुंठणकर

अभ्यासपूर्ण लिखाण करण्यात राम गोदे यांचा हातखंडा होता. 'मनन चिंतन' या वैचारिक मासिकातून ते सतत लेखन करत. एखाद्या विषयावर ते निबंध म्हणण्यापेक्षा प्रबंध लिहिताना त्या विषयाचा सर्वांगीण अभ्यास करत. सरकारच्या शाळाविषयक एका विषयावर त्यांनी प्रबंध हाती घेतला होता. सरकारने मध्यान्ह आहार योजनेखाली शाळेच्या मुलामुलींना दुपारच्या खाण्यासाठी खिचडी देण्याचे काम हाती घेतले होते. याबाबतच्या प्रबंधाचा अभ्यास म्हणून निरनिराळ्या व्यक्तींना भेटण्याचे काम राम गोदे यांनी सुरू केले. प्रथम त्यांनी सरकारी योजनेची माहिती मिळवली व ते 'आदर्श विद्यालयात' गेले. तेथे त्यांनी कदम नावाच्या एका ओळखीच्या शिक्षकाला गाठले. गोदे आणि कदम तेथेच एका रिकाम्या खोलीत बसले. मुलांना खिचडी देण्याचे काम कसे काय चालू आहे, खिचडी कोण तयार करते वगैरे चौकशी त्यांनी सुरू करताच कदम म्हणाले,

''त्याची एक मज्जाच झाली बघा. सरकारनं योजना जाहीर करताच एकदम सात–आठ जणांनी हेडमास्तरांकडे गर्दी केली बघा. तीन–चार हॉटेलवाले आले. आपण रोज खिचडी करून देतो म्हणाले. लग्नांची कॉन्ट्रॅक्टस् घेणारे एक–दोन केटरर्स आले. ते खिचडी द्यायला तयार. एक सेवानिवृत्त पोलिस इन्स्पेक्टर आला तो म्हणाला, आपण फर्स्ट क्लास खिचडी करतो. पोलिस स्टेशनात पूर्वी नेहमी करत होतो. तो तयार झाला.''

''मग शेवटी हेडमास्तरांनी कुणाला निवडला?''

''आमचा हेडमास्तर अगदी पक्का. तो हॉटेलवाल्यांना आणि पोलिस इनस्पेटरला कसली दाद देतोय? त्यांनी लग्नसमारंभचा एक केटरर पकडला. का पकडला असेल सांगा?''

''काही कल्पना नाही बुवा.''

''तीच खरी मज्जा आहे बघा. अहो, हेडमास्तराच्या मुलीचं लग्न ठरलंय. तो एका दगडात दोन पक्षी मारणार. इकडे त्या केटररला शाळेचं खिचडीचं कॉन्ट्रॅक्ट देणार आणि मुलीच्या लग्नात त्यालाच जेवणाचं कॉन्ट्रॅक्ट देऊन लग्न स्वस्तात उरकून टाकणार.''

''मग त्याला दिलं का ते काम?''

''खरी मज्जा सरकारने केली. त्यांनी ही योजनाच बदलली. खिचडीसाठी शाळेनं कुणालाही नेमायचं नाही तर सरकारच शाळेला खिचडी पुरवणार असा फतवा निघाला. म्हणजे सरकार काय करणार होतं, माहीत आहे?''

''काय?''

''सरकार शहरातल्या सर्व शाळांचं कॉन्ट्रॅक्ट एकाच हॉटेलवाल्याला देणार होतं. हजारो विद्यार्थी. मग सरकारी अधिकाऱ्यांची चंगळ. हॉटेलवाल्याकडून त्यांना प्रचंड घबाड मिळणार. पण घोडं लंगडलं.''

''म्हणजे सरकारनं बदल केला ना? याचं कारण काय?''

''आता एक हॉटेलवाला शहरातल्या सर्व शाळांना खिचडीचे मोठे डबे देत देत जाणार. म्हणजे काही शाळांना गरम खिचडी. काही शाळांना थंड. शिवाय, कधी खिचडी बिघडली तर सर्वच शाळांना–म्हणजे मुलांना–सक्तीचा उपवास नाही का?''

''बरोबर! मग ते काम आता शाळेकडेच आलंय ना? म्हणजे सरकारनं खिचडी देण्याऐवजी शाळेनं तिथंच स्वैपाकी लावून खिचडी बनवायची, असंच ना? ती योजना कशी काय चाललीय?''

''ठीक चाललीय म्हणायची. सुरुवातीला सर्वच हेडमास्तरांना फार त्रास झाला. आधी या योजनेत सामील होण्यासाठी बारा पानी फॉर्म भरून सरकारला सादर करा...''

''बारा पानी फॉर्म?'' गोदे चकित झाले.

''नाना तऱ्हेचे प्रश्न होते त्या फॉर्ममध्ये. शाळेत विद्यार्थी किती, रोज हजर राहणारे किती, खिचडी न खाणारे किती, स्वैपाकी कोण नेमणार, तांदूळ, डाळ, तेल वगैरे कुठून विकत घेणार, शिजवण्यासाठी भांडी आहेत काय, खिचडी उरली तर काय करणार, मधल्या सुटीत सर्वांची खिचडी खाऊन होते काय... नाना प्रश्न बघा. हे सगळे फॉर्म सँक्शन व्हायला खूप वेळ लागायचा. मग त्या सरकारी क्लार्कला शर्टपीस नेऊन दिला, की योजना सँक्शन व्हायची. त्या क्लार्कच्या बायकोचं, शर्टपीस आणि ब्लाऊजपीसचं बाजारपेठेत एक दुकान आहे.''

''अस्सं! बरं पुढे?''

''स्वैंपाकासाठी स्टेनलेसचीच भांडी वापरली पाहिजेत असा फतवा सरकारनं काढला. काही शाळांनी अलिमीनची भांडी...''

''अल्युमिनियम''

''हां, तेच. अलिमीनची भांडी घेतली होती, ती परत करायला लावली. पुन्हा स्टील भांडी घ्यायला लावली. स्वैंपाकासाठी स्वतंत्र खोली आहे की नाही ती पाहणी केली. काही शाळांत वर्गातच खिचडी शिजवणार होते. त्यांना व्हरांड्यात पत्र्याची खोली करायला लावली. धूर वर्गात शिरू नये म्हणून पाहणी केली. पाण्याची पिंपं विकत घ्यायला लावली.''

''सध्या खिचडी योजना चांगली चालली आहे ना?''

''चांगली चालले बघा.''

राम गोदेंनी विचार केला. सगळीच माहिती शिक्षकाकडून काढून मिळणार नाही. काही पालकांकडून, मुलांकडून, प्यूनकडून माहिती मिळवली पाहिजे. मग ते तेथून उठले.

त्यांच्या घराच्या शेजारी गोपाळ नावाचा एक प्यून राहत होता. तो उपनगरातील एका शाळेत काम करत होता. गोपाळला गोदेंनी आपल्या घरी बोलावले. त्याला आपल्या खोलीत नेले. सहज गप्पा मारतमारत त्यांनी खिचडी योजनेचा विषय काढला. गोपाळ म्हणाला,

''आमच्या साळेत तर त्यो माणगावकर लई गमजा करताय. आता खिचडी प्रोगरॅमसाठी सर्कारनी पैशे सँक्शन केलेत की न्हाई? केलेत! हा माणगावकर मास्तर गमजाच करताय. ह्यो पालकांकडून सुद्धा पैशे गोळा करताय...''

''पालकांकडून?'' गोदे एकेक नवलच ऐकत होते.

''हां, ह्यो पालकांना काय सांगताय. सर्कार म्हणे अर्धेच पैशे देतेय. अर्धे पैशे म्हणे पालकांनी घालायचे. ह्यो असे पैशे गोळा करताय. आणि ह्या माणगावकरांनी पावतीबुकं मी छापून घेतलेत. खोटी पावतीबुकं. पैशे घेतले की ह्यो पालकांस्नी पावती देताय. पावतीवर वरती सर्कारचं नाव, शिक्षण खाते आणि कारण खिचडीचे पैशे. आसं लिव्हलंय. लई गमजा.''

''अस्सं?''

''आणि ह्यो माणगावकर काय करताय, शाळेत शंभर मुलं असताना आहार योजनेच्या फॉर्मवर ह्यांनी दीडशे दाखवलेत. तांदूळ, डाळ, तेल, कांदे..सगळं दीडशेचा कोटा सँक्शन करून घेतलाय. शाळेला दीडशे मुलांच्या आहाराचे पैशे मिळतात आणि शाळेत खिचडी करताना मातर ह्यो नव्वद मुलांचीच करताय. रोज आट धा मुलं आपसेंट तरी असत्यात न्हाईतर नव्वदाची खिचडी शंबराला पुरवायची. लई गमजा बघा.''

''चांगला आहे की याचा उद्योग!''

''कोण जाब इचारत न्हाई काई न्हाई. आता ह्यो माणगावकर म्हणे पुढच्या वर्षी फॉर्मवर शाळेची मुलं दोनशे लिव्हणार.''

''पण हेडमास्तर जाब विचारत नाही?''

''त्याची काय टाप हाये जाब विचारायची?''

''म्हणजे?''

''अहो हेडमास्तराचं एका बाईबरोबर लफडं हाये. त्ये बाकी कुणाला फारसं माहीत न्हाई पण ह्यो माणगावकर, त्याला माहीत हाये. आता त्ये लपवलं पायजेल की, मग माणगावकरभी गपचीप. हेडमास्तरभी गपचीप.''

''म्हणजे 'एकमेकां सहाय्य करू, अवघे धरू सुपंथ' म्हणायचं तर...''

''आता ह्यो माणगावकर. आणखी गमजा सांगतो.''

''सांग.''

''आता शनिवारी शाळा किती वाजता असते सांगा.''

''सकाळी. म्हणजे सकाळी आठ ते बारा''

''आठ ते बारा. बरोब्बर की न्हाई. पण आमची शाळा फक्त आठ ते आक्रा.''

''आठ ते अकरा? ते कसं काय?''

''शनिवारी जर खिचडी दिली तर मधल्या सुटीत म्हणजी सव्वा धा वाजता दिली पायजेल. होय की न्हाई?''

''बरोबर.''

''ह्यो माणगावकर, याची युक्ती. शाळा आक्रापर्यंत सरळ घ्यायची. आक्राला सोडून द्यायची. मुलं घरी जात्यात. मधली सुट्टीभी न्हाई आणि खिचडीभी न्हाई. शनिवारच्या खिचडीचे पैसे माणगावकरच्या खिशात.''

''आणि शाळा लवकर सुटली म्हणून मुलंही खूश. होय ना?''

''मुलं तर एकदम खुश.''

मग आणखी थोडा वेळ गप्पा मारून आणि गोदेंकडूनच पन्नास रुपये उसने मागून घेऊन गोपाळ निघून गेला.

शिक्षकांची, प्यूनची जशी मते ऐकून घेतली तसेच पालक काय म्हणतात ते ऐकून घेणे गरजेचे आहे, असे राम गोदेंच्या मनात आले. आतापर्यंतचे सर्व मुद्दे त्यांनी कागदावर टिपून ठेवले. त्यांच्या डोळ्यांसमोर ज्यांची मुले शाळेला जातात असे चार-पाच मित्र उभे राहिले. पण आहार योजनेविषयी व्यवस्थित माहिती देईल असा एकही नव्हता. दोन-तीन जण तर सदा सर्व्हिसमध्येच बिझी असायचे. ते मुलांच्या शिक्षणाकडेही लक्ष देत नसत. मुलांना ट्युशन क्लासला पाठवले की आपले कर्तव्य संपले असे त्यांना वाटायचे. एक मित्र फारच अबोल होता. त्याला आहार योजनेची माहिती विचारली असती तर 'ठीक चालले.' 'मधल्या सुटीत खिचडी देतात.' अशी मोघम उत्तरे मिळाली असती. आणखी एक मित्र होता त्याला विचारले असते तर शाळेतल्या खिचडी योजनेबाबत काहीही न सांगता, 'हे सरकार काय योजना राबवणार? योजना बंद पडते, बघ तू.' असे म्हणून सरकारला शिव्या दिल्या असत्या व ''हे सरकार पाडवून 'सुस्वराज्य' पक्षाचे सरकार आणल्याशिवाय काही सुधारणार नाही. एकदा का सुस्वराज्य पक्षाचे सरकार आले, की देशातला सगळा भ्रष्टाचार बंद होतोय बघ.'' असे त्याने सांगितले असते.

आणि अचानक गोदेंना रेगेची आठवण झाली. रेगेची दोन मुले शाळेत शिकत होती. रेगे म्हणजे सर्वगुणसंपन्न व स्पष्टवक्ता माणूस. रेगेकडून खिचडी योजनेची माहिती काढायची असे ठरवून गोदेंनी रेगेचे घर गाठले.

रेगे नुकताच स्मशानापर्यंत एका माणसाला खांदा देऊन परतला होता. त्याची दुसऱ्यांदा आंघोळ झाली होती.

गोदेंनी आपल्या येण्याचा उद्देश त्याला सांगितला. तेव्हा रेगे म्हणाला,

''तुला एक उद्योग नाही बघ. अरे, आज तीन-चार ओळींच्या चारोळ्या लिहिण्याचं युग आलंय आणि तू पंचवीस-तीस पानी प्रबंध लिहिणार? आता तू प्रबंधाचं वाटोळं करणार की प्रबंध तुझं वाटोळं करणार, समजतं नाही बघ. आणि प्रबंधाचा विषय कसा पाहिजे, 'आजच्या समाजवाद्यांनी समाजाचा आणि वादांचा विपर्यास केला आहे काय?' असा दणदणीत विषय पाहिजे. आणि तू त्या नासक्या खिचडीचा विषय घेतलास. आता आमच्या मुलांच्या शाळेत त्या मालगावे मास्तरांनी खिचडीच्या नावानं शाळेचं जे भजं वाजवलंय, त्याला तोड नाही. तुला मालगाव्याची घटना माहीत आहे की नाही?''

''नाही. कोणती?''

''बरं, तू चहा ढोसणार की कॉफी घशात ओतणार, की आंबट सरबत पिणार ते आधी सांग.''

''काहीही चालेल.''

मग रेगेने आत कॉफीची ऑर्डर सोडली.

''हं, ऐक. तो मालगावे लेकाचा. शाळेचा डोकंमास्टर म्हणजे हेडमास्तर. डोकं नसलेल्या वल्लीला हेडमास्तर करायचा त्या शाळेचा नियम असणार, बघ रे गोदे, तो एक नंबरचा साठेबाज, तो व्यापारी व्हायचा चुकून मास्तर झालाय बघ. तर खिचडीसाठी शाळेत आणलेलं डाळीचं पोतं यानं आपल्या घरी नेऊन ठेवलंय. आधी बायको याची डाळ शिजू देत नाही आणि हा शाळेतली डाळ घरी शिजवायला निघालाय. शाळेची गत काय तर नुसतीच तांदळाची खिचडी. म्हणजे कांदे

घातलेला पांढरा भातच की रे.''

''वा: वा:''


''तर या मालगाव्यानं ते पोतं घरी ठेवलंय. कुणीतरी वाइटावर असतंच की रे. त्यात आणि हा सिनिऑरिटी डावलून वशिल्यानं हेडमास्तर झालाय. कुणीतरी शाळेत बातमी पसरवली की इनस्पेक्टर धाड घालणार आहेत, खिचडीचं संपूर्ण साहित्य चेक करणार आहेत. शाळेत आणि घरीही धाडी घालणार आहेत. हा मालगाव्या लटपटायला लागला. भूकंप झाल्याप्रमाणे थरथरलं असणार ते. चड्डी ओली झाली तर नवल नाही, घामानं रे! पहिल्यांदा ते डाळीचं पोतं लपवलं पाहिजे. मग हा आधी घरी पळाला. आतल्या खोलीतलं पोतं घसटत घसटत परसात नेलं. विहिरीच्या कट्ट्याला टेकवून ठेवलं. कुणाला दिसणार नाही असं. विहीर याच्या घरापासून तशी लांबच म्हण की. आणि हा पुन्हा पळत-पळत धापा टाकत शाळेत आला आणि तिकडे मज्जा काय, ते पोतं कठड्यासकट विहिरीत कोसळलं. थोडी डाळ बुडाली की काय कोण जाणे, थोडी तरंगायला लागली. बरं, सांगायची गोष्ट म्हणजे याची विहीर कॉमन. शेजारच्या घरातल्या बायका पाणी भरायला आल्या आणि त्यांचे डोळे फिरायची पाळी आली. चष्मा असता तर चष्माही फिरला असता. बाजारात महाग असलेली डाळ आयती पाण्यावर तरंगतेय. भराभर बायकांचा घोळका जमा झाला.''

तोच रेगेच्या पत्नीने आतून कॉफी आणून दिली. दोघांचीही कॉफी पिऊन होताच रेगे सांगू लागला.

''हां, तर बायकाच त्या. वटवट सुरू झाली. डाळ कुठून आली? विहिरीत कशी पडली? विहिरीच्या कडेलाही थोडी डाळ दिसते, ती कुठली? उगीचच एवढी डाळ विहिरीत कोण, का टाकतंय? कधी कधी म्हैस विहिरीत पडते ते एक ठीक आहे. म्हैस चालत-चालत येते आणि पडते. पण डाळीला काही चालता येत नाही. कोणीतरी विहिरीत डाळ टाकत असणार! ही कुणी करणी तर केली नसेल? कुणी देवदेवस्की तर करत नसेल? नाना बायकांच्या नाना शंका, बघ रे गोदे.''

''पण शेवटी बायकांना समजलं की नाही?'' गोदेने प्रश्न केला.

''समजलं, त्या बायकांत एक भटकभवानी निघाली. ती 'एक ना धड भाराभर चिंध्या' थाटाची भटकभवानी सगळीकडे नाक खुपसत असते. तिनं म्हणे एकदा रात्री दहा वाजता, रिक्षातून मालगावे एक पोतं घेऊन उतरले होते आणि कुणालाही मदतीला न बोलवता ते पोतं ओढत ओढत आपल्या घरात नेलं होतं, ते



पाहिलं त्या पोत्यात डाळच असणार आणि तीच डाळ विहिरीत पडली असणार. पण ती डाळ पैसे खर्च करून शाळेतून आणून विहिरीत का टाकावी ते कुणालाच समजेना. उगीचच लोकांची करमणूक करायची म्हणून काही मालगावे डाळ विहिरीत टाकणार नाहीत. पाणी शुद्ध करायला पोटॅशियम परमँगनेट टाकतात, डाळ टाकत नाहीत. म्हणजे तोही उद्देश नव्हे. नाना तऱ्हेचे तर्कवितर्क निघाले.''

''पण हे प्रकरण शाळेत समजलं होतं का?'' गोदेंचा प्रश्न.

''शाळेत गाजायचं राहतंय होय? मानेमास्तरांच्या शेजारी शाळेची मुलं राहतातच की रे, गोदे. शाळेत शिक्षकांमध्ये तीच चर्चा. 'डाळ तुला नाही, मला नाही, घाल विहिरीला.' अशी अवस्था झाली. त्यादिवशी इन्स्पेक्टरची धाडबीड काही पडली नाही. पण नंतर मात्र ही बातमी वाऱ्यासारखी सगळीकडे पसरली. आणि कुठपर्यंत पोचली सांग? सरळ शिक्षणाधिकाऱ्यापर्यंत पोचली.''

''पोचली का? मग पुढे?'' गोदेंची उत्सुकता वाढली.

''बातमी शिक्षणाधिकाऱ्यापर्यंत पोचली म्हणताच

हा मालगाव्या पळण्याची शर्यत असल्याप्रमाणे शिक्षणाधिकाऱ्याच्या बंगल्यापर्यंत पळत गेला. त्या साहेबाला गाठलं. साहेबाला बातमी समजलेलीच होती. तो शिक्षकांना पिळण्यात बहाद्दर. ओले कपडे अगदी सुकेपर्यंत पिळतात तसं हा पिळणार. त्याला आयतं सावज मिळालं. जाळं न टाकताच जाळ्यात येऊन सापडलं. त्यांनी मालगाव्याला एकदम 'निलंबित करतो' म्हणून धमकी दिली. मालगाव्या सटपटलं, लटपटलं, सरपटलं. सरपटत सरपटत साहेबाचे पाय धरले.''

''मग पुढे?''

''पुढेच गम्मत आहे. साहेब मोठा रंगेल गडी. त्याच्या घरात रंगमहाल. त्या साहेबाची एक भानगड होतीच. बायकोला घटस्फोट देऊन हा साहेब एका अप्सरेच्या मागं लागलाय. त्या अप्सरेशी याला लग्न करायचं आहे. साहेब तयार. अप्सरा तयार. पण अप्सरेचा बाप? 'ये शादी नही होगी' म्हणणारा. तो आप्सरेचं लग्न साहेबाबरोबर लावायला तयार नाही. 'आप्सरेचा बाप डोक्याला ताप' अशी साहेबाची अवस्था झाली. तो मुकेशची गाणी म्हणत फिरतोय सध्या. तर त्या साहेबांनी आता मालगाव्याला धरलंय. अट घातली, की आप्सरेच्या बापाची ओळख काढ, त्याला पटवून दे. आप्सरेच्या लग्नाला मान्यता दे म्हणून. आप्सरेचा आणि आपला साखरपुडा होईपर्यंत सगळं तू जमवायचं. मगच डाळीच्या पोत्याची चौकशी थांबवतो.''

''चांगलीच इंटरेस्टिंग घटना आहे की.''

''तर मालगाव्याचा आता मृदंग झालाय. दोन्ही बाजूंनी बडवायचा. टांग टांग धितांग. टांग् टांग् धितांग, टुंगुक टुंगुक. इकडे साहेब दटावतोय, 'चौकशी चालू ठेवीन.' 'निलंबित करणार,' 'डाळ चोरीबद्दल फौजदारी खटला भरणार' 'खेड्यात बदली करणार' आणि तिकडे आप्सरेचा बाप हट्टाला पेटलाय 'त्या स्त्रीलंपट माणसाला मी माझी मुलगी मुळीच देणार नाही. बायकोला हकलतोय आणि तरुण मुली पाहिजेत साहेबाला. मरेपर्यंत वाट बघ म्हणावं', 'स्वत:ला शिक्षणखात्यातला वाघ समजतोय पण हा भाद्रपदातला कुत्रा आहे', 'माझ्या दारात जर मुलगीला मागणी घालायला आला तर त्याला लाथ मारून बाहेर काढीन.' आणि मालगाव्याचं सँडवीच झालंय. त्याचं पुढे काय होणार समजत नाही. एकंदरीत चौकशी म्हणा, चौकशीचं नाटक म्हणा, चौकशीचा फार्स म्हणा, चालूच राहणार. ते डाळीचं जड पोतं मालगाव्याला फारच जड जाणार एवढं नक्की.''

''बरं, आहार योजनेच्या आणखी काय हकिकती?''

''इतर हकिकतीसुद्धा आहेत हो, त्या हकिकती म्हणजे नगाऱ्यापुढे तुणतुणे.''

''आम्हाला प्रबंध लिहायचा म्हणजे नगाराही लागतो आणि तुणतुणंही लागतंय.''

''बरोबर बोललास बघ, गोदे. आज तुणतुणं दाखवून त्यालाच नगारा म्हणणारे प्रबंधकारही आहेत. सर्वांगीण अभ्यास नाहीच. गाइडला वशिला लावून, चमचेगिरी करून थातुरमातुर अभ्यासावर लिखाण करून डॉक्टरेट पदवी मिळवणारेही आज आहेत. आता एक लहानशी दुसरी घटना.''

''सांग.''

''या मालगाव्याच्याच शाळेतली एक शिक्षिका. तिच्या मुलाचा पहिला वाढदिवस. आता मुलाचा 'हॅपी बड्डे' म्हणजे एक सणच असतो बघ. वाढदिवसाला दोनशे जणांना आमंत्रण देऊन ठेवलेत, पण ती शिक्षिका एक नंबरची काटकसरी. प्रसिद्धी तर पाहिजे पण खर्च करायला नको. आता हॉटेलला खाण्याची ऑर्डर द्यावी की नाही? पण पैसे झिजतात. हिनी घरी फोडणीचे पोहे करायचे ठरवले. प्रत्येकी पाव बशी फोडणीचे पोहे आणि अर्धा पेढा. पण पोहे करायला मोठ्ठं पातेलं पाहिजे. मग शाळेतलं खिचडीचं पातेलं आहेच की. ते घरी आणलं. वाढदिवस झाल्यावर दोन दिवसांनी ते पातेलं परत केलंय. म्हणजे शाळेच्या मुलांना तीन दिवस खिचडी नाही. मालगाव्या तरी तिला जाब काय विचारणार? तो डाळीचं पोतं पळवणारा डोकंमास्तर.''

''वा, वा! छान.'' गोदे हसले.

''आणखी एक घटना सांगतो. त्याच शाळेतली दुसरी एक शिक्षिका. ती तर धुतल्या तांदळासारखी स्वच्छ व्यक्तिमत्त्वाची. म्हणजे काय ते समजलंच असेल तुला. अरे, ती खिचडीसाठी आणलेले तांदूळच पळवायची. आणि कसे पळवायची सांग? पर्समधून. रोज फक्त एक मूठ तांदूळ, शाळा सुटली की जाता-जाता जवळ कोण नाही असे पाहून हळूच तांदूळ पर्समध्ये घालायची. आणि कांदे महाग झालेल्या दिवसात दोन कांदे पर्समध्ये टाकायची. बरेच दिवस हा उद्योग कुणाला माहीत नव्हता. एकदा म्हणे दुसऱ्या एका शिक्षिकेनं पाहिले. मग आठवडाभर गुपचूप पाळत ठेवली आणि एके दिवशी 'रेड हँडेड' पकडतात तसे 'राइस हँडेड' पकडून मालगाव्यासमोर उभं केलं.''

''ते मालगावेसर स्वत:च चोर''

''तेच की रे. उंदीर-मांजर दोस्त दोस्त. तू मला खाऊ नकोस. तू चोरून दूध पितोस ते मी कुणाला सांगत नाही. म्याऊ-

म्याऊ करार. मालगावेचं ठीक आहे रे. पण ती पकडणारी शिक्षिका स्वस्थ कशाला बसते?''

''का? काय झालं?''

''तिनी दुसरे दिवशी शाळाभर मुद्दाम गाजावाजा केला. मग तू गाजावाजा का करतीस म्हणून ही उठली. मग मुलांच्या पुढ्यात जोरदार भांडण सुरू. भांडण अगदी साग्रसंगीत शिव्यांसहित. दोघींनाही भरपूर शिव्या पाठ. बघणाऱ्या मुलांनाही नवनवीन शिव्या समजल्या. मग भांडण मुद्यांवरून गुद्यांवर आलं. हिनी तिची मानगूट पकडली. तिनी हिची तंगडी पकडली. मग दोघींचं कबड्डी-कबड्डी सुरू झालं. हिनी तिला आडवं पाडलं. तिनी हिला चारी मुंड्या चीत केलं. बघणारा शिक्षकवर्ग सगळा पुरुषवर्ग. बायकांना हात लावून कुस्ती कोण सोडवणार? विद्यार्थ्यांना जसे 'गप्प बसा' 'बोलू नका.' 'दंगा नको.' म्हणून सूचना देतात, तसे सारे शिक्षक दुरून त्या दोघींना 'भांडू नका.' 'शिव्या आवरा' 'कुस्ती संपली.' 'आता उठा' 'उठा बघू' अशा सूचना देत होते. मग कुस्तीची वेळ संपली म्हणून असेल किंवा पुरेशी पाठ रगडून निघाली म्हणून असेल, भांडण एकदाचं थांबलं बुवा! मग धुसफुसत, गुरगुरत दोघीही शिकवायला आपापल्या वर्गावर निघून गेल्या. वर्गात काय शिकवलं कोण जाणे.''

''तू सुद्धा एखादी घटना फार मजेशीर पद्धतीनं सांगतोस बुवा.''

''घटना मजेशीर वाटेल. पण अतिशयोक्ती अजिबात नाही. आमच्या मुलांना विचार पाहिजे तर.''

''आणखी काही घटना असल्या तर त्याही सांग.''

''तशा घटना फारशा नाहीत. पण एक मजा सांगतो. तो फडणीस मास्तर रे. एक नंबरचा कामचुकार. मधल्या सुट्टीच्या आदल्या तासाला शाळेत स्वैंपाकी खिचडी तयार करतो. हा फडणीस वर्ग तसाच टाकून तिकडे खिचडी ढवळायला जातो. तासभर आपली खिचडी ढवळत बसायची. या फडणीसला असलीच कामं पाहिजे असतात. सहलीसाठी मिनी बस ठरवायला बाहेर फिरायचं. शाळेच्या मॅगझिन छपाईसाठी दिवसभर छापखान्यात जाऊन गप्पा मारत बसायचं. हे सगळं शाळेच्या वेळात. मुलांच्या अभ्यासाचं भजं वाजेना का, याचं काय जातंय? आणि गावडे नावाचा दुसरा एक मास्तर आहे म्हणे, मध्यान्ह आहार योजना चालू झाल्यापासून तो तर घरी जेवतच नाही म्हणे. शाळेतच चार पाच प्लेट खिचडी चापतोय. बकासूर आहे लेकाचा. अरे, ती खिचडी मुलांसाठी असते. आणि त्याचं वैशिष्ट्य म्हणजे खिचडी कच्ची असो वा करपलेली असो, ती चार-पाच प्लेट चापायचीच, उदर भरणं हेच याचं यज्ञकर्म. तर अशा एकेक गमती. ही अशी माणसं या खिचडी योजनेचं केव्हा भजं वाजवून बंद पाडतील, काही सांगता येत नाही.''

मग आणखी थोडा वेळ गप्पा मारून गोदे तेथून उठले. शिक्षकांकडून, प्यूनकडून, पालकांकडून माहिती मिळवल्यावर शेजारच्या विद्यार्थ्यांकडून गोदेनी थोडी माहिती मिळवली. पण 'खिचडी कधी कधी खारट असते.' अथवा 'फक्त अर्धी बशी खिचडी देतात.' या पलीकडे फारशी माहिती मिळाली नाही. विद्यार्थी फारच घाबरट निघाले.

आता राहिला स्वैंपाकी. स्वैंपाक्यांचे या योजनेबाबत काय म्हणणे आहे हे जाणून घेणे महत्त्वाचे होते. पण आहार योजनेत काम करणारा एकही स्वैंपाकी गोदेंच्या ओळखीचा नव्हता. शेवटी गोदेच्या पत्नीच्या ओळखीची एक स्वैंपाकीण निघाली. तिला पत्नीने जाऊन बोलावून आणले. तीन-चार वेळा 'येतो' 'येतो' म्हटल्यावर एकदाची ती आली. तिचे नाव राधिका होते.

गोदेनी तिला खिचडी योजनेची माहिती विचारल्यावर ती म्हणाली.''योजना फार चांगली आहे हो. त्यामुळे आम्हाला चार पैसे जास्तीचे मिळतात बघा. सरकारनं हे एक बरं केलं बघा.''

''या योजनेविषयी तक्रारी वगैरे आहेत काय? म्हणजे मुलांच्या, पालकांच्या, सरकारच्या वगैरे...''

''तशा म्हटलं तर आहेत... म्हटलं तर नाहीत.'' ती संकोचत म्हणाली.

''काय तक्रारी? कुणाच्या?''

''अय्या... मी इथं आणि कशाला सांगत बसू...'' राधिका लाजली.

''....नाही. मी इतर कुणाकडे बोलणार नाही. माझ्याकडे तक्रारी सांगायला काहीच हरकत नाही.''

''.... आता बघा... कुणाकडे बोलू नका हं... सरकारनी स्टेनलेसचं भांडं घ्यायला सांगितलंय...पण आमच्या माने मास्तरांनी अलिमीनचं भांडं घेतलंय. स्वस्तात पडतंय म्हणून. बाकीचे शिक्षक मागं नावं ठेवत असतात बघा....'' राधिकेनं लाजत लाजत सांगितले.

''ॲल्युमिनीयमचं भांडं उपयोग नाही. स्टीलचं पाहिजे.''

''होय. हो...पण मानेमास्तर आपल्या मनात येईल तेच खरं करतात हो... कुठं बोलू नका हं.... आता डाळ महाग झाले की नाही? तर हे मानेमास्तर म्हणतात. खिचडीला डाळच

घालू नका, ...आता तुम्हीच बघा...डाळीशिवाय खिचडी म्हणजे काय... आणि कांदे महाग झाले, की हे म्हणतात खिचडीला कांदाच घालू नका... असली खिचडी करायची म्हणजे लाजच वाटते बाई... अहो, तो साधा पिवळा भातच झाला की हो... कुठं बोलू नका हं...''

''म्हणजे हे मानेमास्तर पैसे वाचवतात तर.''

''होय बघा.''

''आणि पैसे वाचवून काय करतात?''

राधिका एकदम लाजली म्हणाली.

''....काय करतात ते मला विचारू नका हो... पण इतर मास्तरही तेच म्हणतात....''

''काय म्हणतात?''

''....हे मानेमास्तर पैसे वाचवून काय करणार आहेत म्हणतात. म्हणजे हे वाचवलेले पैसे जातात कुठं?...पैसे काय तिजोरीत जातात की काय? की मानेमास्तर आपल्या घराला सोन्याची कौलं घालणार आहेत म्हणजे सगळे मास्तर मागं बोलत असतात.'' राधिकेने लाजत लाजत सांगितले.

''अस्सं?''

''मध्ये मध्ये तर खिचडीऐवजी सार-भात वाढायचं असं मानेमास्तर म्हणत होते. म्हणजे अगदी पातळ सार आणि पांढरा भात.''

''वा! वा! काय आयडिया आहे.'' गोदे हसले.

''....तुम्ही कुणाकडे बोलू नका...हं...पण मध्ये एकदा नगरसेवकांनी शाळेवर धाड घातली....''

''धाड? कशासाठी?''

''पालकांच्या तक्रारी आल्या होत्या म्हणे. नगरसेवकसाहेबांकडे.''

''कशाबद्दल?''

''हेच की, खिचडीबद्दल. खिचडीला डाळ नसते, कधी-कधी कांदे नसतात, अलिमीनचं भांडं वापरतात. तशा तक्रारी शाळेत आधी मानेमास्तरांकडे सुद्धा आल्या होत्या.''

''बरं, मग?''

''या तक्रारीना मानेमास्तरनी दाद दिली नव्हती. सरकारकडून अजून डाळीचा कोटा सँक्शन झाला नाही. कांद्याचा कोटा सँक्शन झाला नाही असं कायतरी सांगून त्यांना परत पाठवून दिलं... ते कधी भांडत बसत नाहीत. गोड बोलून पाठवून देतात.''

''मग ते पालक नगरसेवकाकडे गेले काय?''

''हां. तसंच झालंय... त्याचं काय झालं... त्या दिवशी अचानक शाळेजवळ राहणारे ७-८ कार्यकर्ते नगरसेवकसाहेबांसह हजर झाले. बरोब्बर मधल्या सुट्टीतच आले. सर्वांना एकदम प्रश्न विचारायला लागले.... पालकांच्या तक्रारी आलेत काय... सरकारकडून खिचडीच्या सामानाचे पैसे वेळेवर येतात काय... सरकारी क्लार्क पैसे खातात काय.... मुलांना खिचडी पुरते की नाही.... खिचडी उरली तर काय करता... कधी-कधी खिचडी करपते काय... पिण्याच्या पाण्याची सोय काय केली... हात धुण्याला पाणी कुठले... स्टेनलेस स्टीलचे भांडे आहे की नाही... असे खूप प्रश्न विचारले... आणि अचानक...खिचडी खाऊन बघणार म्हणाले.''

''खिचडी खाणार म्हणाले?'' गोदे चकीत झाले.

''होय. एकदम म्हणाले की हो... पंचाईतच झाली की हो... सर्वांची एकदम तारांबळ उडाली हो... आता खिचडी खाऊन बघणार म्हणजे..... पुढे काय होणार... मग सर्व कार्यकर्त्यांना आणि साहेबांना खिचडी दिली.... थोडी खिचडी खाल्यावर माझ्यावर ओरडायला सुरुवात केली की हो...''

''तुमच्यावर?''

''हो माझ्यावर... मुलांना रोज अशीच खिचडी देता काय म्हणून ओरडले. त्यादिवशी खिचडीला डाळही नव्हती. कांदेही नव्हते. साहेब माझ्यावर ओरडले...मला काही सुचेना. शेवटी कुलकर्णीसर देवासारखे अचानक मदतीला धावून आले. कुलकर्णीसरांनी आमची बाजू घेतली... आणि नगरसेवकसाहेबांच्या कानात मानेमास्तरांचे नाव सांगितलं...''

''सांगितलं?''

''....हो त्यांचं नांव सांगितलं....साहेब आल्यापासून मानेमास्तर आतल्या खोलीतच थांबले होते. पुढे आले नव्हते.... पण साहेबांनी बोलावलं की... कोण ते मानेमास्तर, बोलवा त्यांना.. म्हणून बोलावलं की हो.''

''बरं मग?''

''मग मानेमास्तरांवर ओरडायला सुरू केलं....पण मानेमास्तर पक्के... त्यांनी 'खरं काय घडलंय ते सांगतो, चला.' म्हणून फक्त एकट्या साहेबाला झाडाखाली नेलं... कुठं बोलू नका हं... त्या नगरसेवकसाहेबाला म्हणे चिकनबिर्याणी फार आवडते... तर मानेमास्तरांनी त्याला व्हिस्की आणि चिकनबिर्याणी देतो म्हणून कबूल केलं... ते साहेब खूश... मग त्यांनी ओरडणं थांबवलं. 'मी मध्ये मध्ये तपासणी करणार, खिचडी चांगली द्या मुलांना.' एवढं सांगून ते... नगरसेवकसाहेब जीपमधून गुपचूप निघून गेले. त्यानंतर मात्र तीन-चार दिवस

खिचडीत डाळ आणि कांदे दोन्ही भरपूर घालायला मानेमास्तरनी सांगितलं हो.'' राधिका लाजत लाजत म्हणाली.

''वा! एकंदरीत मजा मजा चाललेत तर या आहार योजनेत. बरं, शाळेतल्या स्वैपाकाचं काम तुझ्याकडे पहिल्यापासून आहे?''

''नाही. माझ्या आधी दुसरी होती.''

''कोण?''

''कोमल''

''कोमल? मग तिनं काम सोडलं?''

''तिला काढून टाकलं''

''का?''

''...तिचं काय होतं, ती आठवड्यातल्या सहा दिवसापैकी चारच दिवस कामाला यायची...''

''चारच दिवस? मग उरलेले दोन दिवस मुलांना खिचडी नाही?''

''नाही हो. खिचडीच नाही बघा.''

''पण चुकवण्याचं कारण काय?''

''...आता कसं सांगू? ...नको घ्या. मी सांगत नाही...'' राधिका लाजली.

''मी कुणाकडेही बोलणार नाही. सांग तू.''

''....बोलू नका हं कुणाकडे... ते मानेमास्तर...त्यांनी कोमलला आपल्या घरी स्वैंपाकाला लावलं.... चार दिवस शाळेत खिचडी करायची. दोन दिवस तिनी मानेमास्तरांच्या घरी स्वैंपाक करायचा. मानेमास्तरांची बायको आळशी, म्हणून कोमलला स्वैंपाकाला लावलं हो, आणि घरी वेगळा पगार नाही. शाळेत खिचडी करण्यासाठी जो पगार देतात नै, त्याच पगारात मानेमास्तरांच्या घरचा स्वैपाक.''

''अस्सं का? वा! वा!''

''पण घरी भाकऱ्या, आमटी, भाजी, भात सगळंच की हो.''

''अस्सं. बरं, पण तिला काढून का टाकलं?''

''...ते मी सांगत नाही...'' राधिका लाजली.

''मी कुणाकडे बोलणार नाही.''

''...म्हणजे त्याचं काय झालं... ती कोमल तरणीताठी बाई हो... मानेमास्तरांची बायको तिच्यावर संशय घ्यायला लागली की हो.. ती आपल्या नवऱ्याला भुलवेल. त्याला नादी लावेल. आपला नवरा फशी पडेल... मग तिनं नवऱ्याला अट घातली, कोमलला काढून टाका... नुसतं घरातून काढून टाका नव्हे. शाळेतूनच काढून टाका. खिचडीसाठी दुसरी बाई नेमा.. मग मानेमास्तरनी नाइलाजानी तिला काढून टाकलं की हो... तसे खरे मानेमास्तर बायकांच्या बाबतीत एकदम सज्जन... एवढ्या तरण्या मास्तरणी शाळेत असतात, पण कधी कुणाकडे वाकडा डोळा करून बघितलं नाही हो.. अगदी साधे बघा.''

''एकंदरीत असं आहे तर...''

''आणखी एक मास्तरीणबाई आहे हो शाळेत. तिचं नाव अथणीकर-कुलकर्णी. तिचे सणवार खूप असतात बघा हो. ती सोमवार आणि गुरुवार करते, सोमवार शंकराचा म्हणून आणि गुरुवार दत्ताचा म्हणून. तर तिनी मला एकदा येऊन सांगितलं, दर सोमवारी आणि गुरुवारी साबुदाण्याची खिचडी करायची म्हणून.. माझी पंचाईत आली की हो.''

''बरोबर, मानेमास्तरांनी सांगितल्याशिवाय तुम्ही एकदम बदल कसा करणार? साबुदाणे विकत आणण्याचा प्रश्न आहेच. खरं ना?''

''बरोबर बोललात बघा. मी मानेमास्तरांना सांगितलं. मग मानेमास्तरांनी शिक्षकांची मीटिंग बोलवली. साबुदाण्याच्या खिचडीचा ठराव मांडला की हो एकदम! पण शिक्षकांमध्ये आपापसात पटेना बघा. सगळे सोमवार आणि गुरुवारच का म्हणून बसले. एक म्हणाला, माझा गणपतीचा मंगळवार आहे. मंगळवारी साबुदाणा खिचडी कर. दुसरा म्हणाला, शनिवारी करा. आपला मारुतीचा वार आहे. दुर्गादेवीचा शुक्रवार करणारीही एक मास्तरीण बाई निघाली की हो. शेवटी मानेमास्तरनी सगळं रद्द केलं. साबुदाणा खिचडीबिचडी काही नाही. साधी नेहमीचीच खिचडी करणार म्हणाले. तरी सुद्धा अथणीकर-कुलकर्णी बाईंचं म्हणणं साबुदाणा खिचडी नाही तर नाही, निदान गुरुवारची खिचडी कांदे न घालता तरी करा. मानेमास्तर त्याला तयार होतील असं वाटतंय. चला, निघते मी. माझी कामाची वेळ झाली.''

एवढे सांगून राधिका निघून गेली.

राम गोदेंकडे आता पुरेसे मुद्दे जमले होते. ते मुद्दे व्यवस्थित रचून आणि त्याचे सविस्तर विश्लेषण करत ते आता प्रबंध लिहिणार होते. 'सरकारी मध्यान्ह आहार योजना-उद्देश, कृती आणि फलश्रुती.' हे नाव प्रबंधाला द्यायचे त्यांनी ठरवून टाकले होते.

**सुभाष सुंठणकर**
२२१/२, दि आदर्श को.ऑप.क्रे.सोसायटी इमारत,
शनी मंदिराजवळ, कपिलेश्वर रोड, बेळगाव - ५९०००१
भ्रमणध्वनी : ९९०२८९५५१०
फोन: ०८३१-२४२५६८४

# ऋणानुबंधी

## प्रभा पुरोहित

त्या दिवशी मी नेहमीप्रमाणे शाळेतून घरी आले, गाडी गॅरेजमध्ये ठेवली अन् माझ्या सहा महिन्यांच्या मुलाला–श्रीरंगला घेऊन मागच्या व्हरांड्यात येऊन बसले. त्याला दिवसभर सांभाळणारी राधाबाई माझ्यासाठी पाणी घेऊन आली. मी पाणी प्यायले अन् श्रीरंगला खेळवण्यात रमले. मी त्याला उंचावत होते आणि तो आनंदानं खिदळत होता. राधाबाई माझ्यासाठी चहा घेऊन आली. तिनं श्रीरंगला घेतलं. मी चहा संपवला. मी श्रीरंगला घेतलं अन् पुन्हा आमचा खेळ सुरू झाला. त्यात आम्ही दोघंही पूर्ण रंगलो होतो. तेवढ्यात राधाबाई मला म्हणाली, ''बाई, बघा, बघा.'' पण माझं लक्षच नव्हतं. ''अहो बाई, पाहा तर खरं तिकडे, आपल्या टाक्याकडे.'' मी जरा दचकलेच. मनात आलं, काय आहे, कोण जाणे! सापबीप तर नसेल? मी श्रीरंगला पोटाशी धरलं. आमच्या टाक्याच्या काठावर एक सुंदर पोपट येऊन बसला होता; हिरवा हिरवाकंच अन् लालचुटुक चोचीचा. आम्ही त्याच्याकडे बघत होतो. तो आपल्याच तालात टाक्याच्या काठावर नाचत होता. मधूनच शीळ वाजवायचा, मधूनच 'मिठ्ठू' 'मिठ्ठू' म्हणायचा. मध्येच पाण्यात चोच बुडवायचा. मला तर आश्चर्यच वाटत होतं. राधाबाई म्हणाली, ''बाई, हा कोणाच्या तरी घरचा मिठ्ठू आहे. बघानं कसा बोलतो. शिकवल्यावाचून असा बोलंन का राघू, मैनेवानी?''

मला हसायलाच आलं. राघू मैनेवानी (मैनेसारखा) बोलत होता म्हणे.

''बाई, हसू नका. आपन त्येला पकडू. नाहीतर कावळे त्यास मारून टाकतील.''

''अग, पण पकडणार कसं? आपण जवळ गेलो की तो उडून नाही का जाणार?''

''पन परयतनं करावा नं.'' राधाबाईचा आग्रह.

''बरं चल, करते प्रयत्न. एक फडका आण अन् एक केळं आण. आहे नं घरात? श्रीरंगला घे तू आता.''

'हस्ती करी वलय अशा उपायी । भूपे हळूच धरिला कलहंस पायी।।' अशा काहीतरी ओळी आठवत, हातात केळं आणि फडकं घेऊन दबकत दबकत पुढे सरसावले. मी पोपटाजवळ पोचले तरी त्यानं माझी काही दखल घेतली नाही. मी धीटपणे आणखी पुढे गेले, अगदी त्याच्याजवळ. हातातलं केळं त्याच्यापुढे धरलं. पोपटही धीटपणे पुढे सरसावला केळं खायला. मी केळं टाक्याच्या काठावर ठेवलं. पोपट लगबगीनं पुढे आला अन् त्यानं केळं खायला सुरुवातही केली. पोपट

खाण्यात गुंतलेला बघून मी माझ्या हातातलं फडकं हळूच त्याच्या अंगावर टाकलं. त्यानं थोडी फडफड केली. पण तो केळ्यासकट फडक्यात अडकला. पोपट तर पकडला गेला. पण मोठा प्रश्न पुढे उभा राहिला की त्याला ठेवायचं कुठे, अन् कसं? घरात पिंजरा नव्हता. कसा असणार? ह्यापूर्वी असा पक्षी पाळण्याचा विचार कधी डोक्यातही आला नव्हता. आता काय करावं? काही सुचेना. संध्याकाळ झाली होती. पिंजऱ्याचा प्रश्न आज सुटणार नव्हताच.

कॉलेजमधून केशव घरी आला. त्याच्या मते पक्ष्यांना पिंजऱ्यात बंदिवान करणं योग्य नव्हतं. तसं ते मलाही मान्य नव्हतंच. पण, इतर पक्षी त्याला त्रास देतील, मारून टाकतील. ह्या राधाबाईनं काढलेल्या शंकेच्या प्रभावाखाली मी वागले होते. केशव म्हणाला, ''असं मीही ऐकलं आहे. खरं-खोटं कोणाला माहीत! उद्या आपण पिंजरा आणू या.''

मला हायसं वाटलं. एका रात्रीचाच प्रश्न होता. तोपर्यंत आपण त्याला मोठ्या टोपल्याखाली ठेवूया असा विचार केला. रोजची खरकटी भांडी घासल्यावर ती भरून ठेवायची एक मोठी टोपली होती, ती रिकामी केली. पेरू, केळं, हिरवी मिरची अन् एका वाटीत पाणी अशी तयारी केली. पोपटाला टोपलीखाली बाहेर व्हरांड्यात ठेवणं धोक्याचं होतं. मांजर, मसन्याऊद वगैरेची भीती होती. शिवाय टोपली कुरतडून तो उडूनही जाऊ शकत होता. शेवटी त्याला देवघरात ठेवायचं ठरवलं. आमच्या घरी देव नसल्यानं ते रिकामच होतं. त्या छोट्याशा स्वतंत्र खोलीला एक जाळीबंद खिडकीही होती. सर्व विचार करून, पूर्ण तयारीनिशी पोपटाशी देवघरात व्यवस्था झाली. त्याला टोपलीखाली ठेवून देवघराचं दार बंद करून घेतलं.

दुसऱ्या दिवशी पिंजरा आणल्यावर देवघराचं दार हळूच किलकिलं केलं, त्या देवदूताला बघायला. बघते तर तो टोपलीवर बसलेला. त्यानं टोपलीच्या कैदेतून आपली सुटका करून घेतली होती, कशी कोण जाणे! इकडेतिकडे पेरूचे, केळ्याचे तुकडे पसरलेले, पाणी लवंडलेलं अशी खोलीची दुरवस्था अन् स्वत: टोपलीवर आरूढ!

पेरू, केळं, भिजवलेली चण्याची डाळ, हिरवी मिरची, पाण्याची वाटी असं सगळं पिंजऱ्यात ठेवलं. पिंजऱ्याचं दार उघडं करून ठेवलं अन् पिंजरा हळूच खोलीत सरकावला. दाराच्या फटीतून मी बघत होते, राघू काय करतो ते. तो टोपल्यावरून खाली उतरला अन् पिंजऱ्याच्या दिशेनं निघाला, एकेक पाय टाकीत. दाराशी थोडा थांबला. 'आत जाऊ की नको' असा विचार करत होता की काय? पण तो एकदाचा आत शिरला. अन् मिरची चावू लागला. तो खाण्यात गुंतलेला आहे असं पाहून मी त्याच्या नकळत हळूच पिंजऱ्याचं दार बंद केलं. लगेच बाहेर आले. त्याला पिंजऱ्यात स्थिरावू द्यावं असा विचार केला. नंतर पिंजरा बाहेर आणून व्हरांड्याच्या खिळ्याला टांगला.

मिठ्ठू पिंजऱ्यात कसा राहतो ही एक काळजी होती. परंतु त्यानं फार काही गडबड केली नाही. त्याला पिंजऱ्याची सवय असावी असंही वाटलं. असा हा राघू आमच्या घरातला एक सदस्य झाला. त्याच्या येण्यानं, वास्तव्यानं आमच्या घरात चैतन्य आलं, त्याची सुरेल शीळ, त्याचं, 'मिठ्ठू, मिठ्ठू' गोड बोलणं, पंख फुलारून पिंजऱ्यात नाचणं, सगळंच कसं आम्हाला सुखावू लागलं. आमचा छोटासा सुबक बंगला 'सुख'रूप झाला. आमच्याकडे शिकायला राहणारी माझी भाची सुहास अन् केशवचे प्रोफेसर मित्र मुकुंदराव बुरडकर (त्यांना क्वार्टर मिळेपर्यंत ते आमच्या घरीच राहत होते) ह्यांनाही त्याचं कौतुक वाटे. मुख्य म्हणजे राधाबाई त्याची खूप काळजी घ्यायची. त्याच्यासाठी डाळ भिजवून ठेवणं, वाट्या घासून ठेवणं, हिरवी मिरची, फळं राखून ठेवणं, हे सगळं ती करायची. 'तिच्यामुळे तो आमच्या घरी आला होता त्यामुळे तिची ती जबाबदारी आहे' असं तिला वाटायचं की काय, न कळे! पण त्याची सगळी कामं- पिंजरा धुण्यापासून सर्वच- ती खुशीनं करायची. त्यामुळे मी निर्धास्त!

आमचा पोपट शीळ घालायचा, 'मिठ्ठू मिठ्ठू' बोलायचा ह्यात काही नवल नव्हतं. पण तो 'चॅक, चॅक' असा आवाज काढायचा, टांगेवाला घोड्याला हाकताना काढतो तसा. ह्याचं मात्र नवल वाटायचं. मी मग राधाबाईला विचारायची, ''हा टांगेवाल्याच्या घरचा पोपट असेल का गं?''

ती हसायची, म्हणायची ''काजीनं बा?''

त्यावेळी अमरावतीला थोडे टांगे होते. आमच्या विदर्भ महाविद्यालयाच्या कॉलनीतही एक टांगा होता. पण त्यांच्याकडे कधी पोपट नव्हता. कुठून शिकला असेल तो असा आवाज काढायला? हा मिठ्ठू जरा नकल्याच होता. माझ्या मुलीला सांभाळायला लक्ष्मी नावाची बाई होती. तिच्या हसण्याची तो हुबेहूब नक्कल करायचा. ती हसली, की तो हसायचा, तिच्यासारखाच. जणू तिला चिडवतोय. ती चिडायची अन् म्हणायची, ''हात् रांडलेका, मज काऊन

एडावते तू? थांब तूज एक तिखट मिरची देतो.'' तिखट मिरची खाऊन तो गोड शीळ घालत नाचायचा. मग लक्ष्मीचा राग कुठल्या कुठे पळून जायचा. आम्हालाही हसू यायचं.

त्याची आणखी एक गोष्ट. मला अचंब्यात टाकायची. केशव कॉलेजातून घरी यायचा तेव्हा पुष्कळदा त्याच्याबरोबर त्याचे मित्रही असत. ते गप्पा मारत मारत यायचे. केशवचा आवाज मिठ्ठू अचूक ओळखायचा. तो आपली पिसं फुलवून पिंजऱ्यात नाचू लागायचा. खुशीनं गिरक्या घ्यायचा. मी थट्टेनं केशवला म्हणायची, ''अरे, हा राघू नाही, मैना आहे, तुझी मागच्या जन्मीची प्रेयसी तर नाही? तुझा आवाज ऐकून बघ कशी खुशीत येते अन् नाचते.''

केशव हसून विचारायचा, ''तुला हेवा वाटतो?'' मलाही हसू यायचं.

सरकारी नियमाप्रमाणे आम्हाला बंगले बदलावे लागायचे. तसा तो आमच्याबरोबर एकाहून एका मोठ्या बंगल्यात फिरला. नव्या जागेत गेलं की तीन-चार दिवस तो 'मूक' असायचा. सवय झाली जागेची, की मूळ पदावर यायचा. पशुपक्ष्यांना देखील स्वभाव-व्यक्तित्व असतं? त्याचं शीळ घालणं, बोलणं, नाचणं, नकला करणं सुरू झालं, की आम्हाला स्वस्थ वाटायचं.

१९७२ साली आमची मुंबईला बदली झाली, अमरावतीहून पूर्वी आम्ही थोडे दिवस बाहेरगावी गेलो तरी मिठ्ठूला सोडून जाताना आमचा जीव आत-बाहेर व्हायचा; आमच्या बंगल्याच्या आउट हाऊसमध्ये राहणारे लोक त्याची छान काळजी घ्यायचे तरीही. पण आता आम्ही कायमचे मुंबईला जाणार होतो. प्रश्न होता मिठ्ठूचा, आउट हाउसमध्ये राहणारे सुधाकर, प्रभाकर, ज्ञानेश्वर सगळे त्याला सांभाळायला एका पायावर तयार होते. प्रश्न मिठ्ठूचा नव्हताच. खरा प्रश्न होता तो आमचाच. आम्ही त्याला असं देऊन टाकू शकत नव्हतो. तो आमचा होता अन् आमच्याबरोबरच राहणार होता. पण त्याला न्यायचं कसं? सामानाच्या ट्रकबरोबरच पाठवणं आम्हाला रुचत नव्हतं. आम्ही विचारात पडलो. शेवटी निर्णय घेतला, 'मिठ्ठू आमच्याबरोबरच येणार. आमच्या गाडीतून' अन् मिठ्ठूला घेऊन निघालो, मुंबईच्या लांबच्या प्रवासाला. लांबच्या प्रवासाची सर्व तयारी केली. मिठ्ठूचा विचार करून थांबत थांबत जायचं ठरवलं. तरी मिठ्ठूला प्रवास कसा झेपेल हा विचार आम्हाला अस्वस्थ करीत होताच.

प्रवासात -आमच्या हेरॉल्ड गाडीनं केलेल्या त्या दीर्घ प्रवासात- आमच्या शहाण्या मिठ्ठूनं मुळीच त्रास दिला नाही. त्यानं फडफड केली नाही, की तोंडातून एक शब्दही काढला नाही. मौनव्रत धारण केलेल्या एखाद्या मुनीप्रमाणे तो डोळे मिटून स्वस्थ होता. मुंबईला घरी पोचल्यावरही दोन-तीन दिवस मुका-मुकाच होता. हळूहळू तो स्वरंगात आला. शीळ घालणं, मिठ्ठू मिठ्ठू म्हणणं सर्व सुरू झालं. यथावकाश तो ह्या नव्या घरातही रुळला, इतका की जिन्यात केशवची पावलं वाजली, की त्या 'पदन्यासा'बरोबर पिंजऱ्यात त्याचा 'पंखन्यास' ही सुरू व्हायचा. मला गंमत वाटायची. मनात यायचं, 'माझ्याआधी ह्याला कसं कळतं? ह्याचे कान (?) तीक्ष्ण आहेत की ह्याला दुरूनच गंध येतो? प्रत्येकाचा निराळा गंध तो ओळखतो? अनेक अनुत्तरित प्रश्न!

आमचा मिठ्ठू मुंबईकर होतो आहे, हे आमचं छोटं घर म्हणजे सदनिका त्यालाही आवडली ह्याचं आम्हाला समाधान वाटत होतं. मुंबईची एकच गोष्ट आमच्या मिठ्ठूला आवडत नव्हती; ती म्हणजे 'मुंबईचे कावळे'. अमरावतीला हे पक्षी त्याला फारसे दिसत नव्हते. आमच्या अंगणात चिमण्या सतत असायच्या, पारवे असायचे, बुलबुलदेखील येऊन जायचे. पण कावळे दिसत नसत. हे काळे पक्षी आमच्या मिठ्ठूला मुळीच आवडत नसत. त्याचा पिंजरा बाल्कनीत लावला, की तो आरडाओरडा करायचा. कावळ्यांची काव-काव त्याला मुळीच सहन होत नसे. त्याच्या पिंजऱ्यासाठी मग मी बाल्कनीऐवजी घरातच जागा केली.

मुंबईत आमच्या मिठ्ठूचं वास्तव्य सुखानं चालू असलं तरी तो आता म्हातारा होऊ लागला होता, हे आम्हाला जाणवू लागलं. त्याचं शीळ घालणं, पंख फुलारून नाचणं कमीकमी होऊ लागलं होतं. तसंच त्याचं खाणंही कमी होऊ लागलं होतं. आम्हाला त्याची काळजी वाटायची.

मुलांना अन् आम्हालाही दिवाळीच्या सुट्ट्या लागल्या तेव्हा आम्ही सर्वांनी दिवाळीसाठी चंद्रपूरला (माझ्या माहेरी- मुलांच्या मामाच्या घरी) जावं असं ठरवलं. खूप दिवसांत आम्ही तिकडे गेलोच नव्हतो. पण आमचा जीव मिठ्ठूत अडकत होता. त्याला कुठे ठेवायचं? त्याची काळजी कोण घेणार इथे मुंबईला? अमरावतीला असा प्रश्न पडत नव्हता. इथे त्याला असं वाऱ्यावर सोडून कसं जाणार? आमची ही घालमेल, आमचे शेजारी बाबासाहेब कर्णिकांच्या लक्षात आली. ते म्हणाले, ''प्रभाताई, तुम्ही नका काळजी करू.

आम्ही सांभाळू तुमच्या पोपटाला. आमचे 'बुवा' (त्यांचा घरगडी-त्यांच्या घरीच राहणारा.) त्याच्याकडे पूर्ण लक्ष देतील. त्याचं खाणं-पिणं सगळं सांभाळतील. तुम्ही जाऊन या, नि:शंक मनानं.'' असं सगळं ठरलं. बाबासाहेबांच्या शब्दाबाहेर आम्ही कसे जाणार? आम्ही तयारीला लागलो. मिठूला मी सांगितलं, ''आम्ही जाणार आहोत पण लवकर परत येऊ.'' त्याच्यासाठी चण्याची डाळ, पेरू, मिरच्या असं सगळं बुवांच्या स्वाधीन केलं. अन् आमच्या घराची किल्लीही दिली. मिठू कदाचित त्यांच्याकडे राहणार नाही अशी माझ्या मनात शंका होती. सगळी तयारी झाली आणि रात्री आम्ही लवकरच झोपलो.

आम्ही झोपलो खरे पण मला काही स्वस्थ वाटेना, नीट झोपही येईना, आपण गेल्यावर मिठू घरी एकटाच राहणार, तो कसा राहील? असे विचार सारखे मला सतावत होते. मी कड बदलत पहाट होण्याची वाट बघत राहिले. एखादी डुलकी लागली तरी गाढ झोप आलीच नाही. पहाटे रोज ऐकू येणारी मिठूची शीळ! त्या शिळेची मी वाट बघत वेळ घालवीत होते. उजेडायला आलं तरी शीळ कानावर आली नाही. शेवटी मी उठले, मिठूच्या पिंजऱ्याजवळ गेले. बघते तर मिठू पिंजऱ्यात आडवा पडलेला. असं कसं झालं? काल तर तो चांगला होता. त्याला एकटं टाकून आम्ही गावाला जाणार हे तर त्याला कळलं नसेल? मला कळेना. म्हणूनच तर तो आम्हाला टाकून एकटाच पुढे निघून गेला नसेल ना?

थोड्या वेळानं सगळेच-केशव, श्रीरंग, मन्ना-उठले. आमचा मिठू गेला हे त्यांना खरंच वाटेना. पण ते स्वीकारणं तर भागच होतं. आमच्या सोसायटीच्या चाफ्याच्या झाडाखाली आम्ही त्याला चिरविश्रांती दिली. एका तपापेक्षा जास्त असलेला सहवास संपलेला होता. जड मनानं प्रवासाला निघालो.

चंद्रपूरला गेलो. तिथल्या गडबडीतही मिठूची आठवण मनात सतत होती. विसरायचा प्रयत्न करण्यात काही अर्थ नव्हता. आठ-दहा दिवसांनी परतलो तेव्हा घरात मिठू नाही हे तीव्रतेनं जाणवलं. त्याचं शीळ घालणं, पंख फुलारून नाचणं, हसण्याची नक्कल करणं ह्या सगळ्या गोष्टींची आठवण करीत घराचं दार उघडलं. घरात पंखांची फडफड ऐकू आली. हा भास तर नाही ना? पण तो भास नव्हता. घरात आलो. बघतो, तर पिंजऱ्यात एक पोपट! तेवढ्यात बाबासाहेब कर्णिकांकडचे बुवा घरात आले. मी त्यांना विचारलं, ''बुवा, हे काय?''

''मिठूचं नसणं तुम्हाला... म्हणून मी हा पोपट घेऊन ठेवला...'' खरं तर मला ते काही आवडलं नव्हतं पण त्यांची भावना लक्षात घेऊन मी काही बोलले नाही.

हा पोपट आमच्या घरी कधी रुळलाच नाही. पिंजऱ्यात त्याची सारखी धडपड चालू असायची. बाहेरच्या पोपटांचे आवाज ऐकले की त्याची बेचैनी खूपच वाढायची. पिंजऱ्यातून बाहेर पडण्याची त्याची धडपड असायची. हे सर्व मी आठ-दहा दिवस कसंतरी सहन केलं. एक दिवस मी पिंजरा बाल्कनीत नेऊन ठेवला. पिंजऱ्याचं दार उघडलं अन् काय होतं ते बघत बसले. बाल्कनीच्या शेजारच्या अशोकाच्या झाडावर एक पोपटाची जोडी येऊन बसली होती. त्यांचा आवाज ऐकताच पिंजऱ्यात फडफड सुरू झाली अन् एका क्षणात पोपटानं पिंजऱ्याच्या बाहेर झेप घेतली. बाहेरच्या जोडीत तो सामील झाला अन् तिघेही उडून गेले.

केशव कॉलेजातून घरी आला. रिकामा पिंजरा बघून त्यानं विचारलं, ''पोपट कुठे आहे?''

''तो उडून गेला.'' मी उत्तरले.

''असा कसा उडाला?''

''पिंजऱ्याचं दार उघडं होतं.''

''कुणी ठेवलं?''

''मी.''

''का?'' अशी प्रश्नोत्तर सुरू झाली. मी सांगितलं, ''मला त्याची तडफड बघवत नव्हती. कशाला बिचाऱ्याला कोंडून ठेवायचं?''

''अग, पण त्याला इतर पोपटांनी मारलं तर?'' केशवची शंका.

''तसं काही नाही. इतर पोपटांबरोबर तो मजेत उडून गेला. मी बघितलं नं.'' माझा विश्वास मी बोलून दाखवला. केशवला ते कितपत पटलं कोण जाणे!

मिठूचा पिंजरा मी आमच्या मोलकरणीला देऊन टाकला. आमच्या मिठूची जागा कोणी दुसरा पोपट घेऊ शकणार होता का? आमचा 'मिठू' आमचा होता. आमचा ऋणानुबंधी होता हेच खरं!

**प्रभा पुरोहित**
५, अभंग, साहित्य सहवास,
वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१.
फोन : २६५९०५४३

RNI NO - 428 / 1987
RUCHEE Regd. MH/MR/WEST/79/2009-2011 POSTED AT MUMBAI PATRIKA CHANNEL STG OFFICE. MBI - 400 001




'रुची' हे मासिक संपादक दिनकर गांगल यांनी 'ग्रंथाली'करता इंडिया प्रिंटिंग वर्क्स, इंडिया प्रिंटिंग हाऊस, ४२, जी. डी. आंबेकर मार्ग, वडाळा, मुंबई ४०० ०३१ येथे छापून ग्रंथाली, द्वारा संडियन एज्युकेशन सोसायटीची महात्मा फुले कन्याशाळा, दादर (प), मुंबई ४०००२८ येथे प्रकाशित केले.